बक्षिसें व लायब्ररी यांजकरितां सरकारनें मंजूर केलेलें पुस्तक.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

—गीता.

मुलांचा महाराष्ट्र.

(मराठ्यांचा गोष्टीरूप इतिहास.)

लेखक

गोविंद अनंत मोडक, बी. ए.

आवृत्ति चौथी.

१९२४

किंमत दोन रुपये.

हें पुस्तक पुणें, पेठ शनवार, घ. नं ४९५ येथें **गणेश काशिनाथ गोखले** सेक्रेटरी **श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स**, यांनीं छापिलें

व

गोविंद अनंत मोडक, यांनीं पुणें, पेठ नारायण, घ. नं. ४१० येथें प्रसिद्ध केलें.

आधारभूत ग्रंथांची यादी.

बखरी:—

१ कृष्णाजी अनंत सभासदकृत शिवचरित्र. २ मल्हार रामराव चिटणीस-विरचित शिवछत्रपतींचें सप्तप्रकरणात्मक चरित्र [चिटणीस-बखर]. ३ शिव-दिग्विजय. ४ चिटणीसकृत संभाजी, राजाराम व शाहू यांचीं चरित्रें. ५ मराठी साम्राज्याची छोटी बखर. ६ मराठी दप्तर-रुमाल पहिला, भोंसले यांची बखर, [शेडगांव बखर]. ७ मराठी दप्तर रुमाल दुसरा. ८ पेशव्यांची बखर. ९साष्टीची बखर. १० भाऊसाहेबांची बखर. ११ रघुनाथ यादवकृत पानिपतची बखर. १२ दाभाडे यांची बखर. १३ हरिवंशाची बखर.

रसल कागदपत्र:—

काव्येतिहाससंग्रह, पत्रें, यादी वगैरे.

रा. राजवाडेकृत मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १–२१ [म.इ.सा.खं.].

ग. खरे यांचा ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग १–११.

भारतवर्ष मासिक वर्ष १ व २.

पारसनीसकृत इतिहाससंग्रह.

वाडकृत सातारचे राजे व पेशवे यांच्या रोजनिशींतील उतारे भाग १–९ [वाड, भाग].

भारत-इतिहाससंशोधक मंडळ, इतिवृत्तें, शके १८३२–३९ [भा. इ. सं. मं. इतिवृत्त].

८ भारत-इतिहाससंशोधक मंडळ, संमेलनवृत्तें १–७ [भा. इ. सं. मं. संमेलनवृत्त].

९ भारत-इतिहाससंशोधक मंडळ, त्रैमासिक वर्ष १ व २.

रा. पारसनीसकृत ब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र व पत्रव्यवहार.

द. वि. आपटेकृत इतिहासमंजरी.

—

राजवाडेकृत राधामाधवविलासचंपू ऊर्फ शहाजीचें चरित्र.

ग. कळुसकरकृत शिवाजीमहाराजांचें चरित्र.

जो. सरकार यांचा ' शिवाजी व त्याचा काळ ' (इंग्रजी).

रा. खेरकृत नानाफडणविसाचें चरित्र.

५ नातूविरचित महादजी शिंद्याचें चरित्र.
६ गोगटेकृत-नानासाहेब पेशवे व शाहूचें चरित्र.
७ अत्रेकृत मल्हारराव होळकर याचें चरित्र.
८ पुरुषोत्तमकृत-देवी अहल्याबाई.
९ शाळिग्रामकृत-बापू गोखले.
१० निगुडकरकृत-परशुरामभाऊ पटवर्धन.
११ प्रभुरत्नमाला.

इतिहासः—

१ ग्रँट डफ यांचा मराठ्यांचा इतिहास (इंग्रजी).
२ 'किंकेड व पारसनीस'कृत मराठ्यांचा इतिहास भा १ व २ (इंग्रजी).
३ रा. सरदेसाई यांची मराठी रियासत पूर्वार्ध व मध्यविभाग नं. १, २, ३.

इतर पुस्तकेः—

१ न्यायमूर्ति रानडे यांचा मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष (इंग्रजी).
२ रा. केळकरकृत मराठे व इंग्रज.
३ रा. खरेकृत अधिकारयोग.
४ रा. पारसनीसकृत-मराठ्यांचे पराक्रम.
५ ,, मराठ्यांचें अरमार.
६ ,, अयोध्येचे नबाब.
७ रा. राजवाडे यांचा संकीर्ण-लेखसंग्रह.
८ दळवीकृत मराठा कुळांचे इतिहास.
९ भानुकृत नाना आणि महादजी.
१० 'अँक्वर्थ व शाळिग्राम'कृत ऐतिहासिक पोवाडे.
११ रा. भावेकृत अफझलखानाचा वध.
१२ रा. द. वि. आपटेकृत श्रीरंगपट्टणची मोहीम
१३ रा. आपटेकृत घराण्यांचे इतिहास–(आपटे, बर्वे, पटवर्धन, गोखले-रास
१४. प्रो. सरकार यांचे 'मॉडर्न रिव्ह्यू' मधील लेख.

दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

१ आपला जीवनक्रम शुद्ध रीतीनें चालवून समाजाच्या कल्याणासाठीं यथाशक्ति झटण्याची हौस व हिंमत तरुण पिढींत उत्पन्न करणें हेंच शिक्षणाचें ध्येय असलें पाहिजे, व तें साध्य होण्यास स्वराष्ट्रेतिहासाचें योग्य तें ज्ञान तरुणांस होणें अत्यंत अवश्य होय. इतिहासाचा हा उपयोग लक्षांत ठेवूनच पाश्चात्त्य देशांतील शिक्षणक्रमांत त्यास उच्च स्थान दिलेलें आढळतें. भारतरामायणांतील कथा ऐकूनच शिवाजीस देशोद्धाराची स्फूर्ति झाली या गोष्टीवरूनही वरील अनुमानास बळकटी येते. आतां कोणताही विषय मुलांच्या मनांवर ठसावयास त्याची मांडणी मनोहर होऊन शिवाय विद्यार्थ्यांची ग्रहणशक्ति ओळखून पुस्तकाची रचना झाली पाहिजे. पुस्तकांत केवळ सनवार हकीकत दिल्यास तें कंटाळवाणें होऊन त्याच्या वाचनानें विषयाची गोडी लागणें दुरापास्त होतें. तेव्हां अलीकडे प्रसिद्ध व्यक्ति व उज्ज्वल प्रसंग यांस धरून प्रकरणशः इतिहासाच्या पुस्तकाची रचना करणें इष्ट होय, हा सिद्धांत सर्वसंमत झाला आहे. या सिद्धांताच्या अनुरोधानें प्रस्तुत पुस्तकाची रचना केली आहे.

२ या पुस्तकाचे विशेष खालीलप्रमाणें आहेतः—

अ. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें गेल्या २०–२५ वर्षांत पुष्कळ उपलब्ध झालीं आहेत. अशा स्थितींत लहानपणीं इंग्रज ग्रंथकारांचे ग्रंथ किंवा त्यांच्या आधारें लिहिलेली पुस्तकें वाचावयाचीं व मग मोठेपणीं नवीन उपलब्ध झालेलीं साधनसामग्री चाळून पूर्वी बनलेले चुकीचे ग्रह बदलावयाचे, हा द्राविडी प्राणायाम विद्यार्थ्यांस करणें माग पडलें, म्हणजे शक्तीचा व कालाचा व्यर्थ अपव्यय होतो. तेव्हां नवीन प्रकाशित साधनांच्या आधारें लिहिलेला ग्रंथच एकदम मुलांच्या हातीं देणें इष्ट होय हें जाणून हा प्रयत्न केला आहे.

आ. साधनपद्धति (source method) म्हणून एक इतिहास शिकविण्याची पद्धति अलीकडे पाश्चात्त्य देशांत जारीनें चालू आहे, तीमध्यें पूर्वकाळचीं नाणीं, पत्रव्यवहार व इतर स्मरणीय वस्तू यांचा उपयोग करून पूर्वकाल जेणेंकरून मुलांच्यापुढें प्रत्यक्ष उभा ठाकेल अशी व्यवस्था करावयाची असते. या पद्धतीचा प्रस्तुत पुस्तकांत अवलंब केला आहे.

इ. मराठ्यांच्या इतिहासकाळीं पुष्कळ नररत्नें होऊन गेलीं. त्यांजविषयीं मनोरंजक व बोधपर अशा बऱ्याच आख्यायिका उपलब्ध आहेत, त्यांपैकीं महत्त्वाच्या आख्यायिकांचा एक छोटासा कलाप परिशिष्टांत जोडला आहे.

ई. लिहिण्याच्या ओघांत कित्येक अवघड शद्वांचा प्रयोग झाला आहे. शिवाय बखरींतील व पत्रांतील उताऱ्यांतून बरेच फारसी अवघड शब्द आले आहेत, त्यांचा कोश शेवटीं दिला आहे.

उ. नकाशाच्या साहाय्याशिवाय इतिहासाचें पुस्तक वाचलें असतां त्यावरून जो बोध व्हावयाचा तो अर्धवट होतो. तेव्हां ज्ञान व्यवस्थित व्हावें या हेतूनें एक हिंदुस्थानचा व एक महाराष्ट्राचा असे दोन नकाशे पुस्तकांत घातले आहेत व शक्य तितकीं स्थळें त्यांत दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

ऊ. मराठ्यांच्या इतिहासांतील बऱ्याच प्रसंगांच्या मित्या आतां निश्चित झाल्या आहेत, तथापि त्या नाना ग्रंथांत विखुरलेल्या असल्यानें वाचकास त्या एकदम सांपडणें कठीण जातें. ही अडचण दूर व्हावी म्हणून या ग्रंथास एक शकावली जोडली आहे. तींत जाड खिळ्यांनीं दर्शविलेल्या मित्या पाठ ठेविल्यास चांगल्या.

ऋ. पुस्तकाच्या शेवटीं सूचि जोडिली आहे. प्रस्तुत पुस्तकाचा काळजीपूर्वक अभ्यास करणारास व संदर्भासाठीं प्रसंगानुसार तें हातीं धरणारास तिचा उपयोग होईल अशी आशा आहे.

३ या ग्रंथाची पहिली आवृत्ति **कै. गुरुवर्य जनार्दन विनायक ओक** यांनीं छापिली होती, व तिची प्रस्तावना त्यांनींच लिहिली होती. सुदैवानें ते जर आज हयात असते तर ही दुसरी आवृत्ति प्रसिद्ध करण्याचें कामही त्यांजकडेच सोंपविणें मला सोईचें झालें असतें, व त्यांनींही तें आनंदानें केलें असतें. परंतु त्यांच्या अकालिक मृत्यूमुळें तो योग आला नाहीं.

४ पहिल्या आवृत्तीमध्यें कांहीं चुका झाल्या होत्या. त्या ज्यांनीं माझ्या नजरेस आणिल्या त्यांचा मी अत्यंत आभारी आहें. विशेषतः विविधज्ञानविस्तार या मासिकाच्या १९१६च्या जूनच्या अंकांत जें परीक्षण आलें, त्याचा मला पुष्कळ उपयोग झाला. त्यांतील सूचनांचा शक्य तितका स्वीकार करून ही आवृत्ति सुधारली आहे. शिवाय अधिक प्रसिद्ध झालेल्या नवीन माहितीचाही ह्या आवृत्तींत ठिकठिकाणीं अंतर्भाव केला आहे.

५ भारत इतिहास संशोधक मंडळाचे उत्साही सभासद रा. रा. दत्तात्रय वामन पोतदार बी. ए. व रा. रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन ह्यांनीं या ग्रंथाच्या

पहिल्या आवृत्तीची चिकित्सापूर्वक तपासणी केली होतीच. या द्वितीय आवृत्तीच्या प्रसंगींही त्यांस वेळोवेळीं सल्ला विचारला व त्यांनींही योग्य तें मत देण्यास व माहिती सांगण्यास कसूर केली नाहीं, याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच. याशिवाय भा. इ. सं. मं. चे प्रसिद्ध सभासद श्रीमंत ताल्यासाहेब मेहेंदळे यांनीं मला आपल्या ग्रंथालयाचा वेळोवेळीं उपयोग करूं दिला याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. शेवटीं ही दुसरी आवृत्ति महाराष्ट्रीय तरुणांना बोधप्रद व उद्दीपक होवो अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करून हा प्रस्ताव पुरा करितों.

पुणें, दासनवमी माघ व. ९
शुक्रवार, शके १८४१ } **गोविंद अनंत मोडक.**

तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

या तिसऱ्या आवृत्तींत बेचाळिसावें प्रकरण नवें घातलें असून ठिकठिकाणीं नवी माहिती घालून व दुरुस्त्या करून पुस्तक सुधारिलें आहे. मोठा टाईप, चित्रें व हस्ताक्षरें या नवीन गोष्टींचा अवलंब केल्यामुळें पुस्तक अधिक उपयुक्त होईल अशी उमेद आहे. लिहिण्यास आनंद वाटतो कीं, नुक्तेंच हें पुस्तक मुंबईसरकारानें प्राथमिक व दुय्यम शाळांतून बक्षिसांसाठीं व लायबऱ्यांसाठीं मंजूर केलें आहे.

पुणें, विजयादशमी, आश्विन शु॥ १०
मंगळवार, शके १८४३ } **गोविंद अनंत मोडक**

प्रस्तावना.

१. मराठ्यांच्या इतिहासाची साधनसामुग्री छापून निघत आहे व अधिक वाचनानें पुस्तकांतले कांहीं भाग अपूर्ण वाटूं लागतात. या दोन कारणांनीं पुस्तकांत सुधारणा करणें अवश्य होतें. तेव्हां या चौथ्या आवृत्तींत आरमारासंबंधीं दोन प्रकरणें, मराठ्यांची बंगालवर चढाई, व महादजीच्या उत्तरेकडील कामगिरीचीं दोन प्रकरणें अशीं एकंदर पांच प्रकरणें नवीन लिहिलीं. त्याचप्रमाणें ठिकठिकाणीं बदल करून व नवीन मजकुराची भर घालून आधुनिक माहितीच्या ग्रहणानें पुस्तक शक्य तितकें बिनचूक राहील अशी खबरदारी

घेतली. जून १९२३च्या विविधज्ञानविस्ताराच्या अंकांत एका मुद्यासंबंधीं सूचना आली होती, त्या ठिकाणीं योग्य दुरुस्ती केली आहे. अशाच रीतीनें पुस्तकांतील चुका कोणीं माझ्या नजरेस आणिल्यास त्या सुधारण्यास बरें पडेल. या आवृत्तींत श्रीसमर्थ रामदासस्वामी यांचें चित्र व पानिपतच्या मोहिमेचा नकाशा या दोन नवीन गोष्टींचा अन्तर्भाव केला आहे.

२. मराठ्यांचे इतिहासाचे पुष्कळ कागदपत्र अलीकडे प्रसिद्ध होत आहेत. ते सर्व वाचण्याची सामान्य वाचकांस व विद्यार्थ्यांस सवड नसते व मगदूरही नसतो. परंतु या कागदपत्रांत असे कांहीं लेख आहेत कीं, भावनेच्या दृष्टीनें व माहितीच्या दृष्टीनें प्रत्येक महाराष्ट्रीयास ते आवडतील. या लेखांमध्यें आपल्या पूर्वजांच्या महात्त्वाकांक्षा व भावना अगदीं उत्कटत्वानें प्रदर्शित झाल्या आहेत. असल्या कागदपत्रांचा या पुस्तकांत अन्तर्भाव करावयाचा असें धोरण ठेविलें आहे. उदाहरणार्थ, शिवाजीचा सैन्यास हुकूम (पृ. ६९–७१), खुद्द चिमाजीआप्पानें केलेलें वसईच्या वेढ्याचें वर्णन (पृ. २४९–२५१), गोविंदराव काळ्यांचें पत्र (पृ. ४९५–४९७), इत्यादि. असले लेख सर्व शिक्षित महाराष्ट्रीयांच्या नजरेखालून जाणें ही अत्यंत अवश्य व इष्ट गोष्ट असें जाणून त्यांचा संग्रह या पुस्तकांत योग्य स्थळीं केला आहे. मात्र अशा कागदपत्रांचा संग्रह करितांना मुख्य कथासूत्राचा बिघाड न होईल याची काळजी घेणें अवश्य होय. व तशी मीं घेतली आहे. हा उपक्रम मागील आवृत्त्यांतूनच सुरू केला; पण या आवृत्तींत त्याचा 'धोरण' म्हणून रीतसरपणें अवलंब केला असल्यामुळें त्या गोष्टीचा प्रस्तावनेंत मुद्दाम उल्लेख करणें जरूर झालें. ही आवृत्ति तयार करितांना माझे मित्र प्रो. दत्तो वामन पोतदार व रा. रा. राजाराम विनायक ओतूरकर, बी. ए. शिक्षक, नूतन मराठी विद्यालय, या दोघांनीं मला वेळोवेळीं सल्ला दिला व सूचना केल्या, त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहें; तसेंच श्रीमंत तात्यासाहेब मेहेंदळे यांनीं आपल्या ग्रंथसंग्रहालयाचा मला उपयोग करूं दिला याबद्दल त्यांचे मजवर मोठे उपकार आहेत. शेवटीं हें पुस्तक महाराष्ट्रीय तरुणांस पसंत पडावें व उपयुक्त वाटावें अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

पुणें, मकरसंक्रांत, पौष शु॥ ४
गुरुवार शके १८४५

गोविंद अनंत मोडक

या पुस्तकावरील अभिप्राय.

मराठ्यांच्या इतिहासासंबंधानें सध्यां जीं साधनें उपलब्ध झालेलीं आहेत त्यांतील सर्व बखरी, पत्रव्यवहार व इतिहास मननपूर्वक वाचून महाराष्ट्राचा खराखरा इतिहास आपल्या मुलांना कळावा याच एका उद्देशानें लेखकांनीं हें पुस्तक लिहिलें आहे. महाराष्ट्राचा सर्व इतिहास गोष्टींच्या रूपानें साध्या व सरळ भाषेंत संगतवार लिहिला असल्यामुळें आणि वेळोवेळीं महत्त्वाचे वाटलेले बखरींचे व पत्रव्यवहारांतील उतारे दिलेले असल्यामुळें पुस्तक बरेंच मनोरंजक झालें आहे. मराठ्यांच्या इतिहासाशीं इंग्रज, फ्रेंच वगैरे परराष्ट्रीय लोकांचा ज्या ज्या वेळीं संबंध आला, त्याचा इतिहास एखादा निराळा भाग न करतां त्या त्या प्रसंगींच लिहिला गेला आहे,हा या पुस्तकांत विशेष असून आपल्या लोकांचे व परक्यांचे त्या वेळचे विचार व त्यांचीं धोरणें कळून येणें त्यामुळें सुलभ झालें आहे. श्रीशिवाजीमहाराजांच्या मरणानंतर मराठेशाहीवर आलेलें संकट कसेंबसें दूर होऊन तिची स्थिरस्थावर होत आहे तोंच छत्रपतींच्या गृहकलहाचीं बीजें कशीं पेरलीं गेलीं आणि त्याचप्रमाणें पानिपतच्या घोर संग्रामामुळें मराठी साम्राज्याची गेलेली अब्रू पुनः मिळवून त्याचें वजन कायम ठेवणाऱ्या श्रीं. थोरल्या माधवरावांच्या मरणानंतर पेशव्यांच्या गृहकलहानें त्याच्यावरही ताण करून हिंदुपदपातशाहीचा वृक्ष समूळ उन्मळून पाडण्यास तो कसा कारणीभूत झाला, याचें वर्णन या पुस्तकांत बहारीनें केलेलें आहे. त्या काळच्या कांहीं प्रसिद्ध व्यक्तींची माहिती होण्याकरितां त्यांच्या कांहीं आख्यायिकाही पुस्तकांत दिलेल्या आहेत. इतिहासवाचनास भूगोलाची अवश्यकता असून महाराष्ट्राचा व मराठी साम्राज्याच्या वेळच्या हिंदुस्थानचा असे दोन नकाशे पुस्तकांत दिलेले असल्यामुळें पुस्तकाच्या उपयुक्ततेंत अधिक भर पडली आहे. महाराष्ट्राच्या इतिहासासंबंधानें शक्य तितक्या भरपूर माहितीनें भरलेलें असें हें पुस्तक असून महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे हातीं देण्यास तें सर्वस्वी योग्य आहे —**केसरी ६।४।१९१५**

रा. मोडक यांनीं महाराष्ट्राचा इतिहास, सर्वांगपरिपूर्ण असा, लहानशा ग्रंथांत आणिला याबद्दल आम्ही त्यांची तारीफ करितों. कोठेंही इतिहासकथनाची सांखळी तुटूं न देतां सर्व भाग जागच्या जागीं दाखवून महाराष्ट्राच्या इतिहासाचा आराखडा वाचकांपुढें आरंभापासून शेवटपर्यंत उभा राहील अशी रचना करण्याचें त्यांचें कौश-

ल्य ग्रंथांत दिसून येतें. सर्व प्रकरणांची भाषा चित्ताकर्षक व जोरदार अशी आहे. सर्वच प्रकरणें चांगलीं आहेत. त्यांच्यामध्यें आवडनिवड करणें कठिण आहे.

—विविधज्ञानविस्तार. (जून १९१६).

मुलांचा महाराष्ट्र या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीवर ता. ६ एप्रिल १९१५च्या केसरींत अभिप्राय दिलेला आहे. त्याच वेळीं हें पुस्तक इतकें लोकप्रिय व उपयुक्त होईल असें आम्हास वाटलें होतें, व चार वर्षांत या पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढण्याची अवश्यकता वाटली यावरून त्याचें प्रत्यंतर आलें. पहिल्या आवृत्तीवरील टीकेंत निर्दिष्ट केलेल्या टीकाकारांनीं जे दोष दिग्दर्शीत केले होते ते दूर करून आणि गेल्या पांच वर्षांत उपलब्ध झालेल्या नवीन माहितीचा उपयोग करून रा. मोडक यांनीं ही द्वितीय आवृत्ति तयार केली आहे. या पुस्तकांत जागजागीं अस्सल कागदपत्रांतील उतारे दिलेले असल्यामुळें पूर्वकालीन समाजस्थितीचें साधार चित्र वाचकांच्या पुढें उभें राहतें. स्वराज्यस्थापनेची पूर्वतयारी, कर्णधारांचा निश्चय, स्वराज्याची सनद, भाग्यवान् सवाईमाधवराव पेशवे, दोस्तांची टिपूवर स्वारी वगैरे प्रकरणें फारच सुरस वठलीं आहेत. एकंदरींत मराठी शाळेंत महाराष्ट्राचा इतिहास यथार्थ स्वरूपानें व मनोरंजक रीतीनें शिकविण्यास व इतर सामान्य वाचकांसहि महाराष्ट्राच्या इतिहासाचें थोडक्यांत यथार्थ ज्ञान होण्यास हें पुस्तक अत्यंत उपयुक्त होईल—**केसरी २०-७-१९२०**

मुलांचा महाराष्ट्र--आवृत्ति ३रीः—महाराष्ट्राच्या या इतिहासाची ही तिसरी आवृत्ति निघत आहे यावरूनच त्याची लोकप्रियता व उपयुक्तता व्यक्त होते. पूर्वीच्या आवृत्तींत ' मराठ्यांचा गुजराथेंत प्रवेश ' हा भाग देण्याचा राहिला होता तो या आवृत्तींत योग्य स्थळीं घातलेला आहे. अनेक इतिहासप्रसिद्ध पुरुषांचीं चित्रें व हस्ताक्षरेंहि पुस्तकांत दिलीं आहेत. शेवटीं जोडलेलें परिशिष्ट, कठिण शब्दांचा कोश, शकावलि व सूचि यांच्या योगानें पुस्तकाच्या उपयुक्ततेंत चांगलीच भर पडली आहे.मुंबईसरकारानें हें पुस्तक आतां लायब्ऱ्यांसाठीं व बाक्षिसांसाठीं मंजूर केलें आहे: परंतु त्याचा क्रमिक पुस्तकांत समावेश होणें योग्य असतां तसें करण्यास सरकारला संकोच कां वाटावा ?

केसरी २१-२-१९ २२

अनुक्रमणिका.

विषय	पृष्ठांक.
१ उपोद्घात	१
२ भोंसले घराण्याचें पूर्ववृत्त	३
३ शहाजीची कर्तबगारी	७
४ शिवाजीचें बालपण ...	१३
५ स्वराज्यस्थापनेची पूर्वतयारी ...	१८
६ स्वराज्यस्थापना ...	२५
७ शहाजीचा बंदिवास	२९
८ चंद्रराव मोऱ्याचें पारिपत्य	३४
९ अफजलखानाचा वध	३७
१० बाजी प्रभूचा पराक्रम	४३
११ शाएस्तेखानाची स्वारी	४७
१२ रणशूर मुरारबाजी ...	५४
१३ बादशहाशीं समेट ...	४६
१४ कपटानें धरलें पण युक्तीनें सुटले ! ...	५९
१५ स्वराज्यव्यवस्था ...	६५
१६ मराठ्यांच्या आरमाराचा उदय	७५
१७ गड आला पण सिंह गेला ! ...	८४
१८ सालेरचें युद्ध ...	९१
१९ विजापूरकरांशीं युद्ध	९४
२० राज्याभिषेक ...	९८
२१ दाक्षिणदिग्विजय ...	१०५
२२ विजापूरकरांस साहाय्य	११३
२३ संभाजीस राज्यप्राप्ति	११८
२४ सिद्दी व पोर्तुगीज यांच्याशीं दोन हात ...	१२३
२५ वादळ वाहूं लागलें	१२६
२६ तारूं भडकलें ! ...	१३०
२७ कर्णधारांचा निश्चय	१३५
२८ स्थलांतर ...	१३८
२९ जगण्यासाठीं पराकाष्ठा	१४२
३० पुनः वादळ ...	१४६
३१ तारूं बुडतें कीं काय ?	१५४
३२ आणखी लाटा उसळतात ! ...	१५८
३३ बचावलें ! ...	१६२
३४ मराठी राज्यांत दुही	१६९
३५ बाळाजी विश्वनाथाचा उदय ...	१७३
३६ बंडखोर मराठे सरदार	१७६
३७ बाळाजी विश्वनाथास पेशवाई कशी मिळाली ?	१८०
३८ सरंजामपद्धतीचा उदय	१८४
३९ स्वराज्याची सनद	१८९
४० मूळच उपटलें कीं खांद्या आपोआप खालीं येतील	१९६
४१ खरे कोण, सातारकर कीं कोल्हापूरकर ? ...	१९८
४२ शिंदेहोळकरांचा उदय	२०४

विषय	पृष्ठांक.
४३ गुजराथ--माळव्यांत मराठ्यांचा प्रवेश	...२०८
४४ गजेंद्रमोक्ष	...२१७
४५ कोल्हापूरकर संभाजीशीं समेट	...२२१
४६ गृहकलह	...२२४
४७जंजिऱ्याच्या सिद्दीचा बंदोबस्त	...२३०
४८ दिल्लीची स्वारी	...२३६
४९ भोपाळचा वेढा	...२४०
५० माझें मस्तक तरी किल्ल्यांत पडूं दे.	...२४४
५१ आतां हिंदुमुसलमानांनीं एक झालें पाहिजे.	२५२
५२ बाळाजी बाजीरावास पेशवाई कशी मिळाली ?	...२५६
५३ माळव्याची सनद	...२६१
५४ आधीं एकी, मग मुलूखगिरी	...२६८
५५ मराठ्यांची बंगालवर चढाई	...२७५
५६ शाहूमहाराज कैलासवासी झाले ...	...२८०
५७ सांगोल्याची स्वारी	...२८८
५८ ताराबाईचें कारस्थान	...२९२
५९ शाबास! शिंदेहोळकर, शाबास !	२९६
६० दाक्षिणच्या सुभेदारास शह	३०१
६१ राघोबाची हिंदुस्थानांत पहिली भरारी	...३०६
६२ शिंद्यांचे मारवाडांतील पराक्रम ...	...३१०
६३ मराठ्यांच्या आरमारास जबर धक्का...	...३१४
६४ मराठी राज्याचा कर्नाटकांत विस्तार	...३२२
६५ निजामच्या दरबारशीं तंटा	३२७
६६ भगवा झेंडा अटकेवर फडकतो !	... ३३०
६७ अर्धी दाक्षिण सर झाली।	३३६
६८ विश्वासघातकी नाजिबानें पुरता दगा दिला!!	...३४१
६९ स्वारीची जंगी तयारी	३४५
७० घनघोर संग्राम ! भाऊ ! भाऊ ! !	...३५३
७१ पेशव्यांच्या घरांत कलीनें प्रवेश केला ?	...३६३
७२ निजामाशीं युद्ध	...३६७
७३ हैदरचा पुंडावा	...३७४
७४ हैदरअलीवरील पहिली स्वारी	...३७७
७५ राघोबाची उत्तर हिंदुस्थानावरील तिसरी स्वारी	...३८२

विषय	पृष्ठांक.
७६ राज्यकारभार	...३८८
७७ गृहशत्रूचा मोड	... ३९२
७८ भोंसल्यावर दुसरी स्वारी	३९६
७९ हैदरअलीवरील तिसरी स्वारी	... ४०२
८० पानिपतचा सूड	... ४०९
८१ दाक्षिणचा दिवा मालवला! हिरा हरपला!!...	४१४
८२ नारायणराव पेशवे...	४१९
८३ 'ध' चा 'मा'	... ४२१
८४ औट घटकेचें राज्य...	४२६
८५ राज्यक्रांति–बारभाई	४३०
८६ राघोबाचा पळ	... ४३४
८७ इंग्रजांशीं लढाई	... ४३८
८८ मराठी राज्यांतील दंग्यांचा मोड	... ४४२
८९ इंग्रजांचा पराभव	... ४४६
९० इंग्रजांशीं चाललेल्या लढाईची समाप्ति	... ४५१
९१ भाग्यवान् सवाईमाधवराव पेशवे	... ४५७
९२ टिपूशीं लढाई	... ४६०
९३ दिल्लीच्या बादशाहीचीं सूत्रें मराठ्यांच्या हातीं आलीं	४६४
९४ महादजी शिंद्याची मर्दुमकी	... ४७२
९५ दोस्तांची टिपूवर स्वारी	४८५
९६ महादजीचा पेशव्यांचे कारभारी होण्याचा प्रयत्न	४९४
९७ खर्ड्याची लढाई	... ५०२
९८ सवाईमाधवरावाचा मृत्यु	... ५०७
९९ पेशवे परतंत्र झाले!!	५११
१०० स्वातंत्र्याकरितां धडपड	५१७
१०१ मराठी राज्याची अखेर	५२२
१०२ सातारचे नामधारी छत्रपती	... ५२६
१०३ मराठी राज्याची अंतर्व्यवस्था	... ५२५
१०४ उपसंहार	... ५४२
० परिशिष्ट १:–(आख्यायिका)	१-१७
२ परिशिष्ट २:— कठिण शब्दांचा कोश	१८-२२
३ परिशिष्ट:३—शकावली	२२-२८
४ सूचि	१-३२

चित्रें.

	पृष्ठांक
छत्रपति शिवाजीमहाराज	मुखपृष्ठ
श्रीसमर्थ रामदासस्वामी	
मल्हारराव होळकर व श्रीमंत पहिले बाजीराव	२०६
श्रीमंत थोरले माधवराव पेशवे	३८९
श्रीमंत सवाईमाधवराव पेशवे, नाना व पाटीबावा	५००

हस्ताक्षरें.

बाळाजी विश्वनाथ व हरिपंत फडके	५३९

नकाशे

महाराष्ट्र	१६
हिंदुस्थान	६४
पानिपतची मोहीम	३४८

विशेष सूचना:—शुद्धिपत्रावरून पहिल्यानें शुद्ध करून ग्रंथ वाचावा. छापतांना कानेमात्रा उडून कांहीं ठिकाणीं चुका झाल्या आहेत त्या सहज समजण्यासारख्या असल्यामुळें शुद्धिपत्रांत दिल्या नाहींत.

श्रीसमर्थ रामदासस्वामी.

(भीमस्वामीचा मठ, तंजावर.)

श्री छत्रपति शिवाजी महाराज.

जन्म शके १५५१.] [मृत्यु शके १६०२.

मुलांचा महाराष्ट्र.

६९४.

उपोद्घात.



उत्तरेस नर्मदा नदी, पश्चिमेस अरबी समुद्र, ईशान्येच्या टोंकास असलेल्या नागपूर शहरापासून नैर्ऋत्येच्या कारवार शहरापर्यंत असलेली एक वांकडीतिकडी रेघ, ह्याच आपल्या महाराष्ट्र-देशाच्या ठोकळ मर्यादा होत. पूर्वी या देशांत शालिवाहन वंशांतील राजे राज्य करीत होते. त्यांचें राजधानीचें शहर गोदावरी नदीच्या उत्तरतीरीं असलेलें पैठण हें होतें. या राजांच्या नांवावरून आलेला शालिवाहन शक अजूनही महाराष्ट्रांत चालू आहे. या राजांनीं शके १४०पर्यंत राज्य केलें. त्यांच्या मागून सुमारें तीन शतकेंपर्यंत कोणीं राज्य केलें हें प्रसिद्ध नाहीं.

२. शके ४७२च्या सुमारास बादामींतील चालुक्यवंशाचे राजे महाराष्ट्रावर राज्य करूं लागले. या वंशांतील चौथा राजा पुलकेशी हा फारच पराक्रमी निघाला. शके ५४२त कनोजचा महत्त्वाकांक्षी राजा हर्ष हा बरोबर सैन्य घेऊन स्वतः महाराष्ट्रावर चाल करून आला. परंतु पुलकेशीपुढें त्याचें कांहीं न चालून त्यास तसेंच चुरमुरे खात कनोजेस परत जावें लागलें. पुलकेशीची कीर्ति

केवळ हिंदुस्थानांतच नव्हे, तर इराणापर्यंत पसरली. इराणच्या राजानें पुलकेशीचा स्नेह संपादन करण्याकरितां त्याजकडे एक वकील पाठविला. पुलकेशीच्या मागून चालुक्यवंशाचे आणखी पांच राजे झाले.

३. शके ६७५त चालुक्यवंशांतील शेवटचा राजा कीर्तिवर्मा यास राष्ट्रकूट वंशांतील दन्तिदुर्ग नांवाच्या एका पराक्रमी पुरुषानें पदच्युत केलें; व त्या वेळेपासून राष्ट्रकूट वंशांतील राजे महाराष्ट्रावर राज्य करूं लागले. या राष्ट्रकूट राजांची राजधानी मालखेड येथें होती. याच वंशाच्या कारकीर्दीत वेरुळचीं लेणीं खोदिलीं गेलीं. राष्ट्रकूटांनीं शके ८९५पर्यंत राज्य केलें. या सालापासून फिरून चालुक्य घराण्याचा अम्मल सुरू झाला. या चालुक्य घराण्यानें फिरून सव्वादोनशें वर्षेपर्यंत महाराष्ट्रांत राज्य केलें. यांची राजधानी मोंगलाईंतील कल्याण ही होती. चालुक्यांच्या मागून शके १११२त देवगड येथील यादव वंशांतील राजे महाराष्ट्रावर राज्य करूं लागले. यादववंशांत सिंघण यादव या नांवाचा मोठा पराक्रमी राजा झाला. त्यानें गुजराथ, माळवा इत्यादि भोंवतालच्या प्रांतांवर स्वाऱ्या करून राष्ट्रकूटांच्या ताब्यांत होता तितका मुलूख आपल्या ताब्यांत आणिला. शके ११९३त रामदेवराव यादव हा गादीवर आला. त्याचा कारभारी हेमाद्री या नांवाचा महापंडित होता. त्यासच पुढें हेमाडपंत असें नांव पडलें. हा हेमाडपंत मोठा शूर असून बुद्धिमान् होता. त्यानेंच पहिल्यानें मोडी लिपी प्रचलित केली. रामदेवराव यादवाच्या कारकीर्दीतच ज्ञानेश्वरानें ज्ञानेश्वरी हा ग्रंथ शके १२१२त संपविला. रामदेवराव राज्य करीत असतां शके १२१६त दिल्लीच्या अल्लाउद्दीन खिलजीनें देवगडावर स्वारी केली. रामदेवरावाचा पराभव होऊन त्याला अल्लाउद्दिनास मोठी खंडणी भरून त्याची परत रवानगी करणें भाग पडलें. फिरून शके १२२९त अल्लाउद्दीन खिल-

जीचा सरदार मलिक काफूर देवगडावर चालून आला व त्यानें रामदेवरावास पकडून दिल्लीस नेलें. नियमितपणें खंडणी देण्याचें कबूल करून रामदेवरावानें दिल्लीहून आपली सुटका करून घेतली. रामदेवराव शके १२३१त वारला. त्याचा मुलगा शंकरदेव हा बापाप्रमाणें दिल्लीस खंडणी पाठवीना; म्हणून मलिक काफुरानें शके१२३४त फिरून दक्षिणेवर स्वारी करून शंकरदेवास ठार केलें व यादवांचें राज्य खालसा केलें. यानंतर सात आठ वर्षांनीं रामदेवरावाचा जांवई हरपाळदेव यानें मुसलमानांचा परकीय अम्मल झुगारून देऊन फिरून हिंदु राज्य स्थापण्याचा प्रयत्न केला. परंतु दिल्लीच्या मुबारीक खिलजीनें दक्षिणेंत येऊन हरपाळास पकडून त्याचा वध केला; व तेव्हांपासून (शके १२४०, इ. स. १३१८) महाराष्ट्रांत मुसलमानांचा परकीय अम्मल चालू झाला !

२ भोंसले घराण्याचें पूर्ववृत्त.

मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें शके १२४०त महाराष्ट्रावर दिल्लीच्या मुसलमान सुलतानांचा अम्मल बसला; परंतु तो फार दिवस टिकला नाहीं. शके १२६९त महाराष्ट्रांतील जाफरखान नांवाच्या मुसलमान सरदारानें बंड केलें व बेदर येथें आपली स्वतंत्र गादी स्थापिली. हा जाफरखान पूर्वी दिल्लीस एका गंगू नांवाच्या ब्राह्मणाचा गुलाम होता. ' तूं पुढें राजा होशील, ' असें भविष्य गंगूनें जाफरखानास सांगितलें होतें. त्या वेळीं जाफरखानानें ' मी राजा झाल्यास राज्यास तुमचें नांव ठेवीन ' असें कबूल केलें होतें. यावरून त्यानें बेदर येथें स्थापिलेल्या स्वतंत्र राज्यास ' ब्राह्मणी राज्य ' असें नांव दिलें. या ब्राह्मणी राज्याचीं दीडशें वर्षांत पांच स्वतंत्र राज्यें झालीं. तीं सर्व मुसलमानांचींच होतीं. त्यांतील तीन प्रबळ होतीं.

२. तीं अहमदनगरची निजामशाही, विजापूरची अदिलशाही व गोंवळकोंड्याची कुतुबशाही हीं होत. हीं राज्यें प्रबळ होतीं खरीं, पण तीं केवळ मुसलमानांच्या पराक्रमामुळें तशीं होतीं असें नाहीं. या राज्यांतून मोठमोठे मराठे सरदार असत, व त्यांच्या पराक्रमावरच मुसलमानी राज्यांचा जोर किंबहुना जीवित अवलंबून होतें. या सर्व मराठ्यांच्या घराण्यांची माहिती असणें अगत्याचें आहे. परंतु प्रस्तुत स्थळीं ती सर्व सांगण्याचें कांहीं कारण नाहीं. महाराष्ट्रभूमीवर स्वातंत्र्याचा प्रकाश पाडणारा तेजोराशि सूर्य ज्या घराण्यांत उदय पावला, तेवढ्याच घराण्यांची पूर्वस्थिति काय होती ती आज आपण पाहूं.

३. निजामशाहींत मराठ्यांचीं दोन घराणीं विशेष प्रसिद्धीस आलीं; एक भोंसल्यांचें व दुसरें जाधवांचें. यांपैकीं जाधवांचें घराणें भोंसल्यांच्या आधींच लौकिकास चढलें होतें. लुकजी जाधवराव हा दहा हजारांची मनसब चालवून एक बडा सरदार म्हणून निजामशाहींत गाजत होता, तेव्हां मालोजी भोंसले वेरुळास कांहीं गांवांच्या पाटिलक्या करीत बसला होता. आपल्या वयाच्या सत्ताविसाव्या वर्षीं जाधवरावाच्या वतीनें मालोजी शिलेदारी करूं लागला. मालोजी शिलेदारी करीत असतां बरींच वर्षें गेलीं. त्यास मुलगा झाला नाहीं. तेव्हां नगरच्या किल्ल्यांत शहासरीफ पीर नांवाचें मोठें जागृत स्थान आहे असें ऐकल्यावरून त्याची स्त्री दिपाबाई हिनें त्या पिराला नवस केला. पुढें तिला दोन मुलगे झाले. हें त्या पिराच्या कृपेचें फळ होय अशा समजुतीनें मालोजीनें त्यांचीं नांवें शहाजी * व सरफजी अशीं ठेविलीं.

४ शहाजी रूपवान् होता व लहानपणापासूनच मधुर भाषण करण्याची त्याला संवय लागून गेली होती; त्यामुळें मालोजीची त्याच्या-

* शहाजी व सरफजी हीं नांवें सिंहजित् व शरभजित् या संस्कृत नांवांवरून निघालीं असावीं (राजवाडेकृत माधवविलासचंपू पृष्ठ ३६).

वर विशेष प्रीति होती. दरबारांत व इतर ठिकाणीं मालोजी त्याला आपल्याबरोबर नेत असे. जाधवराव याचे घरीं एकदां रंगपंचमीचा समारंभ होता. नेहमींप्रमाणें मालोजी शहाजीला चांगला पोशाख घालून त्या समारंभाला घेऊन गेला. या वेळीं शहाजीचें वय पांच वर्षांचें होतें. तेथें जाधवरावाची मुलगी जिजाऊ ही आली होती. ती तीन वर्षांची होती. लहान मुलें एके ठिकाणीं आल्यावर त्यांचे खेळ सुरू होण्यास उशीर लागत नाहीं, हें सर्वांस ठाऊकच आहे. त्यास अनुसरून शहाजी व जिजाऊ एकमेकांच्या अंगावर रंग उडवूं लागलीं. हें पाहून जाधवरावानें जिजाऊला हांक मारून आपल्या मांडीवर घेतलें व शहाजीला दुसऱ्या मांडीवर बसविलें. त्या दोघांचीं रूपें पाहून तो गहिंवरून गेला व त्यानें जिजाऊला विचारिलें, "हा नवरा तुला पाहिजे का ?" व मग सर्व जमलेल्या मंडळीकडे पाहून तो म्हणाला "उभयतां जोडा चांगला दिसतो." मालोजीनें हें ऐकलें. तेव्हां सर्व सभाजन बसले होते त्यांना, "जाधवराव काय बोलतात तें ऐका" असें तो म्हणाला. नंतर सभा विसर्जन झाली व मंडळी आपआपल्या घरीं निघून गेली. पुढें जाधवराव पोस्ताच्या जेवणाचें निमंत्रण करण्यास आला; तेव्हां मालोजीनें त्यास निक्षून सांगितलें कीं, 'आतां लग्नांत तुमचें आमचें भोजन होईल. मधीं व्हावयाचें नाहीं.' हें त्याचें निग्रहाचें बोलणें ऐकून जाधवराव मनांत चपापला, व रंगाच्या भरांत आपण हें काय बोलून गेलों, असें वाटून त्यास पश्चात्ताप झाला. हें वर्तमान त्याच्या बायकोला कळल्यावर तिच्या तळव्याची आग मस्तकास गेली व ती जाधवरावास रागानें म्हणाली, "आपण मातबर थोर, असें असून आपले सेवकाचे घरीं मूल दिली. बरोबरीचे निंबाळकर, शिर्के, महाडीक, पातशाही चाकर यांच्या घरीं मुलगे आहेत; ते टाकून याची मातबरी आपण काय पाहिलीत ?" जाधवरावाला तिचें म्हणणें पटलें व त्यानें मालोजीला बोलावून

आणून, आपण बोललों तें थट्टेनें बोललों; वास्तविक त्यांत कांहींच नाहीं असें सांगून निरोप दिला.

५. जाधवराव बोलले तर खरेच, पण आतां थट्टेवारी नेतात, तेव्हां आतां हें लग्न कसें होईल याची मालोजीला चिंता पडली. शेवटीं त्यानें मनांत पक्की खूणगांठ बांधिली कीं, जर नांवाचा मालोजी असेन तर हरयत्न करून हें लग्न जमवून आणीन. असा निश्चय करून मालोजी वेरुळास परत आला. पुढें काय करावें या विचारांत तेथें तो होता; इतक्यांत त्याला आपल्या बागेंतील वारुळांत द्रव्य सांपडलें. तें नेऊन शेषाप्पा नाईक पुंडे म्हणून एक भला गृहस्थ श्रीगोंदें येथें रहात होता त्याजकडे ठेविलें. मालोजीनें हळू हळू आपली पागा वाढविण्याची तयारी चालविली. "घरीं घोडीं खरेदी करून पागा वाढविली, हजार पांचशें केली. श्रीशिखर महादेव येथें चैत्री यात्रा बहुत येणें, उदक नाहीं, यात्रेस फार श्रम होतात, जाणून मोठें विस्तीर्ण तळें बांधिलें. त्यांत उदक अपरिमित राहूं लागलें. याजमुळें यात्रेस फार सुखावह झालें.*" श्रीवेरुळ येथील घुसृणेश्वराच्या देवालयाचा जीर्णोद्धार केला व शिवालयतीर्थ बांधिलें. अशीं लोकोपयोगी कृत्यें केलीं व लग्नाच्या मसलतीचा घाट घातला. तो असाः—जगपाळराव निंबाळकर हा मालोजीचा मेहुणा होता; त्याच्या साहाय्यानें रानडुकरें मारून दौलताबादेंत येऊन तीं गळ्यांत चिठ्या बांधून मशिदींत टाकिलीं. चिठ्यांत निजामशहा बादशहास अर्ज लिहिला कीं, "लुकजी जाधवराव यांनीं आपली कन्या जिजाई आमचे पुत्र शहाजी यास देऊं केली. शिमग्याचे पोस्तांत हुजूरमजलसींत बोलून स्त्रियांचेयोगें नाकबूल झाले आणि आम्हांस चाकरीवरून दूर केलें. यास्तव आपण जगपाळ निंबाळकर यांचा आश्रय करून मशिदींत डुकरें मारिलीं. याउपरी पातशहा आमची दाद घेऊन सोयरीक

* चिटणीसबखर, पृ. १७.

आम्हांस करून देववितील तर * उत्तम. " दुसरे दिवशीं सकाळीं मुसलमान येऊन मशिदीपुढें पाहतात तों त्यांना डुकरे मेलेलीं दिसलीं. मुसलमानांच्या धर्मांत डुक्कर अमंगल मानलें असल्यामुळें मुसलमानांचा राग अनावर झाला. हें वृत्त सुलतानास कळल्यावर तोही संतापला. परंतु या वेळीं दिल्लीच्या पातशहाची निजामशाहीवर वक्रदृष्टि झाली होती. तेव्हां निजामशहाच्या कारभाऱ्यांनीं असा बेत केला कीं, या वेळीं मालोजीची समजूत पाडिली पाहिजे. म्हणून त्यांनीं त्याला बोलावून आणिलें व रुसण्याचें कारण विचारिलें. तेव्हां त्यानें सर्व हकीकत सांगितली. तेथील सर्व मंडळीची खात्री झाली कीं, जाधवरावानें वचन मोडलें, म्हणून तो अपराधी आहे. पण त्याला शासन करणें शक्य नव्हतें. तेव्हां गोड बोलूनच लग्न करून टाकण्याचा दरबारच्या मंडळींनीं विचार केला. नंतर जाधवरावास बोलावून आणिलें. तेव्हां त्यानें लग्न न करण्याचीं कारणें सांगितलीं. तीं ऐकून सुलतान बोलला, " मग कांहीं हरकत नाहीं; ही मी त्यास तुमच्या सवाई मनसब देतों. " असें म्हणून पंचहजारी मनसब, राजे असा किताब, शिवनेरी व चाकण हे किल्ले, आणि पुणें व सुपें हे प्रांत सरंजाम व साहेबनौबत दिली. जाधवरावही मुलगी खुषीनें देण्यास तयार झाला. मग सुलतानानें स्वतः जाऊन लग्नसमारंभ मोठ्या थाटानें साजरा केला.

---

३ शहाजीची कर्तबगारी.

मालोजी वारला (शके १५४१) तेव्हां शहाजी सुमारें पंचवीस वर्षांचा होता. तो बापासारखाच शूर असल्यामुळें त्यास बापाच्या मृत्यूनंतर लागलीच मनसब मिळाली. या वेळीं निजामशाही राज्यांत

* मराठी साम्राज्याची छोटी बखर, पृष्ठ, ६.

मालिकंबर नांवाचा प्रमुख वजीर होता. दिल्लीचे पातशहा तर राज्य गट्ट करण्याकरितां सारखे प्रयत्न करीत होते; व हा वेळपावेतों मालिकंबरानें मोठ्या शौर्यानें मोंगलांशीं दोन हात करून निजामशाही राखिली होती. शेवटीं त्यानें मोंगलांनीं घेतलेला सर्व प्रांत परत मिळविण्याच्या हेतूनें मोंगल सुभ्याचें ठाणें बऱ्हाणपुर या शहरास वेढा दिला व गेलेला प्रांत परत मिळविला (शके १५४२, सन १६२०). त्या वेळीं शहाजीस आपली मनसब करूं लागल्यास वर्षसुद्धां झालें नव्हतें. तथापि या दूरच्या स्वारींत त्यानें खूप पराक्रम केला. पुढें जाधव व भोंसले यांजमध्यें तंटा होऊन शहाजीचा सासरा लुकजी जाधवराव यानें निजामशाहींतील नोकरी सोडून दिली व तो मोंगलांस जाऊन मिळाला. नंतर विजापूरकरांशीं संगनमत करून मोंगल अहमदनगरावर चालून आले. हा निजामशाहीवर मोठा कठीण प्रसंग होता. अहमदनगरजवळ भातवडीच्या रानांत निजामशाही सैन्याची शत्रूशीं गांठ पडून तुंबळ युद्ध झालें (कार्तिक शके १५४६, सन १६२४). या भातवडीच्या लढाईंत शहाजीनें कसून मेहनत केली व अप्रतिम पराक्रम गाजविला. विजापूरकर व मोंगल यांच्या फौजांचा पुरा मोड झाला व मालिकंबरास मोठा जय प्राप्त झाला. या वेळीं शहाजीनें बजाविलेल्या कामगिरीमुळें मालिकंबर अगदीं खूष झाला व त्याचें शहाजीवर अतिशय प्रेम जडलें. यापुढें 'प्रतापशाली सरदार' म्हणून शहाजीचें नांव सर्व दाक्षिणेंत दुमदुमूं लागलें.

२. मालिकंबर शके १५४८च्या वैशाखांत(सन १६२६) वारला. त्याच्यामागून त्याचा मुलगा फत्तेखान यास निजामशहाची वजिरी मिळाली; परंतु बापाचें कर्तृत्व व दूरदर्शित्व या दोहोंचाही त्याच्या ठिकाणीं अभाव असल्यामुळें निजामशाहींत लवकरच गोंधळ माजून गेला. याच सुमारास दिल्लीच्या गादीवर शहाजहान बादशहा बसला. त्याला दाक्षिण जिंकण्याची प्रबळ इच्छा होती. त्यामुळें दाक्षिणेकडील

मोंगल सुभेदारांचे निजामशाही मुलुखावर जोराचे हल्ले होऊं लागले. तेव्हां फत्तेखानानें मोंगलांस बराच मुलूख देण्याचें कबूल केलें. नंतर मोंगल सुभेदार बीड ताब्यांत घेण्यासाठीं पुढें चालून आला. इकडे फत्तेखानानें मोंगली मुलुखांत दंगा उडवून देण्यासाठीं शहाजीच्या हाताखालीं एक फौज पाठविली. शहाजीनें पूर्वखानदेशांत शिरून पूर्णा व तापी या नद्यांमधील दुआबांत खूप धुमाकूळ घातला. इतक्यांत दर्याखान रोहिला नांवाच्या मोंगलांकडील सरदाराची त्या प्रांतीं जहागीर होती, त्यानें सैन्य जमवून निजामशाही फौजेवर चाल केली. तेव्हां शहाजीस त्या प्रांतांतून माघारें फिरावें लागलें (सन १६२८). पुढें लवकरच खानजहान लोदी हा मोंगल सरदार बादशहाविरुद्ध बंड पुकारून दाक्षिणेंत आला व सह्याद्रीच्या लगत्यास बागलाण प्रांतांत त्यानें ठाणें दिलें. त्यानें निजामशहाचा आश्रय मागितला, तेव्हां फत्तेखानानें त्याला साहाय्य करण्याचें कबूल केलें. फत्तेखानाच्या या कृत्यानें मोंगल चवताळून गेले व निजामशाही फौजेचे चोहों बाजूंस पराभव होऊं लागले. मग मूर्तजा निजामशहानें फत्तेखानास कैदेंत टाकिलें. शहाजीचा सासरा लुकजी जाधवराव मोंगलांची नोकरी सोडून नुक्ताच निजामशहाकडे आला होता. फत्तेखानास कैदेत टाकल्याचें पाहून निजामशहाकडे रहावें कीं मोंगलांकडे जावें याविषयीं त्याच्या मनाची चलबिचल उडाली. जाधवराव मोंगलांकडे गेल्यास आपल्या दरबारची सर्व बित्तंबातमी मोंगलांस लागेल यासाठीं निजामशहानें त्याला पकडण्याचें ठरविलें, व दरबारांत भेटीस बोलाविलें. आयत्या वेळीं प्रसंग विकोपास जाऊन जाधवराव पकडला जाण्याऐवजीं ठार मारला गेला (शके १५५१, श्रावण शु. १५; सन १६२९). त्या प्रसंगीं जाधवरावाचें दोन मुलगेही मारले गेले. त्याचा भाऊ जगदेवराव व त्याची शूर स्त्री गिरिजाबाई यांनीं मात्र बचावून आपलें मूळ गांव शिंदखेड गांठलें.

३. सासऱ्याच्या भयंकर कत्तलीची हकीकत ऐकतांच शहाजीस निजामशहाचा मनस्वी राग आला. यापुढें निजामशहाची नोकरी न करितां स्वतंत्रपणें आपल्या मुलुखांत राहण्याचें त्यानें ठरविलें. लवकरच त्यानें त्रिंबकपासून जुन्नरपर्यंतचे किल्ले व आसपासचा मुलूख आपल्या ताब्यांत आणिला. जुन्नरचा अधिकारी श्रीनिवासराव याच्याशीं शहाजीचा चांगला स्नेह जडला व त्यानें आपली स्त्री जिजाबाई गरोदर आहे, असें पाहून तींस तेथेंच शिवनेरीवर बंदोबस्तानें ठेविलें. जुन्नरजवळ भीमगड नांवाचा त्यानें एक किल्ला बांधिला व पांच सहा हजार फौज ठेवून तो मोठ्या इतमामानें राहूं लागला. नंतर आपल्याला पदरीं ठेवण्याविषयीं शहाजीनें दाक्षिणेकडील मोंगल सुभेदार अजमखान याशीं बोलणें लाविलें. त्याला शहाजीची कर्तबगारी माहीत असल्यामुळें त्यास पदरीं ठेवून घेण्यास तो मोठ्या खुषीनें तयार झाला. लवकरच शहाजीस पांच हजार स्वारांची मनसब मिळून खर्चास दोन लक्ष रुपये मिळाले व त्याचा सात वर्षांचा मुलगा संभाजी यास दोन हजार स्वारांची मनसब देण्यांत आली (सन १६३०). यापुढें एक दीड वर्ष शहाजी मोंगलांचा आश्रय धरून राहिला.

४. फत्तेखानास कैदेंत घातल्यापासून निजामशाही राज्यांत अधिकच गोंधळ माजून गेला. तेव्हां मूर्तजा निजामशहानें फत्तेखानास बंधमुक्त केलें व आपलें आणि आपल्या राज्याचें रक्षण करण्याविषयीं त्याची विनवणी केली. पुढें दोन महिन्यांतच फत्तेखानानें मूर्तजास ठार केलें (सन १६३१). नंतर त्याचा लहान मुलगा हुसेन यास गादीवर बसवून फत्तेखानानें मोंगल सुभेदाराशीं सख्य केलें. तेव्हां मोंगल सुभेदार खूष झाला व त्यानें फत्तेखानाच्या जहागिरीपैकीं शहाजीस दिलेले प्रांत फत्तेखानास परत दिले. त्यामुळें शहाजीस चीड येऊन त्यानें मोंगलांची चाकरी सोडून दिली, व विजा-

पूरकरांच्या मदतीनें मोंगलांशीं लढाई करण्याचा त्यानें धाडसी संकल्प केला. एकदां मोंगलांचा सरदार महाबतखान यानें दौलताबादेस वेढा घातला होता; त्यावर विजापूरकरांच्या मदतीनें स्वारी करण्याचा शहाजीनें बेत केला. फत्तेखानासही त्यानें आपल्या बाजूकडे वळविलें. या युद्धांत मोंगलांना जय मिळाला. त्यांनीं फत्तेखान व निजामशहा या दोघांस कैद करून ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत पाठविलें. याच स्वारींत एक गोष्ट घडली. ती शहाजीच्या अकलेचें उत्तम उदाहरण आहे. एकदां शहाजी व विजापूरकर यांच्या फौजेचा मुक्काम भीमा-इंद्रायणीच्या संगमावर पडला होता. त्या दिवशीं सोमवार असून सूर्यग्रहण* पडलें होतें. तेव्हां विजापूरचा सरदार मुरार जगदेव यानें उत्तम पर्वकाळ आहे असें पाहून सुवर्णतुळा दान केली. त्या प्रसंगीं हत्तीची तुळा कशी करावी हा प्रश्न निघाला. तेव्हां कोणाचीही मति चालेना. अशा वेळीं शहाजीनें युक्ति सुचविली:—" हत्ती नावेंत घालून हत्तीचे भारें नाव जितकी पाण्यांत बुडेल तेथें खूण करून हत्ती काढून द्रव्य त्यांत घालून खूण जमली म्हणजे तुळा झाली." मुरारपंत शहाजीवर फार खूष झाला, व त्यानें त्या गांवचें नांव 'नागरगांव' होतें तें बदलून 'तुळापूर' असें ठेविलें. तें अद्याप चालत आहे.

५. येणेंप्रमाणें मोंगलांचा जय झाला, तरी शहाजीनें आपला निजामशाही वांचविण्याचा प्रयत्न सोडला नाहीं. त्यानें अहमद निजामशहाच्या वंशांतील एका मूर्तजा नांवाच्या लहान मुलास गादीवर बसविलें, आणि त्याचा कारभारी म्हणून राज्यकारभार स्वतः चालविला. विजापूरकरांच्या मदतीनें त्यानें मोंगल सरदार महाबतखान याचा परिंडा येथें मोड करून त्याला खानदेशांत हुसकून दिलें. शहाजीस विजापूरकरांची मदत आहे हें पाहून दिल्लीच्या बादशहानें मोठें सैन्य बरोबर घेऊन स्वतः दक्षिणेंत जाण्याचें ठरविलें, व दक्षिणेंत आल्या-

* शके १५५५ भाद्रपद वद्य ३०, सोमवार ता. २३।९।१६३३.

वर विजापूरकरांवर तीन दिशांनीं हल्ले सुरू केले. तेव्हां विजापूरकर शरण आले व त्यांनीं तह केला (६ मे १६३६). त्यांत विजापूरकरांनीं मोंगलांची सार्वभौम सत्ता कबूल केली, त्याच्या मोबदला निजामशाहीपैकीं कांहीं मुलूख विजापूरकरांस मिळाला. शहाजी भोंसले याजकडे असलेले त्रिंबक, शिवनेरी व इतर पांच किल्ले तो परत देणार नाहीं तेथपर्यंत त्यास कोणत्याही प्रकारें आश्रय न देण्याचें विजापूरकरांनीं अभिवचन दिलें. इतकें झाल्यावर दक्षिणच्या सुभ्याची व्यवस्था आपला मुलगा औरंगजेब यास सांगून बादशहा परत गेला. मग महाबतखानाचा मुलगा खानजमान हा शहाजीवर चालून आला. पहिल्यानें त्यानें शिवनेरीस वेढा घातला. शहाजीनें मोंगल सैन्याभोंवतीं घिरट्या घालून त्यांची अन्नसामुग्री अशा शिताफीनें तोडिली कीं, शत्रूस वेढा उठविणें भागच पडलें असतें. परंतु विजापूरचा सरदार रणदुल्लाखान त्याच्या मदतीस आल्यामुळें शहाजीचे श्रम व्यर्थ गेले. तथापि मोंगल व विजापूरकर यांस हुलकावण्या देऊन आपला मुलूख स्वतंत्र राखण्याची चार पांच महिने त्यानें शिकस्त केली. शेवटीं तो एकदां कल्याणजवळच्या माहुली किल्ल्यांत असतां शत्रूनें त्या किल्ल्यास वेढा दिला. तेव्हां निरुपाय होऊन त्यानें तहाचें बोलणें सुरू केलें. सन १६३६च्या आक्टोबरांत तह ठरला. त्यांत शहाजीनें शिवनेरी व इतर सहा किल्ले मोंगलांस देण्याचें मान्य करून निजामशहाच्या वंशजास त्यांच्या स्वाधीन कलें. शहाजीस पदरीं ठेवावयाचें व त्यास पुणें व सुपें या दोन परगण्यांची जहागीर द्यावयाची, या ठरावास विजापूरकरांनीं मान्यता दिली. अशा प्रकारें आपला निजामशाही बांचविण्याचा प्रयत्न शहाजीनें मोठ्या कष्टानें सोडून दिला. या सुमारास विजापूरकरांच्या ताब्यांतील कर्नाटक प्रांतांत पाळेगारांनीं बंडें उभारिलीं होतीं. पराक्रमी व धोरणी सरदार म्हणून शहाजीची ख्याति होती. तेव्हां सुलतानानें कर्नाटक प्रांतांत

व्यवस्था करण्याची कामगिरी शहाजीवर सोंपविली (सन १६३८). त्यानें तिकडील बंडखोरांचा तेव्हांच मोड केला व लवकरच कर्नाटकांत स्वस्थता व शांतता नांदूं लागली. तेव्हां यापुढें शहाजीस कर्नाटकांतच पांच लक्ष होनांची जहागीर मिळून तिकडे तो बंगळूर येथें मोठ्या तोलानें राहूं लागला.

---

४ शिवबाचें बालपण.



मलिकंबराच्या मृत्यूनंतर निजामशाही राज्यांत अव्यवस्था माजली व त्या राज्यावर दिल्लीच्या मोंगलांचे एकसारखे हल्ले होऊं लागले. तेव्हां त्या बिकट परिस्थितींत शहाजीनें पुणें प्रांत आपल्या हातीं आणिला, जुन्नरचा अधिकारी श्रीनिवासराव याशीं स्नेह केला व आपली स्त्री जिजाबाई गरोदर आहे असें पाहून मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें तीस बंदोबस्तानें शिवनेरीस ठेवून दिलें. भोंवतालची अंदाधुंदी व मधल्यामध्यें आपल्या नवऱ्यावर पडलेली शत्रूंची धाड या गोष्टींचा विचार जिजाबाईच्या मनांत रात्रंदिवस येत असल्यामुळें ती सारखी काळजींतच असे. त्या संकटकाळीं तिनें तेथें किल्ल्यावर असलेल्या शिवाई देवीला " मला मुलगा होऊं दे, मी त्याला तुझें नांव ठेवीन," असा नवस केला. तिला शके १५५१च्या फाल्गुन व० ३ स * (१९।२।१६३०) मुलगा झाला, तेव्हां तिला फार

---

* शिवाजीची जन्मतिथि ही बाब वादग्रस्त आहे. आजपर्यंत शके १५४९ची वैशाख शु० २ (सन १६२७) ही शिवाजीची जन्मतिथि मानली जाई. बऱ्याच बखरींतही हीच तिथि दिलेली असते. निदान शके १५४९च्या वैशाखांत शिवजन्म झाला असें बहुतेक बखरकार लिहितात. तथापि भा. इ. सं. मं. च्या चतुर्थ संमेलनवृत्तांत जेधे यांची शकावली छापली आहे. तींत शके १५५१ फाल्गुन वा ३ शुक्रवार [ता. १९ फेब्रुवारी सन १६३०] ही

आनंद झाला. हें देवीला केलेल्या नवसाचें फळ म्हणून तिनें त्याचें नांव शिवाजी असें ठेविलें.

२. शिवाजीचें लहानपण शिवनेरी किल्ला व त्याच्या आसपासचा पुणें प्रांत यांतच गेलें. तेव्हां त्याची जोपासना करणारी त्याची आई जिजाबाई हीच काय ती होती. जिजाबाईला माहेरचें सुख पहिल्यापासून नव्हतेंच. आतां तर जाधव हे भोंसल्यांचे वैरीच झाले होते! इकडे नवऱ्याकडून तिनें सुखाची आशा करावी तर शहाजीचें तिजशीं काय बिनसलें होतें कोणास ठाऊक! त्यानें मोहित्यांची कन्या तुकाबाई हिजशीं दुसरें लग्न केलें. अशी जिजाबाईची अगदीं निराशा झाली होती. कोणीकडूनच तिला सुख नव्हतें. पण ईश्वराची लीला अगाध आहे. तिला त्यानें जो मुलगा दिला होता त्याची भक्ति तिजवर कांहीं विलक्षणच होती! शिवाजीची एकंदर चालचालणूक पाहून तिला अतिशय समाधान होई, व असा * मुलगा लाभला म्हणून तिला धन्यता वाटे. शिवाजी म्हणजे तिचा जीव कीं प्राण! नवऱ्याविषयीं किंवा बापाविषयीं स्मरण होऊन तिला दुःखाचा आवेग येई; परंतु इतक्यांत जर कां शिवाजी दिसला तर तें दुःख पार कोठल्याकोठें विरघळून जाई. इतकें ल्या माउलीचें शिवाजीवर प्रेम होतें. तिनें शिवाजीला जवळ बोलावून कधीं रामा-

---

शिवाजीची जन्मातिथि म्हणून दिली आहे. तिथि, वार व नक्षत्र यांचा वस्तुस्थितीशीं मेळ या दिवशीं उत्तम बसतो. तसें इतर ठिकाणीं दिलेल्या तिथीसंबंधीं होत नाहीं. शिवाय गोविंदसुत परमानंद यानें संस्कृत भाषेंत शिवाजीच्या सांगण्यावरून रचिलेलें 'शिवभारत' नांवाचें शिवचरित्र नुकतेंच उपलब्ध झालें आहे. त्यांतही शके १५५१, फाल्गुन वा ३ शुक्रवार, हीच तिथि दिली आहे. तेव्हां शके १५५१, फाल्गुन वा ३ शुक्रवार, नक्षत्र हस्त, हीच शिवाजीची जन्मतिथि मानणें युक्त आहे.

* पूर्वी शके १५४५ [सन १६२३] त जिजाबाईस एक मुलगा झाला होता. त्याचें नांव संभाजी असून लहानपणापासून तो शहाजीजवळ राही.

यणांतल्या तर कधीं महाभारतांतल्या वीरांच्या कथा सांगाव्या. रावणाच्या दुष्टाव्याच्या गोष्टी ऐकून शिवाजीनें क्रोधानें लाल व्हावें. रामाच्या वनवासानें त्याचें मन द्रवून जावें. 'शत्रूचें पारिपत्य करून कुळाचा उद्धार करणारा शककर्ता राजा आपल्या कुळांत निपजणार आहे, म्हणून देवीचे दृष्टांत झाले आहेत, परंतु ते केव्हां खरे होतील कोण जाणे!' असे दुःखोद्गार जिजाबाईनें कधीं कधीं काढावे. हा आपल्या अत्यंत प्रिय मातेचा उपदेश शिवाजीच्या डोक्यांत सारखा घोळत असे. जिजाबाई ही त्याचा पहिला गुरु होय.

३. त्याचा दुसरा गुरु म्हटला म्हणजे पुणें प्रांतावरचा शहाजीचा कारभारी दादाजी कोंडदेव मलठणकर हा होय. दादाजी कोंडदेव फारच करारी होता. एके दिवशीं दादाजीपंतानें सरकारबागेंतील एक पाडाचा आंबा तोडला. पुढें आपण हा मालकाला न विचारतां तोडला याबद्दल वाईट वाटून त्यानें ज्या हातानें तो आंबा तोडला होता तो हात तोडून टाकण्याचा निश्चय केला. शिवाजीनें व जवळच्या इतर मंडळींनीं फार निषेध केला. तेव्हां पंतानें या चुकीचें आपल्याला जन्मभर स्मरण रहावें व आपल्या हातून फिरून चूक होऊं नये, म्हणून त्या हाताची अस्तनी जन्मभर लांडी ठेविली! पुणेंप्रांत अगदीं उजाड पडला होता, तो लागवडीस आणण्याची दादाजी कोंडदेवानें फार खटपट केली. मुलुखांत लांडगे फार झाले होते, म्हणून त्यानें लोकांस बक्षिसें देऊं करून लांडगे मारून टाकविले; व लोकांस कांहीं वर्षांची सूट देऊन जमिनी लागवडीस आणिल्या. या प्रांतांत रहाणाऱ्या लोकांस मावळे म्हणत. ते दिसण्यांत अडाणी असले तरी ग्रामाणिक असून मोठे उद्योगी व चपळ असत. दादाजीनें प्रांताचा बंदोबस्त करण्यांत त्यांचा चांगला उपयोग करून घेतला. बिनकवाइती लोकांचें एक पथक त्यानें तयार केलें व गांवोगांव चौक्या

पहारे बसवून चोरांची भीति नाहींशी केली. आपल्या हद्दींतील किल्ले दुरुस्त केले व त्यांजवर शिबंदी ठेवून दिली. या दादाजीच्या व्यवस्थेनें प्रांतांत शांतता नांदू लागली. लोकांस उद्योगधंदा मिळाला, आणि पुणेंप्रांताची लवकरच खूप भरभराट झाली. अशा रीतीनें ज्या मावळे लोकांच्या साहाय्यानें शिवाजीनें पुढें स्वराज्यस्थापना केली व मोठमोठीं युद्धें जिंकिलीं, त्या लोकांस योग्यतेस चढविण्याचा दादाजीनें आरंभ केला होता ! त्यानें शिवाजीला घोड्यावर बसणें, तिरंदाजी करणें, भाला मारणें, तरवार वगैरे हत्यारें उत्तम चालविणें इत्यादि राजपुत्रास अवश्य असें सर्व मर्दानी शिक्षण दिलें. शिवाय, वसूल-बाकीच्या हिशेबी कामांतही शिवाजीची त्यानें बरीच गति करून दिली.पुढें जी शिवाजीनें आपल्या राज्यांतील वसूल वगैरे मुलकी बाबींची उत्कृष्ट व्यवस्था लाविली, ती लावतां येण्यास दादाजी कोंडदेवापासून लहानपणीं मिळालेल्या शिक्षणाचा त्याला फार उपयोग झाला हें उघड आहे. गांवच्या मोकदमीबद्दल दोन पक्षांमध्यें तंटे होत, त्यांचा निवाडा प्रांताचा मुख्य या नात्यानें ' हजीर मजलसीं बैसून ' (प्रमुख लोकांच्या सभेमध्यें बसून) दादाजी करीत असे. अशा तंट्यांचीं बरींच निवाडपत्रें (महजर) उपलब्ध झालीं आहेत. त्यांजवर दादाजीचा उल्लेख " मसरल हजारती राजश्री दादाजी कोंडदेऊ सुभेदार व नामजाद किले कोंडाणा व महालानिहाय* " असा आढळतो. यावरून दादाजी कोंडाण्याचा सुभेदार असून कोंडाण्याच्या टापूखालील सर्व प्रांतावर त्याचा अंमल चाले असें उघड दिसतें. तंटे तोडण्याचें काम सदरेंत होई. त्यामुळें आपसांत तंटे तोडण्याची लोकांना संवय झाली व हें सर्व काम शिवाजीच्या नजरेसमोर होत असल्यामुळें त्याला न्यायमनसुब्याची माहिती झाली.

---

* मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १८, लेखांक ७, ८, ९.

४. शिवाजी सुमारें तेरा वर्षांचा झाला तेव्हां त्याच्या गुणांची फार तारीफ ऐकल्यामुळें शहाजीस त्याची भेट घेण्याची इच्छा झाली व त्यानें त्यास कांहीं दिवस विजापुरास नेलें. तेथें असतां लहानपणीं आईच्या तोंडून ऐकलेलीं यवनांचीं दुष्ट कृत्यें शिवाजीच्या प्रत्यक्ष दृष्टीस पडूं लागलीं. या गोष्टी डोळ्यांनीं पाहून त्याचें अंतःकरण खवळून जाई व गोवध करणाऱ्या यवनांचें पारिपत्य करून गोवध केव्हां बंद करीन असें त्यास होऊन जाई. एकदां शहाजीनें पातशहाच्या दर्शनास येण्याविषयीं शिवाजीस आग्रह केला. तेव्हां शिवाजीनें खिन्न होऊन उत्तर केलें " अमीर वजीर यांचे घरीं जाणें, हें माझे चित्तास योग्य वाटत नाहीं.§ " हें बोलणें शहाजीस रुचलें नाहीं व त्यानें शिवाजीचा निषेध केला कीं, " पृथ्वीचे अधिपती ते, तेव्हां आपला धर्म आपण रक्षून सेवा करून असावें. § " तरी शहाजीस वाटलें कीं, आपण यास दरबारांत घेऊन जावें, मग तेथें कांहीं हा वांकड्या रीतीनें वागावयाचा नाहीं. म्हणून त्यानें अत्याग्रहानें एक दिवस शिवाजीस आपल्यावरोवर दरबारास नेलें. शहाजी रीतीप्रमाणें मुजरा करून आपल्या जागीं जाऊन वसला; परंतु शिवाजी मुजरा न करितां तसाच आपल्या जागीं जाऊन वसला. तेव्हां दरवारांत सर्वांस आश्चर्य वाटलें व जिकडेतिकडे चुळबूळ सुरू झाली. इतक्यांत+मुरारपंत म्हणाला, " लेंकरूं आहे, दरबार पाहून घाबरलें. त्याला लवकर दरबारांतून जाऊं द्या. " असें म्हटल्यावर विडे देऊन निरोप दिला. शिवाजी नीट वागेल व दौलतीचें रक्षण

---

§ चिटणीस बखर पृष्ठ २७. × मुरारपंत सन १६३५त ठार झाला असें प्रो. सरकार लिहितात [मॉडर्न रिव्हयू, सप्टेंबर १९१७]. त्याशीं या प्रसंगाचा विरोध येतो.

करील, असें शहाजीस वाटत होतें; पण त्याच्या वागण्याची ही रीत. तेव्हां पुढें काय करावें म्हणून शहाजी मोठ्या फिकीरींत पडला.

५. एके दिवशीं शिवाजी विजापुरांत हिंडत होता, तेव्हां एका कसायाच्या घरीं गाईचा वध होत असतां तिनें हंबरडा फोडला, तो त्यानें ऐकला. तेव्हां त्याला कळवळा येऊन त्या कसायाचा संताप आला. त्यानें कसायास धरून कमच्याचा मार दिला, गाय सोडून दिली व तिची किंमत कसायाच्या हातावर ठेवून कसायास घालविलें. नंतर हें वृत्त साऱ्या गांवभर कळलें. तेव्हां लोक म्हणूं लागले कीं, "आज यवनी पातशाही नष्ट झाली कीं काय?" हें वृत्त शहाजीस समजलें, तेव्हां त्याला आपल्या मुलाविषयीं मोठी काळजी लागून राहिली व याला कोठें तरी लांब ठेविला पाहिजे असा त्यानें विचार केला. दादाजी कोंडदेव हिशेब देण्यास विजापुरीं आला होता. त्याजबरोबरच शिवाजीस त्यानें पुण्यास परत पाठवून दिलें (शके १५६५; इ. स. १६४३).

---

५. स्वराज्यस्थापनेची पूर्वतयारी.

शिवाजीला पुण्यास पाठवितांना शहाजीनें दादाजीस शिवाजीस फार जपण्यास सांगितलें होतें. यामुळें दादाजीही शिवाजीवर जास्त नजर ठेवूं लागला. आतां शिवाजीही मोठा झाला होता. तेव्हां वसूल करावयास पंत निघाले कीं शिवाजीस आपल्या बरोबर नेत. आपल्या जहागिरीचा बंदोबस्त कशा तऱ्हेनें उत्तम राहील, याबद्दल शिवाजीला वारंवार कांहीं माहिती देत; वसुलबाकी कशी करावी हेंही त्यास शिकवीत. शिवाजी जसा मोठा होऊं लागला तसतशा त्याच्या बालपणच्या कल्पना दृढावत चालल्या. आतां तर त्याला

जास्त समजूं लागलें. मुसलमानांच्या धर्मांत देव निराकार आहे असें मानिलें आहे. त्यामुळें कित्येक धर्मवेड्या मुसलमानांस मूर्तीची चीड येऊन त्यांजकडून या वेळीं कधीं कधीं हिंदूंच्या देवळांतील मूर्तीचा ध्वंस होत असे. शिवाय गाई व ब्राह्मण यांस हिंदुधर्म जसा पूज्य मानतो तसे महंमदी धर्मांतील लोक मानीत नसल्यामुळें या दोहोंचाही त्यांजकडून योग्य बोज राखला जात नसे. रामायण व महाभारत यांच्या श्रवणानें हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें शिवाजीच्या मनावर पक्कीं बिंबलीं होतीं व गाई, देव (मूर्ति) आणि ब्राह्मण यांच्याठायीं त्याची अढळ निष्ठा बसून गेली होती. म्हणून त्यांचा उपमर्द झाल्याच्या गोष्टी जेव्हां त्याच्या कानावर येत, तेव्हां शिवाजी अगदीं क्रोधायमान होई व या कृत्यांचा नायनाट कसा करावा यासंबंधींचे विचार त्याच्या मनांत नेहमीं येत. आपल्या हातांत सामर्थ्य, अधिकार, व सत्ता आल्याशिवाय आपल्याला हीं कृत्यें बंद करतां यावयाचीं नाहींत असें त्यास वारंवार वाटे. आपल्या अंगांत सामर्थ्य असून हातांत सत्ता आल्याशिवाय कांहीं उपयोग नाहीं, व त्यासाठीं आपलें हिंदूंचें राज्य स्थापण्याची खटपट आपण केली पाहिजे, अशी कल्पना त्याच्या मनांत येई व केव्हां केव्हां तर ती अत्यंत जोरदार होई. तेव्हां "आम्हीं हिंदूकुळीं जन्म घेऊन ब्राह्मणउच्छेद, गोवधादि दुष्ट कृत्यांचा नाश होईल, तरी जन्मास आलियाचें फळ, नाहीं तरि गर्भाचे ठिकाणीं हा देह झाल्याचें दुःख नाहीं; परंतु जीवित असल्यानी दुःसह* " असें मनांत येऊन त्यास अगदीं चैन पडेनासें होई. असें चाललें असतां शेवटीं त्यानें निश्चय केला कीं, " **धर्मरक्षणार्थ** प्राणही वेंचून धर्म रक्षूं व आपलें पराक्रमें नवीन मुलूख संपादूं तें अन्न भक्षूं. नवें साधावें हें या कुलांत जन्मल्याचें सार्थक. दैव पंगु आहे. यास्तव

* शिवदिग्विजय, पृष्ठ ११५.

देवावर व दैवावर भार घालून पुरुषप्रयत्न-अवलंबन करावें. त्यास दैव जसें अधिक साहाय्य होईल तसतसें अधिक करीत जावें. देव परिणामास नेणारा समर्थ आहे. × "

२. दादाजीच्या हाताखालीं शामराज नीळकंठ, बाळकृष्ण मुजुमदार, सोनोपंत व रघुनाथ बल्लाळ कोरडे ही ताज्या दमाची तरुण-बांड मंडळी होती. शिवाजीचा निश्चय कायम झाल्यावर या घरच्या मंडळीसच आपल्या मताकडे ओढण्याची त्यानें खटपट चालविली व त्यांत यश येण्यास वेळ लागला नाहीं. शिवाय दादाजीपंत शिवाजीस प्रांतांत हिंडण्यास घेऊन जाऊं लागला होताच. तेव्हां डोंगरांत राहणाऱ्या मावळे लोकांपासून त्यानें त्या प्रांतांतील सर्व जागांची माहिती करून घेतली. या वेळींच तीन मावळे शिवाजीला अतिशय प्रिय झाले व ते यावज्जन्म त्याच्या प्रीतींत राहिले. ते तानाजी मालुसरा, बाजी पासलकर व येसाजी कंक हे होत. या सर्व लोकांची शिवाजीवर फारच भक्ति होती. एकदां शिवाजीनें विचारिलें, "आम्हीं कांहीं कार्यावलंब केला असतां तुमची अनुकूलता कशी आहे?" लोकांनीं उत्तर केलें, " महाराज, तुम्ही धणी कसे, मायबाप आहां. तुमचे शब्द तेथें आमचें शीर. जी आज्ञा कराल ती मान्य. वरकड विषयांचा पदार्थच मानीत नाहीं. " मावळ्यांचा आपल्यावरील दृढविश्वास पाहून आपल्या कल्पना त्यांच्या मनांत रुजविण्याचा शिवाजीनें क्रम ठेविला. शिवाजीचे विचार मावळ्यांस पटले व ते वाटेल त्या बिकट कामांत त्यास साहाय्य करण्यास तयार झाले. पुढें " कारकून सरदार वगैरे ममतेंत, मसलतींत येतील त्याप्रमाणें घेऊन आणखी चांगले मर्द शिपाई पाहून त्यांस जवळ ठेवावें. कारकून चांगला कर्ता लिहिणार पाहून त्यास ठेवावा. तसेंच राजकारणें करावीं; मातबर चहूं जागचे

× चिटणीसबखर, पृ. २९.

मराठे यांसी आप्तपणा करावा. पत्रें लिहावीं. त्यांस आणून भेट घ्यावी. आपण त्यांजकडे जाऊन ' आम्हांस अनुकूल असावें ' असें बोलावें. असें करण्यांत ज्यांनीं महाराजांचें (शिवाजीचें) बोलणें परम आदराचें व पराक्रमाचें ऐकावें त्यांस वेध लागून वाटावें कीं, हे परम थोर आहेत. यांचेच संमतें चालावें. हे सांगतील तसें चालावें. प्राणही गेले तरी जावोत. परंतु सेवा करून यांचे आज्ञेंत चालावें, अशीं सर्वांचीं चित्तें वेधून घेतलीं "*

३. शिवाजी व त्याचे अनुयायी एकत्र जमत व पहिल्यानें काय करावें यासंबंधीं त्यांचीं बोलणीं होत. त्यांत पुष्कळ वादविवाद झाल्यावर आपल्या भोंवतालचे देशमुख आपण अंकित करून घेतले पाहिजेत असें ठरलें. मग या मंडळींनीं तें कार्य करण्यास आरंभ केला. प्रथम गोडीगुलाबीनें, ' मी तुमचा अंकित आहें, ' असा दस्त लिहून दे अशी देशमुखास ते विनंति करीत. गोडीगुलाबीनें कार्य होत नाहीं असें दिसल्यास धाकदपटशास सुरुवात होई. मग त्या दस्त लिहून न देणाऱ्या देशमुखास अडून म्हणा उघड म्हणा त्रास देत. अशा रीतीनें बारा मावळांतील × देशमुख शिवाजीनें बांधून घेतले. याकरितां त्याला कांहीं अधिकारी नेमावे लागले. देशमुखाचें मन वळविणारास त्यानें डबीर नेमिलें; जो त्याजकडून दस्त करून घेई त्यास मुख्य प्रधान नेमिलें; व ज्या छोट्या सैन्याच्या जोरावर ही खटपट चालली होती त्याच्या व्यवस्थापकास सबनीस केलें. " हीं

* चिटणीसबखर पृ. ३०. × जुन्नरापासून चाकणपर्यंत १२ मावळें, व पुण्यापासून शिरवळापर्यंत १२ मावळें. जुन्नरापासून चाकणपर्यंतः—शिवनेर, जुन्नर, मोन्नेर, घोडनेर, भीमनेर भामनेर जामनेर पिंपळनेर, पारनेर सिन्नर, संगमनेर, अकोळनेर. पुण्याखालीलः—अंदरमावळ नाणेमावळ, पवनमावळ, घोटणमावळ, पौडखोरें, मोसेमावळ, मुठेमावळ, गुंजणमावळ, वेळवंडमावळ, भोरखोरें, शिवतरखोरें व हिरडसमावळ. (म. इ. सा. खंड ४, पृष्ठ ७८-७९).

सर्व कृत्यें आपल्या जहागिरीच्या संरक्षणाकरितां मी करीत आहें" असें शिवाजी म्हणे.

४ दादाजी कोंडदेवानें पुणेंप्रांतांतील जहागिरींची व्यवस्था नीट लाविल्याचें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. परंतु जहागिरीची व्यवस्था लाविली म्हणजे आपली इतिकर्तव्यता झाली अशी त्याची समजूत नव्हती. शिवाजी उत्साही व ताज्या दमाचा असून स्वतंत्र राज्य स्थापण्याचा हुरूप त्याच्या ठिकाणीं होता. दादाजीनें हें ओळखिलें होतें व या नव्या उद्योगासही त्याचें पाठबळ होतें. शके १५६१मधील शिवाजीनें पाठविलेला एक हुकूमनामा × उपलब्ध झाला आहे. त्यावर शिवाजीची मुद्रा आहे. तींत खालील मजकूर आहेः—

प्रतिपच्चन्द्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववन्दिता ।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥

अर्थ—ही शहाजीचा मुलगा शिवाजी याची मुद्रा. प्रतिपदेच्या चन्द्रकोरीप्रमाणें सारखा वाढत जाण्याचा तिचा धर्म असून ती सर्व विश्वास पूज्य आहे. ती (लोकांच्या) कल्याणासाठीं शोभत आहे.

हीच मुद्रा शिवाजीच्या पुढील कागदपत्रांवर आढळून येते. शके १५६१च्या सुमारास ती पहिल्यानें तयार झाली. त्या वेळीं शिवाजीचें वय सुमारें दहा वर्षांचें असल्यानें ती त्यानें तयार केली असें म्हणतां येत नाहीं. ती शहाजी आणि दादाजी यांच्या विचारेंच तयार झाली, यांत शंका नाहीं. वर्धिष्णु व विश्ववन्दिता या पदांवरून स्वतंत्र राज्याचाच बोध होतो. तेव्हां केवळ दादाजीच नव्हे तर शहाजीही स्वराज्यस्थापनेच्या तयारीस अनुकूल होता हें उघड आहे. दादाजी नरस प्रभु देशपांडे या नांवाचा वेलवंडखोरे व रोहिडखोरें येथील कुलकर्णी होता.

× म. इ. सा. खंड १५, लेखांक ४३७.

हा तरुण व धाडसी असून शिवाजीनें त्यास नवीन उद्योगांत लवकरच सामील करून घेतला. शपथप्रमाणही झालें. रोहिडा किल्ल्यावरील देवाच्या पूजेस पूर्वीचा माणूस काढून त्यानें 'सिवा जंगम' यास ठेविलें (शके १५६४, सन १६४३). पुढें रोहिडा किल्ल्यावर तो स्वतंत्ररीतीनें वागूं लागला. तो किल्ला विजापूरच्या सिरवळ परगण्यांत मोडत होता. तेथील अमिनास हें न खपून त्यानें विजापुराकडे तक्रार केली. तेव्हां विजापूरदरबारनें दादाजी प्रभूस एक खरमरीत हुकूम धाडिला. 'शिवाजीराजे फरजंद शहाजीराजे यानें शहाजीशीं बेमानगी करून तुझे खोरियांत रोहिडेश्वरचे डोंगराचे आसराण पुंडावेयानें मावळे वगैरे लोक जमाव केला आणि तेथून जाऊन पेशजी किल्ल्यावरील ठाणें उठवून आपण किल्ल्यांत शिरला. .....त्यास लोकाचा वगैरे जमाव तूं सामील असून फिसाद करून रसीद राजे मजकूर निल्हेस देतोस व ठाणे शिरवळ अमिनाशीं रुजू रहात नाहींस. मगरुरीचे जबाब ठाणगे व नायकवाडियासी देतोस हे जाहिरात आले. त्यास हे नामाकूल गोष्ट तुझे जमेदारीचे इजतीस आहे.*....' हा हुकूम येतांच दादाजीचे म्हातारे वडील नरसीबावा हवालदिल झाले. तेव्हां शिवाजीनें दादाजीप्रभूस पुढील पत्र पाठवून धीर दिला.

श्री. १५६७ वैशाख शु० १.

सिका **नकल**

राजश्री दादाजी नरस प्रभू देशपांडे व कुलकर्णी ता॥ रोहिरखोरे व वेलवंडखोरे यासि प्रति सिवाजी राजे सा॥ खमस अर्बैन अलफ तुम्हांस (सिका) मेहेरबान वजिराचा विजापुराहून हुकूम आला तो ठाणें सिरवलाहून ठाणें अमिनानीं तुम्हांकडे पाठविला त्याजवरून तुमचे बाप नरसीबावा हवालदिल जाले. कित्येक बहुतेक लिा. त्यास शहास बेमानगिरी तुम्ही व आम्ही करीत नाहीं. श्रीरोहिरेश्वर

* मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १५, लेखांक २६७.

तुमचे खोरियांतील आदि कुलदेव तुमचा डोंगरमाथा पठारावर शेंद्री (सह्याद्री) लगत स्वयंभू आहे. त्याणी आम्हास यश दिलें व पुढें तो मनोरथ **'हिंदवी स्वराज्य'** करून पुरविणार आहे. त्यास बाबास हवाल होऊं नये. खामाखा सांगावा आणि तुम्ही तों कागद घेऊन सिताब हुजूर येणें. राजश्री **दादाजी-पंताचे** (दादाजी कोंडदेव) विद्यामानें बाबाचे व तुमचे व आमचे **श्रीपासी इमान झालें तें कायम वज्रप्राय आहे**, त्यांत अंतर आम्ही व आमचे लेकराचे लेकरी वतन वगैरे चालविण्याविसी कमतर करणार नाहीं. हे राज्य व्हावें हें श्रीचे मनांत फार आहे. याप्रमाणें बाबाचे मनाची खातरी करून तुम्हीं येणें. रा॥ छ० २९ सफर बहुत काय लिहिणें. ÷ (मोहोर) रुज् सुरनीस, माहे सफर बार.

बांदल देशमुख व खोपडे देशमुख यांनीं शिवाजीनें पाठविलेल्या या पत्राची बातमी विजापुरास दिली. तथापि शिवाजीनें 'मी येथील सर्व कृत्यें बादशहाच्या मुलुखाचा बंदोबस्त व्हावा म्हणून करीत आहें' असें कळविलें व त्याच्या उद्योगाकडे विजापूर दरबारानें दुर्लक्ष केलें.*

५. शिवाजी पुण्यास येऊन राहिला तेव्हांच त्याचीं दोन लग्नें झालीं होतीं. पहिली स्त्री निंबाळकरांची सईबाई; हिलाच पुढें संभाजी झाला. दुसरी शिर्क्यांची सोयराबाई; हिजपासून राजाराम झाला.

÷ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १५, लेखांक २६८.

* दादाजी कोंडदेव स्वराज्याच्या कल्पनेस अनुकूल नव्हता अशी आजपर्यंत कल्पना असे व सर्व बखरींतून तींच ग्रथित केली आहे. उदाहरणार्थः—

" आपण म्हणतां तें कार्य चांगलें खरें, पण याचा शेवट लागणें परम दुर्घट आहे. या करण्यास आपणास मातबर स्थलें असावीं, हिंदुराजे व हिंदु-फौजा जागजागीं साह्यकर्त्या असाव्या, त्या समयीं ईश्वराची अनुकूलता व सिद्ध पुरुषांचा आशीर्वाद असतां अशा गोष्टी घडतील. साहेब मनांत आणितात हें कठीण. वाडिलें योग्यता मिळवून दौलत संपादन केली. याचा विचार म्हणावा तरि हें युग विपरीत, तेव्हां दिवसोंदिवस धर्म क्षयास जाणार, तेव्हां हें घडणें

६. स्वराज्यस्थापना.

(शके १५६८, इ. स. १६४६)

शिवाजी देशमुखांस बांधून घेत असतां त्याच्या मनांत अशी कल्पना आली कीं. आपला मुलूख डोंगराळ, तेव्हां यावर सत्ता चालवूं इच्छिणारानें किल्ल्यांसारख्या बळकट जागा आपल्या ताब्यांत घेतल्या पाहिजेत; एक किल्ला हातांत आला कीं. भोंवतालचा सर्व मुलूख कार्बाज करण्यास अवघड पडणार नाहीं: व एकदां आपल्या ताब्यांत मुलूख आला कीं. किल्ल्यावरून त्याच्या आसपासच्या सर्व मुलुखाचा बंदोबस्त ठेवणेंही सोईचें होईल. हे विचार त्याच्या सोबत्यांस पसंत पडून किल्ले घेण्याचा विचार कायम झाला. शके १५६८ मध्यें येसाजीकंक, तानाजी मालुसरे, बाजी पासलकर, या मावळ्यांनीं तोरणा किल्ल्यावरच्या किल्लेकऱ्यास वश केलें, व शिवाजीनें तोरणा घेऊन. स्वराज्यमंदिराची मुहूर्तमेढ रोविली. त्या किल्ल्याची डागडुजी करीत असतां त्यास एक मोहरांचा हंडा सांपडला; तेव्हां ' देवी मला प्रसन्न झाली आहे व तिनें मला हा प्रसाद दिला आहे' असें शिवाजीनें लोकांत प्रसिद्ध केलें. तेव्हां शिवाजीच्या कृत्यास ईश्वरी आशीर्वाद आहे असें कळल्यावर लोकांची शिवाजीवर निष्ठा बसली व ते त्यास देवाप्रमाणें भजूं लागले.

दुरासद. कालदेशवर्तमान तिहींकरून मनसब्यास येत नाहीं. वडिलीं दौलत संपादिली ते गमावली, हें वांट्यास न यावें." असा दादाजीनें शिवाजीस उपदेश केला असें चिटणीसांच्या बखरींत लिहिलें आहे [चिटणीस—बखर पृष्ठ २९]. वर दिलेल्या लेखांक २६८मध्यें दादाजी कोंडदेवामार्फत दादाजी नरस प्रभूशीं हिंदवी स्वराज्य व वतनबाबी यांजविषयीं बोलणें झाल्याचें लिहिलें आहे. शिवाय स्वतंत्र राजास शोभणारी मुद्राही शिवाजी दहा बारा वर्षांचा असतां करण्यांत आली. त्यावरून दादाजी कोंडदेव व शहाजीही स्वराज्यस्थापनेस अनुकूल नव्हते, ही आजपर्यंतची सर्वमान्य कल्पना चुकीची ठरते.

२. तोरण्याच्या अग्नेयीस तीन मैलांवर मुरबादचा डोंगर आहे, त्यावर तोरण्यांत सांपडलेलें द्रव्य खर्चून राजगड किल्ला शिवाजीनें बांधिला. ही सर्व हकीकत विजापुरास कळली; तेव्हां बादशहानें शिवाजीस किल्ला बांधण्याचें काम बंद ठेवण्याविषयीं हुकूम केला; व शहाजीपाशीं त्याच्या मुलाच्या दांडगाईबद्दल जाब मागितला. शहाजीनें दरबारची कशीबशी समजूत केली व शिवाजीस राजगडची तटबंदी बंद ठेवण्याविषयीं लिहिलें. दादाजी* कोंडदेव अगदीं म्हातारा झाला होता. तो याच सुमारास वारला (सन १६४७ ऑक्टोबर). अगदीं मरतांना त्यानें शिवाजीस आपल्याजवळ बोलावून पुढीलप्रमाणें बोध केला:—"गोब्राह्मणांचें प्रतिपालन करण्याचा जो उद्योग तुम्हीं आरंभिला आहे, तो तसाच चालवून धर्मस्थापना करा. ह्यांत देव तुम्हांला यश देईल.×" दादाजी वारल्यावर शहा-

* दादाजी कोंडदेव स्वराज्याच्या कल्पनेस अनुकूल नव्हता असा बखरकारांचा समज होता. म्हणून त्यांनीं शिवाजीच्या धाडसी उद्योगामुळें आपल्या धन्याची जहागीर नाहींशी होणार अशी सारखी हुरहुर लागून त्यांत दादाजीचें देहावसान झालें असें लिहिलें आहे. 'यांजपाशीं कारभार करणें युक्त दिसत नाहीं. यांचे करण्यानीं महाराजांस (शहाजीस) पेंच पडणार, अपयश आपणावर येईल म्हणून क्षीण झाले.' (चिटणीसबखर पृष्ठ ३१). डफनेंही दादाजीच्या मरणाची कारणमीमांसा अशीच दिली आहे. आणि दादाजी व शहाजी यांना स्वराज्याची कल्पनाच नव्हती, किंबहुना ते तिच्याविरुद्ध होते, असा सार्वत्रिक समज प्रचलित असल्यामुळें न्यायमूर्ती रानडे आदिकरून अलीकडील लेखकांनीं हीच मीमांसा खरी मानली. तथापि शिवाजीच्या मरणानंतर थोड्याच वर्षांनीं राजारामाकरितां तंजावरास कृष्णाजी अनंत सभासद यांनीं लिहिलेल्या शिवचरित्रांत 'त्याजवर कालवशात् दादाजी कोंडदेव मृत्यु पावले' अशा एकेरी वाक्यांतच दादाजीच्या मृत्यूचा उल्लेख आहे व कारणमीमांसा कांहींच दिली नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. शिवाय अस्सल कागदपत्रांच्या पुराव्याच्या विरुद्ध या मीमांसेचा रोख असल्यानें ती विश्वसनीय मानतां येत नाहीं.

× ग्रँट डफकृत मराठ्यांचा इतिहास भाग १ पृष्ठ १०५ (१९२१ ची प्रत).

जीकडून वसूल मागण्यास लोक आले. त्यांस 'येथला खर्च वाढला आहे सबब आम्हांस कांहीं देतां येत नाहीं,' असें सांगून शिवाजीनें परत पाठविले.

३. दादाजीच्या मरणाच्या वेळच्या उपदेशानें शिवाजीस उत्तेजनच आलें. त्यानें आपलें किल्ले घेण्याचें व आपल्या प्रांतांतील लोकांस कह्यांत आणण्याचें काम जोरांत चालविलें. चाकणचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा ह्यास वश करून घेतलें व तो किल्ला त्याजकडेच ठेविला. अशाच रीतीनें कोंडाणें व पुरंदर हेही किल्ले शिवाजीनें आपल्या ताब्यांत आणिले. आतां शिवाजीचें सामर्थ्य बरेंच वाढलें व जास्त धारिष्टाचीं कृत्यें करण्याचा हुरूप त्यास आला. कल्याणचा सुभेदार विजापूरकडे खजिना पाठवीत आहे अशी त्यास बातमी लागली. तो खजिना हस्तगत करून घेण्याचा बेत त्यानें केला व शेलके लोक बरोबर घेऊन तो सर्व खजिना त्यानें मिळविला. यापुढें तुंग, तिकोना, लोहगड, राजमाची हे किल्ले घेतले व कोंकणांतल्या लोकांनीं बोलावल्यावरून तिकडे उतरून तळें, घोसाळें हे किल्ले त्यानें काबीज केले. याच वेळीं कोंकणांत गोवळकर सांवत भेटले. त्यांनीं तीनशें होनांची एक तलवार शिवाजीस अर्पण केली. हीच नामांकित भवानी तलवार होय.

४. नंतर दाक्षिण कोंकणांत राजापुरावर शिवाजीनें स्वारी केली. याच स्वारींत शिवाजीस बाळाजी आवजी चिटणीस हा येऊन मिळाला. बाळाजीचे वडील आवजी हरि चित्रे, हे जंजिऱ्याच्या हब्श्याजवळ दिवाणगिरी करीत होते. एकदां हब्श्याचा त्यांच्यावर राग होऊन त्यानें त्यांस ठार मारिलें, व त्यांच्या मुलामाणसांस गलबतांत घालून मस्कत येथें नेऊन गुलाम म्हणून विकण्याकरितां पाठवून दिलें. बाळाजी व त्याची आई गुलबाई यांजवर केवढा तरी हा भयंकर प्रसंग ! पण त्या गुलबाईचा धूर्तपणा कांहीं अजब होता.

गलबतावरील खलाशाचें मन वळवून ती राजापुरास उतरली. तेथें तिचा भाऊ मोठा व्यापारी होता. त्यानें ही आपली बहीण अशी खलाशास ओळख न देतां तीस खलाशापासून विकत घेतलें. पुढें ती आपल्या मुलांसह भावापाशींच होती. शिवाजी राजापुरास आला तेव्हां जे कांहीं लोक पकडले गेले त्यांत बाळाजी होता. हें त्याच्या आईस समजलें, तेव्हां तिनें येऊन शिवाजीच्या पायांवर लोटांगण घातलें, व आपली सर्व हकीकत मोठ्या काकुळतीला येऊन सांगितली. शिवाजीनें त्या मुलाची हुषारी पाहून आपली चिटणिशी त्यास सांगितली व बाईचें समाधान करून तीस घरीं धाडून दिलें.

५. शिवाजी कोंकणांत असतां कल्याणचा सुभेदार मुल्लाना अहमद यास शिवाजीचा विश्वासू सेवक आबाजी सोनदेव यानें पकडिलें, व सर्व कल्याणप्रांत काबीज केला. ही आबाजीची कामगिरी पाहून शिवाजी फार खूष झाला व त्यानें आबाजीस कल्याणचा सुभेदार नेमिलें. या वेळेस एक गोष्ट घडली ती फारच महत्त्वाची आहे. आबाजीनें मुल्लाना अहमदास पकडिलें तेव्हां त्याचीं इतर माणसेंही पकडलीं होतीं. त्यांतील त्याची सून फार सुंदर आहे असें पाहून शिवाजीस नजर करण्याकरितां म्हणून त्यानें तीस ठेविलें. शिवाजीनें तीस दरबारांत आणण्यास सांगितलें. आबाजीनें दरबारांत आणून नजर केली; तेव्हां तिचें लावण्य पाहून शिवाजी बोलला, "हे स्त्री लावण्यवती आहे. आमचे मातुश्रीची तसबीर अशी असती तर आम्ही विशेष सौंदर्यवान् आमचे मातुश्रीचे उदरीं जन्मलों असतों.*" इतकें बोलून त्यानें तीस वस्त्रें, अलंकार दिले व पालखी देऊन मोठ्या सन्मानानें परत पाठविलें. केवढी उज्ज्वल नीतिमत्ता! कोण मनाचा थोरपणा? अशांवर ईश्वराचा कृपाहस्त कां असणार नाहीं?

* शिवदिग्विजय, पृष्ठ १८९.

७. शहाजीचा बंदिवास.

(शके १५७०–७१; इ. स. १६४८–४९.)

इ. स. १६४६त शिवाजी किल्ले घेऊं लागला. त्याच सालीं विजापूरचा सुलतान महंमद अदिलशहा अर्धांगवायूनें आजारी पडला व त्या दरबारांत बजबजपुरी माजली. पुढें सुलतान सन १६५६त मृत्यु पावला तेथवर अंथरुणास खिळून होता; त्यामुळें दहा वर्षें विजापूर–दरबारची दुःस्थिति कायम राहिली व शत्रूच्या या हलाखीचा शिवाजीस मोठा उपयोग झाला. तथापि शिवाजीनें खजिना कसा लुटला व कल्याण प्रांत कावीज करून आपल्यास कसें पकडिलें, हीं दुःखकारक वर्तमानें सांगण्यास मुल्लाना अहमदच स्वतः विजापुरास दाखल झाला; तेव्हां त्या दरबारांतील सर्व सरदारांच्या तोंडून शिवाजीविषयीं व विशेषतः शहाजीविषयीं द्वेषाचे उद्गार निघूं लागले. शहाजी कर्नाटकांत स्वतंत्रपणें वागतो म्हणून कुरकूर सुरूच होती; त्यावरून सुलतानानें शहाजीचा प्रतिस्पर्धी मुस्तफाखान याची शहाजीवर दडपण म्हणून रवानगी केलीच होती. आतां सुलतान फारच संतापला व त्यानें शहाजीस त्या रागांतच एक पत्र लिहिलें. शहाजीनें मोठ्या नम्रपणानें त्याचें उत्तर पाठविलें. त्यांत "माझा मुलगा कांहीं माझें ऐकत नाहीं. तो जसा आपला अपराधी आहे, तसा माझाही आहे. आपण फौज पाठवून त्याचें खुशाल पारिपत्य करावें. माझी बिलकुल ना नाहीं." असा मजकूर होता. परंतु तें पत्र वाचून सुलतानाचें मुळींच समाधान झालें नाहीं; त्याला शहाजीचा जास्तच संशय येऊं लागला; पण त्याला पकडणें म्हणजे कांहीं साधी गोष्ट नव्हती. या वेळीं मुस्तफाखानानें जिंजी किल्ल्यास वेढा घातला होता व शहाजी त्याला मदत करीत होता. शहाजी फौजबंद सरदार असून अतिशय पराक्रमी

असल्यामुळें लढाई करून त्यास कैद करून आणणें सोईचें नव्हतें. त्याला धरण्यास कपटाची योजना करणें भाग होतें. हें कारस्थान सुलतानाच्या हुकुमावरून मुस्तफाखानानें बाजी घोरपडे यास पार पाडण्यास सांगितलें. हा बाजी घोरपडे मुधोळचा देशमुख असून शहाजीच्या हाताखालीं काम करीत असे. तो नीच स्वभावाचा असल्यामुळें आपल्या धन्यास कपटानें धरून देण्याचें काम त्यानें मोठ्या हौसेनें पत्करिलें. एके दिवशीं तो मोठ्या लगबगीनें शहाजीकडे गेला व आपल्या घरीं त्यास जेवावयास बोलावण्याचें सोंग करून शहाजीस पकडण्याचें दुष्ट कृत्य त्यानें घडवून आणिलें. शहाजीस पकडण्याची मोठी कामगिरी आपण केलेली पाहून सुलतान आपल्यावर खूष होईल अशा भरावर बाजी घोरपडे शहाजीस टोंचून बोलला:— "तुम्ही हरामखोर; सरकारचें अन्न खाऊन लेक मुद्दख मारीत फिरतो तरी तुम्हांस त्याबद्दल कांहींच वाटत नाहीं" !× (श्रावण शके १५७०).

२. बाजी घोरपड्यानें शहाजीला विजापुरास सुलतानापुढें आणिलें. सुलतानानें विचारिलें तेव्हां त्यानें 'मुलगा माझें ऐकत नाहीं' असें सांगितलें. शहाजी लबाड आहे, खऱ्या गोष्टी सांगत नाहीं, असें सुलतानास वाटून याचा छळ केल्याशिवाय कांहीं हा खरें सांगावयाचा नाहीं, असा त्यानें आपल्या मनाशीं विचार केला. मग त्यानें शहाजीस एका कोनाड्यांत घातलें व हवा आंत जाण्यापुरती वाट ठेवून कोनाडा बंद केला. शेवटीं त्यानें शहाजीस अशी धमकी दिली कीं, "मुलाला वठणीवर आण, नाहीं तर कोनाडा अगदीं बंद करून टाकतों." शहाजीचा असा छळ चालला होता, तरी शिवाजीला पत्रें पाठविण्याची त्याला परवानगी होती. त्याप्रमाणें त्यानें "आम्हांवर बादशहाची तुमच्या कृत्यांमुळें गैरमर्जी झाली

× चिटणीस–बखर, पृष्ठ ३६.

आहे. तुम्ही सर्व उद्योग टाकून बादशहास शरण आलां तर आमची धडगत आहे, नाहीं तर आम्ही खास मरतों" अशा अर्थाचीं पत्रें पाठविलीं. तीं वाचून शिवाजीस दुःख झालें व तो चिंताग्रस्त झाला. "वडील मला देवाप्रमाणें; त्यांची आज्ञा ती शिरसावंद्य; परंतु धर्म रक्षावा म्हणून हा मार्ग अवलंबिला. आतां आम्हांकरितां वडिलांवर बादशहाची गैरमर्जी, यास्तव वडीलांस फार त्रास होत असेल तर आतां काय करावें?" हे विचार त्याच्या मनांत सारखे येऊन, काय करावें याविषयीं त्याच्या मनाचा निश्चय होईना. एके दिवशीं त्याची बायको सईबाई जवळ होती. तिला आपल्या मनांतील हे विचार सांगून 'आतां काय करावें' म्हणून शिवाजीनें विचारिलें. तेव्हां 'आम्ही बायका; आम्हांस राजकारण काय कळतें?' इत्यादि चुकवाचुकवी करून शेवटीं जेव्हां फारच आग्रह पडला तेव्हां ती म्हणाली "माझे मतें राज्य साधावें, देवब्राह्मणांची स्थापना करावी, धर्म रक्षावा ही इच्छा धरली ते योग्य. देवावर भार घालावा. यश देणारा तो समर्थ आहे. **राज्य साधणें त्याअर्थी मोह काय उपयोग?**"× इतर सरदारांनाही विचारिलें, तेव्हां त्यांनींही 'राज्य साधावें' हेंच उत्तर केलें. त्यामुळें शिवाजीचें बरेंच समाधान झालें; परंतु शहाजीचा त्रास दिवसेंदिवस वाढतच होता. तो कसा चुकवावयाचा, या विवंचनेंत तो होता. अशा निकराच्या वेळेस सर्व अडचणींतून अचूक मार्ग शोधून काढण्याचा गुण शिवाजीच्या अंगांत होता. या वेळेस ते गुण त्याच्या उपयोगीं पडला. त्यानें असें पाहिलें कीं, विजापूरचा सुलतान आपल्या मानानें तर मोठाच सामर्थ्यवान् आहे. आपणा स्वतःला त्याच्याविरुद्ध कांहीं खटपट करितां यावयाची नाहीं. पण दिल्लीचा बादशहा शहाजहान त्याहूनही सामर्थ्य-

× चिटर्णीस-बखर, पृष्ठ ३७.

वान् आहे. त्याचें विजापूरकरावर दडपण आणिल्यास आपल्या बापाची सुटका करतां येईल. या सर्व गोष्टींचा विचार करून त्यानें शहाजहान बादशहास आपली सर्व हकीकत कळविली, व 'माझ्या बापाची तेवढी सुटका करा; मी आपली सेवा करण्यास तयार आहें,' असेंही लिहिलें. बादशहाला शहाजीचा पराक्रम माहीत होताच; हे दोघे बापलेक आपल्याला मिळाल्यास आपला मोठा फायदा आहे असें त्यास वाटलें; व शहाजीस सोडण्याविषयीं त्यानें विजापूरकरास लिहिलें. खुद्द विजापुरांत शहाजीची मित्रमंडळी त्याच्या तर्फेनें रदबदली करीत होतीच. या दुहेरी जोरामुळें सुलतानानें शहाजीस कोनाड्यांतून सोडून दिलें. याप्रमाणें दिल्लीकडून शह लावून शिवाजीनें आपल्या बापाची सुटका करून घेतली.

३. शके १५७१ ज्येष्ठ शु. पौर्णिमेस (१६।५।१६४९) शहाजीस कोंडाणास (सिंहगडीं) आणून सोडिलें. त्या वेळीं त्याच्या बरोबर पकडलेले कान्होजी नाईक जेधे व दादाजी कृष्ण लोहकरे यांसही सोडिलें. तेव्हां बेलरोटीवर हात ठेवून शपथपूर्वक शहाजीनें कान्होजी नाइकास सांगितलें कीं, 'तुमचें वतन मावळांत आहे. चिरंजीव राजश्री सिउबा खेडेबारियांत व पुणा आहेत, त्याजवळ तुम्ही जमावानिसी राहावें. तुमची जबरदस्ती त्या प्रांतें आहे. अवघे मावळचे देशमुख देखील त्यासी रुजू होऊन त्यांचे आज्ञेंत वर्तेत यैसा विचार करून जबरदस्तीनें राहावें. एखादी मोंगलाईकडील फौज व इदलशाहीकडील फौज आली तरी आपण इमान राखावें. त्यासी लढाई करावी. * " कान्होजीनेंही तसें करण्याचे शपथपूर्वक कबूल केलें. यावरून सह्याद्रीलगत मावळ प्रांतीं स्वतंत्र राज्य स्थापिलें जावें ही कल्पना शहाजीच्या अंतःकरणांत होती हें निर्विवाद आहे. आतां

* भा. इ. सं. मं. चतुर्थ संमेलनवृत्त, जेधे यांची शकावली पृष्ठ १७९.

राष्ट्रीयत्वाची भावना आपल्या स्वतःच्या व संवगड्यांच्या मनांवर पक्की बिंबवून घेऊन त्या कल्पनेला व्यवहार्य करून सोडण्याची उत्कृष्ट कामगिरी शिवाजीनेंच केली. परंतु शहाजीस स्वतंत्र राज्याची कल्पनाच नव्हती, इतकेंच नव्हें, तर तो तिच्या विरुद्ध होता, हा सिद्धांत आतां डळमळीत झाला येवढें मात्र खरें.

४. सुटका झाल्यावर शहाजीस चार वर्षें विजापुरांतच नजरकैदेंत काढावीं लागलीं. इकडे कर्नाटकांत कोणीच समर्थ सरदार न राहिल्यामुळें बंडें उद्भवलीं. गोवळकोंड्याच्या कुतुबशहाचा श्रीमान् व कर्तबगार सरदार मीरजुमला अदिलशाही मुलुखांत शिरल्याची बातमी आली. तेव्हां अदिलशहानें मोठ्या तांतडीनें शहाजीची कर्नाटकांत रवानगी केली. शहाजीनें मीरजुमल्यास रेटीत रेटीत गुत्तींत कोंडिलें व दांतीं तृण धरून शरण यावयास लाविलें. याच सुमारास शहाजीवर एक आपत्ति आली. एकदां त्याचा वडील मुलगा संभाजी कनकगिरीच्या पाळेगारावर चालून गेला. शहाजीचा उत्कर्ष सहन न होणाऱ्या मुस्तफाखानाच्या पक्षांतील अफजलखान म्हणून विजापूरचा एक सरदार होता; तोही याच वेळीं कनकगिरीस आला; त्याच्याशीं संभाजीची कटकट होऊन तींत संभाजी गोळा लागून ठार झाला (शके १५७७ सन १६५५). त्याच्या मृत्यूनें शहाजीस अत्यंत दुःख झालें व अफजलखानाची फार चीड आली. कर्नाटकांत यापुढें शहाजीचा एकसारखा उत्कर्ष होत गेला. बंडखोर पाळेगारांचा त्यानें खरपूस समाचार घेतला. त्यानें पूर्वेस कर्नूल, वेलोर इत्यादि प्रांत जिंकून पश्चिमेकडे गोवें, तेलिचेरी येथवर दौड मारिली व सर्व कर्नाटक प्रांतांत आपला अंमल चालू केला. आतां शहाजीपाशीं पन्नास साठ हजार फौज झाली. ती जय्यत राखून तिच्या बळावर बंगळूर येथें शहाजी स्वतंत्र राजासारखा राहूं लागला. जयराम

पिंड्ये म्हणून शहाजीच्या दरबारीं एक कवि होता; त्यानें 'राधा-माधवविलासचंपू' या काव्यांत शहाजीच्या दरबारचें वर्णन केलें आहे. प्रथम निजामशाहीच्या संरक्षणार्थ शहाजी स्वतंत्र रीतीनें सुमारें दहा वर्षें झटला व पुढें दादाजी कोंडदेवास पुणें प्रांतीं ठेवून तो प्रांत स्वस्थ, समृद्ध, व जवळजवळ स्वतंत्र करण्याचा त्यानें घाट घातला. नंतर कर्नाटकांत त्यानें अनिरुद्धपणें अंमल गाजविला. त्या प्रांतीं दिलेल्या +सनदा व इतर कागदपत्र सांपडले आहेत. त्यांतील भाषेंत विजापूर दरबारचा रीतीप्रमाणें वरिष्ठ सरकार म्हणून उल्लेख करावयास पाहिजे होता तो त्यानें केला नाहीं. या गोष्टीवरून शहाजीच्या स्वातंत्र्येच्छेची चांगली साक्ष पटते.

चंद्रराव मोऱ्याचें पारिपत्य.

(शके १५७७; इ. स. १६५५)

कोनाड्यांतून सुटल्यावर शहाजी चार वर्षें विजापुरींच नजरकैदेंत होता. तेव्हां आपण कांहीं गडबड केल्यास त्यास त्रास होईल असें शिवाजीस वाटल्यामुळें तोही स्वस्थच होता. विजापूरचा सुलतान मात्र स्वस्थ बसला नाहीं; त्याच्या मनास शिवाजीचा नाश कसा करावा, याची सारखी काळजी लागली होती. त्यानें आपल्याजवळचा एक शिलेदार बाजी शामराज यास शिवाजीस पकडण्याकारितां पाठवून दिलें. या वेळीं शिवाजी महाडास होता. बाजी शामराज चंद्रराव मोऱ्याच्या मुलुखांत आला व शिवाजीस पकण्याच्या कार्यांत त्यानें मोऱ्याची संमती मिळविली. चंद्रराव मोरे हा जावलीचा राजा मोठा बलाढ्य व गबर होता. पण त्या दोघांचें कारस्थान पूर्ण होण्याच्या आंतच शिवाजीनें

+ विल्क्ससकृत म्हैसूरचा इतिहास, भाग १ पृष्ठ ४७.

बाजी शामराजावर एकाएकीं छापा घातला व त्याचें सैन्य उधळून लाविलें. बाजी शामराज आपल्या सैन्याची झालेली दुर्दशा पाहून विजापुराकडे पळून गेला.

२. चंद्रराव मोऱ्यानें बाजी शामराजास मदत केली तेव्हांपासून शिवाजीस मोऱ्याचा राग आला. हा शत्रूच्या पक्षास मिळालेला आहे, हा आपला केव्हां घात करील याचा नेम नाहीं, म्हणून याची क्षमा करून उपयोग नाहीं, असें त्यानें ठरविलें. मग या शत्रूस नाहींसा कसा करावयाचा? शिवाजीस लढाई किंवा रक्तपात यापेक्षां सामोपचार फार आवडत असे व ज्या ठिकाणीं सामोपचारानें कार्य होत नाहीं अशी त्याची खात्री होई त्याच ठिकाणीं केवळ तो लढाईनें किंवा रक्तपातानें आपलें कार्य घडवून आणी. या आपल्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून शिवाजीनें सामाचें बोलणें करण्यास माणसें पाठविलीं. पण तो जावलीचा 'राजा' शिवाजीसारख्यास काय दाद देतो? शिवाजीचे वकील निराश होऊन परत आले. मोऱ्याचा ताठा पाहून शिवाजीनें त्याचें पारिपत्य करण्याचा निश्चय कायम केला.

३. इकडे कर्नाटकांत बंडें उद्भवूं लागलीं, म्हणून बादशहानें शहाजीस कर्नाटकांत जाण्याची परवानगी दिली. वडील कर्नाटकांत गेले हें कळतांच शिवाजीनें आपला बंद ठेवलेला उद्योग फिरून चालू केला, व मोऱ्याचें पारिपत्य करण्याचें काम पहिल्यानें करून टाकण्याचें त्यानें ठरविलें. त्यानें आपले सरदार राघो बल्लाळ व संभाजी कावजी यांस जावलीस पाठविलें. त्यांनीं तेथें जाऊन चौकशी करून शिवाजीस कळविलें कीं, येथलें काम आम्ही पार पाडतों; तुम्हीं मात्र फौज घेऊन जावलीच्या लगत्यास असावें. शिवाजी जावलीपासून निसणीच्या वाटेनें चार मैल असलेल्या महाबळेश्वरास येऊन राहिला. इकडे राघो बल्लाळानें, 'शिवाजीस तुमची

मुलगी द्याल काय ? त्याची लग्न करण्याची इच्छा आहे,' असें सांगून लग्नाच्या वाटाघाटी करण्याकरितां चंद्रराव मोरे व त्याचा भाऊ सूर्यराव यांच्या भेटी घेतल्या. एका भेटींत त्या दोघां मोऱ्यांस राघो बल्लाळ व संभाजी कावजी यांनीं ठार केलें. लागलीच मोऱ्याच्या लोकांत गलबला सुरू झाला. इतक्या अवकाशांत राघो बल्लाळ व संभाजी कावजी रानांत घुसले, व जवळच असणाऱ्या शिवाजीच्या फौजेस त्यांनीं सूचना केली. मग शिवाजी जावलीवर चालून गेला. दोन प्रहरपर्यंत युद्ध झालें. मोऱ्यांचा दिवाण हणमंतराव युद्धांत पडला व चंद्ररावाचे दोघे मुलगे कैद झाले (पौष शके १५७७). प्रारंभीं त्या दोघांना पुण्यास कैदेंत ठेविलें होतें; पण त्यांनीं सुटका करून घेण्याकरितां विजापूरकराशीं कारस्थान केल्यामुळें शिवाजीनें त्यांचा शिरच्छेद करविला.

४. या मोऱ्यांच्या पारिपत्यापासून शिवाजीस जावली प्रांत मिळाला. त्या प्रांताचें रक्षण करण्याकरितां शिवाजीनें एका उंच डोंगरावर प्रतापगड नांवाचा किल्ला बांधिला. त्या कामीं मोरो त्रिंबक पिंगळे याचें फार कौशल्य दिसून आलें; त्यामुळें शिवाजीची त्याच्यावर फार मर्जी बसली. जावली प्रांत डोंगराळ असल्यामुळें शिवाजीच्या राज्याची दक्षिण सरहद्द भक्कम झाली व प्रतापगडाखालच्या पार घाटानें कोंकणांत महाडास उतरण्याची उत्तम सोय झाली. मोऱ्यांच्या सैन्यांतील मावळ्यांनीं शिवाजीची चाकरी पत्करिली व त्यामुळें त्याचें सैन्यबल खूप वाढलें. मोरे मोठे कर्तबगार असून आठ पिढ्या जावलीवर अंमल चालवीत होते; त्यामुळें त्यांच्यापाशीं अलोट संपत्ति होती; ती सर्व आतां शिवाजीच्या हातीं पडून त्याचें द्रव्यबलही खूप वाढलें. मोऱ्यांचें ढळढळीत उदाहरण पुढें असल्यामुळें इतर मराठे सरदारांच्या मनावर शिवाजीचा चांगलाच वचक बसला व ते त्याला शरण आले.

४. तुळजापुरास अंबाबाईचें दर्शन घ्यावयास जावयाचें म्हणजे फार लांब पडतें व नेहमीं दर्शन घडत नाहीं, असें पाहून शिवाजीनें प्रतापगडावर देवीची स्थापना करण्याचा निश्चय केला. प्रथम गंडकी शिळा आणवून तुळजापूरच्या सारखीच एक प्रतिमा एका चतुर कारागिराकडून करवून घेतली. नंतर मोरो त्रिंबक पिंगळे याच्या हस्तें सुमुहूर्तानें प्रतापगडावर यथाशास्त्र देवीची स्थापना केली. शिवाजीनें देवीस उत्तम अलंकार दिले व कांहीं गांवें इनाम देऊन तिच्या पूजे-अर्चेची व उत्सवाची उत्कृष्ट व्यवस्था करून ठेविली. या प्रतापगड-च्या भवानीवर शिवाजीची फारच निष्ठा होती.

५. हिरडस मावळचा बांदल देशमुख मोठा शिरजोर होता. जावली घेतल्यावर लवकरच शिवाजीनें त्या देशमुखाच्या रोहिडा किल्ल्यावर हल्ला केला. देशमुखानें मोठ्या शौर्यानें कांहीं वेळ तो किल्ला लढविला; परंतु युद्धांत तो मारला जाऊन किल्ला शिवाजीच्या ताब्यांत आला. देशमुखाचा दिवाण बाजी प्रभू आपल्या धन्याकरितां मोठ्या शौर्यानें लढला. त्याचें शौर्य व स्वामिनिष्ठा पाहून शिवाजीनें त्यास आपल्या पदरीं ठेविलें व त्यानेंही आपली स्वामिनिष्ठा पुढें उत्कृष्टपणें प्रकट केली. याच सुमारास शिवाजीनें महाडाजवळील रायरी किल्ला कार्बीज केला (वैशाख शके १५७८, सन १६५६). यासच पुढें रायगड असें नांव पडलें. सुप्यास शहाजीचा मेहुणा संभाजी मोहिते होता तो शिवाजीस दाद देईना. तेव्हां छापा घालून शिवा-जीनें सुपें कार्बीज केलें व संभाजी मोहित्यास शहाजीकडे पाठवून दिलें.

---

९ अफजलखानाचा वध.

(शके १५८१; इ. स. १६५९)

शिवाजीनें चंद्रराव मोऱ्याचें पारिपत्य करून जावलीप्रांत घेतला

व इतर मराठे सरदारही त्याला शरण जाऊं लागले, ही बातमी विजापुरास समजली. तेव्हां त्या दरबारच्या मंडळीस दुःख झालें; पण शिवाजीचें पारिपत्य करण्याचें काम ताबडतोब हातीं घेणें विजापूरकरास शक्य नव्हतें. महंमद अदिलशहा मृत्युपंथास लागला होता. तो लवकरच मृत्यु पावला (४ नोव्हेंबर १६५६); नंतर त्याचा एकोणीस वर्षांचा मुलगा अली गादीवर बसला. राज्यकारभार अलीची आई 'बडी साहेबा' हिजकडे नवरा आजारी पडल्यापासून होता, तो पुढें तसाच चालू राहिला. महंमदशहाच्या मृत्यूनंतर राजधानीची व्यवस्था लाविल्यावर तिनें दरबार भरविला व विजापूरचे मानकरी आल्यावर " हें शिवाजीचें बंड वाढलें आहे, त्यामुळें मला अन्न गोड लागेनासें झालें आहे; ज्या कोणास विजापूरच्या अदिलशाहीची—या गादीची-एकनिष्ठ सेवा करून दाखवावयाची असेल, त्यानें शिवाजीचें पारिपत्य करावें " असें ती बोलली. अफजलखान म्हणून वाईचा पूर्वीचा सुभेदार असून त्याला वाईप्रांताची चांगली माहिती होती. तो उठला व प्रतिज्ञा करून म्हणाला, " शिवाजीचा मजकूर इतका कशास पाहिजे ? आपणास आज्ञा करावी म्हणजे जाऊन धरून आणतों किंवा मारून टाकतों. " ही प्रतिज्ञा ऐकून 'बडी साहेबा' खूष झाली व तिनें मोत्याचा तुरा, पदक, एक तलवार व घोडा देऊन तेथल्या तेथें खानाचा सन्मान केला.

२. खान बारा हजार फौज घेऊन निघाला तो तुळजापुरास आला. तेथें भवानी देवीची मूर्ति फोडून त्यानें तिचें पीठ केलें ! तो पुढें पंढरपुरास आला. तेथें त्याची स्वारी विठोबाच्या मूर्तीसही भोंवली. त्या वेळीं शिवाजी राजगडास होता. खान आपल्यावर चालून येत आहे ही बातमी ऐकून तो प्रतापगडावर गेला. खानही पुण्याचा रस्ता सोडून वाईस गेला. खानानें वाटेनें येतांना सर्व हिंदूंस पूज्य अशा देवांची विटंबना केली होती. त्यामुळें सर्व हिंदु

प्रजा अगदीं चिडून गेली होती. वाईस आल्यावर या अडचणीच्या जागेंत शिवाजी आपल्या हातीं लागणें कठीण असें खानास वाटलें. म्हणून शिवाजीस तह करण्याचा घाट दाखवून पकडावें* असा त्यानें बेत केला, व वाईचा कुळकर्णी कृष्णाजी भास्कर यास शिवाजीकडे पाठविलें.

३. कृष्णाजी भास्कर वकील शिवाजीकडे आला व " तुम्ही बादशहाचा घेतलेला सर्व मुलूख परत द्या, म्हणजे मी तुमचे सर्व गुन्हे माफ करतों. एकदां भेटीस या, म्हणजे निकाल करून टाकूं " असा खानाचा निरोप त्यानें शिवाजीस सांगितला. शिवाजीनें तें सर्व ऐकून घेतलें व त्याचा स्वधर्माभिमान जागृत करण्यासाठीं मोठ्या कळकळीचें भाषण केलें. त्या भाषणाचा कृष्णाजीपंताच्या मनावर चांगलाच परिणाम झाला, व तो शिवाजीस खानाचे अंतस्थ हेतु कळविण्यास तयार झाला. ' खानाचा बेत भेटीच्या वेळीं तुम्हांस दगाबाजी करण्याचा आहे ' असें त्यानें सांगितलें. शिवाजीनें कृष्णाजी भास्कराबरोबर आपला वकील पंताजी गोपिनाथ दिला व त्याच्याबरोबर खानास निरोप पाठविला कीं, " तुम्ही म्हणतां, तें सर्व आम्हांस कबूल आहे, आम्हीं जो मुलूख घेतला, किल्ले वगैरे बांधले,

---

*अफजलखानाच्या मनांत कपट होतें याविषयीं एक नवीन दाखला उपलब्ध झाला आहे. राजापूर येथील इंग्रज गुमास्त्यांनीं १० आक्टोबर १६५९ रोजीं सुरतच्या कौन्सिलास पाठविलेल्या पत्रांत पुढील मजकूर आहे. "या वर्षी राणीनें (विजापूरच्या सुलतानाची आई) शिवाजीवर १०,००० स्वारांसह अबदुलखान यास पाठविलें. येवढ्या सैन्यानिशीं शिवाजीशीं तो सामना देऊं शकणार नाहीं, असा विचार करून शिवाजीशीं मित्रत्वाचें ढोंग करण्यास तिनें त्याला भर दिली व त्यानें तसें केलें. शिवाजीनेंही वरील गोष्टीच्या माहितीवरून म्हणा किंवा तसा संशय आल्यामुळें म्हणा प्रेमाची बतावणी केली " (प्रो. सरकार यांचा ' शिवाजी व त्याचा काळ ' पृष्ठ ६९).

फौज ठेविली, ही सर्व पातशहाचीच दौलत वाढविली आहे. मी भेट घेण्यास तयार आहें. आपण जावलींत यावें म्हणजे भेट होईल. " खानास हा निरोप पोंचला, तेव्हां त्यास फारच आनंद झाला. शिवाजी आपण होऊन भेट घेण्यास तयार झाला आहे, आतां दगा करावयास कांहीं उशीर नाहीं, असे तो आपल्या मनांत मांडे खाऊं लागला. शेवटीं त्यानें 'जावलींत भेट घेण्यास मी राजी आहें' असें शिवाजीस कळविलें. नंतर आपली फौज घेऊन खान वाईहून निघाला व त्यानें प्रतापगडाखालीं कोयनाकांठीं मौजे पार येथें येऊन तळ दिला.

४. शिवाजीनें प्रतापगडाखालीं माचीवर भेटीसाठीं एक मंडप तयार करविला. वाटेंतील झाडी काढून टाकून खानास येण्यास एक चांगली वाट केली. खानाच्या मनांत कपट असल्यामुळें फौजेचा बंदोबस्त करणें शिवाजीस भाग होतें. त्यानें नेताजी पालकर सरनौबत यास फौज घेऊन सिद्ध असण्यास सांगितलें. अशी तयारी झाल्यावर खानास भेटीस येण्याविषयीं शिवाजीनें सूचना दिली. दोघांनींही सडेच भेटीस यावयाचें असें ठरलें होतें. खान सैद बंडू नांवाच्या एका शिपायास बरोबर घेऊन भेटीच्या जागीं आला. खान शिवाजीच्या दर्शनास फारच उतावीळ झाला होता. शिवाजी केव्हां येतो व मी त्यास केव्हां धरतों, असें खानास झालें होतें. इकडे शिवाजीनेंही निघण्याची तयारी केली. जाण्यापूर्वी किल्ल्याचा चांगला बंदोबस्त केला. नेताजी पालकर व मोरोपंत पेशवे यांना फौज घेऊन खानाच्या फौजेच्या आसपास झाडीमध्यें तयार राहण्यास सांगितलें. किल्ल्यावर जिजाबाई व संभाजी यांजपाशीं कोणीतरी आधिकारी असावेत, म्हणून अण्णाजी दत्तो सचीव व बाळाजी आवजी चिटणीस, इत्यादि ठेविले. जिजाबाई व संभाजी यांस त्यांचे हवालीं केलें. " आम्हीं ही होड आरंभिली. श्री सिद्धीस नेईलच. कदाचित् वांकडेंही पडल्यास तुम्हीं घाबरें न होतां शत्रूस बुडवावें,

राज्य रक्षावें." * असें सांगून शिवाजी निघावयाच्या तयारीस लागला, त्यानें अंगांत आधीं चिलखत घालून वर झगा घातला. तसेंच डोक्यावर जिरेटोप घालून वर पागोटें घातलें. उजव्या हातांत भवानी तरवार व बाहींत बिचवा आणि डाव्या हातांत वाघनखें अशीं हत्यारें घेतलीं. देवीचा व जिजाबाईचा आशीर्वाद घेऊन शिवाजी निघाला. जिऊ महाला व संभाजी कावजी बरोबर होते. खान अगोदरच मंडपांत आला होता. शिवाजी आला तेव्हां त्यास सामोरा येऊन खान भेटला. खान उंच असून धिप्पाड होता. भेटत असतां त्यानें शिवाजीस डाव्या हाताखालीं दाबून धरिलें; व तो आपल्या हातांतील तलवार शिवाजीच्या कुशीवर चालवूं लागला.× शिवाजीच्या अंगांत चिलखत असल्यामुळें ती त्यावर खरखरली. इतक्यांत शिवाजीनें डाव्या हातांत वाघनख होतें तें खानाच्या पोटांत खुपसलें. खानाच्या अंगांत नुसता अंगरखाच होता. पोटांत वाघनख जातांच आंतडीं बाहेर आलीं. खानानें शिवाजीस धरिलें होतें तें सोडिलें, आणि तो 'दगा! दगा!' म्हणून मोठ्यानें ओरडला. लागलीच खानानें शिवाजीच्या डोक्यावर तलवारीचा वार केला. पण जिरेटोप घातला असल्यामुळें वार लागला नाहीं. किंचित गव्हाइतकी जखम झाली. शिवाजीनें खानावर उलट तलवारीचा वार केला. तो खांद्यापासून पोटापर्यंत गेला. खान मुर्दा होऊन जमिनीवर पडला; सैद बंडू अंगावर आला तेव्हां जिऊ महाल्यानें वार करून त्याला ठार केलें. इतक्यांत भोई खानाचें प्रेत पालखींत घालून नेत होते त्यांना थांबवून खानाचें शिर घेऊन जिऊ महाला व संभाजी कावजी यांस बरोबर घेऊन शिवाजी किल्ल्यावर गेला.

---

* चिटणीसबखर, पृष्ठ ५९. × किंकेड व पारसनीस यांचा मराठ्यांचा इतिहास भाग १, पृष्ठें १६१ आणि १६४.

५. इकडे खानाची फौज अगदीं घाबरून गेली. शिवाजीच्या फौजेनें चांगलाच सामना देऊन तीस पळावयास लाविलें. विजापूरच्या फौजेचे लोक जेव्हां पळूं लागले, तेव्हां शरण येतील त्यांस कैद करण्याचा, व जे शरण न येतील त्यांची कत्तल करण्याचा शिवाजीच्या फौजेनें सपाटा चालविला. अफजलखानाचा मुलगा फाजलखान हा शिवाजीच्या फौजेच्या हातींच सांपडावयाचा, पण खंडूजी खोपडे नांवाच्या वाईजवळील खोऱ्यांतील एका देशमुखानें द्रव्यलोभानें त्यास सोडून दिलें, म्हणून तो वांचला. या खोपड्यानें देशद्रोह केल्यामुळें त्यासही अफजलखानासारखें शिवाजीनें यमसदनास पाठविलें, हें सांगणें नकोच. डोंगराच्या एका टोंकावर अफजलखानाचें शीर पुरून त्यावर बुरूज बांधिला. तो बुरूज अजून 'अबदुल्ला बुरूज' म्हणून प्रसिद्ध आहे. भेटीच्या जागीं जेथें अफजलखानाचें शरीर पडलें तेथें त्यावर कबर बांधिली व तिच्या दिवाबत्तीच्या खर्चाची नेमणूक करून दिली. अजूनही हा खर्च देवीच्या संस्थानांतून चालतो. या प्रसंगाची बातमी चौथ्या दिवशीं जेव्हां विजापुरास जाऊन धडकली तेव्हां अली अदिलशहास अत्यंत दुःख झालें व त्याची आई 'बडी साहेबा' "अल्ला! अल्ला! खुदा! खुदा!" असें ओरडत अंग पलंगावरून टाकून रडत पडली. तिनें तीन दिवस अन्नउदक घेतलें नाहीं, व पुढें लवकरच ती मक्केस निघून गेली. हा अफजलखानाचा वध शके १५८१ मार्गशीर्ष शुद्ध ७ (इ. स. १६५९ नोव्हेंबर तारीख १०) रोजीं घडला.

६. अफजलखानाच्या वधामुळें मुसलमानांच्या मनावर शिवाजीचा विलक्षण वचक बसला व मराठ्यांस दुप्पट हिंमत चढली. त्या दिवशीं मराठ्यांस मोठी प्राप्ति झाली. तोफा, दारुगोळा, गाड्या इत्यादि सर्व लष्करी सामान मराठ्यांच्या हातीं पडलें. बाराशें उंट व चार हजार घोडे पागेंत आले. तीन लाखांचें जवाहीर व सात

लाखांची रोकड खजिन्यांत जमा झाली. कापड, हत्यारें इत्यादि आणखी मिळकत झाली ती निराळीच. युद्ध संपल्यावर, युद्धांत कष्ट व मेहनत केलेल्या लोकांस मोठ्या उदारपणानें बक्षिसें देऊन शिवाजीनें त्यांची योग्य संभावना केली. पंताजी गोपिनाथ बोकील यास त्याचें रहातें गांव मौजे हिवरे हें इनाम करून दिलें व एक लक्ष होन रोख बक्षीस दिले. पुढें या अद्भुत प्रसंगावर अज्ञानदास शाहिरानें एक जोरदार व रसभरित पोवाडा + रचिला, आणि खुद्द शिवाजी, जिजाबाई, इत्यादि मंडळीपुढें म्हणून दाखविला. तेव्हां सर्वांच्या अंतःकरणांत वीररसाचा संचार झाला. शेवटीं अज्ञानदासाला " शिवाजी सरजानें इनाम घोडा बक्षीस दिला व शेरभर सोन्याचा तोडा त्याच्या हातांत घातला. "

---

१० बाजी प्रभूचा पराक्रम.

(शके १५८२, सन १६६०)

अफजलखानाचा वध झाल्यावर शिवाजी स्वस्थ बसला नाहीं. विजापूरकरांपासून कोल्हापूर प्रांत घेण्याचा निश्चय करून तो निघाला आणि हिंदु किल्लेदारास वश करून पन्हाळा किल्ला त्यानें प्रथम काबीज केला. त्या प्रांतावरचा विजापूरकरांचा सुभेदार रुस्तुमजमान शिवाजीवर चालून आला, तेव्हां शिवाजीनें त्याचा हां हां म्हणतां धुव्वा उडविला. इतकें झाल्यावर शिवाजी थेट विजापुरापर्यंत खंडण्या घेत गेला व इतक्या सपाट्यानें पन्हाळ्याकडे परत आला कीं, विजापूरकराकडील कोणाही सरदारास त्याचा पाठलाग करतां आला नाहीं. शिवाजीनें अफजलखानाचा नाश केल्याचें वर्त-

---

+ ' अर्कर्थ व शाळिग्राम ' कृत पोवाडे, पृष्ठें १-१८.

मान ऐकून विजापूरचा सुलतान अगदीं खचून गेला होता. त्यास पुढें काय करावें, हेंच सुचेना. शिवाजीनें कोल्हापूर प्रांत घेतला, विजापुरापर्यंत खंडण्या वसूल केल्या, तेव्हां याचा हा क्रम असाच चालू दिल्यास हा अनावर होईल म्हणून त्यानें सिद्दी जोहार नांवाच्या एका कर्नाटकांतील सरदारास शिवाजीवर पाठविलें. अफजलखानाचा मुलगा फाजलखान हाही आपल्या बापाचा सूड उगविण्याकरितां त्याच्याबरोबर मोठ्या ईर्षेनें आला होता. वाडीकर सांवत व जंजिऱ्याचा सिद्दी यांनींही सुलतानास मदत करण्याचा बेत केला.

२. अशा रीतीनें शिवाजीवर चोहोंकडून शत्रु उठले. पण त्यानें न डगमगतां सिद्दीचें पारिपत्य करण्यास राघो बल्लाळ अत्रे यास धाडिलें, व सांवतावर बाजी पासलकर याची रवानगी केली. सांवत व बाजी पासलकर या दोघांमध्यें जंगी युद्ध होऊन त्यांत ते दोघे सेनापति ठार झाले. स्वतः शिवाजी कोल्हापूर प्रांताच्या रक्षणाकरितां पन्हाळ्यावर बंदोबस्तानें राहिला. ते पावसाळ्याचे दिवस होते, तरी शत्रूनें येऊन पन्हाळ्यास वेढा दिला. तीन महिनेपर्यंत वेढा सारखा बसला होता. सिद्दी जोहारास वाटलें कीं, आतां शिवाजी खचित आपल्या हातीं सांपडणार. शिवाजीनें, बरेच दिवस झाले वेढा उठत नाहीं, तेव्हां तह करणें भाग असें समजून, तहाचें बोलणें लाविलें. एके दिवशीं शिवाजी सिद्दीस एका चौकीजवळ भेटला व त्या भेटींत दुसरे दिवशीं किल्ला स्वाधीन करावयाचा असें ठरलें. वेढ्याच्या कामास मुसलमानांचें सैन्य अगदीं त्रासलें होतें. मुलूख डोंगराळ आणि त्यांतून पावसाळचे दिवस, त्यामुळें त्यांना अतिशयच त्रास झाला. तह ठरला हें एकून त्यांना आनंद झाला व त्या रात्रीं पहिल्याप्रमाणें ते सावध राहिले नाहींत. मध्यरात्रीच्या सुमारास अगदीं काळोखांत मावळे लोकांची एक टोळी बरोबर घेऊन शिवाजी पन्हाळ्यावरून खालीं आला; व मोठ्या हुशारीनें शत्रूचे चौकी पहारे चुकवीत विशाळगड किल्ल्याकडे चालला

बराच वेळपर्यंत मुसलमानांस याची कांहींच दाद नव्हती. पण शिवाजी गेला याची पक्की खबर लागतांच फाजलखान व सिद्दी जोहाराचा मुलगा सिद्दी अजीज हे दोघे, घोडेस्वार घेऊन शिवाजीच्या पाठलागास निघाले. सकाळीं नऊ दहा वाजतां शिवाजी विशाळगडाचा घाट चढत होता, तेव्हां त्यानें शत्रु आपल्या पाठीवर येत आहेत हें पाहिलें. तेव्हां शत्रूस घोडाखिंडींतून पुढें न येऊं देण्याकरितां कांहीं सैन्य ठेविलें पाहिजे, असें शिवाजीस वाटलें. शिवाजीबरोबरच्या सैन्यांत बाजी प्रभु देशपांडे या नांवाचा एक शूर सरदार होता. तो भोरजवळील सिंदगांवचा राहणारा असून त्याचे वंशज अद्याप तेथें राहतात. पूर्वी रोहिडा किल्ला घेतांना झालेल्या युद्धांत शिवाजीनें त्याचा पराक्रम व स्वामिनिष्ठा पाहून त्यास आपल्या चाकरीस ठेविलें होतें. त्यास हांक मारून, ' आम्ही जवळच्या किल्ल्यांत पोंचेपर्यंत तुम्हीं हें सैन्य घेऊन येथें शत्रूस थोपवून धरावें. आम्ही किल्ल्यांत गेल्यावर तुम्हांस तोफेची इशारत करूं, नंतर तुम्हीं निघून यावें ' असें सांगितलें. " साहेबीं निघून जावें गनिम थोपवून धरतों, खिंड चढूं देत नाहीं" असें त्यानें शिवाजीस उत्तर केलें. शिवाजी किल्ल्याकडे निघून गेला व बाजी देशपांडे आपल्या फौजेचा बंदोबस्त करून पांढर पाण्याजवळ खिंड धरून राहिला. थोडक्याच वेळांत शत्रूचे घोडेस्वार खिंड चढूं लागले. बाजीनें शत्रूवर निकराचा हल्ला करून त्यास खिंडीच्या खाली उधळून लाविलें. पुढें विजापूरकरांचें पायदळ येऊन पोंचलें. पायदळानें केलेले दोन हल्ले बाजीनें मोठ्या शौर्यानें लढून मागें परतविले. इतक्यांत फाजलखान हा बरोबर ताज्या दमाचे लोक घेऊन तिसरा हल्ला करून आला. त्या वेळीं दुपारचें ऊन मी म्हणत होतें. बाजीचे बरेच लोक पडले होते. अशांत हा हल्ला त्याच्यावर आला. तथापि बाजी मुळींच न डगमगतां शौर्यानें लढत होता. आतां त्याचें लक्ष किल्ल्यावरच्या तोफेच्या आवाजाकडे

सारखें लागलें होतें. शत्रू ताज्या दमाचा व मावळे दमलेले, यामुळें बरेच मावळे या युद्धांत पडले. बाजी प्रभूलाही एक गोळी लागली. इतक्यांत ज्या तोफेच्या आवाजाकडे त्याचें चित्त सारखें लागलें होतें तो ऐकूं आला. तो आवाज ऐकतांच बाजीच्या तोंडून ' मीं आपलें कर्तव्यकर्म केलें ' असे शब्द निघाले व लागलीच त्याचें प्राणोत्क्रमण झालें! (आषाढ वद्य २, शके १५८२, १४।७।१६६०). घोडखिंडींत एक दगडाची रास आहे, ती बाजी प्रभूचें थडगें म्हणून लोक अजूनही मोठ्या प्रेमानें दाखवितात.

३.शिवाजी विशाळगडास पोहोंचल्यावर ' वरातीमागून घोडें ' या म्हणीप्रमाणें सिद्दी अर्जीज व फाजलखान तेथें आले. परंतु ती जागा अवघड आहे असें पाहून अफजलखानासारखा आपला नाश होईल अशी त्यांस धास्ती वाटली, तेव्हां ते परत गेले. हें कळल्यावर विजापूरचा सुलतान स्वतः शिवाजीवर स्वारी करून आला. पण कर्नाटकांत दंगे होऊं लागल्यामुळें त्याला परत जावें लागलें. इकडे शिवाजीनें कोंकणांत उतरून शृंगारपुरास सुर्वे राजे होते, त्यांजपासून शृंगारपूर काबीज करून घेतलें; दाभोळ, मालवण इत्यादि समुद्रकांठचीं ठिकाणें मिळविलीं व ' सांवतवाडीवर ' जाऊन वाडीकर सांवतास आपला अंमल मान्य करावयास लाविलें. या खटपटीचें फळ म्हणजे दक्षिण कोंकण (हल्लींचा रत्नागिरी जिल्हा) विजापूरकरांच्या हातून निघून शिवाजीच्या ताब्यांत आला (शके १५८३, सन १६६१).

४. शेवटीं शिवाजीशीं तह करण्याचा सुलतानानें विचार केला. त्यानें मुलाची भेट घेण्याची शहाजीस परवानगी देऊन ' शिवाजीचा व आमचा तह करून द्या' म्हणून लिहिलें. शहाजीनें भेटीला जाण्याचें मोठ्या आनंदानें कबूल केलें व ' तह करून देतों ' म्हणून सांगितलें. बापलेकांची भेट होऊन फार वर्षें झालीं होतीं. भेटीस बारा

वर्षांवर दिवस झाले म्हणजे देवळांत भेट घेण्याची चाल आहे, त्याप्रमाणें त्यांची भेट जेजुरीच्या देवळांत झाली. भेट झाल्यावर रहाण्याच्या ठिकाणीं येण्याकरितां शहाजी पालखींत बसला. तेव्हां शिवाजी पायांत जोडा न घालतां पालखीचा दांडा धरून घरापर्यंत पायींच आला. मग त्यानें शहाजीला राज्यांतील मुख्य किल्ले, ठाणीं, कचेऱ्या व तेथें केलेले बंदोबस्त वगैरे दाखविले. आतांपर्यंत शिवाजी मुख्यतः राजगडावर राही. यापुढें शहाजीच्या सूचनेवरून त्यानें रायगड हें आपलें रहाण्याचें मुख्य ठिकाण केलें आणि त्या किल्ल्याची बळकटी वाढविण्याचें व त्यावर इमारती बांधण्याचें काम आबाजी सोनदेव याजकडे सोंपविलें. दोन महिने शहाजी मुलापाशीं राहिला. त्यानें विजापूरकर व शिवाजी यांचा तह करून दिला व मग तो कर्नाटकांत परत गेला. शिवाजीनें आजपर्यंत मिळविलेला सर्व मुलूख या तहानें त्याच्याकडे कायम झाला. या वेळीं कल्याणपासून गोव्यापर्यंत कोंकणपट्टी व भीमा आणि वारणा या दोन नद्यांमधील शंभर मैल रुंदीचा प्रांत, इतका मुलूख शिवाजीच्या ताब्यांत आला (इ. स. १६६२). कर्नाटकांत गेल्यावर पुढें दोन वर्षांनीं होदीगिरें या गांवीं शिकार करीत असतां घोड्यावरून पडून शहाजी मृत्यु पावला (माघ शु॥ ६ शके १५८५). शहाजीच्या स्मरणार्थ व्यंकोजीनें एक वृंदावन होदीगिरें येथें बांधिलें व शिवाजीनें शिखर शिंगणापुरास एक डौलदार छत्री उभारली. छत्रीची पूजाअर्चा भोंसल्यांचे उपाध्ये अद्याप करितात.

---

११ शाएस्तेखानाची स्वारी.

विजापूरकरांशीं तह झाल्यावर शिवाजीस दिल्लीच्या मोंगल

बादशहाशीं झगडावें लागलें. या झगड्याचें स्वरूप नीट लक्षांत येण्यास तो कसा व कां झाला हें कळणें अवश्य आहे. दिल्लीचा बादशहा शहाजहान यानें अहमदनगरची निजामशाही बुडवून तिचा बराचसा मुलूख आपल्या साम्राज्यास जोडल्याचें मागें दुसऱ्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. नर्मदेच्या दाक्षिणेकडील मोंगल मुलुखाचा एक सुभा असे. त्याची व्यवस्था सन १६५६च्या सुमारास बादशहाचा मुलगा औरंगजेब याजकडे होती. दाक्षिणेंतील हिंदु व मुसलमान राज्यांचा नायनाट करून सर्व दाक्षिण पादाक्रांत करण्याचा त्याचा विचार होता. १६५६च्या नोव्हेंबरांत विजापूरचा महंमद अदिलशहा वारला. त्याचा पुत्र अली हा बापामागून गादीवर बसला. परंतु अली हा महंमदशहाचा पुत्र नव्हे, या सबबीवर औरंगजेबानें विजापूरवर स्वारी केली. आपण या स्वारींत मोंगलांस साहाय्य केल्यास आपल्याला काय मिळणार याचें बोलणें करण्यास शिवाजीनें औरंगाबादेस वकील पाठविला. परंतु औरंगजेबानें गुळमुळीत उत्तरें देण्यापलीकडे कांहीं केलें नाहीं. तेव्हां मोंगल स्वारीवर गेल्यावर शिवाजीनें विजापूरकरांशीं संगनमत करून अहमदनगर व जुन्नर या मोंगलांच्या परगण्यांतून खूप खंड वसूल केला (मार्च व एप्रिल सन १६५७). याचा वृत्तांत औरंगजेबास स्वारींत कळतांच त्यानें त्या परगण्यांतील मोंगल कामगारांस सक्तीचे हुकूम पाठवून कसाबसा त्या परगण्यांचा बंदोबस्त केला. इतक्यांत पावसाळा संपतांच बादशहा शहाजहान आजारी पडल्याची बातमी आली व विजापूरशीं कसाबसा तह उरकून औरंगजेब उत्तरेकडे निघून गेला. मोंगल विजापूरच्या युद्धांतून मोकळे झाले हें पाहून शिवाजीस त्यांशीं तहकरणें जरूर वाटलें व त्यानें रघुनाथपंतास औरंगजेबाकडे पाठविलें. औरंगजेब उत्तरेकडे जाण्याच्या गडबडींत होता. त्यानें तह करण्याचें

कबूल केलें व शिवाजीस एक सामोपचाराचें पत्र*लिहिलें. पुढें औरंगजेबानें आपल्या भावांचा नाश करून व बापास कैदेंत टाकून दिल्लीची गादी बळकाविली. त्यानें शिवाजीशीं केलेला तह केवळ बाह्यात्कारी होता. शिवाजी हा कर्तबगार असून त्याचा लवकर मोड केला पाहिजे, हें तो पक्कें जणून होता. म्हणून गादीवर बसल्यावर लवकरच त्यानें आपला मामा शाएस्तेखान याची दाक्षिणच्या सुभ्यावर नेमणूक केली व शिवाजीचें पारिपत्य करण्यासाठीं ही तुमची योजना आहे असें त्यास स्पष्ट बजाविलें (१६५९ जुलै). शाएस्तेखान २८ फेब्रुवारी १६६० रोजीं अहमदनगराहून निघाला व सुपें, बारामती या रस्त्यानें सासवडवरून ९ मे रोजीं पुण्यास दाखल झाला. आपलें उत्तरेकडील दळणवळण कायम रहाण्यास चाकण आपल्या हातीं येणें जरूर, असें जाणून त्यानें चाकणास वेढा घातला.

२. चाकण किल्ल्यावर फिरंगोजी नरसाळा हा मराठा किल्लेदार होता. खानास वाटलें कीं, आपण सहज किल्ला घेऊन टाकूं; पण वेढा बसून दोन महिने झाले तरी किल्ला हातीं येईना. तेव्हां खानाची फारच निराशा झाली. शेवटीं एक सुरुंग लाविला होता तो उडाला. तेव्हां तटाला एक खिंडार पडलें. मोंगलांनीं आंत शिरण्याचा फार जोर केला तरी फिरंगोजीनें एक सबंध दिवसभर शत्रूस आंत येऊं दिलें नाहीं. शेवटीं निरुपाय होऊन फिरंगोजीनें किल्ला मोंगलांच्या हवालीं केला (१५ आगष्ट १६६०). शाएस्तेखानानें फिरंगोजीचा पराक्रम पाहिला होताच. तो फिरंगोजीस म्हणाला, " तुम्ही शिपाई खरे मर्द आहांत; तुम्हांस वाढवितों. आम्हांपाशीं रहावें. " एखादा सामान्य मनुष्य असता तर सहज हो म्हणता; परंतु फिरंगोजी शिवाजी-

* म. इ. सा. खंड ८, लेखांक ६; २४ फेब्रुवारी १६४८.

च्या तालमींत तयार झालेला अस्सल मराठा होता. त्यानें खानास उत्तर केलें " मला तुमची बढती नको. मला माझ्या धन्याकडे जाऊं द्या म्हणजे झालें. " खानानें सन्मान करून फिरंगोजीस शिवाजीकडे लावून दिलें. फिरंगोजी शिवाजीकडे गेला तेव्हां त्याला ही सर्व हकीकत कळली. त्याबरोबर शिवाजीला त्या आपल्या सेवकाबद्दल प्रेमाचें भरतें आलें. त्यानें फिरंगोजीची पाठ थोपटली व ' शर्थ केलीस ' असें म्हणून त्यास भूपाळगडचा किल्लेदार नेमलें. धन्य शिवाजी आणि धन्य त्याचा एकनिष्ठ सेवक फिरंगोजी ! अशी स्वामिसेवकांची जोडी सांपडणें विरळा.

३. शाएस्तेखानास चाकणचा किल्ला घेण्यास दोन महिने लागले; तेव्हां किल्ले घेण्याचा नाद त्यानें सोडून दिला. शिवाय आतां पावसाळा सुरू झाला होता; त्यामुळें त्यानें पुण्यास छावणी दिली, व सर्व शहराची नाकेबंदी करून सशस्त्र मराठ्यांस गांवांतून फिरण्याची मनाई केली. मग सन १६६१च्या आरंभीं मोंगलांनीं शिवाजीचे कल्याण व भिवंडी हे प्रांत घेतले. अशा रीतीनें ते शिवाजीच्या राज्याचा उत्तरेकडील मुलूख हाताखालीं घालून बसले. पुढें दक्षिणेकडे व पश्चिमेकडे स्वारी करून शिवाजीचे किल्ले घ्यावयाचे व मराठी राज्याचा संपूर्ण नाश करावयाचा. परंतु शाएस्तेखानास डोंगरी मुलुखांत शिरणें धोक्याचें वाटलें व त्यानें दोन वर्षें तशींच पुण्यांत स्वस्थतेनें काढिलीं.

४. विजापुराशीं तह होऊन त्या युद्धांतून मोकळा होतांच शिवाजीनें मोंगलांचा समाचार घेण्याचें ठरविलें. त्यानें मोरोपंत पेशवे याजबरोबर पायदळ देऊन जुन्नरच्या उत्तरेकडचे किल्ले काबीज करण्यास त्यास पाठविलें. नेताजी पालकर हा स्वार बरोबर घेऊन मोंगलांचा औरंगाबादेपर्यंत मुलूख मारून परत आला (मार्च सन १६६३). खुद्द शिवाजी कोंडाण्यावर (सिंहगड) होता. शाएस्तेखान पुण्यांत बंदोबस्तानें राहिला आहे असें पाहून शिवाजीनें त्याच्या

पारिपत्याची एक खाशी युक्ति योजिली.

५. खान आपल्या जनानखान्यासह शिवाजीच्या 'लाल महालांत' राहिला होता. दक्षिणेकडे सिंहगडच्या रस्त्यांपलीकडे त्याचा सहकारी जसवंतसिंग दहा हजार फौजेसह तळ देऊन राहिला होता. शिवाजीनें एक हजार शूर निवडक लोक आपल्या बरोबर घेतले; व नेताजी पालकर आणि मोरोपंत पेशवे यांच्या हाताखालीं एक एक हजारांची टोळी देऊन त्यांस जसवंतसिंगाच्या तळाच्या आसपास ठेविलें. निवडक चारशें लोकांसह रात्र पडतांच शिवाजी मोंगलांच्या तळावर आला. तेथें रक्षकांस आम्ही मोंगलांकडील मराठी सैनिक आहों, अशी थाप मारून त्या तळामध्येंच त्यानें कांहीं वेळ काढिला. मग एका वरातीच्या समारंभांत मिसळून तो शहरांत आला. बरोबर खेडचे बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी देशपांडे हे शिवाजीचे शूर व जिवलग संवगडी अघाडीस चालले. मध्यरात्रीं खानाच्या वसतीवर त्यानें हल्ला केला. तो रमजानचा महिना होता. तेव्हां दिवसाच्या उपवासानंतर खूप जेवून खानाचे लोक झोंपी गेले होते. कांहीं आचारी रमजानच्या महिन्यांतील पहाटच्या जेवणाचा स्वयंपाक करण्यासाठीं उठले होते. त्यांस मराठ्यांनीं कांहींएक गडबड होऊं न देतां ठार केलें. स्वयंपाकघर व वाडा यांजमध्यें एक दार होतें. तें विटांनीं बुजविलें होतें. आंत जाण्यास रस्ता करण्यासाठीं मराठे त्याच्या विटा काढूं लागले; तेव्हां आवाज झाला. त्यामुळें खानाचे कांहीं चाकर जागे झाले व त्यांनीं खानास वर्दी दिली. परंतु निद्रावश झाल्यामुळें, त्यानें उगीच माझी झोंपमोड करितां म्हणून त्यांची निर्भत्सनाच केली!

६. रस्ता होतांच शिवाजी व त्याचा विश्वासू सहकारी चिमणाजी बापूजी हे दोनशें लोकांसह अंतःपुरांत गेले. त्यांत पडदे लावून पुष्कळ खोल्या केल्या होत्या. पडदे तरवारीनें फाडून शिवाजी

शेवटीं खुद्द खानाजवळ गेला, तेव्हां तेथील स्त्रिया अगदीं धावरून गेल्या व त्यांनीं खानास जागें केलें. परंतु तो स्वसंरक्षण करण्यास सज्ज होतो न होतो तोंच शिवाजीनें तरवारीचा वार केला. तेव्हां खानाचीं तीन बोटें तुटलीं! इतक्यांत एका चाणाक्ष बाईनें सर्व दिवे मालवले. मग अंधार झाल्यावर सर्वच गोंधळ माजला. या गोंधळांत शाएस्तेखानाच्या दासींनीं त्याला सुरक्षित स्थळीं नेऊन पोंचविलें. मराठ्यांनीं अंधारांत ठार करण्याचें काम तसेंच चालविलें होतें. त्या वेळीं खानाच्या आठ दासी मारल्या गेल्या.

७. इकडे बाबाजी बापूजीच्या हाताखालची दुसरी २००ची टोळी रक्षकांवर तुटून पडली व तिनें त्यांचा हां हां म्हणतां निःपात केला. शेवटीं तींतील कित्येक लोक बॅण्डवाल्यांच्या खोलींत शिरले व त्यांस आपलीं वाद्यें वाजविण्याचा त्यांनीं (खानातर्फे?) हुकूम केला. यानंतर वाद्यांचा ध्वनि व मराठ्यांच्या आरोळ्या यांनीं सर्व जागा दणाणून गेली. शिवाय अंतःपुरांतही मोठा कल्लोळ उडाला. या सर्व गडबडीनें दूर असलेलें मोंगल सैन्य जागें झालें व 'शत्रू आला' अशी आरोळी ठोकून जामानिमा करण्यास त्यानें सुरुवात केली!! शाएस्तेखानाचा मुलगा अबदुल फत्तेखान हा आपल्या बापाच्या मदतीस सर्वांचे आधीं धावून आला. परंतु तो झटापटींत तेव्हांच मारला गेला. दुसरा एक मोंगल सरदार खानाच्या वाड्याजवळच रहात होता. धूर्त मराठ्यांनीं वाड्याचे दारास आंतून कडी लाविली आहे असें पाहून तो दोरावरून आंत आला. पण त्यासही मराठ्यांनीं लागलेंच ठार केलें. शत्रु सावध झाला असें पाहून शिवाजीनें न थांबतां आपले सर्व लोक जमविले व झटपट कूच करून तो निघून गेला. (चैत्र शु. ५ शके १८८५, ता. ५।४।१६६३).

८ पहिल्यानें मोंगलांनीं आपल्या सर्व छावणींत शोध केला.

मग ते शत्रूच्या पाठलागास निघाले तों शिवाजीनें त्यांना चकविण्याची आधींच तरतूद करून ठेविली होती. त्यानें कात्रजच्या घाटाच्या बाजूस बैलांच्या शिंगांस व झाडांना पोत गुंडाळून ठेवण्यास सांगितलें होतें. शिवाजी पुण्यांतलें कृत्य आटोपून परत फिरल्याबरोबर ते पोत पेटविण्याची सूचना करण्याकरितां करंणे वाजले; मग पोत पेटले. तेव्हां साहजिकच मागून पाठलाग करणाऱ्या मोंगलांना शिवाजी कात्रजकडे गेला असें वाटलें व ते तिकडे गेले. शेवटीं उजाडतांच त्यांस खरी बातमी कळली आणि ते कोंडाण्याकडे आले. ते जवळ येतपर्यंत शिवाजीनें कांहीं केलें नाहीं. पण जेव्हां शत्रू तोफांच्या माऱ्यांत आला, तेव्हां किल्ल्यावरून गोळीबार होऊं लागला. मोंगल जाया होऊं लागले. खान मोठ्या चिंतेत पडला. इतक्यांत तोफेचा गोळा लागून खाशा खानाचा हत्तीच मारला गेला. तेव्हां तर खानाचा अगदींच धीर सुटला. पावसाचे दिवस जवळ आले आहेत; शिवाजी दगेखोर, काय प्रसंग येईल नेम नाहीं, पावसाळा गेल्यावर काय तें करूं, असा विचार करून खान परत फिरला आणि औरंगाबादेस छावणी देऊन राहिला. शाएस्तेखानाच्या झालेल्या फजितीचें वर्तमान जेव्हां औरंगजेब बादशहाच्या कानावर गेलें, तेव्हां त्याला वाईट वाटलें, व आपल्या मामाचा फार राग आला. त्या वेळीं एखाद्या सुभेदारावर बादशहाची गैरमर्जी झाल्यास त्याची बंगालच्या सुभ्यावर नेमणूक होई. औरंगजेबानें आपल्या मामाची निर्भर्त्सना केली व त्याला एकदम बंगालच्या सुभ्यावर बदललें. शिवाजीविषयीं औरंगजेबाची अशी कल्पना होती कीं, शिवाजी म्हणजे कांहीं मोठा बलवान् नाहीं व त्याला चिरडून टाकण्यास मुळींच उशीर लागणार नाहीं; पण आतां औरंगजेबास शिवाजीच्या पराक्रमाची चुणूक दिसतांच तो बोलला कीं, "शिवाजी तो बडा सैतान पैदा हुवा."

१२. रणशूर मुरारबाजी.

शाएस्तेखानाच्या पराभवामुळें औरंगजेबास अनावर राग आला व मनस्वी दुःख झालें. हा रागाचा वेग उतरतो न उतरतो तोंच एकामागून एक अशा कांहीं बातम्या दिल्लीस येऊन थडकल्या कीं, त्यामुळें त्याचा क्रोधाग्नि भडकला व शिवाजीचा पुरा मोड करण्याचा त्यानें निश्चय केला. शिवाजीचा बहिरजी नाईक नांवाचा एक हुशार हेर होता. तो शिवाजीस फार महत्त्वाच्या बातम्या गुप्तपणें कळवीत असे. त्यानें सुरतेची खडान् खडा माहिती शिवाजीस कळविली; तेव्हां शिवाजी निवडक लोक बरोबर घेऊन सुरतेवर आला व त्या शहराची त्यानें सहा दिवसपर्यंत खंडणी बिनधोक वसूल केली (शके १५८५, सन १६६४). तरी मोंगल सरदारास त्या गोष्टीची दादही नव्हती. नंतर शिवाजी सर्व पैसा घेऊन सुरक्षितपणें परत रायगडास आला. इकडे शिवाजीच्या आरमारावरील अधिकाऱ्यांनीं मक्केच्या यात्रेकरूंनीं भरलेलीं गलबतें पकडलीं व मोठा खंड घेऊन सोडून दिलीं; ही गोष्ट औरंगजेबास कळली, तेव्हां त्याच्या तळव्याची आग मस्तकास गेली. बादशहा स्वतःच शिवाजीवर आला असता; पण उत्तरेकडे बंडें उद्भवल्यामुळें त्याला येतां येईना. तरी त्यानें जयपूरचा राजा मिरजा जयसिंग व पठाण दिलीरखान या दोघांस ताबडतोब रवाना केलें. जयसिंग व दिलीरखान मोठी फौज घेऊन निघाले, व मजल दरमजल पुण्यास आले. शिवाजी या वेळेस आरमार घेऊन दक्षिणेस गोकर्णाकडे गेला होता. त्या दोघांनीं किल्ले घेण्याचा निश्चय केला. दिलीरखानानें पुरंदरास वेढा घातला आणि जयसिंग एकंदर मोहिमेची व्यवस्था लावण्याकरितां पुरंदरजवळच तळ देऊन बसला. दिलीरखान पठाण मोठा मर्द व पराक्रमी होता.

शिवाजीचें पारिपत्य करण्याचा बादशहाचा हुकूम त्याच्या मनांत सारखा घोळत होता. या स्वारींत आपण पराक्रम केला तर बादशहाची मर्जी आपल्यावर खात्रीनें बसेल हें त्यानें ताडलें, शौर्यानें लढेन व नांव मिळवीन अशा ईर्षेनें त्यानें वेढ्याचें काम चालविलें.

२. पुरंदर किल्ल्यावर मुरार बाजी महाडकर हा मुख्य होता आणि त्याच्या हाताखालीं दोन हजार लोक होते. मोंगलांचें सैन्य किल्ल्यास वेढा घालण्यास येतें असें कळल्याबरोबर मुरार बाजीनें मोंगलांस दाणावैरण मिळूं नये अशी व्यवस्था केली आणि त्यांच्या दारूगोळ्यास आग लावून दिली. तथापि दिलीरखानानें सर्व व्यवस्था नीट लावून वेढा घातला. चोरवाटांनीं किल्ल्यावर धान्य जात होतें. शिवाय किल्ल्यावरील लोकांपाशीं दारूगोळ्याचा चांगलाच संग्रह होता. त्यामुळें बरेच दिवस मोंगलांचा उपाय चालेना. शेवटीं एके दिवशीं मोंगलांनीं शिकस्त केली, तेव्हां त्यांचा खालच्या कोटांत प्रवेश झाला. किल्ल्यावरील मराठ्यांची सर्व शिबंदी वरच्या कोटांत गेली. तेव्हां मोंगलांना वाटलें कीं, आतां काय ? शत्रु आपणांस भिऊन पळाले आहेत. म्हणून ते खालच्या कोटांतल्या घरांतून लुटालूट करण्याच्या नादीं लागले. मोंगली लष्कराची ही अव्यवस्था पाहून किल्लेकऱ्यांनीं वरून तोफा डागण्यास सुरुवात केली. तेव्हां मोंगलांची अतिशय तारांबळ उडाली. बरेच मोंगल पटापट मरून पडले; कांहीं खालीं पळून गेले व कांहीं कानाकोपरा पाहून लपून बसले. इतक्यांत हेटकरी व मावळे मोंगलांच्या पाठीस लागले. मुरार बाजीनें तर असा जोराचा पाठलाग केला कीं, तो खुद्द दिलीरखानाच्या तंबूशीं आला. ही आपल्या फौजेची झालेली फजिती पाहून खानास त्वेष आला. त्यानें भिऊन पळणाऱ्या आपल्या लोकांची भित्रेपणाबद्दल निर्भर्त्सना करून त्यांना धीर येईल असें भाषण केलें व सर्व लोकांस परत फिरवून फिरून हल्ला केला. त्या वेळीं मराठ्यांची व मोंगलांची फार

निकराची लढाई झाली. मुरार बाजी मोठ्या आवेशानें लढत होता. इतक्यांत दुर्दैवानें त्याची ढाल तुटली. तथापि त्या वीरानें मुळींच न घाबरतां कंबरेचा शेला सोडला व शत्रूचे घाव तो त्या शेल्यावर झेलून घेऊं लागला. इतक्या अवकाशांत दिलीरखानानें एक बाण सोडला. मुरार बाजीचें शीर उडालें व तो रणांगणावर पडला. मुरार बाजी पडला तेव्हां दिलीरखानास किल्ला आतां सहज स्वाधीन होईल असें वाटलें. त्यानें वरपर्यंत हल्ला नेला व वरच्या शिबंदीस शरण येण्यास सांगितलें. तेव्हां वरच्या लोकांनीं उत्तर केलें, "एक मुरार बाजी पडला तरी काय झालें ? आम्ही तसेच शूर आहों. ऐशी हिंमत धरून भांडतों." शेवटीं त्यांनीं मोंगलांस किल्ला घेऊं दिला नाहींच.

---

१३ बादशहाशीं समेट.

[पुरंदरचा तह, शके १५८७; इ. स. १६६५.]

शिवाजी गोकर्णाहून समुद्रावरची स्वारी करून परत आला, तोंच दिलीरखान व जयसिंग हे दोन सरदार मोठी फौज घेऊन आपल्या राज्यावर चाल करून आले आहेत ही बातमी त्याला समजली. हे सरदार मोठे पराक्रमी आहेत, आणि यांच्यापाशीं फौजही पुष्कळ आहे; तेव्हां आपण आतां काय करावें याचा शिवाजीस मोठा विचार पडला. इतक्यांत दिलीरखानानें पुरंदर किल्ल्याला वेढा घातला होता त्या वेळीं झालेल्या झटापटींत आपला शूर व एकनिष्ठ सरदार मुरार बाजी पडला, ही दुःखकारक बातमी शिवाजीच्या कानांवर येऊन आदळली. 'मुरार बाजी गेला, आतां पुरंदर जाण्यास कांहींच वेळ लागणार नाहीं व आपले किल्ले हे मोंगल एकामागून एक घेतील,' असे विचार मनांत येऊन शिवाजी कांहीं

काळ सचिंत असा होता. शिवाजीवर अति भयंकर संकटें येत, त्याला दुःखही होई, परंतु त्याची ईश्वरावर निष्ठा होती; यामुळें संकटकाळीं निभावून जाण्याचें त्याला सामर्थ्य येत असे व प्रत्येक संकटाला तोंड देऊन शिवाजी त्यांतून निभावून जाई. मोंगल किल्ले घेतात; आज एक घेतला, उद्यां दुसरा; व असेच ते बळावत जाणार; अशा तऱ्हेचा प्रसंग पाहून त्यानें मोंगलांशीं समेट करून वेळ मारून नेण्याचें ठरविलें.

२.आपल्या पारिपत्याकरितां पाठविलेल्या सरदारांपैकीं राजा जयसिंग तर हिंदु आहे; तेव्हां तो आपल्यास कांहींसा अनुकूल झाल्याशिवाय राहणार नाहीं. असा विचार करून शिवाजीनें वस्त्रें, अलंकार बरोबर देऊन आपण भेटीस येतों हें सांगण्याकरितां रघुनाथ पंडित यास पाठविलें. जयसिंगानें पंडिताचा सन्मान केला आणि शिवाजीचा निरोप मोठ्या खुषीनें ऐकून घेतला. शाएस्तेखानाची फजिती झाल्यापासून शिवाजीविषयीं मोंगलांच्या दरबारांत धाक बसून गेला होता. शिवाय जयसिंगाच्या लष्करासही रात्रीं त्रास देण्याचें मराठ्यांनीं सोडलें नव्हतें. या कारणांनीं जयसिंगासही लढाई चालविली तर जय मिळेल अशी खात्री नव्हती; म्हणून तो तह करण्यास तयार होता. त्यानें पंडितरावास म्हटलें "औरंगजेब बादशहा बलवान् पृथ्वीपति, त्यांशीं तुम्हीं सख्य करावें; शत्रुत्वानें राहून या काळीं परिणाम लागणार नाहीं; आम्ही हिंदु, जयपूरचे राजे तुम्हीही उदेपूरच्या थोर घराण्याचे वंशज; तुम्ही हिंदुधर्म स्थापन करतां, यारतव आम्ही तुम्हांस अनुकूल आहोंत. तुम्ही बादशहास शरण याल तर त्याजकडून माफी देववून कांहीं मुलूखही जहागीर देववूं. याजबद्दल रजपुतांची आणभाक घेऊन तुमची खात्री करण्यास आम्ही तयार× आहों." असें सांगून शिवाजीस अवश्य भेटीस यावें, असा त्यानें उलट निरोप पाठविला.

× चिटणीसबखर पृ. १०२.

३. जयसिंगाचा निरोप पोहोंचल्यावर शिवाजीनें त्याच्या भेटीस जाण्याची तयारी केली. आपण स्वतः साधा पोषाख केला. बरोबर फौज घेतली. फौजेंतील लोकांनीं बराच थाट केला होता. भेटीचें स्थळ पुरंदरजवळ होतें. तेथें आपल्या फौजेसह शिवाजी येऊन पोहोंचला. त्या लष्कराचें वैभव पाहून मोंगलांकडचे लोक दिपून गेले. इतकी संपत्ति ज्या राजाची आहे, तो किल्लेकोट घेतो हें साहजिक आहे, असें त्यांस वाटलें. शिवाजीनें साधाच पोषाख केल्यामुळें त्याची तर मोंगलांस ओळखही पटेना. भेट घेण्याकरितां जयसिंग पुढें सामोरा आला होता. तो आणि शिवाजी एका अंबारींत बसून बैठकीच्या जागीं गेले. जयसिंगानें शिवाजीस आपल्या उजव्या बाजूस बसविलें. शिवाजीनें जयसिंगाची औदार्याची वर्तणूक पाहून त्याशीं भाषण केलें:—"तुम्हांस जे गड पाहिजेत ते मी देतों, निशाणी चढवितों, पण मुसलमानांस यश न देणें. मी हिंदु, आपण रजपूत तेव्हां हिंदुच! राज्य मूळचें सर्व हिंदूंचें व हिंदुधर्माचें रक्षण करणाऱ्या थोर पुरुषांपुढें मी आपलें डोकें एकदां सोडून दहादां नमवीन. आपण आपल्या देशाची व धर्माची मानहानि होईल असें कधींही करणार नाहीं." हें भाषण ऐकून जयसिंगाचा धर्माभिमान जागृत झाला व त्यानें तह करण्याचें मोठ्या आनंदानें कबूल केलें. पुढें तह करावयाचा, पण हिंदूस हिंदु मिळाला असा गवगवा होईल, याकरितां अगोदर दिलीरखानाची भेट घ्यावी, असें जयसिंगानें शिवाजीस सुचविलें. मग दिलीरखानाच्या भेटीस शिवाजी निघाला. तेथें जयसिंगानें त्याजबरोबर आपला मामा सुभानसिंग यास पाठविलें. शिवाजी भेटीस येत आहे हें खानास कळतांच तो मोठा खिन्न झाला. कारण अजून पुरंदर कांहीं त्याच्या हातीं आला नव्हता. तेव्हां त्याला पुरंदर सर करण्याचें यश आपल्या हातीं लागत नाहीं असें वाटलें. हेंच तो खिन्न होण्याचें कारण. भेटीच्या

प्रसंगीं दिलीरखान म्हणाला, "या किल्यावर उद्यां निशाण चढवून मी तिकडे येतों" सुभानसिंगानें "शिवाजी पाहिजे ते किल्ले देऊन तह करण्यास आला आहे," असें म्हटलें; तेव्हां खान म्हणाला:—तुम्ही मिळून जयसिंगाकडे जा. ते वडील आहेत. ते करतील त्यांत आपण आहों.

४. शिवाजी व सुभानसिंग जयसिंगाकडे गेल्यावर तह टरला. शिवाजीनें बारा किल्ले आपणाकडे ठेवून बाकी राहिलेले वीस मोंगलांस देण्याचें कबूल केलें. शिवाजीचा आठ वर्षांचा मुलगा संभाजी यास बादशहाकडून पांच हजार घोडेस्वारांची मनसब मिळाली. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही कीं, विजापूरच्या राज्यांत चौथाई व सरदेशमुखी हे दोन हक्क वसूल करण्याची शिवाजीस परवानगी मिळाली. कुलाब्यानाजीकचा हब्शांच्या सत्तेखालचा जंजिरा आपल्याला मिळावा म्हणून त्यानें फार खटपट केली; पण बादशहानें असें लिहून धाडलें कीं, 'जंजिऱ्याचें बोलणें इतक्यांत बोलूं नये. हुजूरभेटीला याल तेव्हां त्या गोष्टीचा निकाल करूं.'

---

१४ कपटानें धरलें पण युक्तीनें सुटले!

पुरंदरचा तह झाल्यावर जयसिंगानें विजापुराशीं युद्ध करण्यास सुरुवात केली. त्यांत शिवाजीनें त्याला चांगली मदत केली. शिवाजीनें केलेल्या साहाय्याचें वर्णन जयसिंगानें आग्र्यास लिहून पाठविलें. तें वाचून बादशहा अगदीं खुष झाला. त्यानें भेटीस येण्याविषयीं शिवाजीस आग्रहाचें बोलावणें केलें. शिवाजीच्या मनांतही एकदां जाऊन तेथील स्थिति बारकाईनें पाहून येण्याचें होतेंच. त्यानें जाण्याचा निश्चय केला. जाण्यापूर्वी किल्ल्यांचा बंदोबस्त केला.

सर्व कारभार मोरोपंत पेशवे, अण्णाजी दत्तो सचीव, निळो सोनदेव मुजुमदार या त्रिवर्गांनीं मिळून चालवावा अशी व्यवस्था केली. आपल्याबरोबर संभाजी, दत्ताजी त्रिंबक, निराजी रावजी, राघो मित्रा, हिरोजी फर्जंद इत्यादि लोक घेतले व हजार फौजही घेतली. निघतांना शिवाजीनें मोरोपंत वगैरे कारभाऱ्यांस जवळ बोलावून "आग्र्यास माझें बरें वाईट झालें तर तुम्हीं न डगमगतां राजारामास गादीवर बसवून राज्याचें रक्षण करावें," असें सांगितलें, नंतर शिवाजी निघाला, तो औरंगाबादेस आला. तेथें जयसिंगाची भेट झाली. अगोदरच त्यानें आपला पुत्र रामसिंग यास शिवाजीस हरएक प्रकारची मदत करण्याविषयीं लिहिलें होतें. शिवाजी तेथून निघाला, तो मजल दरमजल करीत आग्र्यास चालला. वाटेंतल्या सर्व अम्मलदारांस बादशहानें असा हुकूम केला होता कीं, शिवाजी आमच्या भेटीस येत आहे, तर त्यास भेटून ठिकठिकाणच्या अम्मलदारांनीं त्याची सर्व प्रकारची तरतूद करावी. त्यामुळें शिवाजीस कोणत्याही प्रकारची दगदग न पडतां निघाल्यापासून दोन महिन्यांनीं तो आग्र्यास पोंचला (ज्येष्ठ शु॥ २, शके १५८८). शहराबाहेर स्वागताकरितां रामसिंग आला होता. बादशहानें शिवापुरा नांवाची स्वतंत्र हवेली शिवाजीकरितां ठेविली होती; तींत शिवाजी उतरला.

२. नंतर ज्येष्ठ शुद्ध ५ स. शिवाजीची भर दरबारांत भेट घेण्याचें औरंगजेबानें ठरविलें. चांद्रगणनेनें तो दिवस बादशहाचा पन्नासावा वाढदिवस होता. त्यामुळें त्या दिवशीं औरंगजेबाची सुवर्णतुळा व रौप्यतुळा व्हावयाची होती व त्यानें सर्व सरदारांस दरबारास येण्याविषयीं आमंत्रण केलें होतें. त्याप्रमाणें सर्व मानकरी हजर राहिले. दरबारास जातांना रामसिंगानें शिवाजीस बरोबर घेतलें. दरबारांत बादशहास सलाम करणें, नजर देणें, या गोष्टी झाल्यावर बादशहानें शिवाजीस जसवंतसिंग मारवाडचा राजा उजवे

बाजूस होता त्याचे खालीं उभें राहण्यास सांगितलें. बादशहाच्या तोंडचे शब्द कानीं पडतांच शिवाजीस क्रोध आला आणि त्या जागीं जातांना तो मराठींत " ज्याची पाठ माझ्या फौजांनीं पाहिली त्या जसवंतसारख्या उमरावाच्या खालच्या बाजूस मला उभें करावें म्हणजे काय ?" असे कांहीं शब्द पुटपुटला. हें पाहून बादशहा गडबडला आणि त्यानें जवळच्या मंडळीस शिवाजी काय म्हणतो, हें विचारिलें. नंतर बादशहानें कांहींएक कमजास्त न करतां " शिवाजीस उतरल्या ठिकाणीं घेऊन जा " म्हणून रामसिंगास सांगितलें. शिवाजी उतरल्या ठिकाणीं येऊन पोंचल्यावर थोड्याच वेळानें बादशहाकडून "याउपर तुम्हीं दरबारांत येऊं नये, काय बोलणें असेल तें वकिलामार्फत कळवीत जावें " असा निरोप आला. मग शिवाजीनें आपला वकील रघुनाथपंत कोरडे याच्या मार्फत बादशहास वारंवार निरोप पाठवून कळविलें कीं, "माझी दुसरी कांहीं इच्छा नाहीं. विजापूर, गोंवळकोंडें येथील राज्यें मोडून बादशहाची सेवाचाकरी करावी येवढीच इच्छा आहे. भेटीस येण्यासही माझ्या मनांत कांहींच वाटत नाहीं." पण औरंगजेबासारख्या संशयी बादशहाचा विश्वास यावर कसा बसणार ? अगोदरच औरंगजेबाचा शिवाजीवर भरंवसा नव्हता. त्यांतून दरबारांतलें त्याचें वर्तन पाहून बादशहा संशयग्रस्त झाला. मग आपण काय वचन दिलें आहे, या गोष्टीची बादशहानें मुळींच फिकीर न करितां पोलादजंग कोतवालास पांच हजार स्वारांनिशीं शिवाजीवर पहारा ठेवण्यास सांगितलें. आतां शिवाजी मोठ्या संकटांत पडला; पण त्यानें रामसिंगाकडून बादशहास विनंति केली कीं, आमच्या देशास जाण्याची आम्हांस परवानगी द्यावयाची नसली तरी आमच्यावरोबरच्या लोकांस कांहीं येथील हवापाणी मानवत नाहीं, तेव्हां त्यांना परत जाण्याचा हुकूम व्हावा. बादशहास वाटलें कीं, हें चांगलें झालें. शिवाजी आपण होऊनच आपली फौज परत

करतो हें बरेंच. आतां तो येथें राहिल्यावर काय करणार आहे ! असा विचार करून औरंगजेबानें शिवाजीच्या फौजेस परत जाण्याचा हुकूम दिला. मग आग्र्यास कांहीं निवडक मंडळी मात्र शिवाजीजवळ राहिली.

३. शिवाजीनें औरंगजेबाकडे मला दक्षिणेंत जाण्याची परवानगी व्हावी असे बरेच निरोप पाठविले, पण औरंगजेबाकडून परवानगी मिळेना. औरंगजेबास शिवाजीचा स्वाभिमानी स्वभाव पहिल्या दिवशींच दरबारांत कळून चुकला होता. शिवाजीला दक्षिणेंत जाऊं दिलें तर तेथें तो आपली सेवा करून राहील हें त्या धोरणी बादशहास मुळींच खरें वाटलें नाहीं. त्यानें शिवाजीला आग्र्यास ठेवून घेण्याचा विचार केला. बादशहास असें वाटत होतें कीं, शिवाजी प्रत्यक्ष आपल्याजवळच राहिला तर त्याच्या शौर्याचा आपणास उपयोग करून घेतां येईल. शिवाय शिवाजी आग्र्यास रहाण्यास कबूल होईपर्यंत त्यावर सक्त पहारा ठेवावयाचा, असें रामसिंगास त्यानें एके प्रसंगीं सांगितलें. हा बादशहाचा बेत शिवाजीच्या अगोदरच ध्यानांत आला होता. शिवाजीला आतां काय करावें, हा प्रश्न पडला—आग्र्यास बादशहाचा सरदार म्हणून रहाण्यास कबूल व्हावें, तर आपण मोठ्या मेहनतीनें आरंभिलेला स्वराज्यस्थापनेचा उद्योग सोडून द्यावा लागणार ! बरें; दक्षिणेंत जाण्यास बादशहा सरळपणें परवानगी देत नाहींच; पहारा तर कडक आहे. या संकटांतून सुटावें कसें ? इत्यादि विचार शिवाजीच्या मनांत आले. शेवटीं जीव धोक्यांत पडेना का, पण आग्र्याहून निसटून जाण्याचा शिवाजीनें निश्चय केला.

४. मी आग्र्यास रहाण्यास तयार आहें, अशा अर्थाचे निरोप शिवाजी बादशहास पाठवूं लागला. तसेच दरबारांतील लोकांच्या घरीं हळूहळू नजराणे म्हणून मिठाईनें भरलेले पेटारे शिवाजीकडून जाऊं

लागले. पहिल्यापहिल्यानें पहारेकरी पेटारे तपासून पहात, पण पुढें पुढें यांत मिठाईच असते, त्यांत काय पहावयाचें ! असें म्हणून तपासण्याचा ते कंटाळा करूं लागले. इतक्यांत पहारेकऱ्यांस शिवाजीच्या लोकांनीं सांगितलें कीं, 'महाराजांचें कपाळ दुखतें ! तुम्ही गलबला करूं नका. मिठाईचे पेटारे मागच्याप्रमाणें जातच होते. शिवाजी आजारी आहे; तेव्हां उशिरां उठतो, आपल्या नजरेस फारसा पडत नाहीं, याचें पहारेकऱ्यांस आश्चर्य वाटलें नाहीं. असे दहा पंधरा दिवस गेले; मग एके दिवशीं संध्याकाळीं शिवाजी एका पेटाऱ्यांत व संभाजी एका पेटाऱ्यांत असे कुलस्वामिनीचें चिंतन करून बसले. पेटारे * रोजच्याप्रमाणें तपासणी न होतां चालले. ते गांवाबाहेर पूर्वीच ठरलेल्या जागीं आले. तेथें निराजी रावजी वगैरे शिवाजीच्या जवळचीं जिवास जीव देणारी मंडळी होतीच. वेष पालटून ते कसेबसे मथुरेस पोंचले. इकडे हिरोज फर्जंद हा शिवाजीचा पोषाख करून डोळ्यांवर पांघरूण घेऊन निजला होता. तो लवकर उठला आणि पहारेकऱ्यांस 'महाराज जास्त आजारी आहेत, मी औषध आणण्यास जातों. तुम्ही कोणी आंत जाऊं नका' असें सांगून निघाला आणि त्यानें दक्षिणेचा मार्ग धरला. दुपार झाली तरी कांहीं हालचाल नाहीं, असें पाहतांच पहारेकरी आंत गेले आणि पाहतात तों शिवाजी तेथें नाहीं. हें वर्तमान पोलादखानानें बादशहास कळविलें, तेव्हां बादशहा पोलादखानावर फारच रागावला व त्याची मनसब त्यानें जप्त केली. औरंगजेबास आपल्या शहाणपणाची घमेंड होती. त्याला वाटत होतें कीं, आपण शिवाजीस आतां अडकावून टाकलें. पण ईश्वरी संकेत निराळा. शिवाजी

* शके १५८८ ज्येष्ठ शु. २ राजश्री शिवाजी राजे अगरियास पाऊन श्रावण व॥ १२ स पेटारियांत बैसोन पळाले (जेधे यांची शकावली).

बादशहाचे हातावर तुरी देऊन दक्षिणेकडे निघून गेला. आपण नीट दक्षिणेकडे गेलों तर पकडले जाऊं असा विचार करून शिवाजी प्रथम उत्तरेस मथुरेकडे गेला. पायीं चालून लहानग्या संभाजीच्या पायास फोड आले व त्याच्यानें चालवेना. मथुरेस कृष्णाजीपंत, काशीपंत व विसाजीपंत हे त्रिवर्ग बंधु मोरोपंत पेशव्याचे मेहुणे होते. त्यांची व निराजीपंताची ओळख होती. त्यांनीं संभाजीस आपल्यापाशीं ठेवून घेण्याचें मोठ्या धैर्यानें कबूल केलें. मग बैराग्याच्या वेषानें प्रयाग, काशी व गया येथील त्रिस्थळी यात्रा करून पूर्वेकडे थेट पुरीस उतरून तेथें शिवाजीनें जगन्नाथाचें दर्शन घेतलें. नंतर गोंडवणांतून दक्षिणेस येऊन कुतुबशाही व अदिलशाही हद्दींतून गुप्तपणें मार्ग आक्रमीत गेल्यापासून दहा महिन्यांनीं तो रायगडास येऊन दाखल झाला (१६६६ डिसेंबर). त्या प्रसंगीं जिजाबाई व कारभारी मंडळी यांस किती आनंद झाला, तें सांगतां येत नाहीं.

५. शिवाजीचें आग्र्यास गमन व तेथील त्याचा बंदिवास हें एक मराठ्यांच्या राज्यावर गंडांतरच येऊन गेलें! या वेळीं कारभाऱ्यांनीं व्यवस्थितपणें राज्यकारभार चालविला होता; जणूं काय शिवाजी कोठें गेलाच नाहींसें भासत होतें. हें शिवाजीस कळल्यावर त्यास फार आनंद झाला यांत कांहीं नवल नाहीं. आपल्यामागें आपलें काम चालविण्यास योग्य माणसें आहेत हें पाहून कर्त्या पुरुषास फारच समाधान वाटतें. तसेंच या प्रसंगीं शिवाजीसही झालें. दहा महिने मालक जाग्यावर नसतां महाराष्ट्रांतील एकही मराठा स्वराज्य सोडून फितूर होऊन त्या वेळीं चहूंकडे गाजणाऱ्या मोंगलांस मिळाला नाहीं! उघडच आहे, महाराष्ट्रांतील सर्व लोकांस हिंदुराज्य हें आपलें राज्य असें मानण्याची संवय लागली होती. संभाजीला घेऊन पेशव्याचे मेहुणे थोड्याच दिवसांनीं दक्षिणेंत आले. वाटेंत उज्जनीस संभाजीविषयीं लोक चौकशी करूं

लागले, तेव्हां 'हा आमचा भाचा आहे' असें त्यांनीं सांगितलें. 'तुमचा जर तो भाचा आहे, तर तुम्ही एका ठिकाणीं जेवा पाहूं' असा तेथील लोकांनीं आग्रह धरिला. तेव्हां 'याची मुंज झाली आहे, तेव्हां एके ठिकाणीं जेवतां येत नाहीं' असें ते म्हणाले. लोकांना तें कारण पटलें. नंतर त्यांनीं दहीं पोहे कालवून एकत्र खाल्ले; तेव्हां लोकांचा संशय दूर झाला. अशा संकटांतून आपला मुलगा आणला हें पाहून शिवाजीनें त्रिवर्गबंधूंस 'विश्वासराव' असा यथोचित किताब दिला व×देणग्या देऊन त्यांची योग्य संभावना केली.

---

१५ स्वराज्यव्यवस्था.

(शके १५९०।१५९१; सन १६६८।१६६९)

शिवाजी आग्र्याहून सुटून गेला. तेव्हां या कामीं त्यास रामसिंगाची मदत असावी, असा औरंगजेबास संशय आला आणि त्यानें रामसिंगास दरबारांत येण्याची मनाई केली. शिवाजी आग्र्यास गेल्यावर जयसिंगानें विजापुरास वेढा घातला होता, पण त्याला जय मिळाला नाहींच; उलट अति त्रास झाला. म्हणून तो वेढ्याचें काम टाकून देऊन औरंगाबादेस परत गेला. त्याचा हा झालेला पराभव व शिवाजी हा दक्षिणेंत नुकताच गेलेला असल्यामुळें त्या दोघांचें ऐक्य होण्याची भीति, या दोन कारणांनीं बादशहाचें मन जयसिंगाविषयीं साशंक झालें. यामुळें त्यानें त्यास परत बोलाविलें व दिलीरखानास माळव्याच्या सुभ्यावर बदललें. यापुढें बादशहानें दक्षिणच्या सुभ्यावर आपला मुलगा मुअज्जम व जोधपूरचा राणा जसवंतसिंग या दोघांची

+मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड ८, लेखांक २३.

रवानगी केली. आग्र्यास असतां या दोघांचाही स्वभाव शिवाजीस माहीत झाला होता. त्यानें जसवंतसिंगास पैसे भरून व मुअज्जमशीं गोड बोलून मोंगलांशीं पूर्वी झालेला तह कायम करण्याविषयीं बादशहास लिहिण्यास सांगितलें. बादशहाही तह कायम करण्यास कबूल झाला. शिवाजीशीं औदार्याची वर्तणूक करून फिरून त्यास फसवून दगा करण्याचा त्या कपटी बादशहाचा विचार होता. यासाठीं तो नुसता तह करून थांबला नाहीं. भोंसले घराण्यांत राजे हें उपपद पूर्वीपासून चालू होतेंच; परंतु खुद्द बादशहानें आतां शिवाजीची राजे ही पदवी मान्य केली. कोंडाणा, पुरंदर हे किल्ले वगळून पुणें व सुपें हे जहागिरीचे परगणे परत दिले; आणखी बऱ्हाडप्रांत जहागीर दिला. ह्या बऱ्हाडप्रांतांतील जहागिरीच्या बंदोबस्ताकरितां व पुरंदरच्या तहांत बादशहाकडून संभाजीला मिळालेली पांच हजारांची मनसब चालविण्याकरितां शिवाजीनें प्रतापराव गुजर यास पांच हजार फौजेनिशीं मोंगलांच्या छावणींत औरंगाबादेस ठेवून दिलें. या तहानें शिवाजीस विजापूरकराच्या राज्यांतून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मिळाला होता. त्यामुळें विजापूरकर घाबरून गेले आणि आपल्या राज्यास त्रास न पोंचावा म्हणून त्यांनीं दरसाल तीन लक्ष रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें. गोवळकोंड्याच्या सुलतानानें याचप्रमाणें पांच लक्ष खंडणी कबूल केली. हे तिन्ही तह झाल्यावर दोन वर्षेपर्यंत परराज्यांशीं शिवाजीचें सख्य कायम राहिलें. या दोन वर्षांचा काळ शिवाजीनें आपल्या राज्याची व्यवस्था लावण्यांत खर्च केला. ती राज्यव्यवस्था कशी होती हें आतां सांगावयाचें.

२. ज्या सैन्याच्या जोरावर शिवाजीनें विजापूरच्या सुलतानास शरण यावयास लाविलें, औरंगजेबास नरम आणिलें व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वराज्यस्थापना केली, त्या सैन्याची व्यवस्था

कशी होती हें पाहूं. शिवाजीच्या पायदळांत घाटमाथ्यावर रहाणारे मावळे व कोंकणांत राहणारे हेटकरी असत. त्यांचीं शस्त्रें म्हणजे तलवार, ढाल, बंदुक किंवा तीरकमठा. डोंगर चढण्याच्या कामांत ते अगदीं पटाइत असत. इतके कीं, ज्या कड्यावरून इतर माणसांनीं चढण्याचा प्रयत्न केल्यास तीं ठिकऱ्या ठिकऱ्या होऊन प्राणास मुकतील असले अवघड कडे ते सहज चढून जात. त्यांतल्या त्यांत शिवाजीचे हेटकरी अचुक नेम मारीत आणि मावळे लढाईला तोंड लागलें म्हणजे तलवार घेऊन निकरानें लढण्यांत तरबेज असत. शिवाजीनें राज्यस्थापनेचा आरंभ केला तेव्हां प्रथम किल्ले सर केले. हे किल्ले घेतांना त्याच्या पायदळाची त्याला उत्कृष्ट मदत झाली. त्यावर मुख्य येसाजी कंक हा होता.

३. शिवाजीचें घोडदळ दोन प्रकारचें होतें. एक शिलेदार व दुसरे बारगीर. शिलेदार जरा श्रीमंत असून घोडीं, दारूगोळा, हत्यारें वगैरे त्यांचीं स्वतःचीं असत. कांहीं कांहीं शिलेदार आपल्या हाताखालीं पांच पन्नास स्वार बाळगून असत. बारगीर हे गरीब असत. त्यांस वापरावयास घोडीं, हत्यारें इत्यादि सरकारांतून मिळत. शिवाजीचा बारगिरांवर विशेष भरंवसा असे. त्यांचीं हत्यारें ढाल, तलवार व भाला हीं असत. बंदुकीही कित्येकांपाशीं असत. परमुलुखावर स्वाऱ्या करतांना शिवाजीला घोडदळाची मदत विशेष असे. घोडदळाचा प्रसिद्ध असा सरनोबत प्रथम नेताजी पालकर व नंतर प्रतापराव गुजर हा होता.

४ वर्षांपैकीं आठ महिने लष्करानें शत्रूच्या मुलुखांत 'मुलूखगिरी' करून पोट भरावें अशी शिवाजीची योजना होती. दसऱ्याच्या दिवशीं सर्व लष्करी अधिकारी राजदर्शन घेत व त्यांना कोणी कोठें मुलूखगिरीस जावयाचें याची आज्ञा होई. कूच करून जाण्यापूर्वी लष्करची पाहणी करून प्रत्येक सैनिकाजवळील चीजवस्तेची यादी तयार करीत.

मुलूखगिरीवर जातांना बरोबर बायका न नेण्याची सक्त ताकीद असे. " परमुलुखांत पोरबायका न धरावीं, मर्दाना सांपडला तरी धरावा व योग्य खंड भरतांच त्याची सुटका करावी, गाय न धरावी. बैल ओझ्यास मात्र धरावा " असे नियम होते. आठ महिन्यांनीं पावसाळ्याच्या आरंभीं लष्कर परत छावणीस येतांच स्वराज्याच्या हद्दीपाशीं झाडा घेत. पूर्वीच्या यादीपेक्षां सैनिकापाशीं जो अधिक माल असेल तो किंवा त्याची किंमत त्याला सरकारांत भरावी लागे. छावणीस आल्यावर हिशेब करून मुलुखगिरीवर मिळविलेलें सोनें, रुपें, जडजवाहीर व कापड घेऊन लष्करचे अधिकारी राजदर्शनास येत व आपली मौल्यवान मिळकत सरकारी खजिन्यांत जमा करीत. स्वारीवर असतां ज्यांनीं पराक्रम गाजविला असेल त्यांस बक्षिस मिळे, व बेकैद वागणारास शासन होई. पावसाळ्यांत निरनिराळ्या किल्ल्यांच्या आश्रयानें स्वदेशीं छावणी होई. त्या वेळीं दाणा, औषधें घोड्यांस व लोकांस घरें गवतानें शाकारून ठेवलेलीं असत. मोठ-मोठीं कुरणें राखिलीं असत. तेथें पूर्वीच्या हंगामांतील कापून रचून ठेवलेल्या गवतावर घोड्यांची गुजराण होई. ही व्यवस्था करण्यास निराळे लोक असत व त्यांस इनाम जमिनी दिलेल्या असत. ही लष्करच्या छावणीची व्यवस्था शिवाजीच्या नंतरही उत्तमरीतीनें चालू होती.

५. शिवाजीनें स्वराज्य स्थापिलें तें गोब्राह्मणांचें प्रतिपालन करण्याकरितां होय. मुसलमानांच्या राज्यांत महाराष्ट्रांतील लोकांचा छळ चालला होता, तो छळ नाहींसा करून लोकांस सुख व्हावें याकरितांच शिवाजी आणि त्याचे अनुयायी यांनीं जिवापाड मेहनत करून स्वराज्य स्थापण्याची खटपट केली. तेव्हां आपल्या सैन्यापासून प्रजेस त्रास होऊं नये याबद्दल शिवाजी फारच जपत असे, हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. एकदां शिवाजीच्या कांहीं फौजेची छावणी कोंकणांत होती. त्या फौजेच्या अधिकाऱ्यांस शिवाजीनें

एक पत्र लिहिलें; तें पुढीलप्रमाणें आहे:—

श्रीभवानीशंकर.

वैशाख शु ॥ १५, शके १५९६. ९ मे सन १६७४.

१मशरुल अनाम राजश्री २जुमलेदारानी व हवालदारानी व कारकुनानी ३दिमत पायगो मुक्काम मौजे हलवर्ण ४तो चिपळूण ५मामले दाभोळ प्रति राजेश्री शिवाजी राजे ६सु॥ ७अर्बा सबैन व अलफ. कसबे चिपळुणीं साहेबीं लष्कराची ८विले केली आणि या उपरि घाटावरि कटक जावें ऐसा मान नाहीं म्हणून एव्हां छावणीस रवाना केलें. ऐसीयास, चिपळुणीं कटकाचा मुक्काम होता याकरितां दाभोळच्या सुबेयांत पावसाळ्याकारणें पागेस ९सामा व दाणा व वरकड केला होता तो कित्येक खर्च होऊन गेला व चिपळुणाआसपास १०विलातींत लष्कराची ११तसवीस व गवताची व वरकड हरएक बाब लागली. त्याकरितां १२हाल कांहीं उरला नाहीं. ऐसें असतां वैशाखाचे दिवस, उन्हाळा, हेही पागेस अधिक बैठी पडली. परंतु जरूर जालें त्याकरितां कारकुनाकडून व गडोगडी गल्ला असेल तो देवऊनच जैसी तैसी पागेची बेगमी केली आहे. त्यास तुम्ही मनास माने ऐसा दाणा, १३रातीब, गवत मागाल. असेल तोंवरी धुंदी करून चाराला. नाहींसें जालें म्हणजे मग कांहीं पडत्या पावसांत मिळणार नाहीं. उपास पडतील, घोडी मरावयास लागतील. म्हणजे घोडीं तुम्हींच मारिलीं ऐसें होईल. व विलातीस तसवीस देऊं लागाल. ऐशास, लोक जातील, कोण्ही कुणब्याचे एथील दाणे आणील, कोण्ही भाकर, कोण्ही गवत, कोण्ही फाटे, कोण्ही भाजी, कोण्ही पाले, ऐसें करूं लागलेंत म्हणजे जीं कुणबीं

---

१ लोकप्रसिद्ध,'राजमान्य राजश्री'प्रमाणें फारसी मायना. २ जुमलेदार हवालदार व कारकून यांची प्रथमेचीं अनेकवचनें. ३पायगो=पायगा=पागा; दिमत=संबंधी;पागेकडील.४तरफ.५मामलत.६सु॥=सुहूरसन,७'अर्बा'=४, सबैन=७०, अलफ=१०००; अर्बा सबैन व अलफ=१०७४. ८व्यवस्था. ९ सामान, सामुग्री. १०विलायत=प्रदेश. ११ त्रास, उपसर्ग. १२आतां. १३ ठराविक प्रमाण.

घर धरून जीवमात्र घेऊन राहिलीं आहेत तेहि जाऊं लागतील. कित्येक उपाशीं मरायला लागतील. म्हणजे त्यांला ऐसें होईल कीं मोंगल मुलकांत आले त्याहूनहि अधिक तुम्ही ! ऐसा तळतळाट होईल ! तेव्हां रयतीची व घोड्यांची सारी बदनामी तुम्हावरी येईल. हें तुम्हीं बरें जाणून, सिपाई हो अगर १४पावखलक हो, बहुत १५यादी धरून वर्तणूक करणें. कोण्ही पागेस अगर मुलकांत गांवोगांव राहिले असाल त्यांणीं रयतेस काडीचा १६अजार द्यावयाची गरज नाहीं. आपल्या राहिल्या जागांतून बाहीर पाय घालाया गरज नाहीं. साहेबीं खजानांतून वांटणिया पदरीं घातलिया आहेती. ज्याला जें पाहिजें, दाणा हो अगर गुरे ढोरें वागवीत असाल त्यांस गवत हो, अगर फाटें, भाजीपाले व वरकड विकावया येईल तें १७रास घ्यावें, बाजारास जावें, रास विकत आणावें. कोण्हावरी जुलूम अगर १८ज्याजती अगर कोण्हासी कलागती करावयाची गरज नाहीं. व पागेस सामा केला आहे तो पावसाळा पुरला पाहिजे. ऐसे तजवीजीनें दाणा रातीब कारकून देत जातील तेणेंप्रमाणेंच घेत जाणें; कीं उपास न पडतां रोजबरोज खायला सांपडे आणि होत होत घोडीं तवाना होत ऐसें करणें. नसतीच कारकुनासी घसपस कराया, अगर अमकेंच द्या तमकेंच द्या ऐसें म्हणाया, धुंदी करून १९खासदारकोठींत, कोठारांत शिरून लुटाया गरज नाहीं. व हल्लीं उन्हाळ्याला आहे तइसें खलक पागेचे आहेत, २०खण धरून राहिले असतील व राहातील, कोण्ही आगट्या करतील कोण्ही भलतेच जागा चुली २१रंधनाला करितील, कोण्ही तंबाकूला आगी घेतील, गवत पडिलें साहे ऐसे अगर वारें २२लागलें आहे ऐसें मनास न आणिता. म्हणजे २३अविस्वाच एकादा दगा होईल. एका खणास आगी लागली म्हणजे सारे खण जळोन जातील. गवताच्या २४लहळ्यास कोणीकडून तरी विस्तो जाऊन पडला म्हणजे सारें गवत व लहळ्या

---

१४ पायदळांतील सैनिक. १५ काळजीपूर्वक. १६ त्रास. १७ घाऊक. १८ बळजबरी. १९ खासकोठींत. २० झोपडी, घर. २१ स्वयंपाकाला. २२ सुरू झालें, सुटलें. २३ अकस्मात. २४ पेंढ्या ?

आहेत तितक्या एकएक जाळों जातील. तेव्हां मग कांहीं कुर्णाबयांच्या गर्दना मारल्या अगर कारकुनास ताकीद करावी तैसी केली तऱ्ही कांहीं खण कराया एक लाकूड मिळणार नाहीं, एक खण होणार नाहीं; हें तों अवघियाला कळतें. याकारणें, बरी ताकीद करून, खासे खासे असाल ते हमेशा फिरत जाऊन, रंधनें करिता, आगट्या जाळिता, अगर रात्रीस दिवा घरांत असेल, अविस्त्राच उंदीर वात नेईल, ते गोष्टी न हो. खण, गवत वांचेल तें करणें. म्हणजे पावसाळा घोडीं वाचलीं. नाहीं तर मग, घोडीं बांधावीं नलगेत, खायास घालावें नलगे, पागाच बुडाली. तुम्ही २५निसूर जालेत !! ऐसें होईल. याकारणें तपशिलें तुम्हांस लिहिलें असे. जितके खासे खासे जुमलेदार, हवालदार, कारकून आहां तितके हा २६रोखा तपशिलें ऐकणें, आणि हुशार राहणें. वरचेवरी रोजाचारोज, खबर घेऊन, ताकीद करून, येणेप्रमाणें वर्तणूक करितां ज्यापासून अंतर पडेल, ज्याचा गुन्हा होईल, बदनामी ज्यावर येईल त्यास—मराठियाची तो इज्जत वाचणार नाहीं. मग रोजगार कैसा, २७खळक २८समजों २९ज्यास्ती केल्यावेगळें सोडणार नाहीं. हें बरें म्हणून वर्तणूक करणें. ऽ छ. १२ +सफर. *

हा हुकूम करितांना शिवाजीला आपल्या प्रजेला त्रास होईल कीं काय म्हणून किती चिंता पडली असेल बरें ! शिवाजीच्या वेळेस सारख्या लढाया चालल्या होत्या. पण अशा वेळींही आपल्या सैन्यापासून रयतेस मुळींच त्रास पोचूं नये इकडे लक्ष देणारा शिवाजी किती प्रजावत्सल असेल ! आपल्या प्रजेवर त्याचें कितीतरी प्रेम असेल बरें ! आम्ही जे त्याला शंकराचा अवतार समजतों तें यथार्थ नव्हे काय ?

६. शिवाजीची सैन्यव्यवस्था सांगतांना त्यानें केलेल्या किल्ल्यांचा

---

२५ निष्काळजी. २६ हुकूम. २७ क्षुद्र, नीच. २८ समजून २९ कडक शिक्षा केल्यावांचून. ऽ चंद्र बारावा=शु॥ द्वादशी. + सफर महिना.
* म. इ. सा. खंड ८, लेखांक २८.

बंदोबस्त अवश्य माहीत करून दिला पाहिजे. शिवाजीनें तोरणा किल्ला घेतला. तेव्हां त्याच्या स्वराज्यस्थापनेस सुरुवात झाली हें मागें आलेंच आहे. तोरणा किल्ला घेतल्यावरही किल्ले घेण्याचा तडाका कांहीं वर्षें चालला होता. शिवाजीनें राज्यस्थापनेचा उद्योग महाराष्ट्राच्या पश्चिमेस सह्याद्रीला लागून असणारा प्रदेश, म्हणजे हल्लींच्या पुणें व सातारा या जिल्ह्यांचे पश्चिमभाग, त्यांत केला. हा मुलूख डोंगराळ आहे व तो ताब्यांत ठेवावयाचा म्हणजे किल्लेच ताब्यांत आणणें भाग होतें. मोंगल आणि विजापूरकर यांनीं या किल्ल्यांचा नीट बंदोबस्त केला नव्हता व त्यांची सत्ता ह्या भागांत पूर्णपणें बसली नव्हती. किल्ल्यांच महत्त्व शिवाजीच्या लक्षांत आल्याशिवाय राहिलें नाहीं. त्यानें जुने किल्ले घेतले, पडले होते त्यांची डागडुजी केली व इतकेंच करून न थांबतां त्यानें पुष्कळ नवे किल्ले बांधिले. किल्ले-कोट हे माझ्या राज्याचे जीवप्राण आहेत असें तो नेहमीं म्हणे; आणखी आपल्या किल्लेकोटांचा नीट बंदोबस्त असल्यावर मोठ्या बलाढ्य शत्रूचाही हिशेब धरावयास नको अशी त्याची खात्री होती. किल्यावर धान्य व दारूगोळा नेहमीं सांठविलेला असे. राज्यांत शत्रू शिरला असतां त्याच्याशीं झुंजण्यास किल्ल्यांचा उपयोग फार होई; शिवाय शत्रूच्या मुलुखांत स्वारी करावयाची तेव्हां जवळच्या किल्ल्यांत स्वारीवर काय मिळेल तें आणून टाकलें म्हणजे शत्रूचा कांहीं इलाज चालत नसे. प्रत्येक किल्ल्यावरचा मुख्य अधिकारी एक मराठा हवालदार असे. त्याच्या मदतीस एक ब्राह्मण सबनीस व प्रभु कारखाननीस असत. सबनीस लिहिण्याचें काम करी, व कारखाननीस धान्य, दारूगोळा, शिबंदीचे पगार इत्यादि गोष्टींची व्यवस्था पाही.

७. आपल्या राज्यांतील वसूल करण्याची शिवाजीनें उत्तम व्यवस्था लाविली होती. पूर्वी मुसलमानांच्या राज्यांत जमिनीवरचा वसूल

करण्याचें काम देशमुख, देशपांडे या वतनदार लोकांकडे सोंपविलेलें असे. शिवाय वसुलाबद्दल धान्यच घेण्याची त्या वेळीं वहिवाट होती. किती वसूल ध्यावयाचा याविषयीं देशमुख, देशपांडे यांशीं ठराव झाला असल्यामुळें सरकारचा प्रजेशीं मुळींच संबंध येत नसे. त्यामुळें देशमुख, देशपांड्यांचें आपआपल्या प्रांतांत फारच वजन असे व प्रसंग पडल्यास सरकारावर उलटण्यासही ते कमी करीत नसत. शिवाजीनें ही स्थिति ओळखली व देशमुख देशपांडयांचें प्रस्थ अजिबात मोडून टाकण्याकरितां त्यानें कमाविसदार, महालकरी, सुभेदार वगैरे पगारी अंमलदार नेमिले. जुने गांवोगांवचे तट पाडून टाकिले व नवे कोणास करूं दिले नाहींत. जमिनीची मोजणी करून सरकारसाऱ्याबद्दल शेतकऱ्यापासून कबुलायत लिहून घ्यावयाची व मग जमीन त्याच्या हवालीं करावयाची असा प्रघात शिवाजीनें पाडिला. सरकारी सारा ऐनजिनसी असो वा नक्त रोख पैसा असो, जमिनीच्या उत्पन्नाच्या दोनपंचमांशापेक्षां केव्हांही तो जास्त असूं नये, असा ठराव केला. पाऊस नीट न पडल्यास लोकांस सरकारांतून मदत मिळे व साऱ्याचा वसूलही हप्त्याहप्त्यानें घेत. रयतेवर जमिनीच्या साऱ्याशिवाय दुसरा कोणताही कर नव्हता.

८. वसुलाचें काम करण्याकरितां प्रत्येक खेड्यांत पाटील कुलकर्णी नेमिले होते. बरींच खेडीं मिळून तालुका होई; त्यावर तालुकदार म्हणून ब्राह्मण किंवा प्रभु अम्मलदार असे. त्याच्या जोडीस हवालदार म्हणून एक मराठा अम्मलदार असे. यांच्यावरचा अधिकारी म्हटला म्हणजे सुभेदार हा होय. हे सर्व अधिकारी पगारदार असून त्यांस महिनाअखेर किंवा सालअखेर उक्ता पगार मिळे. सुभेदाराचा वार्षिक पगार चारशें होन म्हणजे दरमहा शंभर रुपये असे. शिवाजीच्या राज्याचे एकंदर बारा सुभे होते; व प्रत्येक सुभ्याचें उत्पन्न सुमारें चार लाख येई. म्हणजे एकंदर राज्याचें

उत्पन्न सुमारें अर्ध कोटी होतें. शिवाजीच्या अष्ट प्रधानांपैकीं पंत सचिव व पंत अमात्य या दोघांची राज्यांतील सर्व वसूल-व्यवस्थेवर देखरेख असे.

९. आपल्या राज्यांतील न्यायव्यवस्थाही शिवाजीनें केली होती. त्यानें आपल्या अष्ट प्रधानांत न्यायाधिशाचें काम करणारा एक प्रधान नेमिला होता. गांवांतील तंट्यांचा निकाल पूर्वापार चालीप्रमाणें पंच नेमून करीत. फौजदारी खटल्यांची चौकशी करण्याचा अधिकार जमीनमहसुलाकरितां नेमिलेल्या अम्मलदारांसच दिलेला होता. त्यांपुढें फौजदारी खटले चालून हिंदुधर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें अपराध्यांस शिक्षा होई.

१०. विद्वानांस दक्षिणा देऊन त्यांची योग्य संभावना करण्याचा शिवाजीनें प्रघात पाडिला. त्यामुळें लोकांत विद्वान् होण्याची ईर्षा उत्पन्न झाली, व महाराष्ट्रांतच केवळ नव्हे तर हिंदुस्थानांत चोहोंकडे विद्येचा उत्कर्ष होऊं लागला. मुसलमानांच्या राज्यांत हिंदुलोकांच्या प्राचीन वेद व शास्त्रें या विद्या मृत्युपंथास लागल्या होत्या. त्यांस शिवाजीच्या आश्रयामुळें पुनर्जन्म झाल्यासारखें होऊन फिरून सर्व हिंदुस्थानभर त्यांचा जयघोष होऊं लागला. विद्वानांप्रमाणें गवय्ये, बजवय्ये, कवि इत्यादि गुणी लोकांचाही शिवाजी परामर्ष घेत असे. त्याच्या दरबारीं भूषणकवि म्हणून एक नामांकित कवि होता. त्यानें 'शिवराजभूषणकाव्य' म्हणून एक हिंदी भाषेंत काव्य लिहिलें आहे. शिवाजीनें आपल्या राज्यांतील देवालयांसही चांगलाच आश्रय दिला. जमिनी शिवाजीनें कोणासही तोडून दिल्या नाहींत, हें मागें सांगितलेंच आहे. तो कामाबद्दल कोणासही रोख पैसे देत असे. पण या नियमास देवालयें मात्र अपवाद होतीं ! त्यांना शिवाजीनें जमिनींचीं उत्पन्नें तोडून दिलीं होतीं ! मुसलमानांच्या मशिदी व पीर यांचींही इनामें व उत्पन्नें त्यानें उदारपणानें चालू ठेविलीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

१६ मराठ्यांच्या आरमाराचा उदय.

१ महाराष्ट्रांत सह्याद्रीच्या पश्चिमेस अरुंद कोंकणपट्टी दक्षिणोत्तर पसरलेली असून तिच्या किनाऱ्यावर अरबी समुद्राच्या लाटा एकसारख्या आपटत आहेत. कोंकणांतून निरनिराळ्या नद्या वहात जाऊन समुद्रास मिळतात. त्यांच्या मुखापाशीं खाड्या झाल्या आहेत व त्यांच्या तोंडांशीं उत्तम बंदरें वसलीं आहेत. भडोच, चौल, दाभोळ इत्यादि बंदरांतून प्राचीन काळापासून अरबस्तान, इराण इत्यादि परदेशांशीं महाराष्ट्राचें दळणवळण सुरू असून कोणाही महाराष्ट्रीय राज्यकर्त्यानें ही भडोचपासून गोव्यापर्यंतची कोंकणपट्टी आपल्या ताब्यांत ठेविल्याशिवाय त्याचा महाराष्ट्रावरील अंमल सुरक्षित होणें शक्य नाहीं. स्वराज्यस्थापनेनंतर ही गोष्ट शिवाजीच्या लवकरच ध्यानांत आली. प्रथम त्यानें मोठ्या धैर्यानें व धाडसानें बहुतेक सर्व कोंकणपट्टी आपल्या ताब्यांत आणिली व पुढें तिच्या संरक्षणाची तजवीज करण्यांत अलौकिक बुद्धिसामर्थ्य व अप्रतिम दूरदर्शित्व प्रकट केलें. या कार्यासाठीं त्याला आरमाराची स्थापना करावी लागली. तेव्हां या आरमाराच्या उदयाच्या वृत्तांताचें या प्रकरणांत वर्णन करूं.

२. शिवाजीला समुद्रावर जो मोठा झगडा करावा लागला तो जांजिऱ्यांतील सिद्दी सरदारांशीं होय. मुंबईच्या दक्षिणेस सुमारें पंचेचाळीस मैलांवर राजपुरीची खाडी आहे. त्या खाडीच्या उत्तर तीरावर दंडा व राजपुरी हीं दोन्ही बंदरें आहेत. त्यांपैकीं राजपुरी अगदीं खाडीच्या तोंडाशीं असून दंडा तिच्या आग्नेयीस सुमारें दोन मैलांवर आहे. हीं दोन्ही बंदरें मिळून त्या ठिकाणास दंडाराजपुरी असें जोडनांव पडलें आहे. त्या खाडीच्या समोर पश्चिमेस एक समुद्रवलयांकित लहानसा खडक असून

त्यावर एक मजबूत किल्ला बांधिला आहे. तोच प्रसिद्ध जंजिरा* होय. तो मुंबईहून आगबोटीत बसून दक्षिण कोंकणांत जातांना लागतो. जंजिरा सिद्दी लोकांच्या ताब्यांत असून त्याच्यासमोरील कोंकणपट्टीच्या बऱ्याच भागावर त्यांचाच अंमल चाले. सिद्दी मूळचे आफ्रिकेंतील अबिसीनिया ऊर्फ हब्साण या प्रांतांतले होत; त्यावरून त्यांस हब्शी असेंही म्हणतात. सय्यद शब्दाचा अपभ्रंश होऊन त्यांना सिद्दी हें नांव पडलें. हे लोक मोठे शूर व उत्तम दर्यावर्दी असत. चौदाव्या शतकापासून त्यांचा हिंदुस्थानशीं व्यापार सुरू झाला. दक्षिणेंत मुसलमानी राज्यें झालीं; तेव्हां त्या राज्यांतून या लोकांची लवकरच प्रसिद्धि झाली. प्रथम कोंकणपट्टी अहमदनगरच्या निजामशहांच्या ताब्यांत असल्यामुळें सिद्दी सरदार त्या दरबारचे अंकित असत. पुढें १६३६ त निजामशाही नष्ट होऊन कोंकणपट्टी विजापूरकराकडे गेली; तेव्हां विजापूरदरबारनें जंजिऱ्याच्या सिद्दी सरदारास कोंकणचा सुभेदार नेमिलें व त्यास वजीर असा किताब दिला. या वेळीं सिद्दीनें समुद्रावरील व्यापाराचें संरक्षण करावें व मक्केला जाणाऱ्या यात्रेकरूंचा प्रवास निर्विघ्नपणें पार पडेल अशी व्यवस्था ठेवावी या दोन गोष्टींची विजापूरकरांनीं सिद्दीपासून कबुली घेतली. एव्हांपासून जंजिऱ्यांतील सिद्दी सरदाराचा नागोटण्यापासून बाणकोटपर्यंतच्या कोंकणपट्टीवर अंमल चालू झाला. उत्तरेकडे नागोटण्यापासून कल्याणपर्यंतची कोंकणपट्टी विजापूरकरांच्याच ताब्यांत असून तिचा निराळा सुभा केला होता व त्याचें मुख्य ठिकाण कल्याण होतें.

३. शिवाजीनें शके १५७०त कोंकणांत उतरून तळें, घोसाळें इत्यादि किल्ले हस्तगत केले; तेव्हांपासून सिद्दी लोकांशीं

* जंजिरा या शब्दाचे दोन अर्थ होतात; (१) दंडाराजपुरीच्या समोरील किल्ल्याचें नांव, (२) समुद्रांतील किंवा समुद्रकिनाऱ्यावरील कोणताही किल्ला.

मराठ्यांचा संबंध येऊं लागला. सिद्दी हे हिंदुधर्माचे द्वेष्टे असून कोंकणांतील हिंदूंचा छळ करीत; तेव्हां हिंदूंची या छळापासून कायमची मुक्तता व्हावी या उद्देशानें शिवाजीनें जंजिऱ्याच्या सिद्दीची कोंकणांतून पुरती हकालपट्टी करण्याचा बेत केला. त्यानें प्रत्येक अनुकूल संधीचा उपयोग करून नागोठणें ते बाणकोट या भागांतील किल्ले सर केले व त्या भागांतील बहुतेक सर्व कोंकणपट्टी आपल्या ताब्यांत आणिली. शेवटीं दंडा व राजपुरी या दोन्ही ठिकाणांस सिद्दीनें बळकट तटबंदी केली होती, तीं घ्यावयाचीं राहिलीं. या कामगिरीवर प्रथम शिवाजीनें पेशवा श्यामराजपंत रांझेकर यास पाठविलें; पण त्यास अपयश येऊन तो तसाच माघारा आला (शके १५८१). पुढील वर्षी राघो बल्लाळ अत्रे यानें दंडाराजपुरी घेण्याची कामगिरी आपल्या अंगावर घेतली व मोठी शर्थ करून तीं दोन्ही ठिकाणें त्यानें काबीज केलीं (शके १५८३). आतां सिद्दीच्या ताब्यांत किनाऱ्यावरील कांहींच मुलूख राहिला नाहीं. तेव्हां मराठ्यांनीं जंजिरा घेण्याचा बेत केला. परंतु तो किल्ला समुद्रांत दूर असल्यामुळें किनाऱ्यावरून त्याच्यावर मारा चालेना. मात्र समुद्रकिनारा मराठ्यांच्या हातीं असल्यामुळें धान्य व इतर सामान यांचा पुरवठा सिद्दीस होईना. तथापि त्याच्यापाशीं 'पाणियांतील जहाजें होतीं. तेणेंकरून वरकड मुलूख मारून सामान आणून खाऊं लागले.' अर्थातच शिवाजीस आरमार तयार करावें लागलें. " लवकरच राजियांनीं जहाजें पाणियांतील सजिलीं. गुराबा व तरांडीं, तारवें व गलबतें, शिबाडे, पगार अशीं नाना जातींचीं जहाजें केलीं* " लवकरच दक्षिणकोंकणही सर करून वाडीचे सांवत आदिकरून हिंदु संस्थानिकांस आपल्या अंकित करून घेतलें; सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग इत्यादि जंजिरे होते ते दुरुस्त केले व कित्येक नवे किल्ले

* सभासद-बखर पृष्ठ ६८.

बांधिले. त्यांत मालवणचा सिंधुदुर्ग हा प्रमुख होय. हा किल्ला बांधण्याचें काम तीन वर्षें चाललें होतें. १५८६च्या मार्गशीर्ष शु॥ २स शिवाजीच्या हस्तें या किल्ल्याचा प्रवेश समारंभ झाला. सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, पद्मदुर्ग, अंजनवेल, रत्नागिरी इत्यादि ठिकाणीं जहाजें बांधण्याचीं कामें चालत. कोंकणपट्टीच्या समुद्रकिनाऱ्यावर कोळी व भंडारी या जातींचे लोक मोठे काटक व दर्यावर संचार करण्यांत अत्यंत पटाईत असत. त्यांच्यांतून शिवाजीनें आपल्या आरमारावरील लढाऊ लोकांची भरती केली. आरंभीं शिवाजीच्या आरमारांत लढाऊ जहाजें तीन होतीं, तीं त्याच्या कारकिर्दीच्या अखेर साठाहून अधिक झालीं. आरमारांत एकंदर पांच हजारपर्यंत लोक होते. दर्यासारंग व मायनाईक भंडारी हे दोघे मराठ्यांच्या आरमाराचे मुख्य कामगार होते. दौलतखान, मिसरी इत्यादि दुसऱ्याही आरमारावरील अधिकाऱ्यांचीं नांवें मधून मधून आढळतात. सिधोजी गुजर व कान्होजी आंगरे हे दोघे शिवाजीच्या आरमारांत नोकरी करून पुढें मोठे दर्यावर्दी सरदार म्हणून प्रसिद्धीस आले. शिवाजीच्या कारकिर्दीत मालवणचा सिंधुदुर्ग हेंच आरमाराचें मुख्य ठिकाण होतें. भंडारी व कोळी नाविकांची शिवाजीवर मोठी भक्ति जडली. पुढें त्यांनीं सिंधुदुर्गामध्यें एक देऊळ बांधून त्यांत शिवाजीच्या मूर्तीची स्थापना केली, व अजूनही दरसाल त्या देवळांत मोठा उत्सव होत असतो.

४ मराठ्यांचें आरमार सिद्ध झालें तेव्हां गोव्याच्या पोर्तुगीज लोकांवर वचक बसून त्यांनीं शिवाजीशीं तह केला. दारूगोळा व तोफा पुरविण्याचें कबूल करून ते दरसाल शिवाजीस नजराणाही पाठवूं लागले. लवकरच मराठ्यांच्या आरमाराचा संचार सबंध कोंकणपट्टीवर सुरू झाला. शत्रूच्या जहाजांतून व बंदरांतून धान्याची व द्रव्याची मोठी किफायत होऊं लागली. व्यापारी जहाजांतून

समुद्रकिनाऱ्यावरील व्यापार जोरानें सुरू झाला. इतकेंच नव्हे तर इराण व अरबस्तान येथील बंदरांशीं व्यापार करण्यासाठीं मराठी जहाजें जाऊं येऊं लागलीं. कोंकणपट्टीवर सिद्दीखेरीज डच इंग्रज आदिकरून युरोपियनांच्या वखारी होत्या व त्यांतून या लोकांचा व्यापार चालू असे; या सर्व लोकांवर शिवाजीचा वचक बसला. शके १५८६ च्या माघांत ८५ लहान जहाजें व तीन मोठीं जहाजें असें आरमार घेऊन चार हजार लोकांसह मालवण येथून शिवाजी निघाला व गोव्याच्या दक्षिणेस एकशेंतीस मैलांवर बसरूर या बिदनूर संस्थानांतील श्रीमंत बंदरावर अचानक उतरला. तेथें खूप खंडणी वसूल करून तो परत फिरला. जवळच गोकर्ण हें क्षेत्र आहे. तेथें उतरून महाशिवरात्रीस त्या क्षेत्रीं स्नान करून श्रीमहाबळेश्वराचें त्यानें दर्शन घेतलें. नंतर कारवार, अंकोला इत्यादि त्या प्रांतांतील बंदरांतून खंडणी घेऊन तो परत आला. या वेळीं कारवारच्या इंग्रज व्यापाऱ्यांनीं ११२० रुपये खंडणी शिवाजीस भरली. या स्वारींत शिवाजीस समुद्र लागला; त्यामुळें त्यानें स्वतः पुनः आरमारी स्वारी कधीं केली नाहीं. पुढें दहा वर्षांनीं शिवाजीनें गोव्याजवळचा फोंडे हा बळकट किल्ला विजापूरकरांपासून घेतला व गोव्याजवळचा कानडा प्रांत विजापूरकरांच्या ताब्यांत होता तोही मराठ्यांनीं त्याच सालीं हस्तगत करून घेतला (शके १५९७, सन १६७५). कारवार, शिवेश्वर, अंकोला इत्यादि ठाणीं सर होऊन 'उत्तरकानडा' प्रांतांत मराठी सत्ता सुरू झाली, व कारवारकडील गंगावती नदी हीच मराठी राज्याची दक्षिण सरहद्द बनली. त्या प्रांतांतील बिदनूर व सोंधे हीं दोन्ही संस्थानें मराठ्यांचीं अंकित बनलीं व दरसाल खंडणी देऊं लागलीं. मराठी आरमार जोरदार असल्यानें हा प्रांत ताब्यांत ठेवणें सुलभ होतें. पुढें शिवाजीच्या मृत्यूनंतर या प्रांताकडे मराठ्यांचें दुर्लक्ष झालें; तथापि या प्रांतांत मराठी

संस्कृतीची छाप अजूनही दिसून येते.

५. आरमार तयार करण्यांत शिवाजीचा मुख्य हेतु जंजिरा काबीज करण्याचा होता; परंतु तो मात्र केव्हांच साध्य झाला नाहीं. आरमार तयार झाल्यावर शिवाजीनें दरसाल जंजिऱ्यास वेढा घालून तो सर करण्यासाठीं अतिशय खटपट चालविली. शेवटीं सन १६७०त स्वतः शिवाजीनें जंजिऱ्याचें काम हातीं घेतलें. जंजिऱ्यास मराठी आरमारानें असा कांहीं पुरता वेढा दिला कीं, आंतील सिद्दी लोकांची उपासमार होऊं लागली व ते अगदीं टेकीस आले. शेवटीं मुख्य सरदार फत्तेखान किल्ला स्वाधीन करण्यास तयार झाला. परंतु त्याचे तीन दुय्यम सरदार सिद्दी संबूळ, सिद्दी कासीम व सिद्दी खैरियत हे हिंदुधर्माचे पक्के द्वेष्टे होते, त्यांना फत्तेखानाचा बेत मुळींच आवडला नाहीं. त्यांनीं फत्तेखानास कैद केलें. व सुरतेच्या मोंगल सुभेदाराशीं बोलणें लावून मदत आणविली; तेव्हां मराठ्यांना वेढा उठविणें भाग पडलें. यापुढें जंजिऱ्याचे सिद्दी हे मोंगलांचे ताबेदार झाले. सिद्दी संबूळ यास बादशहा औरंगजेब यानें आपल्या आरमारावरील मुख्य नेमिलें व त्यास याकुतखान हा किताब दिला. एव्हांपासून मोंगल आरमारावर सिद्दी सरदारच मुख्य असत व त्यांस याकुतखान हा किताब चालूं लागला. याच सालीं होळीच्या सणांत मराठे दंग असतां जमिनीवरून व समुद्रांतून हल्ला करून सिद्दींनीं दंडाराजपुरी परत घेतली. यानंतरही मराठ्यांनीं जंजिऱ्यास पुनः पुनः वेढा घातला. परंतु सुरतेच्या मोंगलांची सिद्दीस मदत मिळाल्यामुळें जंजिरा मराठ्यांच्या हातीं आला नाहीं. जंजिरा घ्यावा ही शिवाजीची जन्मभर महत्त्वाकांक्षा होती; पण ती सफल होण्याचा योग आला नाहीं.

६. मोंगलांचा आश्रय मिळून सिद्दी हे बादशाही आरमाराचे मुख्य झाल्यावर अधिक धाडसाचीं कृत्यें करूं लागले. ते मुंबई

बंदरांत पावसाळ्यांत आपलें आरमार उतरवीत व मराठ्यांच्या बंदरांवर हल्ला करून लूट मारीत, लोकांस धरून नेत व केव्हां केव्हां कत्तलीही करीत. या अनन्वित प्रकारांमुळें शिवाजीस सिद्दीची अत्यंत चीड आली. मुंबई बंदर इंग्रजांच्या ताब्यांत होतें. वास्तविकपणें त्यांनीं सिद्दीस आपल्या बंदरांत उतरूं द्यावयाचें नव्हतें; पण सुरत येथें त्यांची वखार असल्यामुळें मोंगलांस विरोध करण्यास इंग्रज धजत ना व त्यांनीं दुटप्पी वर्तन चालविलें. शेवटीं शिवाजीनें सिद्दीचा हा जुलूम थांबविण्यासाठीं एक चोख युक्ति काढली. मुंबई बंदरांत शिरतांना जवळच खांदेरी व उंदेरी अशीं दोन बेटें आहेत. त्यांजकडे तोंपर्यंत कोणाचें लक्ष गेलें नव्हतें. शिवाजीनें तीं बेटें घेऊन त्यांजवर तटबंदी करण्याचा बेत केला. शके १६००च्या भाद्रपदांत खांदेरी बेट मराठ्यांनीं आपल्या ताब्यांत घेतलें व त्यावर तटबंदी करण्यास सुरुवात केली. मराठी आरमार दौलतखानाच्या हाताखालीं नागोठण्याच्या खाडींत राहून बेटावर मालमसाला पुरवूं लागलें. ही गोष्ट कळतांच इंग्रज व सिद्दी या दोघांसही मोठी काळजी उत्पन्न झाली. व त्यांनीं मराठ्यांचा तटबंदी करण्याचा बेत हाणून पाडण्याचा निश्चय केला. तेव्हां मराठी आरमारास इंग्रजांच्या आरमाराशीं एकदोनदां झगडावें लागलें. इतक्यांत शिवाजीनें कल्याणकडे मोठी फौज तयार करून मुंबईवर झडप घालण्याची तयारी केली. त्याबरोबर इंग्रजांनीं शिवाजीशीं तह केला व खांदेरीच्या तटबंदीस विरोध करण्याचें सोडून दिलें. सिद्दीनें जवळच्या उंदेरी बेटावर तोफा चढविल्या; तेव्हां दौलतखानानें त्याच्याशीं युद्ध केलें. त्यांत खुद्द दौलतखान जखमी झाला व मराठी आरमाराचें बरेंच नुकसान झालें. त्यामुळें मुंबई बंदराच्या तोंडावरील उंदेरी सिद्दीच्या ताब्यांत राहिली. मात्र खांदेरीवरील तटबंदी या वेळीं पुरी झाली असून तें बेट

मराठ्यांच्या ताब्यांत राहिलें. परंतु जवळचें उंदेरी बेट सिद्दीच्या ताब्यांत गेल्यामुळें मुंबईकर इंग्रजांवर वचक बसविण्याचा शिवाजीचा हेतु पूर्णपणें सफळ झाला नाहीं. याच सुमारास मुंबईनजीकच्या मुलुखाचा सिद्दी व पोर्तुगीज यांजपासुन बचाव करण्यासाठीं अलीबागेजवळ नऊघर येथे समुद्रकिनाऱ्याजवळ खडक होता, तेथें शिवाजीनें किल्ला बांधून जंजिरे कुलाबा असें त्याचें नांव ठेविलें (शके १६०२). हाच कुलाबा पुढें मराठी आरमाराचें एक मुख्य ठिकाण झालें.

७. अशा रीतीनें आरमार सजविण्यासाठीं व कोंकणपट्टी सुरक्षित करण्यासाठीं शिवाजीनें जिवापाड मेहनत केली व किनाऱ्यावरील सर्व प्रतिस्पर्ध्यांवर चांगली जरब बसविली. आपलें आरमार नेहमीं सज्ज राहावें व त्याच्या साधनसामुग्रींत केव्हांही उणें पडूं नये यासाठीं शिवाजी अत्यंत काळजी ठेवी. एकदां मामले प्रभावळीचा सुभेदार जिवाजी विनायक यानें आरमारास ऐवज व गल्ला नेमल्याप्रमाणें पावता केला नाहीं. ही गोष्ट शिवाजीच्या कानावर गेली, तेव्हां त्याला अत्यंत राग आला व त्यानें सुभेदारास एक खरमरीत पत्र लिहिलें. त्या पत्रावरून शिवाजीची आरमाराबद्दल दक्षता व सुभेदारावरील जरब चांगली व्यक्त होते. तें पत्र येणेंप्रमाणें:—

"राजश्री जिवाजी विनायक सुभेदार व कारकून सुभे मामले प्रभावळी, प्रती राजश्री शिवाजीराजे दंडवत. दौलतखान व दरिया सारंग यांसी ऐवज व गल्ला राजश्री मोरोपंत पेशवे यांणीं बराता सुभे भजबुरावरी दिधल्या. त्यास तुम्हीं कांहीं पाठविले नाहीं म्हणोन कळोन आलें. त्यावरून अजब वाटलें कीं, ऐसे नादान थोडे असतील! तुम्हांस समजलें कीं याला ऐवज कोठें तरी ऐवज खजाना रसद पाठविलिया मजरा होईल म्हणत असाल, तरी पद्मदुर्ग वसवून राजपुरीच्या (जंजिरा) उरावरी दुसरी राजपुरी केली आहे. त्यांची मदत व्हावी, पाणी फाटी आदिकरून सामान पावावें, या कामास आरमार वेगीनें पावावें, तें

नाहीं. पद्मदुर्ग हबशी फौजा चौफेर जेर करीत असतील; आणि तुम्ही ऐवज न पाववून, आरमार खोळंबून पाडाल ! एवढी हरामखोरी तुम्ही कराल; आणि रसद पाठवून मजरा करूं म्हणाल, त्याकरी साहेब रिझतील कीं काय ? हे गोष्ट घडायाची तऱ्ही होय न कळे कीं हबशियांनीं कांहीं देऊन आपले चाकर तुम्हांला केले असतील ! त्याकरितां ऐसी बुद्धि केली असेल ! तरी असल्या चाकरास ठीकठीक केले पाहिजेत ! ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करूं पाहतो ? याउपरी तऱ्ही त्यांला ऐवज गल्ला राजश्री मोरोपंतांनीं देविला असेल तो देवितील. तो खजाना रसद पाविलियाहून अधिक जाणून तेणेंप्रमाणें आदा करणें कीं ते तुमची फिर्याद न करीत व त्यांचे पोटास पावोन आरमार घेऊन पद्मदुर्गाचे मदतीस राहात तें करणें. याउपरी बोभाट आलियाउपरी तुमचा मुलाहिजा करणार नाहीं. गनिमाचे चाकर, गनीम जालेस, ऐसें जाणून बरा नतीजा तुम्हांस पावेल. ताकीद असे. रवाना छ. २ *जिल्काद "

८. आरमारास मालाचा पुरवठा करितांना प्रजेस त्रास पोंचूं नये यासाठीं शिवाजी अत्यंत झटत असे. "आरमारास तक्ते, सोंट, डोलाच्या काठ्या आदिकरून थोर लांकडें असावीं लागतात. आपले राज्यांत अरण्यांत सागवानादि वृक्ष आहेत, त्यांचें जें अनुकूल पडेल ते हुजूरचे परवानगीनें तोडून न्यावें. याविरहित जें लागेल तें परमुलखाहून खरेदी करून आणवीत जावें. स्वराज्यांतील आंबे, फणस आदिकरून हेही लांकडें आरमाराच्या प्रयोजनाचीं; परंतु त्यांस हात लावूं देऊं नये. काय म्हणोन कीं, हीं झाडें वर्षां दोन वर्षांनीं होतात असें नाहीं. रयतांनीं हीं झाडें लावून लेकरांसारखीं बहुत काळ जतन करून वाढविलीं. तीं झाडें तोडिल्यावर त्यांचे दुःखास पारावार काय ? एकास दुःख देऊन जें कार्य करीन म्हणेल ते कार्य करणारास हित स्वल्प काळचें बुडोन नाहींसेंच होतें, किंबहुना

* मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड ८, लेखांक ३१; (माघ शु॥ ३ शके १५९६, १८।१।१६७५.)

धनियाचे पदरीं प्रजापीडनाचा दोष पडतो. त्या वृक्षांच्या अभावें हानिही होत्ये. याकरितां हे गोष्टी सर्वथैव होऊं न द्यावी. कदाचित् एखादें जें झाड बहुत जीर्ण होऊन कामांतून गेलें असलें तरी त्याचे धन्यास राजी करून घेऊन द्रव्य देऊन त्याचे संतोषें तोडून न्यावें. बलात्कार सर्वथैव न *करावा." सहा उतारा रामचंद्र निळकंठ बहुतकर यानें पोक्तपणीं सन १७१६त लिहिलेल्या मराठेशाहींतील राजनीति या ग्रंथांतील आहे. रामचंद्रपंत हा शिवाजीच्या तालमींत तयार झालेला हुशार व स्वामिनिष्ठ मुत्सद्दी होय. तेव्हां त्याच्या ग्रंथांतील धोरण हें शिवाजीचेंच होय हें उघड आहे.

---

१७ गड आला पण सिंह गेला !

(माघ वद्य ९ शके १५९१; तारीख ४ फेब्रुवारी सन १६७०).

औरंजेबानें आपला वडील मुलगा मुअज्जम याच्या वतीनें शिवाजीशीं तह केला; व प्रतापराव गुजराच्या हाताखालीं आपल्या फौजेची छावणी शिवाजीनें औरंगाबादेस मोंगलांच्या लष्करांत ठेवून दिली, असें पंधराव्या भागांत सांगितलें; पण हा तह फार वेळ टिकला नाहीं. कारण औरंगजेब मोठा संशयी स्वभावाचा होता. आपला मुलगा शिवाजीशीं मैत्री करून आपल्याविरुद्ध बंड तर करणार नाहींना? असा औरंजेबाच्या मनांत विचार आला. मग काय तो थोडाच थांबणार ! त्यानें लागलीच आपल्या मुलास एक हुकूम खरडला. त्यांत शिवाजी व त्याचे सरदार जितके सांपडण्यासारखे

* विविधज्ञानविस्तार पुस्तकमाला, पुस्तक १—मराठेशाहींतील राजनीति पृष्ठ ३९.

असतील त्यांस कैद करून इकडे पाठवावें. असा मजकूर होता. मुअज्जमास तो हुकूम मिळण्याच्या पूर्वीच ही बातमी कळली. त्याला मराठ्यांचा विश्वासघात करण्याची जरूर वाटली नाहीं व प्रतापराव गुजरास त्यानें वादशहाचा मतलब सांगून आपल्या सैन्यासह परत जाण्यास सांगितलें. औरंगजेब किती कपटी, दुष्ट व आंतल्या गांठीचा आहे हें आग्र्यास झालेल्या भेटीच्या प्रसंगापासून शिवाजी ओळखूनच होता. पण आपल्यास पकडण्याच्या या हुकुमानें त्या बादशहाच्या दुष्टपणाचें एक ताजें उदाहरण शिवाजीच्या डोळ्यापुढें आलें; तेव्हां त्या वादशहाचा त्याला अनावर क्रोध आला व वादशहाला दिलेले किल्ले व मुलूख परत घेण्याचा त्यानें निश्चय केला.

२. याच सुमारास एके दिवशीं जिजाबाई प्रतापगडावर सहज बसली होती. तों तिची नजर ईशान्य दिशेकडे गेली आणि कोंडाणें किल्ला तिच्या ध्यानीं आला. नंतर तिला काय वाटलें कोणास ठाऊक ! तिनें शिवाजीला बोलावून आणा ह्मणून जवळच्या कारभाऱ्यांस सांगितलें. शिवाजी राजगडावर होता. त्याला जिजाबाईकडून ' राजगडावर जेवीत असशील तर प्रतापगडावर अंचवावयास ये ' इतक्या निकडीचा निरोप गेला; निरोप कळल्याबरोबर शिवाजी अगदीं तांतडीनें प्रतापगडास आला ! आल्याबरोबर "काय आज्ञा" ह्मणून जिजाबाईला विचारतां 'मला तुजबरोबर फांशांचा डाव खेळावयाचा आहे' असें ती ह्मणाली. 'बरें' असें शिवाजीनें ह्मटलें व दोघें खेळूं लागलीं. त्या दिवशीं शिवाजीला मुळींच दान पडलें नाहीं. जिजाबाईला मात्र ती जें ह्मणे तें पडे. शेवटीं जिजाबाईनें डाव जिंकला. तेव्हां शिवाजी ह्मणाला, 'आई, मला तूं जिंकलेस; तर तुला काय मागावयाचें तें माग, मी तुला देतों.' जिजाबाई म्हणाली, 'मला कांहीं नको, पुण्याजवळचा कोंडाणें किल्ला तेवढा घेऊन दे.' शिवाजी चपापला. व म्हणतो, 'आई,

तेवढा नको मागूं. तो किल्ला आधींच किती बळकट ! शिवाय त्यावर मोंगलांचो मोठी छावणी आहे. तेव्हां तो सध्यां घेणें फार अवघड ! इतर काय थोडे किल्ले माझ्या सत्तेखालीं आहेत ? त्यांतील माग.' जिजाबाई मुलाचे उगीच लाड करणारी नव्हती. शिवाजीचे शब्द ऐकून ती जास्तच हट्टास पेटली व म्हणाली, 'द्यावयाचा असला तर कोंडाणा दे, नाहीं तर तोंड दाखवूं नकोस.'

३. शिवाजी मोठा मातृभक्त. त्यानें विचार केला कीं, किल्ला तर घेतलाच पाहिजे. पण तो कसा घ्यावा याचा लवकर निश्चय होईना. हें काम करण्यास योग्य माणूस कोण याचा शिवाजी सारखा विचार करीत बसला होता. इतक्यांत या कामगिरीवर तानाजीस पाठवावें हा विचार त्याला सुचला. त्याबरोबर त्याची चिंता नाहींशी झाली. त्यानें एक लखोटा लिहिला व लखोटा पोंचविण्यास जासुदास सांगितलें.

४. तानाजी कांहीं दिवसांपासून उमरठें नांवाच्या आपल्या कोंकणांतल्या गांवांत जाऊन राहिला होता. शिवाजीचा बादशहाशीं तह झाला होता व दक्षिणेंतील दोन्ही मुसलमान राज्येंही त्याला खंडण्या देऊं लागलीं होतीं. तेव्हां एकंदरीनें ते स्वस्थतेचे दिवस होते. यामुळेंच तानाजीस आपल्या गांवास जाण्यास थोडी फुरसत झाली. सुभेदार तानाजीराव हल्लीं घरींच असल्यामुळें त्याच्या घरांतलीं सर्व माणसें सुखांत होतीं. शिवाय आतां माघ महिना होता, व माघ व॥ ९मीला तानाजीरावाचा मुलगा रायबा याचें लग्न ठरलें होतें. या लग्नाचें साहित्य करण्यांत बायका दंग होत्या. पुरुषमंडळी लग्नाला बऱ्हाडी बोलावावयाच्या गडबडींत होती. आतां लग्नाला अगदीं थोडे दिवस होते. हळदीसुद्धां लागल्या होत्या. मग त्या वेळीं त्या गांवांतील सर्व माणसें विशेषतः तानाजीरावांच्या येथील माणसें फारच आनंदांत होतीं हें काय सांगितलें पाहिजे ? अशा ऐन वेळीं शिवाजीचा जासूद जाऊन पोहोंचला.

५. मजकूर वाचल्याबरोबर, शिवाजीचा जासूद आला म्हणून भोंवतालीं मंडळी जमली होती, त्यांस तानाजी म्हणाला, " मला शिवाजीमहाराजांनीं कोंडाणा घेण्याची आज्ञा केली आहे; तेव्हां आधीं लगीन कोंडाण्याचें, मग रायबाचें करीन". तें त्याचें भाषण ऐकून शेलारमामा ऐंशीं वर्षांचा म्हातारा होता, तो म्हणाला, " कोंडाणा किल्ला अतिशय अवघड; शिवाय वर मोंगल अगदीं बंदोबस्तानें आहे, तो घेण्याचा प्रयत्न व्यर्थ होईल. तूं या भानगडींत पडूं नको. " त्या म्हाताऱ्यानें दिलेला हा भित्रेपणाचा सल्ला तानाजीस अगदीं रुचला नाहीं, व मोठ्या आवेशानें तो म्हणाला, " मामा, असें काय बोलतोस ! हें तुला शोभत नाहीं. आपण कोण आहोंत ? आम्ही शूर मर्द क्षत्रिय, नाहीं भिणार मरणाला. " असें बोलून त्यानें लग्नाची बाब अगदीं बाजूला ठेविली. आपला भाऊ सूर्याजी यास एक हजार मावळे बरोबर घेऊन येण्यास सांगून तो स्वतः कोंडाण्याची बारीक माहिती मिळविण्याकरितां पुढें निघाला. तानाजी आपल्या मुलाचें मंगलकारक लग्न टाकून शिवाजीच्या एका चिठ्ठीवर कोंडाणें घेण्यास चालता झाला. केवढा हा स्वराज्यप्रेमा ! केवढी ही देशभक्ति !

६. जयसिंगाशीं झालेल्या तहानें कोंडाणें मोंगलांच्या ताब्यांत गेला होता. त्याला आतां पांच वर्षें होऊन गेलीं होतीं. तो किल्ला ह्या वेळीं उदयभानु नांवाच्या किल्लेदाराच्या ताब्यांत होता. हा उदयभानु मूळचा रजपूत; पण बाटून मुसलमान झाला होता. त्याच्या हाताखालीं गडाच्या संरक्षणास रजपुतांचें व पठाणांचें मिळून अठराशें सैन्य होतें, किल्ल्याच्या पायथ्याशीं कोळ्यांचा व तटाजवळ बाहेरच्या अंगास महारांचा असे पाहरे होते. या सैन्याची व पहाऱ्यांची व्यवस्था उदयभानूनें सक्त ठेविली होती. तानाजी सुगावा काढीत काढीत आला; तों त्यास समजलें कीं, कोळ्यांचा मुख्य रायाजी कोळी आहे. तानाजीनें स्वतः त्याची गांठ घेतली. त्याचा

धर्माभिमान व देशाभिमान जागृत करण्यासारखें त्याशीं भाषण करून त्याच्याकडून गडावरील सर्व व्यवस्थेची माहिती मिळविली व सूर्याजीच्या सैन्यास येऊन तो मिळाला.

७. रात्र पडतांच तानाजीनें सैन्याच्या पांचशेंपांचशेंच्या अशा दोन टोळ्या केल्या व एक पांचशांची टोळी सूर्याजीच्या हाताखालीं देऊन "मध्यरात्र होण्यापूर्वी गडाच्या दक्षिणेकडच्या कल्याण दरवाज्याच्या बाहेर यावें, आम्हीं दुसरीकडून गडांत शिरून तो दरवाजा उघडतों" असें त्यास सांगितलें व आपण आपल्या हाताखालच्या पांचशें लोकांसह किल्ल्याच्या पश्चिमेच्या बाजूला गेला. या बाजूचा कडा उभाच्या उभा आहे. यामुळें वर असलेल्या मोंगलांस या बाजूनें किल्ल्यास भीति नाहीं असें वाटत होतें. म्हणून या बाजूचा बंदोबस्त चांगलासा नव्हता. तानाजीनें अनुकूल संधी आली तीन दवडतां त्या बाजूनें किल्ल्यांत उतरण्याचा निश्चय केला. कड्याच्या पायथ्याशीं आल्यावरोवर 'यशवंती' * घोरपड कमरेला सांखळदंड बांधून कड्यावर सोडली. ती पहिल्यानें मागें फिरली. पण तानाजीनें दटाविल्यावरोवर पुन्हां वर जाऊन नखें रोंवून वसली. तानाजी वर चढला. मग कांहीं मावळे वर गेले. त्यांनीं मेखा ठोकून

---

*ही सरड्याच्या जातीची असते. ती अत्यंत चपल असून तिचीं नखें तीक्ष्ण असतात; तीं रोंवून डोंगराच्या कड्यासारख्या अवघड जागावर चढून जाऊन एखाद्या ठिकाणीं चिकटून वसण्याची तिची शक्ति अजव असते. या तिच्या गुणामुळें पूर्वी अवघड कडे चढून जाण्यास तिचा उपयोग करीत. कंवरेला दोर अथवा सांखळदंड बांधून तिला कड्यावर सोडीत; व ती वर जाऊन घट्ट चिकटून वसली, कीं लांवल्या दोरावरून एक इसम चढून जाई, व त्या दोरास बांधून दिलेली दोराची शिडी वर घेऊन ती एखाद्या दगडास किंवा झाडास भक्कम बांधी. मग त्या शिडीवरून लोक चढून जात.

आणखी दोन चार दोर खालीं लोंबते सोडले व त्यांवरून पटापट तीनशें मावळे चढून गेले.

८. इतक्यांत किल्ल्यावरच्या शिबंदीस किल्ल्याच्या पश्चिम बाजूला कांहीं गडबड आहे असें वाटलें. त्यावरून त्यांनीं मशाली पेटविल्या व पाहूं लागले, तों त्यांना वर चढून आलेले तीनशें मावळे दिसले. मग ते रजपूत व पठाण शिपाई चाल करून आले. मावळेही सज्जच होते. लागलीच लढाईस सुरवात झाली. मोठें घनचक्कर युद्ध सुरू झालें. कांहीं मावळ्यांनीं जाऊन कल्याण दरवाजा काबीज केला. आणि तेथें ते सूर्याजीरावाची वाट पहात बसले. किल्ल्यांत युद्ध चाललेंच होतें. तो मध्यरात्रीचा समय होता. कोंडाणें किल्ल्यावर तलवारींचा खणखणाट चालला होता. असें युद्ध चालू असतां मोंगलांचा मुख्य उदयभानु व तानाजीराव या दोघांचें द्वंद्व-युद्ध चालू झालें. दोघेही शूर व कसलेले लढवय्ये; दोघांच्या तलवारी सारख्या चालल्या होत्या. डाव्या हातांतल्या ढालीनें आपल्या शत्रूच्या तलवारीचे वार चुकविण्याचीं दोघेही शिकस्त करीत होते. थोड्याच वेळांत दोघांना पांच सात वार लागून त्यांच्या अंगांतून रक्ताच्या धारा चालल्या. इतक्यांत उदयभानूचा एक जोराचा वार तानाजीच्या ढालीवर पडून ती तुटली. आतां तानाजीस दुसरी ढाल कोठली मिळणार! पण त्यानें न डगमगतां उजव्या हातानें आपला पट्टा फिरवीत राहून डाव्या हातानें कमरेचा शेला सोडला व तसाच त्या हातावर तो गुंडाळून घेऊन तो लढूं लागला. फिरून दोघांचें कडाक्याचें युद्ध सुरू झालें. कांहीं वेळानें दोघेही एकमेकांचे वार लागून पडले. गडावर तानाजी व उदयभानु या दोघांचीं थडगीं एकमेकापासून सुमारें दीडशें यार्डांचे अंतरावर वायव्य कोपऱ्यांत आहेत.

९. जेव्हां तानाजीच्या मृत्यूची बातमी मावळे लोकांत पसरली, तेव्हां त्यांचा धीर सुटला व ते ज्या दोरांवरून चढले होते तिकडेच

उतरण्याकरितां पळूं लागले. रजपुतांना दुप्पट जोर चढला. मराठ्यांचा पराभव होण्याची वेळ आली. पण इतक्यांत तानाजीरावांचा भाऊ सूर्याजी कल्याण दरवाज्यानें नुकताच आंत येऊन पश्चिमच्या बाजूला लढत होता, त्यास ही बातमी समजली. तेव्हां त्या पळणाऱ्या लोकांस थांबवून तो वीरश्री चढल्यामुळें मोठ्या आवेशानें म्हणाला, "षंढांनो धिक्कार असो तुम्हांला! अरे, तुमचा सेनापति--तुमचा बाप--मेला असतां तुम्ही त्याच्याबद्दलचा सूड उगविल्यावांचून असे बायकांसारखे पळून कोठें चाललां? काय? तुम्ही दोरावरून खालीं उतरून जाणार? मी ते दोर अगोदरच तोडून टाकिले आहेत. आतां तुम्ही कड्यावर जाऊन भागूबाईसारखे जीव द्या किंवा मागें उलटून मर्दासारखे या. शत्रूशीं लढा व जय मिळवा." हें उत्तेजनाचें भाषण ऐकून ते मावळे लज्जेनें परत फिरले आणि जिवावर उदार होऊन लढले. रजपुतांची तारांबळ उडाली. बरेच रजपूत मेले. कांहींनीं कड्यावरून उड्या टाकिल्या व कांहीं शस्त्रें खालीं ठेऊन शरण आले. किल्ला फत्ते झाला. पहाटचा सुमार होता. तेव्हां सूर्याजीनें एका गवताच्या गंजीस आग लावण्यास सांगितलें. त्या जाळावरून शिवाजीस किल्ला सर झाला हें समजलें. तेव्हां त्यास अतिशय आनंद झाला व ही बातमी त्यानें जिजाबाईस कळवितांच तिनें तानाजीला फार फार आशीर्वाद दिले. दुसरे दिवशीं सकाळीं शिवाजीकडे किल्ल्यावरची हकीकत विस्तृतपणें कळविण्याकरितां जासूद आला. शिवाजीस किल्ला सर झाल्याची बातमी अगोदरच कळली असल्यामुळें तो आनंदानें जासुदाजवळचें पत्र वाचूं लागला. तानाजीच्या मृत्यूची बातमी पाहिल्याबरोबर कागद हातांतून गळला व शिवाजी देहभान विसरला. त्याला फार दुःख झालें व तो एक दीर्घ सुस्कारा टाकून म्हणाला, "गड आला, पण सिंह गेला." यावरून त्या किल्ल्याचें नांव सिंहगड पडलें. तानाजीचा भाऊ

सूर्याजी यानें किल्ला सर करण्यांत जी उत्कृष्ट कामगिरी बजाविली तिजबद्दल त्याला शिवाजीनें सिंहगडचा किल्लेदार नेमून त्याचा गौरव केला. सिंहगडच्या या वीररसपूर्ण प्रसंगावर तुलसिदास शाहिरानें रचिलेला उत्कृष्ट * पोवाडा प्रसिद्ध आहे.

---

१८ सालेरचें युद्ध.

(शके १५९३ माघ, सन १६७२ जानेवारी.)

मराठ्यांच्या मोंगलांशीं प्रत्यक्ष समरांगणावर झालेला पहिला झगडा.

सिंहगड सर झाल्यावर एक महिन्याच्या आंत सूर्याजी मालुसऱ्यानें पुरंदर किल्ला घेतला. मोरोपंत पेशव्यानें सर्व कल्याण प्रांत हस्तगत केला. पावसाळा संपल्यावर शिवाजीनें सुरतेवर हल्ला केला, व तीन दिवसपर्यंत त्या शहरांतून खंडणी वसूल केली. यानंतर मोरोपंत पिंगळे बागलाणांत शिरला, आणि औंढा, पट्टा आणि सालेर हे किल्ले त्यानें मोंगलांपासून हां हां म्हणतां सर केले. प्रतापराव गुजरानें फौज घेऊन खानदेशावर चाल केली, व त्या मोंगलांच्या परगण्यांतून चौथाई वसूल केली. त्यानें गांवोगांवच्या पाटील कुळकर्ण्यांपासून "आम्ही मराठ्यांस वसुलाचा चौथा हिस्सा देत जाऊं" असें लिहून घेतलें; आणि असे ज्यांनीं लिहून दिलें त्यांस 'तुम्हांला मराठ्यांपासून त्रास होणार नाहीं,' असें आश्वासन दिलें. येणेंप्रमाणें शिवाजीनें मोंगलांना पूर्वी दिलेले किल्ले परत मिळविले. इतकेंच नव्हे, तर मोंगलांच्या प्रत्यक्ष अंमलाखालच्या

* 'अॅकर्थ व शाळिग्राम'कृत पोवाडे, पृष्ठें १८–५०.

प्रांतांतून खंडणी वसूल केली. या वातम्या औरंगजेबास जेव्हां समजल्या, तेव्हां त्याच्या तळव्याची आग मस्तकास गेली. त्याला शिवाजीचा अत्यंत राग आलाच; शिवाय मुअज्जम व जसवंतसिंग हे शिवाजीस मिळाले असावेत असें त्यास वाटलें. त्यानें जसवंतसिंगास परत येण्याचा हुकूम पाठविला व महाबतखान यास स्वतंत्र अधिकार देऊन दक्षिणेंत पाठविलें. त्याच्या हातांखालीं दिलीरखानास दिलें. महाबतखानानें आल्यावरोबर औंढा व पट्टा हे किल्ले परत मिळविले. इतक्यांत पावसाळा सुरू झाला. पावसाळा संपतांच दिलीरखानानें आपल्या फौजेच्या दोन टोळ्या केल्या. त्यांपैकीं एका टोळीनें चाकणास वेढा घातला आणि दुसरी टोळी सालेरीस वेढा देऊन वसली. सालेरचा किल्ला नाशिक जिल्ह्यांतील वागलाण तालुक्याच्या पश्चिमेस आहे. त्या वेळेस गुजराथेंत उतरावयाची वाट त्या किल्लयाजवळून असे. शिवाय तो किल्ला म्हणजे वागलाण प्रांताचें नाक होतें.

२. सालेर किल्ला असा महत्त्वाचा असल्यामुळें मोंगलांनीं वेढा दिला असें कळतांच शिवाजीनें प्रतापराव गुजरास व मोरोपंत पिंगळ्यास त्या किल्ल्याच्या मदतीस जाण्याचे हुकूम पाठविले. मराठ्यांची फौज किल्लयाच्या मदतीस आली असें समजतांच तिला मागें हटविण्यास महाबतखानानें वरोबर मोठी फौज देऊन इकलासखान नांवाच्या सरदाराची रवानगी केली. मराठ्यांच्या आघाडीस प्रतापराव गुजर होता. इकलासखानाची फौज अंगावर येतांच प्रतापरावानें आपण भ्यालों असें दाखविलें व मराठ्यांची फौज पळूं लागली. मग मोंगलांस कां बरें आवेश चढणार नाहीं? हे मरगट्टे आपल्याला भिऊन पळत आहेत. आतां यांना आपलें शौर्य दाखवावयाची वेळ आहे असा विचार करून तें मोंगल सैन्य मराठ्यांचा पुरा मोड करण्याकरितां त्यांच्या पाठीस लागलें. हा हल्ला भ्यालेल्या शत्रूवर! तेव्हां मोंगलांचे सैनिक स्वच्छंदानें वागूं लागले. पण त्या

मोंगलांस मराठ्यांचा गनिमी कावा काय माहीत ? मोंगलांच्या सैन्यांत अव्यवस्था झालेली पाहतांच प्रतापरावानें आपल्या फौजेस मोंगलांवर एकदम हल्ला करण्याचा हुकूम केला. या वेळीं मोरोपंताचेंही सैन्य त्या ठिकाणीं येऊन पोंचलें होतें. मराठ्यांनीं उलट खातांच जें कांहीं रणकंदन झालें तें अवर्णनीयच !

३. धुळीचे लोट असे उडाले कीं, पांच मैलांच्या घेरांत आपल्या समोरचा माणूस आपल्याकडचा आहे, कीं शत्रूकडचा आहे हें ओळखावयास पंचाईत पडे. रक्ताचे पूर वाहिले. मोंगलांची अगदीं फटफजिती उडाली. त्यांचा पूर्ण पराजय झाला. त्यांचे नामांकित बावीस सरदार पडले व लहान मोठे दहा हजार लोक कामास आले. पुष्कळ लोक मराठ्यांस पाडाव सांपडले. शिवाय सव्वाशें हत्ती, सहा हजार उंट, सहा हजार घोडे मराठ्यांच्या हस्तगत झाले. मराठ्यांचा नांव घेण्यासारखा एक पंचहजारी सरदार सूर्यराव काकडे हा पडला. सालेरची लढाई मराठ्यांच्या इतिहासांत फार महत्त्वाची आहे. मोंगलांशीं समोरासमोर असें हेंच पहिलें युद्ध झालें. त्यांत मराठ्यांचा जय तर झालाच; पण मुख्य गोष्ट ही कीं, मोंगलांना मराठ्यांचा वचक बसला, व मराठ्यांनाही मोंगलांशीं प्रत्यक्ष लढाई देण्याचा प्रसंग आला तरी तें काम आपल्याला सहज करितां येतें, हा आत्मविश्वास आला. सालेरच्या विजयानें मराठी सैन्यास मोठें स्फुरण चढलें. शके १५९४च्या पावसाळ्यांत मोरोपंत पिंगळे जंगी फौज घेऊन कोंकणांत उतरला आणि त्यानें जव्हार व रामनगर हीं दोन्ही कोळी राज्यें काबीज केलीं. पुढें मराठी सैन्यानें वर घाटीं चढून खानदेश व वऱ्हाड या प्रांतांत खूप खंडणी वसूल केली. परंतु या वेळीं मोंगल सैन्य जलदीनें मराठ्यांवर चालून आल्यामुळें त्यांना सर्व मिळकत स्वदेशीं सुखरूपपणें आणितां आली नाहीं. (डिसेंबर १६७२).

४. सालेरची लढाई झाल्याबरोबर सालेर किल्ल्याचा वेढा उठवून मोंगल औरंगाबादेस गेले हें वृत्त औरंगजेबास कळतांच त्यास फार वाईट वाटलें. त्यानें महाबतखानास परत बोलाविलें व त्याच्या जागीं खानजहान बहादुराची दाक्षिणचा सुभेदार म्हणून नेमणूक केली. खानजहान बहादुरास मराठ्यांशीं युद्ध चालू ठेवण्याचें सामर्थ्य आपल्या अंगांत नाहीं असें वाटलें; त्यावरून शिवाजीशीं तह करून भीमेच्या कांठीं पेडगांवास छावणी देऊन तो राहिला. पेडगांव हें ठिकाण मराठी मुलुखाच्या अगदीं सन्निध असल्यामुळें येथून मराठी मुलुखावर चालून जाणें व मराठ्यांच्या हालचालीवर टेहळणी करणें या दोन्ही गोष्टी अगदीं सुलभ होत्या. यामुळें लष्करी दृष्ट्या हें ठिकाण महत्त्वाचें असून येथें मोंगलांनीं लवकरच 'बहादुरगड' हा किल्ला बांधिला व यापुढें पुष्कळ वर्षेपर्यंत हा किल्ला मोंगलांचें [illegible] छावणीचें ठिकाण होऊन बसला.

१२. विजापूरकरांशीं युद्ध.

(शहाजीराव गुजराचा मृत्यु व हंबीरराव मोहित्यांचा उदय.)

मोंगलांशीं चाललेलें युद्ध संपतें न संपतें तोंच विजापूरचा सुलतान अली आदिलशाहा मृत्यु पावला (२४ नोव्हेंबर १६७२). त्याचा मुलगा शिकंदर गादीवर बसला. पण तो अगदीं अल्पवयस्क असल्यामुळें सरदार लोकांच्या हातांत सर्व सत्ता गेली. त्या सरदारांची परस्पर भांडणें सुरू झालीं व दरबारांत घोंटाळा माजला. विजापूरच्या दरबारांत घोंटाळा माजावयाला व शिवाजी मोंगलांच्या युद्धांतून

मोकळा व्हावयाला एकच गांठ पडली. आतां आपण आपल्या राज्याच्या दक्षिण बाजूकडे लक्ष देऊन त्या बाजूकडे आपलें राज्य वाढाविण्याची हीच संधी आहे हें चाणाक्ष व हुषार शिवाजीनें तेव्हांच ताडलें. त्यानें विशाळगडीं मोठें सैन्य जमा केलें. त्या सैन्यांतली एक टोळी जी निघाली ती हां हां म्हणतां हुबळी शहरावर जाऊन आदळली. या टोळीवर मुख्य अण्णाजी दत्तो हा होता. हुबळी ही दक्षिण महाराष्ट्रांतील व्यापारी पेठ होती. तेथें इंग्रज, फ्रेंच, डच इत्यादि परकीय लोकांच्याही वखारी होत्या. त्या गबर शहरांतील सर्व व्यापाऱ्यांपासून मराठ्यांनीं फार मोठी खंडणी वसूल केली (मे १६७३). नंतर त्यांनीं कनाटकांतील इतरही गबर अशा बऱ्याच शहरांतून पैसा मिळविला. इतक्या अवकाशांत खुद्द महाराष्ट्रांत विजापूरकरांच्या ताब्यांतील किल्ले परत मिळविण्याचा उद्योग शिवाजीनें आरंभला. अण्णाजी दत्तोनें हुबळीवर जाण्यापूर्वी 'भेद करून' पन्हाळा सर केला होताच (फाल्गुन व ॥ १३ शके १५९४). पुढें परळी मराठ्यांच्या हातीं पडली. लवकरच सातारा किल्ल्यास वेढा घालून श्रावणांत तोही मराठ्यांनीं कबीज केला. थोड्याच काळांत पन्हाळ्यापासून ताथवडयापर्यंत किल्ल्यांची रांग शिवाजीच्या ताब्यांत आली व त्यामुळें मराठी राज्याची आग्नेय सरहद्द बळकट झाली. शिवाजीनें आपलें जन्मस्थान शिवनेरी ताब्यांत घेण्यासाठीं याच सुमारास खटपट केली; पण तो गड केव्हांच त्याच्या ताब्यांत आला नाहीं. कोंकणांतून मोंगली मुलुखावर हल्ला करण्यास त्या गडाजवळच्या वाटेनें उत्तम सोय होती; म्हणून शिवनेरी लष्करी दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचें ठिकाण होतें. अर्थातच मोंगलांनीं तेथें चांगला बंदोबस्त ठेविला होता.

२. शिवाजीच्या या चढाईच्या कृत्यांची हकीकत जेव्हां विजापुरांत लागोपाठ जाऊन पोहोंचली, तेव्हां अव्यवस्थित सरदारांतही ऐक्य उत्पन्न झालें व बहलोलखान (अबदुल करीम) हा पठाण सरदार मोठें सैन्य

घेऊन पन्हाळा प्रांतावर चाल करून आला. इतक्यांत शिवाजीनें प्रतापराव गुजर यास खुद्द विजापूरकडे पाठविलें. तो जाऊन विजापूरजवळच्या मुलुखांत खंडणी घेऊं लागला. हें पाहतांच विजापूरचा कारभारी खवासखान यानें बहलोलखानास परत येण्याविषयीं हुकूम पाठविला. या हुकुमाप्रमाणें तो विजापुरास परत जाण्याकरितां निघणार तोंच ही बातमी प्रतापरावास समजून तो खानावर चाल करून गेला. हल्लींच्या जत संस्थानांतील उंबराणी येथें दोघांची गांठ पडली (चैत्र शके १५९५). मोठें कडाक्याचें युद्ध झालें. शेवटीं विजापूरकरांच्या सैन्यास प्यावयास पाणीसुद्धां मिळेना. बहलोलखान अगदीं हताश होऊन प्रतापरावास शरण आला. प्रतापरावासही त्याची दया आली. त्यानें "मी फिरून शिवाजीमहाराजांच्या मुलुखांत येणार नाहीं" असा ठराव करून घेऊन त्यास सोडून दिलें. प्रतापरावानें बहलोलखानास सोडून दिल्याचा हा वृत्तांत शिवाजीस कळला, तेव्हां हें सेनापतीचें कृत्य त्यास मुळींच पसंत पडलें नाहीं व त्याला सेनापतीचा अगदीं राग आला.

३. प्रतापराव त्या मुसलमान सरदाराची गय करण्यांत कसा सपशेल चुकला होता हें लवकरच स्पष्ट झालें. पावसाळा संपतांच शिवाजीनें मोठें सैन्य जमवून विजापूर-कर्नाटकावर चाल केली. त्या प्रांतांतील श्रीमंत स्थळांपासून खूप खंडणी घेऊन तो पश्चिमेस घाटाखालीं कारवारकडे उतरला व तिकडेही त्यानें पुष्कळ द्रव्य मिळविलें. इतक्यांत मिरज–कोल्हापूर भागाचें मराठ्यांपासून संरक्षण करण्यासाठीं व कारवारप्रांतीं असलेल्या शिवाजीचें मराठी मुलुखाशीं दळणवळण तोडण्यासाठीं मोठें सैन्य बरोबर घेऊन बहलोलखान पुनः पश्चिमेकडे चालून आला. शिवाजीनें लागलीच प्रतापरावास हुकूम केला—" तुम्हीं ज्यास सोडून दिलें तो बहलोलखान फिरून स्वारी करून येत आहे. तुम्ही लष्कर घेऊन त्याचा पराजय करा, नाहीं तर मला तोंड दाखवूं नका. " शिवाजीचा हा रागाचा हुकूम पाहून

प्रतापरावास बहलोलखानाची विशेष चीड आली. जेसरी या गांवीं मराठ्यांची व बहलोलखानाची महाशिवरात्रीच्या दिवशीं गांठ पडली. त्या प्रसंगीं प्रतापरावानें चवताळून विजापूरकरांच्या सैन्यावर एकदम हल्ला केला. पण तो घाईनें केलेला हल्ला बरोबर लागू झाला नाहीं. त्या दिवशीं प्रतापराव मोठ्या आवेशानें लढला. शेवटीं तो रणांगणीं पडला. तेव्हां मात्र मराठी फौजेचें धैर्य गळून जाऊन ती पळून जाऊं लागली; पण न्यायी परमेश्वरास तें कसें रुचणार ? विश्वासघातकी विजापूरकरांस तो कसचा जय मिळवून देतो ? हंसाजी मोहिते नांवाचा एक सरदार पुढें झाला व मराठ्यांच्या फौजेस धीर देऊन त्यानें आपल्या वीरश्रीच्या भाषणानें तिच्या अंगांत आवेश उत्पन्न केला. लागलीच मराठे लोकांस वीरश्री चढली व तिच्या भरांत त्यांनीं शत्रूवर असा निकराचा हल्ला केला कीं, तेणेंकरून शत्रूनें विजापुराकडे पळच काढला. साध्या व्यवहारांत एकदां बिघडलेली घडी फिरून सुरळीत करून देणें मोठें अवघड असतें. मग लढाईची गोष्ट तर काय विचारावी ! एकदां लोक कच खाऊन पळू लागले असतां फिरून एक करून त्या लोकांकडून अगोदर शिरजोर झालेल्या शत्रूवर हल्ला करणें हेंच फार अवघड. त्यांतून तो पळून जाई इतका त्याचा पूर्ण पराभव करणें म्हणजे तर जवळ जवळ असंभवनीय ! पण शिवाजीच्या वेळचे मराठे म्हणजे वाघाचे बच्चे होते त्यांना कांहींच अशक्य वाटत नसे. पहा ! हंसाजी मोहित्यानें पळून चाललेली मराठी फौज एक करून शत्रूवर हल्ला केला व त्यास पळावयास लाविलें कीं नाहीं ! याच लढाईंत धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे या तरुण दुकलीनें आपला छोटासा पराक्रम दाखविला. त्यांची हकीकत पुढें येईलच. शिवाजीस या युद्धाचें वृत्त कळतांच प्रतापरावाच्या मरणाबद्दल त्यास फार दुःख झालें. प्रताप

राव म्हणजे शिवाजीचा केवळ उजवा हातच होता. त्यानें प्रतापरावाची मुलगी जानकीबाई हिचें राजारामाशीं लग्न करून तिला आपली सून केली. याच लढाईंत हंसाजी मोहित्यानें केलेली कर्तबगारी पाहून शिवाजी त्याच्यावर खुष झाला. त्यानें त्यास हंबीरराव हा किताब दिला व प्रतापरावाची जागा त्यानें जेसरीच्या लढाईंत (माघ वद्य १४ शके १५९५, २४।२।१६७४) जशी भरून काढली तशीच तो नेहमीं भरून काढील या उमेदीनें हंबीररावास त्यानें सेनापति केलें.

राज्याभिषेक.



दक्षिणच्या मोंगल सुभेदारानें शिवाजीशीं तह केला व शिवाजीच्या राज्याच्या दक्षिणेकडे विजापूरकरांशीं युद्ध चालून त्यांत त्यांचें सैन्य पळून गेलें. महाराष्ट्रावर अंमल करणारीं दोन्ही मुसलमानी राज्यें शिवाजीशीं विरोध करण्याचें सोडून देऊन स्वस्थ बसलीं. शिवाजीनें शके १५६८त तोरणा किल्ला घेतला व स्वराज्याची मुहूर्तमेढ रोंविली. आतां शके १५९६ (सन १६७४) हें वर्ष सुरू झालें होतें. या वेळीं शिवाजीचें राज्य उत्तरेस तापीपासून दक्षिणेस तुंगभद्रेपर्यंतच्या प्रदेशावर पसरलें होतें. त्यांत रायगड, पन्हाळा, सिंहगड यांसारखे शेंकडों किल्ले होते. सुरतेपासून कारवारापर्यंत कोंकणपट्टी त्याच्या ताब्यांत होती. तिच्या रक्षणार्थ विजयदुर्ग, सिंधुदुर्ग वगैरे बळकट जंजिरे होते. या कोंकणपट्टींत पोर्तुगीज, इंग्रज, हब्शी, वाडीकर सांवत यांचा कांहीं मुलूख होता. पण शिवाजीचा त्या सर्वांना चांगला वचक होता. १५६८त स्वराज्याची मुहूर्तमेढ रोंवल्यावर जो अठ्ठावीस वर्षांचा काळ गेला, त्यांत शिवाजीनें स्वराज्याची ही भव्य इमारत उठवून दिली होती.

२. शिवाजीनें एवढा मोठा मुलूख काबीज केला खरा, पण सर्व लोकांस हें स्वराज्य स्थापन झालें आहे व शिवाजी हे आपले हिंदुराजे आहेत, ही कल्पना जितकी स्पष्ट यावयास पाहिजे तितकी आली नाहीं. शिवाजीच्या अंगांत कर्तबगारी आहे, तेव्हां तो पुष्कळ मुलूख मिळवीत आहे, अशी लोकांची समजूत होई. शिवाजी व त्याचे अनुयायी मात्र पहिल्यापासून आपण काय करीत आहों हें पक्कें जाणून होते. आपल्या देशांत हिंदु स्वराज्य स्थापावयाचें याच उद्देशानें त्यांनीं आपल्या कामास सुरुवात केली होती व आतां त्यांच्या संकल्पाप्रमाणें बराच मोठा मुलूख त्यांच्या ताब्यांत आला होता. हा मिळविलेला मुलूख आपलें स्वराज्य, व आपले राजे छत्रपति शिवाजीमहाराज होत, हें आतां प्रसिद्धपणानें लोकांस कळविण्याचा योग्य समय आला होता. हें कसें कळवावयाचें ? यास मार्ग म्हणजे शिवाजीनें आपल्या हिंदुधर्मांत सांगितल्याप्रमाणें मोठ्या समारंभानें राज्याभिषेक करून घेऊन सिंहासनारूढ होत्साता छत्रचामरें धारण करावयाचीं.

३. राज्याभिषेक करून घेण्याचें शिवाजीच्या मनांत आलें, त्यास आणखीही कारणें होतीं. जाधव, घाटगे, माने, निंबाळकर, घोरपडे इत्यादि जुन्या प्रसिद्ध मराठा घराण्यांतील सरदार शिवाजीशीं सारख्या दर्जाच्या माणसांप्रमाणें वागत. शिवाजीनें राज्य मिळविलें होतें व हे सरदार खरें म्हटलें तर त्याच्या नोकरींत असत. पण त्यांना आपले पूर्वज भोंसल्यांच्या बरोबरीचे किंवहुना त्यांहून वरचढ असें वाटत असल्यामुळें ते शिवाजीशीं वागतांना तो मागला डौल आणीत. शिवाजीनें विजापूरकरांपासून मुलूख मिळविला होता व दिल्लीच्या बादशहापासूनही मिळविला होता. दोन्ही बादशहांचा रोख निदान दरबारी भाषेत व्यवहार करतांना शिवाजी हा आपला एक सरदार आहे असें मानण्याचा असे. शिवाजी हा एक स्वतंत्र असा निराळा राजा आहे, व त्याशीं त्या नात्यानें आपण लढाई किंवा तह करीत

आहोंत, असें विजापूरचा सुलतान किंवा दिल्लीचा बादशहा यांपैकीं कोणीच म्हणत नसत. यामुळें राज्याभिषेकसमारंभ करून आपलें राज्य स्वतंत्र आहे व आपण स्वतंत्र निराळे राजे आहोंत हें सिद्ध करणें शिवाजीला भाग पडलें.

४. शिवाजी आणि त्याचे कारभारी या सर्व जणांच्या मनांत अलीकडे हा राज्याभिषेकाचा विषय सारखा घोळत होता. एके दिवशीं शिवाजीनें कारभारी मंडळींना जमवून राज्याभिषेकाचा प्रश्न काढला. सर्वांच्या मनांत तें घोळत होतेंच. लागलीच सर्व कारभाऱ्यांनीं ही गोष्ट अवश्य आहे व हें लवकर झालें पाहिजे, असा सल्ला दिला. राज्याभिषेक करण्याचा निश्चय ठरला. या समारंभास विद्वान् ब्राह्मणांची जरूरी होती. गागाभट्ट नांवाचे एक विद्वान् पंडित काशीक्षेत्राहून पैठणास आले होते. त्यांनाच राज्याभिषेकाकरितां आणण्याचें ठरलें. बाळाजी आवजी चिटणीस यानें आपलीं कांहीं माणसें पाठवून मोठा सत्कार करून त्या पंडितास आणिलें. त्यांस आणल्यावर राजधानी कोणती करावी हा प्रश्न निघाला. शत्रूस दुःसाध्य ठिकाण असावें म्हणून रायगड हीच राजधानी ठरली. राज्याभिषेकास मुहूर्त ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी शके १५९६ हा ठरला. शिवाजीचा व्रतबंध अजून झाला नव्हताच. तो ज्येष्ठ शुद्ध चतुर्थी या दिवशीं उरकून घेण्याचें ठरलें. अशा रीतीनें राज्याभिषेकासंबंधीं मुख्य गोष्टी निश्चित झाल्यावर रायगडास त्या समारंभाची जंगी तयारी सुरू झाली. समारंभाकरितां आपल्या राज्यांतील जे लोक यावयाचे त्यांस व परकीय राजांस आमंत्रणें गेलीं. समारंभाच्या वेळची व्यवस्था ठेवण्याविषयीं सर्व नियम झाले. पुण्यनद्यांचीं उदकें आणविलीं.

५. समारंभाचे दिवस जवळ आले, तशीं लाखों माणसें जमलीं. ज्येष्ठ शु॥ ४ थीच्या दिवशीं व्रतबंध झाला. मग त्रयोदशीपर्यंत

निरनिराळे धार्मिक संस्कार चालले होते. शेवटीं महान् आनंदाचा दिवस जो त्रयोदशी तो उगवला. त्या दिवशीं लोकांत जिकडे तिकडे आनंदीआनंद दिसत होता. रायगडावर गडबड उडून गेली होती. सर्व लोक सकाळच्या प्रहरींच मंगलस्नान करून उंची पोषाख घालून सभामंडपांत दाखल झाले. प्रातःकाळीं शिवाजी स्त्रीपुत्रांसह मंगलस्नान करून आसनावर विराजमान झाला. शेजारीं डाव्या बाजूस राणी सोयराबाई पटबंधन करून बसली व मागें राजपुत्र संभाजी स्थानापन्न झाला. अष्टप्रधानही निरनिराळ्या अभिषेक-द्रव्यांनीं युक्त कलश हातीं घेऊन भोंवतीं अष्टदिशांस उभे राहिले. त्यांभोंवतालून कोश वगैरेवरचे अधिकारी उभे राहिले. मांडलिक राजेही भोंवतीं उभे राहिले. मध्यें वैदिक ब्राह्मण महानद्यांचें व समुद्राचें उदक घेऊन उभे होते. त्यांनीं मंत्र म्हणण्यास सुरुवात केली; तेव्हां कलशांतील अभिषेकद्रव्यांचा व महानद्यांच्या पवित्र उदकाचा आसनावर बसलेल्या मंडळीवर अभिषेक करण्यांत आला. त्या वेळीं मंगल वाद्यें वाजूं लागलीं. तो शब्द आकाशांत मावेना. अभिषेकाचें काम आटोपल्यावर शिवाजी सिंहासनावर आरूढ झाला. त्या वेळेस तर मंगलवाद्यांचा कडाकाच उडाला. पूर्वीच ठरविल्याप्रमाणें निरनिराळ्या किल्ल्यांवरून तोफांची सरबत्ती झाली. मग शिवाजीनें तांबडीं वस्त्रें परिधान केलीं. अंगावर चौकडे, कंठ्या, शिरपेंच इत्यादि अलंकार घातले. मंत्रविधी झाले. ब्राह्मणांचे आशीर्वाद घेतले. ब्राह्मणांस दक्षिणा वांटल्या. गागाभट्टजींची पांच लक्ष रुपये देऊन संभावना केली. प्रधान, सरदार वगैरे सर्व अधिकाऱ्यांस ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें पोषाख, अलंकार दिले. हा सिंहासनावर विराजमान होण्याचा समारंभ संपल्यावर एक मोठ्या थाटाची मिरवणूक निघाली. शिवाजी उंची वस्त्रें व अलंकार घालून एका सजविलेल्या हत्तीवर आरूढ झाला. मग गडावरच्या मुख्य

रस्त्यांनीं मिरवीत मिरवीत ती मिरवणूक राजवाड्यांत येऊन पोंचली. मिरवणुकीनंतर समारंभ संपला. पुढें मेजवान्या कित्येक दिवसपर्यंत सारख्या चालल्या होत्या. शिवाजीनें ज्येष्ठ शुद्ध १३ शके १५९६ पासून नवीन ' राज्याभिषेक शक ' सुरू केला. महाराजांच्या दरबारीं सर्व राजकीय व्यवहारांत याच शकाचा उपयोग करीत. शिवाजीनें आपली सुवर्णतुला केली. त्याचें वजन १६००० होन (सुमारें १४० पौंड) भरलें. ते होन ब्राम्हणांस दक्षिणा म्हणून वांटण्यांत आले. यापुढें शिवाजीनें ' **क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति** ' अशी पदवी धारण केली.

६ याच वेळीं शिवाजीनें अष्टप्रधानांचीं फारसी नांवें बदलून संस्कृत नांवें ठेविलीं, आणि त्यांचीं कामें कायम केलीं. १ शिवाजीच्या प्रधानांपैकीं त्याचा **मुख्य प्रधान** हा श्रेष्ठ असे. हा राजाच्या हाताखालचा असून सर्व लष्करी व मुलकी कामावर त्याची देखरेख असे. शिवाजीचा त्या वेळचा मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे हा होता. २ **सेनापतीकडे** सर्व लष्करचा अधिकार होता. सेनापतीच्या जागेवर हंबीरराव मोहिते होता. ३ **अमात्याची** सर्व वसुलावर देखरेख असे. अमात्याच्या हुद्यावर रामचंद्र निळकंठ बहुतकर होता. ४ **सचिवाकडे** सर्व राज्यांतील दफ्तर सांभाळण्याचें काम होतें. हें पद अण्णाजी दत्तोकडे होतें. ५ **सुमंताकडे** परकीय राजाशीं कोणताही व्यवहार करण्याचें काम असे. या कामावर जनार्दनपंत हणमंते होता. ६ **मंत्री** हा राजाचा खाजगी कारभार पाही. या अधिकारावर दत्ताजीपंत होता ७ **न्यायाधीश** राज्यांतील न्यायाचीं कामें करी. या पदावर बाळाजीपंत हा होता. ८ **पंडितराव** हा धार्मिक भानगडी राज्यांत उपस्थित झाल्या तर त्यांची निरवानिरव करी. राज्याभिषेकाच्या वेळीं रघुनाथपंत पंडितराव होता. रघुनाथपंडित मोठा विद्वान् होता. शिवाजीचा स्वभाषाभिमान जाज्वल्य असल्यामुळें

त्यानें या पंडिताकडून प्रसिद्ध ' राजव्यवहारकोश ' रचविला. हा कोश श्लोकबद्ध असून त्यांत राजकीय व्यवहारास लागणाऱ्या फारसी शद्वांस संस्कृत प्रतिशब्द दिले आहेत.

७. मागें पंधराव्या प्रकरणांत शिवाजीच्या राज्यव्यवस्थेचें वर्णन केलें आहे. तींत त्याचे अष्टप्रधान अत्यंत महत्वाचे होत. प्रधानांचीं संस्कृत नांवें राज्याभिषेकसमयीं ठेविल्यावरून अष्टप्रधानव्यवस्थेची माहिती येथें सांगितली. तथापि त्याच्या राज्यव्यवस्थेची उभारणी या अष्टप्रधानपद्धतीवर झाली होती हें निरंतर लक्षांत ठेविलें पाहिजे. शिवाजीनें आपल्या राज्यकारभारांत निरनिराळीं खातीं उत्पन्न केलीं व एकेका खात्यावर एकेका प्रधानाची स्वतंत्र नेमणूक केली. धर्म-खातें, न्यायखातें, वसूलखातें, लष्करखातें, इत्यादि सर्व खात्यांचा नीट बंदोबस्त झाला म्हणजे सर्व राज्याची व्यवस्था लागली हें सहज समजण्यासारखें आहे. जिजाबाई आतां अगदीं म्हातारी झाली होती. ती या समारंभानंतर बारा दिवसांनींच मरण पावली. शिवाजी त्याच्या लहानपणापासूनच तिला अत्यंत प्रिय असून त्याला उदात्त वळण लावण्याचा तिनें उद्योग केला होता. आपल्या प्रिय पुत्राला राज्याभिषेक झालेला तिनें आपल्या डोळ्यांनीं पाहिला तेव्हां तिला किती धन्यता वाटली असेल बरें !

८ राज्याभिषेक झाल्यावर लवकरच मराठी राज्यांतील अष्टप्रधान व इतर अधिकारी यांचीं कामें कोणतीं व तीं त्यांनीं कशीं पार पाडावीं यासंबंधीं शिवाजीनें एक आज्ञापत्र काढिलें. त्यांत सर्व मुख्य अधिकाऱ्यांचीं कर्तव्यें थोडक्यांत दिलीं असल्यामुळें मराठ्यांच्या राज्यव्यवस्थेच्या दृष्टीनें तें अत्यंत उपयुक्त आहे. त्या आज्ञापत्रांतील अष्टप्रधानांच्यासंबंधीं भाग पुढीलप्रमाणें:—

१कानुजावता राज्याभिषेक शके१ आनंदनाम संवत्सरे ज्येष्ठ वद्य

१ नियम.

१३त्रयोदशी भौमवासरे (मंगळवार).

मुख्य प्रधान यांणीं सर्व राजकार्य करावें. राजपत्रावर शिक्का करावा. सेना घेऊन युद्धप्रसंग व स्वारी करावी व तालुका रतावीनांत स्वाधीन होईल त्याचा रक्षून बंदोबस्त करून आज्ञेंत वर्तावें. सर्व सरदार सेना [यांणीं] याजबरोबर जावें. त्यांणीं सर्वांसमेत चालावें. येणेंप्रमाणें मोर्तब. कलम १.

सेनापती यांणीं सर्व सैन्य संरक्षण करून युद्धप्रसंग स्वारी करावी. तालुका स्वाधीन होईल तो रक्षून हिशेब रुजू करून आज्ञेनें वर्तावें. फौजेच्या लोकांचें बोलणें बोलावें. सर्व फौजेचे सरदार यांणीं त्यांजबरोबर चालावें. मोर्तब. कलम १.

अमात्य यांणीं सर्व राज्यांतील जमाखर्च चौकशी करून दप्तरदार, फडणीस (हे) यांचे स्वाधीन असावे. लिहिणें चौकशीनें आकारावें. फडणिसी चिटणिसी पत्रांवर निशाण करावें. युद्धप्रसंग करावे. तालुका जतन करून आज्ञेंत चालावें. मोर्तब. कलम १.

पंडितराव यांणीं सर्व धर्माधिकार, धर्म, अधर्म पाहून शिक्षा करावी. शिष्टांचे सत्कार करावे. आचार, व्यवहार, प्रायश्चितपत्रें होतील त्यांजवर संमत चिन्ह करावें. दानप्रसंग, शांति, अनुष्ठान तात्काळ करावें. मोर्तब. कलम १.

सचिव यांणीं राजपत्रें शोध करून अधिक, उणें अक्षर मजकूर शुद्ध करावा. युद्धप्रसंग करून तालुका स्वाधीन होईल तो रक्षून आज्ञेत वर्तावें. राजपत्रांवर चिन्ह संमत करावें. मोर्तब. कलम १.

न्यायाधीश यांणीं सर्व राज्यांतील न्याय, अन्याय मनास आणून बहुत धर्मेंकरून न्याय करावे. न्यायाचीं निवाडपत्रें यांजवर संमत चिन्ह करावें. मोर्तब. कलम १.

मंत्री यांणीं सर्व मंत्रविचार राज्यकारणें यांतील सावधतेनें विचार करावे. आमंत्रण, *वांकनिसी त्यांच्या स्वाधीन. तालुका जतन करून युद्धादि प्रसंग करावे. राजपत्रांवर संमत चिन्ह करावें. मोर्तब. कलम १.

---

२ अधिकारांत. * घडलेल्या गोष्टींचीं टिपणें करणें.

सुमंत यांणीं परराज्यांतील विचार करावा. त्यांचे वकील येतील त्यांचे सत्कार करावे. युद्धादि प्रसंग करावे. राजपत्रांवर संमत चिन्ह करावें. मोर्तब. कलम १.*

या आज्ञापत्रावरून एक गोष्ट उघड होते कीं, पंडितराव व न्यायाधीश हे दोन प्रधान सोडून बाकीच्या सहा प्रधानांच्या कार्यांत युद्धप्रसंगाचा अन्तर्भाव केला आहे. तो काळ धामधुमीचा असल्यामुळें शिवाजीस अशी व्यवस्था करणें जरूर झालें.

२१ दक्षिणदिग्विजय.

१ शहाजीच्या मृत्यूसमयीं बंगलूर प्रांतांत त्याची जहागीर असून अरणी, पोर्टोनोव्हो हे किल्ले आणि तंजावर प्रांत हे त्याच्या वर्चस्वाखालीं होते. शहाजीच्या मृत्यूनंतर हा मुलूख शिवाजीचा सावत्रभाऊ व्यंकोजी याच्या ताब्यांत गेला. पुढें १६७४ सालीं व्यंकोजीनें तंजावरच्या नायकराजास पदच्युत करून त्या प्रांतीं आपला स्वतःचा अंमल चालू केला व खुद्द तंजावरासच वस्ती केली. व्यंकोजीच्या अंगांत पराक्रम व कर्तबगारी हीं फारशीं नव्हतीं. रघुनाथ नारायण हणमंते हा हुशार पुरुष त्याचा कारभारी होता. तो शहाजीपासून दिवाणगिरीच्या कामावर असे. तो मोठा पाणीदार व महत्त्वाकांक्षी होता. पण व्यंकोजीच्या भित्र्या स्वभावामुळें त्याला कांहींच मोठी कामगिरी करून दाखवितां येईना. शेवटीं कंटाळून रघुनाथपंत व्यंकोजीस खोंचून बोलला. व्यंकोजीला त्याचें भाषण सहन झालें नाहीं. " तुम्ही चाकर, सांगूं तितकें काम करून असावें " येवढेंच त्यानें रागारागानें उत्तर दिलें. व्यंकोजीचें उत्तर ऐकतांच " तुमच्या

* काव्येतिहाससंग्रह, पत्रें यादी वगैरे, लेखांक ४०४.

मांडीस मांडी लावून बसेन तरच नांवाचा रघुनाथ," असें कांपऱ्या आवाजांत बोलून तो तापट रघुनाथपंत तेथून चालता झाला.

२ व्यंकोजीशीं भांडण होऊन बाहेर पडण्यापूर्वीच रघुनाथपंताच्या मनांत शिवाजीकडे जाण्याचें आलें होतें. बरोबरच आहे. कर्तृत्ववान् मनुष्यास माशा मारीत स्वस्थ बसणें कसें आवडणार? आपल्या स्वतःचें कर्तृत्व जेथें दाखवितां येईल त्या ठिकाणीं जाण्याची त्याला उत्कंठा असणें अगदीं साहजिक आहे. शिवाजी पराक्रमी, हुशार, व मोठा कर्तबगार आहे हें ध्यानांत आल्यापासून रघुनाथपंताला त्याच्याकडे जावें असें वाटत असे. व्यंकोजीशीं झालेल्या भांडणाची संधी साधून त्यानें हा बेत कायम केला. पण शिवाजीकडे नुसते हात हालवीत जाऊन काय करावयाचें ? कांहीं तरी मोठी कामगिरी घेऊन जाऊं असा पंतानें मनांत विचार करून तो हैद्राबादेस गेला. तेथें तो गोवळकोंड्याच्या कुतुबशहाचा दिवाण मादण्णापंत यास भेटला. मादण्णानें त्याच्या एकंदर बोलण्यावरून हा मोठा हुशार आहे असें सहज ताडलें. " शिवाजीशीं सख्य करून देतों " असें रघुनाथपंत म्हणाला होता, त्यावरून तर मादण्णास विशेष समाधान झालें. त्यानें पंताचा सत्कार करून शिवाजीस देण्याकरितां सुलतानाकडून त्याच्याबरोबर पत्रें दिलीं. पंतानें तीं पत्रें घेतलीं व तो शिवाजीस जाऊन भेटला. पंताच्या भेटीकरितां शिवाजी सामोरा गेला. त्यानें तीं कुतुबशहाचीं पत्रें पाहून व कर्नाटकांत मोठा मुलूख जिंकितां येईल अशा अर्थाचीं भाषणें ऐकून दक्षिणदिग्विजयास निघण्याचें ठरविलें. निघण्यापूर्वी रामचंद्रपंत अमात्याच्या जागेवर होता, त्यास दूर करून रघुनाथपंतास तें पद दिलें. शके १५९७ (इ. स. १६७६) सरतां सरतां शिवाजी पाऊण लाख फौज घेऊन कर्नाटकच्या मोहिमेवर निघाला. त्यानें राज्याच्या बंदोबस्ताकरितां मोरोपंत पेशवे व अण्णाजी दत्तो हे दोघे हुशार कारभारी मागें ठेविले. पहिल्यानें हैद्राबादेस जाण्याचें ठरलें.

कुतुबशहाच्या राज्यांतून चालत असतां लष्कर फारच बंदोबस्तानें चालत होतें. प्रजेस कांडीइतकाही त्रास न देतां दाणा, वैरण, लांकूड इत्यादि लागणारें सर्व सामान विकत घेण्यांत येत होतें. हैद्राबादेस पोंचतांच कुतुबशहानें शिवाजीचा मोठा सन्मान केला. त्या शहरीं शिवाजीचा मुक्काम महिनाभर होता. कुतुबशहा लष्कर पाहण्यास येत असे. एके दिवशीं कुतुबशहा म्हणाला, "माझ्या हत्तीबरोबर झुंजेल असा कोणी माणूस तुमच्या लष्करांत आहे काय?" "हत्तीबरोबर झुंजणें कठीण. पण त्यांतून पहावें काय होतें तें, हत्ती तर सोडा" असें शिवाजीनें उत्तर केलें. मग बादशहाचा सर्वांत मस्त हत्ती सोडला. त्याबरोबर शिवाजीनें एसाजी काळे यास खुणेनें उठण्यास सांगितलें. एसाजी काळे पुढें आला. त्याजवर हत्तीनें चालविलेल्या दोन तीन झटापटी होतांच हत्तीची सोंड तुटून तो परत फिरला. हें पाहून सर्वांस व विशेषतः कुतुबशहास आश्चर्य वाटलें. तो अगदीं खुष झाला, व काळ्यास त्यानें मोठें बक्षीस दिलें. एके प्रसंगीं बाळाजी आवजीची हुषारी व स्वामिनिष्ठा पाहून कुतुबशहानें "आम्हांस तुमचा हा चिटणीस द्या" म्हणून म्हटलें. शिवाजीनें उत्तर केलें, "एक एक माणूस मिळवून माळेस मणी लाविले आहेत, ते माळेचे मणी कसे काढतां× येतील ?"

३. कुतुबशहाशीं स्नेह दृढ करून शिवाजी हैद्राबादेहून कर्नाटककडे जाण्यास निघाला. निवृत्तिसंगमावर स्नान करून, सडा होऊन तो श्रीशैलाचें रम्य स्थान पाहण्यास गेला. त्यानें फौज तुंगभद्रा उतरून त्या प्रांतांतील किल्ले घेण्यास पुढें पाठविली. श्रीशैल येथील मल्लिकार्जुन हा शिवाच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक आहे. मल्लिकार्जुनाचें दर्शन होतांच शिवाजीस राज्य सोडून अशा एखाद्या देवस्थानीं रहावें अशी उत्कट इच्छा झाली; पण खोल विचाराअंतीं त्यानें

× मराठी साम्राज्याची छोटी बखर, पृष्ठ ४५.

तो बेत रहित केला. मग तुंगभद्रा उतरून शिवाजी कांहीं फौज घेऊन थेट मद्रासेकडे गेला. शिवाजी त्या प्रांतीं जातांच जिंजी किल्ल्यावरील विजापूरकरांचे अधिकारी रूपखान व नासीर महंमद यांनीं तो किल्ला खाली करून शिवाजीच्या ताब्यांत दिला. त्रिनोमाली प्रांतीं शेरखान लोदी हा विजापूरकरांचा सरदार होता. त्याचा पराभव करून मराठी सैन्यानें वेलोर किल्ल्यास वेढा दिला. पुढें साजरा गोजरा या टेकड्यांवरून तोफांचा मारा करून मराठ्यांनीं वेलोर काबीज केला. लवकरच कोलेरूनच्या उत्तरेकडील सर्व कर्नाटक मराठ्यांच्या हातीं पडलें. या नवीन जिंकलेल्या मुलुखाचें जिंजी हें मुख्य ठिकाण करून शिवाजीनें त्या प्रांताचा बंदोबस्त राखण्यासाठीं शहाजीचा दासीपुत्र संताजी भोंसले याची नेमणूक केली. व रघुनाथ नारायण हणमंते यास त्याची दिवाणगिरी सांगितली. त्या प्रांतांत पूर्ण व्यवस्था होईपर्यंत हंबीरराव मोहिते यास त्यांच्या मदतीस ठेविलें. जिंजी किल्ल्याचा पुढें राजारामाच्या वेळीं मराठ्यांस मोठा उपयोग झाला.

४. व्यंकोजीच्या स्वभावासंबंधानें मागें थोडें सांगितलेंच आहे. व्यंकोजी शिवाजीचा भाऊ खरा, पण त्याला स्वराज्याची कल्पना नव्हती. त्याला विजापूरकर अदिलशहा हेच काय ते आपले राजे असें वाटून त्यांच्या हाताखालीं सरदारी करणें हें मोठें भूषण, असें तो समजत असे. रघुनाथपंतानें व्यंकोजीच्या डोक्यांतील या अपवित्र कल्पनांचा शिवाजीपुढें पाढा वाचला. तेव्हां त्या स्वराज्यभक्त शिवाजीस अत्यंत खेद झाला. त्यानें आपल्या भावाच्या समजुतींत योग्य पालट केला पाहिजे, याकरितांच अर्धा वांटा घेण्याच्या मिषानें कर्नाटकची मोहिम काढिली होती. शके १५९९च्या श्रावणांत कोलेरूनच्या कांठीं त्रिमलवाडी येथें दोघां भावांची भेट झाली. आठ दिवस दोघां भावांच्या परस्परास मेजवान्या झाल्या. नंतर शिवाजीनें वडिलोपार्जित जिंदगीचा अर्धा वांटा मागितला. हें मागणें व्यंकोजीस रुचलें

नाहीं व तो त्याच रात्रीं रागावून तंजावरास निघून गेला. त्यानंतर पुनः शिवाजीनें वकील पाठवून दौलतीचा वांटा मागितला. यावर अविचारी व्यंकोजीनें शिवाजीस लिहिलें, "वडील असतां तुम्हीं बादशहापाशीं बंडपणा केला त्यामुळें वडिलांस इजा झाली. आम्ही शहाचे चाकर. यांत तुमचा संबंध नाहीं." * इतकें भावास लिहून तो थांबला नाहीं. त्यानें विजापूरकरांस "तूं व्यंकोजीपाशीं वांटा मागूं नको" अशी ताकीद शिवाजीस पोंचवा असें लिहिलें. पण शिवाजीचें सामर्थ्य विजापूरकरांस माहीत असल्यामुळें शिवाजीस अर्धा वांटा द्यावा, असाच त्यांनीं उलट व्यंकोजीस हूकूम केला.

५ पूर्व कर्नाटक जिंकल्यानंतर शिवाजी पश्चिम कर्नाटकांत आला. तेथें बंगळूर, कोलार, हुस्कोटें, शिरें इत्यादि परगणे त्यानें काबीज केले. हे प्रांत हल्लींच्या म्हैसूर संस्थानांत आहेत. या मुलुखाच्या व्यवस्थेस शिवाजीनें रंगो नारायण यास ठेविलें; मात्र त्यानें जिंजीच्या अधिकाऱ्यांच्या आज्ञेंत वागावें अशी व्यवस्था केली. नंतर शिवाजीनें तुंगभद्रेच्या उत्तरतीरीं येऊन त्या प्रांतांत खंडणी घेतली. गदग, मुलगुंद, लक्ष्मेश्वर, बेलवाडी, इत्यादि स्थळें काबीज केलीं. बेलवाडीकर सावित्रीबाई देसाइणीनें तो किल्ला सत्तावीस दिवसपर्यंत भांडविला. औरंगजेबानें आपल्या पारिपत्याची जय्यत तयारी केली आहे, असें परत येत असतां शिवाजीनें ऐकिलें. म्हणून तो फारच जलद परत आला, व मोहिमेस निघाल्यापासून सुमारें अठरा महिन्यांनीं रायगडास पोहोंचला (शके १६०० ज्येष्ठ). या कर्नाटकांतील स्वारींत शिवाजीनें सर्व श्रीमंत स्थळांपासून खूप खंडणी घेतली; त्यामुळें त्याच्या खजिन्यांत द्रव्याची चांगली भर पडली.

६. इकडे कांहीं मुसलमानांनीं शिवाजीशीं युद्ध करण्याची

* शिवदिग्विजय, पृ० ३१२.

व्यंकोजीस भर दिली. त्याचें सैन्य व शिवाजीनें कर्नाटकांत ठेविलेलें सैन्य यांचें युद्ध झालें. त्यांत व्यंकोजीचा सपशेल पराभव झाला. या लढाईचें वर्तमान ऐकून शिवाजीस वाईट वाटलें. त्यानें व्यंकोजीस तंटा वाढविण्याची बुद्धि झाली याबद्दल खेद व्यक्त करून आतां तरी लवकर तह करा म्हणून एक पत्र* लिहिलें. तुम्हांस कबूल असेल तर पन्हाळा प्रांतांत तीन लक्षांची जहागीर देतों, कर्नाटकांतला मुलूख सोडा असें त्यांत लिहिलें होतें. या पत्रांतील अटी व्यंकोजीस पसंत पडल्या नाहींत व तो अत्यंत उदासीन झाला. तेव्हां त्याची चतुर व धोरणी स्त्री दिपाबाई हिनें कसेंही करून शिवाजीशीं सख्य करण्याचा त्याला सल्ला दिला. मग बऱ्याच वाटाघाटीनंतर दोघां बंधूंचें रघुनाथपंत हणमंत्याच्या मध्यस्थीनें सख्य झालें (शके १६०१, सन १६७९). तंजावर प्रांत व्यंकोजीकडे कायम होऊन जिंजीखालील मुलुखापैकीं सात लाख होनांचा मुलूख त्यास जहागीर मिळाला. म्हैसूरकडे बंगलूर, होस्कोटें व सिलेकोट हे दोन लाख होनांचे प्रांत शिवाजीनें व्यंकोजीची स्त्री दिपाबाई हींस 'चोळी–बांगडी'करितां बक्षिस दिले. व्यंकोजीनें आपण विजापूरकरांचे चाकर ही समजूत सोडून देऊन शिवाजीच्या व रघुनाथपंताच्या संमतीनें वर्तणूक करावी असें ठरलें. शेवटच्या अटीवरून शिवाजीची कर्नाटकावरील स्वारी केवळ स्वराज्याच्या विस्ताराकरितां होती हें उघड दिसतें.

७. शिवाजीनें परत येतांना तुंगभद्रेच्या उत्तरेकडील मुलुखांत कांहीं फौज ठेवून दिली होती. तुंगभद्रा व कृष्णा या नद्यांमधील मुलुखास दुआब म्हणतात. हा दुआब विजापूरकरांच्या ताब्यांत असून हुसेनखान मायणा हा पठाण सरदार बेळगांव येथें राहून त्याच्या उत्तरभागावर अंमल चालवी व त्याचा भाऊ कासीमखान मायणा

* इतिहाससंग्रह–तंजावरचें राजघराणें, पृष्ठ ३६-३८.

हा कोपळ येथून दक्षिण भागावर सत्ता गाजवी. तुंगभद्रेच्या दक्षिणेस जिंकलेल्या मुलुखाशीं आपलें दळणवळण सुलभ करण्यासाठीं हा प्रांत घेणें मराठ्यांस जरूर होतें. लवकरच मोरोपंत पिंगळ्यानें कोपळ काबीज केलें. पूर्व कर्नाटकांतील व्यवस्था नीट लागल्यामुळें शिवाजीनें हंबीरराव मोहित्यास आपली फौज घेऊन परत बोलाविलें. महाराष्ट्रांत परत येत असतां दुआबांतील फौजेंत कांहीं काळ त्यानें मुक्काम केला. तेव्हां हुसेनखान मायणा त्याच्यावर चालून गेला. सावनूरजवळ मराठे व मायणा यांची गांठ पडली. त्याप्रसंगीं हंबीरराव अशा निकरानें लढला कीं, त्यानें विजापूरकरांच्या सैन्याची रेवडी उडविली. खुद्द हुसेनखान मायणा कैद झाला. ही बातमी विजापुरास कळतांच दरबारांत अगदीं हलकल्लोळ उडून गेला. मायणास सोडविण्याकरितां एका मोठ्या सैन्याची रवानगी झाली. हें सैन्य आलें तेव्हां हंबीरराव सावधच होता. शिवाय त्याच्या मदतीस आतां धनाजी जाधव येऊन पोहोंचला. मग काय ! त्या दोघांनीं त्या सैन्यास हां हां म्हणतां विजापूरपर्यंत पिटाळून लाविलें. हें युद्ध झाल्यावर धनाजी जाधव शिवाजीस भेटण्याकरितां रायगडास आला. शिवाजीनें लढाईचें वृत्त ऐकिलें, तेव्हां तो धनाजीस म्हणाला, " तुमच्यासारखीं माणसें प्रतिसृष्टि निर्माण करतील. आमच्या साह्यास देवलोकाहून मनुष्यरूप घेऊन निर्माण झालां असें वाटतें. पंचवीस तीस हजार माणसांशीं पांच सहा हजार असून तुम्हीं झुंज घेतलें आणि त्यास पिटाळलें ना ! शाबास धनाजीराव ! शाबास*हंबीरराव !" यापुढें तुंगभद्रा व कृष्णा यांजमधील दुआब मराठ्यांच्या ताब्यांत आला. याचा एक स्वतंत्र प्रांत बनविण्यांत येऊन त्याजवर जनार्दन नारायण हणमंते सुमंत यांची मुख्य अधिकारी म्हणून नेमणूक झाली (सन १६७९).

८. शिवाजी व व्यंकोजी या दोघां बंधूंमध्यें तह झाला खरा;

* शिवदिग्विजय पृष्ठ ३४५.

पण 'मी विजापूरकरांचा नोकर आहें' ही भावना व्यंकोजीच्या मनांत दृढमूल झाली असल्यामुळें शिवाजीच्या हुकुमांत वागणें त्याला मनापासून रुचलें नाहीं. पुढें तर अत्यंत बिकट प्रसंगीं शिवाजीनें साह्याच्य केल्यावरून विजापूरकर खूष झाले व शिवाजीनें कर्नाटकांत जिंकलेला मुलूख व तंजावर यांजवरील आपला स्वामित्वाचा हक्क त्यांनीं अजिबात सोडून दिला. तेव्हांपासून दिवसेंदिवस राज्यकार-भाराचा भार लोकांवर सोंपवून व्यंकोजी स्वतः अगदीं विरक्ताप्रमाणें वागूं लागला. ही गोष्ट रघुनाथपंताने शिवाजीस कळविली. तेव्हां शिवा-जीस दुःख झालें. आपला भाऊ राज्यकारभारांत लक्ष घालून आपल्या घराण्याचा लौकिक कसा काय राखतो हें कळण्याविषयीं त्यास एक-सारखी उत्कंठा लागली व त्यानें पत्र पाठवून बंधूस सन्मार्गदर्शक असा सुंदर उपदेश केला. तें पत्र येणेंप्रमाणें:—

"श्रियासह चिरंजीव अखंडित—लक्ष्मीअलंकृत राजश्रिया विराजित राज-मान्य राजश्री महाराज व्यंकोजी राजे प्रति राजश्री शिवाजी राजे आशीर्वाद. येथील क्षेम जाणोन स्वकीय कुशल लेखन करणें. विशेषः-कित्येक दिवस झाले, तुमचें पत्र येत नाहीं. याकरितां समाधान वाटत नाहीं. सांप्रत राजश्री रघु-नाथपंतीं लिहिलें कीं, तुम्हीं आपलें ठायीं उदासवृत्ति धरून पहिलेसारखे आपलें शरीर संरक्षण करीत नाहीं. सणवार उत्सवादिक हेंही कांहीं करीत नाहीं. सेना बहुत आहे. परंतु उद्योग करून कार्य प्रयोजन करवावें, हेंही कांहीं करीत नाहीं. वैराग्य धरिलें आहे. एखादे तीर्थाचे जागीं वसून कालक्रमणा करूं, ऐशा गोष्टी सांगतां म्हणोन विस्तारें लिहिलें होतें. तरी या गोष्टी आम्हांस बहुत अपूर्व वाटल्या कीं, कैलासवासी स्वामींनीं कसे कसे प्रसंग पडले ते निर्वाह करून यवनांच्या सेवा करून, आपल्या पुरुषार्थें बाजी संवारून, उत्कर्ष करून घेतला. शेवट बरा निर्वाह केला. तें सर्व तुम्ही जाणतां. त्यांच्या साह्यतेस त्यांच्या बुद्धियुक्ति सर्वही तुम्हांस उपतिष्ठोन त्यापासून शहाणे जाले आहां. त्याउपरी आम्हींही जे जे प्रसंग पडले, ते निर्वाह करून कोणे तऱ्हेनें राज्य मिळविलें, हें जाणतां व देखत आहां. असें असोन तुम्हांला ऐसा कोणता

प्रसंग पडला जे इतक्याचमध्यें आपल्या संसाराची कृतकृत्यता मानून नसतें वैराग्य मनावरी आणून, कार्यप्रयोजनाचा उद्योग सोडोन, लोकांहातीं रिकामेपणीं द्रव्य खाऊन, नाश करवणें, व आपल्या शरीराची उपेक्षा करणें. हें कोण शहाणपण व कोणती नीति ? व आम्ही तुम्हांस वडील मस्तकीं असतां चिंता कोणे गोष्टीची आहे ? याउपरी सहसा वैराग्य न धरितां मनांतून विपण्णता (काढून) कालक्रमणा करीत जाणें. सणवार उत्साह पूर्ववत् करीत जाऊन तुम्हीं आपलें शरीरसंरक्षण वरें करीत जाणें. जमेती सेवक लोकांना रिकामें न ठेवून, कार्यप्रयोजनाचा उद्योग करून, त्यांपासून सेवा करून, पुरुषार्थ व कीर्ति अर्जणें. तुम्ही त्या प्रांतें पुरुषार्थ करून संतोषरूप असलिया. आम्हांस समाधान व श्लाघ्य आहे कीं. कनिष्ठ बंधु असे पुरुषार्थी आहेती. रा. रघुनाथपंडित त्या प्रांतें आहेती. ते कांहीं इतर नव्हेती, आपले पुरातन तुम्हांसी कोणे रीतीनें वर्तावें हें निपुण जाणितात. आम्हांस मानितात तैसें तुम्हांस मानितात. आम्हीं त्यांचे ठायीं विश्वास ठेविला आहे. तैसा विश्वास तुम्हींही ठेवून, कार्यप्रयोजनास परस्परें अनुकूल व साह्य होऊन वर्तत जाणें. पुरुषार्थ व कीर्ति अर्जणें. रिकामे बैसोन. लोकांहातीं नाचीज खावयून, काल व्यर्थ न गमावणें. कार्यप्रयोजनाचे दिवस हे आहेती. वैराग्य उत्तरवयीं करावें तें थोडें. आज उद्योग करून आम्हांसही तमासे दाखविणें. बहुत काय लिहिणें, तुम्ही सुज्ञ असा. "*(मोर्तब मर्यादेयं विराजते.)

---

२२. विजापूरकरांस साहाय्य.

शिवाजीनें कर्नाटकप्रांतीं स्वारीवर जातांना गोवळकोंडेकरांशीं सख्य केलें होतें. हें विजापूरचा कारभारी बहलोलखान यांस रुचलें नाहीं. त्याला गोवळकोंडेकरांचा राग आला. औरंगजेबाचा दक्षिणचा

* इतिहाससंग्रह, तंजावरचें राजवर्णन,पृष्ठें ४२—४३.

सुभेदार दिलीरखान तर दक्षिणेंतील या दोन्ही सुलतानांस निःसत्त्व करण्यास बसला होता. त्यानें विजापूरकरांशीं ऐक्य करून गोवळकोंड्यावर स्वारी केली. पण मादण्णापंतानें मोठी मेहनत घेऊन सैन्य जमविलें असल्यामुळें विजापूरकर व मोंगल यांचा पराभव झाला. लवकरच बहलोलखान वारला (सन १६७७). त्याच्या जागीं मसाउदखान सिद्दी हा कारभारी झाला. दिलीरखानाच्या गोवळकोंड्याच्या स्वारीची हकीकत ऐकून औरंगजेबास मुळींच बरें वाटलें नाहीं. त्यानें दिलीरखानास विजापुरावर एकदम स्वारी करण्याविषयीं हुकूम केला. या हुकुमाप्रमाणें दिलीरखानानें विजापुरावर चालून जाऊन त्या शहरास वेढा घातला. या मोंगलांच्या वेढ्यानें मसाउदखान अगदीं हताश होऊन गेला. आतां काय करावें? मोंगलांपासून आपलें रक्षण कोण करील? याचा तो विचार करूं लागला. शेवटीं शिवाजीस विनंति करून पहावी, त्यानें आपलें रक्षण केलें तर बरेंच झालें, असा विचार मसाउदच्या मनांत आला. लागलीच त्यानें मिनतवारीचें एक पत्र शिवाजीस पाठविलें. शिवाजीस पत्र पोहोंचतांच विजापुरकरांस साहाय्य करण्याचें काम त्यानें मोठ्या खुषीनें पत्करिलें. विजापुरास दिलीरखानानें घातलेला वेढा उठविणें हेंच शिवाजीचें मुख्य काम होतें. तो उठविण्यास गनिमी काव्याचा उपयोग करण्याचा शिवाजीनें निश्चय केला. तो स्वार घेऊन निघाला, तों तडक गोदावरी उतरून जालना शहरास आला. सुलतान मुअज्जम औरंगाबादेस होता; तरी त्याची फारशी फिकीर न करितां त्यानें तीन दिवसपर्यंत जालन्याचा खंड वसूल केला. हें सर्व करण्यामध्यें त्याचा असा हेतु होता कीं, आपला प्रांत उध्वस्त होत आहे या भीतीनें दिलीरखान वेढा उठवून परत येईल व विजापुरावरचें संकट टळेल. त्यानें त्या मोंगलांच्या परगण्यांत धुमाकूळ मांडला. पण दिलीरखान वेढा उठवीना. दिलीरखानाचें कोणतेंच कृत्य औरंगजेबास

पसंत पडत नव्हतें. तेव्हां त्यानें या वेळीं हुकुमाप्रमाणें विजापूर कार्बीज करण्याचा निश्चय केला होता. शिवाजीवर मुअज्जमानें रण-मस्तखानास दहा हजार फौज देऊन पाठविलें. तो पाठलाग करीत आला. व त्यानें शिवाजीस*जालन्याजवळ गांठिलें. तेथें मोठी निकराची लढाई झाली. तींत पहिल्यानें मराठ्यांचा पराजय होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. सिधोजी निंबाळकर पडला. संताजी घोरपडे कच खाऊन मागें फिरला. तेव्हां स्वतः शिवाजीनें सैन्यास उत्तेजन देऊन शत्रूचा हल्ला परतवून मोंगल सैन्य उधळून लाविलें. इतक्यांत किसनसिंगाच्या हाताखालीं वीस हजारांची मोंगल सैन्यांत भर पडली. त्याबरोबर बहिरजी नाइकानें दाखविलेल्या आडवाटेनें शिवाजी संपत्तीसह नाशिकजवळच्या पट्टा किल्ल्यावर येऊन पोहोंचला. तेव्हां मोंगल औरंगाबादेस परत गेले. या वेळीं पट्टा किल्ल्यावर अत्यंत अवश्यक अशी विश्रांति मिळाली, यावरून शिवाजीनें त्या किल्ल्याचें नांव विश्रामगड असें ठेविलें (कार्तिक शके १६०१, नोव्हेंबर १६७९).

२. शिवाजी रायगडास पोंचतांच विजापुराहून अगदीं काकुळतीचा निरोप आला कीं, "लवकर येऊन अदिलशाहीचें रक्षण करा." तेव्हां शिवाजी सैन्य घेऊन थेट विजापुरास जाण्यास निघाला. वाटेंत त्याचा थोरला मुलगा संभाजी फितूर होऊन मोंगलांस मिळाला होता तो परत आल्याची बातमी समजली. ती ऐकून शिवाजीस किती आनंद झाला म्हणून सांगावें! हंबीररावास विजापुरास जाण्याचें काम सांगून संभाजीची नीट व्यवस्था लावण्यास तो मागें फिरला.

३. संभाजी हा शिवाजीचा वडील मुलगा. लहानपणापासून त्याचें शौर्य दिसूं लागलें होतें. पण दुर्दैवानें त्याच्या अंगांत व्रात्यपणाही शिरला होता. कांहीं वाईट वर्तन केल्यामुळें शिवाजीनें

* ही लढाई संगमनेरास झाली असें ग्रँटडफ म्हणतो; ग्रँटडफकृत मराठ्यांचा इतिहास भाग १, पृष्ठ २२३; (१९२१ ची प्रत).

त्यास पन्हाळ्यास बंदोबस्तानें ठेविलें होतें. तेथून तो निसटला व दिलीरखानास जाऊन मिळाला (१३।१२।१६७८). संभाजी आपल्याकडे आल्याचें पाहून खानास मोठा हर्ष झाला. लागलीच त्यानें मोठ्या घाईनें ती बातमी औरंगजेबास कळविली व संभाजीस हातीं धरून मराठ्यांचा निःपात सहज करितां येईल असें सुचविलें. औरंगजेबास ही सूचना मुळींच पसंत पडली नाहीं. त्यानें संभाजीस कैद करून दिल्लीस पाठवून देण्याचा दिलीरखानास हुकूम पाठविला. दिलीरखानानें संभाजीचा फार मान केला होता. त्याला संभाजीचा विश्वासघात करणें बरें वाटलें नाहीं. संभाजीची समजूत करण्यास शिवाजीकडून माणसें आलीं होतींच. त्यांजबरोबर त्यानें संभाजीस परत पाठवून दिलें. औरंगजेबाचा आपल्यास कैदेत घालण्याचा बेत पाहून संभाजीच्या लक्षांत आपली चूक आली होतीच; म्हणून मोंगलांकडे गेल्याबद्दल त्याला पश्चात्ताप झाला होता. शिवाजीनें त्याची भेट घेतली (१३।१।१६८०). व त्याचें मन न दुखवितां तो सुधारेपर्यंत त्यास पन्हाळ्यास ठेविलें. त्याच्यावर देखरेखीकरितां हिरोजी फर्जंद व आणखी कांहीं मंडळी होती.

४. विजापुराकडे हंबीरराव गेला होता. त्यानें दिलीरखानच्या सैन्यास दाणा-चारा मिळूं न देण्याचा अटोकाट प्रयत्न चालविला. शिवाय मराठे मदतीस आले. त्यामुळें मसाउदखानास शहरचें रक्षण करण्यास विशेष नेट आला. शेवटीं दिलीरखान अगदीं कंटाळून गेला. त्याला विजापूर हस्तगत होणें हें अशक्य वाटलें. याच वेळीं मोरोपंत पेशव्यानें आंदा व नाहावागड हे किल्ले घेऊन आपलें सैन्य सर्व खानदेशभर पसरविलें होतें. त्यामुळें दिलीरखान वेढा उठवून परत गेला व विजापूरकरांस शिवाजीनें मदत केली म्हणूनच त्या शहरचा बचाव झाला आणि अदिलशाही आणखी कांहीं वर्षें जगली. मसाउदखानही हे शिवाजीचे उपकार जाणून होता. त्याची व शिवाजीची

विजापुराजवळ भेट झाली. तींत त्यानें कर्नाटकांत शिवाजीनें जिंकलेला सर्व मुलूख मराठ्यांस देऊन शहाजीच्या जहागिरीचा मुलूख शिवाजीस दिला व त्यावरचे सर्व हक्क सोडले.

५. विजापूरकरांस साहाय्य करणें हेंच शिवाजीच्या आयुष्यांतील त्याचें शेवटचें मोठें कृत्य होय. यापुढें तो फार दिवस वांचला नाहीं. शके १६०२ (मार्च सन १६८०) च्या आरंभास त्याला गुदगी रोग झाला. त्यांतच त्याला ताप येऊन तो आल्यापासून सातवे दिवशीं (चैत्र शुद्ध पौर्णिमेस) रायगडावर त्याचें देहावसान झालें. शिवाजीचें मृत्युसमयीं वय अवघें ५० वर्षांचें होतें. त्याला दुर्दैवानें अकालीं मृत्यु आला. रायगडावर जगदीश्वराच्या देवालयाच्या महाद्वाराच्या बाहेर दक्षिणभागीं बेलाचीं, चंदनाचीं व तुलसीचीं काष्ठें आणि कापूर घालून त्याला अग्नि दिला. त्या ठिकाणीं छातीइतकें उंच काळ्या चिऱ्यांचें अष्टकोनी जोतें बांधिलें. पुढें त्यावर छत्री बांधावयाची; पण पुढील धामधुमीच्या काळांत ती गोष्ट तशीच राहून गेली.

६. शिवाजीच्या बालपणीं महाराष्ट्रावर विजापूरच्या सुलतानाचें राज्य होतें. दिल्लीच्या मोंगल बादशहानीं अहमदनगरच्या निजामशाहीचा नुकताच नाश केला होता, व विजापूर आणि गोवळकोंडें येथील राज्यें गट्ट करून सर्व दक्षिण आसमुद्र जिंकून टाकण्याचा त्यांचा विचार होता! अशा वेळीं प्रथम विजापूरकरांशीं झगडून शिवाजीनें हिंदवी राज्याची स्थापना केली. पुढें दिल्लीपति सामर्थ्यवान् बादशहा औरंगजेब याशीं विरोध करण्याचा त्याच्यावर प्रसंग आला. औरंगजेबापाशीं सैन्य व धन यांचा मुबलक पुरवठा असून 'कपटविद्येंत' तर त्याचा हातखंडा असे. शिवाय हिंदुस्थानचा तो बादशहा असल्यामुळें त्याच्या नांवाचा वचकही सर्वत्र बसून गेला होता. परंतु त्याच्या राज्यांत उत्तरेकडे सारखीं बंडें होत होतीं व त्याचा स्वभावही अत्यंत संशयी असे. आपल्या कार्यास ह्या गोष्टी

अनुकूल आहेत हें पक्कें ओळखून शिवाजीनें त्याच्या सैन्यास निर्माल्यवत् केलें व त्याच्या कपटावर आपल्या युक्तीची व प्रसंगावधानाची योजना करून आपलें राज्य निर्बाध राखिलें. अप्रतिम शौर्य, अलौकिक धैर्य, उदात्त नीति आणि उत्कट स्वाभिमान त्याच्या अंगीं असून मातृभक्ति व पितृनिष्ठा आणि धर्मश्रद्धा व राष्ट्रप्रेम या उज्वल भावनाही त्याच्याठायीं उत्कटत्वानें बाणून गेल्या होत्या. महाराष्ट्रास **'राष्ट्रीय स्वातंत्र्य'** प्राप्त करून देऊन उत्तम राज्यपद्धति घालून देणारा शिवाजी खरोखर धन्य होय! शिवाजी हा हिंदूंमधील शेवटचा प्रतिभाशाली, कर्ता राज्यसंस्थापक होय.* त्याची थोरवी कोठवर वर्णावी? "राजा साक्षात् केवळ अवतारीच जन्मास येऊन पराक्रम केला. नर्मदेपासून रामेश्वरपर्यंत द्वाही फिरली. देश काबीज केला. अदलशाई, कुतुबशाई निजामशाई, मोंगलाई ह्या चारी पातशहा व समुद्रांतील बेबीस पातशहा असे जेर जप्त करून नवेंच राज्य साधून मराठा पातशाहा सिंहासनाधीश छत्रपति जाहला. प्रतिइच्छा मरण पावून कैलासास गेला. ये जातीचा कोणी मागें जाहला नाहीं, पुढेंही होणार नाहीं."+

---

२३. संभाजीस राज्यप्राप्ति.

शिवाजी मरण पावला तेव्हां त्याचा वडील मुलगा संभाजी पन्हाळा किल्ल्यावर नजरबंदींत होता. शिवाजीच्या मरणाची बातमी ऐकतांच मोरोपंत पेशवे व अण्णाजी दत्तो सचिव हे रायगडास

*यदुनाथ सरकारकृत 'शिवाजी आणि त्याचा काळ,' पृष्ठ ४९६.
+सभासद बखर, पृष्ठ १६४.

आले. तेथें आतां गादीवर कोणास वसवावें हा प्रश्न निघाला. संभाजी हा शिवाजीचा वडील मुलगा खरा, पण दुर्वर्तनी व अविचारी असल्यामुळें तो गादीवर आला तर राज्यावर संकट आल्याशिवाय राहणार नाहीं असें सर्व कर्त्या मंडळीस वाटलें. औरंगजेब स्वतः दक्षिणेंतील सर्व राज्यें नाहींशीं करण्याच्या निश्चयानें लवकरच महाराष्ट्रांत येणार, त्याकरितां या वेळीं मराठी राज्य सुयंत्रित चालणें तर अत्यंत जरूरीचें होतें. सोयराबाईनें सुचविलें कीं, माझा मुलगा राजाराम यास गादीवर बसवून कारभार चालवा. अण्णाजी दत्तो व मोरोपंत पिंगळे यांना हा विचार पटला व त्यांनीं इतर कर्त्या पुरुषांस अनुकूल करून घेऊन राजारामास गादीवर बसविण्याचा बेत कायम केला. कोल्हापुरास जनार्दनपंत हणमंते सुमंत होता. त्यास पन्हाळचा बंदोबस्त फार कडेकोट ठेवण्याविषयीं लिहिलें. शिवाजीच्या मृत्यूची बातमी संभाजीस मुळींच कळूं देऊं नका व जास्त नजर राखा, अशा अर्थाच्या चिठ्या पन्हाळ्यावर हिरोजी फर्जंदास पाठविल्या. येणेंप्रमाणें राज्यांतील सर्व कर्त्या पुरुषांनीं संभाजीस बाजूला ठेवून राजारामास गादीवर बसवून सुरळीतपणानें राज्य हांकण्याची मसलत केली. शिवाजीच्या मरणानंतर सुमारें एक महिन्यानें राजारामास राज्याभिषेक झाला. पण ही मसलत शेवटास गेली नाहीं. रायगडाहून हिरोजी फर्जंदास गुप्तपणा राखण्याविषयीं हुकूम गेले होते, पण गुप्तपणा शेवटपर्यंत राखला गेला नाहीं. संभाजीस शिवाजीच्या मृत्यूची बातमी कर्णोपकर्णीं कळली. त्यानें हिरोजी फर्जंदास आलेले हुकूम ज्यानें आणिले होते त्यास बोलावून आणून धमकी देऊन विचारिलें, तेव्हां कारभाऱ्यांची सर्व मसलत त्याला कळली. त्यानें लगेच उग्र स्वरूप धारण केलें. हुकूम आणणाऱ्या लोकांचा कडेलोट केला. हिरोजी फर्जंद कोंकणांत पळून गेला. लगेच पन्हाळा किल्ला संभाजीच्या

सहज हस्तगत झाला. १ जनार्दनपंत कोल्हापुरास सैन्य घेऊन होता. त्याच्या सैन्यांत संभाजीनें फितुर केला व त्याच्यावर चाल करून त्याच्या पायांत विड्या ठोकल्या. २ हंबीरराव मोहिते सेनापति कऱ्हाडास होता. संभाजीचीं हीं धाडसाचीं कृत्यें पाहून सेनापतीच्या मनांत आदर उत्पन्न झाला, व तो तत्काल संभाजीस मिळाला. पुढील व्यवस्थेकरितां मोरोपंत पिंगळे पन्हाळ्याकडे जात होता. सेनापति मसलतींतून फुटला असें पाहतांच तोही संभाजीस जाऊन मिळाला. मग संभाजीनें रायगडावर चाल केली. तेव्हां तो गड त्याच्या हातीं लागण्यास कांहींच उशीर लागला नाहीं. रायगड काबीज होतांच आपल्या विरुद्ध असलेल्या लोकांस त्यानें शिक्षा करण्याचा सपाटा चालविला. ३ अण्णाजी दत्तो व मोरोपंत पिंगळे या दोघांस कैदेत टाकलें. ४ राजारामाची आई सोयराबाई हीस तर त्यानें फारच क्रूरपणाची भयंकर शिक्षा दिली; भिंतीच्या कोनाड्यांत तिला चिणून टाकलें. तेथें तिचा तिसरे दिवशीं प्राण गेला.

२. औरंगजेब बादशहाचा मुलगा महंमद अकबर यानें बादशहाविरुद्ध बंड केलें (१।१।१६८१). तेव्हां त्याला धरण्यास बादशहानें सरदार पाठविले. अकबर दक्षिणेत पळून आला व संभाजीपाशीं आश्रय मागूं लागला. संभाजीनें त्याचा सत्कार करून त्याला रायगडाजवळ घोडसें गांवीं ठेवून दिलें. पुढें अण्णाजी दत्तो आदिकरून मंडळीनीं अकबरापाशीं राजारामास गादीवर बसविण्याचें कारस्थान केलें आहे असें संभाजीस कळलें. हें ऐकतांच तो वाघासारखा चवताळून रायगडास आला आणि कटांत सामील असल्याबद्दल ज्यांचा त्याला संशय आला त्या सर्वांस त्यानें देहान्तशिक्षा दिली. ६ अण्णाजी दत्तो व बाळाजी आवजी चिटणीस यांस हत्तीच्या पायीं दिलें (भाद्रपद शके १६०३). संभाजी या वेळला अगदीं चिडून गेला होता. + कलुशा

+ कलुशा आपल्याला 'कविकुलेश' म्हणजे कविश्रेष्ठ म्हणवी. या

नांवाचा एक दुष्ट कनोजा ब्राह्मण त्याचा मुख्य सल्लागार होता. तो भोंसल्यांच्या प्रयाग येथील पिढीजाद क्षेत्रोपाध्यांच्या घराण्यापैकीं असून संभाजीला राज्याभिषेक होण्यापूर्वी थोडे दिवस दक्षिणेत येऊन दाखल झाला. त्यानें व इतर सल्लागारांनीं संभाजी क्रोधवश झाला आहे असें पाहून शिवाजीच्या उत्तम नररत्नांची अशी वाट लाविली. संभाजीची बायको येसूबाई त्याला म्हणाली, " बहूत दिवसांचे कर्ते पुरुष तुम्हीं काय म्हणून जिवें मारले ? त्यांणीं काय अपराध केला होता ? हलक्या लोकांच्या मसलती घेऊन राज्य कसें चालेल ? " यावेळीं संभाजीचा राग गेला होता. आपली चूक त्याच्या लक्षांत आली. त्यानें बाळाजी आवजीचे मुलगे खंडो व निळो या दोघांसही बडिलांचीं कामें दिलीं. पण मन शांत ठेवून विचारानें चालण्याचें संभाजीच्या हातून निभावणें शक्य नव्हतें. कारण त्याचा सर्व विश्वास त्याचा मुख्य सल्लागार कलुशा याजवर; आणि तो तर शिवाजीच्या वेळेचीं माणसें निघतील तितकीं काढण्यास टपलेला! त्याचें संभाजीवर जास्त जास्त वजन पडत चाललें होतें.

३. संभाजीस सुधारावें या इच्छेनें दोघां मोठ्या व्यक्तींनीं प्रयत्न केला. पहिली व्यक्ति म्हणजे शिवाजीचे गुरु रामदास. यांनीं संभाजी गादीवर बसल्यावर त्यास एक उपदेशपर पत्र पाठविलें. त्यांतील महत्त्वाचा भाग खालीं दिला आहे.

मागील अपराध क्षमावे । कारभारी हातीं धरावे ॥
सुखी करूनि सोडावें । कामाकडे ॥ १ ॥
श्रेष्ठीं जें जें मेळविलें । त्यासाठीं भांडत बैसलें ॥
तरी मग जाणावें फावलें । गनीमासी ॥ २ ॥

नांवापैकीं कवीचा **कन्जी** व कुलेशाचा **कलुशा** असे अपभ्रंश झाले, व कलुशाच्या दुष्टपणामुळें तींच त्याचीं नांवें पडलीं. कविकलश असेंही त्याचें नांव लिहिलेलें आढळतें.

ऐसें सहसा करूं नये । दोघे भांडतां तिसऱ्या जये ॥
धीर धरूनी महाकार्य । समजूनी करावें ॥ ३ ॥
आहे तितकें जतन करावें । पुढें आणीक मेळवावें ॥
महाराष्ट्रराज्याचि करावें । जिकडे तिकडे ॥ ४ ॥
शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा प्रताप ।
शिवराजाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ॥ ५ ॥

४. हा उपदेश केल्यावर थोड्याच दिवसांनीं म्हणजे माघ वद्य ९ शके १६०३ या दिवशीं समर्थ रामदासस्वामी समाधिस्थ झाले. संभाजीस ताळ्यावर आणण्याची खटपट करणारा दुसरा गृहस्थ रघुनाथ नारायण हणमंते. शिवाजीचा कर्नाटकांतील अम्मलदार, हा होय. हा संभाजीच्या भेटीकरितां बरोबर मोठें सैन्य घेऊन आला (शके १६०४ चैत्र). बरोबर त्यानें कर्नाटक प्रांताच्या वसुलाचे ४० लक्ष होन आणले होते. संभाजीनें विरवाडीस एका शोभिवंत मंडपांत त्याची भेट घेतली. सरदार वगैरे राज्यांतील मानकरी हजर होते. त्या सर्वांसमक्ष रघुनाथपंतानें संभाजीस चार उपदेशपर शब्द सांगितले. "तुम्हीं राज्यांतील सर्व कर्ते माणसें ठार मारलीं. आतां औरंगजेब उत्तरेकडून स्वारी करून येत आहे त्याचा प्रतिकार करण्याची तुम्हीं काय तयारी केली आहे ?" पण हें सर्व बोलणें संभाजीस रुचलें नाहीं. औरंगजेब दक्षिणेंतील सर्व राज्यें बुडविण्याच्या उद्देशानें येणार असें कळल्यावर रघुनाथपंताचा दक्षिणेंतील तिन्ही राज्यांचा एकोपा करण्याचा विचार होता. पण संभाजीचें मन कलुशानें अगदीं भारून टाकलें आहे हें पाहून त्यास आपली मसलत सिद्धीस जाईल असें वाटलें नाहीं. म्हणून तो कर्नाटकांत परत निघून गेला. तिकडे तो थोडक्याच दिवसांनीं वारला (शके १६०५ वैशाख). रघुनाथपंताच्या मृत्यूनंतर जिंजीकडील मुलुखाची व्यवस्था शिवाजीचा जांवई हरजी राजे महाडीक याजकडे आली व त्याच्या मदतीस निळो मोरेश्वर पिंगळे याची नेमणूक झाली

२४. सिद्दी व पोर्तुगीज यांच्याशीं दोन हात.

संभाजी व्यसनी होता, हट्टी होता, पण तो शूरही होता. शिवाजीनें सिद्दीच्या ताब्यांतील जंजिरा घेण्याकरितां अतिशय खटपट केली. तथापि तो किल्ला कांहीं त्याच्या हातीं आला नाहीं. शिवाजी वारल्यावर सिद्दी मराठ्यांच्या प्रांतांत आला व पुष्कळ माणसांस गुलाम म्हणून विकण्याकरितां त्यानें पकडून नेलें. आणखी एका प्रसंगीं मराठे लोक गलबतांतून चालले होते. त्यांवर एकाएकीं छापा घालून ८० असामींस सिद्दीनें ठार केलें. त्याच वेळीं औरंगजेबानें तुम्हीं मराठ्यांस होईल तितका त्रास द्यावा असा हुकूम त्यास पाठविला. मग काय ! हुकुमाची अम्मलबजावणी करण्याकरितां सिद्दीनें आपलें आरमार वाढविलें. या गोष्टी संभाजीस कळल्या, तेव्हां संभाजीस त्याचा फार राग आला व सिद्दीचा नायनाट करण्याचा त्यानें निश्चय केला.

२. प्रथम खंडोजी फर्जंद यानें जंजिऱ्यांत फितूर करण्याचें काम पत्करलें व जंजिऱ्यास जाऊन सिद्दीची नोकरी धरली. पण एका दासीनें खंडोजीची सर्व हकीकत सिद्दीस कळविली; सिद्दीनें चौकशी केली तों खरें बाहेर पडलें. फर्जंदास मग तो कसची क्षमा करतो ? त्यानें त्यास एकदम ठार केलें. दादजी रघुनाथ देशपांडे यानें (कलुशा) कब्जीमार्फत संभाजीकडे बोलणें लाविलें कीं, मी जंजिरा घेऊन देतों. संभाजी जंजिरा घेण्याविषयीं फार उत्सुक झाला होता. त्यानें दादजीस जंजिरा घेण्याच्या कामगिरीवर नेमिलें व जर जंजिरा फत्ते करून द्याल तर अष्टप्रधानांत जागा देईन असें कबूल केलें. दादजीनें जंजिऱ्यास वेढा घातला. संभाजी महमद अकबरास बरोबर घेऊन स्वतः जंजिरा घेण्याकरितां कोंकणांत गेला व त्यानें जंजिरा घेण्याची

एक अजब युक्ति काढली. त्यानें किल्ल्यापर्यंत खाडीच मुळीं भरून काढण्याचा विचार केला होता. केवढा साहसाचा विचार हा ! जरी शेवटीं संभाजीस जंजिरा मिळाला नाहीं. तरी या त्याच्या कल्पनेवरून जंजिरा घेण्याविषयीं त्यास किती उत्सुकता वाटत होती, हें समजतें. परंतु हें सर्व कल्पनेचें साम्राज्य ! संभाजीस प्रत्यक्ष कांहींच करतां आलें नाहीं. कारण रणमस्तखान नांवाचा मोंगल सरदार येऊन कल्याण प्रांत लुटूं लागला. त्यामुळें संभाजीस कल्याणाकडे जाणें भाग पडलें. दादजी रघुनाथ यानें जंजिऱ्यास वेढा घातला होता; परंतु पावसाळ्यांत त्याचा टिकाव लागला नाहीं. सिद्दीनें दादजीचा अगदीं पराभव केला व महाडपर्यंत मराठ्यांचा मुलूख लुटला. यापुढें मराठ्यांचीं व सिद्दीचीं कांहीं युद्धें झालीं, पण तीं विशेष महत्त्वाचीं नाहींत.

३. सोळाव्या शतकापासून कोंकणांत युरोपांतील निरनिराळे लोक येऊन आपलीं ठाणीं करून राहिले होते. त्यांतील पोर्तुगीज हे त्या वेळीं प्रबळ होते. यांनीं व्यापाराबरोबरच आपलें राज्य वाढविण्याचें धोरण ठेवून कोंकणपट्टींतील बराच मुलूख आपल्या सत्तेखालीं आणला होता. साष्टी बेट आणि दमण, वसई, रेवदंडा व गोवें हीं बंदरें पोर्तुगीजांच्या ताब्यांत होतीं. परंतु मुसलमान व मराठे यांजमध्यें जेव्हां युद्धाचा प्रसंग येई तेव्हां या लोकांची लुडबुड फार असे. संभाजीचें सिद्दीशीं युद्ध चाललें होतें, तेव्हां पोर्तुगीजांनीं संभाजीच्या मार्गांत फार अडचणी आणल्या. आपल्या बंदरांवरून त्यांचीं जहाजेंच जाऊं देऊं नयेत, शिवाय सिद्दीस मदत करावी, वगैरे त्यांच्या लटपटी सारख्या चालल्या होत्या. तेव्हां संभाजीनें पोर्तुगीज लोकांची खोड मोडण्याचा विचार केला, आणि त्यांच्या रेवदंडा (चौल) बंदरास वेढा घातला. त्यांचा गव्हर्नर गोव्यास रहात होता. त्यास हें कसचें खपतें ? त्यानें जंगी फौज बरोबर घेऊन मराठ्यांच्या मुलुखांत दंगा

आरंभिला व फोंडे किल्ल्यास वेढा घातला. ही वार्तमी कळतांच संभाजी तडक तिकडे चालून गेला, व त्यानें पोर्तुगीजांच्या पिछाडीवर हल्ला चढविला. त्यावरोबर गोव्याशीं आपलें दळणवळण तुटणार अशी गव्हर्नरास भीति पडली व त्यानें वेढा उठवून परत गोव्यास जाण्याचें ठरविलें. तेव्हां फोंड्याजवळ मराठ्यांची व पोर्तुगीजांची फार निकराची लढाई झाली. तींत पोर्तुगीजांचा पूर्ण पराभव झाला. त्यांच्याकडील दोनशें पोर्तुगीज व एक हजार एतद्देशीय शिपायी प्राणास मुकले. त्यांच्या तोफा, दारुगोळा व लष्करची इतर सर्व सामुग्री मराठ्यांच्या हस्तगत झाली. रणांगणांतून पळ काढून पोर्तुगीज फौजेनें मोठ्या शिकस्तीनें गोवें गांठलें. या युद्धांत मराठ्यांकडील येसाजी कंक व त्याचा मुलगा कृष्णाजी कंक यांनीं मोठा पराक्रम गाजविला (कार्तिक शके १६०५). पोर्तुगीज व मराठे यांजमधील हा पहिलाच सामना होय. त्यांत मराठ्यांस जय येऊन त्यांची कीर्ति चोहोंकडे पसरली. पोर्तुगीजांस तर त्यांचा धाकच बसला. त्यांनीं औरंगजेबापाशीं आश्रय मागितला व त्यानें त्यांचें मागणें कबूल केलें.

४. संभाजी फार साहसी असे. पोर्तुगीज लोक होड्यांत बसून जाऊं लागले, तेव्हां त्यानें त्यांचा पाठलाग चालू ठेवण्याकरितां आपला घोडा खाडींत घातला. खाडीस भरती आली व संभाजीचा घोडा पोहोर्णीस लागला. अशा विकट प्रसंगीं खंडो बल्लाळ चिटणीस यानें आपल्या घोड्यावरून खालीं उडी घेतली व संभाजीचा घोडा धरून तो शूर व इमानी सरदार त्यास कांठास घेऊन आला. खंडो बल्लाळाच्या या कृत्यानें संभाजी त्याच्यावर फार खूष झाला. खंडो बल्लाळाचा बाप बाळाजी आवजी यास संभाजीनें ठार मारलें होतें. तरी राष्ट्रहिताकडे लक्ष देऊन तें कृत्य यत्किंचितही मनांत न आणतां, तो संभाजीच्या उपयोगी पडला. केवढा हा राष्ट्राभिमान !! संभा-

जीनें फोंडें येथें एक नवीन बळकट किल्ला बांधिला व पोर्तुगीज लोकांचा गोंव्याच्या उत्तरेकडील सर्व मुलूख जाळून लुटून फस्त केला. पोर्तुगीज लोक अगदीं टेर्कीस आले व संभाजीशीं त्यांनीं तहाचें बोलणें लाविलें. संभाजीचा पोर्तुगीजांस समूळ हांकून देण्याचा विचार होता. जंजिरा घेऊन सिद्दीचीही वाट लावण्याचा त्याचा बेत होता. या दोघांचा समूळ उच्छेद केला असता म्हणजे कोंकणपट्टी अगदीं मोकळी झाली असती. परंतु उत्तरेकडून औरंगजेबाचें अरिष्ट येऊन कोसळल्यामुळें त्या अरिष्टापासून आपला बचाव करण्याकरितां त्याला हे सर्व बेत बाजूस ठेवावे लागले. यास त्याचा उपाय नव्हता.

---

२५. वादळ वाहूं लागलें.

औरंगजेबानें दक्षिणेवर शाएस्तेखान, जयसिंग, दिलीरखान, महाबतखान यांच्यासारखे मोठमोठे सरदार एकामागून एक पाठविले होते. त्याच्या मनांत या सरदारांनीं शिवाजीस पकडून आणावें, आणखी विजापूर व गोवळकोंडें येथील पातशाह्या अगदीं खिळखिळ्या करून टाकाव्या असें होतें. एवढें झाल्यावर आलमगीर स्वतः दक्षिणेंत येऊन आपला जयस्तंभ रोवून जाणार होता. परंतु औरंगजेबाच्या इच्छेप्रमाणें यांपैकीं एकदेखील काम त्याच्या बड्या सरदारांच्या हातून झालें नाहीं. शिवाजी तर जास्त जास्त बलवान् होत होता. विजापूरकरांनीं व गोवळकोंडेकरांनीं मोंगलांचें सैन्य परतविलें होतेंच. आपल्या सरदारांची दिलाई पाहून औरंगजेबास फार वाईट वाटलें. परंतु करतो काय? उत्तरेकडे एकामागून एक दंगे होत होते. अफगाण लोकांचा मोठ्या शिकस्तीनें पराभव केला. तोंच रजपूत बंडें

करूं लागले. रजपुतांचें बंड निष्कारण नव्हतें. त्याला कारण असें झालें कीं, औरंगजेबानें सर्व हिंदूंवर जिझिया कर बसविला, त्यांचीं देवस्थानें फोडलीं; अर्थातच रजपुतांस चेव आला व त्यांनीं बादशहास सळो कीं पळो केलें. इतक्यांत बादशहाचा मुलगा महंमद अकबर यानें बापाविरुद्ध बंड केलें, व तो रजपुतांस मिळाला. तेव्हां तर बादशहाची अत्यंत त्रेधा उडाली. औरंगजेबानें रजपुतांशीं कसाबसा तह केला, व अकबरास धरण्यास लोक पाठविले. तेव्हां अकबर उत्तरेतून निसटला व मार्गील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें संभाजीस येऊन मिळाला. आतां मात्र उत्तरेतील सर्व गडबड नाहींशी होऊन बादशहाचें तिकडचें काम संपलें. सरदारांच्या हातून दक्षिणेंतील कांहींच काम झालें नव्हतें. आतां औरंगजेबास फुरसत मिळाली. त्यानें स्वतःच दक्षिण कार्बीज करण्याकरितां मोठी स्वारी काढण्याचा बेत केला. शिवाजी मृत्यु पावला होताच. तेव्हां दक्षिण जिंकण्याच्या मोहिमेस फार झालें तर दोन तीन वर्षें लागतील असा त्यानें दिल्लीहून निघतांना अंदाज केला होता.

२. औरंगजेब बादशहा दिल्लीहून निघाला तेव्हां त्यानें बरोबर चार लाख फौज घेतली होती. याशिवाय त्याच्याबरोबरचें बाजारबुणगें आणखी होतेंच. अफगाणिस्थान व पंजाब या प्रांतांतले उंच बांध्याचे लोक त्याच्या फौजेंत होते. दक्षिणच्या डोंगराळ मुलुखांत लढाई करण्यास उपयोगीं पडावे म्हणून बुंदेले, मेवाडी वगैरे पहाडी लोकही त्यानें बरोबर घेतले होते. त्याच्याबरोबर उत्कृष्ट तोफखाना होता व त्यावर युरोपियन गोलंदाजांची नेमणूक केली होती. अशा जंगी फौजेसह औरंगजेबानें दिल्लीहून कूच केलें. त्याच्या स्वारीचा थाटही प्रेक्षणीय होता व एकंदर वैभव पाहून कोणाचेही डोळे दिपून गेल्याशिवाय राहिले नसते. औरंगजेबानें ही जी मोठ्या थाटाची स्वारी काढली त्यांत त्याचा असा हेतु होता कीं, लोकांनीं

आपलें ऐश्वर्य पाहून गार होऊन जावें व आपणास शरण यावें. त्याच्या लष्कराचा एखादे ठिकाणीं तळ पडला कीं, तेथें एखादें मोठें शहर वसल्यासारखें होई. औरंगजेबाच्या बरोबरचें सर्व सामान दुहेरी असे. तंबू वगैरे पुढल्या मुक्कामाचे ठिकाणीं सर्व व्यवस्था लागल्यावर मग मागल्या मुक्कामाहून सैन्याचा तळ हालविण्यांत येई. अशा डौलानें औरंगजेब बऱ्हाणपुरास येऊन पोहोंचला (शके १६०३, कार्तिक शु॥ १३; १३।११।१६८१).

३. पहिल्यानें मराठ्यांचा मुलूख जिंकण्याचा विचार औरंगजेबानें ठरविला होता. त्यास अनुसरून त्यानें आपले मुलगे मुअज्जम व अजीम या दोघांस पुढें पाठविलें. अजिमानें मराठ्यांच्या उत्तरेकडील प्रांतावर हल्ला केला, व मुअज्जम जुन्नराहून निघून कल्याण प्रांतांत उतरला. अजिमानें सालेरचा किल्ला फितूर करून सहज घेतला. नंतर मोंगलांनीं बागलाणांतील अनेक किल्ले काबीज करून रामसेज किल्ल्यास वेढा घातला (चैत्र शके १६०४). तेव्हां रामसेजच्या किल्लेकऱ्यांस मदत पोंचविण्याकरितां सेनापति हंबीरराव मोहिते बागलाण प्रांतांत चालून गेला. मग त्याचीं मोंगल सैन्याशीं रामसेजच्या किल्ल्याजवळ मोठी लढाई झाली. हंबीररावाचा पराभव झाल्यानें तो सातारा–मिरजेकडे परत आला. त्याचे मागोमाग मोंगल आले. परंतु मोंगलांचा या पाठलागानें फायदा न होतां उलट ते तोंडघशीं पडले. मराठ्यांच्या मुलुखांत बरेच आंत आल्यावर मराठ्यांनीं मोंगल सैन्यावर वेळोवेळीं हल्ले करून त्यास अगदीं जिकिरीस आणिलें. औरंगजेबास हें कळतांच त्यानें अजिमास परत बोलाविलें. इकडे रामसेजवरील मराठे किल्लेकरी अतिशय शौर्यानें लढले. मोंगलांनीं दोनदां मोठ्या जोराचा हल्ला केला. पण दोन्ही वेळां त्यांचे प्रयत्न फुकट गेले. शेवटीं मोंगलांस वेढा उठवणें भाग पडलें (आश्विन शके १६०४), व रामसेज किल्ला मराठ्यांच्या हातीं कायम राहिला.

४. इकडे मुअज्जम कल्याण प्रांतांत उतरल्याबरोबर लुटालूट करीत दक्षिण कोंकणांत वेंगुर्ल्यापर्यंत गेला. या वेळीं संभाजीनें गोव्या-नजीक पोर्तुगीजांस चांगला शह दिला होता, तो काढून टाकण्या-साठीं मुअज्जमची ही हालचाल होती. मराठ्यांनीं मोंगलांशीं कधींही समोरासमोर सामना दिला नाहीं. मुअज्जमनें प्रांत उदध्वस्त करण्याचा सपाटा चालविला होता. परंतु त्यांत त्यानें आपला तोटा करून घेतला. आधींच कोंकण प्रांतांत धान्य कमी; तें त्यानें पहि-ल्यानें नाहींसें केलें. मराठे लोक किल्ल्यांतून रहात असल्यामुळें त्यांचेजवळ सामुग्री भरपूर असे. मोंगली सैन्यास उपास पडूं लागले. आपल्या मुलाच्या हालांची बातमी औरंगजेबास समजली. लागलीच त्यानें सुरतेच्या अम्मलदारास मुअज्जमकडे धान्य पाठवून देण्याचा हुकूम केला. आणखी शहाबुद्दीन नांवाच्या एका सरदारास बरोबर फौज देऊन त्याच्या मदतीस पाठविलें. सुरतेहून धान्य भरून कांहीं गलबतें आलीं. त्यांपैकीं संभाजीच्या जहाजांनीं बरींच पकडून नेलीं. शिवाय मुअज्जमच्या लष्करांत रोगाची सांथ जोरानें सुरू झाली. यामुळें तर तो फार संकटांत पडला. औरंगजेबानें आणखी दोन सरदार कल्याण प्रांतांत पाठविले. संभाजी त्यांच्या पारिपत्यास कल्याणाकडे गेला कीं मुअज्जमला घाटावर चढून जाणें सोपें होईल असा बादशहाचा समज होता. शेवटीं मुअज्जम मोठ्या संकटानें घाट चढून वाळव्यास येऊन तळ देऊन राहिला (२०।३।१६८४).

५. पुढें संभाजी फौज घेऊन भडोचवर चाल करून गेला; व तेथ त्यानें पुष्कळ खंडणी गोळा केली. तशीच दहा हजार मराठ्यांची टोळी बादशहाच्या सैन्यास न कळत दौड मारीत गेली, आणि बऱ्हाणपूर गांठून त्या प्रांतांत बराच धुमाकूळ उडवून परत आली (सन १६८५). औरंगजेबास ही बातमी लागली, तेव्हां त्यानें त्या टोळीवर खान-

जहान बहादुरास पाठविलें. परंतु ती त्याच्या हातांत कशी सांपडणार ? बहादुराच्या हातावर तुरी देऊन मराठे स्वस्थपणें आपल्या प्रांतांत परत आले. मग औरंगजेबानें आपला धाकटा मुलगा कामबक्ष यास बऱ्हाणपूरच्या बंदोबस्ताकरितां लावून दिलें. येणेंप्रमाणें तीन वर्षें घालविल्यावर औरंगजेबास तूर्त मराठ्यांचा नाद सोडून द्यावा असें वाटूं लागलें. विजापूरची अदिलशाही आणि गोवळकोंड्याची कुतुबशाही यांचा अगोदर समाचार घ्यावा, मग मराठ्यांस जिंकतां आलें तर पहावें, असा विचार करून औरंगजेबानें आपला मोर्चा विजापुराकडे वळविला. लवकरच अजीमशहानें बापाच्या हुकुमावरून विजापूरच्या वेढ्याचें काम हातीं घेतलें (१४।६।१६८५). नंतर गोवळकोंडेकरांस विजापूरकरांची मदत करितां येऊं नये म्हणून बादशहानें मुअज्जमास गोवळकोंड्याच्या टेहळणीस धाडिलें. याप्रमाणें औरंगजेबाचा तात्पुरता हल्ला मराठ्यांना परतवितां आला; याचें कारण असें कीं संभाजी अद्यापि दुष्ट कलुशाच्या पुरतेपणीं तावडींत सांपडला नव्हता.

---

२६. तारूं भडकलें !

मराठ्यांचा नाद सोडून औरंगजेब विजापूरकडे गेला हें मागील गोष्टींत सांगितलें. औरंगजेब विजापुरास गेल्यावर संभाजीस कांहींशी फुरसत मिळाली. परंतु दुर्दैवानें त्या फुरसतीचा उपयोग करून घेण्याची बुद्धि त्याला झाली नाहीं. खरें म्हटलें म्हणजे त्या वेळीं दक्षिणेंतील तिन्ही राज्यांच्या जिवावर प्रसंग आला होता. विजापूरचें राज्य, गोवळकोंड्याचें राज्य, व मराठ्यांचें राज्य या तिन्ही राज्यांची चटणी करण्याचा औरंगजेबाचा विचार होता. तेव्हां या तिघांनीं

एक होऊन औरंगजेबाचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करणें जरूरीचें होतें. असा प्रयत्न जर तिन्ही राज्यांनीं मिळून केला असता तर औरंगजेबाचा सहज प्रतिकार झाला असता. औरंगजेबाचें सैन्य अवाढव्य होतें हें खरें आहे; परंतु त्यांत चैनी व लहरी लोकांचा भरणा भारी होता. बादशहानें आपल्या सैन्यांत ठेविलेली व्यवस्थाही लढाई करण्यास सोईची नव्हती. या गोष्टी ध्यानांत घेतल्या म्हणजे महाराष्ट्रांतील राज्यांनीं औरंगजेबाच्या सैन्याचा सहज धुव्वा उडविला असता, ह्यांत संशय नाहीं. परंतु हें ऐक्य करण्याची खटपट कोणींच केली नाहीं. विजापूर व गोवळकोंडे येथील राजे फार शूर नव्हते; आणि त्यांची सर्व भिस्त राज्यांतील सेवक सरदारांवरच होती; परंतु दोन्ही राज्यांतील पुष्कळ सरदार औरंगजेबानें फितविलेले होते. औरंगजेब महाकपटी, त्याच्या कपटाचा फार उपयोग झाला; व ज्या सरदारांनीं अदिलशाहीचें व कुतुबशाहीचें प्राण रक्षण करण्याकरितां झटावें, तेच सरदार औरंगजेबानें देऊं केलेल्या इनामाच्या आशेनें अदिलशाही व कुतुबशाही यांचीं प्रेतें आपण बादशहापुढें केव्हां नेऊन टाकतों व प्रेत वाहून मिळणारी दक्षिणा केव्हां उपटतों याची डोळ्यांत तेल घालून वाट पहात होते. ज्यांच्यावर राज्यांचें जीव वांचविण्याचें काम येऊन पडलें होतें, तेच सरदार लोक असे फितल्यावर त्या राज्यांचें काय झालें असावें बरें ! दुसरें काय? अदिलशाही मेली व कुतुबशाहीनें प्राण सोडला (सन १६८६, १६८७).

२. संभाजीनें तिन्ही राज्यांचें ऐक्य तर केलें नाहींच, निदान आपल्या स्वतःच्या राज्याची तरी व्यवस्था लावून बादशहाशीं टक्कर देण्याची कांहीं तरी तयारी त्यानें करावयास नको होती काय ? परंतु दुर्दैव महाराष्ट्राचें ! परंतु दुर्दैव तरी कां म्हणावें ? एका अर्थीं सुदैवच. कारण महाराष्ट्र त्या समयीं संकटातून पारखून

निघावयाचा होता. संभाजीनें कांहींच तयारी केली नाहीं. इतकेंच नव्हे तर उलट दिवसेंदिवस तो राज्य करण्यासच नालायक होत चालला. कोणचीही गोष्ट करावयाची म्हणजे अगोदर कलुशाचें मत विचारावयाचें असें होऊं लागलें. यामुळें कलुशाचें वजन अतोनात वाढलें. संभाजीनें त्याला ' छंदोगामात्य ' (वेदवेत्ता) ही पदवी दिली. त्याचा मंत्रतंत्रावर अतिविश्वास. बादशहाच्या स्वारीची गोष्ट निघाली कीं कलुशा म्हणे " बादशहाचा नाश करावयास सैन्याची काय जरूर ? मी कांहीं चेटकें करतों कीं बादशहाचा फन्ना उडेल. " संभाजीस दुर्दैवानें घेरलें असल्यामुळें तोही कलुशाच्या अशा भाषणानें खूष होऊन त्याचा मोठा गौरव करी. विनाशकाल आला म्हणजे विपरीत बुद्धि होते असें म्हणतात तें खोटें नाहीं. कब्जी बोले आणि दळ हाले, असें झालें. संभाजीनें सर्व राज्यकारभार कलुशावर सोंपविला; व तो स्वतः व्यसनांत चूर होऊन गेला. राज्याचा वसूल नीट होईना. राज्यकारभाराची सर्व शिस्त विघडली. सैन्याची अव्यवस्था झाली. शिवाजीनें केलेले नियम सैन्यांत मुळींच पाळले जाईनात. प्रजेला लष्करी लोकांपासून त्रास होऊं लागला. बरोबरच आहे. कब्जीला राज्य कसें चालवितां येणार ? त्याचा जन्म जादूटोणा, मंत्रतंत्र व वाकपांडित्य यांत गेला होता. मग असला अनुभव घेतलेले कब्जी राज्य करूं लागल्यावर असें झालें यांत कांहीं नवल नाहीं. शिवाय स्वतः संभाजी राजे म्हणजे सर्व व्यसनांत गढून गेलेले, लहरी, व आपल्या चैनीकरितां सदा सर्व लोकांस त्रास देणारे. प्रधान आणि राजे यांची जोडी जमली व सर्व राज्यांत अंदाधुंदी माजली !

३. औरंगजेबानें अदिलशाही व कुतुबशाही बुडवून मराठ्यांचें राज्य घेण्याचा बेत केला, तेव्हां मराठी राज्याची वर वर्णन केल्याप्रमाणें शोचनीय स्थिति झाली होती. बादशहानें मराठ्यांच्या

राज्यावर एकदम तीन टोळ्या पाठविल्या. एक अर्जीमशहाच्या हाताखालीं खानदेशाकडे, दुसरी इतिकदखानाच्या हाताखालीं कोंकणांत आणि तिसरी मुकर्रबखानाच्या हाताखालीं कोल्हापूरकडे. मुकर्रबखानास संभाजी संगमेश्वरीं आहे ही माहिती कळली. तो व्यसनाधीन होऊन अगदीं बेसावध असतो, अशीही आणखी बातमी लागली. हें सर्व ऐकून मुकर्रबखानास फारच आनंद झाला. आतां संभाजीस धरावें व बादशहापुढें नेऊन उभें करावें असा त्यानें बेत केला.

४. त्यानें कोंकण प्रांताचा माहितगार वाटाड्या बरोबर घेतला, व तो कोल्हापुराहून निघून विशाळगडच्या घाटानें झटपट संगमेश्वरास गेला. वाटेनें जातांना ' बादशहाकडून संभाजीमहाराजांकडे वकिलीस मी जात आहें,' असें तो सांगत असे. संगमेश्वराजवळ मोंगल आले हें पाहून जवळच्या लोकांनीं संभाजीस ती बातमी घाबऱ्या घाबऱ्या कळविली. परंतु संभाजीला अम्मल चढला होता. त्यानें त्या लोकांस झिडकारून " तुम्ही खोट्या बातम्या सांगतां. येथें मोंगल कोठून येतील ? पुन्हां तर खोटी बातमी आणा कीं तुमचीं नाकेंच कापतों गुलामांनों ! " असें म्हटलें. मुकर्रबखानाचे लोक गढींत शिरूं लागले तेव्हां पहाऱ्यावरचे लोक दरवाजा लावूं लागले. मोंगलांनीं त्या पाहारेवाल्यांस ठार केलें, तों मोंगल आले म्हणून आंतील बरेच लोक पळून गेले. कलुशा व आणखी कांहीं लोक राहिले होते. संभाजीनें वेषांतर केलें होतें; परंतु त्याच्या अंगावर कांहीं मौल्यवान दागिने तसेच राहिले होते. त्यावरून मुकर्रबखानानें संभाजीस ओळखून पकडलें. खानानें ही बातमी बादशहास कळविली तेव्हां बादशहानें संभाजीस आपल्या लष्करांत आणण्याचा हुकूम ताबडतोब पाठविला. संभाजीस खान तुळापुरास घेऊन गेला. बादशहाच्या जवळच्या सरदारांनीं ' संभाजीस हातीं धरून मराठे सरदारांच्या हातांतील सर्व किल्ले कार्बीज करावे, म्हणजे किल्ले घेण्यास त्रास पड-

णार नाहीं, असें सुचविलें. औरंगजेबास हा सल्ला पटला व त्यानें संभाजीस जिवंत ठेवण्याचा निश्चय केला. परंतु त्याला बाटवून मुसलमान करावें व मग त्याच्याकडून किल्ले घ्यावे असा बादशहाचा बेत होता. त्याप्रमाणें त्यानें संभाजीस निरोप पाठविला कीं, " तुम्ही मुसलमान झालां तर तुम्हांस जीवदान देण्याचा बादशहाचा विचार आहे ". संभाजी दुर्व्यसनी असला तरी वीराचा बच्चा होता. त्याला बादशहाच्या सैन्यानें कैद केलें तेव्हांपासूनच तो जिवास कंटाळून गेला होता. त्याचा पदोपदीं अपमान होत होता. तेव्हां या जांचांतून मी केव्हां सुटेन असें त्यास झालें होतें. बादशहाच्या निरोपास खरमरीत उत्तर पाठविलें म्हणजे बादशहा आपल्यास देहान्त शिक्षा करील, व आपण या त्रासांतून सुटूं असें त्यास वाटलें, व म्हणून त्यानें बादशहास असें सांगून पाठविलें कीं 'जर तुझी बेटी मला देशील तर मी मुसलमान होतों.' इतकें बोलून त्यानें पैगंबरास शिव्या हांसडल्या. औरंगजेबास तो निरोप व शिव्या ऐकून संभाजीचा अत्यंत क्रोध आला व त्यानें त्याची जीभ तोडून, डोळे काढून, हालहाल करून त्यास ठार मारण्याचा हुकूम केला. त्या हुकुमाप्रमाणें अत्यंत क्रूरपणानें संभाजीचा वध झाला (फाल्गुन व॥ ३०, शके १६१०;११।३ १६८९).

५. संभाजीचा अशा भयंकर रीतीनें वध केल्यावर औरंगजेबास वाटलें कीं, आतां मराठ्यांचें राज्य आपल्या हातीं आलेंच. विजापूर शहर काबीज केल्यावर अदिलशाही जशी नष्ट झाली, गोंवळकोंडे ताब्यांत आल्यावर जशी कुतुबशाही ताब्यांत येण्यास कांहींच त्रास पडला नाहीं, तसेंच आतां संभाजी हातीं येऊन त्यास यमसदनास पाठविल्यावर मराठे असे निराळे काय उरले ? अशी त्याची कल्पना होती. तेव्हां आतां दक्षिण जिंकण्याचें काम संपलें, असे तो बादशहा आपल्या मनांत मांडे खाऊं लागला.

२७. कर्णधारांचा निश्चय.

(शके १६११; सन १६८९)

संभाजीचा भयंकर रीतीनें औरंगजेबानें वध केला, ही बातमी महाराष्ट्रभर पसरली. तेव्हां जिकडे तिकडे हाहाकार झाला. सर्व लोक दुःखाचे सुस्कारे टाकूं लागले. बादशहानें संभाजीराजाचा वध केला, आतां तो महाराष्ट्रराज्य बुडविल्याशिवाय राहणार नाहीं, असें मनांत येऊन सर्व मराठे लोकांना अगदीं उद्वेग उत्पन्न झाला; त्यांना संभाजीच्या दुर्गुणांचा अगदीं विसर पडला व संभाजीच्या वधाचा सूड उगविण्याचा विचार त्यांच्या मनांत आला. मराठ्यांचें राज्य बुडविण्यास बादशहा टपलेला आहे, व संभाजीस त्यानें ठार केलें हें तरी मराठी राज्य नाहींसें करण्याकरितांच, असें बादशहाच्या कृत्यांवरून त्यांनीं ताडलें. आपलें राज्य जाणार हा विचार मनांत आल्यामुळें पहिल्यानें लोकांस दुःख झालें खरें; परंतु थोडक्याच वेळांत स्वराज्य जाणार मग आम्हांला जगून काय करावयाचें आहे? जिवांत जीव आहे, तेथवर स्वराज्याचें रक्षण करणें अवश्य अशी विचारपरंपरा सुरू होऊन महाराष्ट्रभर स्वराज्यरक्षणाकरितां जिवावर उदार होऊन शेंकडों लोक आपआपल्यापरी खटपट करूं लागले. राजारामास संभाजीनें रायगडावर नजरकैदेंत ठेविलें होतें. संभाजीची बायको येसूबाई आपल्या पांच वर्षांच्या मुलासह रायगडावरच रहात असे. तिच्या शहाणपणाच्या गोष्टी मागें सांगितल्या आहेतच. संभाजीच्या वधाची बातमी कळतांच मराठे सरदार पुढें काय करावयाचें हें ठरविण्याकरितां रायगडावर जमा झाले. जनार्दनपंत हणमंते, प्रल्हाद निराजी, रामचंद्रपंत बहुतकर, खंडो बल्लाळ चिटणीस, महादजी नाईक पानसवळ, संताजी घोरपडे, धनाजी जाधव व

खंडेराव दाभाडे हे त्यांपैकीं प्रमुख होत. त्यांनीं येसूबाईकडे जाऊन तीस राज्याची व्यवस्था काय करावयाची म्हणून विचारलें. ती शहाणी व हुषार होती. तिनें राज्यावर आलेला कठीण प्रसंग ओळखून मोठा उत्कृष्ट सल्ला दिला. " माझ्या मुलाचें वय लहान; तेव्हां त्याला आतां गादीवर बसविणें धोक्याचें आहे. माझे दीर राजारामसाहेब यांचे हातांत राज्यकारभार देऊन त्यांना घेऊन तुम्ही येथून निघा. सर्वांनीं एके ठिकाणी राहणें या प्रसंगीं बरें नाहीं. एके ठिकाणीं राहिल्यास एकदम सर्व माणसें बादशहाच्या हातांत सांपडूं. हा किल्ला मजबूत आहे, यावर बालशिवाजीस घेऊन मी रहातें. तुम्ही सर्व बाहेर पडल्यावर शत्रू तुमचे अंगावर जातील. तुमचा सर्वांचा जमाव एके ठिकाणीं झाला म्हणजे आम्हांस काढून तिकडे न्यावें." किती शहाणपणा या सल्ल्यांत भरला आहे बरें? केवढें स्वराज्यप्रेम? केवढी स्वार्थ-निरपेक्षता!! येसूबाईचें म्हणणें सर्वांस पसंत पडलें. राजाराम स्वभावानें थोडा उदार व मनमिळाऊ होता. त्यानें भावजयीचा निरोप ऐकून राज्य करण्याचें काम पत्करलें; परंतु तो आजन्म गादीवर बसला नाहीं. त्यानें कारभारी या नात्यानें सारा जन्म राज्य चालविलें.

२. येसूबाईस मागें एकटें टाकून निघून जाणें राजारामाच्या जिवावर आलें. तथापि प्रसंगावर दृष्टि देऊन हें करणें जरूर म्हणून तसें करण्याचा त्यानें निश्चय केला. मग त्यानें सर्व सरदारांस एके ठिकाणीं जमविलें. तेथें येसूबाई व बालशिवाजी हीं दोघें होतींच. सर्वांचें समाधान करून राजाराम बोलला, " राज्याचे अधिकारी शिवाजी राजे पूर्वीचे तेच हे, ऐसें लक्ष ठेवून, आम्ही कारभारी, आमचे आज्ञेंत राहून, पूर्वीहून ज्याची जशी शक्ति त्याहून अधिक पराक्रम करून औरंगजेब शत्रू यास जिंकून राज्य * रक्षावें." इतकें बोलून 'जिवांत जीव आहे तेथवर स्वराज्यरक्षण करण्यास झटेन' अशा

* चिटणीसकृत थोरले राजाराम यांचें चरित्र, पृष्ठ २५.

अर्थाची त्यानें शपथ घेतली व सर्व सरदारांनींही घेतल्या.

३. ह्या वेळीं महाराष्ट्रांत स्वराज्यरक्षणाचा आवेश चोहोंकडे उत्पन्न झाला होता. शिवाजीनें जन्मभर कष्ट करून स्थापिलेलें मराठी राज्य बुडविण्यास औरंगजेब आला आहे, तेव्हां तें त्याच्या तडाक्यांतून वांचविणें हें आपलें पवित्र कर्तव्यकर्म आहे, असें महाराष्ट्रांतील सर्व लोकांस वाटूं लागलें होतें. हें रक्षणाचें पवित्र कर्तव्य करीत असतां आपल्या प्राणावर बेतली तरी फिकीर नाहीं, इतकी पुष्कळांच्या मनाची तयारी झाली होती. अशा वेळीं रायगडावर मराठे सरदार जमून त्यांनीं हें स्वराज्यरक्षणाचें काम कोणच्या धोरणावर करावयाचें हें ठरविलें. मग रायगडचा चांगला बंदोबस्त करून राजाराम निघाला व प्रतापगडावर आला. तेथें देवीचें दर्शन घेऊन महाराष्ट्रांतील किल्लेकोटांच्या बंदोबस्तास तो लागला. या कारभारांत त्याला सल्ला देणारा प्रल्हाद निराजी म्हणून शिवाजीच्या न्यायाधिशाचा मुलगा होता. तो मोठा हुशार व स्वराज्यनिष्ठ होता. वेढा पडला तर किल्ले पुष्कळ दिवस झुंजण्याकरितां किल्ल्यांवर सामुग्रीची नीट व्यवस्था ठेवावी, व होईल तितकें सामर्थ्य खर्च करून मोंगलांस किल्ले देऊं नयेत, असे सर्व किल्लेकऱ्यांस हुकूम पाठविण्यांत आले. याच सुमारास संताजी घोरपड्यानें आपले दोघे बंधु व विठोजी चव्हाण यांजसह तुळापुरास एके रात्रीं बादशहाच्या छावणींत प्रवेश करून घेतला; खुद्द औरंगजेबाच्या तंबूचे तणावे तोडिले; आणि सोन्याचे कळस काढून आणिले. इकडे धनाजी जाधवानें रणमस्तखानाच्या हाताखालील मोंगल फौजेवर फलटणजवळील मैदानांत हल्ला करून मोंगल फौजेची रेवडी उडविली. या कामगिरीनें राजाराम खूष झाला, व त्यानें संताजीस 'ममलकत-मदार' (प्रांताचा मुख्य) व धनाजीस 'जयसिंगराव' असे किताब देऊन गौरविलें; तेव्हां आपल्या श्रमाचें चीज होत आहे

असें पाहून संताजी व धनाजी या दोघांस कार्य करून दाखविण्यास दुप्पट हिम्मत चढली. येणेंप्रमाणें राजाराम व त्याचे कारभारी यांनीं स्वराज्यरक्षण करण्याचा निश्चय केला; व ते मोठ्या उमेदीनें त्या उद्योगास लागले.

---

२८. स्थलांतर.

(शके १६११: इ० स० १६८९)



इतिकदखानास औरंगजेबानें एका टोळीवर मुख्य नेमून मराठ्यांचा कोंकणांतील अम्मल उठविण्याकरितां पाठविलें, म्हणून मागें एका गोष्टींत सांगितलें. पावसाळा संपल्याबरोबर तो मोहिमेवर निघाला आणि त्यानें पहिल्याप्रथम रायगडासच वेढा दिला (२६।३।१६८९). या वेळीं रायगडावर संभाजीची बायको येसूबाई व तिचा मुलगा शिवाजी (हाच पुढें शाहू या नांवानें प्रसिद्ध झाला) हीं होतीं. त्यांस मोठ्या बंदोबस्तानें तेथें ठेविलें होतें.रायगड किल्ला मूळचाच मजबूत आहे.इतिकदखानास जंजिऱ्याचा सिद्दीही मदत करीत होता.मोंगलांनीं पुष्कळदां हल्ले चढविले, परंतु किल्लेकऱ्यांपुढें त्यांचें कांहींच चालेना. शेवटीं इतिकदखान फितूर करण्याच्या प्रयत्नास लागला. त्यानें दाखविलेल्या लालुचीस भुलून स्वजनद्रोह करण्यास सूर्याजी पिसाळ नांवाचा देशमुख सिद्ध झाला. या पिसाळाला वाईची देशमुखी आपल्याला केव्हां मिळेल असें झालें होतें. ती मिळविण्याकरितां तो वाटेल तसलें नीचपणाचें कृत्य करण्यास तयार होता. इतिकदखानास रायगड घ्यावयाचा होता व पिसाळास कसेंही करून आपला तळिराम गार करावयाचा होता. इतिकदखानानें फूस देतांच त्यानें स्वतःस वाईची देशमुखी मिळाली तर मी तुम्हांस रायगड घेऊन देतों, असें खानास सांगितलें.

इतिकदखानानें देशमुखी देण्याचें आनंदानें कबूल केलें व पिसाळानें मोंगलांस गडाच्या गुप्त वाटा दाखविल्या. त्यावरोबर मोंगल फौज वर चढून गेली व रायगड मोंगलांच्या हातीं गेला (शके १६११ मार्गशीर्ष, शु॥२; ३।११।१६८९). स्वार्थासाठीं माणूस किती नीचपणाचीं कृत्यें करावयास तयार होतो, याचें पिसाळ हें एक ठळक उदाहरण आहे. या अधमानें आपल्या राजघराण्यांतील मंडळीस व राजधानीस शत्रूच्या स्वाधीन करून दिलें! येसूबाई व शिवाजी मोंगलांचे हातीं लागलीं. त्यांस इतिकदखानानें तावडतोब औरंगजेबाच्या लष्करांत पाठवून दिलें. इतिकदखानानें रायगड घेतला, व मराठ्यांच्या राजघराण्यांतील माणसें कब्जांत आणलीं, तेव्हां त्याच्यावर औरंगजेब बादशहा फार खूप झाला हें काय सांगावयास पाहिजे! बादशहानें इतिकदखानाचा मोठा सन्मान केला व त्यास झुल्फिकारखान हा किताब देऊन गौरविलें, व झुल्फिकारखान या नांवानेंच तो इतिहासांत प्रसिद्ध आहे. येसूबाई व शिवाजी या दोघांस औरंगजेबानें आपल्या लष्करांतच ठेवून घेतलें. औरंगजेबाच्या मुलींचा शिवाजीवर फारच प्रीति जडली. औरंगजेबही त्याच्याशीं गोडीगुलाबीनें वागे. 'हा तेवढा साव* व इतर चोर' असें तो लडिवाळपणानें म्हणे. यावरून शिवाजीचें नांव शाहू असें पडलें, अशी एक आख्यायिका सांगतात.

२. संभाजीचा भाऊ राजाराम आणि कित्येक मराठे सरदार एकत्र होऊन फौज जमा करीत आहेत, अशी औरंगजेबास वातमी लागली होती. त्यानें राजारामाचा पाठलाग करून त्यास पकडून आणण्या-

* या व्युत्पत्तीवद्दल वाद आहे. रा. राजवाड्यांनीं 'संकीर्ण लेखसंग्रहां'तील 'शाहू' या निबंधांत 'शहाजीपासून शाहू नांव निघालें असें प्रतिपादिलें आहे. परंतु अलीकडे सांपडलेल्या कागदपत्रांवरून शाहूचें शिवाजी असेंही नांव होतें असें उघड दिसतें.

करितां कांहीं फौज रवाना केली. राजाराम पन्हाळा किल्ल्यावर होता. मोंगलांच्या फौजा आपल्या मागें लागल्या असें कळतांच तो विशाळगडास गेला. तेथून रांगण्यास पळाला; परंतु मोंगली फौजेचें त्याच्यामागचें झेंगट कांहीं केल्या सुटेना. राजाराम व त्याचे कारभारी मोठ्या पंचाइतींत पडले. आतां जर आपण मोंगलांच्या हातीं सांपडलों तर आपले स्वराज्यरक्षणाचे सर्व मनोरथ व्यर्थ होतील, असा विचार मनांत येऊन त्यांचें चित्त कांहीं वेळ उद्विग्न झालें. परंतु लवकरच त्यांस एक उपाय सुचला, व तो उपाय करून पाहण्याचा आवेशही त्यास आला. महाराष्ट्रांत राहून कांहीं उपयोग नाहीं, आपण आतां दक्षिणेस जिंजीकडे पळावें, असें राजारामाच्या मनांत आलें.सर्वांस हा उपाय योग्य वाटला. लागलीच जिंजीस जाण्याच्या तयारीस राजाराम व त्याचे कारभारी लागले. पहिल्यानें महाराष्ट्राच्या व्यवस्थेकरितां कोणीं तरी राहिलें पाहिजे, असें ठरून रामचंद्र निळकंठ बहुतकर याच्या हातीं महाराष्ट्राची सर्व व्यवस्था देण्यांत आली. त्याला हुकूमतपन्हा हा किताब दिला. सिधोजी गुजर व त्याच्या हाताखालीं कान्होजी आंगरे या दोघांनीं समुद्रकांठचा बंदोबस्त ठेवावा, असें ठरलें. महादजी नाईक पानसवळ हा एक म्हातारा शिलेदार होता. त्यास राजारामानें सेनापति नेमून महाराष्ट्रांत ठेविलें. राजाराम, प्रल्हाद निराजी, खंडो बल्लाळ चिटणीस, धनाजी जाधव, संताजी घोरपडे व खंडेराव दाभाडे यांनीं लिंगाईत यात्रेकरूंचा वेष घेऊन जिंजीची वाट धरली. ते रांगण्याहून निघाले ते गोकर्णास जाऊन बंगलुराकडे चालले. इतक्यांत ते कर्नाटकाकडे गेल्याची बातमी बादशहास कळली. बादशहानें कर्नाटक प्रांताचा फौजदार कासीम-खान यास ही बातमी कळवून, सांपडतील तेथें या टोळींतील मडळीस पकडण्याचा हुकूम पाठविला. कासीमखानानें ठिकठिकाण-च्या ठाणेदारांस या टोळीचा छडा लावून तीस पकडण्याची सक्त

तार्काद दिली. राजाराम बंगलुरास पोंचण्याच्या अगोदरच कर्नाटकांत त्याचा बारीक रीतीनें शोध सुरू झाला होता. राजाराम व त्याचे सरदार बंगलुरास पोंचून तेथें ते एका धर्मशाळेंत उतरले होते. एका क्षुल्लक गोष्टीवरून ते सर्व पकडले जाण्याचा संभव होता. परंतु खंडो बल्लाळ चिटणिसाच्या सावधगिरीनें तें संकट टळलें.

३ तो प्रसंग असा. राजारामाचे पाय धुवावयाचे होते, त्या वेळीं एका गड्यानें त्याच्या पायांवर पाणी घातलें. तें पाहून एक कानडा जवळच्या माणसांस म्हणाला, 'हे जंगम दिसतात, पण या एका माणसाच्या पायांवर दुसऱ्यानें पाणी घातलें; तेव्हां हे कोणी तरी वेषांतर केलेले असावेत.' झालें; ही बातमी पसरतां पसरतां सर्व गांवभर पसरली. राजारामावरोबरच्या कानडी जाणणारांनीं तें भाषण ऐकून पूर्व मंडळीस सांगितलें. खंडो बल्लाळानें तें ऐकतांच हें चिन्ह बरोबर नाहीं असें सांगितलें व निरनिराळे फुटून तावडतोब निघून जाण्याविषयीं राजारामास विनंति केली. ही विनंति सर्वांस पसंत पडली. राजारामादिकरून मंडळी चालती झाली. खंडो बल्लाळ चिटणीस व आणखी दोघे तिघे तेथें स्वयंपाक करीत राहिले. त्या सर्वांस पकडून ठाण्यांत नेलें. ठाणेदारानें विचारलें, " तुम्ही कोण ? कोठें चाललांत ?" यांनीं उत्तर केलें, "आम्ही यात्रेकरू, रामेश्वरास जात आहों. आम्ही उतरलों होतों तेथें जवळच आणखी कांहीं यात्रेकरू उतरले होते. परंतु ते जेवण करून अगोदर निघून गेले." ठाणेदारानें त्यांच्या डोक्यावर तीन तीन मणांचे दगड ठेविले, त्यांना चाबकांनीं मारलें, राखेचे तोबरे दिले, तरीही त्यांचा आरंभींचाच जोष्टसाल शेवटपर्यंत कायम होता ! हा केवढा दृढनिश्चय ! केवढी स्वामिभक्ति ! तीन दिवस झाले. त्यांनीं सांगितलें ' आम्हांला सोडल्याशिवाय अन्न घेणार नाहीं. ' त्यांचा इतका निग्रह पाहून ठाणेदाराचा संशय फिटला व त्यानें त्यांस सोडून दिलें. ते तेथून

जे निघाले ते प्रल्हाद निराजीच्या टोळीस मिळाले, आणि मग जिंजीस सुखरूप पोंचले. राजाराम. संताजी व धनाजी तेथें अगोदरच पोंचले होते (कार्तिक शके १६११).

२९. जगण्यासाठीं पराकाष्ठा.

राजारामानें जिंजीस पोंचल्यावर अष्टप्रधान नेमले. निळो मोरेश्वर पिंगळे यास मुख्य प्रधान नेमलें. महादजी नाईक पानसबळ वारला म्हणून संताजी घोरपडे यास सेनापति नेमलें. प्रल्हाद निराजी हरघडीस उपयोगीं पडत होता. यासाठीं पंतप्रतिनिधि म्हणून नवेंच पद काढून त्यावर त्याची नेमणूक केली. जिंजीस हरजी राजे महाडीक व निळो मोरेश्वर पिंगळे अगोदरपासूनच होते. त्यांनीं तेथील व्यवस्था चांगली ठेविली होती. त्या प्रांतांतील किल्ल्यांचा बंदोबस्तहि त्यांनीं चांगला राखिला होता. तेव्हां संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांची या प्रांतांत विशेष जरूर नाहीं असें पाहून त्यांस महाराष्ट्रांत पाठविलें. मग प्रल्हाद निराजीच्या सल्ल्यानें, राजारामानें इनामें व पदव्या देण्यास सुरुवात केली. इनाम देत तें बादशहाच्या मुलुखांत इनामें व पदव्या मिळाल्या म्हणून मराठे लोकांत मोठाच चढाओढ सुरू झाली, व इनामें मिळाल्यावर तीं बादशहाच्या मुलुखांत असल्यामुळें आयताच बादशहाच्या मुलुखांत धुमाकूळ माजून गेला. औरंगजेबास राजाराम जिंजीस गेल्याचें कळतांच त्यानें झुल्फिकारखानास फौज देऊन, तें स्थळ काबीज करण्याकरितां पाठविलें व खानानें जिंजीस वेढा घातला. याची हकीकत पुढील गोष्टींत सांगू. इकडे महाराष्ट्रांत काय काय हालचाली झाल्या त्या आधीं पाहूं. राजाराम जिंजीस गेला तेव्हां रामचंद्रपंत बहुतकर यास, महाराष्ट्राचा सर्व

बंदोबस्त करण्याचें काम सोंपवून विशाळगडास ठेविलें होतें म्हणून मागें सांगितलेंच आहे. राजाराम गेल्यावरोबर मोंगलांनीं पन्हाळा सर केला व त्यांच्या फौजा विशाळगडास वेढा घालून बसल्या. रामचंद्रपंतानें पुष्कळ वेळ किल्ला लढविला. पण शेवटीं हा किल्ला आपल्या हातीं टिकणें शक्य नाहीं अशी त्याची खात्री झाली. म्हणून तो जो त्यावरून निसटला तो साताऱ्यास आला. तेथून त्यानें स्वतः किल्लोकिल्लीं फिरून जे जे किल्ले मराठ्यांच्या ताब्यांत राहिले होते तेथील शिबंदी, दारूगोळा व दाणावैरण इत्यादि बंदोबस्त केला. त्याला ही व्यवस्था लावतांना दोन पुरुष अत्यंत उपयोगीं पडले. एक परशुराम त्रिंबक कुळकर्णी. हा हल्लींच्या औंधच्या पंतप्रतिनिधींचा मूळपुरुष; दुसरा संक्राजी नारायण गांडेकर. हा हल्लींच्या भोरच्या पंतसचिवांचा मूळपुरुष. हे दोघेही मोठे हुषार व मेहनती होते. मोंगल लोकांच्या ताब्यांत कांहीं किल्ले होतेच. त्यांचे लोक धान्या करितां त्या किल्ल्यांच्या आसपास फिरत असत. असे लोक सांपडले. कीं त्यांस मार देण्याचा क्रम रामचंद्रपंतानें चालविला. त्यामुळें मोंगलांना मराठ्यांचा चांगला वचक बसला व ते इकडे तिकडे फिरण्यास सुद्धां घाबरूं लागले.

२. बादशहानें विजापूर, गोवळकोंडे व महाराष्ट्र हे तिन्ही प्रांत जिंकले खरे, पण खरोखर पाहिलें तर या तिन्ही प्रांतांतून त्यास कवडीचाही वसूल होईना. विजापूरच्या व गोवळकोंड्याच्या शेंकडों घोडेस्वारांनीं निरनिराळ्या टोळ्या करून व "मराठे" हें टोंपण नांव घेऊन नाशीक, बीड व बेदर या ठिकाणीं लुटण्याचा सपाटा चालविला. त्यामुळें बादशहाच्या फौजेस मुख्य मुख्य शहरें व किल्ले यांचा बंदोबस्त ठेवतां ठेवतांच पुरे पुरेसें झालें. इतक्यांत धनाजी जाधव व संताजी घोरपडे महाराष्ट्रांत परत आले. मग तर काय विचारावें? महाराष्ट्रांत जी दंगल माजली तिच्यायोगें बाद-

शहास सळो कीं पळो झालें.

३. धनाजी व संताजी परत येतांच रामचंद्रपंतानें वाईच्या मोंगल फौजदारावर हल्ला करण्याची त्यांस सूचना केली. त्यांना काय आवकाश ? त्यांनीं एकाएकीं हल्ला करून फौजदारास कैद केलें व तेथें आपलें ठाणें बसविलें. संताजीनें दुसरी मोहीम करून मिरजेच्या फौजदारावर हल्ला करून तेंही ठाणें मारलें. रामचंद्रपंतानें त्यास या पराक्रमाबद्दल मिरजेच्या देशमुखीची सनद दिली. धनाजी व संताजी यांचे हे पराक्रम पाहतांच इतर मराठे शिलेदारांस उमेद आली, व त्यांनीं ईर्षेनें मोंगलांच्या मुलुखांतून खंडणी उकळण्यास आरंभ केला. या शिलेदार मंडळींत पवार, आटोळे,व थोरात हे मुख्य होते.ते चौथाई व सरदेशमुखी या हक्कांबरोबर फौजेच्या गुजाऱ्याकरितां घांसदाणा या नवीन कराची वसुली करूं लागले. राजारामास त्यांच्या पराक्रमाची वातमी लागतांच त्यांनीं दुप्पट जोरानें आपलें काम चालवावें, याकरितां त्यानें या तिन्ही शिलेदारांस गौरवाचीं पत्रें पाठविलीं; व पवार यास 'विश्वासराव', आटोळे यास 'समशेर-बहादुर'. व थोरातास 'दिनकरराव' असे किताव दिले. या वेळस संक्राजी नारायण गांडेकर यानें युक्तीनें राजगड किल्ला मोंगलांपासून घेतला. त्याच्यामागून परशुराम त्रिंबक प्रतिनिधी यानें पन्हाळा सर केला (इ.स.१६९२). अशी ही महाराष्ट्रांत दंगल माजली व जिकडे तिकडे मराठ्यांचा फत्ते व बादशहाची फजिती सुरू झाली. औरंगजेबास जिंजी-कडे सैन्याचा पुरवठा करतां येऊं नये म्हणून धनाजी व संताजी या दोघांनीं एक जंगी स्वारी करण्याचें मनांत योजिलें. त्यांनीं बरेंच सैन्य जमा करून गोदावरीच्या कांठच्या सर्व प्रदेशांत दंगा माजवून देण्याचा बेत केला. हा प्रदेश मोठा सुपीक होता. धनाजी व संताजी यांच्या हाताखालीं लष्कराची धाड जी निघाली ती या प्रदेशावर येऊन पडली. मग स्वदेशरक्षणार्थ बादशहाचा पराभव करण्यासाठीं

झटणाऱ्या मराठे वीरांनीं त्या सुपीक प्रदेशाचा अगदीं फन्ना उडविला. सर्व देश उध्वस्त झाल्यामुळें बादशहाच्या सैन्याचें फारच नुकसान झालें. शिवाय उत्तरेकडून धान्य घेऊन मोठमोठे तांडे येत; त्यांजबरोबर फौजेचा बंदोबस्त असे; पण मराठ्यांच्या सैन्यापुढें ती फौज किती ! संताजीनें असे भले मोठे तीन तांडे वाटेंत गांठले व लुटले. त्यांच्या बंदोबस्तास मोठमोठे मोंगल सरदार फौजेसह होते. त्यांजवर संताजीनें निकराचा हल्ला केला, सरदारांस पकडलें, व त्यांजपासून मोठमोठ्या खंडण्या घेतल्यावर त्यांस जीवदान देऊन सोडून दिलें.

४. धान्याचा पुरवठा जेव्हां बंद पडूं लागला, तेव्हां बादशहास फार काळजी लागली. नंतर त्यानें जिंजी घेऊन राजारामास पकडलें म्हणजे हा मराठ्यांचा त्रास बंद पडेल असें समजून जिंजीकडे आपला मुलगा कामबक्ष व झुल्फिकारखानाचा बाप आसदखान या दोघांबरोबर आणखी फौज देऊन जिंजीचें काम लवकर उरकण्यास झुल्फिकारखानास लिहिलें (सन १६९१). त्यानें आपल्या लष्कराचा मुक्कामही हालविला; व जिंजीच्या रोखें आपण चाललों असें दाखविण्याकरितां त्यानें कृष्णाकांठीं गलगलें येथें मुक्काम केला. परंतु बादशहाची अटकळ अगदीं चुकली. मराठ्यांनीं मोंगली मुलूख लुटण्याच काम पहिल्यासारखेंच जोरांत चालविलें. वऱ्हाडाकडे परसोजी भोंसल्यानें धुमाकूळ मांडला. खंडेराव दाभाड्यानें गुजराथेचा पिच्छा पुरविला. हैबतराव निंबाळकर गंगथडी (गोदावरीच्या कांठचा मुलूख) उजाड करीत होता. या सर्वांवर संताजी घोरपडे व धनाजी जाधव ताण करीत होते. शेवटीं औरंगजेबाची निराशा होऊन फिरून त्यानें आपला मुक्काम भीमेच्या कांठीं ब्रह्मपुरीस आणला (इ. स. १६९५). औरंगजेब अगदीं मेटाकुटीस आला. तो म्हणाला, "यांच्यावर फौज पाठवावी तर हे मराठे पळून जातात, माझी फौज

जरा लांब गेल्याचें यांनीं पाहिलें कीं, पुनः झाला यांचा धूमाकूळ सुरू! पाऊस, थंडी, ऊन व अंधार कांहींही न पाहतां घोड्यावरच हरभरे, भाकरी,चटणी, कांदे खाऊन धांवतात. यांस कसे जिंकावें? एका मुलुखांत दंगा करतात म्हणून यांवर फौज पाठवावी तर दुसरीकडे जाऊन ठाणीं घेतात; मुलूख मारितात. खरोखर हे आदमी नव्हत, हा भूतखाना आहे." ×

---

३०. पुनः वादळ.

(जिंजीचा वेढा: शके १६१२—१६१९, इ. स. १६९०-९८)

राजाराम जिंजीस गेल्याची बातमी औरंगजेबास कळतांच त्यानें आपला पराक्रमी सरदार झुल्फिकारखान यास जिंजी काबीज करण्याकरितां पाठविलें. झुल्फिकारखानानें रायगड घेऊन नुकतीच बादशहाची मर्जी संपादन केली होती. झुल्फिकारखान हा बादशहाचा वजीर आसदखान याचा मुलगा होता. तेव्हां दरबारांत त्यानें रायगड घेऊन बजाविलेल्या कामगिरीची अतिशय तारीफ झाली, व जिंजी घेण्याचें महत्त्वाचें काम निघतांच त्याची त्या कामावर नेमणूक झाली. झुल्फिकारखान सैन्य घेऊन येत आहे असें कळतांच प्रल्हाद निराजीनें पूर्वी विजापुराकडे असलेल्या एका मुसलमान सरदारास त्याजवर पाठविलें; परंतु तो सरदार झुल्फिकारखानास मिळाला, व झुल्फिकारखान जिंजीवर चालून आला (सप्टेंबर १६९०). हा किल्ला अनेक डोंगर सांधून बांधलेला आहे. त्यामुळें त्याचा घेरा फार मोठा आहे. झुल्फिकारखानास आपल्याजवळ असलेली

× चिटणीस बांचें खोरले राजारामाचें चरित्र, पृष्ठ ४६.

फौज वेढा घालण्यास पुरणार नाहीं असें वाटलें. म्हणून त्यानें बादशहास आणखी फौज पाठविण्याविषयीं लिहिलें, व नवी फौज येईपर्यंत तंजावर वगैरे ठिकाणें कायीज करण्याकरितां तो दक्षिणेकडे गेला. तंजावरकडील ठिकाणांपासून जबर खंडणी उकळून खान परत आला, तरी बादशहाकडून मदत आली नाहीं. दलपतराय नांवाच्या बुंदेले सरदाराच्या हाताखालीं कांहीं फौज आली; पण ती फारच थोडी होती. यामुळें जिंजीच्या वेढ्याचें काम ढिलाईनें चाललें होतें. औरंगजेब तरी काय करील ? तो फौज कोठली पाठविणार ? महाराष्ट्रांत चाललेली दंगल थांबवितां थांबवितां त्याच्या नाकीं नव आलें होते. त्याच कामास त्याच्याजवळची फौज पुरेना. इकडे झुल्फिकारखान आणखी फौज पाठवा म्हणून सारखें ठुमणें लावून बसला होता. शेवटीं मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें प्रथम जिंजी घ्यावी व राजारामास पकडावें, मग महाराष्ट्रांतील गोंधळ आपोआप शमेल, अशा समजुतीनें बादशहानें वजीर आसदखान व आपला मुलगा कामबक्ष यांस झुल्फिकारखानास कुमक करण्याकरितां कर्नाटकांत पाठविलें (डिसेंबर १६९१).

२. बादशहानें मदत पाठविली खरी, परंतु मध्यंतरी एक तिसरेंच कुलंगडें उत्पन्न होऊन वेढ्याचें काम रें रें करीत चाललें. त्याचें कारण असें—बादशहानें कामबक्ष यास या कामावर मुख्य नेमिलें, हें पाहून झुल्फिकारखान असंतुष्ट झाला. मीं रायगड घेऊन बादशहाची उत्कृष्ट कामगिरी बजावली असतां फौजेचा मुख्य अधिकार बादशहानें कामबक्षास दिला, याबद्दल झुल्फिकारखानास अत्यंत वाईट वाटलें. आसदखान झुल्फिकारखानाचा बापच ! अर्थातच आपल्या मुलाचा झालेला अपमान त्यास मुळींच सहन झाला नाहीं. यामुळें ते दोघे बापलेक वेढ्याचें काम नेटानें न करितां सर्वदा उदासीन असत. मराठेही कांहीं स्वस्थ बसले नव्हते. मोंगलांच्या मुख्य सरदारांत

फूट पडली आहे असें पाहतांच राजारामानें झुल्फिकारखानाशीं गुप्तपणें बोलणें सुरू केलें. खानाचें मन बादशहाविरुद्ध फारच विटलें होतें. तो मराठ्यांच्या बोलण्यास वश झाला; व असें ठरलें कीं, कामबक्षाची जिंजी घेण्याची मसलत मुळींच सिद्धीस जाऊं द्यावयाची नाहीं. औरंगजेब मात्र मनांत समजत होता कीं, आतां जिंजी हस्तगत होण्यास मुळींच वेळ लागणार नाहीं. जिंजीस वेढा घालणाऱ्या मोंगल सरदारांत अशी फूट पडली असतां त्यांजवर आणखी धोंड कोसळली. संताजी घोरपडे व धनाजी जाधव हे महाराष्ट्रांत बादशहाच्या सैन्याचा पिच्छा पुरवीत होते. रामचंद्रपंतानें पाहिलें कीं, बादशहाचें बरेंच सैन्य जिंजीकडे गेलें आहे. तेव्हां त्यानें मोंगल सैन्याचा समाचार घेण्यासाठीं धनाजी व संताजी यांजबरोबर तीस हजार फौज देऊन त्यांची कर्नाटकांत रवानगी केली. लागलींच ते दोघे बहादर बादशहाच्या सैन्यास गुंगारा देऊन पूर्व-कर्नाटकांत उतरले. संताजीनें कांजीवरमचा फौजदार अलीमर्दानखान याजवर कावेरीपाक येथें हल्ला चढविला. खानाचे बंदुकवाले मराठ्यांस येऊन मिळाले. तेव्हां मराठ्यांस तोंड देण्याची खानास छाती होईना, व तो कांजीवरमकडे हटण्याचा प्रयत्न करूं लागला. पण संताजीनें त्यास चोहोंबाजूंनीं घेरिलें. त्याबरोबर अलीमर्दानखान पंधराशें घोडे व सहा हत्ती येवढ्या सामुग्रीसह संताजीच्या स्वाधीन झाला (१३ डिसेंबर १६९२). पुढें जिंजीस पोहोंचल्यावर एक लाख होन नजराणा भरून अलीमर्दानानें आपली सुटका करून घेतली. इतक्या अवकाशांत धनाजी सात आठ हजार फौजेसह जिंजीजवळ गेला. तेथें पोहोंचल्याबरोबर त्यानें बादशहाच्या सैन्याचे मोर्चावर हल्ला केला. मोंगल सैन्य अस्ताव्यस्त पसरलें होतें. व्यवस्था करून युद्धाची तयारी करण्यापूर्वीच एकीकडून धनाजीच्या सैन्यानें व दुसरीकडून किल्ल्यांतील सैन्यानें असे दोन जोराचे हल्ले त्याजवर केल्यामुळें

मोंगल सैन्यांत कत्तल उडाली. इस्माइलखान नांवाचा सरदार जखमी होऊन कैद झाला आणि पांचशें घोडे व दोन हत्ती मराठ्यांस पाडाव सांपडले (जानेवारी १६९३). लागलीच मराठ्यांनीं हैद्राबाद–कर्नाटक, म्हणजे कांजीवरम व कडप्पा या प्रांतांवर आपली सत्ता जाहीर केली व त्या प्रांतांवर केशवरमण या सुभेदाराची स्थापना केली.

३ या वेळीं जिंजीस वेढा घालून बसलेल्या मोंगल सैन्याची जी कांहीं तारांबळ उडाली ती सांगतां पुरवत नाहीं. त्यांना दाणावैरण मुळींच मिळेनाशी झाली. बादशहाचें आणि त्या फौजेचें दळणवळण बंद पडलें. इकडील बातमी तिकडे नाहीं व तिकडील इकडे नाहीं. अशा विपत्तींत मोंगल फौज दिवस कंठीत असतां पहिल्यानें बादशहास वेड लागलें अशी बातमी उठली. मागून तर अशी कंडी पिकली कीं बादशहा मरण पावला! मग त्या फौजेंत अत्यंत गोंधळ माजला. तो त्या फौजेंत उडालेला गोंधळ पाहून मराठ्यांनीं कामबक्षाशीं बोलणें लावलें कीं, आम्ही तुला दिल्लीच्या बादशहाच्या गादीवर बसवितों. तें ऐकून कामबक्ष खूप झाला व त्यानें आपल्या फौजेस कूच करावयास तयार होण्याचा हुकूम दिला. लागलीच आसदखान व झुल्फिकारखान या दोघांनीं कामबक्षावर मराठ्यांशीं ऐक्य केल्याचें कुभांड रचून त्यास नजरकैद केलें. असा मोंगल फौजेंत गोंधळ माजला असतां अलीमर्दानखानाला चीत करून व कांजीवरम प्रांतांतून खूप खंडणी वसूल करून संताजी घोरपडे जिंजीस दाखल झाला (जानेवारी १६९३). तेव्हां मराठ्यांनीं मोंगल फौजेवर हल्ल्यांवर हल्ले करून तीस अगदीं टेंकीस आणलें. शेवटीं आसदखानानें संताजीशीं तह ठरविला. त्यांत मोंगलांस मराठ्यांनीं बांदिवाशास जाऊं द्यावें व तेथें असतां बादशहाचा हुकूम येईल त्याप्रमाणें मोंगलांनीं वागावें, मराठ्यांनीं त्यांस त्रास देऊं नये, असें ठरलें. नंतर सर्व मोंगल फौज बांदिवाशला गेली (२३।१।१६९३). आसदखानानें एक पत्र

पाठवून कामबक्षाचीं कारस्थानें बादशहास कळविलीं होतीं. तें पत्र पोंचतांच वजीर व मुलगा पाठविण्यांत आपण चूक केली असें औरंगजेबानें ताडलें व त्या दोघांना परत येण्याचा हुकूम पाठविला. नंतर जिंजीस वेढा देणाऱ्या सर्व मोंगल फौजेचा अधिकार पुनः झुल्फिकारखानाकडे आला; पुढें चार महिने त्यानें वांदिवाश येथेंच छावणी केली (फेब्रुवारी-मे १६९३).

४ मोंगल सैन्याची फजिती उडविल्यावर पूर्वकर्नाटकांत आपला अंमल बसविण्याचा उद्योग मराठ्यांनीं आरंभिला. याचप्पा नायक नांवाचा संस्थानिक वेलोरजवळच्या सतगड किल्ल्यावर रहात असे; तो अगोदरपासूनच मराठ्यांस येऊन मिळाला होता. दोन महिन्यांनीं संताजीनें त्रिचनापल्लीस वेढा दिला. लवकरच राजाराम त्रिचनापल्लीस गेला. तेव्हां तेथील नायकानें मराठ्यांशीं तह केला. पुढें तंजावरास जाऊन राजारामानें आपला चुलतभाऊ शहाजी (व्यंकोजीचा मुलगा) याची भेट घेतली. या भेटींत शहाजीनें राजारामास द्रव्याची व माणसांची मदत करण्याचें वचन दिलें. नंतर राजाराम जिंजीस परत आला. पुढें संताजी व धनाजी हे पुनः महाराष्ट्रांत गेले. तेव्हां झुल्फिकारखानास वांदिवाशमधून निघून कर्नाटकांत आपली सत्ता स्थापित करण्याची उत्कृष्ट संधी मिळाली (सन १६९४). प्रथम त्यानें आपलें बादशहाशीं दळणवळण तुटलें होतें तें सांधून घेतलें; नंतर याचप्पा नायकास आपल्या बाजूस मिळवून घेतलें व पुढें ठार मारिलें (१६९४). तसेंच त्यानें दक्षिणेस त्रिचनापल्ली, तंजावर आदिकरून स्थलांवर चालून जाऊन सर्व संस्थानिकांपासून बादशाही सत्तेस मान्यता देणारे तहनामे करून घेतले व खूप खंडणी उकळिली. तंजावरच्या शहाजीनें राजारामास मदत न देण्याचें वचन दिलें, व दरसाल तीस लाख खंडणी भरण्याचें कबूल करून कांहीं मुलूख व किल्लेही नजर केले. तेव्हां खानानें त्यास मागील अपराधांची क्षमा केली. नंतर

झुल्फिकारखानानें परत येऊन पुनः जिंजीस वेढा दिला (१६९४ आक्टोबर). तथापि वेढ्याचें काम कसेंबसें चालवून भोंवतालच्या मुलुखांतून द्रव्य वसूल करण्याकडेच खानाचें विशेष लक्ष होतें. त्यानें १६९५च्या आक्टोबरांत वेलोरला वेढा घातला. इतक्यांत जंगी फौजेसह धनाजी व संताजी या दुकलीची कर्नाटकांत रवानगी झाली. धनाजी पूर्व–कर्नाटकांत उतरला; त्याबरोबर वेढा उठवून झुल्फिकार-खान अर्काटमध्यें बंदोबस्तानें राहिला.

५ इकडे संताजीनें मोंगलांच्या ताब्यांतील पश्चिम कर्नाटकांत धूमाकूळ उडवून दिला (सन १६९५). त्याची बातमी औरंगजेबास लागतांच त्यानें आपल्याजवळची कांहीं फौज त्याच्या पारिपत्याकरितां पाठविली. विजापूर-कर्नाटकाचा फौजदार कासीम हाही तीस मिळाला. मोंगल फौज संताजीवर चाल करून येऊं लागली. संताजी कसला वस्ताद! त्यानें मोंगलांस तसेंच पुढें येऊं दिलें. मग एके दिवशीं मोंगल फौज मुक्काम करण्याच्या विचारांत होती, व आघाडीचे लोक तंबू ठोकीत होते. त्यांना मुळींच दाणावैरण मिळूं देऊं नये, दिवसां हल्ले करावेत, रात्रीं बाण टाकावेत, असें करून त्या मोंगल फौजेचे मराठ्यांनीं फार हाल मांडले. मोंगलां-ची फौज अगदीं गांगरून गेली होती. शेवटीं त्यांना दुधारी + येथील गढींत कांहींसा आश्रय मिळाला. परंतु भोंवतालीं मराठ्यांनीं वेढा दिला. तेव्हां आंत मोंगलांना उपास पडूं लागले. या फौजेची झालेली अशी दशा बादशहास कळून त्यानें हिम्मतखान नांवाच्या एका सरदाराबरोबर तिच्या मदतीस कांहीं फौज पाठविली. परंतु संताजीनें हिम्मतखान जवळ येतांच त्याच्यावर हल्ला करून असा मारा केला कीं, तो कसा तरी जीव वांचवून पळून गेला. शेवटीं गढींत अडकलेली फौज मराठ्यांस शरण आली (पौष शु॥११ शके १६१७).

+ म्हैसूर संस्थानांत चित्रदुर्गच्या पूर्वेस बावीस मैल.

संताजीनें मोंगल सरदारांपासून मोठमाठ्या खंडण्या घेऊन त्यांस सोडून दिलें. कार्सामखानास मराठ्यांस खंडणी भरून स्वतःचा जीव वांचवण्याची लाज वाटली. म्हणून त्यानें विष खाऊन प्राण दिला. हिम्मतखान पराभव पावून गेला, तो फिरून आणखी फौज घेऊन परत आला. मराठ्यांची व मोंगलांची बसवापट्टणजवळ एका मैदानांत गांठ पडली. पहिल्यानें मराठे हुलकावणीदाखल पळून गेले. मोंगलांस वाटलें कीं, मराठे घाबरले, म्हणून पळत आहेत. मोंगल पाठलाग करूं लागले. मग जरा डोंगराळ जागा लागतांच मराठे उलटले व मोंगलांवर त्यांनीं जोरानें चाल केली. कापाकापी सुरू होऊन खुद्द हिम्मतखानच पडला. तेव्हां मोंगलांच्या सैन्याची दाणादाण होऊन त्यांचें सर्व सामानसुमान मराठ्यांच्या हातीं लागलें. (पौष शके १६१७, इ. स. १६९६ जानेवारी).

६. झुल्फिकारखानानें जिंजीस वेढा घातला होता. परंतु त्यानें वेढ्याचें काम ढिलाईनें चालविलें होतें. औरंगजेब आतां अगदीं म्हातारा झाला होता. त्याचें वय ऐंशींच्या वर गेलें होतें. तेव्हां त्याच्या मरणानंतर आपली व्यवस्था काय? असा प्रत्येक मोंगल सरदारापुढें प्रश्न होता. त्याच्या कोणत्याही मुलांत सर्व हिंदुस्थानवर आपली सत्ता चालविण्याची कुवत नव्हती हें उघड दिसत होतें. तेव्हां ठिकठिकाणीं स्वतंत्र राज्यें होणार हें अगदीं निश्चित होतें. झुल्फिकारखानास आपणास दक्षिणेकडे एखादें राज्य मिळावें असें वाटत होतें; व राज्य मिळण्यास जवळ सैन्य पाहिजे तें सैन्य आयतेंच त्याच्या हातांखालीं होतें; याकरितां त्यानें जिंजीचा वेढा तसाच लांबणीवर टाकण्याचा विचार केला होता. परंतु शेवटीं त्याला असें कळलें कीं, बादशहा अगदीं निकरावर आला आहे व जिंजी लवकर हस्तगत न झाल्यास त्याचा आपणास परत बोलाविण्याचा विचार आहे. हें ऐकतांच हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागण्यांत अर्थ नाहीं,

अशी झुल्फिकारखानाची खात्री झाली; व त्यानें वेढ्याचें काम जोरांत चालविलें (नोव्हेंबर १६९७).

७. मोंगलांनीं वेढ्याचें काम जोरांत चालविलें, तेव्हां राजाराम व त्याचे कारभारी यांना चिंता पडली. जिंजीस येऊन सात वर्षें झाली होतीं. या सात वर्षांत औरंगजेब बादशहाची मराठ्यांच्या सामर्थ्याविषयीं बरीच खात्री झाली होती. महाराष्ट्रांत तर शिलेदारांस असा कांहीं आवेश चढला होता कीं, त्याच्यायोगानें बादशहा अगदीं टेंकीस आला. मग आतां महाराष्ट्रांत परत जाण्यास कांहीं हरकत नाहीं असें जिंजींतील मराठे कारभाऱ्यांनी ठरविलें. परंतु मोंगलांच्या वेढ्यांतून कसें सुटावयाचें? मोंगल सैन्यांत मराठे सरदार नोकरीस आहेत व त्यांचें मन वळवून पहावें. असा बेत झाला. खंडो बल्लाळ चिटणिसानें ती कामगिरी पत्करिली. राणोजी व गणोजी शिर्के हे दोघे नेऋत्येच्या बाजूस मोर्च्यांत होते. त्यांचें मन वळविण्याचा बेत करून खंडो बल्लाळ त्यांजकडे गेला. शिर्के यांचा भोंसले घराण्यावर. संभाजीनें मागें 'शिरकाण' (जो जो शिर्के दिसेल त्याची कत्तल करावयाची) केलें होतें, तेव्हांपासून दांत होता. खंडो बल्लाळानें ' राजाराम वगैरेची तुम्हीं सुटका करावी ' अशी गोष्ट काढतांच शिर्के यांनीं साफ सांगितलें कीं, " आमच्यानें हें होणार नाहीं. भोंसल्यांचा वंश अजिबात नष्ट झाला तरी आम्हांला आनंदच होईल. " हें शिर्क्यांचें भाषण ऐकून खंडो बल्लाळास वाईट वाटलें. तो मोठ्या आर्जवानें शिर्क्यांस म्हणाला, "या समयास तुम्ही बोलतां हें योग्य नव्हे. तुमचें शिरकाण केलें तसेंच आमचे तीन पुरुष हर्त्ताचे पायाखालीं मेले. तेही गेले. परंतु हिंदूंच्या दौलतीकरितां आम्ही झटतच आहों. ज्यांस जसा प्रसंग पडेल तसे झटतच आहेत. तुम्ही तों आप शरीख (भागीदार) आहां. या समयास महाराज व कबिले काढून द्यावे. तुमच्या भाच्याचेंच राज्य. या समयीं राजाराम-

साहेब यांस कुटुंबसुद्धां पार करून दिल्यास तुमची कीर्ति होईल. "* धन्य खंडो बल्लाळ, धन्य आहे तुझी ! तूं आपलें धर्मराज्य कायम ठेवण्याकरितां प्रत्यक्ष पित्याचा खून विसरलास ना ! केवढें हें तुझें स्वराज्यप्रेम ! केवढी स्वार्थनिरपेक्षता ! जणूं मूर्तिमंत राष्ट्राभिमान तुझ्या देहांत शिरून तूं राष्ट्राभिमानाचा दिव्य पुतळा बनून गेलास ! तें दिव्य भाषण ऐकल्यावर शिर्के राजारामास जाऊं देण्याचें काम करण्यास तयार झाले यांत काय नवल ? शिर्क्यांनीं 'दाभोळचें वतन आम्हांस द्यावें' असें खंडो बल्लाळास म्हटलें. खंडो बल्लाळाचें स्वतःचेंच तें वतन होतें. कसेंही करून राजाराम आतां सुटला पाहिजे असें खंडो बल्लाळास वाटत असल्यामुळें तो त्या वतनावर पाणी सोडण्यास तयार झाला. वतन मिळतांच शिर्के खूष झाले व राजाराम आदिकरून मंडळीस संतोषानें सोडून देण्यास तयार झाले. मग एके रात्रीं शिर्क्यांच्या गोटांतून राजाराम व त्याचे कारभारी निघून गेले. मागून शके १६१९ (जानेवारी १६९८) च्या शेवटीं झुल्फिकारखानानें जिंजीचा किल्ला सर केला. परंतु राजाराम निसटून गेल्यानंतर तो घेतल्यामुळें, धान्य गेल्यावर भूस मिळालें तर जसा आनंद होत नाहीं तसेंच तो किल्ला हातीं आल्याबद्दल औरंगजेबास आनंद वाटला नाहीं हें उघड आहे.

३१. तारूं बुडतें कीं काय ?

(राजारामाचा मृत्यु; शके १६२१, सन १७००)

राजाराम जिंजीहून महाराष्ट्रांत आल्याचें मागील गोष्टींत सांगितलें. त्याच्यामागें कर्नाटकांत धनाजी जाधव मोंगलांशीं झुंजत राहिला.

*चिटणीसकृत थोरले राजारामाचें चरित्र, पृ. ५५.

यावेळीं जर धनाजीच्या मदतीस संताजी घोरपडेही असता व त्या दोघा मराठे वीरांनीं एकीनें वागून मोंगलांशीं सामना दिला असता, तर मोंगलांचा चुराडा उडण्यास मुळींच अवकाश लागला नसता. परंतु दुर्दैवानें संताजी व धनाजी या दोघांत तंटे होऊन शेवटीं त्यांत संताजीचा मोठ्या भयंकर रीतीनें खून झाला. संताजी मोंगलांस फितूर झाला असावा असा राजारामास संशय आला होता. पण प्रल्हाद निराजी या हुषार व स्वामिकार्यतत्पर मुत्सद्यानें संताजीची बाजू संभाळली होती. प्रल्हाद निराजी जिंजीचा वेढा चालू असतांनाच वारला. मग धनाजी व संताजी यांजमधील तंटा फिरून बळावला, व एके दिवशीं धनाजीनें संताजीच्या लष्करावर हल्ला केला. संताजीची शिस्त कडक असे, त्यामुळें त्याच्या लष्करांतील लोक त्याच्यावर खूष नसत. म्हणून त्याच्या लष्करांतील बरेचसे लोक धनाजीच्या लष्करास मिळाले. तेव्हां संताजी प्राण वांचविण्याकरितां पळूं लागला. एके प्रसंगीं त्याचा मुक्काम म्हसवडास पडला. तेथील देशमुख नागोजी माने याच्या बायकोचा भाऊ अमृतराव निंबाळकर हा संताजीशीं पूर्वी झालेल्या एका चकमकींत ठार झाला होता. भावाच्या मृत्यूचा दंश मनांत धरून माने याची स्त्री राधाबाई हिनें संताजीस मेजवानीच्या मिषानें राहवून घेतलें. नंतर दुसरे दिवशीं अडचणीच्या जागेंत तिनें दोनशें बरकंदाज दबा धरून बसविले होते, त्यांनीं संताजी व त्याजबरोबरचीं बहुतेक मंडळी गोळ्या घालून ठार केली. संताजीच्या मृत्यूनें मराठ्यांचें फार मोठें नुकसान * झालें (आषाढ

* संताजीच्या मृत्यूसंबंधाचा मुद्दा वादग्रस्त आहे. पत्रें यादींतील पत्रांक ४०७मध्यें घोरपड्यांचे हकीकतींत हा मजकूर आहे:—"श्रीमन्महाराज राजारामसाहेब छत्रपति यांनीं किल्ले शिवगड येथें शके १६२१ सालीं कैलासवास केला. पुढें संताजी घोरपडे यास म्हसवडकर माने यांनीं दगाफटका करून शके १६३५ (इ. स. १७१३।१४) या सालीं मारिलें."

शके १६१९, सन १७९७).

३, राजाराम जिंजीहून निघून विशाळगडास सुखरूप येऊन पोहोंचला. तेथें आल्यावर राज्यव्यवस्थेंत त्यानें कांहीं फेरफार केले. आजपर्यंत रायगड ही मराठी राज्याची राजधानी होती, ती बदलून आतां सातारा हें मराठ्यांच्या गादीचें मुख्य ठिकाण झालें (सन १६९८). इतके दिवस किल्ल्यांच्या आश्रयानेंच मोंगलाशीं युद्धें करावीं लागत, पण आतां मराठ्यांचें सामर्थ्य वाढलें होतें. तेव्हां मैदानाच्या मुलुखांत देखील मोंगलांशीं झुंज देणें मराठ्यांस सोपें वाटूं लागलें होतें. तेव्हां मैदानांतल्या मुख्य शहरीं गादी असणें सोईचेंच होतें. या वेळीं धनाजी जाधव यास सेनापतिपद देण्यांत आलें. जनार्दनपंत हणमंते अमात्य, जिंजी येथें वारल्यामुळें फिरून अमात्यपद रामचंद्रपंतास मिळालें. संक्राजी मल्हार नरगुंदकर सचिवपदावर होता तो काशीस निघून गेल्यामुळें संक्राजी नारायण गांडेकर याची सचिवाच्या जागीं नेमणूक झाली. मराठ्यांच्या आरमारापैकीं सरदार सिधोजी गुजर वारला होता. तेव्हां कान्होजी आंगरे यास आरमारासंबंधीं सर्व अधिकार मिळाले. सुवर्णदुर्ग व कुलाबा हीं समुद्रावरचीं मुख्य ठाणीं होतीं. खंडो बल्लाळ चिटणीस यानें जिंजीस फारच महत्त्वाची कामगिरी केली होती. त्याजबद्दल त्याला चौल प्रांतीं वतन दिलें. तसेंच परशुराम त्रिंबक, आटोळे, दाभाडे, पवार इत्यादि ज्या ज्या मंडळींनीं महाराष्ट्रांत मोंगलांशीं युद्ध चालवून राष्ट्राची कामगिरी बजाविली होती, त्या सर्वांस जहागिरी व इनामें देण्यांत आलीं. त्याचा परिणाम असा झाला कीं, या सर्व मराठे सरदारांस आपआपल्यापरी मोंगलांची रग जिरविण्यास दुप्पट हुरूप चढला व आपआपलें काम ते जास्त नेटानें व उत्साहानें करूं लागले.

३. राजारामानें शके १६२१चा पावसाळा सरतांच खानदेश–वऱ्हाडाकडे एक मोठी मोहीम करण्याचा निश्चय केला. त्याला पर-

सोजी भोंसले, हैबतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे, आटोळे वगैरे मराठे सरदार येऊन मिळाले. त्या वेळीं मराठ्यांची जितकी फौज एकत्र जमली, तितकी पूर्वी कधींही जमली नव्हती. राजारामानें बादशहाच्या छावणीवर हल्ला करून शाहूस सोडविण्याचा प्रयत्न केला, पण थोडी चुकामूक पडली. शाहू व बादशहा दोघेही बेगमेच्या गोटाकडे गेले होते, म्हणून रामारामाचा बेत फसला. मग मराठी सैन्य लष्कर उत्तरेकडे चालून गेलें. वाटेनें जातांना चौथाई व सरदेशमुखी हे हक्क वसूल करण्याचा मराठ्यांनीं सपाटा चालविला. जे मुकाट्यानें वसूल देत, त्यांस मराठ्यांचा मुळींच त्रास होत नसे. ज्यांच्या अंगांत वसूल देण्याचें सामर्थ्य नसे, त्यांजपासून खतें लिहून घेण्यास मराठे राजी असत. परंतु जे मराठ्यांचा वसूल करण्याचा हक्क धाब्यावर बसविण्याचा प्रयत्न करीत, त्यांचें मात्र कडक शासन केल्याशिवाय मराठी फौज रहात नसे. अशा रीतीनें हक्क वसूल करीत मराठ्यांच्या फौजा गंगथडी (गोदावरीकांठ), वागलाण, खानदेश, वऱ्हाड, येथवर जाऊन पोहोंचल्या. परत येतांना राजारामानें एकएक सरदार एकएका प्रांतांत नेहमीं वसूल करण्याकरितां ठेविला. परसोजी भोंसल्यानें वऱ्हाडचा वसूल करावा म्हणून त्यास वऱ्हाडांत ठेविलें. त्याचप्रमाणें खानदेशांत नेमाजी शिंदे, वागलाणांत खंडेराव दाभाडे, गंगथडींत हैबतराव निंबाळकर असे सरदार ठेविले. अशी व्यवस्था लावून राजाराम माघारीं फिरला. तो जालना शहरची खंडणी वसूल करीत होता. इतक्यांत झुल्फिकारखानाच्या हाताखालीं एक मोंगलांच्या फौजेची टोळी मराठ्यांवर आली. मोंगल मोठ्या तयारीनें आले होते. असा हा अचानक हल्ला आल्यामुळें राजारामास आपली फौज बचावून नेण्यास बराच त्रास पडला. वाटेंत दगदगीनें त्याला ताप आला; तो नवज्वराचा ताप होता. राजाराम सिंहगडास पोंचला तोंच रक्त ओकूं लागला. थोडे दिवस गेल्यावर शके १६२१ च्या

फाल्गुन वद्य ९स (३।३।१७००) तो मृत्यु पावला. शिवाजीची तडफ व तेज राजारामाच्या ठिकाणीं नव्हतें. तथापि तो मोठा मनमिळाऊ व कार्यनिष्ठ होता. त्यामुळें बरोबरच्या मंडळीस मिळवून घेऊन त्यानें स्वराज्यसंरक्षण उत्तम रीतीनें केलें. शिवाजीचा नित्यपूजेचा बाण जवळ ठेवून राजाराम त्याची पूजा करीत असे. त्या बाणाची स्थापना सिंहगडीं करून व छत्री बांधून रामचंद्रपंतानें त्याच्या व छत्रीच्या पूजा नैवेद्याची व्यवस्था केली, ती अजून चालत आहे. तशीच राजारामाची पुण्यतिथिही दरसाल फाल्गुन वा। ९स अजून सिंहगडावर साजरी करितात. त्याला चार स्त्रिया होत्या. पहिली प्रतापराव गुजराची मुलगी जानकीबाई; ती अगोदरच वारली होती. दुसरी हंबीरराव मोहित्याची मुलगी ताराबाइ; हिला शिवाजी म्हणून दहा वर्षांचा एक मुलगा होता. तिसरी कागलकर घाटग्यांची मुलगी राजसबाई; हिला संभाजी या नांवाचा तीन वर्षांचा मुलगा होता. चौथी अंबिकाबाई; ही राजारामाच्या मृत्यूची बातमी ऐकून सती गेली.

---

३२. आणखी लाटा उसळतात !

राजारामास पकडण्याकरितां जिंजी किल्ला हस्तगत करण्याचा औरंगजेबानें झुल्फिकारखानास आग्रहाचा हुकूम पाठविला; परंतु जिंजी किल्ला हातीं आला तरी राजाराम सुटला; त्यामुळे औरंगजेबास बरें वाटलें नाहीं, म्हणून मागें एका गोष्टींत सांगितलेंच आहे. राजाराम जिंजीहून सुटून महाराष्ट्रांत आला तेव्हां तर मराठे लोकांस विशेषच हुरूप आला; व ते बादशहाच्या सैन्यास व मुलुखास त्रास देऊं लागले. आपण जों जों यांचा नाश करावयाचे प्रयत्न करावे तों तों मराठ्यांची शक्ति वाढतेच आहे, हें पाहून औरंगजेबास अत्यंत दुःख

झालें. पण तो हट्टी होता म्हणून मराठ्यांचा पराभव करण्याचा त्यानें निश्चय केला. कितीही संकटें आलीं तरी त्यानें त्यांस जुमानिलें नाहीं. त्याचा मराठ्यांचें राज्य नष्ट करण्याचा मूळचा निश्चय जास्तच दृढ झाला व त्यानें आतां एक नवीनच मसलत काढली.

२. राजाराम महाराष्ट्रांत आल्यावर आतां कर्नाटकांत लढाईचें कांहीं कारण नव्हतें. धनाजी जाधवाच्या व झुल्फिकारखानाच्या कांहीं झटापटी तिकडे चालल्या होत्या; पण त्या म्हणजे जिंजीच्या वेढ्याचें शेंपूट, यापेक्षां त्यांत कांहीं अर्थ नव्हता. राजाराम महाराष्ट्रांत आला तेव्हां आतां महाराष्ट्रांत युद्धास तोंड लागणार हें उघड दिसत होतें. राजारामानें राज्यकारभाराची व्यवस्था लावल्याबरोबर मोंगलांच्या मुलुखावर स्वारी केली. मोंगलांच्या मुलुखाची खंडणी मराठे शिलेदारांनीं गोळा केल्यामुळें बादशहाच्या सैन्यास धान्य इत्यादि पदार्थ त्या मुलुखांत मुळींच मिळतनासे झालें. या मराठ्यांच्या स्वाऱ्या कशा बंद कराव्या, याचा औरंगजेब विचार करूं लागला. या बंद झाल्याच पाहिजेत, नाहीं तर दिवसेंदिवस आपली फौज कमकुवत होऊन हे मराठे मात्र बलिष्ठ होतील; मग त्यांना कसें जिंकावयाचें ? असा तो मोठ्या पेंचांत पडला. शेवटीं त्यानें असें ठरविलें कीं, मराठ्यांचे सर्व किल्ले घ्यावेत.म्हणजे त्यांच्या शक्तीचें मूळच तुटल्यासारखें होईल. एकीकडे किल्ले घ्यावेत व दुसरीकडे मराठ्यांच्या ज्या टोळ्या मुलुखास त्रास देत असतील त्यांजवर फौज पाठवून त्या अगदीं नष्ट करून टाकाव्या, असा मराठ्यांवर दुहेरी हल्ला करण्याचा त्यानें बेत केला व झुल्फिकारखानास कर्नाटकांतून जलद परत येण्याविषयीं हुकूम पाठविला. मग त्यानें आपल्या सैन्याचे दोन भाग केले. एका टोळीनें किल्ले सर करावयाचे व दुसरीनें मोंगली मुलुखांत दंगा करणाऱ्या मराठ्यांचा निःपात करावयाचा. किल्ले घेणारी टोळी बादशहानें स्वतः आपल्या हाताखालीं घेतली व देशा-

वर मराठ्यांचें पारिपत्य करण्याच्या कामावर अजीमशहाचा मुलगा बेदरबक्त व झुल्फिकारखान या दोघांची नेमणूक केली. हे दोघे मैदानांत मराठी फौजेशीं लढण्याकरितां निघाले आणि राजाराम जालना शहरची खंडणी घेत असतां, मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें त्यांनीं त्यास गांठलें.

३. सन १६९५पासून औरंगजेब ब्रह्मपुरीस तळ देऊन होता. तेथून तो मराठ्यांचे किल्ले काबीज करण्याच्या मोहिमेवर निघाला (१९ आक्टोबर १६९९); व विसाव्या दिवशीं वसंतगडास त्यानें वेढा घातला. तीन दिवसांत तो किल्ला मोंगलांच्या हातीं आला. मोहिमेवर निघाल्यावर पहिल्यानें हा किल्ला हस्तगत झाला म्हणून औरंगजेबानें त्याचें नांव 'कलीद इ फत्ते' (जयाची किल्ली) असें ठेविलें. पुढें औरंगजेबानें तडक जाऊन साता-यास वेढा घातला. मराठ्यांस वाटत होतें कीं औरंगजेब वसंतगड घेतल्यावरोबर पन्हाळा घेण्यास जाईल; त्यामुळें सातारा किल्ल्यावर कांहीं व्यवस्था केली नव्हती. दोन महिने पुरेल इतकेही धान्य त्या किल्ल्यावर नव्हतें. अशा स्थितींत किल्ल्यास मोंगलांचा वेढा पडला. सातारचा किल्ला फार उंच नाहीं. पण चाळीस फूट उंचीचा कडा चोहोंबाजूंनीं तुटला असल्यामुळें तो किल्ला मजबूत आहे. औरंगजेबाचें सैन्य पुष्कळ होतें. त्यामुळें चहूं बाजूंनीं मोंगली सैन्याचा चांगला वेढा पडला. अशा स्थितींत किल्लेकऱ्यांपाशीं धान्यसामुग्री नसल्यामुळें लवकरच तो किल्ला मोंगलांच्या हातीं आला असता. परंतु परशुराम त्रिंबक कुळकर्णी परळी किल्ल्यावर होता, त्यानें बादशहाच्या सैन्यांत फितूर करून अजीमशहाच्या बतीनें किल्ल्यावर धान्य पुरविण्याची तजवीज केली. त्यामुळें बरेच दिवस किल्ला मोंगलांच्या हातीं लागेना.

४. किल्ल्यावर प्रयागजी अनंत फणसे हा प्रभु मुख्य किल्लेदार होता. किल्लेकरी पहिल्यापासून नेटानें किल्ल्याचें संरक्षण करूं

लागले. मोंगल सैन्यांतील लोक जवळ येऊं लागले, तर किल्लेकरी वरून मोठमोठे दगड लोटीत. त्यामुळें बरेच लोक ठार होत. किल्ल्याच्या ईशान्येच्या टोंकाला मंगळाई बुरूज आहे. त्याखालीं मोंगलांनीं दोन सुरुंग तयार केले होते. ते उडवून किल्ल्यांतील सर्व लोकांचा नाश करण्याचा मोंगलांचा विचार होता. बादशहा मोठ्या थाटामाटानें किल्ल्याच्या त्या भागाकडे चालला. किल्ल्यावरच्या शिबंदींतील लोकांस सुरुंगाची बातमी नव्हती. औरंगजेबानें एक थाटामाटाची स्वारी काढली आहे असें त्यांस वाटलें, व ती पाहण्याकरितां सर्व किल्लेकरी मंगळाई बुरुजावर जमले. इतक्यांत मोंगलांनीं पहिल्या सुरुंगास बत्ती दिली. त्याबरोबर एक मोठा आवाज होऊन सर्व माची हदरली, व बुरुजाचा तट उडून बादशहाची स्वारी पाहण्याकरितां जमलेल्या मराठ्यांच्या अंगावर पडला. त्यामुळें पुष्कळ लोक ठार झाले. प्रयागजी मात्र मोठ्या सुदैवानें वांचला. त्याच्यावर जे दगड पडले त्यांत दोन दोहोंकडे उभे व तिसरा आडवा असे पडले. त्यामुळें त्याला इजा न होतां तो आंत पुरला गेला ! मग त्याला उकरून काढले तेव्हां तो जिवंत निघाला. मोंगलांनीं शिबंदीचा पूर्ण नाश करण्यासाठीं दुसऱ्या सुरुंगास बत्ती दिली. परंतु तो सुरुंग नीट लागूं न होता त्यानें डोंगर बाहेर कोसळला व मोंगल सैन्यापैकीं दोन हजार लोक प्राणास मुकले. त्यामुळें मोंगल सैन्याचा विरस झाला. आणखी कांहीं दिवस वेढा चालला असता, पण अजीमशहास आपल्या फितुरीची बातमी बापास कळेल अशी भीति वाटून तो आंत धान्य जाऊं देईना. त्यामुळें किल्ला मोंगलांच्या स्वाधीन करण्याचें ठरलें. अजीमशहाच्या वतीनें किल्ला हस्तगत झाला, म्हणून औरंगजेबानें किल्ल्याचें नांव 'अजीमतारा' ठेविलें. किल्ला मोंगलांच्या हातीं लागण्यापूर्वी एक

महिना राजाराम वारला होता. राजाराम मृत्यु पावला व सातारचा किल्ला हस्तगत झाला या दोन गोष्टींनीं औरंजेबास आपली नवी मसलत लवकरच यशस्वी होणार असें वाटूं लागलें, व त्यानें किल्ले घेण्याचें काम नेटानें चालवून आपली दक्षिणची मोहीम लवकरच संपविण्याचा निश्चय केला.

---

३३. वचावलें!

(स्वातंत्र्ययुद्धाची समाप्ति; शके १६२८, इ. स. १७०७)

सातारा हातीं येतांच औरंजेबानें परळीस वेढा घातला. हा किल्ला दोन महिन्यांनीं हस्तगत झाला. परंतु वेढा चालू असतांनाच पावसाळा लागला होता; त्यामुळें पावसाच्या सरीवर सरी येऊन त्या डोंगराळ मुलुखांत त्याच्या सैन्याचे फार हाल झाले. किल्ला घेतल्यावर पावसाळ्यांत मैदानांत छावणी देण्याकरितां मोंगल सैन्य परत जाऊं लागलें. तेव्हां कृष्णा नदीस उतार नव्हता. सैन्य तसेंच पुरांतून जाऊं लागलें. तेव्हां मोंगलांची फारच दुर्दशा उडाली. शेंकडों लोक मेले, सामान वाहून गेलें. अशा अडचणींत कृष्णा उतरून औरंगजेबानें आपल्या फौजेची माण नदीच्या कांठीं खवासपूर येथें पावसाळ्यापुरती छावणी केली. छावणीस असतांना त्यानें फिरून फौजेंत व्यवस्था लाविली, उत्तर हिंदुस्थानांतून मुबलक पैसा आणविला, व निरनिराळ्या मोंगल सुभ्यांतून नवी फौज जमविली. पावसाळा संपल्यानंतर त्यानें पन्हाळ्यास वेढा घातला (९।३।१७०१). वेढा घालणाऱ्या फौजेस धनाजीनें बराच त्रास दिला, पण दोन महिन्यांनीं आंतील लोक जेरीस येऊन त्यांनीं किल्ला औरंगजेबाच्या स्वाधीन केला. प्रत्येक

किल्ल्याच्या वेढ्याची हकीकत देण्याचें कारण नाहीं. औरंगजेबानें किल्ले घेण्याची जी मोहीम सुरू केली, ती पुढें पांच वर्षें सारखी चालली होती. शेवटीं त्यानें सिंहगड, राजगड, पुरंदर, इत्यादि उत्तरेकडचे किल्ले सर केले. किल्ले घेण्याचें हें काम तर औरंगजेबानें केलेंच; पण मराठ्यांचा खात्रीनेंच पराभव करण्याचा उपाय–त्यांच्यांत दुही करणें–हाही त्यानें करून पाहिला. सातारा किल्ल्यावर जेव्हां मोंगलांनीं हल्ला केला तेव्हां त्यावर धान्य सांठविलें नव्हतें म्हणून मागें सांगितलेंच आहे. रामचंद्रपंत अमात्यानें मोंगलांस फितूर होऊन त्या किल्ल्याचा बंदोबस्त केला नाहीं, असा ताराबाईस संशय आला होता. लवकरच औरंगजेबास ही बातमी कळली. तो जन्मतःच कपट शिकला होता. त्यानें रामचंद्रपंतास लिहून धाडलेलें असें एक खोटेंच पत्रक तयार करून तें ताराबाईच्या हातीं पडेल असें केलें. त्यामुळें ताराबाई व रामचंद्रपंत या दोघांमध्यें कांहीं दिवस वांकडें आलें. परंतु रामचंद्रपंताचें वजन चांगलेंच असल्यामुळें औरंजेबास कायमची फूट पाडतां आली नाहीं.

२. राजाराम वारल्यावर ताराबाईनें आपला मुलगा शिवाजी यास गादीवर बसविलें. ताराबाई स्वतःकर्तृत्ववान् होती. तिची परशुराम त्रिंबकावर फार मर्जी होती.तिनें त्याला'पंत प्रतिनिधि'पद दिलें(४।३।१७०१). अमात्याविषयीं तिचें मन निर्मळ नव्हतें, म्हणून मागें सांगितलेंच आहे. राजाराम, संताजी, पल्हाद निराजी, इत्यादि औरंगजेबाशीं टक्कर देणारीं कर्ती माणसें निघून गेलीं. धनाजी जाधव, रामचंद्रपंत, परशुराम त्रिंबक व संक्राजी नारायण येवढे प्रमुख लोक काय ते राहिले होते; परंतु त्यांच्यांत देखील पूर्ण ऐक्य नव्हतें. तेव्हां औरंगजेब बादशहा अशा वेळीं अगदीं डुरळून गेला यांत नवल नाहीं. मग औरंगजेबानें किल्ले घेण्याचें काम जोरांत चालविलेंच; पण येवढेंच करून तो थांबला नाहीं. त्यानें बेदरबक्त व झुल्फिकारखान यांस

'मैदानावर लढून मराठ्यांचा फन्ना उडविण्यास उत्तम संधि आहे' असे निरोप वरचेवर पाठविले. खरोखर बादशहा या वेळीं अतिशय हट्टास पेटला होता.

३. मराठ्यांकडचे कांहीं कर्ते पुरुष मरून गेले व उरले होते त्यांत पूर्ण ऐक्य नव्हतें; या गोष्टी खऱ्या; पण असें झालें तरी राजारामाच्या वेळेस मराठ्यांस जो अनुभव आला होता तो ते मुळींच विसरले नाहींत. मोंगलांच्या मुलुखांत आपण धूमाकूळ मांडला तर मोंगलांचें कांहीं चालत नाहीं, मोंगल चैनी, त्यांच्या पुढून आपण पळून गेलों तर त्यांच्या अंगांत आपला पाठलाग करण्यासारखी कुवत नाहीं, इत्यादि गोष्टी त्यांच्या पक्क्या स्मरणांत होत्या. ताराबाईनें देखील हें मोंगलांचें मर्म ओळखिलें होतें व बादशहाच्या हातांतील बाहुलें बनण्याइतकी ती कोत्या मनाची खास नव्हती. तिनें किल्लेकिल्लीं हिंडावें व किल्ले भांडविण्याविषयीं लोकांस खूप उत्तेजन द्यावें. मोंगलांच्या मुलुखांत खंडणी वसूल करणाऱ्या लोकांसही राजारामाच्या वेळेप्रमाणेंच तिनें उत्तेजन दिलें. जाधव, आटोळे, निंबाळकर, भोंसले इत्यादि मराठे सरदारांनीं मोंगलांच्या मुलुखांत धुमाकूळ करून सोडला. शके १६२४ (इ. स. १७०२) त त्यांनीं सुरत व बऱ्हाणपूर या दोन श्रीमंत शहरांपासून मलीं मोठी खंडणी वसूल केली. शके १६२७त तर नर्मदा नदी उतरून मराठे घोडेस्वारांनीं माळवा प्रांतांत वसूल घेतला. या सर्व बातम्या औरंगजेबास कळतांच त्यानें झुल्फिकारखानास माळव्यांत पाठविलें; आणि वऱ्हाड व गुजराथ या दोन प्रांतांत सरदार पाठवून व्यवस्था केली. पण याचा काय उपयोग? मोंगल आले असें कळलें कीं, मराठ्यांची फौज चटकन पांगून ठिकाणावर कोणीच नाहीं असें होई; व मोंगल जरा दूर गेले कीं मराठ्यांची फौज एक होऊन फिरून तिचें खंडणी वसूल करण्याचें काम सुरू होई.

४. मराठ्यांच्या फौजेचा साधेपणा कांहीं विलक्षण होता. त्यांच्या

जवळचें सामानसुमान म्हटलें म्हणजे एक घोंगडी, थोडीशी कांदा-भाकरी; आटपलें. ते रात्रीचे एखाद्या ठिकाणीं उतरले, कीं तरवारी जवळ टेवून घोड्यांचे लगाम हातांत धरून तशीच रात्र काढीत. दुपारच्या वेलेस दोघे चौघे एखाद्या झाडाची सावली पाहून घोंगडी टाकून निजत. त्यांचे भाले जवळच जमिनीवर खोंचून ठेविलेले असत. अंगावर ऊन पडलेलें आहे अशा स्थितींत ते खुशाल घोरत पडत. त्यांच्याजवळची आणखी एक महत्त्वाची जिन्नस म्हटली म्हणजे मुलुखांतून माल भरून नेण्याची पिशवी ! ती पिशवी एकदां भरली कीं, ते इतक्या झपाट्यानें तो माल लांबवीत, कीं कांहीं विचारूं नये. मराठी फौज अशी सुटसुटीत, काटक व चपळ असे. मोंगलांची फौज म्हणजे चैनीचें आगर. त्यांच्या घोड्यांवर किती अलंकार ! मोंगल फौजेंतील लोक तर किती चैनी व मिजासी ! ! त्यांना एका मुक्कामाहून दुसऱ्या मुक्कामीं जावयाचें म्हणजे किती त्रास वाटावयाचा !! मुक्कामाहून निघतांना सर्व जामानिमा आटोपून सर्व लोक एक होऊन निघण्यासच अतिशय वेळ लागे. अशा स्थितींत एखादे वेळीं मोंगल फौजेचा मराठ्यांनीं पराभव केल्यास मराठ्यांची अतिशय चंगळ उडून जात असे. तेंच उलट मराठ्यांचा पराभव केल्यास मोंगलांना त्यांच्यापासून कांहीं एक मिळत नसे. उत्तरेकडून मोंगल फौजेस येणारें धान्य आणि खजिने मराठ्यांनीं पुष्कळदां लुटले. मोंगलांच्या फौजेस स्वारीचा त्रास सहन होईना. त्यांना चैनीची संवय झालेली. त्यांच्यानें उन्हांतून हिंडवेना. अशांत आणखी मराठ्यांचा त्रास ! मैदानावर मराठ्यांशीं लढण्यास पाठविलेल्या फौजेची अशा रीतीनें अगदीं हैराणगत होऊं लागली. त्या फौजेच्या तक्रारी सारख्या बादशहाच्या कानावर जाऊं लागल्या. परंतु किल्ले घेतल्यावर तिकडे पाहूं असा विचार करून औरंगजेबानें किल्ले घेण्याचें काम जोरांत चालविलें. शेवटीं मराठ्यांचे सर्व किल्ले घेतल्यावर औरंगजेबानें

आपली छावणी विजापुरास केली. या वेळेस औरंगजेब फारच त्रासला होता. त्याला किल्ले घेण्याच्या कामांत अतिशय दगदग झाली होती. शिवाय मैदानावर मराठ्यांचा त्रास जास्त जास्तच वाढूं लागला होता. त्यामुळें तर तो फारच खिन्न झाला. अशा चिंतेंत बादशहा झुरत असतां त्याचा मुलगा कामबक्ष यानें मराठ्यांशीं तह करून घ्यावा अशी त्यास सूचना केली. बादशहा युद्धास अत्यंत त्रासला होता. त्यानें नाइलाज म्हणून ती सूचना मान्य केली. मग धनाजी जाधवाशीं मोंगलांचें बोलणें सुरू झालें. दक्षिणच्या साही सुभ्यांत मराठ्यांनीं सरदेशमुखीचा हक्क वसूल करावा, औरंगजेबानें शाहूस सोडून द्यावें, अशीं कलमें ठरत होतीं. लवकरच ही तहाची बातमी मराठे सरदारांत पसरली व ते सर्व धनाजीच्या जवळ जमूं लागले. ज्या ज्या सरदारास वाटलें कीं, आपणास कांहीं तरी मिळालेंच पाहिजे; म्हणून जो तो घाईनें धनाजीजवळ येऊं लागला. आपल्या लष्कराजवळ मराठे लोक जमून गोंधळ करीत आहेत हें पाहून औरंगजेबास राग आला. पण करतो काय? युद्ध केव्हां एकदांचें संपतें असें त्यास झालें होतें. म्हणून त्यानें मराठ्यांचा त्रास निमूटपणें सहन केला. मराठे सरदारांनीं औरंगजेब टेंकीस आला आहे हें ओळखलें होतें. शिवाय जरी युद्ध चाललें असतें तरी त्यांची चंगळच होती. तेव्हां त्यांनीं औरंगजेबास अशी अट घातली कीं, तह करावयाचा असेल तर आमच्यापैकीं सत्तर जणांस अगोदर पोषाख मिळाले पाहिजेत. हा मराठ्यांचा हट्ट पाहून मात्र औरंगजेबास क्रोध आला व त्यानें तहाचें बोलणें बंद केलें. याच वेळीं विजापूर प्रांतांत वाकिनखेडें या गांवीं पिऱ्यानाईक नांवाच्या एका बेरडानें दंगा आरंभिला होता. मोंगल फौजेवर हल्ले करावे, प्रांत लुटावा, खजिना लांबवावा, असे प्रकार त्यानें चालविले होते. त्याचें पारिपत्य करण्याकरितां औरंगजेब निघाला. त्यानें वाकिनखेड्यास वेढा घातला

(८।२।१७०५); पण पिऱ्यानाईक त्याला दाद देईना. मराठ्यांशीं युद्ध करण्यांत बादशहा गुंतला होता, त्या अवसरांत पिऱ्यानाईकानें आपल्या गांवचा तट भक्कम केला होता. त्या प्रांतांतील लोकही त्यास सामील झाले होते. खुद्द मराठ्यांचा सेनापति धनाजी जाधव याचा त्याच्याशीं उत्तम स्नेह होता; त्यामुळें औरंगजेबानें वाकिनखेड्यास वेढा घातला असें ऐकतांच धनाजी पिऱ्यानाईकास साहाय्य करण्याकरितां गेला. औरंगजेबानें झुल्फिकारखान व कर्नाटकचा सुभेदार दाऊदखान या बड्या सरदारांस वाकिनखेड्यास बोलाविलें. ते दोघे आल्यावर मोंगलांनीं जोराचा हल्ला केला,तेव्हां वाकिनखेडें हस्तगत झालें (२७।४।१७०५).

५. औरंगजेब वाकिनखेड्याकडे गेला तेव्हां मराठे लोकांनीं बादशहानें मोठ्या श्रमानें कावीज केलेले किल्ले परत घेण्याचा सपाटा चालविला. रामचंद्रपंतानें पन्हाळा व पावनगड सर केले. परशुराम त्रिंबकानें वसंतगड व सातारा हे किल्ले मिळविले. संक्राजी नरायणानें मोंगल सैन्याची पाठ फिरतांच सिंहगड, रायगड, रोहिडा हे हल्ला करून घेतले. वाकिनखेडें घेतां घेतां औरंगजेब मेटाकुटीस आला होता, त्या दगदगीनें तो आजारी पडला. इतक्यांत आपण इतक्या श्रमानें व दगदगीनें सर केलेले किल्ले मराठ्यांनीं परत घेतले ही बातमी येऊन थडकली. तेव्हां औरंगजेबास दुःख झालें. पन्हाळा व सिंहगड गेल्याबद्दल तर त्यास अत्यंत वाईट वाटलें. त्याचा आजार जास्तच वाढला. त्यानें झुल्फिकारखानास सिंहगड घेण्यास पाठविलें व स्वतः अहमदनगरास जाण्याचा बेत केला. झुल्फिकारखानानें सिंहगड घेतला; परंतु तो घेऊन तो परत फिरला; त्याबरोबर संक्राजी नारायणानें तो किल्ला फिरून सर केला. औरंगजेब अहमदनगरास आला (२०।१।१७०६). त्याची मराठ्यांस जिंकण्याची अगदीं निराशा झाली होती. अशा स्थितींत शके १६२८च्या माघ व॥ ३० रोजीं (२०।२।१७०७) त्याचा अंत झाला. औरंगजेबाच्या आज्ञेवरून

त्याचें शव दौलताबादेनजीक रोझे येथें एका मुसलमान साधूच्या कबरीशेजारीं पुरण्यांत येऊन त्यावर एक साधी कबर बांधण्यांत आली.

६. शके १६०३त औरंगजेब दक्षिण काबीज करण्याच्या इराद्यानें महाराष्ट्रांत आला. आल्यापासून पांच सहा वर्षांच्या अवकाशांत त्यानें अदिलशाही व कुतुबशाही या दोन्ही शाह्या बुडविल्या व मराठ्यांवर राज्य करणाऱ्या संभाजीस जिवें मारिलें. त्या वेळीं मराठेमंडळावर मोठा कठीण प्रसंग येऊन लोटला होता. औरंगजेबासारखा पराक्रमी बादशहा उत्तर हिंदुस्थानांतील चार लक्ष लढवय्ये लोक घेऊन महाराष्ट्र देश काबीज करण्यास आलेला. हिंदुस्थानच्या साम्राज्याचा तो अधिपति असल्यामुळें फौज काय, पैसा काय, किंवा इतर कोणतेंही साधन काय, कशाची म्हणून त्याला कमतरता नव्हती. त्याची महत्त्वाकांक्षाही जबर. दक्षिण घेईन तेव्हां परत फिरेन, अशा निश्चयानें तो आला होता. अशा सर्वतोपरी बलाढ्य शत्रूपासून आपलें संरक्षण मराठ्यांस करावयाचें होतें; व त्या मानानें त्यांची तयारी काय म्हणाल तर संभाजीच्या वेळेच्या बेबंदशाहीमुळें रिकामा झालेला खजिना, उधळून गेलेलीं लष्करें व सर्वस्वी निरुपयोगी स्थितींत पडून राहिलेले किल्ले! त्यांचीं सर्व कर्तीं माणसें संभाजीनें ठार केलीं होतीं, त्यांच्या राज्याचा वारस औरंगजेबाच्या कैदेंत होता, व जे कायराजाराम, प्रल्हाद निराजी, संताजी घोरपडे. धनाजी जाधव, खंडेराव दाभाडे यांजसारखे नवीन पुढारी होते, त्यांस देशांतर करून जिंजीच्या किल्ल्याचा आश्रय घ्यावा लागला होता. अशा बिकट स्थितींत त्या वेळीं मराठी राज्य सांपडलें होतें. त्या वेळीं शत्रूशीं उघड मैदानांत सामना देऊन मराठ्यांचा मुळींच निभाव लागला नसता. शत्रूच्या ज्या मुलुखांत नीट बंदोबस्त नसेल त्यांत जाऊन तो अगदीं उध्वस्त करून टाकावा, त्यांतून शत्रूस मुळींच धान्याचा पुरवठा होणार नाहीं अशी व्यवस्था करून टाकावी; शत्रूची एखा-

दी लहानशी टोळी गांठून तिला चीत करावें, व शत्रूकडील चैनी व ऐषआरामी लोक अव्यवस्थेनें भटकत असतांना सांपडल्यास त्यांचा खरपूस समाचार घ्यावा; शत्रूस उत्तरेकडून येणाऱ्या पुरवठ्यावरही धाड घालावी, व शत्रूचे प्रांतचे प्रांत बेचिराख करून त्यास पेंचांत आणावें या गनिमी काव्याच्या पद्धतीनेंच त्या वेळीं शत्रूशीं टक्कर देणें शक्य झालें. या लढाईच्या पद्धतीचा असा परिणाम झाला कीं, मराठ्यांस जय आला व औरंगजेबासारख्या बलाढ्य बादशहास वर सांगितल्याप्रमाणें निराश होऊन अहमदनगरीं आपला देह ठेवावा लागला.

---

३४. मराठी राज्यांत दुही.

औरंगजेब वारल्यावरोबर त्याच्या मुलांत गादीविषयीं तंटे उत्पन्न झाले. त्याचा वडील मुलगा मुअज्जम हा काबूलच्या सुभ्यावर होता; तो बापाच्या मरणाचें वर्तमान ऐकतांच दिल्लीकडे आला. बादशहाचे दोघे मुलगे अजीम व कामबक्ष दक्षिणेंत होते. त्यांपैकीं अजीमास आपल्यास गादी मिळावी अशी इच्छा झाली. औरंगजेबाचा शूर व पराक्रमी सेनापति झुल्फिकारखानही अजीमास मिळाला होता. मग अजीमानें मुअज्जमचा पाडाव करून गादी बळकाविण्याकरितां दिल्लीकडे कूच केलें. तो उत्तरेकडे निघाला तेव्हां शाहू त्याच्याबरोबर होता.

२. मोंगलांचें सैन्य उत्तरेकडे गेलें असें पाहून मोंगलांनीं जिंकलेला प्रांत सोडविण्यास मराठ्यांनीं जोरानें आरंभ केला. धनाजी जाधवानें पुण्याचा फौजदार लोदीखान याचा पराभव केला, व चाकण सर केलें. अजीमशहाची फौज नर्मदा उतरून पुढें चालली होती. तेव्हां त्यास ही बातमी समजली. शाहूस सोडावें, म्हणजे

मराठे लोकांत तंटे उत्पन्न होतील, व आपल्या दक्षिणेंतील मुलुखास उपसर्ग पोंचणार नाहीं, असा झुल्फिकारखानानें अजीमशहास सल्ला दिला. अजीमशहास तें म्हणणें पटलें. त्यानें शाहूस सांगितलें कीं, " तुमच्या आजोबानें विजापूरकरांपासून जो मुलुख जिंकून घेतला तो व भीमा आणि गोदावरी या नद्यांमधील कांहीं मुलुख जहागीर म्हणून तुम्हांस देतों. तुम्हीं दक्षिणेंत जाऊन आपल्या मुलुखाचा बंदोबस्त करावा. " असें सांगून त्यानें शाहूस सोडून दिलें. शाहू मोंगलांच्या फौजेंतून निघाला तो नर्मदा उतरून पुढें येऊं लागला. नंदुरबारकडे डोंगराळ मुलुखांत मोहनसिंग नांवाचा अधिकारी रहात होता. तो शाहूस पहिल्यानें मिळाला. मग सुरतेपासून बऱ्हाणपुरापर्यंतच्या मुलुखांत अम्मल बसविणारा अमृतराव कदम बांडे त्याच्याकडे आला. वऱ्हाडांत परसोजी भोंसले व खानदेशांत चिमणाजी दामोदर मोघे, हे दोघे मराठे सरदार होते. शाहूनें त्यांजकडे माणूस पाठविला. तेव्हां ते दोघेही शाहूस येऊन मिळाले. हे बडे बडे मराठे सरदार शाहूस मिळाल्याबरोबर इतर बारीकसारीक लोक पुष्कळ मिळाले व शाहूचें सैन्य वाढलें. हे सर्व लोक घेऊन शाहू गोदावरीअलीकडे आला व त्यानें ' आम्ही बादशहापासून निघालों, लवकरच येतों ' अशा अर्थाचें पत्र ताराबाईस पाठविलें. पुढें शाहू अहमदनगरास आला.

३ पुतण्याचें पत्र पाहून ताराबाईस मुळींच समाधान झालें नाहीं. ती कर्तृत्ववान् व महत्वाकांक्षी बाई होती. "संभाजीच्या मृत्यूपासून शाहू बादशहाच्या कैदेंत होता. इतक्या अवकाशांत औरंगजेबानें मराठी राज्याचा नाश करण्याचे अघोर उपाय केले, पण आपला नवरा होता म्हणून मराठी राज्य वांचलें. पुढें नवरा मेल्यावर तरी मी स्वतः राज्यरक्षणार्थ किती तरी झटलें, व आतां इतकी दगदग करून वांचविलेलें राज्य उपटून आयत्या पिठावर रेघा ओढण्याकरितां हा शाहू

तयार झाला आहे," असे विचार तिच्या मनांत आले; व शाहूस राज्य न मिळूं देण्याचा तिनें घाट घातला. तिनें पहिल्यानें अशी कंडी पिकाविली कीं, हा खरा शाहूच नव्हे. सर्व कारभारी मंडळी एकत्र जमवून शाहूस मोडून काढण्याचा बेत तिनें जाहीर केला. किल्लेकऱ्यांस व सुभ्यांतील अम्मलदारांस तिनें तावडतोब हुकूम पाठविले कीं, " किल्ले देऊं नयेत. कोणीं जाऊन भेटूं नये, खर्चास मुलुखांतील वसूल देऊं नये;" आणि सेनापति धनाजी जाधव व प्रतिनिधि परशुराम त्रिंबक या दोघांस सैन्य बरोबर देऊन शाहूचा मोड करण्याकरितां पाठविलें. सैन्याबरोबर खंडो बल्लाळ चिटणीसही होता.

४. शाहूस या सर्व हकीकती समजल्या. पण आपण वडील घराण्यांतले, तेव्हां राज्य आपल्यालाच मिळालें पाहिजे, असें त्यालाही वाटलें. मग सामोपचारानें मिळत नाहीं तर भांडून कां होईना,आपलें राज्य आपण घेणार असा त्यानें निश्चय केला. तो अहमदनगराहून निघून पारद या गांवीं आला. पारद येथील लोखंडे पाटलानें तें ठाणें शाहूच्या ताब्यांत देण्याचें नाकारलें. त्यावरून शाहूनें हल्ला केला; तेव्हां पाटलाचे बरेच लोक मेले. गांव शाहूच्या हातीं आला. त्यासमयीं एक पाटलाची बाई एक मूल घेऊन शाहूकडे आली व तें मूल शाहूच्या पालखींत टाकून म्हणाली, " यास वांचवावें. अन्यायी होते ते मारले गेले. हें मूल आपणांस वाहिलें आहे!" त्यावरून शाहूनें तें मूल ठेवून घेतलें. व पहिल्यानें या गांवीं जय मिळाला म्हणून त्या मुलाचें नांव फत्तेसिंग भोंसले, असें ठेविलें. हाच फत्तेसिंग भोंसले हल्लींच्या अक्कलकोट संस्थानचा मूळपुरुष. शाहू पारदाहून निघाला तो खेड कडूसपर्यंत आला. ताराबाईकडून शाहूच्या पारिपत्याकरितां निघालेले धनाजी जाधव व परशुरामपंत त्याच सुमारास खेडजवळ आले. धनाजीच्या मनांत पहिल्यापासूनच शाहू खरा कीं खोटा हा निकाल लावून घ्यावा व खरा असल्यास त्याच्या बाजूस मिळावें असें होतें. त्यानें

शाहूची छावणी जवळच आहे असें पाहून खंडो बल्लाळास गुप्तपणें शाहूच्या खेरखोटेपणाविषयीं चौकशी करण्यास पाठवलें. चौकशीअंतीं शाहू खरा अशी खंडो बल्लाळाची खात्री झाली. तें ऐकून शाहूस मिळण्याचा धनाजीचा बेत कायम झाला. सेनापतीचें मन वळविण्याकरितां शाहूकडून माणसें आलीं; तेव्हां तर धनाजी शाहूस पूर्ण अनुकूळ झाला. प्रतिनिधीचा युद्ध करण्याचा हेका सुटेना. तेव्हां धनाजीनें कपटयुद्ध करण्याचा बेत केला. दोन्ही सैन्यांत युद्ध सुरू झालें, तेव्हां प्रतिनिधि मात्र जोरानें लढला. शाहूचा हत्ती आपल्या घोड्यापर्यंत आला तरी धनाजी हालला सुद्धां नाहीं. प्रतिनिधीचें एकट्याचें काय चालणार? तो बिचारा पराभव पावून पळून गेला. नंतर धनाजी शाहूस भेटला. दुसरे दिवशीं शाहूनें धनाजीस बोलावून नेऊन त्याचा मोठा सन्मान केला, व त्यास सेनापतिपदाचीं वस्त्रें दिलीं. खंडो बल्लाळास चिटणिशी सांगितली. प्रतिनिधि पळ काढून सातारच्या किल्ल्यांत बंदोबस्तानें राहिला. पुढें शाहू चंदनवंदनांखालीं आला. ते किल्ले घेऊन त्यानें तेथें पावसाळा काढला. पावसाळा गेल्यावर सातारा किल्ला घेण्याचा शाहूनें प्रयत्न चालविला. त्यानें प्रतिनिधीस आपणास येऊन मिळण्याविषयीं पत्रें लिहिलीं, पण प्रतिनिधि वश होईना. मग त्यानें एक युक्ति केली. सातारच्या किल्ल्यावर शेखमिरा नांवाचा एक मुसलमान सरदार रहात असे. त्याचें वतनाचें गांव वाईजवळ होतें, तेथून त्याचीं बायकामाणसें धरून आणिलीं. तेव्हां शेखमिरा सातारा ताब्यांत देण्यास तयार झाला. शाहूनें असा भेद करून सातारा घेतला. तेथें प्रतिनिधि हातीं आला. त्यास शाहूनें कैदेंत ठेविलें. सातारा ही राजधानी हस्तगत झाल्यावर शाहूनें राज्याभिषेक करून घेण्याचा बेत केला. त्याप्रमाणें शके १६२९च्या माघ शु॥ १स (१२।१।१७०८) राज्याभिषेकसमारंभ झाला.

५. राज्याभिषेक झाल्यावर शाहूनें ताराबाईच्या पक्षाचा मोड कर-

ण्याकरितां दोन वर्षे खर्च केलीं. शेवटीं मोड झाला नाहींच. शके १६३१ (सन १७०९) चा पावसाळा संपतांच शाहू मोठें सैन्य घेऊन कोल्हापुराकडे निघाला. तो आपल्यावर चाल करून येत असल्याची बातमी कळतांच ताराबाई पन्हाळ्यास होती ती रांगण्यास निघून गेली. शाहू पन्हाळा काबीज करून रांगण्यावर चाल करून गेला. तेव्हां ताराबाई कोंकणांत मालवण किल्ल्यांत जाऊन राहिली. शाहूनें रांगण्यास वेढा घातला व हल्ला करून किल्ला घ्यावा असा बेत करून हाताखालीं सैन्य घेऊन घोड्यावर स्वार होऊन त्यानें हल्ला केला. डोंगर चढत असतां घोड्याचा पाय घसरला. खंडो बल्लाळ चिटणीस जवळ होता; त्यानें एका झाडाचा नेट घेऊन घोड्यास ओढून धरलें. शेख-मिऱ्यानें शाहूस घोड्याखालीं उतरविलें. आपल्या जिवावर अरिष्ट आलें असतां हे दोघे उपयोगीं पडले, म्हणून शाहूनें चिटणिसास व शेख-मिऱ्यास इनामें दिलीं. हल्ल्यांत असा अपशकुन झाला; शिवाय पावसाळा जवळच आला; यावरून किल्ला हातीं येत नाहीं असें समजून शाहू माघारा फिरला. परत येत असतां शाहूचें एक मोठें नुकसान झालें. धनाजी जाधव मोहिमेवरून परत येतांना वारणातीरीं वडगांव येथें मरण पावला (इ.स.१७१०जून), हें तें नुकसान होय.

---

३५. बाळाजी विश्वनाथाचा उदय.

धनाजी जाधव शाहूस मिळाल्यामुळें शाहूचा वचक चहूंकडे फार लवकर बसला; पण धनाजी फार दिवस वांचला नाहीं. मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें तो लवकरच वारला, व त्यामुळें शाहूचें अत्यंत नुकसान झालें. धनाजी वारल्यावर शाहू व ताराबाई यांज-मधील अंतःकलहास फारच उग्र स्वरूप आलें. शाहूची बाजू अगदीं

लंगडी पडली होती. एकदां त्याचा अगदीं नाश होतो कीं काय असें वाटूं लागलें होतें. अशा स्थितींत शाहूस मोठ्या सुदैवानें एक पुरुष लाभला. तो बाळाजी विश्वनाथ भट हा होय. त्याच्या शहाणपणामुळें शाहूची पडती बाजू चांगलीच सांवरली. म्हणून बाळाजीचा पूर्ववृत्तांत कळणें अवश्य आहे.

२. बाळाजी विश्वनाथ भट हा मूळचा श्रीवर्धनचा देशमुख. श्रीवर्धन हें गांव कोंकणांत सिद्द्याच्या मुलुखांत आहे. तेथें बाळाजीचा वडील भाऊ जानोजी हा देशमुखीचें काम पहात असे. सिद्दी व आंगरे यांचें नेहमीं युद्ध होत असे. एकदां जानोजी हा आंगऱ्यास सामील आहे असा सिद्द्यास संशय आला. लागलीच जानोजीस पकडून आणण्याचा त्यानें हुकूम केला, व आणल्याबरोबर त्यास पोत्यांत घालून समुद्रांत बुडविलें. भावाचा अशा भयंकर रीतीनें वध झाला, तेव्हां बाळाजी चिपळुणास जकातवसुलीच्या कामावर होता. त्यानें ती बातमी ऐकून * कोंकण सोडून देशांत जाण्याचा निश्चय केला. बाजीराव पेशव्याच्या वेळेस धावडशीस येऊन राहिलेले ब्रह्मेंद्रस्वामी या वेळीं कोंकणांत परशुरामक्षेत्रीं रहात होते. त्या स्वामींस बाळाजी भेटावयास गेला. तेव्हां त्यांनींही 'देशावर जावें' अशी बाळाजीस आज्ञा केली. बाळाजी देशावर जाण्यास निघणार असें ऐकून वेळासचे तिघे भानू रामाजी महादेव, हरि महादेव व बाळाजी महादेव हे येऊन त्यास भेटले; व 'आम्हीही देशावर येणार' असें म्हणूं लागले. बाळाजीस आयतीच सोबत मिळाली. तो भानूंस

---

* जानोजी विश्वनाथ याचा शके १६२८ (सन १७०६) चैत्र शु॥५ची लोहगड येथील नोंद त्र्यंबकेश्वरचे पेशव्यांचे क्षेत्रोपाध्ये पाटणकर यांच्या वहींत उपलब्ध झाली आहे. यावरून जानोजीस समुद्रांत बुडविल्यामुळें बाळाजी देशावर आला ही गोष्ट अविश्वसनीय ठरते (इतिहास आणि ऐतिहासिक 'ऐतिहासिक विविधविषय--नंबर १९').

म्हणाला, " बरें आहे, चला; आम्हांस भाकर मिळेल त्यांत तुम्हांसही चतकोर मिळेल."

३. बाळाजी राजारामाच्या*कारकिर्दीत देशावर आला. तो पहिल्यानें संक्राजी नारायण गांडेकर याच्याजवळ भोरास चाकरीस राहिला. तेथें अंबाजीपंत पुरंदऱ्याची व त्याची ओळख झाली. मग ते दोघे मिळून धनाजी जाधवाजवळ नोकरीस राहिले. थोड्याच दिवसांत बाळाजीची हुषारी धनाजीच्या लक्षांत आली व म्हणून त्याच्यावर धनाजीची मर्जी बसली. त्याचा एकसारखा उत्कर्ष होत जाऊन लवकरच त्यानें सरसुभेदारीचें पद गांठलें. शके १६२१ (सन १६९९) त तो पुण्याचा सरसुभेदार असल्याचा ×दाखला उपलब्ध झाला आहे. शके १६२४च्या एका पत्रामध्यें बाळाजीस 'बाळाजी विश्वनाथ दिम्मत सेनापति' म्हटलें आहे. यावरून तो त्या काळीं धनाजी जाधव सेनापति याच्या हाताखालीं बडा कामगार झाला होता हें उघड आहे. पुढें शके १६२९ त (सन १७०७) तो दौलताबादचा सरसुभेदार ×होता. याच सुमारास औरंगजेब मृत्यु पावला, व अजीमशहानें उत्तरेकडे जातांना शाहूस सोडून दिलें. शाहू दक्षिणेंत येऊं लागला तेव्हां ताराबाईनें धनाजी व प्रतिनिधि यांस त्याचा मोड करण्याकरितां पाठविलें; पण त्याचा मोड करण्याऐवजीं धनाजी शाहूसच मिळाला, ही हकीकत मागें सांगितलीच आहे. धनाजी शाहूस मिळाला ही जी गोष्ट घडली, तींत बाळाजीची बरीच खटपट होती; शाहूस अगोदरच मिळालेला

---

*शके १६०१ (इ. स. १६७९) च्या सुमारास बाळाजी देशावर आला असावा. कारण सरसुभेदारीच्या हुद्यापर्यंत चढण्यास त्यास पंधरा वीस वर्षांचा काल सहज लागला असावा. (भा. इ. सं. मं. इतिवृत्त शके १८३७, राजवाडे); ×भा. इ. सं. मं. तृतीयसंमेलनवृत्त, पृष्ठ १४९; ÷भा. इ. सं. मं. इतिवृत्त शके १८३७, पृष्ठ ३०२.

चिमणाजी दामोदर मोघे याचा व बाळाजीचा चांगला स्नेह होता. चिमणाजी दामोदर शाहूस मिळाला आहे, तेव्हां शाहू खरा, अशी बाळाजीची खात्री होऊन त्यानें धनाजीस शाहूस मिळण्याचा आग्रह केला. तो त्याचा आग्रह सफल होऊन धनाजी शाहूस मिळाला. पुढें साताऱ्यास गादीवर बसल्यावर शाहूनें धनाजीस सेनापतिपदाचीं वस्त्रें दिली व वसुलाचें काम पाहण्यास सांगितलें. धनाजीनें वसुलाचें काम सर्वस्वीं बाळाजीवर सोंपविलें. तें काम बाळाजीनें फारच उत्कृष्ट रीतीनें केलें. त्यामुळें धनाजी खूष झाला, इतकेंच नव्हे, तर खुद्द शाहूचा त्याच्यावर मर्जी बसली. ती इतकी कीं, धनाजी वारल्यावर त्याचा मुलगा चंद्रसेन यास शाहूनें सेनापतिपदाचीं वस्त्रें दिलीं. परंतु बापाप्रमाणें वसूलबाबीचा अधिकार त्याच्याकडे दिला नाहीं. वसूलबाबीच्या कामावर शाहूनें बाळाजीची स्वतंत्र नेमणूक केली.

---

३६. बंडखोर मराठे सरदार.

औरंगजेब संभाजीच्या कारकीर्दीत दक्षिणेत आला, तेव्हांपासून मराठे व मोंगल यांजमध्यें जो घनघोर संग्राम सुरू झाला त्याची समाप्ति औरंगजेबाच्या मृत्यूनें झाली. इतक्या अवकाशांत मराठ्यांनीं औरंगजेबास अगदी जेरीस आणिलें. अनेक मराठे सरदार आपले घोडेस्वार घेऊन खुशाल मोंगलांच्या मुलुखांत शिरत व सर्व मुलूख उध्वस्त करीत; आणि उत्तरेकडून येणाऱ्या धान्याच्या तांड्यांवरही हल्ले करून त्यांतीलही धान्य मोंगलांस मिळूं देत नसत. यामुळें औरंगजेब अगदीं मेटाकुटीस आला, व शेवटीं अहमदनगर येथें मृत्यु पावला. मग लढाई थांबली. पण मराठे सरदारांना मुलुखांत स्वतंत्रपणें वावरण्याची झालेली संवय कशी जाणार? मराठे सरदारांनीं

शत्रूच्या मुलुखांत जाऊन दंगा उडविला कीं, राजारामाचीं व तो वारल्यावर ताराबाईचीं उत्तेजनपर पत्रें आलींच म्हणून समजावें. यामुळें पावसाळ्याचे चार महिने सोडून बाकी खुशाल शत्रूच्या मुलुखांत ते दंगा उडवून देत. अशांत शाहूची सुटका झाली. यामुळें खुद्द राजघराण्यांत दोन पक्ष झाले. शाहू व ताराबाईचा मुलगा शिवाजी हे दोघे राज्यावर मालकी सांगूं लागले. परसोजी भोंसले, खंडेराव दाभाडे, चिमणाजी दामोदर व धनाजी जाधव हे शाहू आल्याबरोबर त्यास मिळाले खरे; पण त्यांपैकीं धनाजी लवकरच मरण पावला (इ. स. १७१०); व बाकीचे तिघे आपआपल्या प्रांतांत निघून गेले, ते फिरून आले नाहींत. धनाजीच्या मृत्यूपर्यंत शाहूनें ताराबाईचा पराभव करण्याची खटपट जोरानें चालविली; पण तो वारल्यावर शाहूचे सरदार त्याला सोडून जाऊं लागले. मग ताराबाईशीं तो कसची लढाई देतो ? शाहूस सोडून ताराबाईस मिळालेल्या या सरदारांमध्यें पहिला नंबर धनाजीचा मुलगा चंद्रसेन यासच दिला पाहिजे.

२. चंद्रसेन जाधव बापामागें सेनापति झाला; परंतु बाप शाहूस मिळाला यावद्दल त्याला पहिल्यापासून वाईट वाटत होतें. शिवाय शाहूनें त्याला फक्त सेनापतिपद देऊन बापाप्रमाणें वसुलावरचा अधिकार दिला नाहीं; त्यामुळें तर शाहूचा पक्ष सोडून देण्याचा त्यानें बेत केला. वसुलावरचा अधिकार बाळाजी विश्वनाथास मिळाला होता; तेव्हां चंद्रसेन बाळाजीचा उघड द्वेष करूं लागला. तो शाहूपासून फुटून जाण्याकरितां निमित्त हुडकीत होता. एकदां ताराबाईकडचे कांहीं सरदार शाहूच्या मुलुखांत दंगा करूं लागले. त्यांचें पारिपत्य करण्यास चंद्रसेन व बाळाजी या दोघांस शाहूनें पाठविलें होतें. एके दिवशीं बाळाजीच्या पथकांतील पिराजी राऊत नांवाचा एक शिले-

दार शिकार करीत असतां एका हरणामागें लागला. तें हरिण चंद्रसेनाच्या पथकांतील व्यासराव नांवाच्या ब्राह्मणाच्या राहुटींत शिरलें. त्याला मारण्याकरितां पिराजी राहुटींत जाऊं लागला. व्यासरावानें त्यास अडविलें. पिराजीनें तेथूनच हरणास मारण्याकरितां भाला फेंकला. पण तो चुकून व्यासरावास लागला. पिराजीनें तें पाहून धूम ठोकली व बाळाजीजवळ येऊन त्यानें आपली चूक झाल्याचें सांगितलें; व ' मीं जाणून बुजून भाला फेंकला नाहीं. तेव्हां चंद्रसेनाकडे फिर्याद झाल्यास माझें रक्षण व्हावें ' अशी विनंती केली. त्यानें मुद्दाम अपराध केला नाहीं असें पाहून बाळाजीनें त्याला अभय दिलें. थोड्याच वेळानें ' तुमच्या पथकांतील पिराजी राऊत यानें आमच्या सैन्यांतील व्यासराव या ब्राह्मणावर भाल्याचे वार केले आहेत तेव्हां त्यास इकडे पाठवून द्यावें ' असा चंद्रसेनाकडून बाळाजीस निरोप आला. तेव्हां बाळाजीनें चंद्रसेनास लिहिलें कीं. ' पिराजीनें जाणून बुजून भाला टाकला नाहीं. म्हणून त्याला मीं अभय दिलें आहे. तर शिक्षाच करावयाची असेल तर काय करावयाची हें लिहून पाठवा म्हणजे त्याप्रमाणें करतों. ' यायोगें चंद्रसेनाचें समाधान झालें नाहीं. त्यानें ' पिराजीस माझ्या स्वाधीन करा. ' असा जास्तच आग्रह धरिला. शेवटीं बाळाजी पिराजीस पाठवीत नाहीं हें पाहून बाळाजीच्या पथकावर हल्ला करण्याचा आपल्या कांहीं स्वारांस चंद्रसेनानें हुकूम केला. चंद्रसेनाचे स्वार आपल्यावर येतात असें पाहतांच बाळाजीनें निवडक शेदोनशें स्वार बरोबर घेऊन पुरंदरचा रस्ता धरला. बाळाजी पुरंदराला गेला असें कळतांच तीन हजार स्वार बरोबर घेऊन चंद्रसेन तिकडे निघाला, व त्यानें सचिवास असा निरोप पाठविला कीं, ' बाळाजीस आश्रय द्याल तर तुमच्या मुलुखाची नासाडी करून टाकीन.' तो निरोप ऐकून सचिव घाबरला, व त्यानें बाळाजीस ' येथें तुम्हांस आश्रय मिळणार नाहीं ' असें स्पष्ट सांगितलें. हें ऐकून

बाळाजी मोठ्या संकटांत पडला. पण काय करतो ? स्वस्थ बसून सोय नव्हती. म्हणून तो पुरंदरहून निघून वाईजवळ पांडवगडच्या आश्रयास जाऊन राहिला. तेथून त्यानें अंबाजीपंत पुरंदरे यास साताऱ्यास पाठविलें. शाहूनें बाळाजीची सर्व हकीकत ऐकून घेऊन त्याचें रक्षण करण्याबद्दल वचन दिलें. ही बातमी चंद्रसेनास कळतांच त्यानें शाहूस उद्धटपणाचा निरोप पाठविला कीं, "बाळाजीस माझ्या स्वाधीन करावें, नाहीं तर महाराजांचे पाय आम्हांस सुटतील."

३. शाहूस या सेनापतीच्या उद्दामपणाचा राग आला व त्यानें हैबतराव निंबाळकर सरलष्कर गंगथडीकडे होता त्यास चंद्रसेनावर चालून जाण्यास सांगितलें. त्या दोघांची अंदरकीच्या घाटाखालीं हल्लींच्या फलटण संस्थानांतील जेऊर येथें लढाई झाली. तींत चंद्रसेनाचा पराभव झाला. तेव्हां तो पळून पन्हाळ्यास गेला व उघडपणें ताराबाईस जाऊन मिळाला. चंद्रसेन जाधव ताराबाईस जाऊन मिळाला तेव्हां तिनें शाहूचा नाश करण्याचा जोरानें प्रयत्न सुरू केला. चंद्रसेन एकटाच ताराबाईस मिळून स्वस्थ बसला नाहीं. त्यानें शाहूच्या इतर सरदारांना फितविण्याचा क्रम चालविला. हैबतराव निंबाळकर, खंडेराव दाभाडे व आणखी बरेच सरदार त्यानें फितविले. शाहूकडे फारशी फौज राहिली नाहीं. त्याच्या मुलखांत ताराबाईच्या पक्षाचे सरदार खुशाल धुमाकूळ घालूं लागले. दमाजी थोरात रुस्तुमराव हा हिंगणगांवच्या गढींत राहून भोंवतालच्या मुलखांत खुशाल खंडणी गोळा करूं लागला. कृष्णराव खटावकर हा राजारामाच्या वेळेपासून मोंगलांस मिळाला होता. त्यानें तर शाहू निर्बल झाला आहे, आपणास अडकाठी करण्यास कोणी नाहीं, असें पाहून खटावजवळच्या माण देशांत दंगा आरंभिला. उदाजी चव्हाण हा मिरजेकडे चौथाई बसूल करीत सुटला. वाडीच्या खेम सांवतानें दक्षिण कोंकणांत गडबड मांडिली, व कान्होजी आंग्रे उत्तर कोंकण बळकावून बसला.

असे हे मराठे सरदार चोहोंकडून बंडें करूं लागले; व शाहूस आपलें राज्य तरी टिकतें कीं नाहीं, याविषयींच संशय वाटूं लागला.

---

३७. बाळाजी विश्वनाथास पेशवाई कशी मिळाली ?

बहुतेक मराठे सरदार ताराबाईच्या पक्षाचा आश्रय करून दंगा करूं लागले. तेव्हां शाहूकडे बाळाजीशिवाय कोणी राहिलें नाहीं. शाहूनें परशुराम त्रिंबक यास कैदेंतून सोडून प्रतिनिधिपद दिलें होतें.परशुरामपंतानें आपला मुलगा कृष्णाजी यास आपला विशाळगड किल्ला व त्याभोंवतालचा मुलूख यांत बंदोबस्त करण्यास पाठविलें. कृष्णाजी गेला तो शाहूची निकृष्ट स्थिति पाहून ताराबाईस मिळाला. हें प्रतिनिधीच्या मुलाचें वर्तन पाहून शाहूस फार संताप आला. त्यानें परशुरामपंतास फिरून कैद केलें व त्याचे डोळे काढण्याचा हुकूम केला. परंतु खंडो बल्लाळ चिटणिसाच्या आग्रहावरून तो हुकूम रद्द केला. या उपकाराच्या स्मरणार्थ प्रतिनिधींच्या घरीं श्राद्धाच्या दिवशीं चिटणिसांकडील एका खाशास ब्राह्मणांबरोबर भोजनास बोलाविण्याची वहिवाट बराच वर्षे चालली होती असें म्हणतात.

२. शाहस अशीं चोहोंकडून माणसें सोडून चाललीं. बाळाजी मात्र त्यास चिकटून राहिला. जाधवाकडून फुटून आलेले शिलेदार व त्याचीं स्वतःची मिळून बाळाजीजवळ दोन हजार फौज होती. आणखीही बाहेरचें कांहीं सैन्य बाळाजीनें मिळविलें. अशी फौज जमा करून त्यानें शाहूच्या पडत्या काळांत नव्यानें सैन्य निर्माण केलें. राज्याभिषेक झाल्यावर लवकरच होनाजी अनंत याजकडे सेनाकर्ते हें पद होतें तें त्याजकडून काढून शाहूनें बाळाजीस दिलेंच

होतें; आतां लष्करच्या जमावाच्या बेगमीबद्दल बाळाजी विश्वनाथ सेनाकर्ते यास पंचवीस लक्षांचा सरंजाम दिला (अधिक भाद्रपद व॥ ३ शके १६३३, २०–८–१७११).

३. ताराबाईस शाहूकडचे सरदार मिळाल्यामुळें तिचा पक्ष जोरावला आणि ती शाहूस पकडण्याची खटपट करूं लागली. अशा संकटांत असतां बाळाजी व शाहू या दोघांनीं शत्रूचा उच्छेद करण्याची एक युक्ति काढली. राजारामाच्या दोन बायका. ताराबाई व राजसबाई. ताराबाई व तिचा मुलगा शिवाजी यांनींच राज्य आटोपलें होतें. अर्थात् राजसबाई व तिचा मुलगा संभाजी हीं दोघें असंतुष्ट होतीं. शाहूनें राजसबाईस सुचविलें* कीं. " ताराबाईस कैदेंत टाका. तिचा मुलगा शिवाजी यासही वेडा ठरवून बंदींत ठेवा; व तुमचा मुलगा संभाजी यास गादीवर बसवून राज्य चालवा. तुम्ही जर हें कारस्थान करीत असाल तर मी तुम्हांस मदत करितों. " राजसबाईला आपल्या मुलास गादी मिळणार हें पाहून आनंद झाला; व ती शाहूच्या म्हणण्याप्रमाणें वागण्यास खुषीनें तयार झाली. थोड्याच दिवसांत गिरजोजी यादव. अंताजी त्रिमळ व आणखी कांहीं गडकरी यांच्या साहाय्यानें ताराबाई व शिवाजी या दोघांस पन्हाळ्यावर कैदेंत टाकून संभाजीनें राज्यसूत्रें धारण केलीं (शके १६३४, सन १७१२). अशा रीतीनें शाहूवर जें मोठें ताराबाईचें अरिष्ट कोसळणार होतें त्याचा निकाल लागला; व ताराबाईचा पक्ष पूर्णपणें नाहींसा झाल्यामुळें अंतःकलह संपला. शिवाजी बंदींत असतां चौदा वर्षांनीं शके १६४८त देवी येऊन वारला. त्याचा एक मुलगा गुप्तपणें पळवून नेऊन ताराबाईनें वांचविला. हाच पुढें रामराजा म्हणून जो शाहूच्या मागून सातारच्या गादीवर बसला तो होय. शिवाजीचा दुसरा मुलगा संभाजीच्या हातीं सांपडला, त्यास संभाजीनें

* ' शिवाजी व ताराबाई ' संकीर्ण लेखसंग्रह, राजवाडे.

ठार केलें.

४. शाहूची प्रतिस्पर्धी ताराबाई हिचा मोड झाला खरा, पण मराठे सरदार स्वतंत्र झाले होते; ते शाहूची सत्ता कबूल करीनात. त्यामुळें देशांतला दंगा मोडून आपला अंमल बसविण्याची शाहूस खटपट करावी लागली. पहिल्यानें पुण्याजवळ पाटस तर्फेतील हिंगणगांवास राहून दमाजी थोरात दंगा करीत होता त्यावर शाहूनें बाळाजीस पाठविलें. त्याप्रमाणें बाळाजी फौज घेऊन निघाला. तो जवळ आला असें पाहून थोरात गरिबीनें सामोरा आला, व आपण शरण आलों असें दाखवून व दगा करणार नाहीं म्हणून बेलभंडार उचलून तह ठरविण्याकरितां बाळाजीस हिंगणगांवच्या गढींत घेऊन गेला. गढींत गेल्याबरोबर थोरातानें विश्वासघात करून बाळाजी, त्याचे दोघे मुलगे बाजीराव व चिमाजीआप्पा, व अंबाजीपंत पुरंदरे या सर्वांस कैद केलें. त्याला बेलभंडाराच्या शपथेची जेव्हां आठवण दिली, तेव्हां तो म्हणाला--"बेल म्हणजे झाडपाला व भंडार तर आम्ही दररोज खातों!" त्यानें जबर खंडणी मागितली व ती न दिल्यास 'राखेचे तोबरे देईन' अशी धमकी दिली. मग अंबाजी पुरंदरे रक्कम आणण्याकरितां शाहूकडे गेला. शाहूस बातमी कळली तेव्हां त्यास अत्यंत वाईट वाटलें. त्यानें लागलीच रुपये भरून बाळाजीची सुटका केली. शाहूनें थोराताचें पारिपत्य करण्याचें काम नारो शंकर सचिवास सांगितलें. थोरातानें त्यालाही कैद केलें.तें वृत्त ऐकून बाळाजीनें थोरातास जमीनदोस्त करण्याचा निश्चय केला. पण इतक्यांत दुसरें महत्त्वाचें काम निघाल्यामुळें तो बेत लांबणीवर पडला.

५. कृष्णराव खटावकर माण देशांत व कान्होजी आंगरे कोंकणांत फार गडबड करीत होते. शाहूनें त्या दोघांचा मोड करण्याचा बेत केला. त्यानें खटावकरावर बाळाजीस पाठविलें व आंग्र्यावर बहिरोपंत पिंगळे पेशवे याची रवानगी केली. बाळाजीबरोबर परशुरामपंत

प्रतिनिधि याचा दुसरा मुलगा श्रीपतराव हा गेला. परशुरामपंतानें मुलास सांगितलें कीं, ' खटावकराबरोबरच्या युद्धांत तूं चांगला पराक्रम कर, म्हणजे माझी सुटका होईल.' कृष्णराव खटावकर बराच प्रबळ होता. बाळाजी आपल्यावर चालून येत आहे असें कळतांच तो स्वतः पुढें चाल करून औंधावर आला. तेथें दोघांमध्यें निकराची लढाइ झाली. श्रीपतराव कसून लढला. कृष्णरावाचा पराभव झाला व तो बाळाजीस शरण आला. त्यावरून शाहूनें खटाव हा गांव कृष्णरावास इनाम करून दिला. या युद्धांत श्रीपतरावानें अतिशय पराक्रम केला, त्यावरून शाहूनें परशुरामपंतास बंधमुक्त करून शके १६३६ च्या वैशाख शु॥ ५स (८।४।१७१४) प्रतिनिधिपद दिलें. खटावकराशीं चाललेल्या युद्धांत शाहूचा जय झाला. पण कोंकणांत बहिरोपंत पिंगळे गेला होता,तिकडे निराळाच प्रकार झाला. बहिरोपंताचा पराभव करून कान्होजी आंग्र्यानें त्याला कैदेंत टाकलें, आणि लोहगड व राजमाची हे दोन्ही किल्ले बळकाविले. नंतर तो साताऱ्यावर चाल करून येणार अशी भुमका उठली.

६. खटावकराचें बंड मोडून बाळाजी नुकताच आला होता. त्यासच शाहूनें आंग्र्याचा मोड करण्याच्या कामगिरीवर नेमिलें. बरीच फौज हाताखालीं घेऊन बाळाजी निघाला. कान्होजी आंगरे हा बलाढ्य सरदार होता. त्याच्या ताब्यांत किल्लेकोटही पुष्कळ होते. तेव्हां त्यास सामोपचारानें वश करून घेणेंच फायदेशीर होतें. या गोष्टी बाळाजीच्या ध्यानांत आल्या व त्यानें आंग्र्याशीं तहाचें बोलणें लाविलें. त्यानें आंग्र्यास निरोप पाठविला कीं, " तुम्ही महाराजांचे पदरचे मातबर सुभेदार—तुमचे वडील तुकोजी आंगरे यांनीं थोरले शिवाजी महाराज यांजपाशीं सेवा निष्ठेनें केली. ऐसें असून शाहू महाराज वडील; सिंहासनाचे खावंद; राज्य करतात, त्यांशीं वैर करतां. हा सेवकाचा धर्म कीं काय ?

यांस भेटून कृपा संपादन करावी हे उत्तम गोष्ट आहे." आंग्र्याचें मन या निरोपानें शाहूकडे झुकलें व त्यानें बाळाजीची भेट घेतली. आंग्र्यास दहा अवघड व सोळा सवघड किल्ले मिळाले. आरमाराचा अधिकार त्याच्याकडे राहून शिवाय सरखेल हें पदही मिळालें. आंग्र्यानें शाहूचें स्वामित्व कबूल केलें, बहिरोपंतास सोडून दिलें, व राजमाचीशिवाय सर्व किल्ले परत केले. असा विजय संपादन करून बाळाजी साताऱ्यास आला; तेव्हां स्वतः शाहू त्याचें स्वागत करण्यास गांवाबाहेर गेला. बहिरोपंताच्या अंगांत कर्तबगारी नाहीं असें पाहून शाहूनें त्याच्याकडून पेशवेपद काढून घेतलें. बाळाजी सारखा शाहूच्या उपयोगी पडला होता व त्यानें नुकताच मोठा विजय संपादन केला होता. त्याबद्दल त्यास मार्गशीर्ष शु॥ १० शके १६३५ (१६।११।१७१३) रोजीं 'पेशवे' हें पद दिलें. अशा रीतीनें बाळाजीस अत्युच्च दर्जा प्राप्त झाला व 'चित्पावन जातीमध्यें श्रीवर्धनकर देशमुख अवतंस झाले.'

---

३८. मरंजामपद्धतीचा उदय.

शिवाजीनें केलेल्या राज्यव्यवस्थेसंबंधीं लिहितांना त्याच्या अष्टप्रधानांचेंही वर्णन मागें केलें आहे. शिवाजीनें आपल्या राज्यकारभाराचीं खातीं पाडून एकएका खात्यावर एक एक प्रधान नेमिला; व त्याच्या मरणापर्यंत या व्यवस्थेनें मराठ्यांचें राज्य अष्टप्रधानांच्या हुकुमाखालीं चाललें होतें. पुढें संभाजीनें सर्व प्रधान बाजूला ठेवून कलुशा सांगेल तें प्रमाण मानून तो राज्य करूं लागला. त्याच्या मृत्यूनंतर मराठ्यांचें राज्य बुडतें कीं काय असें वाटूं लागलें होतें. पण राजाराम जिंजीस गेला व त्या किल्ल्याच्या आश्रयानें त्यानें

मराठी राज्याचें रक्षण करण्याचा खटाटोप केला. या वेळेसदेखील शिवाजीची अष्टप्रधान नेमून राज्य करण्याची रीति अंमलांत आली नाहीं. जिंजीस राजारामाचा मुख्य सल्लागार प्रल्हाद निराजी हा होता, व त्याच्याच धोरणानें त्या वेळचा सर्व राज्यकारभार चालला होता. तो वारल्यावर थोड्याच दिवसांनीं जिंजींतून राजाराम निसटून गेला व महाराष्ट्रांत आल्यावरही त्याला मुळींच स्वस्थता मिळाली नाहीं. राजारामानंतर ताराबाई राज्यकारभार पाहूं लागली. तेव्हां तर औरंगजेबास जरा च जोर आला होता. व मोंगलांशीं चाललेलें युद्ध तसेंच पुढें चालविण्यांत ताराबाईचे बरेच दिवस गेले. औरंगजेब वारल्यावर स्वस्थता होईल असें वाटूं लागलें होतें; व अष्टप्रधान-घटित राज्यपद्धति मग कदाचित् अंमलांत आली असती. पण ही स्वस्थता कशी मिळावयाची ? औरंगजेबाच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांनीं शाहूची सुटका झाली. शाहू व ताराबाई या दोघांत झगडे सुरू झाले व राज्यांत गोंधळ कायम राहिला. शेवटीं बाळाजी विश्वनाथाच्या खटपटीनें शाहू गादीवर स्थिर झाला. ताराबाईचा मोड झाला खरा; पण निरनिराळे मराठे सरदार स्वतंत्रतेनें वागत होते. ते शाहूच्या ताब्यांत येऊन मराठी राज्यांत एकी उत्पन्न होणें अवश्य होतें. मराठे सरदार स्वतंत्रतेनें वागत होते. त्यास मराठी राज्यावर औरंगजेबानें केलेली स्वारी हेंच पुष्कळ अंशीं कारण होतें. राजारामाच्या वेळेस मराठी राज्य बुडतें कीं काय असें जेव्हां राजाराम, प्रल्हाद निराजी इत्यादि मंडळीस वाटूं लागलें, तेव्हां ती मंडळी जिंजीस गेली. तेथून मोंगलांच्या मुलुखांत धुमाकूळ मांडून मोंगलास जो जो त्रास देईल, त्याला इनामें. पदव्या देण्यास त्यांनीं सुरवात केली. त्या इनामांच्या व पदव्यांच्या आशेनें शेंकडों मराठे सरदार मुलुखांत दंगा करून मोंगलांस त्रास देऊं लागले. त्यामुळें अखेर मोंगल जेरीस येऊन मराठी राज्य वांचलें. मोंगल गेले खरे; परंतु

मराठे सरदार मुलुखांत पहिल्याप्रमाणेंच दंगा करीत राहिले.

२. इ. स. १७०७ पासून दक्षिणच्या साहा सुभ्यांची व्यवस्था वजीर झुल्फिकारखानाचा दुय्यम दाऊदखान पन्नी याजकडे होती. सन १७१३ साली सय्यद अबदुल्ला व सय्यद हुसेन या दोघां बंधूंनीं फर्रुखसेयर बादशहास दिल्लीच्या गादीवर बसविलें. त्या कामीं त्यांना चिकिलीजखान ऊर्फ निजामुल्मुल्क याची फार मदत झाली. त्यावरून सय्यद बंधूंनीं खूष होऊन निजामुल्मुल्कास दक्षिणचा सुभेदार नेमिलें व दाऊदखानास गुजराथ प्रांतावर बदललें. निजामुल्मुल्क महाकारस्थानी होता. त्यानें कोल्हापूरचा संभाजी व शाहू या दोघांत दुही माजली आहे व मराठे सरदारांस स्वतंत्रपणें वावरण्याची आवड आहे या गोष्टी पाहून त्यांजपासून आपली सत्ता दृढ करण्याचा घाट घातला. चंद्रसेन जाधव ताराबाईस मिळाला होता. परंतु ताराबाई जाऊन कोल्हापुरास संभाजीची स्थापना झाल्यावर त्याची निष्ठा डळमळीत झाली. तेव्हां निजामुल्मुल्कानें त्याला लालूच दाखवून मोंगलीं मुलुखांत भालकीजवळ पंचवीस लक्षांची जहागीर दिली, व आपला अंकित करून टाकिलें. अशा रीतीनें मराठ्यांपैकीं धनाजी जाधवाचा मुलगा चंद्रसेन जाधव हा बडा मराठा सरदार मोंगलांचा हस्तक बनला. रंभाजी निंबाळकर म्हणून एक मोठा पराक्रमी मराठा सरदार होता; त्याला हातीं धरून निजामुल्मुल्कानें पुणें प्रांतावर एकदम चाल केली, बाळाजी विश्वनाथ व हैबतराव निंबाळकर यांच्या सैन्याशीं पुरंदरजवळ सामना देऊन त्यास माल्प्याकडे हटविलें, व पुणें प्रांत हस्तगत केला. मग त्यानें रंभाजीस 'रावरंभा' असा वंशपरंपरा किताब देऊन पुणें प्रांतांत जहागीर दिली (इ. स. १७१३). रंभाजीनें आपल्या जहागिरीच्या व्यवस्थेस बाजी कदम यास नेमिलें. पुढें हैबतराव निंबाळकर मरण पावला, तेव्हां त्याचा मुलगाही निजामुल्मुकाच्या कारस्थानास बळी पडला, व बार्शीस

मोठी जहागीर घेऊन मोंगलांचा नोकर बनला. अशा रीतीनें निरनिराळ्या मराठे सरदारांस फितवून निजामुल्मुकानें आपले मनसबदार बनविलें व मराठी राज्य अगदीं खिळखिळें करून टाकिलें. लवकरच निजामुल्मुल्काच्या कारस्थानांनीं मराठी राज्याचे तुकडे पडणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. परंतु सुदैवानें निजामुल्मुल्काची थोड्याच दिवसांत दक्षिणच्या सुभ्यावरून उचलबांगडी झाली (इ. स. १७१५ एप्रिल), व बाळाजी विश्वनाथानें मोठी मुत्सद्दीगिरी लढवून मराठे सरदारांत ऐक्य उत्पन्न केलें; त्यामुळें मराठी राज्यावरील अरिष्ट टळलें.

३. कोल्हापूरकरांचा दुही, मराठी सरदारांचा स्वच्छंदीपणा व निजामुल्मुल्काचा उपद्व्यापी स्वभाव या तीन कारणांनीं मराठी राज्यांत गोंधळ उडून गेला होता. अशा विकट परिस्थितींत शिवाजीच्या व्यवस्थेप्रमाणें सर्व अधिकार मुख्य सत्तेच्या हातीं ठेवून राज्याचा संभाळ करणें अशक्य होतें. तेव्हां प्रत्येक सरदारानें अंगमेहनत करून मराठी सत्ता कायम राखण्यासाठीं झटावें व त्या सत्तेचा अभिमान धरावा यासाठीं सरंजामपद्धतीचा अवलंब करणें जरूर झालें. मराठ्यांच्या राज्यांत एकी उत्पन्न करण्याकरितां बाळाजीनें एकएका सरदारास मुलूख जहागीर देऊन टाकिला. सरदारानें आपआपल्या मुलुखांत वसूल गोळा करावा, न्यायनिवाडा करावा व त्याचा बंदोबस्त ठेवून शांतता राखावी असें ठरलें. कान्होजी आंग्र्याशीं बाळाजीनें समेट केला तो याच धोरणावर केला. खंडेराव दाभाड्यास खानदेश देऊन गुजराथ कबीज केल्यास तीही जहागीर देऊन टाकूं, म्हणून आश्वासन दिलें. त्याला उत्तेजन यावें म्हणून सेनापतिपदही दिलें. परसोजी भोंसल्यास वऱ्हाड बहाल करण्यांत आला व सेनासाहेबसुभा हें पदही त्याच्याकडे कायम झालें. उदाजी पवारास माळव्यांत मुलूख मिळविण्याविषयीं प्रोत्साहन दिलें. फत्ते-

सिंग भोंसल्यास कर्नाटकाकडे जहागीर दिली. परशुरामपंत प्रतिनिधीकडे निरा व वारणा या नद्यांमधील मुलुखाची व्यवस्था सांगितली. स्वतः बाळाजीनें पुण्याजवळचे सोळा महाल आणि पुरंदर, लोहगड हे किल्ले आपणाकडे ठेविले. तो राजाचा मुख्य सल्लागार झाला व खानदेशांत राज्याचा वसूल गोळा करण्याचें काम त्यानें आपल्याकडे घेतलें. परंतु त्यापासून त्याचें सैन्यबल काय किंवा द्रव्यबल काय दोन्ही वाढलीं नाहींत.

४. सरदारांना जहागिरी देतांना बाळाजीनें पुढील अटी घातल्या होत्या:—

(अ) सरदारांनीं आपआपल्या मुलुखांत मुलकी, दिवाणी, व लष्करी अंमल चालवावा.

(आ) छत्रपति व त्याचे मुख्य प्रधान यांच्या हुकुमाशिवाय कोणत्याही सरदारानें परराष्ट्राशीं लढाई किंवा तह करूं नये.

(इ) ठरविलेली खंडणी सरकारांत भरावी.

(ई) जहागिरीच्या उत्पन्नाचे हिशेब सरकारचे दरखदार तपासतील त्यांस तपासूं द्यावे.

या अटी सरदारांनीं मोठ्या खुषीनें पत्करल्या. जहागिरी मिळाल्याबद्दल सर्वांस मोठा आनंद झाला व जवळचा मोंगलांचा प्रांत काबीज करून आपली जहागीर वाढविण्याची जो तो सरदार खटपट करूं लागला. यामुळें पुढील चाळीस वर्षांत मराठ्यांचें राज्य अत्यंत झपाट्यानें वाढलें. मराठे सरदारांत एकी राहण्यास आणखी एक गोष्ट मोठी पडयोगीं पडली. प्रत्येक मराठा सरदाराचें महाराष्ट्रांत मुख्य सत्तेच्या हद्दींत कांहीं वतन किंवा इनाम असे. या वतनाचा प्रत्येक सरदारास मोठा अभिमान असे व तें वतन राखण्याकरितां मुख्य सत्तेशीं तो नम्रपणें वागे.

५. या सरंजामपद्धतीचा पुढें नीटपणें अम्मल आला नाहीं. पुढें जरी जहागिरी निर्माण झाल्या, जहागीरदार स्वतंत्र होण्याच्या भरीस पडले व मराठ्यांच्या राज्यास त्यामुळें उतरती कळा लागली, या गोष्टी खऱ्या आहेत. परंतु पुढें सरंजामपद्धति नीट चालली नाहीं म्हणून तिची स्थापना करणारास दोष देणें योग्य नव्हे. बाळाजीनें सरदार लोकांस जहागिरी देऊन राज्यांत ऐक्य केलें ही त्यानें फार मोठी कामगिरी बजाविली.

---

३९. स्वराज्याची सनद.

(शके १६४०; इ. स. १७१९)

—:०:—

नारो शंकर सचिवास थोरातानें कैदेंत टाकल्याचें मागें एका गोष्टींत सांगितलें आहे. सचिवाच्या आईनें आपल्या मुलास सोडविण्याविषयीं बाळाजीची विनवणी केली; त्यावरून बाळाजीनें सचिवाची सुटका करून दमाजी थोराताचा नाश करण्याचा बेत केला. एकदम थोरातावर हल्ला केल्यास तो सचिवाच्या जिवास अपाय करील असें बाळाजीस वाटलें, म्हणून त्यानें दंड भरून सचिवास सोडविलें. मग हल्ला करून दमाजी थोरातास कैद केलें व हिंगणगांवची गढी पाडली. नंतर बाळाजीनें शाहूस विनंती करून पुरंदर किल्ला व सासवड हीं दोन ठिकाणें सचिवाची सुटका केल्याबद्दल आपल्या ताब्यांत घेतलीं (शके १६४०, सन १७१८). तीं मराठी राज्याच्या अखेरीपर्यंत पेशव्यांकडेच राहिलीं. पुणें प्रांतांत मोंगलांकडील सरदार रंभाजी निंबाळकर याच्या जहागिरीचा व्यवस्थापक बाजी कदम याचा अंमल होता. बाळाजीनें निंबाळकरांची जहागीर कायम ठेवण्याचें आश्वासन देऊन बाजी कदमास अनुकूल

करून घेतले, व पुणें प्रांतांत आपला अंमल चालू केला. लोकांस सवलती देऊन शेतीस उत्तेजन दिलें. त्यामुळें थोड्याच काळांत सुबत्ता झाली.

२. दिल्लीच्या गादीवर या वेळीं फर्रुखसेयर बादशहा होता (सन १७१३--१७१९). त्यास गादीवर बसविण्यांत सय्यद अबदुल्ला व सय्यद हुसेन या दोघां बंधूंनीं फार खटपट केली होती. तेव्हां सय्यद बंधूंच्या हुकुमाशिवाय राज्यांतील एक पानसुद्धां हलत नसे. फर्रुखसेयर बादशहास या परावलंबनाचा थोड्याच दिवसांत कंटाळा आला, व तो सय्यदांची सत्ता कमी करण्याचे प्रयत्न करूं लागला. शेवटीं त्यानें दोघां भावांची ताडातोड करण्याचा बेत केला. त्यानें अबदुल्लास आपला वजीर करून धाकटा भाऊ हुसेनअली यास दक्षिणच्या सुभ्यावर पाठविलें व निजामुल्मुल्कास मुरादाबादेच्या सुभ्यावर बदललें (एप्रिल १७१५). हुसेनअली दक्षिणेंत पोंचण्याच्या अगोदर बाहशहानें गुजराथचा सुभेदार दाऊदखान पन्नी याला हुसेनअलीशीं लढाई देऊन त्यास ठार करण्याचा गुप्त हुकूम पाठविला. त्याप्रमाणें हुसेनअलीवर दाऊदखान चालून गेला. दोघांचें बऱ्हाणपुराजवळ युद्ध झालें (६।९।१७१५). दाऊदखान युद्धांत पडला व हुसेनअली निर्विघ्नपणें दक्षिणच्या सुभ्यावर पोंचला. हुसेनअलीनें सुरतपासून बऱ्हाणपूरपर्यंत मोंगलांच्या मुलुखाचा बंदोबस्त करण्याच्या इच्छेनें गुजराथेंत खंडेराव दाभाड्यावर फौज पाठविली. खंडेराव त्या मुलुखांत खंडणी जमा करीत असे. झुल्फिकारबेग या सरदाराच्या हाताखालीं आठ हजार लोक दाभाड्यावर चालून गेले. दाभाड्यानें त्यांस बरेंच पुढें येऊं दिलें; व मग उलटून असा सपाट्याचा हल्ला केला कीं, मोंगलांच्या फौजेची रेवडी उडाली! खुद्द झुल्फिकारबेग रणावर पडला. शत्रूचें सर्व सामान मराठ्यांच्या हातीं आलें. या

दिल्ली संयुक्त प्रांतांत एका जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे.

पराजयानें मोंगलांस फार वाईट वाटलें. मग चंद्रसेन जाधव आतां हुसेनअलीस मिळाला होता. तो व मोकुबसिंग या दोघां हिंदु सरदारांच्या हाताखालीं फौज देऊन हुसेनअलीनें त्यांना दाभाड्यावर पाठविलें. दोन्ही फौजांची गांठ अहमदनगरजवळ पडली. खूप जोराची लढाई झाली. मोंगलांची फौज औरंगाबादेस निघून गेली; व जय संपादून दाभाडे साताऱ्यास शाहूच्या भेटीस गेले. शाहूनें खूष होऊन सेनापतिपदाचीं वस्त्रें खंडेरावास दिलीं (सन १७१७). मराठ्यांनीं दक्षिणच्या साही सुभ्यांत चौथाई व सरदेशमुखी हे दोन्ही हक्क वसूल करण्याचा सपाटा चालविला.

३. अशा रीतीनें मराठे त्रास देत होते व सय्यदांचा नाश करण्याच्या फर्रुखसेयर बादशहाच्या खटपटी चालल्या होत्या. अशा स्थितींत पुढें मागें बादशहाशीं लढण्याचा प्रसंग आल्यास आपल्याला मराठ्यांच्या साहाय्याचा उपयोग होईल असें सय्यद हुसेनास वाटलें; व मराठ्यांशीं तह करण्याचा त्यानें निश्चय केला. राजारामानें जिंजीस ज्यास सचिव नेमिले होते तो सक्राजी मल्हार नरगुंदकर कार्शास निघून गेल्याचें मागें सांगितलें आहे. तो कार्शास राहण्यास कंटाळून हुसेनअलीचा नोकरी धरून त्याजबरोबर दक्षिणेंत आला होता. त्यानें ' शाहूशीं मी तुमचा तह करून देतों ' म्हणून हुसेनअलीस सांगितलें व तो तहाचें बोलणें करण्याकरितां साताऱ्यास आला. उभयपक्षीं बोलणें होऊन पुढील कलमांचा तह ठरला. दक्षिणेंतील सहा सुभे (वऱ्हाड, खानदेश, औरंगाबाद, बेदर, विजापूर, व हैद्राबाद). आणि त्रिचनापल्ली, तंजावर व म्हैसूर हीं मांडलिक संस्थानें यांतील ''चौथाई व सरदेशमुखी'' हे हक्क वसूल करण्याचीं मराठ्यांस परवानगी मिळावी. खानदेशाशिवाय शिवाजीनें जिंकलेला सर्व मुलूख, ज्यास ' स्वराज्य ' म्हणतात तो सर्व मराठ्यांस परत मिळावा, शिवनेरी व त्रिंबक हे दोन्ही किल्ले मराठ्यांस द्यावे.

शिवाय परसोजीचा मुलगा कान्होजी भोंसले यानें वऱ्हाड व गोंडवण यांत जिंकलेला मुलूख मराठ्यांच्या ताब्यांत असावा व शाहूचीं बायकामाणसें दिल्लीत होतीं तीं सोडावीं. शाहूनें 'मोंगल बादशहास आपण सरदेशमुखीबद्दल मोठा नजराणा देऊं व सर्व दाक्षिण प्रांतांत शांतता राखूं, आणि चौथाईबद्दल वर्षास दहा लक्ष रुपये खंडणी देऊं व दक्षिणच्या सुभेदाराच्या मदतीस पंधरा हजार मराठी सैन्य कायमचें ठेवूं,' असें कबूल केलें. हुसेनअलीस तह मान्य झाला व शाहूनें प्रांताचा बंदोबस्त करण्यासाठीं हुसेनअलीकडे संताजी व राणोजी भोंसले, उदाजी पवार इत्यादि सरदारांच्या हाताखालीं दहा हजार फौजेची रवानगी करून दिली (सन १७१८).

४. फर्रुखसेयर बादशहास हा तह मान्य झाला नाहीं, व तो सय्यदांचा नाश करण्याची उघड खटपट करूं लागला. तेव्हां हुसेनअलीनें दिल्लीवर स्वारी करण्याचा बेत केला; व शाहूस मदत करण्याविषयीं लिहिलें. शाहूनें बाळाजी विश्वनाथ पेशवे व खंडेराव दाभाडे यांस जाण्याची आज्ञा केली. दहा बारा हजार फौज घेऊन बाळाजी व दाभाडे हुसेनअलीच्या मदतीस शके १६४० (सन १७१८) च्या पावसाळ्यानंतर साताऱ्याहून निघाले. बाळाजीबरोबर त्याचा वडील मुलगा बाजीराव व बाळाजी महादेव भानू हे होते. स्वारीवर निघतांना शाहूनें बाळाजीस सांगितलें कीं, सनदा आणाल त्यांत गुजराथ-माळव्याची सनद आणावी, आणि दौलताबाद व चांदा हे किल्लेही मिळवावे. कान्होजी भोंसले सेनासाहेबसुभा याचे दोघे बंधु संताजी व राणोजी हेही मराठी फौजेस येऊन मिळाले होते. मग मराठे व सय्यद हुसेन यांच्या फौजा एक होऊन कूच दरकूच करीत दिल्लीस पोहोंचल्या. सय्यदांनीं फर्रुखसेयरची समजूत काढण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण त्यांचे श्रम व्यर्थ गेले व फर्रुखसेयर ताब्यावर येईना. तेव्हां सय्यदांनीं त्याचे डोळे काढले, व त्यास ठार मारिलें.

त्याच्यामागून दोन बादशहा गादीवर बसविले, परंतु ते लवकर मेले. शेवटीं शहाआलम याचा नातू रोशन अक्त्यार याचें नांव महंमदशहा असें ठेवून सय्यदांनीं त्याला गादीवर बसविलें (सन १७१९). दिल्लीस या राज्यक्रांत्या होत असतांना मराठी सैन्य दिल्लींतच होतें. फर्रुखसेयरला कैदेत टाकण्यापूर्वी सय्यदांचा पक्ष व बादशहाचा पक्ष यांजमध्यें दिल्ली शहरीं एक मोठी चकमक झाली. तींत मराठ्यांचे पंधराशें लोक ठार झाले आणि संताजी भोंसले व बाळाजी महादेव भानू हे प्रमुख सरदार मृत्यु पावले. पुढें स्थिरस्थावर झाल्यावर सय्यदांनीं करार केल्याप्रमाणें फौजेचा खर्च व सनदा बाळाजीच्या हवालीं केल्या. सर्व सरदारांस व लोकांस बादशहाकडून पोषाख मिळाले. संताजी भोंसले लढाईंत पडला होता, त्याचा भाऊ राणोजी भोंसले यास बादशहानें 'सवाई संताजीराव' असा किताब दिला.

५. बाळाजी सनदा घेऊन व फौजेचा झालेला खर्च घेऊन दक्षिणेस येण्यास निघाला. शाहूची आई येसूबाई व अटकेंत असलेली इतर मंडळीही सोडवून त्यानें बरोबर घेतली बाळाजीनें तेथें तीन सनदा मिळविल्या. एक साही सुभ्यांच्या 'चौथाईची' दुसरी साही सुभ्यांच्या 'सरदेशमुखीची' व तिसरी शिवाजीनें जिंकलेल्या मुलुखाची म्हणजे 'स्वराज्याची'. स्वारीवर असतां बाळाजीची व जयपूरचा रजपूत-राजा सवाईजयसिंग यांची मैत्री संक्राजी मल्हारानें जमवून दिली; तिचा पुढील पेशव्यांस मोठा उपयोग झाला. बाळाजी शके १६४१च्या पावसाळ्याच्या आरंभीं साताऱ्यास येऊन पोहोचला. तेव्हां शाहूनें स्वतः सामोरें जाऊन मातुःश्री येसूबाई व इतर मंडळी यांचा बहुत सन्मान केला. ज्यांनीं कामें केलीं त्या सर्वांस बक्षिसें, इनामें दिलीं. बाळाजीपंत+ भानूचा भाऊ रामाजी महादेव व मुलगा जनार्दन बल्लाळ

+इतिहाससंग्रह; पेशवे दप्तरांतील सनदापत्रांतील माहिती, पृष्ठ १७४.

 (पुढील पानावर पुढें चालू)

यांस ' दिल्लीचे मुक्कामीं युद्ध प्रसंग जाला ते समयीं बाळाजी महादेव मृत्यु पावले ' याजकरितां मौजे वांकसई गांव इनाम मिळाला. प्रसिद्ध नाना फडणीस ऊर्फ बाळाजी जनार्दन भानू हा बाळाजी महादेवाचा नात् होय.

६. पुढील काळ बाळाजीनें वसुलाची व्यवस्था करण्यांत घालविला. राज्यांतील वसूल कोणास मिळावयाचा व तो कोणीं गोळा करावयाचा या दोन्ही बाबतींत बाळाजीनें नियम ठरवून टाकिले. ते नियम पुढीलप्रमाणें होते:—

१. सरदेशमुखीचें उत्पन्न हे राजाचें वतन. यावर गादीच्या मालकाशिवाय इतर कोणाचा हक्क नाहीं.

२. बाकी सर्व हक्क मिळून जें उत्पन्न तें स्वराज्य.

(अ) यांतील शेंकडा २५ गादीच्या मालकाचा. याचें नांव राजबाबती.

(आ) बाकी शेंकडा ७५ उरले तो मोकासा. यांपैकीं साहोत्रा (सर्व स्वराज्यांपैकीं शेंकडा ६ प्रमाणें) पंतसचिव यांचा.

(इ) बाकी उरले शेंकडा ६९. तो ऐन मोकासा. यांपैकीं नाडगौंडा (स्वराज्यावर शेंकडा ३ प्रमाणें विभाग) राजानें इच्छेनुरूप वांटेल त्यास द्यावा.

(ई) बाकी शेंकडा ६६ उरले. ते निरनिराळ्या सरदार लोकांस

बाळाजी महादेवाच्या मृत्यूसंबंधीं एक आख्यायिका प्रसिद्ध आहे.ती अशी:— पेशव्यांस सनदा मिळणार हें दरबारांतील लोकांस आवडलें नाहीं व त्यांनीं पेशवा सनदा घेऊन बाहेर जाईल तेव्हां त्यास ठार करण्याचा बेत केला. त्या वेळीं सनदा घेऊन पेशवा बाळाजी विश्वनाथ निराळ्याच वेषानें बाहेर पडला, व मुखरूपपणें आपल्या लष्करांत पोहोंचला. मागें बाळाजी महादेव भानू पेशव्यांचा पोषाख घालून पालखींत बसून निघाला; तेव्हां लोकांनीं त्यास पेशवा समजून ठार केलें.

जहागीर देण्यांत खर्च व्हावे.

३. राजबाबती वसूल करण्याचें काम पेशवे, प्रतिनिधि व सचिव यांनीं करावें. साहोत्रा सचिव यांनीं वसूल करून घ्यावा; व लांब-लांबच्या गांवीं हा वसूल करण्यास राजानें आपले कामगार पाठवावे. नाडगौडा ज्याला दिला असेल त्यानें वसूल करावा. जहागीर ज्यार्ची त्यानें वसूल करावी.

४. सरदार लोकांस एकमेकाच्या मुलुखांत त्या त्या मुलुखाच्या उत्पन्नाच्या विभागावर किंवा तेथील गांवच्या उत्पन्नावर कांहीं हक्क मिळावे.

७.ही वसूलव्यवस्था झाल्यावर मराठे सरदारांत एकाचा जो फायदा तोच दुसऱ्याचा असें झालें व त्यांच्यांतील बंडाळी नाहींशी होऊन आपआपले हक्क जास्त वाढविण्याकरितां त्यांना मोठें उत्तेजन मिळालें. याप्रमाणें सरदारांमध्यें एकी करण्याचें महत्त्वाचें कार्य बाळाजीनें घडवून आणलें. पुढें लवकरच शके १६४२ च्या चैत्र शु॥ ५स (२।४।१७२०) सासवड येथें दगदगीनें थकून बाळाजी मृत्यु पावला. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहूची सुटका झाली तेव्हांपासून मराठे सरदारांमध्यें घरगुती कलह सुरू झाले. प्रथम बाळाजीनें निरनिराळ्या सरदारांस योग्य कार्यक्षेत्रें आंखून दिलीं व मुख्य सत्तेच्या हुकुमांत वागून त्यांनीं आपला मुलूख संभाळावा अशी व्यवस्था केली. पुढें बाळाजीनें दिल्लींतून 'चौथाई व सरदेशमुखी' या हक्कांच्या सनदा आणिल्या. यांत त्यानें मराठी राज्याची अप्रतिम सेवा केली; कारण त्यामुळें मराठमंडळाचें लक्ष बाहेर नवीन मुलूख काबीज करण्याकडे लागलें व त्यांचीं आपसांतील भांडणें साहजिकपणेंच बंद झालीं. 'चौथाई व सरदेशमुखी'या हक्कांच्या वसुलीच्या निमित्तानें परमुलुखांत मराठ्यांचा अनिरुद्ध संचार सुरू झाला, आपआपसांत भांडत बसणें सोडून देऊन निरनिराळे मराठे सरदार राज्यविस्तारासाठीं झटूं लागले व मराठी

राज्याची चोहोंबाजूंनीं वाढ झाली. तशांत बाळाजीचा मुलगा बाजीराव अत्यंत शूर व महत्त्वाकांक्षी निघून लवकरच मराठ्यांच्या स्वाऱ्या खुद्द दिल्लीपर्यंत होऊं लागल्या व मराठी साम्राज्याची स्थापना झाली.

---

४०. मूळच उपटलें, कीं फांद्या आपोआप खालीं येतील.

बाळाजीस दोघे मुलगे होते. वडील बाजीराव आणि धाकटा चिमाजीआप्पा. दोघेही शूर होते, व चिमाजी नेहमीं बाजीरावाच्या अनुरोधानें वागत असे. त्यावरून रामलक्ष्मणांची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. बाळाजीस चंद्रसेनापुढें सरकत सरकत पांडवगडच्या आश्रयास यावें लागलें, तेव्हां त्याच्याबरोबर बाजीराव व चिमाजी हे दोघे होते. बाळाजी दिल्लीस गेला तेव्हां बाजीराव त्याच्याबरोबर होताच. साताऱ्यास बाळाजी गेला कीं बाजीरावास नेहमीं बरोबर घेऊन जाई. तेथें शाहूच्या व बाजीरावाच्या नेहमीं गांठी पडत. शाहू बाजीरावास जवळ बोलावून निरनिराळे प्रश्न करी. त्यांचीं बाजीरावानें दिलेलीं उत्तरें ऐकून छत्रपति गार होऊन जाई. बाजीराव जवळच असल्यामुळे त्याच्या एकंदर वर्तनावरून लहानपणापासूनच त्याच्या अंगीं असणारा स्वाभिमान शाहूच्या लक्षांत आल्याशिवाय राहिला नाहीं. त्यामुळें शाहूची बाजीरावावर सहज मर्जी बसली. हा आपल्या बापाच्या सवाई होणार असें शाहू नेहमीं म्हणे. बाळाजी वारल्यावर कर्ता माणूस नाहींसा झाला, म्हणून शाहूस दुःख झालें; पण बाजीरावामुळें तें दुःख फार वेळ टिकलें नाहीं. त्यानें बाजीरावास एकदम पेशवाईचीं वस्त्रें दिलीं, व बाळाजीप्रमाणेंच पराक्रम करून स्वामिसेवा करण्याविषयीं उत्तेजन दिलें. बाजीरावानें

पेशवाई मिळाल्याबरोबर खानदेशाकडे स्वारी केली. मोंगलांच्या मुलुखांतील चौथाई न देणाऱ्या फौजदारांचें पारिपत्य केलें. दोन तीन वर्षांत माळव्यावर त्याच्या तीन मोहिमा झाल्या. त्याचें धाडस कांहीं विलक्षण होतें. त्याच्यामुळें मराठे शिलेदारांवर त्याचा तेव्हांच वचक बसला, व ते त्याच्या आज्ञेप्रमाणें वागूं लागले.

२. बाजीरावानें मोंगलांच्या मुलुखांत दाखविलेला विशेष पराक्रम पाहून श्रीपतराव प्रतिनिधीच्या छातात धडधडूं लागलें. एके दिवशीं दरबार भरला होता. त्या वेळेस संधि साधून श्रीपतराव म्हणाला, "पेशवे माळव्यांत व इतर ठिकाणीं जबरदस्तीनें मोंगलांपासून खंडणी घेत आहेत, ही गोष्ट भयंकर नाहीं काय? अशा उद्धटपणाच्या वर्तनानें मोंगलांस चीड येणार नाहीं काय? मी युद्धास कचरतों असें मुळींच नाहीं. लढाईचा प्रसंग आल्यास पेशव्यांप्रमाणें मीही स्वारीवर जाण्यास तयार आहें. परंतु खोल विचाराअंतीं मला असें वाटतें कीं, उत्तरेकडचा मुलूख मिळविण्याचा तूर्त तरी पेशव्यांनीं नाद सोडावा." प्रतिनिधीनें हें जें भाषण केलें, त्याला भीति हें एक कारण होतेंच, पण दुसरें एक कारण होतें; तें हें कीं, बाजीरावाचा उत्कर्ष प्रतिनिधीस सहन होत नव्हता. दोन तीन वर्षांच्या बाजीरावाच्या शूरत्वाच्या कृत्यांमुळें चोहोंकडे त्याचें तेज फांकत चाललें होतें. हें पाहून प्रतिनिधीला वाटलें कीं, असाच पेशव्यांचा उत्कर्ष होत गेला तर आपण निर्माल्यवत् होणार. तेव्हां याची वेळींच तजवीज केली पाहिजे.

३. तें प्रतिनिधीचें भाषण ऐकून बाजीरावास आश्चर्य वाटलें; प्रतिनिधीच्या भाषणानें दरबारांतील लोकांच्या मनांत उत्पन्न झालेला संशय दूर करण्याकरितां बाजीरावानें पुढीलप्रमाणें भाषण केलें. तो म्हणाला, "आजपर्यंत जीं कांहीं युद्धें मीं केलीं आहेत, तीं मोंगलांशींच केलीं आहेत; व त्यांवरून मोंगलांचें सामर्थ्य किती आहे

हें मला कळून चुकलें आहे. मोंगल या नांवाची प्रतिनिधीस इतकी भीति कां वाटते हें मला समजत नाहीं. मोंगलांइतके चैनी या भूपृष्ठावर दुसरे नसतील. मोंगलांच्या राज्याचा वृक्ष वठला आहे. त्याच्या निरनिराळ्या फांद्या तोडण्याची गरज नाहीं. महाराजांनीं आज्ञा मात्र द्यावी. मी दिल्लीस जाऊन या जुनाट वृक्षाच्या मुळाशींच घाव घालतों. **मूळच उपटलें कीं फांद्या आपोआप खालीं येतील**" हें बाजीरावाचें वीरश्रीयुक्त भाषण ऐकून सर्व सरदारांस आवेश चढला. खुद्द शाहूच्या अंगांत शिवाजीचें वारें संचरलें व त्यानें पेशव्यास म्हटलें, " तुमच्यासारखे वीर काय करणार नाहींत ? मराठ्यांचा भगवा झेंडा किन्नरखंडांत नेऊन लावण्यास आमची तुम्हांस परवानगी *आहे.

---

४१. खरे कोण, सातारकर कीं कोल्हापूरकर ?

(**पालखेडची लढाई; शके १६४०, इ. स १७२८**).

महंमदशहा बादशहा गादीवर आला त्या वेळीं दिल्ली येथें झटापटी चालल्या असतां निजामुल्मुल्क मुरादाबादेहून दिल्लीस गेला. तेथें सय्यदांचें व त्याचें जुळेना. तेव्हां त्यांनीं त्याची माळव्याच्या सुभ्यावर नेमणूक करून तिकडे त्याची रवानगी केली (सन १७१९). त्याला लवकरच सय्यदांच्या सत्तेखालीं राहण्याचा कंटाळा आला व दक्षिणेकडे स्वतंत्र होण्याचा त्यानें बेत केला. सन १७२० च्या एप्रिलांत माळवा सोडून तो दक्षिणेंत आला, व बऱ्हाणपूर शहर व असीरगड किल्ला हीं स्थळें त्यानें तेव्हांच काबीज केलीं. त्याच्यावर दडपण म्हणून दिलावरअलीखान या सरदाराच्या

* **ग्रँट डफकृत मराठ्यांचा इतिहास**, भाग १, पृष्ठ ३६१ (१९२१)ची प्रत.

हाताखालीं सय्यदांनीं माळव्याच्या सरहद्दीवर सैन्य ठेवून दिलें होतें. तो निजामुल्मुल्कावर चालून आला व खांडव्याजवळ लढाई होऊन तींत तो मारला गेला (१९।६।१७२०). आलमअली नांवाचा हुसेनअलीचा पुतण्या दक्षिणेंत होता. तो हुसेनअली दिल्लीस गेल्यावर दक्षिणच्या सुभ्याचा कारभार पहात असे. त्याच्याशीं मराठ्यांचें सख्य होतें. निजामुल्मुल्कानें बऱ्हाणपुरास मिळविलेल्या जयाची खबर लागतांच आलमअलीनें आपलें सर्व सैन्य औरंगाबादेस जमवून बऱ्हाणपूरच्या रोखें कूच केलें. त्याच्या फौजेंत सय्यद व मराठे यांमध्यें तह घडवून आणणारा मराठा मुत्सद्दी संक्राजी मल्हार हा असून कान्होजी भोंसले आपल्या पथकानिशीं सिद्ध होता. दिल्लीहून नुक्ताच परत आलेला खंडेराव दाभाडे याचीही शाहूनें आलमअलीच्या मदतीस तांतडीनें रवानगी केली. इकडे चंद्रसेन जाधव, रावरंभा निंबाळकर इत्यादि शाहूच्या विरुद्ध पक्षाचे मराठे सरदार निजामुल्मुल्कास जाऊन मिळाले होते. दोन्ही पक्षांची लढाई पेनघाटांत बाळापुराजवळ होऊन खासा आलमअली पडला (१०।८।१७२०); व मराठ्यांमधील संक्राजी मल्हार नरगुंदकर कामास आला. या जयाचें वर्तमान दिल्लीस गेलें. तेव्हां खुद्द हुसेनअली बादशहास बरोबर घेऊन निजामुल्मुल्काचा मोड करण्यास दिल्लीहून निघाला. परंतु वाटेंत हुसेनअलीचा खून झाला व पुढें त्याच्या भावाचाही मोड झाला. अशा रीतीनें सय्यदांचा नाश झाल्यावर त्यांच्या विरुद्धपक्षांतील लोकांची वढती झाली.

२. लवकरच निजामुल्मुल्काचा चुलता वजीर अमीनखान हा मरण पावला (१७२१ जानेवारी). तेव्हां बादशहानें निजामुल्मुल्कास वजीर नेमिलें. म्हणून तो आपल्या सुभ्याची व्यवस्था लावून शके१६४३ (जानेवारी सन १७२२) च्या शेवटीं दिल्लीस गेला. परंतु तेथें त्याचें व बादशहाचें पटेनासें झालें. निजामुल्मुल्क कर्तृत्ववान् होता. तो औरंगजेबाच्या भारदस्त दरबारांत वाढलेला

असल्यामुळें, हल्लींच्या दरबारची चैनबाजी व पोरकटपणा हीं त्यास खपतनाशीं झालीं. त्यामुळें वजिराचें काम सोडून देऊन 'वकील ई मुतालक' ही पदवी घेऊन कांहीं दिवस तो दिल्लीसच होता. शेवटीं एके दिवशीं शिकारीच्या निमित्तानें दिल्लींतून आपल्या दक्षिणच्या सुभ्याकडे जाण्यास तो निघाला. महंमदशहास ही बातमी कळतांच त्यानें हैद्राबादचा कोतवाल मुबारिझखान यास 'निजामुल्मुल्काचा नाश कर म्हणजे तुला दक्षिणचा सुभेदार करूं' असा गुप्त निरोप पाठविला. हुकुमाप्रमाणें मुबारिझखानानें निजामुल्मुल्काशीं युद्ध करण्याची जय्यत तयारी केली. निजामुल्मुल्कानें गोडीगुलाबीनें मुबारिझखानाचें मन वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण त्याचें मन वळेना. तेव्हां निजामुल्मुल्कानें युद्धाची तयारी केली व मराठ्यांपाशीं मदत मागितली. तेव्हां बाजीराव सैन्य घेऊन आला. मग दौलताबादनजीक साखरखेडे येथें शके १६४६ च्या आश्विनांत (२।१०। १७२४) लढाई झाली. तींत मुबारिझखान व त्याचे दोघे मुलगे पडले. मुबारिझखानाचें शीर निजामानें बादशहाकडे पाठवून दिलें, व स्वामीच्या कृपेनें आम्हीं हा बंडवाला मारला असें पत्र लिहिलें.

३. निजामुल्मुल्कानें अशा रीतीनें दक्षिणेंत येऊन आपली सुभेदारी मिळविली. त्याला बादशहाच्या जांचांतून आपण आतां अजीबाद सुटलों असें वाटलें व आनंद झाला. पण त्याला आतां एक नवीनच शत्रु उत्पन्न झाला. दक्षिणच्या साही सुभ्यांतून खंडणी घेण्याचा हक्क दिल्लीच्या बादशहापासून बाळाजी विश्वनाथानें मिळविला होता (इ. स. १७१९). त्या हक्काचा वसूल दरवर्षी मराठे करीत. त्यामुळें दक्षिणेंतील मोंगलांच्या मुलुखावर मराठ्यांचा कायमचा शह बसला. तो उठवून आपला मुलूख पूर्ण स्वतंत्र करण्यासाठीं निजामुल्मुल्कानें यापुढें सारखी खटपट चालविली. प्रथम कर्नाटकावर आपल्याला नीट देखरेख ठेवतां यावी व मराठ्यांना आपल्या दरबारीं ढवळाढवळ करण्यास

सांपडूं नये म्हणून त्यानें आपली राजधानी औरंगाबाद येथून बदलून हैद्राबाद येथें नेली. पुढें त्याला वाटलें कीं, हैद्राबादच्या जवळपासच्या प्रांतांतून मराठ्यांनीं खंडणी घेऊं नये असा त्यांजबरोबर ठराव करावा. बाजीराव शके १६४८ (सन १७२६) त कर्नाटकांत स्वारीवर गेला होता. तेव्हां शाहूजवळ श्रीपतराव प्रतिनिधिच सल्ला देण्यास असे. निजामानें प्रतिनिधीस वऱ्हाडांत जहागीर देऊन खूष केलें. पूर्वी निजामानें रावरंभा निंबाळकरास पुणें प्रांतांत जहागीर दिली होती. या वेळीं शाहूची मर्जी संपादन करण्यासाठीं ती दूर करून त्याला पूर्वेस करमाळ्याकडे नवी जहागीर दिली; तेव्हां पुणें प्रांतीं पूर्णपणें मराठी सत्ता चालू झाली (इ० स० १७२७). नंतर प्रतिनिधीच्या मध्यस्थीनें शाहू व निजाम या दोघांत पुढीलप्रमाणें तह ठरला. शाहूनें हैद्राबादच्या सुभ्यावरील चौथाई व सरदेशमुखी हे हक्क सोडावे; त्यांपैकीं चौथाईच्या ऐवजीं निजामानें शाहूस ठरीव खंडणी द्यावी व सरदेशमुखीच्या हक्काच्या बदली इंदापुराजवळ जहागीर द्यावी. बाजीरावास हा प्रतिनिधीनें निजामाशीं केलेला तह मुळींच आवडला नाहीं, आणि त्याचें व प्रतिनिधीचें भांडण झालें. हें निजामास कळलें, तेव्हां मराठ्यांत दुही पाडण्याचें धोरण तसेंच पुढें चालविण्याचा त्यानें विचार केला व कोल्हापूरच्या संभाजीस हातीं धरलें. चंद्रसेन जाधव, रावरंभा निंबाळकर व कोल्हापूरचा संभाजी इतकी मंडळी आपल्यास अनुकूल असल्यावर पेशव्याची तेव्हांच खोड मोडतां येईल, अशी निजामास घमेंड होती. त्यानें शाहूकडील वसूल करणाऱ्या लोकांस हाकून दिलें व शाहूस असा निरोप पाठविला कीं, "तुमचे लोक वसूल करण्यास येतात आणि कोल्हापूरच्या संभाजी राजाचेही येतात. या तुम्हां दोघांपैकीं खरा वारस कोण हें अगोदर ठरवूं; म्हणजे मग खऱ्या वारसास मी हक्क वसूल करूं देईन." अशा रीतीनें मराठ्यांमधील दुहीच्या सबबी-

वर त्यांचा साही सुभ्यांतील चौथाई-सरदेशमुखीचा हक्क अजीबाद बुडविण्याचा निजामानें घाट घातला.

४. निजामाचा मगरुरीचा निरोप ऐकून शाहूस अत्यंत क्रोध आला. बाजीराव तर पहिल्यापासूनच निजामाविषयीं जळत होता. बाजीरावानें शाहूस सांगितलें कीं, 'निजाम गर्वानें चढून गेला आहे. मला आज्ञा द्यावी म्हणजे मी त्याचें पारिपत्य करितों.' शाहूनें निजामाची खोड मोडण्यास परवानगी दिली. बाजीराव फौज घेऊन निघाला आणि निजाम व त्याचे साहाय्यकर्ते संभाजी व चंद्रसेन यांच्या फौजा एकत्र होण्यापूर्वीच त्यानें जालना प्रांतांत शिरून तेथें खूप खंडणी वसूल केली. मग मराठ्यांवर ऐनजखानाच्या हाताखालीं कांहीं फौज चालून आली. बाजीरावानें त्याच्याशीं थोडेसें युद्ध केलें व माहुरावर मोर्चा फिरविला. मग फिरून बाजीराव औरंगाबादेकडे झपाट्यानें आला, व बऱ्हाणपुरावर आपण स्वारी करणार अशी अवई उठवून भरारी मारीत खानदेशांत गेला. मग थोडेसे लोक बऱ्हाणपुराकडे पाठवून बाजीराव गुजराथेंत शिरला, व निजामुल्मुल्काच्या हुकुमानें आपण खंडणी वसूल करीत आहोंत असें त्यानें जाहीर केलें. इकडे निजामुल्मुल्कास वाटलें कीं बाजीराव बऱ्हाणपुरास गेला. म्हणून तो मोठ्या घाईनें बऱ्हाणपुराकडे गेला. तेथें गेल्यावर बाजीरावानें आपणास पूर्णपणें चकविलें असें त्याला आढळून आलें. मग रागावून तेथून निघून पुणें जाळून टाकावें या उद्देशानें तो परत फिरला. तो अहमदनगरास येऊन पोंचला नाहीं, तोंच बाजीराव आपल्या मुलुखांत उतरून लुटालूट करीत आहे असें त्यास कळलें. मग फजीत पावून तसाच बाजीरावाचें पारिपत्य करण्याकरितां गोदावरी उतरून निजाम आपल्या मुलुखांत गेला. कांहीं दिवस मराठे व मोंगल यांच्या चकमकी होत होत्या. शेवटीं बाजीरावानें निजामास पैठणच्या बाजूस पालखेड येथें अशा अडचणींत कोंडिलें कीं, त्यास पाणी मिळेना, धान्य मिळेना, व त्याच्या घोड्यांस

वैरण मिळेना. तेव्हां निजाम अगदीं जेरीस आला. निजामानें चंद्रसेनास विचारलें कीं, " तुम्ही मराठे मजकडे असून गनिमी काव्यानें शत्रूशीं कां टक्कर देत नाहीं ? " चंद्रसेनानें उत्तर केलें " माझ्या सैन्यांत पुष्कळ मुसलमानच भरले आहेत. " संभाजीस तोच प्रश्न विचारला, तेव्हां त्यानें सांगितलें कीं, " माझे कारकून विरुद्ध पक्षाला मिळाले असावेत असा जबर संशय येतो ! " शिवाय संभाजी निजामास म्हणाला ' फौजेच्या खर्चास जे पैसे द्याल ते माझ्याजवळ द्या. कारकुनांजवळ दिल्यास ते आणखी फौज फितवितील. ' कारकुनांनीं निजामास साफ सांगितलें कीं, ' संभाजीपाशीं तुम्हीं पैसे दिल्यास फौजेस मुळींच मिळावयाचे नाहींत; तो ते चैनींत उडवून टाकील.' असा निजामाच्या साहाय्यकर्त्यांत गोंधळ होता. त्यामुळें निजामास फारच त्रास होऊं लागला. तेव्हां बाजीरावाशीं समेट करण्याचा त्यानें बेत केला. ऐवजखानाच्या मध्यस्थीनें तहाचीं बोलणीं सुरू झालीं. संभाजीस आपल्या स्वाधीन करण्याविषयीं बाजीरावानें बराच आग्रह धरला. चौथाई व सरदेशमुखी हे हक्क पूर्वीप्रमाणें वसूल करूं देण्याचें निजामानें कबूल केलें. हक्कांच्या वसुलीस उपयोगी असे कांहीं किल्ले देण्याविषयीं मराठ्यांचें म्हणणें होतें, तेंही निजामानें कबूल केलें. तेव्हां बाजीरावानें संभाजीविषयींचा आग्रह सोडला. निजामानें संभाजीस पन्हाळ्यावर पोंचवावें, मग शाहूनें त्याच्याशीं काय वाटेल तो ठराव करावा, निजामानें मध्यें पडण्याची जरूर नाहीं, असें ठरलें. हा तह शके १६५० चैत्र शुद्ध ६ (६।३।१७२८) रोजीं मुंगीशेवगांव येथें ठरला.

४२. शिंदेहोळकरांचा उदय.

बाजीरावानें पेशवाई मिळाल्यावर थोड्याच दिवसांनीं माळव्यावर स्वाऱ्या केल्या म्हणून मागें सांगितलें आहेच. या स्वाऱ्यांत ज्या सरदारांनीं कर्तबगारी दाखविली त्यांत शिंदेहोळकर हे मुख्य होत. कांहीं वर्षें बाजीरावास निजामुल्मुल्काशीं युद्ध करीत महाराष्ट्रांत रहावें लागलें. त्या वेळीं माळव्यांत शिंदे व होळकर हे सरदार हक्क वसूल करीत असत. तेव्हां या सरदारांचा पूर्व वृत्तांत कळणें अवश्य आहे.

२. होळ म्हणून नीरेचे कांठीं जेजुरीजवळ एक खेडे आहे. तेथें खंडूजी नांवाचा एक चौगुला पाटलाच्या हाताखालीं काम करून असे. त्याला मल्हारजी नांवाचा एक मुलगा झाला (सन १६९३). मल्हारजी तीन वर्षांचा असतांच खंडूजी वारला. मग मल्हारजीची आई जिवाई खानदेशांत तळोदें येथें आपला भाऊ भोजराज बारगळ चौगुला याजपाशीं जाऊन राहिली, व तेव्हांपासून मल्हारजी आपल्या मामाच्या घरीं राहूं लागला. मामानें त्याला मेंढरें राखण्याचें काम सांगितलें होतें. दररोज सकाळीं रानांत जाऊन मेंढ्या चारून संध्याकाळीं घरीं यावें असा मल्हारजीचा क्रम चालला होता. एके दिवशीं मेंढ्या चारीत असतां दोन प्रहरची वेळ झाली होती. मल्हारजी श्रमानें थकून एका झाडाखालीं पडला होता. थकल्यामुळें त्याला झोंप लागली होती. इतक्यांत वारुळांतून एक नाग निघून त्यानें त्या मुलावर फणेची छाया केली. तितक्यांत मल्हारजीची आई मुलास भाकरी घेऊन आली. तिनें तें पाहिलें व भयभीत होऊन माघारी जाऊन ती भावास घेऊन आली. तरी तो नाग होताच. शेवटीं माणसांची गर्दी झाल्यावर नाग बिळांत निघून गेला. मल्हारजीच्या आईनें

हा वृत्तांत एका ज्योतिष्यास सांगितला. तेव्हां तो ज्योतिषी म्हणाला, "या मुलास राज्य मिळणार."

३. यापुढें मामानें मल्हारजीस रानांत पाठविणें बंद केलें व त्यास घोड्यांची देखरेख सांगितली. कांहीं दिवसांनीं मल्हारजी, कंठाजी कदम बांडे नांवाच्या सरदाराच्या पथकांत दहावीस घोडे ठेवून शिलेदारी करूं लागला. याच वेळीं बाजीराव पेशव्याच्या माळव्यांत स्वाऱ्या सुरू झाल्या. त्यांत मल्हारजीचा पराक्रम दिसून आला. त्यावरून चढत चढत दहा वीस घोड्यांपासून पांच हजारांपर्यंत फौज मल्हारजीजवळ वाढली व मग अर्थातच मल्हारजीस मल्हारराव होळकर हें नांव मिळालें.

४. सातारा जिल्ह्यांत कोरेगांव तालुक्यांत कण्हेरखेड म्हणून एक गांव आहे. त्या गांवची पाटीलकी शिंदे घराण्याकडे होती. हें शिंदे घराणें मुसलमानांच्या राज्यापासून प्रसिद्ध होतें. नेमाजी शिंदे या सरदाराचें नांव मागें आलेंच आहे. पण या वेळीं या घराण्याची फारच हीन दशा झाली होती. राणोजी शिंदे हा पहिल्यानें बाळाजी विश्वनाथाच्या सैन्यांत बारगिरी करीत असे. बाजीरावाची हुजऱ्याची नोकरी त्यानें आतां पत्करली होती. परंतु अशा हलक्या नोकरींतही त्याची स्वामिनिष्ठा दिसून आल्याशिवाय राहिली नाहीं. एके दिवशीं बाजीराव दरबारास गेला होता; तेथें त्यास कामामुळें बराच उशीर झाला. काम आटोपल्यावर बाजीराव बाहेर येऊन पाहतो तों राणोजीस झोंप लागली आहे. पण त्यानें आपले (बाजीरावाचे) जोडे घट्ट उशाशीं धरले आहेत तें पाहून बाजीरावास राणोजीचें कौतुक वाटलें, व कोणतेंही काम त्याच्यावर सोपविलें असतां तो तें मोठ्या नेकीनें करील अशी त्याची समजूत झाली.

५. एकदां मल्हारराव होळकर हिंदुस्थानांत स्वारी करण्यास निघणार होता. तेव्हां त्याच्याबरोबर पेशव्यांची एक पागा द्यावयाचें ठरलें

होतें. त्या पागेवर मुख्य कोणास नेमावें यासंबंधीं घाटत होतें. पेशव्याकडून ताट घेऊन राणोजी रोज मल्हारराबाकडे पोंचवीत असे.



मल्हारराव होळकर. **श्रीमंत पहिले बाजीराव.**

चित्रकार:—शिवराम चितारी: (मळेकर-संग्रह)

संशोधक:—श्रीमंत तात्यासाहेब मेहेंदळे: भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें.

मल्हारराबाचीही राणोजीवर मर्जी बसली. एके दिवशीं होळकर येऊन

बसला होता. त्या वेळीं बाजीराव त्यास म्हणाला. तुम्ही सांगाल त्यास पागा देतों. राणोजी पेशव्यावर चवरी वारीत होता. त्याच्याकडे होळकरानें बोट केलें. बाजीरावानें तें मान्य करून पागेचीं वस्त्रें राणोजीस देऊन सरकारी शिक्केकट्यार व जरीपटका हीं त्याच्या स्वाधीन केलीं. अशा रीतीनें राणोजीचा उदय झाला. पुढें तो पराक्रम करून होळकराच्या बरोबरीचा सरदार झाला.

६. यावेळीं उदयास आलेलें तिसरें घराणें पवारांचें होय. उदाजी पवार हा आपला भाऊ आनंदराव यास बरोबर घेऊन माळव्यांत मुलूखगिरी करीत असे. पुढें पेशव्यांनीं माळव्याची कायमची खंडणी वसूल करण्याचा रिवाज पाडला व माळवा प्रांताच्या वांटण्या केल्या. त्यांत शेंकडा ४५ पेशव्यांनीं घ्यावयाचे; बाकीच्या ५५त २२॥ शिंदे. २२॥ होळकर व १० पवार अशा वसुलाच्या वांटण्या झाल्या. मराठी सत्ता माळव्यांत सुरू झाल्यावर शिंदे, होळकर व पवार कायमचेच माळव्यांत राहूं लागले. शिंदे उज्जनीस. होळकर इंदुरास व पवार धारेस असे रहात.

७. शिंदेहोळकरांच्या पेशव्यांवरील निष्ठेची त्या काळीं किती प्रसिद्धि होती यासंबंधानें एक गोष्ट आहे. एकदां बाजीराव निजामुल्मुल्कास भेटण्यास औरंगाबादेस गेला होता. गांवाजवळच निजामानें भेटीची तयारी केली होती. बाजीरावाबरोबर फौज नव्हती. कांहीं खिजमतगार मात्र बरोबर होते. उभयतांच्या भेटी होऊन बिछायतीवर बसले. बाजीराव व निजाम यांचीं बरींच बोलणीं झालीं. नंतर निजाम बाजीरावास म्हणाला, " आतां कसें ? आतां तुम्ही आमच्या हातांत सांपडलां ! तुमचे शिंदेहोळकर कोठें आहेत ? आतां तुम्हांस आम्हीं एखादा दगा केल्यास कसें होईल ?" त्यावर बाजीरावानें उत्तर केलें, " आपण निजाम आहांत. आपण असा विश्वासघात करणार नाहीं. केलाच, तर माझे शिंदे-होळकर येथें प्रगट

होऊन, जेथें माझें शीर तेथें त्यांचीं शिरें पडतील. " इतकें बोलणें होतांच खिजमतगारांत उभे असलेले शिंदे-होळकर एकदम सलामास पुढें आले. हें पाहून निजाम चपापला. पुढें तो बाजीरावास म्हणाला " तुम्ही आमच्या भेटीस अते सडे फिरून येऊं नका: आम्ही घात करावयास चुकावयाचे नाहीं. "

---

४३. गुजराथ-माळव्यांत मराठ्यांचा प्रवेश.

सन १७२८ त बाजीरावानें निजामुल्मुल्काचा पूर्ण पराभव करून दक्षिणच्या साही सुभ्यांतून चौथाई-सरदेशमुखीचे हक्क त्याच्याकडून कबूल करून घेतल. मग गुजराथ व माळवा या दोन प्रांतांत मराठ्यांचा अबाधित संचार सुरू झाला. तेव्हां या दोन प्रांतांत मराठी सत्ता कशी स्थापिली गेली व तिची कशी वाढ झाली हें आपण या प्रकरणांत पाहूं.

२. शिवाजीनें सुरत शहरावर दोनदां हल्ला करून खंडणी वसूल केली; तेव्हांच मराठ्यांचें पहिल्यानें गुजराथेंत पाऊल पडलें. पुढें औरंगजेब दक्षिणेंत चाल करून आल्यावर संभाजीनें भडोच शहरावर हल्ला करून मोठा खंड वसूल केला (आक्टोबर १६८५), तेव्हां एकदां मराठ्यांचा गुजराथशीं संबंध आला. जिंजीहून सुटून आल्यावर राजारामानें खानदेशावर स्वारी केली, व परत जाताना त्यानें खंडेराव दाभाडे यास बागलाणांत ठेविलें व तेथून गुजराथवर स्वारी करण्याविषयीं सांगून ठेविलें. तेव्हांपासून बागलाणांत राहून खंडेराव दाभाडे वेळोवेळीं गुजराथवर स्वाऱ्या करीत असे. बाळाजीनें सरंजामीपद्धति सुरू करून जी व्यवस्था केली तीप्रमाणें दाभाड्यास बागलाण जहागीर देऊन गुजराथ घेतल्यास तीही देण्याचें आश्वासन

दिलें. पुढें खंडेराव दाभाडे बऱ्हाणपुराहून सुरतेवर उतरण्याचा डोंगराळ मार्ग आपल्या ताब्यांत ठेवून गुजराथेंत खंडणी वसूल करी; तेव्हां दक्षिणचा सुभेदार हुसेनअली यानें दाभाड्यावर दोनदां फौज पाठविली (सन १७१६); पण तिचें कांहीं न चालून दाभाडे आपल्या स्थळीं स्थिर राहिला. दाभाड्याचा पराक्रम पाहून शाहू खूष झाला, व त्यानें मानसिंग मोऱ्याकडून सेनापतिपद काढून तें खंडेराव दाभाड्यास दिलें (सन १७१७). पुढें बाळापूर येथें झालेल्या लढाईंत (१०।८।१७२०)खंडेराव दाभाड्याचा हस्तक दमाजी गायकवाड यानें फार पराक्रम केला. त्यावरून खूष होऊन शाहूनें दमाजीस खंडेराव दाभाडे सेनापति याचा मुतालिक नेमिलें व 'समशेरबहादुर' हा किताब दिला. अशा रीतीनें गायकवाडांचा उदय झाला. पुढें थोड्या महिन्यांनीं दमाजी गायकवाड मृत्यु पावला, व त्याचें पद त्याचा पराक्रमी पुतण्या पिलाजी याजकडे गेलें.

३. दक्षिणेंत निजामुल्मुल्क स्वतंत्र झाला(१७२४), तेव्हां माळव्याबरोबर गुजराथचा सुभा त्याजकडे होता. निजामानें गुजराथेंत अहमदाबादेस हमीदखान या आपल्या मामास आपला दुय्यम म्हणून ठेविलें होतें. निजामुल्मुल्क दक्षिणेंत स्वतंत्र झाला ही गोष्ट दिल्लीच्या बादशहास न आवडून त्यानें निजामुल्मुल्काकडून गुजराथचा सुभा काढून त्यावर सरबुलंदखान या आपल्या विश्वासांतील सरदाराची नेमणूक केली (सन १७२४). सरबुलंदखान काबूलच्या सुभ्यावर होता; त्यास येण्यास अवकाश असल्यामुळें त्यानें सुजायतखान यास अहमदाबादेस आपला दुय्यम म्हणून नेमिलें. निजामाचा दुय्यम हमीदखान हा आपला अधिकार सोडून जाण्यास अगदीं नाखूष होता. या वेळीं खंडेराव दाभाडे, व त्याचा मुतालिक पिलाजी गायकवाड यांजप्रमाणें कंठाजी कदम बांडे हा मराठा सरदारही गुजराथेंत

खंडणी वसूल करीत असे. कंठाजीचा चौथाई वसूल करण्याचा हक्क मान्य करून हमीदखानानें त्याच्या मदतीनें सुजायतखानावर अहमदाबादेनजीक हल्ला केला व त्यास ठार केलें. याच वेळीं सुजायतखानाचा भाऊ रुस्तुमअली हा सुरतेचा फौजदार होता. पिलाजी गायकवाडाशीं संगनमत करून तो हमीदखानावर चालून आला. दोन्ही फौजांची गांठ पेटलादजवळ आरास येथें पडली. इतक्यांत आपले जातभाई उलट पक्षास मिळाले आहेत असें पाहून पिलाजी आयत्यावेळीं हमीदखानास मिळाला, व बिचारा रुस्तुमअली युद्धांत पडला. येणेंप्रमाणें हमीदखान गुजराथेंत कायम होऊन सरबुलंदखानाचे हस्तक मारले गेले. पुढें बांडे व गायकवाड यांचा चौथाईबद्दल एकसारखा तंटा होऊं लागला. एकदां तर खंबायतजवळ दोघांची चकमकही उडाली. शेवटीं मही नदीच्या पश्चिम प्रदेशाची चौथाई बांड्यांनीं वसूल करावयाची व पूर्वेकडील दाभाड्यांनीं करावयाची असा हमीदखानातर्फे त्या दोघांमध्यें ठराव झाला.

४. इकडे गुजराथेंत सुभेदाराच्या दुय्यमांची झालेली दुर्दशा व मराठ्यांचा वाढता जोर पाहून बादशहानें सरबुलंदखानास लवकर गुजराथेंत जाण्याचा आग्रह केला. तेव्हां सरबुलंदखान अहमदाबादेस आला. त्यानंतर मात्र हमीदखान त्याच्याशीं सामना देण्यास धजेना व गुजराथेंत छपून खंडणी वसूल करावी व भटकावें अशी त्याची स्थिति झाली. दाभाडे व बांडे हेही गुजराथेंत खंडणी वसूल करीत. त्यामुळें सरबुलंदखानाचा अंमल नीट बसेना. तेव्हां त्यानें दिल्लीस महमंदशहाकडे " मला मदत करा " असे पुष्कळ निरोप पाठविले; परंतु बादशहाकडून कांहींच उत्तर येईना. तेव्हां सरबुलंदखान अगदीं टेंकीस आला व मुलुखाचा बंदोबस्त कसा करावा हेंच त्याला समजेना. यासमयीं बाजीरावानें आपला वकील श्यामराव याजबरोबर सरबुलंदखानास असा निरोप पाठविला कीं, " आम्हांस

दक्षिणप्रमाणें गुजराथची चौथाई वसूल करण्याचा हक्क द्या म्हणजे आम्ही प्रांताचा बंदोबस्त करूं व बादशहाचा कारभार सुरळीत चालवूं (१७२८). " सरबुलंदखानास दिल्लीहून मदत येईल, अशी आशा वाटत होती; म्हणून त्यानें बाजीरावाचें म्हणणें मान्य केलें नाहीं. नंतर शके १६५१ (सन १७२९) चा पावसाळा संपल्यानंतर चिमाजीआप्पा गुजराथेंत उतरला, व त्यानें पेटलाद शहरची खंडणी वसूल करून ढोलका परगणा अगदीं उध्वस्त केला. दिल्लीहून सुभेदारास मदत मात्र मुळींच आली नाहीं.तेव्हां कसेंही करून प्रांताचा बंदोबस्त झाला पाहिजे हें लक्षांत घेऊन सरबुलंदखान बाजीरावाशीं तह करण्यास कबूल झाला. सुरत शहर खेरीज करून बाकी सर्व गुजराथ प्रांताचे चौथाई-सरदेशमुखीचे हक्क सरबुलंदखानानें मराठ्यांस लिहून दिले. अहमदाबादेच्या उत्पन्नावर मात्र पांच टक्केच घ्यावयाचे असें ठरलें. मराठ्यांनीं पंचवीसशें घोडेस्वार गुजराथेंत कायमचे ठेवून त्या प्रांताची सर्व व्यवस्था उत्तम ठेवण्याचें मान्य केलें. पिलाजी गायकवाड कोळी व भिल्ल घेऊन प्रांतास उपद्रव देऊं लागेल तर त्याचा बंदोबस्त करण्याची हमी बाजीरावानें घेतली (कार्तिक शुद्ध ७ शके १६५१; १७।१०। १७२९).येणेंप्रमाणें गुजराथचा सुभेदार सरबुलंदखान यानें मराठ्यांचा गुजराथेंत चौथाई वसूल करण्याचा हक्क मान्य केला, व मराठी साम्राज्याच्या कक्षेंत गुजराथ प्रांताची भर पडली.

५. औरंगजेब दक्षिणेंत आल्यावर त्याच्याशीं मराठ्यांना आपल्या राज्याचा बचाव करण्यासाठीं युद्ध करावें लागलें; तें चालू असतां पहिल्यानें मराठ्यांचें पाऊल माळवा प्रांतांत पडलें, व त्या प्रांतांत शिरून त्यांनीं वेळोवेळीं खूप खंडणी वसूल केली. सन १६९८ त उदाजी पवारानें मांडवगडास तळ दिला व कांहीं काळ तो माळव्यांत संचार करीत राहिला. पुढें बाळाजी विश्वनाथानें सरंजामीपद्धति

प्रचारांत आणून मराठेशाहीची जोरानें वृद्धि व्हावी म्हणून निरनिराळ्या सरदारांस निरनिराळे प्रांत वांटून दिले; तेव्हां माळवा प्रांतांत मराठ्यांचा अंमल बसविण्याविषयीं उदाजी पवारास प्रोत्साहन देण्यांत आलें (१७१४). या वेळीं मोंगली राज्यांत घोंटाळा माजल्यामुळें मराठ्यांच्या राज्यविस्तारास उत्तम संधि मिळाली. थोड्याच काळांत उदाजीनें धार येथें ठाणें दिलें, व माळव्यांत अंमल बसविण्यास आरंभ केला. त्याचप्रमाणें मल्हारराव होळकरानेंही माळव्यांत खंडणी वसूल करण्यास सुरुवात केली. सन १७२३ व १७२४ या दोन वर्षांत बाजीरावानें माळव्यावर दोन जंगी स्वाऱ्या केल्या व मराठी सत्तेचा वचक चोहोंकडे बसविला. इतक्यांत १७२४तच निजामुल्मुल्क दक्षिणेंत जाऊन स्वतंत्र झाल्यामुळें त्याच्याकडे असलेला माळव्याचा सुभा बादशहानें काढला; व माळव्यावर राजा गिरिधर या नव्या सुभेदाराची नेमणूक केली. गिरिधर जातीनें नागर ब्राह्मण असून आपल्या सुभ्याचें काम मोठ्या कळकळीनें बजावून बादशहाची मर्जी संपादन करण्याची त्यास प्रबळ इच्छा होती. इकडे घरगुती कामें निघून बाजीराव दक्षिणेंतच अडकून राहिला. या कारणांनीं उदाजीस धार सोडावी लागली, व मराठ्यांचा माळव्यांत अंमल बसविण्याचा संकल्प कांहीं काळ लांबणीवर पडला.

६. राजा गिरिधर याची राजधानी उज्जनी येथें असून त्यानें माळव्याचा खूप कडक बंदोबस्त चालविला, व त्या प्रांतांतून मराठ्यांची पुरती हकालपट्टी करण्याचा घाट घातला. या वेळीं इंदूरचा जमीनदार नंदलाल मंडलोई हा असून तो मराठ्यांचा हितकर्ता होता. जयपूरचा कर्तृत्ववान् रजपूत राजा सवाईजयसिंग हा गिरिधरचा पहिल्यानें साहाय्यकर्ता असून त्यानेंच गिरिधरची माळव्याच्या सुभ्यावर नेमणूक घडवून आणिली होती. तथापि सवाईजयसिंग हिंदु-

धर्माचा कट्टा अभिमानी असल्यामुळें गिरिधरचें मराठ्यांविरुद्ध वर्तन त्याला मुळींच पसंत पडलें नाहीं. शिवाय मुसलमानांच्या सत्तेचा पाडाव करून हिंदुधर्माचें रक्षण करण्याच्या कामीं बाजीरावाशीं जयसिंगाचें संगनमत होतें. त्यामुळें त्यानें नंदलाल मंडलोईसारख्या मराठ्यांस अनुकूल असलेल्या जमीनदारांस मराठ्यांची कड घेऊन गिरिधराशीं झगडण्यास उत्तेजन दिलें; व त्यामुळें मराठ्यांचा माळव्यांत लवकरच प्रवेश झाला. मग इ. स.१७२६ त मल्हारराव होळकरास बरोबर घेऊन चिमाजीआप्पा माळव्यांत शिरला. देवासच्या ईशान्येस सुमारें पन्नास मैलांवर सारंगपूर म्हणून एक ठिकाण आहे, तेथें चिमाजीआप्पा व राजा गिरिधर यांजमध्यें मोठें युद्ध होऊन त्यांत गिरिधर पडला. लागलीच शत्रूवर मराठ्यांचा वचक बसला, व नंदलाल मंडलोई आदिकरून मंडळीस धीर आला.

७. बादशहानें गिरिधरच्या जागीं त्याचा चुलतभाऊ दयाबहादूर याची नेमणूक केली. हा दयाबहादूर भावाच्या सवाई असून मराठ्यांचें माळव्यांतून उच्चाटन करावयाचें व सर्व रयतेस कडकपणानें वागवून सर्वांस दडपून गप्प बसवावयाचें हें धोरण त्यानें स्वीकारिलें. परंतु या धोरणानें व्यवस्था व्हावयाची बाजूस राहून सर्व प्रांतांत अंदाधुंदी झाली. वाटेल त्यानें यावें व रयतेपासून पैसा उकळावा असें होऊं लागलें. शेतकरी अगदीं हताश झाले. तेव्हां सवाईजयसिंग व नंदलाल मंडलोई यांचे मराठ्यांमार्फत माळव्यांत हिंदुसत्ता स्थापण्याचे प्रयत्न यशस्वी होण्यास उत्कृष्ट संधि प्राप्त झाली. या सुमारास पत्रांवर पत्रें पाठवून मोंगल बादशहाच्या सुभेदाराचा अंमल निर्बाध चालविण्यास साहाय्य करण्याविषयीं नंदलाल मंडलोई याचें मन वळविण्याची दयाबहादुरानें अत्यंत खटपट केली. परंतु याच वेळीं मराठ्यांस साहाय्य करण्यांत आपण आपल्या धर्माचें कसें रक्षण करीत आहोंत याची जयसिंगानें मंडलोईस

चांगली जाणीव करून दिली असल्यामुळें दयाबहादुराची डाळ शिजली नाहीं. सवड सांपडतांच सन १७३० व १७३१ या वर्षीं चिमाजीआप्पा लागोपाठ माळव्यावर चालून गेला. नर्मदेच्या उतारांची व्यवस्था नंदलाल मंडलोईकडे असल्यामुळें मराठ्यांस माळव्यांत उतरणें अगदींच सुलभ होतें. सन १७३०त दयाबहादुराचा पराभव करून चिमाजी परत गेला. पुढील सालीं पुनः मल्हारराव होळकर व पिलाजी जाधवराव या दोन सरदारांसह चिमाजीआप्पा माळव्यावर चालून गेला. नर्मदा नदी उतरल्यावर विंध्याद्रींतून माळव्यांत चढण्यास तांडा, मांडव, भैरव, नालछा इत्यादि घाट आहेत. मराठे मांडवघाटांतून जाऊं लागले. परंतु तेथें दयाबहादुरानें सुरुंग लाविले होते, व मराठ्यांचा निःपात करण्यास फौज ठेविली होती. या गोष्टींची माहिती नंदलाल मंडलोईतर्फे मराठ्यांस वेळेवर कळली, व पुढील अनर्थ टळला. लागलीच रस्ता बदलून मराठे भैरवघाटानें माळव्यांत शिरले व उज्जनीजवळ तिरल येथें त्यांनीं दयाबहादुरास गांठिलें. युद्ध झालें; त्यांत दयाबहादूर पडला (आश्विन व॥ ८ शके १६५३, १२।१०।१७३१). यानंतर सवाईजयासिंगाची माळव्याच्या सुभ्यावर नेमणूक झाली; व अशा रीतीनें प्रत्यक्ष मराठी सत्ता जरी माळव्यांत आतांच सुरू झाली नसली, तरी मराठ्यांस सर्वस्वीं अनुकूल पुरुष माळव्याचा सुभेदार झाल्यामुळें मराठ्यांचा चौथाई वसूल करण्याचा हक्क लवकरच मान्य करण्यांत येईल अशी आशा करण्यास जागा झाली. वास्तविक होळकर, शिंदे व पवार यांची स्थापना पेशव्यांनीं माळव्यांत यापूर्वीच केली असून माळव्याच्या उत्पन्नाची वांटणीसुद्धां त्यांजमध्यें केली होती (इ.स. १७२५). परंतु प्रथम गिरिधर व त्याच्यामागून दयाबहादूर हे दोघे सुभेदार मराठ्यांविरुद्ध असल्यामुळें पुढील पांचसहा वर्षें मराठ्यांना त्यांच्याशीं एकसारखें झगडावें लागलें. तिरलच्या लढाईनंतर मात्र मराठ्यांचा अनि-

रुद्ध संचार माळव्यांत सुरू होऊन लवकरच त्यांचा त्या प्रांतीं अंमल बसला.

८. दयाबहादूर मृत्यु पावल्यानंतर सवाईजयसिंगानें नंदलाल मंडलोईस एक पत्र पाठवून त्याचें अभिनंदन केलें. त्या पत्रांत पुढील मजकूर आहे. " हजार शाबास है के फकत हमारे १कोलके उपर आप सब मालवे सरदार रहकर, **आपना धर्मका कल्यान होना,** और मालवेमे धरमकी वृद्धि होना, ये बात बिचारकर मालवेमेसें मुसलमानोंकु २नोपद किये. ओर धर्म कायम रखा, हमारा मनोरथ आपने पुरा किया." बाजीराव व जयसिंग यांचें सख्य किती दृढ होतें तें जयसिंगाच्या एका पत्रावरून चांगलें व्यक्त होतें. हें पत्र येणेंप्रमाणें:—

'सिधेश्री १०८ महाराव भाई नंदलालजी प्रधान ठाकर नरहरदासजी कानुनगो सवस्थान इंदोर. योगश्री जेपुरसे श्रीमहाराजा सवाई जेसिंगजीकृत प्रणाम ३बंचना. अत्रकुशल, तत्रकुशल, श्रीजीकी कृपासे चाहिजेजी. आपरंच हकीकत ऐसी के. ता. ५ जमादिलआवल सन गुदस्तका पत्र आपकु लिखाथा कि जैसे आप मल्हारराव्जी होळकर व राणोजी शिंदे कुल दखनसे वकील भेजकर बुलाये, ओर आपने भाईबेटे सरदार हजारो अदमी कटाकर इनकु मालवेमें स्थापित किये, ओर हमारे (जयसिंगाच्या) लिखनेपर इनकूं पुरी मदत देकर ४टांकेदारोंसे ओर महालोंसे वसूल पोता सुरू करा दिया. ये खबर दिल्लीके दरबारमें पोहोंचनेसे बादशहा५सलामत हमसे बहोत नाराज होकर लिखी है कि, रावसाहेबने (जयसिंग) कुल मालवेंके सरदारोंका दिल आपने हातमें लेकर आप उनसे मिले, इससे हमारा (बादशहाचा) सुभा गारद करवाया, ओर मुलुक दुश्मनोंके दिलवाकर, ५तोजी करा दी, तो कुच फिकीर नहीं. इसका बदला सबको मिलेगा, ओर मरेटे तीन दफे मालवेमें आये, ओर मार-

१ वचनावरून; २ नापैद-नष्ट; ३ वाचावे; ४ ठेकेदार, मक्तेदार, ५ ईश्वराकडून रक्षित असे बादशहा; ५ उघडा, उजाड.

कर निकाल दिये. एसा फिर उसीमाफिक सजा होकर निकाले जाते है. समालो, यहांसे (दिल्लीहून) चढाईकी तारीख मुकर है, एसा लिखा आया १सो हमने प्रधान बाजीरावजीको लिखा. उसपरसे बाजीरावजी पेशवा लिखते है, की, "ये सब मालवेमें हमारा जमाव डालना, ये काम प्रधान रावनंदलालजी, ठाकोर नरहर दासजी ओर उनके सरदारोंका है. इन्होंका मालवेमें हक्क प्रधानी, चोधरात, व चोथान कानुनगोई, व भाईबेटे हकदार जो, मालवेमें है, उनके सबस्थानोंका हक्क महाराजा गिरिधर बहादुरके २खानदानसे मिला हुवा चला आया, वो निर्वेध हम चलाके जास्ती ३परवरसी करेंगे. दुसरे रावसाहेबसे एसा ४कोल है की, राजासाहेब गिरिधर बहादुर ये मालवेके मालवीराजा, इनोनें पादशहाके मदतगार होकर हमारे भाई चिमनाजीआपासे लढे. ये शके १६४८ के सालमें सारंगपुर मुकामपर रणमें ५झूज-गये. इनके वंशमें मालवेका जो उत्पन्न आता था, उसका हिसाब हमनें देखा. उनकी गादी कायम करके वेसाही बंदोबस्त चलावेंगे, एसा श्रीनर्मदाके तीरपर कोल है" एसा लिखा आया. ६सौ आपको लिखते है कीं बादशहाने चढाई की है, तो कुछ चिंता नहीं. **श्रीपरमात्मा पार लगावेगा.** बाजीरावजी पेशवासे हमने आपके निसबत धर्मकर्म कोल वचन कर लिया है. अब किसी तरेका ७शक न रखते, इनका जमाव मालवेमें अच्छी तरेसे डालना. ओर हंमेशा पत्र कुशलताका लिखता रहना. मालवेका बंदोबस्त सब आपके भरोसे *है. ता. २५ सफर, सल्लास सलासीन मया व आलफ. (श्रावण वद्य १२ शके १६५४; ६ आगष्ट १७३२).

---

१ त्याप्रमाणें; २ घराण्यापासून; ३ आश्रय; ४ करार; ५ लढाईंत ठार झाले; ६ तर; ७ संशय.

*मराठी रियासत, मध्यविभाग पृष्ठ ३७०—७१.

४४. गजेंद्रमोक्ष.

(शके १६५१, सन १७२९)

मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें माळव्यांत मराठ्यांचा संचार जोरानें होऊं लागला व दिल्लीच्या बादशाहाचे सुभेदार फिके पडूं लागले. या वेळीं महंमदशहा हा दिल्लीच्या गादीवर होता. याच सुमारास बुंदेलखंडांतील बुंदेले–रजपुतांनीं पराक्रम करून बराच मुलूख आपल्या सत्तेखालीं आणिला होता. तेव्हां मराठ्यांस चीत करण्यापूर्वी बुंदेल्यांचा समाचार घ्यावा असें महंमदशहानें आपल्या मनाशीं ठरविलें. या वेळीं अलाहाबादच्या सुभ्यावर महंमदखान बंगष हा शूर पठाण सरदार होता. बुंदेल्यांचें व मग मराठ्यांचें पारिपत्य करण्याची कामगिरी बादशहानें त्यास सांगितली. महंमदखान बंगषचा अलाहाबाद सुभा बुंदेल्यांच्या राज्यास लागून होता, इतकेंच नव्हे तर त्यांतील कित्येक प्रांत बुंदेल्यांनीं लाटले होते. तेव्हां बादशहानें आपणावर बुंदेल्यांचें पारिपत्य करण्याची कामगिरी सोंपविली हें पाहून बंगषास अत्यंत समाधान वाटलें, व हें काम तडकाफडकी उरकून टाकण्याच्या तयारीस तो लागला.

२. पहिल्यानें बुंदेलखंडांत शिरून बुंदेल्यांचा पाडाव करावयाचा, व मग माळव्यांत उतरून मराठ्यांचा समाचार घ्यावयाचा असा महंमदखान बंगष यानें संकल्प केला. बंगष स्वतः पराक्रमी असून त्याच्या फौजेंतील पठाण सैनिकही मोठे शूर होते. बुंदेलखंडांत उतरून बुंदेल्यांस तेव्हांच वठणीस आणूं अशी बंगषास उमेद होती. पहिल्यानें त्यानें बुंदेलखंडावर स्वारी केली, व तेथील आपल्या जहागिरी सोडविण्याचें काम नेटानें चालू केलें. बुंदेलखंडचा राजा छत्रसाल हा शूर होता; तथापि तो आतां म्हातारा झाला होता.

बंगष त्याचा मुलूख लुटूं लागला.तेव्हां छत्रसालास आपण या शत्रूचा प्रतिकार कसा करावा याविषयीं मोठी चिंता पडली. छत्रसाल स्वतः म्हातारपणामुळें मोहिमेवर जाण्यास निरुपयोगी झाला होता. त्याला दोघे मुलगे होते; पण तेही फारसे कर्तृत्ववान् नव्हते. अशा स्थितींत आपलें राज्य हा बंगष गिळल्याशिवाय रहात नाहीं. असा विचार छत्रसालाच्या मनांत येऊन तो अगदीं निराश झाला होता. इतक्यांत त्याला राज्यरक्षणाचा मार्ग सुचला व त्याची निराशा पार नाहींशी झाली. मराठ्यांना मदतीस बोलवावें म्हणजे ते या बंगषाचा सहज समाचार घेतील व संकट दूर होईल असा छत्रसालच्या मनांत विचार आला. मग लागलीच शंभर दोहऱ्यांचें एक पत्र लिहून त्यांत त्यानें बाजीरावास तांतडीनें आपल्या मदतीस येण्याविषयीं लिहिलें.

३.याच सुमारास बाजीराव पुण्यांत असून त्यानें तेथें मावळवेर्शाजवळ जागा घेऊन 'शनिवारचा वाडा' बांधण्यास सुरुवात केली होती. इतक्यांत छत्रसालानें पाठविलेलें पत्र बाजीरावास पोहोंचलें. त्यांतला एक दोहरा असा होता:—

जो गति ग्राह गजेंद्रकी सो गत भइ है आज।
बाजी जात बुंदेलकी राख बाजी लाज॥

असें तें मोठ्या कळकळीनें लिहिलेलें पत्र वाचून, गजेंद्राचा धांवा ऐकून जसें विष्णूच्या पोटांत कालवलें, तसेंच बाजीरावास झालें. बुंदेलखंडांत जाऊन बंगपास केव्हां पिटाळून लावीन व छत्रसालास केव्हां संकटांतून मुक्त करीन असें त्यास झालें. तो एकदम पुण्याहून निघाला आणि नर्मदा उतरून बुंदेलखंडाकडे त्यानें मोठ्या जलदीनें कूच केलें. त्याच्यावरोबर मल्हारराव होळकर, पिलाजी जाधवराव, विठ्ठल शिवदेव दाणी (विंचूरकर) वगैरे बारा मुख्य सरदार असून एकंदर फौज सत्तर हजार होती.मग धामोरा या ठिकाणीं छत्र-

सालाची त्यानें भेट घेतली व त्याची जी काय बुंदेली फौज होती ती आपल्याबरोबर घेऊन बंगषाचा पराभव करण्याकरितां तो मोठ्या ईर्षेनें पुढें चालून गेला. जैतपूरजवळ दोन्ही सैन्यांची गांठ पडली. बंगष मोठ्या शर्तीनें लढला, पण त्याजवर मराठ्यांनीं असा कांहीं जोराचा मारा केला कीं, बंगषाची फौज उधळली, व दशदिशा पळूं लागली. खुद्द बंगषच जीव घेऊन पळून गेला. ही लढाई ता. १२ मार्च १७२९ रोजीं झाली. यानंतर बरेच दिवस युद्ध चालू राहिलें. वेळोवेळीं मराठे व बंगष यांच्या चकमकी होत. त्यांत मराठे अत्यंत शौर्यानें लढले; त्यामुळें महंमदखान बंगषास चांगली तंबी बसून त्याची रसद अगदीं बंद झाली, व त्याच्या लष्करांत अन्नपाण्याचा अगदीं दुष्काळ पडला. तेव्हां बंगषाच्या लष्करांत हाहाकार उडाला व तो अगदीं हताश झाला. इतक्यांत महंमदखान बंगषाचा मुलगा कायमखान बंगष बापाच्या मदतीकरितां बुंदेलखंडांत चालून आला. ही बातमी कळतांच बाजीराव वाघासारखा चवताळून त्याच्या अंगावर चालून गेला. दोघांची लढाई झाली. तींत मराठ्यांनीं कायमखानाचे हत्ती पळविले; व खुद्द कायमखानावर हल्ला करून ते त्याला पकडण्याच्या बेतांत होते, पण इतक्यांत तो शंभर स्वारांनिशीं पळून गेला. इकडे महंमदखानानें जैतपूरच्या किल्ल्याचा आश्रय केला व तेथें तो आपला बचाव करूं लागला. किल्ल्याचा तट बळकट असल्यामळें हल्ला करून किल्ला घेणें अवघड होतें. तेव्हां चोहों बाजूंनीं रसद तोडून आंतील लोकांस वठणीवर आणण्याचें ठरवून मराठ्यांनीं सर्व बाजूंनीं किल्ल्यास गराडा दिला. कित्येक महिने किल्ल्यास वेढा बसला होता. तेव्हां जवळची धान्यसामुग्री संपून महंमदखानाच्या लोकांस अन्नपाणी मिळणें अशक्य झालें. अशा स्थितींत पठाण लोक गाई, बैल, घोडे, उंट वगैरे मारून त्यावर आपला गुजारा करूं लागले! पण असें किती दिवस चालणार? कोणी-

कडून मदत येत नाहीं असें पाहून शेवटीं महंमदखान किल्ल्यांतून युक्तीनें निसटून गेला व किल्ला मराठ्यांच्या हातीं आला. येणेंप्रमाणें मराठ्यांनीं अतुल पराक्रम करून बंगषास बुंदेलखंडांतून पळवून लाविलें. या कामगिरीमुळें छत्रसाल बाजीरावावर अत्यंत खूष झाला. त्यानें बाजीरावास आपली राजधानी पन्ना येथें नेऊन त्याचा मोठा गौरव केला. आणि झांशी व तिच्याजवळचा अडीच लक्षांचा मुलूख दिला.

४. पुढें इ.स. १७३३त छत्रसाल आजारी पडून अगदीं मरावयास टेकला. त्याचे दोघे मुलगे जगत्राज व हिरदेसा हे फारसे कर्तबगार नव्हते व राज्यानजीक मोंगल सुभेदार तर हाताखालीं मुलूख घालण्यास सज्ज होते. तेव्हां आपल्या पुत्रांस कोणी समर्थ पाठीराखा असावा असा विचार करून बाजीरावाशीं कायमची दोस्ती घडवून आणण्याचें त्यानें ठरविलें. "जसे हे माझे दोन मुलगे तसेच तुम्ही तिसरे" असें म्हणून त्यानें बाजीरावास आपल्या राज्याचा तिसरा हिस्सा दिला. बाजीरावासही माळवा, बुंदेलखंड या प्रांतांत मराठी अंमल बसवून पुढें मागें लवकरच सर्व हिंदुस्थान पादाक्रांत करण्याची जबर महत्त्वाकांक्षा होती. तेव्हां त्यानें मुलूख घेऊन छत्रसालाच्या मुलांचें रक्षण करण्याचें त्यास वचन दिलें. पुढें लवकरच छत्रसाल मरण पावला. या वेळीं बुंदेलखंडांत तेहेतीस लक्ष वसुलाचा मुलूख मराठ्यांस मिळाला. त्यांत कालपी, हटा, सागर, झांशी, सिरोंज, कुंच, गडकोट, हरदेनगर इत्यादि प्रांत होते. प्रसिद्ध मस्तानीही बाजीरावास छत्रसालाकडून नजर मिळाली. बाजीरावाजवळ गोविंदा खेर नांवाचा एक शागिर्द होता. त्यानें बुंदेलखंडाच्या मसलतींत चांगलीच कामगिरी बजाविली होती. त्यावरून खूष होऊन बाजीरावानें त्यास नवीन मिळालेल्या मुलुखाचा सुभेदार नेमिलें. हा गोविंद बल्लाळ खेर पुढें गोविंदपंत बुंदेले या नांवानें प्रसिद्धीस आला. हळू हळू गोविंदपंतानें नवीं ठाणीं

हस्तगत केलीं. व नवे किल्ले बांधिले. कुरईच्या नबाबाकडून त्यानें कांहीं प्रांत काबीज केला, त्यांत 'सागर' नांवाचा एक प्रचंड तलाव होता. त्या तलावाच्या कांठीं 'सागर' नांवाचें एक नवें शहर वसवून गोविंदपंतानें तेथें आपली वस्ती कायम केली.

---

४५. कोल्हापूरकर संभाजीशीं समेट.

शके १६५३ (सन १७३१).

—:o:—

मोंगल बादशहाच्या नजर कैदेंतून सुटून शाहू दक्षिणेंत आला (शके १६२९); तेव्हां मराठी राज्यांत दुही झाली व कोल्हापूरची गादी स्थापिली गेली. पुढें राजसबाईचा मुलगा संभाजी यानें ताराबाई व तिचा मुलगा शिवाजी या दुकलीस कैदेंत टाकून कोल्हापूरचीं राज्यसूत्रें धारण केलीं (शके १६३४). त्यामुळें शाहूस उघड विरोध करणारी व त्याचा नाश करण्यास टपलेली ताराबाई हतबल झाली, व संभाजीच्या मनांत शाहूविषयीं व सातारच्या गादीविषयीं प्रत्यक्ष द्वेषबुद्धि फारशी नसल्यामुळें दोन्ही पक्षांतील युद्ध थांबलें. तथापि कोल्हापुरास निराळी गादी राहिल्यामुळें मराठेशाहीच्या निजामुल्मुल्कादिकरून शत्रूंस मराठ्यांमधील दुहीपासून आपला फायदा करून घेण्याची संधी कायम राहिली, व त्या संधीचा उपयोग करून साही सुभ्यांतून मराठ्यांस चौथाई वसूल करूं देण्यास धूर्त निजाम अळंटळं करूं लागला. मग बाजीरावानें निजामावरील स्वारीचा अंगीकार करून त्यास पेंचांत आणलें, तेव्हां दक्षिणच्या साही सुभ्यांतील चौथाई वसूल होऊं लागली. उदाजी चव्हाणासारखे पुंडही कोल्हापूरच्या आश्रयानें राज्यांत गोंधळ माजवीत. तेव्हां

कोल्हापूरच्या गादीचें स्वतंत्र अस्तित्व नाहींसें होणें मराठी राज्याच्या हिताच्या दृष्टीनें इष्ट होतें; परंतु तसें कधीं झालें नाहीं. निदान कोल्हापूरकर संभाजीशीं शाहूचें सख्य होणें अगदीं जरूर होतें. ती गोष्ट घडून येण्याचा योग शके १६५३ (सन १७३१)त आला, तो असा.

२. शके १६५१चा पावसाळा संपतांच चिमाजीआप्पानें गुजराथेवर स्वारी केली, व पुढें बाजीरावही गुजराथचा सुभेदार सरबुलंदखान याजपासून गुजराथच्या चौथाईचा ठराव करून घेण्याच्या मसलतींत गुंतला होता. निजामाशीं झालेल्या लढाईंत कोल्हापूरच्या संभाजीचा फारच अपमान झाला होता. त्याचें उट्टें काढण्यास, बाजीराव लांब गेला आहे ही संधी उत्तम आहे, असें संभाजीस वाटलें. उदाजी चव्हाण हा पुंड मिरजेकडे चौथाई वसूल करीत असे, म्हणून मागें सांगितलेंच आहे. या उदाजी चव्हाणानें शाहू एकदां शिकारीस गेला असतां त्याच्यावर मारेकरी घालण्यास कमी केलें नाहीं. तेव्हां संभाजीस उदाजी चव्हाणाचें आयतेंच साहाय्य मिळालें. उदाजी चव्हाण व संभाजी हे दोघे एक होऊन त्यांनीं शाहूच्या राज्यांत लुटालूट करण्याचा विचार केला. मग ते दोघेही फौज बरोबर घेऊन वारणा नदी उतरले; आणि शाहूचा मुलूख लागतांच लुटालूट करण्यास त्यांनीं आरंभ केला. संभाजीनें स्वारीवर आपलीं बायकामाणसेंसुद्धां आणलीं होतीं.

३. त्यांच्या दंग्याची हकीकत शाहूस समजली. तेव्हां बाजीराव उत्तरेकडे गुंतला आहे; अशा वेळीं यांचें पारिपत्य करण्यास कोणास पाठवावें अशा विवंचनेंत शाहू पडला. इतक्यांत त्याची काळजी दूर झाली. श्रीपतराव प्रतिनिधीनें पूर्वी कृष्णराव खटावकराचें बंड मोडलें, होतें, तेव्हांपासून कोणताही पराक्रम केला नव्हता. परंतु बाजीरावानें माल मोहिमांवर मोहिमा कराण्याचा तडाखा लावला होता. त्यामुळें प्रतिनिधि अगदीं मागें पडला. खुद्द शाहूजवळ देखील त्याचें फारसें वजन राहिलें नाहीं. त्यांतून प्रतिनिधीच्या मसलतीनें

निजामुल्मुल्काशीं आंतबट्याचा तह करावा लागला होता. तो बाजीरावास मुळींच मान्य न होऊन निजामुल्मुल्काशीं त्यानें एकदम युद्ध सुरू केलें, व निजामास चौथाई व सरदेशमुखी हे दोन्ही हक्क कबूल करावयास लाविले. या गोष्टींनीं शाहूस बाजीराव अत्यंत प्रिय व तितक्याच मानानें प्रतिनिधि अप्रिय झाला होता. शाहूनें प्रतिनिधीस कोणत्याही महत्त्वाच्या कामावर नेमिलें नाहीं. यामुळें प्रतिनिधीच्या मनांत बाजीरावाविषयीं मत्सर उत्पन्न झाला होता. पण श्रीपतराव प्रतिनिधि हा बाजीरावाचा मत्सर करतो हें शाहूस समजल्यावर शाहूची त्याच्यावर जास्तच गैरमर्जी झाली. तेव्हां ती शाहूची गैरमर्जी कशी नाहींशी करतां येईल याची प्रतिनिधीस काळजी लागली. इतक्यांत सुदैवानें बाजीराव उत्तरेकडे जाण्यास व संभाजीचा दंगा उपस्थित होण्यास एकच गांठ पडली. तेव्हां ही संधि उत्तम आहे असें पाहून प्रतिनिधीनें संभाजीचें पारिपत्य करण्याचें काम पत्करिलें. मग त्यानें एकदम संभाजीच्या लष्करावर छापा घातला, व त्याची सर्व चीजवस्त लुटली. तेव्हां संभाजी पन्हाळ्याकडे पळून गेला. आणि ताराबाई व तिची सवत राजसबाई या प्रतिनिधीच्या हातांत सांपडल्या. याप्रमाणें संभाजीचा पराजय झाल्यावर त्या दोघींस घेऊन प्रतिनिधि साताऱ्यास आला. शाहूनें ताराबाईचा सन्मान केला व परत जाण्याविषयीं तिला विचारिलें. तेव्हां ती म्हणाली, "कोठेंही कैदेंत रहावयाचें ते व तुम्ही दोघेही मला सारखेच आहां; तुम्हांपाशींच राहतें." तेव्हां शाहूनें तिला सातारच्या किल्ल्यांत ठेविलें.

४. संभाजीची खात्री झाली कीं. शाहूपुढें आपलें कांहीं चालत नाहीं; तेव्हां त्यानें स्वतः होऊनच सलोखा करण्याविषयीं बोलणें काढिलें. नंतर शाहूनें त्याला भेटीस बोलाविलें. संभाजीनें येण्याचें कबूल केलें. मग कऱ्हाडाजवळ जखिणवाडी येथें दोघांच्या भेटी झाल्या. शाहू संभाजीसह साताऱ्यास आला, तेथें शके १६५३त चैत्र

वद्य ५स(२१।४।१७३१) उभयपक्षीं तह ठरून वारणा व तुंगभद्रा या नद्यांमधील मुलूख संभाजीस मिळाला. कोपळ किल्ला संभाजीस देऊन शाहूनें रत्नागिरी आपल्याकडे घेतला. कोंकणांत साळशीपासून दक्षिणेकडचा मुलूख संभाजीस देण्यांत आला. या तहास 'वारणेचा तह' म्हणतात. येणेंप्रमाणें शाहूची मोंगलांच्या हातून सुटका झाल्यावरोवर ताराबाईनें जो तंटा सुरू केला होता तो या तहानें पूर्णपणें मिटला.

---

४६. गृहकलह.

उभईची लढाई, शके १६५३ (इ. स. १७३१).

मागील एका गोष्टींत सांगितल्याप्रमाणें बाजीरावानें पंचवीसशें घोडेस्वार गुजराथेंत ठेवून त्या प्रांताचा वंदोबस्त केला. हें कृत्य त्या प्रांतांतील मराठे सरदारांस रुचलें नाहीं. खंडेराव दाभाडे सन १७२९ च्या सुमारास मृत्यु पावला होता व त्याचें सेनापतिपद त्याचा मुलगा त्रिंबकराव दाभाडे यास मिळालें होतें. बाळाजी विश्वनाथानें प्रांताची वांटणी केली तेव्हां गुजराथ दाभाड्याकडे सोंपविली होती. आपल्या प्रांतांत पेशवे ढवळाढवळ करूं लागले, हें त्रिंबकरावास खपलें नाहीं. निजामुल्मुल्कासही बाजीरावानें गुजराथेंत सरबुलंदखानाचा अंमल बसविला ही गोष्ट पसंत नव्हती. दाभाडेंही रागावला आहे ही संधि साधून निजामानें मागें कोल्हापूरच्या संभाजीस हातीं धरून जशी लढाई केली, तशीच आतां दाभाड्याशीं ऐक्य करून लढाई करण्याचा बेत केला. निजामाचें म्हणणें दाभाड्यास पसंत पडून त्यानें निजामास मिळून बाजीरावाशीं युद्ध करण्याचें कबूल केलें. त्रिंबक-

राव युद्धाची जारीनें तयारी करूं लागला, व त्यानें लोकांस असें जाहीर केलें कीं, ' आमचे धनी शाहूमहाराज यांचें राज्य ब्राह्मणांनीं गडप करण्याचा बेत केला आहे; तेव्हां त्यांचें पारिपत्य करण्यासाठीं आम्ही तयारी करीत आहों.' दाभाड्यास बरेच मराठे सरदार मिळाले; उदाजी व आनंदराव पवार, कंठाजी कदम बांडे, चिमणाजी दामोदर, यांजसारखे मोठमोठे सरदार दाभाड्याच्या बतीनें लढण्यास तयार झाले. त्रिंबकरावाची एकंदर फौज पस्तीस हजार जमली. अशी मोठी फौज घेऊन तो निजामास मिळण्यासाठीं दक्षिणेकडे येऊं लागला. तिकडून निजामानेंही मोठी फौज जमा करण्याचा सपाटा चालविला.

२. बाजीरावास लवकरच निजाम व दाभाडे या दोघांच्या कटाची बातमी लागली. इतक्यांत त्यानें ऐकिलें कीं, निजामुल्मुल्क सैन्य जमवीत आहे. तेव्हां हे दोघे एक झाले तर प्रचंड फौज होईल, व मग त्यांस जिंकणें अवघड जाईल असें त्यास वाटलें. मग त्यानें निजामुल्मुल्क फौज घेऊन दाभाड्यास मिळण्यापूर्वी दाभाड्यास एकटा गांठून त्याच्याशींच लढाई द्यावी असा बेत केला. बाजीराव लागलीच बरोबर फौज घेऊन झपाट्यानें गुजराथेकडे कूच करीत चालला. त्याची फौज दाभाड्याच्या फौजेच्या निम्मीही नव्हती. त्यानें असें जाहीर केलें कीं, " त्रिंबकराव दाभाडे हे आपला शत्रु निजामुल्मुल्क यास मिळून आमच्यावर चालून येत आहेत. तेव्हां त्यांचा समाचार घेणें आम्हांस भाग, म्हणून आम्ही तो घेत आहोंत." पुण्याहून निघाल्यापासूनच ' निजामास मिळून गृहकलह वाढविण्यांत कांहीं अर्थ नाहीं ' असें बोलणें दाभाड्याशीं त्यानें चालविलें. परंतु दाभाड्यास अनावर क्रोध आला होता; व स्वजन कोण, परका कोण हें ओळखण्याइतकेंही त्याचें डोकें शांत नव्हतें. त्यामुळें शांततेच्या मार्गानें तंटा मिट-

विण्याचे बाजीरावाचे सर्व प्रयत्न व्यर्थ झाले. दाभाडे तसाच कूच करीत येत होता. बाजीरावही जोरानें कूच करीत चालला. बाजीरावाचा सरदार आवजी कवडे हा बिनीस होता, तो मुख्य सैन्यापासून जरा पुढेंच होता. आवजी कवडे हा नर्मदा उतरला, तेव्हां त्याची व शत्रूच्या सैन्यांतील पिलाजी गायकवाडाचा मुलगा दमाजी गायकवाड याच्या टोळीची गांठ पडली. दोन्ही टोळ्यांची चकमक उडून आवजी कवड्याचा पराभव झाला. याप्रमाणें आरंभींच बाजीरावाच्या बाजूस अपयश आलें. पण बाजीराव पडला धीराचा सरदार. तो काय असल्या पराभवानें कचरतो ? या अपशयानें त्यास उलट दुप्पट हिंमत चढली. व त्यानें शत्रूशीं एकदम लढाई करण्याचा निश्चय केला. मग बडोद्याजवळ डभई येथें दोन्ही सैन्यांची गांठ पडली (चैत्र शु॥ ६ शके १६५३,१।४।१७३१). बाजीरावानें एकदम लगट करून हल्ला करतांच दाभाड्यांच्या सैन्यांत अव्यवस्था माजली. सैन्यांत नव्यानेंच भरती केलेले लोक पळून गेले. कंठाजी कदम बांड्यानें तोच मार्ग स्वीकारिला. मग रणांगणावर खंडेराव दाभाड्याच्या वेळची फौज तेवढी राहिली. तेव्हां त्रिंबकराव हत्तीवर बसला होता. तो निधड्या छातीचा होता. सैन्यांत उडालेल्या गडबडीमुळें मुळींच डगमगून न जातां उरलेल्या फौजेस युद्धाचें सारखें प्रोत्साहन तो देत होता, व स्वतः सारखे बाण सोडीत होता. हत्ती मागें सरूं नये म्हणून त्यानें हत्तीच्या पायांत अंकूश घातला होता. लढाई जोरांत चालली होती. इतक्यांत त्रिंबकराव दाभाड्याच्या कानफटींत एक गोळी शिरली. ती घातक होऊन त्रिंबकराव पडला. सेनापति पडल्यावर त्याचें सैन्य पळूं लागलें. या युद्धांत मोठ्या सरदारांपैकीं जिवाजी दाभाडे, मालोजी पवार व पिलाजी गायकवाडाचा एक मुलगा इतके कामास आले. उदाजी पवार व चिमणाजी दामोदर कैदेंत सांपडले. आणि आनंदराव पवार व पिलाजी

गायकवाड पळून गेले.

३. डभईच्या युद्धामुळें दाभाड्याच्या मनांत पेशव्याविषयीं वांकडें आलें. पण शाहूनें हें राज्यास अपायकारक असें समजून त्रिंबकरावाची आई उमाबाई दाभाडे हीस साताऱ्यास नेलें. बरोबर बाजीरावासही नेलें. उभयपक्षीं समाधान करून त्रिंबकराव दाभाडे याचा धाकटा भाऊ यशवंतराव दाभाडे हा होता, त्यास सेनापतिपदाचीं वस्त्रें दिलीं. पिलाजी गायकवाड याजकडे दाभाड्यांची मुतालिकी व जुनें समशेर-बहादूर हें पद कायम होऊन सेनाखासखेल हा नवीन किताब त्यास देण्यांत आला. सेनाखासखेल याचा अर्थ 'खास फौजेचा मुख्य' असा आहे, व हा किताब अजूनही गायकवाडांकडे चालत आहे. गुजराथचें अर्धें उत्पन्न सेनापतीनें घ्यावें, व अर्धें पेशव्यांतर्फे सरकारांत द्यावें असा ठराव झाला. डभईच्या लढाईनंतर आणखी एक फरक झाला. दाभाडे सेनापति श्रावण महिन्यांत तळेगांव येथें ब्राह्मणांस दक्षिणा वांटीत असत. पण आतां त्यांनीं ती बंद केली. तेव्हां पुण्यास पेशवे ती वांटूं लागले. हा दक्षिणासमारंभ पेशव्यांचे अमदानींत पुढें फार मोठा होऊं लागला.

४. सरबुलंदखानानें मराठ्यांस चौथाई व सरदेशमुखी हे हक्क गुजराथेंत वसूल करण्याची परवानगी दिली, हें दिल्लीच्या बादशहास न खपून त्यानें सरबुलंदास काढून जोधपूरचा राणा अभयसिंग यास गुजराथचा सुभेदार नेमिलें (सन १७३०). या अभयसिंगाची दिल्लीच्या गादीविषयीं मोठी निष्ठा होती, व मराठ्यांचा उत्कर्ष त्यास मुळींच सहन होत नव्हता. तेव्हां गुजराथेंतून मराठ्यांची हकालपट्टी करावयाची, व आपली सत्ता त्या प्रांतीं दृढमूल करावयाची अशा मोठ्या ईर्षेनें तो अहमदाबादेस गेला. दाभाड्यांतर्फे गुजराथचा कारभार पिलाजी गायकवाड करीत असे. पिलाजीनें गुजराथेंत मराठ्यांचा अम्मल चांगलाच बसविला होता. तेव्हां त्याला नाहींसा केला म्हणजे मराठ्यांची

गुजराथेंतून उचलबांगडी होईल या आशेनें अभयसिंगानें तहाची वाटाघाट करण्यासाठीं म्हणून पिलाजीस डाकोर येथें नेलें,व तेथें विश्वासघातानें व दुष्टपणानें त्याचा खून करविला (सन १७३२). या दुष्ट कृत्यानें मराठ्यांची गुजराथेंतून हकालपट्टी होईल ही अभयसिंगाची अटकळ मात्र सुदैवेंकरून निष्फळ ठरली. पिलाजीचा मुलगा दमाजी गायकवाड हा बापापेक्षां सवाई कर्तबगार निघाला, व त्यानें गुजराथेंत आपला अंमल नीट बसविला; इतकेंच नव्हे तर त्यानें लवकरच अभयसिंगाचें मूळ ठिकाण जें जोधपूर त्याच्यावरच मुळीं हल्ल्यांवर हल्ले चढविले. तेव्हां अभयसिंगास सळो कीं पळो असें होऊन तो गुजराथचा अधिकार सोडून जोधपुरास चालता झाला (सन १७३५). पुढें गुजराथवर जे सुभेदार आले त्यांनीं दमाजीशीं सलोख्यानें वागून अहमदाबादेस आपलीं कामें केलीं; व एव्हांपासून गुजराथेंत मराठ्यांचें वर्चस्व कायम झालें. यशवंतराव दाभाड्याच्या अंगांत कर्तृत्व मुळींच नव्हतें. शिवाय तो व्यसनाधीन होता. त्यामुळें तो कांहींच कारभार पहात नसे. तेव्हां यापुढें दाभाडे मागें पडून दमाजी गायकवाड हा दाभाड्यांचा मुतालिक गुजराथचा कारभार स्वतंत्रपणें पाहूं लागला.

५. येणेंप्रमाणें श्रीपतराव प्रतिनिधि, कोल्हापूरकर संभाजी व त्रिंबकराव दाभाडे या मराठ्यांमधीलच बाजीरावाच्या प्रतिपक्ष्यांस चिथवून निजामुल्मुल्कानें त्याचा मोड करण्याचे लागोपाठ तीन प्रयत्न केले, परंतु ते निष्फळ होऊन बाजीरावाची सत्ता जास्तच बळावूं लागली. सरबलंदखानामागून गुजराथची सुभेदारी जोधपूरचा रजपूत राणा अभयसिंग यास मिळाली होती, व माळवा प्रांतावरही गिरिधर, दयाबहादूर, व जयसिंग असे हिंदु सुभेदार एकामागून एक नेमिले गेले होते. निजामुल्मुल्कानें दाक्षिणेंत जाऊन सुभेदारी पटकाविली, तेव्हांपासून तो दिल्लीस अप्रियच असे. अशा स्थितींत आज जसे अभयसिंग व जयसिंग हे हिंदु गुजराथ व माळवा या प्रांतांचे सुभे-

दार झाले आहेत, त्याप्रमाणेंच उद्यां बाजीराव आपलें वजन खर्चून दक्षिणचा सुभेदार होईल व आपल्याला मग कांहींच आधार राहणार नाहीं, हें त्या धूर्त निजामुल्मुल्कानें तेव्हांच ओळखिलें; आणि डभईची लढाई झाल्यावर थोड्याच दिवसांनीं बाजीरावाची भेट घेऊन स्नेहाचें बोलणें लाविलें. दक्षिणच्या साही सुभ्यांतून चौथाई वगैरे हक्क वसूल करण्यास मान्यता देऊन गुजराथ व माळवा इकडेही मुलूख मिळवून देण्याची त्यानें हमी घेतली. याचा परिणाम असा झाला कीं, मराठ्यांचें लक्ष उत्तरेकडे लागलें, व निजामाचें राज्य बचावलें. पुढें अटकेवर मराठी भगवा झेंडा फडकला; तरी बालेघाटचा मुलूख—ज्याला साधुसंतांची जन्मभूमि व खरोखरीचें प्राचीन महाराष्ट्र म्हणतां येईल तो पैठण, औरंगाबाद, नांदेड, जालना, बीड वगैरे मुलूख—त्यांच्या हातीं आला नाहीं! बाजीरावाच्या वेळीं जर सर्व महाराष्ट्र मराठ्यांनीं परचक्रापासून सोडविला असता, तर मराठ्यांच्या राज्याचा विस्तार कदाचित् झाला इतक्या झपाट्यानें झाला नसता; तथापि राज्याचा पाया बळकट होऊन संकटकाळीं मराठ्यांची त्रेधा उडाली नसती. बाजीरावानें व त्याच्यापुढील पेशव्यांनीं मराठी राज्याचा विस्तार सर्व हिंदुस्थानभर करण्याकरितां अटोकाट प्रयत्न केले, ते यशस्वी होण्यास खुद्द महाराष्ट्र पुरता स्वतंत्र होणें अत्यंत जरूर होतें. अशा काळीं 'दक्षिणचा सुभा' सुरक्षित राहिला ही गोष्ट निजामुल्मुल्काच्या दूरदर्शित्वास भूषणावह होय. परंतु हिंदुपदपातशाहीच्या दृष्टीनें मराठ्यांची बळकटी होणें जरूर असल्यानें 'दक्षिणचा सुभा' मराठी राज्याच्या काळजांत शल्याप्रमाणें सारखा डांचत राहून मराठी सत्ता कायमची रोगग्रस्त राहिली, व तीस कधींही अंतस्थ बळकटी लाभली नाहीं, असें म्हणणें भाग आहे!

---

४७. जंजिऱ्याच्या सिद्दीचा बंदोबस्त.

बाळाजी विश्वनाथ पेशव्यानें कान्होजी आंगऱ्याशीं शके १६३५ (सन १७१३) मध्यें तह केला. त्या तहांत जंजिऱ्याच्या सिद्दीचा कांहीं प्रांत आंगऱ्याकडे आला. त्यामुळें सिद्दीनें आंगऱ्याशीं युद्ध चालविलें. बाळाजी विश्वनाथ आंगऱ्याच्या मदतीस गेला. युद्धांत मराठ्यांचा जय होऊन आंगऱ्याकडे आलेला प्रांत त्याच्याकडे राहूं देण्याचें सिद्दीनें कबूल केलें. ही गोष्ट शके १६३६च्या शेवटीं घडली. तेव्हांपासून कोंकण प्रांतांत मराठ्यांचा अम्मल कान्होजी आंगरेच चालवीत असे. आंगऱ्याखेरीज पोर्तुगीज, इंग्रज व सिद्दी या तिघांचा कोंकणांत मुलूख होता. त्यांतल्यात्यांत सिद्दीचा मुलूख कुलाबा किल्ल्यानाजिक असल्यामुळें आंगऱ्याशीं त्याचा प्रत्यक्ष संबंध येई. पोर्तुगीजांचा मुलूख वर उत्तर कोंकणांत होता. इंग्रजांकडे मुंबईबाहेर कांहींही प्रांत नव्हता. परंतु सिद्दी व मराठे या दोघांमध्यें चुरस लावून देऊन दुर्बळाचा पक्ष घ्यावयाचा, असा त्या वेळच्या इंग्रज-पोर्तुगीजांचा नेहमींचा क्रम असे. शके १६४८ (सन १७२६)च्या आरंभीं जंजिऱ्याचा सिद्दी याकुतखान यानें निजामुल्मुल्काच्या चिथावणीवरून मराठ्यांच्या मुलुखांत येऊन दंगा मांडला. तेव्हां कान्होजी आंगरे यानें पाहिलें कीं, सिद्दीचा मोड आपल्या हातून व्हावयाचा नाहीं. याकरितां त्यानें शाहूस मदत पाठवून देण्याविषयीं पत्र पाठविलें. ' दसरा झाल्यावर मदत पाठवूं , तोंवर तुम्हीं कोंकणांतील स्थळांचें रक्षण करावें, ' असें शाहूनें उत्तर पाठविलें. उत्तर मिळतांच आंगऱ्यानें कोंकण प्रांताचें रक्षण करण्याचें ठरविलें व दंगा करणाऱ्या सिद्दीशीं युद्ध करण्यास प्रारंभ केला. मराठ्यांची सत्ता कोंकणांत वाढूं नये असें इंग्रजांस वाटे. तेव्हां त्यांनीं या युद्धांत सिद्दीचा पक्ष धरला.

सिद्दीच्या व आंगऱ्याच्या जागोजाग चौक्या बसल्या, व दोघांनीं एकमेकांचीं गांवें लुटण्याचा धूमधडाका चालविला.

२. पुढें बाजीरावाचा गुरु म्हणून प्रसिद्धीस आलेला ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर या वेळीं कोंकणांत परशुरामक्षेत्रीं रहात असे. तो पावसाळा संपल्यावर भिक्षेस निघत असे. गोवळकोट व अंजनवेल या ठिकाणीं जंजिऱ्याच्या सिद्दीकडील सिद्दीसात हा अधिकारी होता. एकदां त्याचा सावनूरच्या नबाबाकडून एक हत्ती आणावयाचा होता. त्यानें ब्रह्मेंद्रस्वामीस हत्ती आणण्याची विनंती केली. स्वामीनें ती तत्काळ मान्य केली. नंतर कर्नाटकांत स्वामी भिक्षा करून तो हत्ती घेऊन परत फिरला (इ. स. १७२६). ह्या वेळीं सिद्दी व आंगरे यांजमध्यें युद्ध चालू असल्यामुळें ठिकठिकाणीं आंगऱ्याच्या व सिद्द्याच्या चौक्या बसल्या होत्या. सिद्दीसाताचा हत्ती जात आहे असें कळतांच आंगऱ्याकडील एका चौकीदारानें हत्ती अडविला व आपल्या ताब्यांत घेऊन जयगडावर पाठवून दिला. सिद्दीसातास हें कळतांच त्याला अत्यंत क्रोध आला. स्वामीनें माझा हत्ती मुद्दाम आंगऱ्याच्या स्वाधीन केला असें त्याला वाटलें व रागाच्या सपाट्यांत तो परशुराम येथें गेला, व तेथील देऊळ खणून टाकून स्वामीची सर्व चीजवस्त त्यानें हस्तगत केली. स्वामीचे नोकर तेथें होते, त्या सर्वांस त्यानें बेदम मारिलें. असा स्वामीच्या क्षेत्राचा महाशिवरात्रीच्या दिवशीं विध्वंस करून सिद्दीसात परत गेला (शके १६४८,८।२।१७२७). ही सर्व हकीकत ऐकून ब्रह्मेंद्रस्वामीस अत्यंत वाईट वाटलें व सिद्दीचा पूर्ण तिरस्कार आला. तथापि स्वामीनें आंगऱ्यापासून हत्ती सोडविला होता तो सिद्दीसातास देऊन टाकला. त्यावरून सिद्दीसात स्वामीस शरण गेला. जंजिऱ्याच्या याकुतखानानेंही स्वामीचें सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. पण स्वामीनें यापुढें कोंकण सोडून देण्याचा पुरता निश्चय केला व तो देशावर निघून गेला. त्याला शाहूपासून धावडशी गांव इनाम

मिळाला होता; तेथ तो आतां राहूं लागला. स्वामीस सिद्दीच्या कृत्याची चीड आली होती. तेव्हां सिद्दीचा निःपात करून टाका म्हणून त्यानें शाहूस वारंवार सांगितलें. शाहूनेंही फुरसत सांपडतांच सिद्दीचा मोड करण्याचा बेत केला.

३. कान्होजी आंग्र्यानें सिद्दीशीं युद्ध तसेंच चालविलें होतें. शेवटीं युद्ध करीत असतांच शके १६५१ (सन १७२९) च्या आरंभीं कान्होजी मृत्यु पावला. त्याला सेखोजी, संभाजी, मानाजी, येसाजी व तुळाजी असे पांच मुलगे होते. त्यांपैकीं सेखोजीस सरखेलीचीं वस्त्रें व बापाकडे चालत आलेला मुलूख मिळाला. पुढें सेखोजी व संभाजी आपआपसांत भांडूं लागले; त्यामुळें सिद्दीस चांगलेंच फावलें. त्यानें मराठ्यांच्या मुलुखास जास्तच उपद्रव देण्यास सुरुवात केली. आंग्र्यांच्या आपापसांतील भांडणामुळें कोंकण प्रांतांत नुकसान होत आहे असें पाहून शाहूनें दोघां भावांचा तंटा मिटविण्याचा प्रयत्न केला, व श्रीपतराव प्रतिनिधीनें नुकताच कोल्हापूरच्या संभाजीवर जय मिळविला होता त्यास कोंकणची कामगिरी सांगितली. परंतु प्रतिनिधीस कोंकणांत जाऊन दोन वर्षे झालीं तरी त्याच्या हातून कांहींच काम झालें नाहीं. त्यामुळें शाहूस फार काळजी लागली. मग त्यानें सेखोजी व संभाजी या दोघांसही साताऱ्यास आपल्या भेटीस बोलाविलें. सेखोजी भेटला, तेव्हां शाहूनें त्यास प्रतिनिधीला साहाय्य करण्याविषयीं आग्रहपूर्वक सांगितलें. त्यावरून बकाजी नाईक महाडीक यास प्रतिनिधीच्या साहाय्याकरितां सेखोजीनें कोंकणांत परत आल्याबरोबर पाठवून दिलें. बकाजी नाइकाची व सिद्दीसाताची चिपळुणाजवळ गांठ पडून युद्ध झालें. त्यांत सिद्दीसाताची बकाजीनें अगदीं तारांबळ उडवून दिली. सिद्दीसात फारच कावेबाज होता. बकाजी नाइकाकडून पराभव झाल्यावर तो प्रतिनिधीस भेटला, व आपण तह करण्यास तयार आहों असें त्यानें प्रतिनिधीस

सांगितलें. प्रतिनिधीस तें त्याचें मायावी भाषण खरें वाटलें, व त्यानें बकाजी नाइकाची आपल्याला कांहीं आतां जरूर नाहीं असें पाहून त्याचें मन दुखविलें. बकाजी नाइकाचे मनांत गोवळकोट घेण्याचें फार होतें. प्रतिनिधीनें त्याशीं असें बोलणें लाविलें कीं, आपण दोघे मिळून गोवळकोट घेऊं. यावरून बकाजीस राग आला. आपण श्रम करावे व किल्ला सर केल्याचें यश प्रतिनिधीनें उपटावें असें होणार, असें बकाजीस वाटून तो परत निघून गेला. तेव्हां सिद्दी-सातानें तहाचें बोलणें थांबविलें, व एकदम तो प्रतिनिधीशीं युद्ध करण्यास तयार झाला. सिद्दीसाताचीं प्रतिनिधीशीं चार पांच युद्धें झालीं; त्यांत प्रतिनिधीचा पूर्ण पराभव झाला. तेव्हां प्रतिनिधि मोठ्या अडचणींत पडला. पण इतक्यांत पावसाळा सुरू झाल्यामुळें गोवळकोट घेण्याचें काम पुढील सालावर टाकून प्रतिनिधीस स्वस्थ बसणें भाग पडलें.

४. शाहूस सिद्दीचें पारिपत्य करण्याची फारच उत्कंठा लागली होती. प्रतिनिधीची झालेली फजिती शाहूच्या कानावर गेली, तेव्हां प्रतिनिधीच्या हातून हें काम पार पडणार नाहीं, हें शाहूनें ताडलें; आणि बाजीराव व फत्तेसिंग भोंसले यांस पावसाळा संपल्यावर कोंकणांत जाण्याची त्यानें आज्ञा केली. त्याप्रमाणें बाजीराव व फत्तेसिंग शके १६५५च्या (सन १७३३) वैशाखांत कोंकणांत उतरले. ते गेल्यावर कोंकणांत सिद्दीशीं चाललेल्या युद्धास निराळाच रंग आला. ते कोंकणांत गेले त्याच्या अगोदर थोडे दिवस मराठ्यांस अनुकूल अशी एक गोष्ट घडून आली; ती याकुतखान सिद्दी मरण पावला ही होय. त्याच्या मरणानंतर सिद्दी--सरदारांत भांडणें होऊं लागलीं. याकुतखानास आठ मुलगे होते. शेखजी म्हणून एक गुहागरचा बाटलेला पाटील सिद्दीकडील सरदार होता. याकुतखानाच्या मृत्यूनंतर तो मराठ्यांस मिळाला. शेखजीनें अबदुल रहमान नांवाचा एक

याकुतखानाचा मुलगाही फोडून मराठ्यांकडे आणला.मात्र सिद्दीसात, अंबर, संबूल, याकूब वगैरे सिद्दी सरदार एक होऊन मराठ्यांशीं लढूं लागले. अशा तऱ्हेनें जंजिऱ्याच्या सिद्दयांत दोन पक्ष झाल्यामुळें व बाजीराव कोंकणांत आल्यामुळें मराठ्यांची बाजू बळकट होऊन मराठ्यांनीं युद्ध जोरांत चालविलें. बाजीरावानें सेखोजी आंग-ऱ्यास उंदेरीवर पाठविलें; बाणकोट व मंडणगड यांजवर बकाजीस धाडिलें; प्रतिनिधि व सोमवंशी यांच्याकडे अंजनवेल घेण्याची कामागिरी सोंपविली, व स्वतः बाजीराव आणि फत्तेसिंग जंजिऱ्याला शह देऊन बसले. थोड्याच अवकाशांत मंडणगड सर झाला. प्रतिनिधीनें रायगड घेतला. बिरवाडी, तळें, घोसाळें इत्यादि ठिकाणें मराठ्यांच्या हातीं आलीं. येणेंप्रमाणें एकएक ठाणें बाजीरावाच्या हातीं येत येत श्रावण वद्य नवमीस जंजिरा व अंजनवेल यांखेरीज बहुतेक सर्व ठाणीं बाजीरावाच्या ताब्यांत आलीं. जंजिऱ्यास बाजीरावानें खुष्कीवरून मोर्चे लाविले व तोफांचा मारा चालविला; व मानाजीनें समुद्रांतून तो किल्ला वेढला. त्यामुळें किल्लयांतल्या लोकांची उपासमार होऊं लागली. शेवटीं सिद्दी अंबर, संबूल वगैरे सरदार पळून अंजनवेलकडे गेले व अबदुल रहमानातर्फे जंजिरा बाजीरावाच्या हातीं आला. तेव्हां बाजीरावानें अबदुल रहमानास गादीवर बसविलें. रायगड, तळें, घोसाळें, अवचितगड व बिरवाडी हे किल्ले मराठ्यांस मिळावे असा ठराव झाला; व मग बाजीराव परत आला.

५. आतां सिद्दी संबूल, सिद्दी सात व सिद्दी अंबर या सरदारांचा मोड मराठ्यांस करावयाचा होता. अंजनवेल, गोवळकोट इत्यादि ठिकाणें या सरदारांच्या ताब्यांत होतीं. त्यांच्याशीं लढून जर मराठ्यांनीं नेटानें युद्ध चालविलें असतें तर तीं ठाणीं काबीज करण्यास कांहींच वेळ लागला नसता. पण मराठे सरदार नेटानें लढले नाहींत. याचें कारण म्हणजे सेखोजी आंगरे इंग्रजांशीं लढत असतां उंदेरीस शके

१६५५च्या भाद्रपद महिन्यांत मरण पावला. त्यामुळें संभाजी व मानाजी या दोघां भावांत फिरून तंटा सुरू झाला; व मराठ्यांचे प्रयत्न शिथील होऊन सिद्दी सरदारांस जोर चढला. अंजनवेल व गोवळकोट या दोन्ही किल्ल्यांस मराठ्यांनीं वेढा घातला होता; पण त्यांपैकीं एकही सर झाला नाहीं. शेवटीं शके १६५६च्या अखेरीस (सन १७३५ च्या आरंभीं) बाजीराव फिरून कोंकणांत उतरला; तो मानाजीस साहाय्य करण्याकरितां आला. मानाजीनें अंजनवेल घेण्याची जास्त जोरानें खटपट चालविली होती. त्यामुळें बाजीराव येण्यापूर्वीच अंजनवेल मराठ्यांच्या हातीं आली. बाजीरावानें मानाजीकडून खांदेरी, कुलाबा व राजमाची इत्यादि स्थळें घेवविलीं. त्यामुळें संभाजीचा पाणउतारा झाला व तो बाजीरावास शरण आला. बाजीरावानें संभाजीकडे सरखेल हें पद कायम करून त्याची विजयदुर्गास स्थापना केली व मानाजीस वजारतमाब असा किताब देऊन कुलाब्याचा कारभार सांगितला. हा तह अलिबागेजवळ नवदरे येथें शके १६५७ (इ. स. १७३५)च्या आरंभीं झाला. अशा रीतीनें दोघां भावांत एकी घडवून आणून बाजीराव परत गेला. या वर्षी सिद्दीसात यानें मराठ्यांस त्रास देण्याचा सपाटा चालविला. त्यावरून सालअखेर चिमाजीआप्पा कोंकणांत गेला. त्याची व सिद्दीसाताची रेवसेजवळ चरई येथें लढाई झाली. तींत सिद्दीसात ठार झाला (१५।४।१७३६). उंदेरीचा किल्लेदार सिद्दी याकूबही पडला. आतां सर्व दंगेखोर सिद्दी सरदार नाश पावले; व मराठ्यांनीं गादीवर बसविलेल्या अबदुल रहमानाचा अम्मल सर्व सिद्द्यांवर चालू झाला. येणेंप्रमाणें मराठ्यांनीं सिद्दीस आपला मांडलिक करून टाकिलें.

---

४८. दिल्लीची स्वारी.

(शके १६५९, इ. स. १७३७).

—:०:—

बाजीरावानें माळव्यांत शिंदे, होळकर व पवार कायमचे ठेवून दिले होते म्हणून मागें सांगितलें आहे. त्यामुळें माळवा प्रांताची चौथाई व सरदेशमुखी दरवर्षी वसूल होतच असे. तथापि बादशहाकडून सनद मिळून तो प्रांत कायदेशीर रीतीनें मराठ्यांस मिळाला नव्हता. शके १६५८च्या शेवटीं बाजीरावानें माळवा प्रांताची सनद मिळविण्याकरितां हिंदुस्थानांत कूच केलें. माळव्याच्या सुभ्यावर दयाबहादुराच्या मागून जयपूरचा राजा सवाईजयासिंग याची नेमणूक झाली होती. त्याचें व बाजीरावाचें पूर्ण सख्य होतें. त्याच्यातर्फे बाजीरावानें माळव्याची सनद करून देण्याचें बादशहाशीं बोलणें लाविलें. तेव्हां बादशहानें 'माळव्याच्या उत्पन्नापैकीं तेरा लाख रुपये घेण्याबद्दल आपण सदन करून देण्यास तयार आहों, व रजपूत राजांपासून मराठ्यांनीं खंडणी वसूल करण्याच्या आडही आम्ही येत नाहीं ' असें बाजीरावास यादगारखान नांवाचा एक वकील पाठवून कळविलें. वकिलाबरोबर गुप्तपणें माळव्याच्या सनदाही दिल्या होत्या; व वरच्या देणग्यांनीं मराठे तह करण्यास तयार नसतील तरच त्या द्यावयाच्या असें दिल्लीस ठरलें होतें. पण ही गुप्त बातमी बादशहापाशीं बाजीरावाचा वकील धोंडोपंत पुरंदरे होता त्यास कळली; व त्यानें ती बाजीरावास कळविली. यापुढें बाजीरावानें आपल्या मागण्या अतोनात वाढविल्या; " सबंध माळवा जहागीर मिळावा. धार, मांडू व रेसीन हे किल्ले आणि चंबळच्या दक्षिणचा सर्व मुलूख मिळावा; व बंगालची खंडणी घेण्याचा हक्क किंवा त्याबदली पन्नास लाख रुपये मिळावे; अलाहाबाद, गया,

मथुरा हीं स्थळें व दक्षिणच्या साही सुभ्यांची सरदेशपांडेगिरी इतक्या गोष्टी मिळाव्या " असें तो म्हणूं लागला.

२. बादशहानें यांपैकीं शेवटची मागणी म्हणजे दक्षिणची सरदेशपांडेगिरी देण्याचें तेवढें कबूल केलें, व इतर सर्व मागण्या फेंटाळून लाविल्या. दिल्लीभोंवतालीं सैन्य देखील जमा होऊं लागलें. वजीर खानडौरान व कमरुद्दीनखान हे बादशाही सरदार सैन्य घेऊन मथुरेकडे येऊं लागले. ही बातमी बाजीरावास कळतांच आपल्या-जवळचें जड सामान बुंदेलखंडांत छत्रसालाचा मुलगा जगत्राज याजपाशीं ठेवून तो जलदीनें उत्तरेकडे गेला, व त्यानें आग्र्याच्या दक्षिणेस चाळीस मैलांवर यमुनेच्या तीरीं आपला तळ दिला. इतक्यांत मल्हारराव होळकर दुआबामध्यें खंडणी घेत होता; त्याच्यावर अयोध्येचा नबाब सादतखान यानें अचानक येऊन छापा घातला. त्यामुळें मल्हारराव दुआबांतून परत आला. सादतखानानें आपल्या विजयाचें वर्णन दिल्लीस लिहून पाठविलें. " मराठ्यांची फौज यमुना उतरून आली ती बुडविली. दोन हजार स्वार मारिले व दोन हजार स्वार नदींत बुडाले. मल्हारजी होळकर व विठोबा बुळे कामास आले. बाजीराव याची धाड आली होती तिची गत झाली. त्याचे फौजेंत बाकी राहिली नाहीं. आपण यमुना उतरून मराठे बुडवून चमेली पार *करितों." अशा यथेष्ट गप्पा त्यांत भरलेल्या होत्या. बादशहास सर्व खरें वाटलें, व त्यानें सादतखानाचा मोठा गौरव केला. सादतखानानें आग्र्याच्या किल्ल्यांत तळ दिला होता. खानडौरान व बंगष हे आग्र्यास आले. तेथें त्यांच्या व सादतखानाच्या भेटी झाल्या. नंतर सादतखानाच्या सांगण्यावरून बाजीरावाचा वकील धोंडोपंत पुरंदरे यास खानडौरानानें निरोप दिला. हे सर्व सरदार आग्र्यास होते. त्या सर्वांस झुकांडी देऊन दिल्लीवर चालून जाण्याचा बाजीरावानें बेत

*श्री ब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र व पत्रव्यवहार, लेखांक २७ (५।४।१७३७).

केला; व वीस वीस कोसांच्या मजला करीत बाजीराव दिल्लीनजीक कुशबंदी येथें उतरला. बाजीरावाच्या मनांत शांततेनें आपला मतलब साधून घ्यावयाचा होता. त्याकरितां दिल्ली शहरच्या वाटेस मुळींच न जातां बादशहास त्यानें एक पत्र पाठविलें. बाहशहाचें उत्तर आलें कीं, धोंडोपंतास पाठवा म्हणजे 'सलूख' करूं. पण आपण फौजेसह जवळ असल्यामुळें धोंडोपंतास एकटें पाठविलें असतां दगा होईल, असें बाजीरावास वाटलें, व त्यानें त्याच्या संरक्षणाची तजवीज करा म्हणजे धोंडोपंतास पाठवून देतों. असें बादशहास लिहिलें; व आपल्या सैन्यापासून शहरास त्रास पोहोंचूं नये म्हणून झीलच्या तलावावर मुक्काम केला.

३. इतक्यांत मुजफरखान, मीर हसनखान कोका, शिवसिंग इत्यादि बादशाही सरदार सात आठ हजार फौजेनिशीं शहराबाहेर आले. त्यांचीं व पिलाजी जाधवाचा मुलगा सटवाजी जाधव यांची गांठ पडली. सटवाजीनें मोंगलांचा हल्ला आल्याची बातमी बाजीरावास कळविली. त्याबरोबर बाजीरावानें मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, तुकोजी, जिवाजी व यशवंतराव पवार, मानाजी पायगुंडे व गोविंद हरी पटवर्धन यांस तावडतोब पाठविलें. तुंबळ युद्ध झालें. त्यांत मोंगलांचा अगदीं मोड झाला. शिवसिंग पडला; कोका जखमी झाला. मोंगलांकडचें तीनशें माणूस ठार झालें व चारशें जखमी झालें. मोंगल फौजेनें शहरांत पळ काढिला. दोन हजार घोडे मराठ्यांस मिळालें. मराठ्यांकडील इंद्राजी कदम याच्या बोटास गोळी लागून दोन बोटें उडून गेलीं; व इतर थोडीं माणसें जखमी झालीं. संध्याकाळीं चार घटका दिवस राहिला होता तों कमर्दीखान म्हणून एक सरदार बाजीरावावर चालून आला. त्याचें व मराठ्यांचें युद्ध सुरू झालें; परंतु सूर्य अस्तंगत झाल्यामुळें तें लवकरच थांबलें. इतक्यांत सादतखान, बंगष व खानडौरान यांस बाजीराव दिल्लीस

गेल्याचें वर्तमान समजून तेही मजल दर मजल दिल्लीजवळ येऊन पोंचले. बाजीरावानें पाहिलें कीं, सर्व मोंगल एक झाल्यावर त्यांशीं दिल्लीजवळ युद्ध करणें फायदेशीर होणार नाहीं. याकरितां मोंगल पाठीवर घेऊन दुआबांत आणून मग बुडवावे, असा बेत करून बाजीराव रेवाडी, कोटपुतळी यांजवरून जयपुराजवळ आला. तेथून दुआबांत उतरून पावसाळ्यापूर्वी खंडणी वसूल करण्याचा बाजीरावाचा बेत होता. त्यानें चिमाजीआप्पास लिहिलें कीं, "निजामुल्मुल्क नर्मदा उतरून आम्हांस त्रास देण्याकरितां वर येऊं लागेल तर तुम्ही त्यास शह देणें; दाणावैरण लुटून अगदीं हैराण करणें." पण हे बेत सिद्धीस गेले नाहींत. कारण बाजीरावास दक्षिणेंत परत जाणें जरूर झालें. माळव्याची सनद तशीच राहिली. फक्त तेरा लाख रुपये मिळण्याची बादशहापासून कबुली घेऊन बाजीराव दक्षिणेंत परत आला.

४. पेशवाई मिळाल्यापासून बाजीरावाच्या सारख्या मोहिमांवर मोहिमा चालल्या होत्या. त्या करण्यास त्याला फौज ठेवावी लागे, व फौज ठेवण्यास अतोनात पैसा खर्च करावा लागे. इतका पैसा कांहीं सरकारी शिलकेंत नसे. तेव्हां त्याला कर्ज काढावें लागे. नवीन कर्ज देण्यास सावकार कुरकुरूं लागले; त्यानें ज्यांच्यापासून अगोदर कर्ज काढिलें होतें, ते आपला पैसा परत करा असा सारखा तगादा करीत. सावकारांच्या जांचानें बाजीराव अत्यंत त्रासला. त्यानें कर्जासंबंधीं ब्रह्मेंद्रस्वामीस दोन पत्रें लिहिलीं आहेत; त्यांत पुढील मजकूर आहे. " या प्रपंचामुळें आम्हीं जोड इतकी केली कीं, वीस लाख रुपयांचे कर्जदार झालों. आतां नित्य उठून कर्जदारांचे पायां पडावें. शिलेदारांचे पायां पडतां कपाळ छिनत चाललें. " " आज दाभाडे, गायकवाड, बांडे, कोटी कोटी रुपये खजिने बाळगून आहेत, आणि आम्हीं तुझे पायांशी व धन्याचे पायांशीं निष्ठेनें वर्ततों ते अन्नास

महाग झालों. हें कर्ज फिटत नाहीं. आतां वांचलीयाचें सार्थक काय? जीवाचा त्याग करितों." या शेवटच्या शब्दांवरून तर बाजीराव कर्जामुळें जिवाससुद्धां कंटाळला होता असें दिसून येतें. सैन्यांतील शिलेदारही त्याची आज्ञा ऐकतनासे झाले. असा बाजीराव चोहोंकडून पेंचांत आला होता.

---

४९. भोपाळचा वेढा.

(शके १६५९: सन १७३८.)

—:०:—

शके १६५९ त (इ० स० १७३७) दिल्लीपर्यंत स्वारी करून शेवटीं माळव्याच्या सनदा न घेतांच बाजीराव गेला खरा; पण मराठे माळवा प्रांत घेतल्याशिवाय राहणार नाहींत अशी दिल्लीच्या बादशहास भीति वाटूं लागली. मराठे एकदां परत गेले म्हणून फिरून येणार नाहींत असें थोडेंच होतें! बाजीराव फिरून आला तर आपल्या जवळच्या सरदारांच्या हातून त्याचा मोड व्हावयाचा नाहीं, असा बाजीरावानें दिल्लीस येऊन उडवून दिलेल्या गडबडीवरून त्यानें अंदाज केला; व माळव्याच्या बचावाची निराळी युक्ति काढिली. दक्षिणचा सुभेदार निजामुल्मुल्क हा शूर व कारस्थानी होता. त्यावरून तो जरी स्वतंत्रपणानें वागे, तरी माळवा त्याच्या स्वाधीन केला असतां त्याचा बचाव होईल असें बादशहास वाटलें. तेव्हां बादशहानें निजामुल्मुल्कास दिल्लीस बोलावून नेऊन त्याचा वडील मुलगा गाजीउद्दीन याच्या नांवानें माळवा व गुजराथ प्रांत निजामाच्या स्वाधीन केले; आणि या दोन्ही प्रांतांतून मराठ्यांस मी स्वतः हांकून देईन, असें ते प्रांत ताब्यांत देतांना निजामापासून बादशहानें वचन घेतलें.

२. पहिल्यानें निजामुल्मुल्कानें रजपूत राजे व बुंदेलखंडांतील राजे आपल्या ताब्यांत आणिले, व मग आपली व मांडलिक राजांची मिळून चौतीस हजार फौज घेऊन निजाम मराठ्यांचें पारिपत्य करण्याकरितां निघाला. त्या वेळीं सर्व हिंदुस्थानांत उत्तम असा तोफखाना त्याच्याबरोबर होता. निजामुल्मुल्क आपलें अवाढव्य सैन्य व उमदा तोफखाना घेऊन सिरोंजेस आला, तों दक्षिणेंतून बाजीरावही नर्मदा उतरला. लवकरच दोन्ही सैन्यें पुढें सरकून एकमेकांपासून आठ नऊ कोसांच्या अंतरावर येऊन दाखल झालीं. मराठे जवळ आले असें पाहून निजामानें एखाद्या बळकट जागेचा आश्रय करण्याचा बेत केला; व थोडें मागें हटून तो भोपाळ किल्ल्याच्या आश्रयास जाऊन राहिला. निजामाच्या फौजेच्या पाठीमागें एक तळें होतें व पुढें एक ओढा होता.

३. निजामानें या नव्या ठिकाणीं तळ दिला त्याच दिवशीं ह्मणजे शके १६५९ पौष शुद्ध ५ (१५।१२।१७३७) ला मराठी फौज त्याच्या फौजेवर चालून गेली. प्रथम निजामानें तोफखाना चालू केला, आपल्या फौजेंतील रजपूत लोकांस लढावयास पुढें धाडिलें व आपण खासा मागें राहिला. या वेळीं मराठ्यांतर्फे राणोजी शिंदे, पिलाजी जाधवराव व सयाजी गुजर हे रजपुतांवर चालून गेले. निजामाच्या तोफखान्यापासून मराठ्यांचें बरेंच नुकसान झालें. पण मराठ्यांनीं न डगमगतां मोठ्या शर्तीनें झुंज केलें. दीडशें रजपूत ठार झाले. मराठ्यांकडील पन्नास साठ माणसें पडलीं, शंभर घोडीं मेलीं व पांचशें जखमी झालीं. निजामाच्या तोफखान्यामुळें हल्ला चांगला लागू झाला नाहीं. तरी पण यापुढें निजामानें आपलें सर्व सैन्य भोपाळ किल्ल्याच्या आंत नेलें. त्यामुळें मराठ्यांनीं शत्रूस चोहोंकडून घेरिलें. दाणावैरण बंद केली. चार दिवसांत निजामाच्या लष्करांत रुपयास चार शेर पीठ झालें. निजामाच्या लष्करांत अशी महागाई वाढूं लागली. हत्ती,

घोड्यांस वैरण पुरेनाशी झाली. एके दिवशीं त्यांना झाडाच्या साली व तळ्यांतील लव्हाळें चारिलें. रात्रीं मराठे निजामाच्या सैन्यावर बाण व बंदुका चालवीत; त्यामुळें निजामाच्या फौजेस रात्रीं ताटकळत बसावें लागे व बराच नाशही होई. शेवटीं रजपूत लोक निजामास सोडून जाण्याच्या विचारास लागले. निजामाजवळ मोठें सैन्य होतें, व उत्तम तोफखाना होता. तरी त्याला किल्ल्याच्या आश्रयास बसण्याची बुद्धि झाली. त्यामुळें तो अगदीं पेंचांत सांपडला.

४. इतक्या अडचणी होत्या तरी निजाम भोपाळ सोडून बाहेर पडेना. कारण त्याला अशी आशा होती कीं, दिल्लीहून व दाक्षिणेंतून आपल्या मदतीस फौज येईल. दिल्लीस व दाक्षिणेंत आपल्या मुलास फौज पाठवून देण्याविषयीं तो सारखे निरोप धाडीत होता. पण कोणीकडून फौज येईना. दिल्लीस वजीर खानडौरान यास निजामुल्मुल्काचा उत्कर्ष मुळींच सहन झाला नाहीं; व आतां निजाम अडचणींत पडलेला पाहून त्यास समाधानच झालें. तेव्हां त्यानें फौज पाठवून निजामास कुमक केली नाहींच. दाक्षिणेंतून फौज येईल अशी निजामास मोठी आशा होती. त्याप्रमाणें त्याचा दुसरा मुलगा नासिरजंग हा औरंगाबाद व हैद्राबाद या दोन्ही ठिकाणीं फौज जमवीत होता; पण बाजीरावानें आपला भाऊ चिमाजीआप्पा यास दाक्षिणेंतून निजामाच्या कुमकेस येणाऱ्या फौजेस अडविण्याची सक्त ताकीद केली. " ती फौज येऊन सामील झाली तर नबाब भारी होतील; याकरितां तिकडून येणाऱ्या फौजेस अटकाव होईल तें करणें; या वेळेस तुम्हांस जी फौज मिळेल ती मिळवून भारी राहणें. दाभाडे, बांडे आम्हांकडे आले नसले तरी तुम्हीं आपणाजवळ बोलावून सामील करणें. श्रीस्वामींस लिहून फत्तेसिंग भोंसले, शंभुसिंग जाधवराव व सरलष्कर आणावेणें. अवध्यांनीं या समयीं

चित्त घालावें. नबाब ठिकाणीं लागल्यावर अवधी दक्षिण निर्वेध* होईल. " असें बाजीरावानें आप्पास लिहिलें. वाटेंत तापीच्या कांठीं फौजेसह चिमाजीनें तळ दिला होता,त्यामुळें दक्षिणेंतून निजामास सोडविण्यास फौज येण्याची आशा राहिली नाहीं. इतक्यांत सादतखानाचा भाचा सफदरजंग व कोट्याचा राजा हे दोघे वीस दजार फौज घेऊन निजामाच्या मदतीस येत होते. त्यांजवर मल्हारराव होळकर व यशवंतराव पवार चालून गेले, आणि त्यांनीं शत्रूकडील पंधराशें लोक ठार केले. तेव्हां सफदरजंग घाबरून परत निघून गेला. शेवटीं निजामाच्या लष्करांत धान्य रुपयास एक शेर झालें; तेव्हां बाहेरून मदत येणें शक्य नाहीं असें पाहून निजामानें आपलें जड सामान भोपाळ व इस्लामगड या किल्ल्यांत टाकून दिलें व तोफांच्या आश्रयानें तो परत जाऊं लागला. पण मराठे चोहोंकडून हल्ले करीत असल्यामुळें रोज तीन चार मैलांवर जमीन चालून होईना. शेवटीं शके १६६०च्या पौष व॥१३स (७।१।१७३८) म्हणजे मराठ्यांनीं पहिला हल्ला केला तेव्हांपासून बरोबर चोविसाव्या दिवशीं सिरोंजेजवळ दराईसराई येथें त्यानें बाजीरावाशीं तह केला. या तहांत निजामानें स्वतः आपल्या हातानें बाजीरावास लिहून दिलें कीं, " तुम्हांस माळवा प्रांताची सनद व नर्मदा आणि चंबळा या नद्यांमधील सर्व मुलूख बादशहापासून मिळवून देईन; व फौजेच्या खर्चाबद्दल पन्नास लाख रुपये तुम्हांस बादशहापासून देवविण्याची मी हमी घेतों." या तहाचें आनंदकारक वर्तमान चिमाजीस कळवितांना बाजीराव लिहितो. ' पुत्राचे नांवें सुभेदारी करून समागमें आणिलें त्या माळव्याची दरोबस्त सनद करून देतां नबाबाच्या चित्तांत कल्पांत आला. परंतु काय करील? संकटाचा प्रसंग देखोन धावें लागलें. ' +

---

* श्रीब्रह्मेंद्रस्वामी ध. वडशीकर, लेखांक ३३; +सदर, लेखांक ३५.

५०. माझें मस्तक तरी किल्ल्यांत पडूं दे.

वसईची मोहीम.

(शके १६६०—६१; इ० स० १७३८–३९).

हिंदुस्थानांत युरोपियन लोक व्यापाराकरितां येऊन ठाणीं करून राहूं लागले, त्यास मूळ आरंभ पोर्तुगीज लोकांपासून झाला. त्यांचा मुख्य सरदार व्हास्को डिगामा हा पहिल्यानें कालिकोट बंदराचर आला. तेथून या लोकांनीं पाय पसरण्यास सुरुवात केली. गोवें प्रांत व हल्लींच्या ठाणें जिल्ह्याचा सर्व पश्चिम भाग हीं हळूहळू त्यांच्या ताब्यांत आलीं. त्यांच्या राजानें मुंबई बेट इंग्रज राजास आंदण दिलें होतें. पण इंग्रज लोक अजून व्यापाराशिवाय इतर उद्योग करूं लागले नव्हते. पोर्तुगीजांची मात्र फारच चलती होती. या लोकांस धर्मवेड फार होतें. त्यामुळें त्यांच्या राज्यांतील हिंदु प्रजेस फार त्रास होऊं लागला. 'जमीनदारांचीं वतनें बुडविलीं, गांवचे गांव घेऊन बाटविले, किरिस्ताव केले. घरांत कोणी नसलें तर पोरें नेऊन बाटवावीं. देवधर्म बुडाला. प्रांतांतील तीर्थें क्षेत्रें सर्व लोपलीं. देवालयें फोडून साफ केलीं. ब्राह्मणांस मुलुखांत फिरण्याची बंदी झाली. कोणीं कांहीं व्रतें, उद्यापनें, होम वगैरे आरंभिला कीं, त्याचें घर वेढलें. शेजारीपाजारी त्यांत सांपडलें कीं, त्यांसही धरून *न्यावें.' पोर्तुगीजांनीं आरंभिलेला हा धर्मच्छल संभाजीच्या कारकीर्दीपासून चालला होता. लोक पोर्तुगीजांच्या जुलुमास अगदीं कंटाळून गेले. शेवटीं वसईचे देसाई व देशपांडे, अंताजी रघुनाथ व रामचंद्र रघुनाथ कावळे व गंगाजी नाईक इत्यादि पाठारे गृहस्थ यांनीं कोंकण प्रांतांत होत असलेला हा छळ पेशव्यांच्या कानावर घातला व

* साष्टीची बखर पृष्ठ १.

पोर्तुगीजांच्या जुलुमापासून सुटका करण्याची आग्रहपूर्वक विनंति केली. बाजीराव व चिमाजीआप्पा यांनीं 'सवड सांपडतांच पोर्तुगीजांचें कार्य हातीं घेतों' अशीं त्यांस उत्तरें पाठविलीं. हीं उत्तरें शके १६५१ (सन १७३०) च्या शेवटीं पाठविलीं. परंतु पेशवे पुढें हब्शीप्रकरणांत गुंतल्यामुळें त्यांस वेळ सांपडला नाहीं.

२. मध्यें पोर्तुगीजांचा जुलूम फारच वाढला. गोव्याचा नवा गव्हर्नर आला तो फाजील धर्मवेडा असल्यामुळें पोर्तुगीजांच्या मुलुखांत अन्यधर्मीय लोकांची सर्रास विटंबना होऊं लागली. दामलुई बोतेलो हा वसई प्रांताचा अधिकारी होता. त्यानें आंगऱ्यापासून आपल्या बंदरांचें रक्षण करण्याकरितां नवीन जहाजें बांधण्यास सुरुवात केली व या नवीन खर्चाकरितां कोळी वगैरे लोकांवर त्यानें नवीन कर बसविले. या वेळीं मराठ्यांचें सिद्दीशीं युद्ध चाललें होतें. तें लवकरच संपलें असतें, पण संभाजी आंगरे व मानाजी आंगरे या दोघां भावांमध्यें दुही असल्यामुळें मराठ्यांची बाजू लंगडी पडली; आणि या दुहीपासून पोर्तुगीज लोकांनीं आपला फायदा करून घेतला. त्यांनीं आज एका भावास तर उद्यां दुसऱ्या भावास मदत करून मराठ्यांच्या हितास अत्यंत घातक अशी दुही कायम ठेवण्याचा सारखा प्रयत्न चालविला होता. बाजीराव दोघां भावांत एकी करण्यास सारखा झटत होता, व त्यानें शके १६५७च्या आरंभीं नवदरे येथें मागें सांगितल्याप्रमाणें तह घडवून आणला; त्यामुळें सिद्दीचा लवकरच मोड झाला व मग चिमाजीआप्पानें पोर्तुगीजांचा समाचार घेण्याचा निश्चय केला.

३. शके १६५९ (सन १७३७)च्या चैत्र महिन्यांत कोंकणांत जाऊन चिमाजीनें पोर्तुगीजांचीं साष्टी बेटांतील ठाणीं घेण्याचा सपाटा चालविला. ठाणें, बेलापूर आणि वेसावें इतक्या जागा त्यानें सर केल्या; व साष्टी प्रांत घेतल्यावर पावसाळ्यांत शंकराजी केशव

फडके व खंडोजी माणकर या दोघांस त्या प्रांताच्या रक्षणाकरितां ठेवून चिमाजी पुण्यास गेला. मराठ्यांच्या झालेल्या या जयानें पोर्तुगीज लोक अगदीं चिरडीस आले, व त्यांनीं पावसाळा संपल्यावर मराठ्यांकडून आपला गेलेला मुलूख परत मिळविण्याकरितां मोठी जोरांत तयारी चालविली. पोर्तुगीजांनीं आपलें आरमार आणिलें आणि केळवें व माहीम येथील मराठे लोकांस शह दिला. त्याबरोबर मराठ्यांचा सरदार शंकराजी केशव यानें कच खाल्ली. तेव्हां बाजीराव पेशव्यानें रामचंद्र हरि पटवर्धन या सरदाराच्या हाताखालीं तीन हजार फौज देऊन केळवें व माहीम सर करण्यास त्यास पाठविलें. आपल्या लोकांनीं कच खाल्ली हें कळतांच बाजीरावास संताप आला व त्यानें रामचंद्र हरीस लिहिलें, " लाखोलाख रुपये खर्च करून लोकांस द्यावे व प्रसंगीं पळ काढतील त्या पाजींचा मुलाहिजा काय? जे शरम धरून साहेबकाम करतील त्यांचें ऊर्जित करीतच आहोंत, ज्या वाटा पळून जावयाच्या असतील तेथें चौक्या ठेवून पळतील त्यांस धरून परिच्छिन्न डोचकीं मारणें. रात्रंदिवस कष्ट करून केळवें व माहीम हीं दोन्ही स्थळें हस्तगत + करणें." रामचंद्र हरीनें निकराचा हल्ला केला पण कांहीं चालेना. पुढें शके १६६० चा पावसाळा संपल्यावर बाजीरावानें शिंदेहोळकरांची कोंकणांत रवानगी केली. पोर्तुगीज सेनापति पेड्रो डिमेलो यानें ठाणें किल्ला परत घेण्याचा निश्चय केला होता. त्याच्या मदतीस*लिस्बनहून दोन लढाऊ जहाजें व गोव्याहून दारूगोळा आला. मार्गशीर्ष शुद्ध ५ शके १६६० रोजीं आठ गलबतें व तीस फत्तेमाऱ्या घेऊन तो ठाण्यावर चाल करून निघाला. ठाण्यास जाऊन पोहोंचतांच त्यानें गोळ्यांचा नुसता वर्षाव सुरू केला. पण मल्हारराव इत्यादि सरदारांनीं तो सहन करून त्याच्याशीं लगट केली व

+पारसनीसकृत ब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र, पृ. ७७; कार्तिक शु॥१३शके १६५९.
*पोर्तुगालची राजधानी.

डिमेलो यास यमलोकीं पाठविले. त्यामुळें पोर्तुगीजांचें बरेंच नुकसान झालें.

४. थोडक्याच दिवसांनीं खुद्द चिमाजीआप्पा कोंकणांत उतरला, व त्यानें पोर्तुगीजांचा वसई प्रांतांतील अम्मल पुरा उठविण्याचा निश्चय केला. त्यानें मराठे सरदारांस निरनिराळीं ठाणीं हस्तगत करण्यास पाठविलें. थोड्याच दिवसांत जयाचीं वर्तमानें येऊं लागलीं. राणोजी शिंद्यानें डहाणू घेतलें. तारापुरास तर मोठी निकराची लढाई होऊन तींत बाजी भिवराव रेटरेकर पडला. पण शेवटीं तें स्थळ मराठ्यांच्या हस्तगत झालेंच. अशारी फत्ते झाली. वेसावें घेतल्याचें खंडोजी माणकराकडून पत्र आलें. अशीं भराभर स्थळें काबीज झालीं. शेवटीं एका वसईखेरीज पोर्तुगीजांकडे कांहीं राहिलें नाहीं. तेव्हां चिमाजीआप्पानें शके १६६० माघ शुद्ध १०मीस (७।२ १७३९) वसईस वेढा घातला.

५. वसई मोठी बळकट जागा. पश्चिमेस व दक्षिणेस खाडी आणि पूर्वेकडून चिखल. त्यामुळें तिहीकडूनही हल्ला करणें अशक्य होतें. एकट्या उत्तरेकडून हल्ला करावयाचा तर तिकडेही वाळू होती त्यामुळें त्रास फार होई. मराठ्यांनीं मोर्चे लाविले, वर तोफा ठेवण्याकरितां धमधमे रचिले व सुरुंगही चालविले. पण पोर्तुगीजांच्या बंदुकींपुढें कांहीं चालेना. दोन महिने झाले तरी जयाचें कांहींच चिन्ह दिसेना. आप्पानें तर निश्चय केला होता कीं, 'वसई घेतल्याशिवाय परत फिरणार नाहीं.' शेवटीं त्यानें सरदार लोकांस बोलावून म्हटलें: "माझें डोकें उडवून तरी वसईच्या किल्ल्यांत टाका." या आप्पाच्या निर्वाणीच्या शब्दांनीं मराठे लोकांस स्फुरण चढलें, व लागलीच वसईचें काम तावडतोब शेवटास नेण्याच्या खटपटीस ते लागले. दहा सुरूंग तयार केले. वैशाख शुद्ध ५माच्या दिवशीं सर्व बेत ठरून षष्ठीस हल्ल्याचे लोक तयार झाले व डाव बाजूकडील

सुरुंगांस बत्त्या दिल्या. अर्धवट सुरुंग उडाले; पण कांहीं लोक घाईनें तसेच वर चढून गेले. इतक्यांत उरलेले सुरुंग उडाले व सर्व लोक जाया झाले. तसेंच उजवे बाजूकडील सुरुंग उडाले व बुरुजास वाट झाली, हें पाहतांच कांहीं लोक वर चढले. पण ह्याही बाजूस फिरून सुरुंग उडाले व चढलेले लोक वर उडून नाश पावले. दोन्ही ठिकाणीं नाश झाल्यामुळें लोक कच खाऊं लागले. परंतु मल्हारराव होळकरानें केलेला सुरुंग अजून उडावयाचा होता. तो सुरुंग उडतांच किल्लयावर निशाणें लावण्याचा बेत करून सप्तमीचे दिवशीं तो उडविला; तो उडतांच अर्धा बुरुज कोसळला. त्याबरोबर मराठे वर चढले व त्यांनीं हल्लयास सुरुवात केली. पोर्तुगीज लोकांनीं आंतून फिरून तोफांचा मारा केला, पण मराठे त्या बुरुजावरून हटतना. तेव्हां नाइलाज होऊन अष्टमीस प्रहर दिवसास पोर्तुगीज किल्ला सोडण्यास तयार झाले. आठ दिवसांच्या आंत पोर्तुगीजांनीं सर्व चीजवस्त घेऊन चालतें व्हावें, असा करार झाला. येणेंप्रमाणें शके १६६१ वैशाख शुद्ध ८ मीस (५।५।१७३९) मराठ्यांचें निशाण किल्लयावर फडकूं लागलें.

६. वसईचा वेढा चालू असतांच एक गोष्ट घडून आली; त्यावरून चिमाजीआप्पाच्या मनाचा थोरपणा स्पष्ट दिसून येतो, एके दिवशीं एका पोर्तुगीज सरदाराची बायको जहाजांत बसून बाहेर निघाली होती. तिला कांहीं मराठ्यांनीं जाऊन धरून आणलें, व आप्पाच्या पुढें तिला उभी केली. तेव्हां आप्पा म्हणाला, " हिला कशास धरून आणली ? " नंतर त्या निग्रही पुरुषानें पोषाख देऊन तिचा सन्मान केला व तिला परत जाऊं दिलें.

७. पोर्तुगीज, इंग्रज आदिकरून युरोपियन लोकांपाशीं सुधारलेलीं हत्यारें असत. विशेषतः तोफा, बंदुका व दारुगोळा यांचा त्यांना भरपूर पुरवठा असे व त्यांचा उपयोग करण्यांत ते चांगले वाकबगार

असत. तेव्हां येथील लोकांना त्यांच्याशीं झुंज देणें अवघड पडे. अशा स्थितींत मराठ्यांनीं पोर्तुगीजांपासून वसई घेतली, तेव्हां त्यांचा मोठा लौकिक झाला. वसईच्या मोहिमेंत शौर्य, धैर्य व स्वामिकार्यार्थ प्रत्यक्ष प्राण अर्पण करण्याची तयारी हे मराठ्यांच्या अंगचे गुण उत्कृष्टपणें प्रकट झाले. वसईवरील शेवटच्या धाडसी हल्ल्याचें स्फूर्तिकारक वर्णन खुद्द चिमाजीआप्पानें ब्रह्मेंद्रस्वामीस लिहिलेल्या एका पत्रांत केलें आहे. तें पत्र पुढीलप्रमाणें:—

श्री. शक १६६१ वैशाख व. १

श्रीमंत महाराजश्री परमहंस बावा स्वामींचे सेवेसि आपत्यें चिमाजीनें कृतानेक सा॥ नमस्कार. विज्ञापना. येथील कुशल ता। वैशाख बहुल प्रतिपदापर्यंत मुक्काम वसई स्वामींचें आशीर्वादेंकरून सुखरुप असों. विशेष. स्वामींचे अभयावरून वसईस मोर्चे माघ शु॥ दशमीस लाविले १त्यादारभ्य मोर्चे चालविले व धमधमे चार पांच बांधिले, सुरुंग चालविले. जे जे उपाय स्थळ हस्तगत करावयाचे ते केले. फिरंगी यांनीं निराकरणाचा मंत्र-पूर्वी युद्धप्रसंगीं मोठ्या मोठ्या सुरांनीं केले-तदन्वयें फिरंग्यांनीं सुरुंगावर व धमधमेयावर गरनाळा टाकिल्या; सुरुंग विच्छिन्न केले; पनळ लावून पाणीं सोडलें; आगीचे ओंडे जळके टाकून त्यावर तेल, दारू, राळ टाकून चार चार रोज डोंब २ राहीसारखा करीत. बरकंदाजी ३ व तोफाजी ४ फिरंगियांची निस्सीम ह्मणावी तैशी. तथापि स्वामींचा आशीर्वाद व दंड हें सबळ शस्त्र आह्मांजवळ; त्याचे प्रतापें इकडून तोफा लावून फिरंगियांच्या तोफा मना केल्या. सफेल ६ पाडून लेश केली. वसई जागा बांका ७ बुलंद; सुरुंगाचा उपाय नाहीं. परंतु स्वामींचे कृपाकटाक्षें सुरुंग चालवून दोन्ही बाजूंनीं खांब, वरती तक्तपोशी, त्यावर दोन अडीच हात रेती टाकून सुरुंग नेऊन पोहोंचाऊन, दोनशें पाथरवट लावून, मोठे मोठे चिरे फोडून सुरुंगाचे बुधलियास जागा करून, वैशाख शु॥ पंचमीस

---

१ तदनंतर. २ जाळ. ३ बंदुकीचा मारा. ४ तोफांचा मारा. ५ बंद केल्या. ६ तटाची गच्ची. ७ अत्यंत बळकट.

सकल सिद्धता करून, सुरुंग लोकांस बाजू वांटून देऊन, नगारेयाची इशारत करून, सुरुंग उडतांच सर्वांनीं येलगारास उठावें, बुरुजावर चढावें, शिड्या टेकून चढावें ऐसा करार करून, वैशाख शु॥६ बुधवारीं दोन घटका दिवस प्रातःकाळचा येतांच सुरुंगास बत्त्या दिल्या; डावे बाजूचे सुरुंग कांहीं उडाले, कांहीं उडणें होते, तोंच लोकांनीं उतावळी करून कोटावर चालून घेतलें; तों दुसरे सुरुंग तेच बाजूचे उडाले, त्यांनीं लोक दडपले व जाया ठार जाले. तसेंच उजवे बाजूचे सुरुंग उडाले, एक दोन उडतांच बुरुजास वाट जाहलीशी देखून लोक बरते चढले, तों दुसरे सुरुंग उडाले, त्याणीं बरते लोक चढले होते ते उडोन गेले. लोक कचरले. हिरमोड होऊन काम बंद पाडिलें. फिरंगी यांणीं संभाळून हुके ८ व गरनाळा व रेजगिरीचा ९ मार न भूतो न भविष्यति असा केला. त्यानें लष्करचे लोकांस व हषमास १० अवसान राहिलें नव्हतें. उजवे बाजूचा मातबर सुरुंग राजश्री मल्हारजी होळकर यांजकडील उडणें होता, त्याचा शोध करून पुन्हां त्यांत बुधले घालून रंजक ११ दुरुस्त करून लोकांची निवड केली; आणि सुरुंग उडतांच खामखा निशाणें चढवावींसा करार करून वैशाख शु॥७ गुरुवारीं उजवे बाजूचा सुरुंग उडविला, तेच समयीं लोक जाऊन बुरूज अर्धा उडाला त्यावर चढले. फिरंगी यांनीं सफेलीच्या आंतून मेढा घालून पेटी भरून तोफा लाऊन तयार होतांच तेथें फिरंगी बळाऊन हुकेरगरनाळाच्या दारूच्या पोत्यास आग लावून मार केला, व रेजगिरीचा मार सीमेपरता केला. लोकांवरी अग्नीचा पर्जन्य करून भाजून काढिले. तथापि स्वामींचे अभय, आशीर्वादाचें वज्रकवच लोकांचे आंगीं होतें, तेणेंकरून आगीची तमा न धरितां लोकांनीं हत्यार बरे वजेनें केलें; फिरांगियांनीं मरदुमी, शिपाईगिरी करावी तैशी केली. त्याप्रमाणें इकडील लोकांनीं भारती युद्धाप्रमाणें युद्ध केलें. यामागें युद्धें बहुत जालीं. परंतु या लढाईस जोडाच नाहीं. सर्व स्वामींचा आशीर्वाद लोक बुरूज सोडीनातसे जाहले. तेव्हां स्वामींच्या दंडकप्रहारेंकरून फिरंगी धर्मद्वेष्टे बेहिंमत होऊन अष्टमीस प्रहर दिवसास कौलास आले.

---

८ बंदुका. ९ छरे. १० आरमारांतील लोक. ११ दारू.

कौल घेतला. 'आठ दिवसांत कबिलासुद्धां झाडून जातोंसे' करार केले. याजवरून मारा महकूफ१२ केला. फिरंगी यांणीं कांबिले वस्तभाव गलबतांत भरिली. काल वैशाख पौर्णिमेस फिरंगी झाडून गेला. स्वामींचे पुण्येंकरून जागा फत्ते जाहली. लष्करचे व हषमाचे लोक सुरुंगानें उडाले. व जायां ठार अदमासें पांच हजार किंबहुना विशेष होतील. तैसेंच फिरंगीयांचे सातआठशें मालीस ठार व यानिराळे जखमी जाले. भारती युद्धाप्रमाणें युद्ध जालें. वसई बांकी जागा, पश्चिमेकडून समुद्र, दक्षिणेकडे खाडी, पूर्वेकडे खाजण१३ चिखल, तिहींकडून किमपि इलाज नाहीं. एक उत्तरेकडून उपाय तिकडेही रेती, घर नाहीं. स्वामी साक्षात्कार ईश्वराचा अंश; स्वामींनीं वसई दिली. त्रिवार लिहिले, ते शद्व अन्यथा कसे होतील ? वरकड वसईची गोष्ट मानवी लोकांनीं म्हणावी ऐसी नाहीं ! वसई स्वामींचे आशीर्वादें फत्ते जाली. श्रीचें सुदर्शन धर्मद्वेष्ट्याचे मस्तकीं वज्रप्रहार होऊन टोपीकर म्लानत्व पावले. अन्यथा वसई वसई होती ! व फिरंगी आगीचा पुला१४ होता. स्वामींचे कर्तृत्वास पार नाहीं. ! स्वामींचा महिमा स्वामी जाणत ! आम्हां मानवी लोकांस काय कळे ? " वसई फत्ते होतांच सव्वाशें पुतळी पाठवून देणें व श्री भुलेश्वरास सव्वाशें रुपयांचा मुगुट घातला " म्हणोन आज्ञा केली. याजवरून स्वामींचे आज्ञेप्रमाणें वसई फत्ते होतांच श्रीनिवास केदार याजबरोबर पुतळी सव्वाशें व श्रीभुलेश्वरास मुगुट सव्वाशें रुपयांचा घातला ते रुपये १२५ सव्वाशें स्वामींचे सेवेसी पाठविले आहेत. प्रविष्ट होतील. आम्ही लेंकरें स्वामींचीं असों. सर्व प्रकारें कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. स्वामींचे व्यतिरिक्त दुसरें दैवत आम्हां काय आहे ? सारांश स्वामींच्या आशीर्वादें व दंडाच्या प्रतापें कार्य सिद्धीतें पावलें असे. स्वामींचा महिमा वर्णावयास आम्ही सामर्थ्य धरीत नाहीं. श्रीनिवास केदार पुतळ्या व रुपये देऊन रवाना केले आहेत ते लवकरच पावतील. वर्तमान त्वरेनें विदित व्हावें यास्तव हें पत्र पुढें रवाना केलें असे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.+

१२तहकूब.१३खरी जमीन. १४पुतळा. +पुढील पानावरील टीप पहा.

५१. आतां हिंदुमुसलमानांनीं एक झालें पाहिजे !

बाजीरावानें निजामुल्मुल्कास भोपाळांत कोंडलें होतें त्या वेळीं नागपूरकर रघूजी भोंसल्यानें अलाहाबादपर्यंत स्वारी केली, व तेथील सुभेदारास ठार मारून व बरीच खंडणी उकळून तो नागपुरास परत आला. मराठ्यांची पोर्तुगीजांबरोबर चाललेली लढाई ऐन रंगांत आली असतां रघूजीनें पूर्वेकडे स्वारी करून सर्व कटक प्रांत लुटून फस्त केला. त्यानें या दोन्ही स्वाऱ्या पेशवे दुसरीकडे गुंतले आहेत असें पाहून केल्या. यास त्यांची परवानगी घेतली नव्हती. रघूजीस या स्वाऱ्यांपासून बरेंच द्रव्यही मिळालें. रघूजीचें हें वर्तन पाहून बाजीरावास भोंसल्याचा राग आला व त्याच्या पारिपत्याकरितां आवजी कवडे नांवाच्या सरदाराची त्यानें एकदम रवानगी केली. रघूजीची व आवजी कवड्याची लढाई जुंपली. पण दुर्दैवानें दाभाड्यावर पाठविला असतां जसा त्याचा पराभव झाला, तसाच आतांही झाला. कवडे पराभव पावून परत आला, तेव्हां स्वतः जाऊन रघूजीची खोड मोडण्याची बाजीरावानें तयारी केली. इतक्यांत दिल्लीहून पुढील वर्तमान आलें—" इराणचा बादशहा दिल्लीवर चालून आला. युद्ध झालें. त्यांत वजीर खानडौरान ठार झाला, व सादतखान नादिरशहाच्या हातीं जिवंत सांपडला आहे. नादिरशहानें महंमदशहास कैदेंत टाकलें आहे. दिल्लीस कत्तल केली, तींत सुमारें दोन लक्ष लोक ठार झाले; व यापुढें त्याचा दक्षिणेकडे चालून येण्याचा बेत आहे. " आवजी कवड्याचा नुकताच पराभव झाला होता. बाजीरावास या वेळीं अतिशय कर्ज झालें होतें. त्यामुळें पैसा मिळून फौज तयार होणें अवघडच

+ म. इ, सा. खंड ३, लेखांक २७; अथवा ब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र व पत्रव्यवहार, लेखांक ५२.

होतें. चिमाजीआप्पा वसईकडे गुंतला होता. अशा वेळीं नादिरशहाची वरील बातमी बाजीरावास लागली. आणि इतक्या अडचणी भोंवतीं असून हें संकट मध्यें कोसळलें. तरी बाजीरावाचें धैर्य किंमपिही ढळलें नाहीं. उलट जितकें भयंकर संकट त्याच्यावर कोसळलें त्या मानानें त्यास विलक्षण अवसान आलें. त्यानें ब्रह्मेंद्रस्वामीस या सुमारास एक पत्र लिहिलें आहे. त्यांत तो म्हणतो, " नादिरशहा दिल्लीस दाखल झाले आहेत. याउपरी दक्षिणेवर स्वारी होणार आहेत. याउपरी त्यास कोणी गनीम (शत्रु) आहे असें नाहीं. आम्ही त्यास व ते आम्हांस गनीम आहों. अशास जों तेथून (दिल्लीहून) ते निघाले नाहींत तों तमाम मराठे फौज एकत्र होऊन चमेली (चंबळा) पार होऊन त्यास अलीकडे येऊं न द्यावें, असा विचार * आहे. " दुसरे एके ठिकाणीं बाजीराव म्हणतो, " आपलीं घरगुती भांडणें—रघूजीचें पारिपत्य, पोर्तुगीजांचा पराभव, हीं बाजूला ठेविलीं पाहिजेत. आतां सर्व हिंदुस्थानास एक शत्रु उत्पन्न झाला आहे. दक्षिणेंतील हिंदु व मुसलमान या दोघांनींही एक झालें पाहिजे. मी तर नर्मदा उतरून सर्व मराठी सैन्य चंबळेपर्यंत पसरून देणार. मग पाहूं द्या नादिरशहा कसा खाली येतो तो. " लागलीच बाजीरावानें चिमाजीआप्पास वसईचा वेढा सोडून येण्यास पत्र पाठविलें, व निरनिराळ्या मराठे सरदारांस हिंदुस्थानचा शत्रु नादिरशहा याचा समाचार घेण्यासाठीं सैन्य घेऊन बोलाविलें. चिमाजीआप्पानें वसई घेऊन बाजीरावाकडे जाण्याचा विचार केला व वेढ्याचें काम जोरांत चालविलें. वसई सर झाल्याबरोबर त्यानें शिंदेहोळकरांस बाजीरावाकडे पाठविलें. पण यापूर्वीच नादिरशहा परत गेल्याची बातमी आली होती. परत जातांना त्यानें चौदा कोटी रुपयांची लूट व बादशहाचें रत्नजडित मयूरसिंहासनही

*श्रीब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र व पत्रव्यवहार, लेखांक ४२; (२४।३।१७३९)

बरोबर नेलें.

२. निजामुल्मुल्कानें भोपाळच्या वेढ्यानंतर बाजीरावास शरण जाऊन माळव्याची सनद देवविण्याचा करार केला खरा; पण एकदां-बाजीरावाच्या हातून सूटून दिल्लीस गेल्यानंतर तो सनदेचें नांव काढीना. शिवाय दिल्लीवर नादिरशहानें स्वारी केली. तेव्हां निजामुल्मुल्कास कांहींच त्रास झाला नाहीं. कारण तो नादिरशहास सामील होता. नादिरशहा गेला तरी निजाम सनदेसंबंधीं कांहींच बोलेना. तेव्हां बाजीरावास निजामाच्या कपटाचा राग आला, व त्यानें त्याचें बरेंच नुकसान करण्याचा विचार केला. रघूजी भोंसल्याचें व पेशव्याचें वांकडें पडलें होतें. त्याचें कारण मागें आलेंच आहे. पण निजामाचें पारिपत्य करण्यासाठीं रघूजीशीं समेट करण्याचा त्यानें बेत केला. त्यानें रघूजीस निजामाच्या कपटाची सर्व हकीकत सांगितली; व या वेळीं निजाम दिल्लीस आहे, त्यामुळें त्याच्या मुलुखावर स्वारी करण्यास किती उत्तम संधि आहे हें कळविलें. नंतर फत्तेसिंग भोंसल्यास बरोबर घेऊन कर्नाटकावर स्वारी करण्यास त्यानें रघूजीस भर दिली; शिवाय महाराष्ट्रांत आणखी कांहीं गांवें इनाम दिलीं व बंगाल आणि हिंदुस्थान यांतही पुढें वांटा देण्याचें आश्वासन दिलें. पेशव्याच्या या उदारपणाच्या देणग्यांनीं रघूजी खूष झाला; व कर्नाटकावर स्वारी करण्याची त्यानें तयारी चालविली. या स्वारींत पायदळ पुरविण्याचें पेशव्यांनीं कबूल केलें. निजाम दिल्लीस होता. त्यामुळें त्याच्या दक्षिणेंतील मुलुखाची व्यवस्था त्याचा दुसरा मुलगा नासिरजंग हा पहात असे. त्याच्यावर बाजीरावानें चिमाजीआप्पास पाठविलें व बाजीरावानें स्वतः खुद्द निजामाचा समाचार घेण्यासाठीं हिंदुस्थानांत जावें असें ठरलें.

३. ठरल्याप्रमाणें रघूजीनें कर्नाटकावर स्वारी केली. संताजी घोरपड्याचा वंशज मुरारराव घोरपडेही त्यास मिळाला. इकडे नासि-

रजंग दहा हजार फौजेसह औरंगाबादेस होता. तो एकदम हातांत सांपडेल असें वाटल्यामुळें बाजीरावानें त्यास गराडा दिला. पण इतक्यांत बरीच मोठी फौज त्याचे कुमकेस आली. त्यावरून नासिरजंग शेफारून गेला व तो गोदावरी उतरून अहमदनगरच्या वाटेनें मुलूख लुटीत चालला. इतक्यांत चिमाजीआप्पा लष्करासह आला व मग दोघां भावांनीं मिळून नासिरजंगास माघारीं फिरविलें. चिमाजीआप्पाबरोबर नासिरजंग तह करण्यास कबूल झाला. मग मुंगी-पैठण येथें शके १६६१ फाल्गुन शुद्ध ११स (२७।२।१७४०) उभयपक्षीं तह झाला. शान्तता राखावयाचें व परस्परांच्या प्रजांस त्रास न देण्याचें दोघांनीं कबूल केलें. नासिरजंगानें नर्मदाकांठीं हांडे व खरगोण हे जिल्हे पेशव्यास दिले. तह होतांच बाजीरावानें हिंदुस्थानकडे कूच केलें. नासिरजंगानें चिमाजीस मोठा आग्रह करून औरंगाबादेस नेलें. तेथें त्यानें केलेल्या सन्मानाचा स्वीकार करून चिमाजीआप्पा पुण्यास परत आला.

४, या सुमारास संभाजी आंग्र्यानें मानाजी आंग्र्यावर स्वारी कली. त्यानें जवळपासचीं सर्व ठाणीं घेऊन कुलाब्यास वेढा घातला, व किल्ल्यांत गोडें पाणी जाऊं देण्याचें बंद केलें. मानाजीनें लागलीच मदत करण्याविषयीं पेशव्यास पत्र पाठविलें. चिमाजीआप्पानें बाजीरावाचा वडील मुलगा बाळाजी यास आपल्या बरोबरचें सैन्य देऊन पुढें पाठविलें व आपण स्वतः पाठीमागून गेला. बाळाजीनें पुढें जाऊन संभाजीपासून ठाणीं परत घेण्याचा सपाटा चालविला होता. शिवाय इंग्रज चिमाजीआप्पाच्या बोलावण्यावरून मानाजीस समुद्रावरून मदत करीत होते. यामुळें लवकरच संभाजी वठणीस येऊन सुवर्णदुर्गास पळून गेला. एके दिवशीं चिमाजीआप्पा व बाळाजीनाना हे दोघे रेवदंडा घेण्याचा विचार करीत बसले होते. इतक्यांत बाजीरावाच्या मृत्यूची दुःखकारक बातमी त्यांस समजली. बाजीराव

शके१६६२ वैशाख शुद्ध १३ या दिवशीं (२५।४।१७४०) नर्मदातीरीं परागण रावेर मौजे कलमडें येथें मृत्यु पावला. बाजीराव अत्यंत शूर व महत्त्वाकांक्षी होता. "मूळच उपटलें कीं खांद्या आपोआप खालीं येतील" हा त्याच्या कार्याचा बीजमंत्र होता. त्याचा सर्व जन्म स्वाऱ्यांत गेला. प्रतिनिधि व दाभाडे हे घरचे प्रतिपक्षी व निजाम आणि उत्तरेकडील सरदार हे उघड शत्रु यांशीं तो सारखा झगडला, व त्यानें त्या सर्वांवर चांगलाच वचक बसविला. परंतु त्याचें कार्य पूर्ण होण्यापूर्वीच तो वारला व त्याच्या वडील पुत्रावर कार्याचा प्रचंड भार एकदम येऊन पडला !! सर्व मुख्य मुख्य मराठे सरदार स्वतंत्र ठिकाणीं वाडे करून राहूं लागले. त्याप्रमाणें बाजीरावानें शके १६५१ त पुण्यास 'शनिवारचा वाडा' बांधून तें आपलें मुख्य वस्तीचें ठिकाण केलें. यानंतर पेशवे पुण्यासच राहूं लागले. वाड्याभोंवतीं कोट बांधण्याची शाहूनें मनाई केली. पुढें शाहूच्या मृत्यूनंतर बाळाजी बाजीरावानें शके १६७७त शनिवार-वाड्यास मजबूत दगडी कोट बांधिला. तो अजून आहे. त्याला नऊ बुरूज, तीन मोठे दरवाजे व दोन दिंड्या आहेत. मुख्य दरवाजा उत्तराभिमुख असून दिल्ल्ली-दरवाजा हें त्याचें नांव आहे. त्या काळच्या बहुतेक सर्व मराठे सरदारांच्या वाड्यांचे मुख्य दरवाजे उत्तराभिमुख असत व त्यांना 'दिल्ली-दरवाजा' असें नांव असे. त्यावरून मराठ्यांचें दिल्ल्ली पादाक्रान्त करण्याचें ध्येय चांगलें व्यक्त होतें.

---

५२. बाळाजी बाजीरावास पेशवाई कशी मिळाली ?

—:०:—

बाजीरावास तिघे मुलगे होते. पहिला बाळाजी ऊर्फ नानासाहेब. मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें बाजीराव मृत्यु पावला तेव्हां बाळाजी

कोंकणांत होता. दुसरा रघुनाथ व तिसरा जनार्दन; हे दोघेही लहानच होते. आणखी त्याला मस्तानीपासून झालेला समशेरबहादर नांवाचा एक दासीपुत्र होता. बाजीरावाच्या मृत्युसमयीं त्याचा वडील मुलगा बाळाजी एकवीस वर्षांचा असून मोहिमांवर जाऊं लागला होता. बाजीरावाच्या मृत्यूनंतर चिमाजीआप्पा बाळाजीस घेऊन साताऱ्यास गेला. तेथें आषाढ शुद्ध १२ शके १६६२ बुधवारीं म्हणजे बाजीरावाच्या मृत्यूनंतर सुमारें दोन महिन्यांनीं पेशवाईचीं वस्त्रें शाहूमहाराजांकडून बाळाजीस मिळालीं. परंतु तीं मिळण्याच्या अगोदर बरेंच मोठें विघ्न उत्पन्न झालें होतें, व कांहीं दिवस बाळाजीस पेशवाई मिळते कीं नाहीं याचा संशय वाटूं लागला होता. हें विघ्न कोणीं आणलें व तें कशा स्वरूपाचें होतें, याविषयीं या गोष्टींत माहिती करून घेऊं.

२. रघूजी भोंसले या मराठी सरदाराचें नांव पूर्वी एकदां आलें आहे. परसोजी भोंसले हा राजारामाच्या कारकीर्दींत वऱ्हाडांत चौथाई वसूल करीत असे. शाहू गादीवर आल्यावर दोन तीन वर्षांनीं तो वारला. त्याच्यामागून त्याचा मुलगा कान्होजी भोंसले ह्यास शाहूनें सेनासाहेबसुभा हें पद दिलें व वऱ्हाडचा अम्मल सांगितला. त्याला पुष्कळ दिवस पुत्र नव्हता, म्हणून त्यानें आपल्या भावाचा मुलगा रघूजी यास आपल्याजवळ ठेविलें व त्यावर स्वतःच्या मुलाप्रमाणें तो प्रेम करूं लागला. पण पुढें कान्होजीस मुलगा झाला, तेव्हां रघूजीवरचें त्याचें प्रेम उडालें व त्यानें त्यास दूर केलें. चुलत्यानें काढून लावल्यावर रघूजी देवगड व एलिचपूर येथील मुसलमान नबाबांपाशीं कांहीं दिवस होता. तेथून तो साताऱ्यास गेला. तेथें तो शाहूकडे जात असे. एके दिवशीं शाहू शिकारीकरितां रानांत गेला होता. रघूजी बरोबर होताच. शाहू जंगलांत पालखींतून उतरून

शिकारीचा तमाशा पहात होता; इतक्यांत एक मातबर वाघ झाडींतून निघून समोरून शाहूच्या अंगावर चालून आला. तो नजीक येऊन झेंप टाकणार इतक्यांत रघूजी जवळ होता त्यानें जलदी करून तरवारीनें वाघ मारला व शाहूचा प्राण वांचविला. यामुळें पुढें शाहूची रघूजीवर फारच मर्जी बसली. रघूजीचा उदय होण्यास या वेळीं आणखी एक मोठें कारण झालें. त्याचा चुलता कान्होजी हा वऱ्हाडांत जुलूम करूं लागला व शाहूशींही ताठ्यानें वागूं लागला. शाहूला त्याचा राग आला व बरोबर फौज देऊन रघूजीस त्यानें चुलत्याचें पारिपत्य करण्यास पाठविलें. तेव्हां रघूजी चुलत्यावर चाल करून गेला व त्यास पकडून घेऊन आला. शाहूनें त्यास बंदींत ठेविलें व रघूजीस सेनासाहेबसुभा या पदाचीं वस्त्रें देऊन वऱ्हाडचा अम्मल सांगितला. हें वर्तमान शके १६५२ (सन १७३०) त घडलें. एव्हांपासून रघूजी वऱ्हाडचा अम्मल करूं लागला. कोन्हेर राम कोल्हटकर व भास्कर राम कोल्हटकर या दोघां बंधूंचा रघूजीशीं स्नेह होता. रघूजी भोंसले याचें घराणें व कोल्हटकर यांचा पूर्वीपासून घरोबा होता. तेव्हां शाहूनें कोन्हेर रामास रघूजीच्या मुजुमदारीचें काम दिलें. पुढें भास्कर राम रघूजीचा सेनापति झाला. या दोघां कोल्हटकर बंधूंनीं नागपूरप्रांतीं मराठी राज्याची उत्कृष्ट कामगिरी बजाविली व चांगला लौकिक मिळविला.

३. रघूजी भोंसले जात्या शूर, कर्तृत्ववान्, व महत्त्वाकांक्षी होता. बाजीराव दिल्लीपर्यंत स्वाऱ्या करीत होता, हें पाहून तर रघूजाची महत्त्वाकांक्षा विशेष जागृत झाली व आपणही वऱ्हाडाबाहेर स्वाऱ्या कराव्या असें त्यास वाटूं लागलें. ह्यावरून त्यानें उत्तरेस अलाहाबादेपर्यंत व पूर्वेस कटकपर्यंत अशा दोन स्वाऱ्या केल्या. हें कृत्य धाडसाचें होतें खरें, परंतु त्यानें आपण होऊन, पेशव्यास किंवा शाहूस न विचारतां केलें असल्यामुळें हें त्याचें करणें मराठ्यां-

च्या एकीस बाधक होतें.त्यावर बाजीराव रघूजीस कसें शासन करणार होता व पुढें त्यानें रघूजीस कर्नाटकांत कसें पाठविलें,हें मागें आलेंच आहे. कर्नाटकांत रघूजीबरोबर पन्नास हजार फौज होती. त्यानें कर्नाटकाचा नबाब दोस्तअली याजवर दमलचेरी घाटाजवळ एकदम छापा घातला व त्यास ठार केलें (२० मे १७४०). मग मराठी सैन्यानें सर्व कर्नाटकभर खंडणी घेण्याचा सपाटा चालविला. शेवटीं दोस्तअलीचा मुलगा सफदरअली यानें मराठ्यांस मोठी खंडणी देण्याचें कबूल केलें; व त्रिचनापल्लीस वेढा घालून तेथील अधिकारी चंदासाहेब यास एकडण्याविषयीं फूस दिली. तेव्हां मराठ्यांनीं त्रिचनापल्ली घेण्याचें ठरविलें. पण पावसाळा सुरू झाल्यामुळें ती मोहीम पावसाळा संपल्यावर करण्याचें रघूजीनें ठरविलें व महाराष्ट्राकडे दोनशेंपन्नास मैल परत येऊन शिवगंगेच्या कांठीं त्यानें छावणी दिली. इतक्यांत त्याला बाजीरावाच्या मृत्यूची हकीकत समजली.

४. रघूजीचे मनांत पेशव्यांविषयीं मत्सर उत्पन्न झाला होता. बाजीरावानें त्याच्याशीं समेट करून त्यास कर्नाटकांत पाठविलें खरें, पण तेवढ्यानें त्याचें मन पेशव्याविषयीं निर्मळ झालें होतें असें मात्र नाहीं. त्याला बाळाजीचाही पराक्रम माहीत होता. त्यानें पाहिलें कीं, यास पेशवाई मिळाली कीं मग आपल्याला निरनिराळ्या प्रांतांवर स्वाऱ्या करावयास कसच्या मिळतात ? दर वेळेस पेशवे आपल्या आड आल्याशिवाय राहणार नाहींत. यासाठीं बाळाजीस पेशवाईच मिळूं देऊं नये व एखादा आपल्या मुठींतला क्षुल्लक माणूस पेशवा करावा, असा त्यानें बेत केला. त्याच्याबरोबर स्वारींत बाबूजी नाईक बारामतीकर (महादेव सदाशिव जोशी) हा होता. तो मोठा श्रीमान् सावकार होता; खुद्द पेशव्यांनींही नाइकापासून पुष्कळ कर्ज काढलें होतें. रघूजीनें नाइकासच हातीं धरण्याचा निश्चय केला; व बाबूजी नाइकास बरोबर घेऊन त्याला पेशवाई मिळवून देण्याकरितां रघूजी

मोठ्या तांतडीनें साताऱ्यास आला. एकदां बाबूजी नाईक पेशवा झाला कीं, आपणास सर्व मुलुखांत वाटेल तसा धिंगाणा घालण्यास सांपडेल व साताऱ्याचा छत्रपति आपण आपल्या हातांतील बाहुलें करून टाकूं,अशी रघूजीच्या विचारांची मजल होती. त्यानें साताऱ्यास आल्याबरोबर प्रतिनिधीस आपल्या बाजूस ओढण्याचा प्रयत्न केला; परंतु प्रतिनिधीस जरी बाळाजीबद्दल प्रेम नव्हतें, तरी तो रघूजीस अनुकूल होईना. रघूजीनें शाहूपाशीं आपल्या वजनाचा उपयोग केलाच. शिवाय नाइकाकडून फार मोठा नजराणा देववितों म्हणून बोलणें लाविलें. पण शाहू त्याच्या म्हणण्यास कबूल होईना. बाजीरावाचा पराक्रम, स्वामिनिष्ठा व आपण त्यास दिलेलीं वचनें शाहू विसरला नव्हता. त्यानें बरेच आढेवेढे घेतले. तरी रघूजीचा प्रयत्न चाललाच होता.

५. इतक्यांत बाळाजी व चिमाजी साताऱ्यास येऊन पोंचले. मग चिमाजीआप्पाच्या वजनानें शाहूनें बाळाजीस पेशवाईचीं वस्त्रें दिलीं (आषाढ शु।।१२शके १६६२;२५।६।१७४०). तेव्हां बाबूजी नाइकाची अगदीं निराशा झाली. सूड घेण्याच्या बुद्धीनें त्यानें बाळाजीस ' आमचे पैसे परत द्या ' असें निकडीचें बोलणें लावून गांजण्यास सुरवात केली. बाळाजीस पेशवाई मिळते न मिळते तोंच बाबूजी कर्जासाठीं धरणें घेऊन बसला. बाळाजी अगदीं पेंचांत आला. पण त्याचा कारभारी महादाजीपंत पुरंदरे यानें ' पेशव्यांचें कर्ज मजकडे लागलें, मी तें देतों,' अशी हमी घेतली. येणेंप्रमाणें अगदीं पहिल्या संकटांतून महादाजीपंतानें बाळाजीस सोडविलें. हे त्याचे उपकार बाळाजी जन्मभर विसरला नाहीं.

६. साताऱ्याहून रघूजी कर्नाटकांत परत गेला. पुढें पावसाळा संपल्यावर त्रिचनापल्लीस वेढा घालून तें बळकट व श्रीमंत स्थळ त्यानें सर केलें (२१ मार्च १७४१), व तेथील मुसलमान अधि-

कारी चंदासाहेब यास कैद करून साताऱ्यास आणिलें. चंदासाहेब पुढें सात वर्षें साताऱ्यास कैदेंत होता. या त्रिचनापल्ली येथील विजयानें मराठ्यांची मोठी कीर्ति झाली व कर्नाटकांत त्यांचा चांगला दरारा बसला. गुत्तीचा मुरारराव घोरपडे यानें वेढ्याच्या कामीं मोठा पराक्रम गाजविला होता, तेव्हां रघूजीनें त्रिचनापल्लीची व्यवस्था त्याजकडेच सोंपविली. त्रिचनापल्ली येथील मुसलमानी अंमल उठल्यामुळें तंजावरच्या राजास स्वस्थता प्राप्त झाली व त्यामुळें शाहूस संतोष झाला. पण मराठ्यांचा अंमल पूर्व–कर्नाटकांत फार काळ टिकला नाहीं. सन १७४३त निजामुल्मुल्क जंगी फौजिसह कर्नाटकांत उतरला, त्यानें त्रिचनापल्ली मुरारराबापासून घेतली व त्यास परत गुत्तीस पाठवून दिलें;नंतर कर्नाटक प्रांताच्या व्यवस्थेसाठीं आपला हस्तक अन्वरुद्दीन याची अर्काट येथें स्थापना करून निजामुल्मुल्क गोवळकोंड्यास परत गेला.

---

५३. माळव्याची सनद.

(शके १६६५; सन १७४३).

निजामुल्मुल्कानें भोपाळच्या लढाईनंतर बाजीरावाशीं तह केला होता. त्यांत माळव्याची सनद बादशहापासून मराठ्यांस देवावितों, असें कबूल केलें होतें; पण पुढील गडबडींत पेशव्यास माळव्याची सनद मिळाली नाहीं. बाळाजी बाजीरावानें दिल्लीच्या बादशहास जयसिंग व निजामुल्मुल्क यांच्यातर्फे पुष्कळ पत्रें पाठविलीं. त्यावरून बादशहानें पंधरा लाख रुपये पेशव्यास दिले. पण माळव्याची कायमची सनद करून देण्यासंबंधानें कांहींच उत्तर

पाठविलें नाहीं. तेव्हां बाळाजी व चिमाजीआप्पा या दोघांनीं आपलीं नांवें घालून एक पत्र तयार केलें. त्यांत त्यांनीं बादशहास 'आम्हांस माळव्याची सनद द्या' असें लिहिलें. " सनद मिळाल्यास आम्ही दोघेही तुम्हांस योग्य मान देऊं. मराठे सरदारांपासून प्रांतास त्रास होऊं देणार नाहीं व बादशहाच्या तैनातीस पांचशें स्वार लावून देऊं. बंडखोर जमीनदारांचें पारिपत्य करण्यास चार हजार सैन्य माळव्यांत सतत ठेवूं व त्या प्रांतीं अगोदरपासून चालत आलेल्या देणग्या परत घेणार नाहीं." या सर्व अटी आपणांस मान्य आहेत, असेंही त्यांनीं पत्रांत लिहिलें. या पत्राचें बादशहाकडून कांहींच उत्तर आलें नाहीं. पुढें लवकरच चिमाजीआप्पा वारला. त्याला सदाशिवरावभाऊ म्हणून अकरा वर्षांचा मुलगा होता. चिमाजीच्या मृत्यूनें बाळाजीचें अत्यंत नुकसान झालें. इतक्यांत निजामुल्मुल्क आपला मुलगा नासिरजंग याचें बंड मोडण्याकरितां दक्षिणेंत येत आहे अशी बातमी आली. लागलीच बाळाजीनें पूर्णा नदीचे कांठीं एदलाबाद येथें त्याची भेट घेतली (माघ शु. १शके १६६२). तींत त्यानें निजामुल्मुल्कास खूष केलें व त्याच्या मुलाचें बंड मोडण्यास मराठे स्वारांचें एक पथक दिलें.या वेळीं माळव्याच्या सनदेसंबंधीं भोपाळच्या लढाईनंतर आपण दिलेलें वचन पार पाडण्याविषयीं निजाम स्पष्ट कांहींच बोलला नाहीं. तेव्हां स्वसामर्थ्यानें आपला अंमल बसविण्याचें धोरण पुढें चालविण्याकरितां बाळाजी माळव्यांत गेला. त्या प्रांतीं त्यानें मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, पिलाजी जाधव इत्यादि सरदारांच्या हस्तें ठिकठिकाणीं आपला अंमल बसविला. नंतर धवलपूर येथें सवाईजयसिंगाची भेट घेऊन बाळाजीनें त्याच्याशीं स्नेह कायम केला, माळव्याची सनद सहा महिन्यांच्या आंत मिळवून देण्याची त्याच्यापासून हमी घेतली (जून १७४१) व पावसाळ्यांत बाळाजी साताऱ्यास परत आला. या सिरोंज-भेलशाच्या स्वारींत बाळाजीस पैशाची चांगली

प्राप्ति झाली, व कर्ज फेडून पुढील उद्योग अंगावर घेण्यास त्याला हुरूप आला.

२. बाळाजी साताऱ्यास गेला तेव्हां शाहूनें पोर्तुगीजांपासून जिंकिलेली सर्व कोंकणपट्टी पेशव्यांस देऊन टाकिली, व नर्मदेच्या उत्तरेकडील मुलुखाची खंडणी वसूल करण्याचीही एक सनद दिली. मग पावसाळा संपल्यावर शके १६६३ च्या मार्गशीर्षांत (डिसेंबर १७४१) बाळाजी उत्तरहिंदुस्थानांत चाल करून गेला व त्यानें गढे व मंडळ हीं दोन ठिकाणें कावीज केलीं. हीं जबलपूर जिल्ह्यांत नर्मदेजवळ आहेत. नागपूरकर रघूजी भोंसल्यापासून नर्मदेच्या उत्तरेचा मुलूख सुरक्षित राखण्यास तीं ताब्यांत घेणें जरूर होतें. पुढें अहिरवाडा, खेचीवाडा, बुंदेलखंड या प्रांतांत आपला जम बसवीत उत्तरेकडेच बाळाजी वर्षअखेर राहिला. पर्जन्यकाळीं परप्रांतीं छावणी केल्याचा हाच त्याचा पहिला प्रसंग होता. या वेळीं रघूजी भोंसल्यानें त्याचे बेत हाणून पाडण्यासाठीं खूप खटपट केली. उन्हाळ्यांत त्याच्या चिथावणीवरून दमाजी गायकवाड व बाबूजी नाईक या दोघांनीं मिळून पश्चिमेकडून माळव्यावर स्वारी केली. परंतु पेशव्यापुढें त्यांचें कांहीं न चालून त्यांस तसेंच परत जावें लागलें. डभईच्या लढाईपासून आनंदराव पवाराशीं बाजीरावाचें बरें नव्हतें. पुढें आनंदराव वारला (इ. स. १७३६). आतां बाळाजीनें आनंदरावाचा मुलगा यशवंतराव पवार याच्याशीं सख्य केलें व त्यास धार येथें कायम करून गायकवाड आदिकरून मराठे सरदारांस माळव्यावर स्वाऱ्या करतां येऊं नयेत अशी तोड काढिली (इ.स.१७४२).

३. बुंदेलखंडांत मराठ्यांचा अंमल बसण्यास खूप त्रास पडला. ही कामगिरी बजावीत असतां अनेक लोकांस अत्यंत श्रम पडले, व कित्येकांच्या धनाची व प्राणाची स्वामिकार्यावर आहुती पडली. मल्हार कृष्ण हा पेशव्यांचा अधिकारी ओर्छे संस्थानांतून खंडणी

वसूल करण्यासाठीं गेला असतां ओर्छेकरानें त्याला व त्याच्या बरोबरच्या मंडळीस दगा देऊन ठार केलें (इ. स. १७४२). तेव्हां ओर्छेकराचें शासन करण्याकरितां नारो शंकर दाणी (राजेबहादर) याची रवानगी झाली.त्यानें ओर्छेकरास कैद करून ओर्छे गांवावरून नांगर फिरविला, व झांशीजवळच्या मुलुखावर मराठ्यांचा अंमल बसविला. तेव्हां झांशी हा निराळा सुभा होऊन त्यावर नारो शंकराची नेमणूक झाली.इ.स.१७५६पर्यंत तो सुभा त्याच्याकडे होता. झांशी किल्ल्यास लागून नारो शंकरानें झांशी शहर वसविलें. गंगा व यमुना यांजमधील दुआबांत जाण्याचा हमरस्ता झांशींतून असल्यामुळें लवकरच तेथील व्यापार वाढला व तें शहर सधन बनलें. इ. स. १७५६ नंतर झांशी प्रांतावर अनेक सुभेदार झाले. शेवटीं सन १७७०त रघुनाथ हरि नेवाळकर याच्याकडे झांशीची सुभेदारी कायम होऊन पुढें ती त्याच्याच वंशांत चालली. याच नेवाळकरांपैकीं सुभेदार गंगाधरराव याची पत्नी लक्ष्मीबाई,+ प्रसिद्ध झांशीची राणी, हिनें सन १८५७ च्या धामधुमींत अतुल पराक्रम गाजवून आपलें नांव इतिहासांत अजरामर करून ठेविलें.

४ माळव्याच्या सनदेचें प्रकरण बराच वेळ भिजत पडलें होतें. तें निकालास लागण्याचा लवकरच योग आला. या वेळीं बंगालचा सुभेदार अलिवर्दीखान या नांवाचा होता. तो पहिल्यानें अगदीं क्षुल्लक माणूस होता. पण त्यानें आपल्या धन्याविरुद्ध बंड करून बंगाल सुभा मिळविला. अलिवर्दीखानानें मागील सुभेदाराचे सर्व दागिने जप्त करून त्याचा एक मौल्यवान् नजराणा दिल्लीच्या बादशहास पाठविला; त्यावरून बादशहानें अलिवर्दीखानास 'बंगालचा सुभेदार' म्हणून मान्य केलें (सन १७४१), बंगालचा सुभेदार

+ ही मोरोपंत तांबे याची कन्या असून तिचें माहेरचें नांव मनुबाई होतें. मोरोपंत ब्रह्मावर्तास बाजीराव पेशव्याच्या आश्रयास होता.

होतांच त्यानें ओरिसा प्रांतावर स्वारी केली व तेथील अधिकारी मुर्शिदकुलीखान यास हांकून दिलें. लागलीच मुर्शिदकुलीचा दिवाण मीरहबीब अलिवर्दीखानास शरण गेला. तेव्हां अलिवर्दीनें त्यास नोकरीस ठेविलें. मीरहबीब हा जरी अलिवर्दीखानाच्या नोकरीस राहिला तरी अलिवर्दीचा नाश करण्यासाठीं त्याचा एकसारखा प्रयत्न चालला होता. रघूजी भोंसले अजून कर्नाटकची स्वारी संपवून आला नव्हता. त्यानें पाठीमागें नागपुरास भास्कर राम कोल्हटकर हा सेनापति ठेविला होता. अलिवर्दीखानाची जेव्हां पहिली स्वारी ओरिसा प्रांतावर झाली, त्याच वेळीं मीरहबीबनें भास्करपंतास आपले मदतीस बोलाविलें होतें. पण भास्करपंतास आपल्या मुखत्यारीवर मदत करितां येईना. म्हणून त्यानें रघूजीस परवानगी देण्याविषयीं लिहिलें. इतक्यांत अलिवर्दीखानानें ओरिसा जिंकून देखील टाकिला. पुढें शके १६६३ (सन १७४२) च्या शेवटीं कटक (ओरिसा) प्रांतांत बंड झालें; तेव्हां अलिवर्दीखान तें मोडण्याकरितां सैन्यासह चालून गेला. मग भास्करपंतानें दहा हजार घोडेस्वार बरोबर घेऊन एकदम बहार प्रांतावर हल्ला केला, व मराठे चहूंकडून खंडणी वसूल करूं लागले. अलिवर्दीखान बंड मोडून शके १६६४च्या आरंभीं परत फिरला. तों वाटेंतच त्यानें मराठे बहार प्रांतांत खंडणी घेत आहेत असें ऐकिलें. त्याचें सैन्य तीन चार हजार घोडेस्वार व चार हजार पायदळ होतें, तरी त्यानें मराठ्यांवर हल्ला करण्याचा निश्चय केला. तो मराठ्यांवर चालून गेला. प्रथम मराठ्यांनीं त्याला तसेंच अंगावर येऊं दिलें, व मग चहूं बाजूंनीं त्यास घेरून त्याची दाणावैरण बंद केली. त्यामुळें अलिवर्दीच्या सैन्याचे फार हाल होऊं लागले. पुष्कळ लोक त्यास सोडून गेले. बरेच ठार झाले. शेवटीं राहिलेल्या तीन हजार लोकांनिशीं अलिवर्दीखान मराठ्यांचा मार खात खात तसाच मागें सरत कटक्यास आला. पहिल्याच हल्ल्यांत मीरहबीब मराठ्यांच्या

हातीं सांपडला. त्यानें बंगाल्यांतील सर्व बारीक माहिती देऊन मराठ्यांचा अतोनात फायदा करून देण्याचें काम अंगावर घेतलें. त्यामुळें भास्करपंताचा तो अगदीं दोस्त झाला. त्यानें पावसाळ्यांत बंगाल्यांतच राहण्याचा भास्करपंतास फार आग्रह केला. पण भास्करपंतास तें पटेना; तेव्हां सैन्याचें एक पथक आपले हातीं घेऊन मीरहबीबनें मुर्शिदाबादेवर चाल केली. तेथें त्यानें आपल्या भावास सोडविलें व जगत्‌राज अमरचंद या गबर सावकाराचें घर लुटून पंचवीस लक्ष रुपये मराठ्यांस मिळवून दिले, व मग तो भास्करपंतास येऊन मिळाला. मीरहबिबाचा हा पराक्रम पाहून भास्करपंतानें पावसाळा बंगाल्यांत काढण्याचें कबूल केलें. नंतर भास्करपंत परतला व हुगळी शहरावर चाल करून तें त्यानें घेतलें. मग कटवा व हुगळी हीं दोन ठिकाणें आपल्या तळाचीं मुख्य स्थानें करून मिदनापूर, बरद्वान, बालासोर इत्यादि आसपासच्या प्रांतांतून मराठ्यांनीं खूप खंडणी वसूल केली. मराठे मुर्शिदाबाद जिल्ह्यांत शिरले असते;पण भागिरथीस फार पूर आल्यामुळें त्यांस ती ओलांडतां येईना; व त्यामुळें मुर्शिदाबादेवर मराठ्यांची स्वारी झाली नाहीं.

५. याच वेळीं दिल्लीच्या बादशहाकडून अलिवर्दीखानाकडे प्रांताची खंडणी मागण्यास एक माणूस आला. अलिवर्दीखानानें बादशहास सांगून पाठविलें कीं, " या वेळीं खंडणी कसची मागतां? या भास्करपंताच्या धाडीपासून माझें रक्षण करण्यास अगोदर सैन्य पाठवा व माझें रक्षण करा; मग मी खंडणी देईन. " याच वेळीं त्यानें बाळाजीस नागपूरकराचे मुलुखावर स्वारी करण्यास विनंती केली व त्याकरितां बरीच मोठी रक्कम पाठविली. पण त्याचा निरोप पेशव्यास पोहोंचलाच नाहीं. तथापि अलिवर्दीखान स्वतः स्वस्थ बसला नाहीं. त्यानें मराठ्यांच्या फौजेवर हल्ला करण्याचा बेत केला, आणि भागिरथी व अजी या दोन नद्यांस पूर आले होते म्हणून पलीकडे जाण्यास

त्यानें नावांचे पूल बांधिले. मग सैन्य घेऊन तो पलीकडे जाऊं लागला. तेव्हां अजी नदीवर बांधलेला पूल तुटला व हजार बाराशें माणसें मेलीं. पण अलिवर्दीखानानें धीर न सोडतां मराठ्यांच्या लष्करावर हल्ला केला. त्या वेळीं आश्विन महिन्याचा आरंभ होता. नवरात्रांत बंगालमध्यें दुर्गापूजेचा मोठा उत्सव होतो. अलिवर्दीखान आतां हल्ला करून येईल अशी भास्करपंताची कल्पना नव्हती. त्यामुळें त्यानें आपल्या सैन्यांत दुर्गेचा मोठा उत्सव आरंभिला होता आणि सर्व मराठे भजनपूजनांत व आनंदांत दंग होते. अशा स्थितींत अचानक हल्ला आल्यामुळें मराठे घाबरून पळून गेले व भास्करपंत निभावून कसा तरी नागपुरास आला. या वेळीं रघूजीही कर्नाटकांतून आला होता. हा झालेला पराभव पाहून रघूजीस अलिवर्दीखानाची चीड आली व त्यानें बहारवर हल्ला करण्याच्या उद्देशानें कूच केलें.

६. इतक्यांत दिल्लीच्या बादशहानें अलिवर्दीखानास साहाय्य करण्याचें ठरविलें. त्यानें अयोध्येचा नबाब सफदरजंग यास भास्करपंतास बंगालमधून हांकून देण्याचा हुकूम केला, व बाळाजीलाही अलिवर्दीखानास मदत करण्यास लिहिलें. हें काम केल्यास बहारच्या (अजिमाबाद) खंडाबद्दलचा पैसा अलिवर्दीखानाकडून यावयाचा होता तो वसूल करण्याची परवानगी बाहशहानें बाळाजीस दिली व माळव्याची सनदही देण्याचें कबूल केलें. तेव्हां माळव्याची सनद मिळणार असें पाहतांच बाळाजीनें घाई करून अलिवर्दीखानास मदत करण्यास मुर्शिदाबादेकडे कूच केल. बाळाजी अलिवर्दीखानाच्या मदतीस आला असें पाहतांच रघूजी बचावासाठीं डोंगरांत पळूं लागला. नंतर अलिवर्दीखान त्याच्यामागें लागला. परंतु या लोकांचे हातीं रघूजी सांपडणार नाहीं अशी अटकळ करून बाळाजीनें स्वतः आडवांटनें शिरून मोंगल येण्यापूर्वी रघूजीस गांठलें

व एक दोन लढायांत त्याचा अगदीं मोड करून टाकला. असा मोड झाल्यावर रघूजी नागपुरास पळून गेला व माळव्याची सनद मिळविण्याकरितां बाळाजी माळव्यांत आला. बाळाजीनें बादशहाचें काम व्यवस्थित बजाविलें होतें; तेव्हां माळव्याची सनद देणें महंमदशहास भाग पडलें. बादशाहीचा डौल राखण्याकरितां एक पोकळ युक्ति जयसिंग व निजामुल्मुल्क यांनीं काढून ती महंमदशहास सुचविली. बादशहाचा मुलगा अहमद याचे कारभारी म्हणून पेशव्यांस माळव्याची सनद शके १६६५च्या आषाढ वद्य ९ स (४।७।१७४३) देण्यांत आली. तींत मागें चिमाजीआप्पा व बाळाजी यांनीं मिळून बादशहास जें पत्र पाठविलें होतें त्यांतील सर्व गोष्टी करण्याचें बाळाजीनें कबूल केलें. बाळाजी सनदेंतलीं कलमें मोडणार नाहीं अशी हमी जयपूरचा राजा सवाई जयसिंग यानें घेतली. शिवाय मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे व पिलाजी जाधव यांनीं बादशहास असें लिहून दिलें कीं, बाळाजी बाजीराव हे तहाच्या कलमाप्रमाणें चालतील; चालले नाहींत तर आपण त्यांची नोकरी सोडून देऊं.

---

५४ आधीं एकी, मग मुलूखगिरी.

—:०:—

बाळाजी सनद मिळविल्यावर आपल्या मुलुखाचा हिशेब दाखविण्याकरितां साताऱ्यास शाहूकडे गेला. रघूजी मोठा धोरणी होता. आपला पराभव झाल्यावर त्यानें पेशव्याकडे एक वकील पाठविला व 'तुम्हीं जी बागणूक केली ती मराठ्यांच्या राज्यप्रसारास अत्यंत उपयोगीं आहे व म्हणून माझ्या मनांत तुम्हांविषयीं कांहीं किंतु राहिला नाहीं' असा निरोप त्याजबरोबर कळविला. निरोप ऐकून बाळाजीस

समाधान झालें. पण इतक्यांत रघूजी मोठी फौज घेऊन साताऱ्याकडे चाल करून येत आहे असें त्यास कळलें. व दमाजी गायकवाड सैन्यासह साताऱ्यास येत आहे असेंही समजलें. श्रीपतराव प्रतिनिधि आजारीच असे. पण त्याचा मुतालिक यमाजी शिवदेव चावरे मोठा कर्तबगार व हुशार असून दमाजी गायकवाडाच्या पक्षाचा होता. हे सर्व साताऱ्यास जुळले म्हणजे आपणाविरुद्ध एक मोठा तट होईल असें बाळाजीस वाटलें व हे एक झाल्यावर दगा करून मराठी राज्यांत घोटाळा उडवितील कीं काय, अशी बाळाजीस भीति पडली. हा कट फोडण्यास बाळाजीनें एक युक्ति काढिली. रघूजीस त्यानें कटाबाहेर काढलें. शाहूनें उत्तरेकडील सर्व मुलुखांत खंडणी वसूल करण्याचा हक्क बाळाजीस देऊन टाकला होता. बाळाजीनें त्यापैकीं लखनौ, पाटणा, दक्षिण बंगाल व बहार या प्रांतांची खंडणी वसूल करण्याचा हक्क शाहूकडून स्वसंतोषानें रघूजीस देवविला. शिवाय कटक प्रांतापर्यंत खंडणीचा हक्क रघूजीस मिळाला. याच वेळेस शाहूनें बाळाजीस एक सनद करून दिली. तींत आजपर्यंत चालत आलेला मोकासा व जहागीर, कोंकण व माळवा प्रांतांचा अम्मल, अलाहाबाद, आग्रा व अजमीर येथील खंडणीची वांटणी, पाटणा जिल्ह्यांतील तीन तालुके, अर्काट प्रांताच्या वसुलांतील वीस हजार रुपये व रघूजीच्या मुलुखांतील कांहीं गांवें इतकें बाळाजीस मिळालें. दाभाड्याकडे मुख्य सरकारची बरीच बाकी राहिली होती. तीसंबंधानें दमाजी गायकवाडाशीं कांहीं बोलणें झालें नाहीं. पण त्यानें माळवा प्रांतावर जी स्वारी केली होती, त्या वेळीं नेलेली खंडणी मात्र त्यानें पेशव्यास परत करावी असें ठरलें.

२. येणेंप्रमाणें मुलूख देऊन बाळाजीनें रघूजीस खूष केलें. तेव्हां रघूजीस समाधान वाटलें, व आपला पराक्रम दाखविण्याचा त्यास हुरूप आला. बाळाजीसही आपले उत्तर हिंदुस्थानांतील उद्योग

जोरानें पुढें चालविण्यास सवड मिळाली. मराठ्यांचा परस्परांतील कलह थांबल्यामुळें बाहेरच्या मुलुखांत त्यांच्या एकसारख्या स्वाऱ्या होऊं लागल्या. शके १६६६चा(इ.स. १७४४) पावसाळा संपतांच बाळाजीनें माळव्यावर चाल केली. लवकरच भेलसें सर होऊन भोपाळचा फैजमहंमदखान याचा निम्मा मुलूख मराठ्यांच्या हस्तगत झाला. पुढें बुंदेलखंडांतील संस्थानिकांपासून प्रांत व खंडणी चोपून घेऊन व नवीन मिळालेल्या मुलुखाची व्यवस्था लावून बाळाजी पावसाळ्यांत देशीं परत आला (शके १६६७). याच सुमारास राणोजी शिंदे सुजालपुराजवळ मृत्यु पावला (१९ जुलै १७४५). त्याच्यामागून शिंद्यांची सरदारी त्याचा वडील मुलगा जयाजी ऊर्फ जयाप्पा याजकडे गेली. राणोजी जेथें वारला त्या स्थळास पुढें राणोगंज असें नांव पडलें.

३. शाहू छत्रपतीला फार कर्ज झालें होतें. तेवढें कसें तरी करून फेडावें असा शाहूनें पेशव्यास तगादा लाविला. तेव्हां स्वामींस (शाहूस) झालेलें कर्ज फेडण्याकरितां उत्तरेकडून शिंदेहोळकरांनीं आपल्याला पैसा पाठवावा अशी बाळाजी सारखी मागणी करूं लागला. द्रव्य मिळविण्याची एक चांगली संधी सन १७४६त आली. जयपूरचा राजा सवाईजयसिंग सन १७४३त वारला. त्याला ईश्वरसिंग व माधवसिंग असे दोघे मुलगे होते. ईश्वरसिंग वडील होता; परंतु माधवसिंग उदेपूरच्या राजकन्येचा पुत्र असल्यामुळें पूर्वीच्या इ. स. १७१० मधील एका ठरावाप्रमाणें तोच गादीचा वारस होता. तथापि जयसिंग हयात असतां उदेपूरचा राणा जगत्सिंग यानें माधवसिंगास आपल्या राज्यापैकीं रामपुरा परगणा जहागीर दिला व त्यानें त्याच्याबदलीं उदेपूरच्या राज्यांत चाकरी करावी असा ठराव केला. पुढें जयसिंग वारल्यावर देखील माधवसिंग जगत्सिंगाजवळ राहिला व ईश्वरसिंगास जयपूरची गादी मिळाली. तीन वर्षें गेल्यावर

जगत्सिंगाच्या मदतीनें माधवसिंगानें जयपूरच्या गादीसाठीं तंटा सुरू केला. प्रथम ईश्वरसिंगानें शिंदे–होळकरांची मदत घेऊन जगत्सिंगाचा पाडाव केला व माधवसिंगास तीन लाखांची जहागीर देऊन स्वस्थ बसावयास लाविलें. बुंदी व कोटा येथील रजपूत राजे माधवसिंगाच्या बाजून लढले. त्यांना तंबी देण्याकरितां जयाप्पा त्यांच्यावर चालून गेला व त्यानें बुंदी-कोटेकरांकडून खूप द्रव्य मिळविलें. येथवर ठीक झालें. पण यापुढें होळकरानें धरसोड आरंभिली. त्यामुळें शिंदे–होळकरांमध्यें बेकीचीं बीजें पेरिलीं गेलीं व मराठ्यांचा उत्तरेकडे दुर्लौकिक झाला. तो प्रकार असाः– जयाप्पास खूप द्रव्य मिळालें हें पाहून मल्हारराव्याच्या तोंडास पाणी सुटलें. आतां माधवसिंगानें होळकराची मदत मागितली व पैशाच्या लोभानें त्यानें ती देण्याचें कबूल केलें. हें मल्हारराव्याचें वर्तन पाहून जयाप्पास अत्यंत राग आला. दोघांनींही एकमेकाविरुद्ध पेशव्याकडे तक्रार केली. पेशवा पैशाच्या अडचणींत होता. तथापि पैसा मिळावा, पण त्याजबरोबर मराठ्यांचा नक्ष व सरदारांची एकी हीं कायम राहिलीं पाहिजेत याची त्याला पक्की जाणीव होती. मल्हारराव अभिमानी व हट्टी आहे, तेव्हां या प्रकरणीं त्याच्या कलाप्रमाणें वागून मराठ्यांनीं आपली एकी राखणें जरूर आहे असें बाळाजीनें शिंद्यास कळविलें. त्याचप्रमाणें एक सुंदर पत्र लिहून शिंदे व होळकर या दोघां सरदारांत एकी असणें किती महत्त्वाचें आहे ही गोष्ट त्यानें जयाप्पाच्या नजरेस आणिली. तें पत्र येणेंप्रमाणेंः–

'तुमचा व मल्हारजी होळकराचा परस्पर पेंच वाढला आहे, म्हणोन वर्तमान बहुतां मुखें ऐकलें जातें. ऐशास आपले घरांत सरदारांत काडीमात्र द्वैतभाव नसावा, हा उत्तम पक्ष आहे. तथापि घर आहे तेथें बोलाचाली आहेच, परंतु परस्पर रुष्टता कोणी बाळगीत नव्हते. सर्वही एकचित्तेंकरून ज्यांत धन्याचें हित व नक्ष तोच मनसुबा करीत गेले. श्रीकृपें व वाडिलांचें पुण्यें करून जें ज्यांणीं

चित्तांत आणिलें तें सिद्धीतें पावत गेलें. यशावह कर्में तुह्मींच संपादिलीं. नक्ष लौकिक म्हणावा तसा लोकोत्तर जाला. पुढेंही तुह्मी स्वामिसेवेस चुकतां असा अर्थ नाहीं. सर्व प्रकारें या दौलतीचे तुह्मी स्तंभच आहां. उचित मनसुबा असेल तो करितां व करालच, संदेह नाहीं. परंतु **घरांत घरभेद सर्वस्वी नसावा**. यामागें तुमचें सांगणें मल्हाररावांनीं केलें; त्यांचा मनोभाव तुह्मीं सिद्धास नेला. म्हणोनच उत्तम शोभा जाहली. एकतत्त्वी फौज. एकदील. कोणाचाही बुद्धिभेद चालला नाहीं. प्रस्तुत तुमची परस्पर रुष्टता याकारितां, या राज्यांत काय, मोंगलाईत काय, उमद्या उमद्यांचे घरीं मनमानें तैशा चर्चा करितात, आमचें कोणास सुख आहे ऐसें नाहीं. परंतु वडिलांचे तपोबलें आमची फौज भारी, सरदार एकदील, मर्द, कर्ते, अस्मानही कडाडलें तरी आपल्या मर्दानगीस, हिंमतीस अंतर करणार नाहींत; व केलें नाहीं. ज्यांच्या मर्दुमकीची व दिलेदारीची तारीफ सर्वही करितात. सांप्रत मल्हारबा इंदुरासच राहून राणाजीच्या भेटीस जाणार, तुह्मी देशास येणार म्हणोन ऐकतों. तर ते तिकडे राहिले, तुह्मी एकटे इकडे आल्यास लोकांत कसें दिसेल ? उमदे लोक चर्चा करितात, आमच्या सरदारांत फूट पाडावी, आपली कारीगिरी चालवावीं हें इच्छितात, तेंच घडूं सकेल. रघूजी भोसलें व बाबूजी नाईक औरंगाबादेस जाऊन नबाब आसफजाची (निजामुल्मुल्क) भेट घेतली. आह्मांकडील विपरीतार्थाच्या गोष्टी सांगतात. नबाब करूं तो सकत नाहीं; परंतु त्याचे मनोरंजकतेसाठीं अनुमोदन देतात गोड बोलतात. रा. स्वामीस (शाहू) कर्ज झालें आहे, तें परिहार झालें पाहिजे, याजकारितां मन मानें तो पैका मागतात, त्यांच्या सांगितल्याप्रमाणें आमच्या वस्तु कबूल करवत नाहीं. यास्तव परम विमनस्कतेच्या गोष्टी घरांत बाहेर बोलतात. येणेंकरून लोकांसही सुखावह वाटोन, मन माने त्या चर्चा करितात. नबाब आसफजाचा विचार दगाबाजीचा. एकास पळ म्हणावें, एकास पाठीस लाग म्हणावें. हा त्याचा विचार तुह्मी जाणतच आहां. त्यास कांहीं चमत्कार दाखवावा, विचारावरी आणावें, येविशींचा विचार करावा. दुसरें राजश्रींच्या कर्जाच्या विचारास तुह्मीं असलें पाहिजे. तुह्मांस येणेंविशीं वारंवार लिहिलें.परंतु अद्याप येणें जालें नाहीं. भेटी होऊन विचार करून आश्विन कार्तिकांत मनसुबा कर्तव्य तो करावा. सारांश तुह्मीं उभयतांनीं यावें, घरचे बाहेरचे मनसुबे उचित दिसतील तैसे तुह्मां सर्वांच्या विचारें करावें, असा विचार आहे. तरी मल्हार-

बांस उत्तम प्रकारें सांगून त्यांस घेऊन येणें. ते इकडे न येण्याचे हरप्रकारें पर्याय लावतील; तथापि बहुतां प्रकारें प्रसन्न करून खासखा घेऊन यावेंच यावें. उभयतां एकजागा जालियावर त्यांच्या चित्तांतील कलुषता दूर करून पूर्ववत्-प्रमाणें तुह्मी ते वर्ता, दरम्यान विकृतभाव नव्हे, ऐसाच विचार देवाच्या दर्ये-करून होईल चिंता नाहीं.×.....

४. पुढें बाळाजी स्वतः शके १७६९च्या मार्गशीर्षांत (डिसेंबर १७४७)उत्तरेकडे गेला व त्यानें जयपूर संस्थानांत नेवाई परगण्यांत मुक्काम केला. ही बाळाजीची उत्तरेकडील चौथी व शेवटची (पुढें पानिपतच्या लढाईच्या वेळीं बाळाजी सिरोंजपर्यंत गेला होता ती स्वारी वगळली असतां) स्वारी होय.तेथें त्यानें शिंदेहोळकरांचें ऐक्य करवून देऊन ईश्वरसिंगाकडून माधवसिंगास चोवीस लक्षांचा मुलूख देवविला. या कामाबद्दल पेशव्यास दहा लाख रुपयांचा नजराणा मिळावा असें ठरलें. पुढें करारापमाणें वागण्याची ईश्वरसिंगानें टाळाटाळ चालविली. तेव्हां मल्हारराव होळकरानें त्याच्यावर स्वारी करून तो करार पुरा करून देण्यास त्यास भाग पाडिलें. नंतर ईश्वरसिंगानें त्रासून जाऊन विष खाऊन जीव दिला व माधवसिंगास जयपूरची गादी मिळाली (सन १७५१). माधवसिंगाकडे उदेपूरच्या राज्यांतील असलेला रामपुरा परगणा त्यानें होळकरानें केलेल्या मदतीबद्दल त्याजकडे लावून दिला, तो अद्यापि इंदूरसंस्थानकडे चालत आहे. येणेंप्रमाणें या जयपूरप्रकरणांत मराठ्यांचा तात्पुरता जय झाला खरा. तथापि या वेळीं शिंदेहोळकरांत दुहीचें बीज पेरिलें गेलें व मराठ्यांचा रजपुतान्यांत दुर्लौकिक झाला. सवाईजयसिंगाशीं बाजीरावाचा उत्तम स्नेह होता. त्यामुळें हिंदुत्वासाठीं रजपूत व मराठे यांनीं मिळून खटपटी चालविल्या व माळवा काबीज करतांना रजपुतांच्या मदतीचा मराठ्यांस मोठा उपयोग

+ मराठी रियासत, मध्यविभाग २, पृष्ठें ७१-७२.

झाला. पण आतां जयपूरप्रकरणानें व पुढेंही द्रव्यसंपादनार्थ मराठ्यांनीं रजपुतांशीं चालविलेल्या लढायांनीं मराठे लोक द्रव्य मिळविण्यासाठीं वचनें मोडून वाटेल त्या पक्षास मिळतात असा रजपुतांचा ग्रह झाला व मराठ्यांविषयीं त्यांची सहानुभूति पार नाहींशी झाली. याचा परिणाम असा झाला कीं पानिपतच्या लढाईच्या वेळीं रजपूत राजे उदासीन राहिले व मराठ्यांचा पानिपतचा पराभव त्यांनीं मजेनें पाहिला.

५. बाबूजी नाइकानें कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील दुआब शाहूपासून सात लक्षांच्या मक्त्यानें घेतला (इ. स. १७४५). परंतु नाइकास प्रांतांतून वसूल करतां येईना. नाइकानें पेशवाई मिळविण्याचा प्रयत्न केल्यापासून बाळाजीच्या मनांत त्याच्याविषयीं वाकडें आलें होतें. नाईक अगदीं कमकुवत आहे असें पाहून बाळाजीनें कर्नाटकाचा वसूल आणण्याकरितां चिमाजीआप्पाचा मुलगा सदाशिवरावभाऊ यास पाठविलें. या स्वारींत सदाशिवरावभाऊबरोबर सखाराम भगवंत बोकील (सवाई माधवरावाच्या वेळचे प्रसिद्ध सखारामबापू) या धोरणी मुत्सद्यास पाठविलें होतें. सदाशिवरावभाऊनें या स्वारींत तुंगभद्रेपर्यंत खंडणी वसूल केली व बहादूरबेंडा हा किल्ला हस्तगत केला. मग सावनूरच्या नबाबाची भेट घेऊन व त्याच्यापासून पंचवीस लक्षांचा मुलूख मिळवून शके १६६९ (सन १७४७) च्या ज्येष्ठांत भाऊ परत आला. बहादूरबेंड्याच्या स्वारीहून परत आल्यावर भाऊस शाहूनें बाळाजीचा मुख्य मदतगार नेमिलें. सदाशिवरावभाऊ मोठा हुषार होता. वासुदेव जोशी व रघुनाथ हरी असे दोन कारकून नेमून तो दप्तरचें काम पाहूं लागला. कांहीं दिवस शांतता होती; तितक्या अवकाशांत बाळाजीनें देशांतील शेतीची सुधारणा केली. त्यामुळें जिकडे तिकडे सुबत्ता दिसूं लागली. पण थोड्याच दिवसांत अशा कांहीं गोष्टी घडून आल्या कीं, त्यामुळे सुधारणेचें काम मागें पडून पुन्हां युद्धाची दंगल सुरू झाली. हें कसें तें पुढें पाहूं.

५५. मराठ्यांची बंगालवर चढाई.

(कटक प्रांताची प्राप्ति.)

१ सन १७४२त रघूजी भोंसले सेनासाहेब सुभा व बाळाजी बाजीराव पेशवे यांजमध्ये वितुष्ट वाढलें; परंतु पुढील सालच्या पावसाळ्यांत शाहूछत्रपतीनें त्या दोघांस साताऱ्यास बोलावून त्यांच्यांतील तंटा मिटाविला व त्या दोघांमध्ये सख्य घडवून आणिलें. यापुढें उत्तर हिंदुस्थानपैकीं लखनौ, बहार, बंगाल, व ओरिसा (कटक) हे प्रांत रघूजीच्या कार्यक्षेत्रांतील होत असें ठरलें व पश्चिमेकडील मुलूख पेशव्याच्या हालचालीस मोकळा राहिला. अशा रीतीनें मराठशाहींतील प्रमुख सरदारांत ऐक्य झाल्यावर स्वाभाविकपणें मराठी साम्राज्याचा जोरानें विस्तार होऊं लागला. बाळाजी बाजीरावानें शिंदेहोळकर आदिकरून सरदारांच्या मदतीनें माळवा, बुंदेलखंड, रजपुताना या मुलुखांत मराठी अंमल कसा चालू केला हें मागील गोष्टींत सांगितलें. आतां आपसांत एकी झाल्यावर रघूजी भोंसल्यास दुप्पट हिंमत चढून त्यानें स्वतः पराक्रम गाजवून व आपल्या हातखालच्या लोकांची मदत घेऊन मराठी राज्याची पूर्वेस कशी वाढ केली हें या प्रकरणांत पाहूं.

२. सन १७४४च्या पावसाळ्यांत रघूजी नागपुरास आला व पूर्वेकडील राज्यविस्ताराचें काम तावडतोब हातीं घेण्याचें ठरवून त्यानें पावसाळा संपतांच भास्कर राम कोल्हटकर या सेनापतीच्या हाताखालीं बीस हजार फौज देऊन त्याची पूर्वबाजूकडे रवानगी केली. भास्करपंत नागपुराहून निघाला तो ओरिसा प्रांतांतून खंडण्या वसूल करीत बहार प्रांतांत शिरला. मराठी फौजेचा हा आक्रम पाहतांच बंगालचा सुभेदार अलिवर्दीखान घाबरून गेला. या वेळीं मराठ्यांच्या जंगी फौजेपुढें आपला सरळपणें निभाव लागावयाचा नाहीं

असें पाहून त्यानें वरकरणी भास्करपंताशीं तहाचें बोलणें लाविलें. मराठी फौजेनें भागिरथीच्या कांठीं कटवा येथें तळ दिला होता. खानानें आपला अफगाण सेनापति मुस्तफाखान व एक हिंदु सरदार जानकीराम यांस भास्करपंताकडे तहाचे बोलणें करण्यासाठीं पाठविलें. अलीभाई नांवाचा एक बाटलेला मुसलमान मराठ्यांकडे होता, त्याच्यामार्फत सलुखाचीं बोलणीं सुरू झालीं. पुढें खासा अलिवर्दीखान कटव्यास मराठी लष्कराजवळ येऊन राहिला. तेथून फळफळावळ व नजराणे पाठवून त्यानें भास्करपंतास अगदीं खूष केलें. नंतर भास्करपंताची आपल्या छावणींत सत्कारपूर्वक भेट घेऊन तह कायम करण्याची अलिवर्दीखानाची फार इच्छा आहे असें मुस्तफाखान म्हणूं लागला. पुढें आपल्या काखेंत एका भरजरी रुमालांत आपण कुराण गुंडाळून आणिलें आहे असें सांगून त्यानें त्या कुराणाला कुर्बान केलें; तेव्हां भास्करपंतादि मंडळीस त्याच्या बोलण्याचा विश्वास पटला, व भास्करपंत अलिवर्दीखानाच्या छावणींत जाऊन त्याची भेट घेण्यास तयार झाला. वास्तविकपणें त्या भरजरी रुमालाच्या आंत मुस्तफानें वींट ठेविली असून कुराण वगैरे त्यांत कांहीं नव्हतें ! अर्थात हें सर्व कपटनाटक होतें. अलिवर्दीखानानें भेटीसाठीं एक भव्य तंबू तयार केला, त्या तंबूपुढें छावणीच्या महाद्वारापर्यंतची सर्व जमीन चादरींनीं आच्छादून त्यांजवर उंची रेशमी गालिचे अंथरले, व छावणीच्या भोंवतीं चोहोंकडे कनाती लावण्याची व्यवस्था केली. इकडून भास्करपंत वीस मराठे सरदार बरोबर घेऊन ठरलेल्या वेळीं भेटीच्या ठिकाणीं गेला. छावणीच्या प्रवेशद्वारापाशीं त्याचें स्वागत करण्यास मुस्तफाखान व जानकीराम हे उभे होते.तंबूच्या दाराशीं आंत खासा अलिवर्दीखान उभा होता. मंडळी आंत शिरतांच मुस्तफाखान व जानकीराम बाहेरच्या बाहेर निघून गेले. पहिलीं प्रश्नोत्तरें होतात तों अलिवर्दीनें विश्वासघात करून एकदम ' काफरकू मारो ' असा गिल्ला केला.

त्याबरोबर क्रूर पठाणांनीं तेथल्या तेथें सर्व मराठे सरदारांची निर्दयपणानें कत्तल केली. तंबूभोंवतींच्या कनाती खालीं सोडून बळकट केल्या होत्या, त्यामुळें कोणाही मराठा सरदारास बाहेर पडून आपला जीव वांचवितां आला नाहीं. रघूजी गायकवाड नांवाचा एक सरदार मागें तळावर राहिला होता, तो तेवढा वांचला. लागलीच मराठी फौजेचा धीर सुटून ती कशीबशी नागपुरास परत आली (इ. स. १७४४ ऑक्टोबर, नोहेंबर).

३. भास्करपंतासारखा मोहरा अकस्मात् गमावला हें कळतांच रघूजी भोंसल्यास अत्यंत दुःख झालें व नीच अलिवर्दीचा खूप राग आला. त्यानें या भयंकर कत्तलीबद्दल खानाचा सूड घेण्याची तयारी चालविली. इतक्यांत अलिवर्दीवर चालून जाण्यास रघूजीस उत्तम संधी प्राप्त झाली. याच वेळीं अलिवर्दीखानाचा सेनापति मुस्तफाखान यानें आपल्या धन्याविरुद्ध बंड उभारिलें. त्याची बातमी हेरांकडून रघूजीस कळली. लागलीच तो आपला मुलगा जानोजी व मीरहबीब यांजसह ओरिसा प्रांतावर चालून गेला. नंतर त्यानें कटक येथें तळ देऊन भास्करपंत व इतर सरदार यांच्या मुंडकटाईबद्दल दंड म्हणून अलिवर्दीखानापाशीं तीन कोट रुपयांची मागणी केली. लवकरच रघूजीनें ओरिसा मिदनापूर, बरद्वान, हुगळी येवढा मुलूख हस्तगत केला. अलिवर्दीखान दंगा मोडण्यांत गुंतला होता. तेव्हां त्यानें ' मी लवकरच तुम्हीं मागितलेली रक्कम भरतों ' असें रघूजीस कळविलें. पुढें दोन महिन्यांत अफगाणांचें बंड मोडून अलिवर्दीखानानें मुस्तफाखानास ठार केलें व मग तो निश्चित झाला. आतां त्यानें रघूजीशीं उद्दामपणाचें वर्तन आरंभिलें. त्याबरोबर रघूजीनें आपल्या हातीं आलेल्या मुलुखांत धुमाकूळ उडवून अगदीं पावसाळ्याच्या तोंडीं बहारवर चाल केली व बंकापुरापर्यंत दौड मारिली. तेव्हां अलिवर्दीखान निराशेनें अगदीं बेफाम झाला व मराठ्यांवर अचानक चाल करून आला. नंतर

नवाब व मराठे यांजमध्यें कटवा येथें लढाई जुंपली. परंतु याच सुमारास नागपूरप्रांतीं गोंड राजांनीं बंडें आरंभिल्यामुळें स्वारीचें काम अर्धवट टाकून रघूजीस नागपुरकडे परत जावें लागलें (इ. स. १७४५चा पावसाळा). पुढें तीन वर्षेपर्यंत नागपूर प्रांतांतील बंडें मोडण्यांत त्याचा काळ गेला व बंगालकडे मोर्चा वळविण्यास त्याला फुरसत सांपडली नाहीं. या अवधींत त्यानें देवगड व चांदा येथील बलीशहा व निळकंठशहा या गोंड राजांचीं संस्थानें खालसा करून तीं मराठी मुलुखांत सामील केलीं.

४. पुढें शके १६७०चा (इ.स. १७४८) पावसाळा संपतांच रघूजीनें मीरहबीबला मदत करण्यासाठीं आपला मुलगा जानोजी व सरदार तुळजाराम यांस बरोबर फौज देऊन बंगालवर रवाना केलें. जानोजीनें कटक प्रांत (ओरिसा) तेव्हांच सर केला. व तो मीरहबीबच्या स्वाधीन केला. या वेळीं अलिवर्दीखान कटक प्रांत सोडण्यास तयार झाला व त्यानें भोंसल्यास बंगाल–बहारच्या मागील चौथाईबद्दल बत्तीस लक्ष रुपये दिले. पुढें दोन वर्षे तो चौथाई देण्यास अळंटळं करूं लागला; तेव्हां इ. स. १७५१ त जानोजीनें बंगालवर पुनः चाल केली व अलिवर्दीखानास सळो कीं पळो करून सोडिलें. तेव्हां अलिवर्दीखानानें नागपुरास रघूजी भोंसल्याकडे वकील पाठवून आपण तह करण्यास कबूल आहों असें कळविलें. तहाची बाटाघाट चालू असतां जानोजी सावधगिरीनें बंगालमध्यें तळ देऊन होता. पुढें जानोजीच्या विद्यमानें रघूजी भोंसले व बंगालचा सुभेदार अलिवर्दीखान यांजमध्यें तह ठरला (इ. स. १७५१). त्याचीं कलमें पुढीलप्रमाणें:—

(१) बंगाल बहार व ओरिसा या तीनहीं प्रांतांची चौथाई नवाबानें भोंसल्यास नियमानें द्यावी.

(२) मीरहबीबला नवाबानें ओरिसा प्रांताचा सुभेदार नेमावें;

मात्र मीरहबीबनें भोंसल्याच्या आज्ञेप्रमाणें बागावें व प्रांताचा वसूल त्याजकडे जमा करावा.

(३) मराठ्यांनीं बंगालवर स्वाऱ्या करूं नयेत; मात्र बंगालची चौथाई म्हणून बारा लक्ष रुपये बंगालच्या सुभेदाराकडून भोंसल्यास दरसाल मिळावे.

(४) कटक प्रांत (सुवर्णरेखा नदीपर्यंतचा) मराठी राज्यांत सामील व्हावा. त्यापलीकडे मराठ्यांनीं पाऊल ठेवूं नये.

(५) नवाबानें मागील दोन वर्षांच्या खंडणीबद्दल पंचवीस लक्ष रुपये नगद द्यावे.

हा तह झाल्यावर रघूजीनें आपलें सर्व सैन्य बंगाल्यांतून परत बोलाविलें. व तहांतील शर्ती तंतोतंत पाळल्या. पुढें मीरहबीब व जानोजी यांचें फार दिवस पटलें नाहीं. जानोजीनें पहिल्यानें त्याला कैद केलें व नंतर त्याचा शिरच्छेद केला. परस्पर कांटा उपटून काढावा या हेतूनें अलिवर्दीखानानें ही गोष्ट घडवून आणिली असेंही म्हणतात. एव्हांपासून कटक प्रांत (ओरिसा) मराठी राज्यांत सामील झाला व रघूजी भोंसल्यानें शिवरामभट साठे याची त्या प्रांतावर सुभेदार म्हणून नेमणूक केली. कटकप्रांतीं शिवभटानें आपलें काम पुढें कित्येक वर्षेपर्यंत बिनबोभाट चालविलें.

५. या तहानंतर चार वर्षांनीं रघूजी मृत्यु पावला (फाल्गुन शु॥ ३ शके १६७६; १४।२।१७५५). त्याला चौघे मुलगे होते; मुधोजी व बिंबाजी हे एकोदर वडील स्त्रीचे, आणि जानोजी व साबाजी हे एकोदर धाकट्या स्त्रीचे. जानोजी धाकट्या स्त्रीचा असला तरी वयानें सर्वांत वडील होता. तेव्हां रघूजीच्या मागून 'सेनासाहेबसुभा' पदाचीं वस्त्रें त्याला मिळालीं. परंतु पुढें दोन वर्षें त्याचें व मुधोजीचें एकसारखें भांडण चाललें होतें. शेवटीं पेशव्यांच्या मध्यस्थीनें शके १६६९त (इ. स. १७५७) कसाबसा

तंट्याचा निकाल लागला. सेनासाहेबसुभा पद जानोजीकडे कायम झालें. मुधोजीस 'सेनाधुरंधर' हें नवीनच पद मिळालें व जानोजीचा कारभार त्यानें करावा असें ठरलें. साबाजी व बिंबाजी यांनीं लहानलहान जहागिरी घेऊन अनुक्रमें दारव्हें व छत्तिसगड येथें रहावें असा करार झाला. मात्र यापुढें भोंसलेवंधूंत पुरतें सख्य कधींच नांदलें नाहीं; त्यामुळें त्यांच्या हातून राज्याची वाढ मुळींच झाली नाहीं, व मराठी साम्राज्याचा पूर्वेस कटक प्रांतापुढें विस्तार झाला नाहीं. इ. स. १७५७त प्लासीची लढाई होऊन इंग्रजांचा बंगाल्यांत उत्कर्ष झाला. याच सुमाराम राघोबा व शिंदेहोळकर यांजकडून अयोध्या, बहार, व बंगाल या प्रांतांवर जंगी स्वारी करविण्याची बाळाजी बाजीरावाची योजना होती. परंतु दिल्लीदरबारच्या भानगडी यापुढें विकोपास गेल्यामुळें ही स्वारी झाली नाहीं आणि बंगाल व बहार हे प्रांत मराठी अंमलाखालीं येण्याचा योग केव्हांच आला नाहीं.

---

५६. शाहूमहाराज कैलासवासी झाले.

(शके १६७१; इ. स. १७४९).

शाहू आपल्या वयाच्या दहाव्या वर्षापासून पंचविसाव्या वर्षापर्यंत औरंगजेबाच्या नजरकैदेत होता. त्यामुळें मोंगलांसारखी ऐषआरामांत व स्वस्थतेंत दिवस काढण्याची त्यास संवय लागली होती. मोंगलांच्या कैदेतून सुटल्यावर फक्त चार पांच वर्षे तो लढाईवर गेला. यापुढें पंतप्रधानावर युद्धाचीं व दगदगीचीं कामें सोंपवून शाहू राजधानींत सुखानें राहूं लागला. शाहू प्रत्यक्ष राज्यव्यवहारांत पडत नव्हता तरी सर्व मराठे सरदारांत एकी कायम ठेवण्यास त्याचा वारंवार उपयोग

होई. कारण सातारच्या गादीबद्दल सर्व मराठ्यांस सारखाच आदर व अभिमान वाटे. शाहूच्या वेळेस मराठी राज्याचा अम्मल करण्याचें जोखमीचें काम पेशव्यांवर पडलें. बाळाजी विश्वनाथ, बाजीराव बल्लाळ व आतां बाळाजी बाजीराव हे तिन्ही पुरुष सारखे कर्ते निघाले. दाभाडे, रघूजी भोंसले, दमाजी गायकवाड, बाबूजी नाईक, प्रतिनिधि इत्यादि मराठे सरदारांस पेशव्यांचा अम्मल सहन होत नसे व म्हणून ते दंगे करीत. परंतु मराठी राज्याचा विस्तार करण्यास पेशवे लायक आहेत असा शाहूचा भरंवसा होता. म्हणून त्यानें दंगेखोर सरदारांची समजूत करून पेशव्यास राज्यविस्ताराच्या कामांत मदत केली. एकदां पेशव्यांसारखे मराठी राज्यांतील सर्वांत प्रबळ सरदार आपल्याशीं कसे वागतात हें पाहण्याचा शाहूनें विचार केला.

२. एकदां दहा हजार फौज घेऊन भेटीस यावें अशी शाहूनें बाळाजीस आज्ञा केली. बाळाजी दहा हजार फौज घेऊन येऊं लागला. यावर शाहूनें इतकी फौज घेऊन येण्याचें कारण काय म्हणून विचारलें. तेव्हां सर्व फौज मागें ठेवून पांच खिजमतगारांनिशीं बाळाजी भेटीस गेला. शाहूस परीक्षाच पहावयाची होती, म्हणून तो शिकारीस निघून गेला. बाळाजीस ती बातमी कळतांच तोही त्याचे मागोमाग गेला. चोपदारांनीं बाळाजी आल्याची वर्दी दिली, तरीही त्यानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. पुढें एक प्रहरानंतर त्यानें बाळाजीस गोटांत जाऊन उतरण्यास सांगितलें.

३. एके दिवशीं दरबार बरखास्त झाल्यावर शाहू वाड्यांत जावयास निघाला. तेव्हां आपले जोडे मधल्या दालनांत टाकून तो तसाच पुढें निघाला. खिजमतगार जवळ नव्हते, तेव्हां बाळाजीनें ते उचलून घेऊन शाहू मागील चौकांत पोहोंचला नाहीं तोंच त्याच्यापुढें ठेविले. ही त्याची नम्रता पाहून शाहू फार खूष झाला.

४. पुन्हां एके प्रसंगीं बाळाजी सात आठ हजार फौज घेऊन

शाहूच्या भेटीस आला होता. त्या वेळीं शाहूनें चिटणिसाकडून 'तुमचें प्रधानपद दूर केलें आहे. याजकरितां हुजरे पाठविले आहेत त्यांच्याबरोबर शिक्केकट्यार व जरीपटका पाठवून द्यावा' असा हुकूम लिहविला व बाळाजी वेण्या नदीवर लष्करांत होता तिकडे पाठविला. बाळाजीनें हुकूम वाचतांच शिक्केकट्यार व जरीपटका हीं हुकूम घेऊन येणाऱ्या हुजऱ्याच्या स्वाधीन केलीं व लहानशी राहुटी ठोकून तेथें तो आपला खाजगी शागीर्दपेशा घेऊन राहिला. मग बाळाजीनें विनयपूर्वक शाहूस एक पत्र पाठविलें:—"आज्ञा झाली तेव्हांच स्वामींच्या चरणापाशीं आलों असतों. परंतु या ठिकाणीं फौज आहे ती कोणाच्या स्वाधीन करावी याची आज्ञा झाली नाहीं. सबब येतां आलें नाहीं. त्याची आज्ञा व्हावी, म्हणजे सत्वर निघून येतों." यावर शाहूनें 'फौजफांटा कारकुनाचे स्वाधीन करावा' असें लिहून पाठविलें. सर्व मंडळीस पेशव्याबद्दल वाईट वाटलें. जवळच्या मंडळींनीं शाहूस विनंती केली, "प्रधानांकडून काय अपराध झाला?" शाहूनें उत्तर केलें, "प्रधानपद यांजकडे ठेवावयाचें नाहीं. पुन्हां पिंगळ्यांकडे द्यावयाचें आहे." तेव्हां सर्व मुत्सद्यांनीं विनंती केली, "हिंदुस्थानप्रांतीं ही बातमी गेली व जाईल. चहूंकडे पंतप्रधानांचे मित्र आहेत, त्यामुळें बखेडा माजेल." आठ दिवस झाले तरी शाहूकडून बाळाजीस कांहीं बातमी कळेना. तेव्हां चिटणिसांतर्फे त्यानें विनंती केली, "आम्ही एका राहुटीनिशीं बाहेर राहिलों. चरणापाशीं येण्याची आज्ञा व्हावी. किंवा दुसरी कांहीं सेवा सांगावी, किंवा कृपा होणें ती व्हावी." तेव्हां शाहूकडून उत्तर आलें कीं, "तुम्हांस तुमचें पद परत दिल्यास नजर काय द्याल?" त्यावर बाळाजीनें सांगून पाठविलें, "आम्ही एकटे येथें आहोंत. फौजफांटा सरकारांत दिलाच आहे. आम्ही येथेंच पायापाशीं आहोंत. घर व सर्व जें आहे तें सरकारांत नजर आहे." यानंतर शाहूनें अकस्मात् हुजरे बोलावण्यास पाठ-

विले. बाळाजी एकाच खिजमतगारानिशीं येऊन मुजरे करून बोलला, " पायांशीं कोणती सेवा सांगणें ती आज्ञा होऊन पायांचा वियोग मात्र न व्हावा. " या एकंदर वर्तनावरून पेशवे खरे एकनिष्ठ सेवक आहेत, अशी शाहूची खात्री झाली. लागलीच जरीपटका, शिक्के व वस्त्रें, सर्व पदाचे बहुमान आणवून वस्त्रें व प्रधानपद पुन्हां दिलें. बाळाजीनें पायांवर मस्तक ठेविलें. तेव्हां शाहू म्हणाला, " तुमची निष्ठा पाहण्याकरितां हें सर्व केलें. तुम्ही बाजीरावाचे पुत्र व बाळाजी विश्वनाथाचे नातू खरे ! तुमची सेवा व निष्ठा पाहून बहुत संतोषित झालों. "

५. शाहूस दोन बायका होत्या. वडील सकवारबाई व धाकटी सगुणाबाई. सकवारबाई हेकेखोर होती. सर्व राज्याचीं सूत्रें आपल्या हातांत असावींत असें तिला वाटत होतें. सगुणाबाई नेहमीं शाहूच्या मर्जीप्रमाणें वागत असे; त्यामुळें शाहूचें तिजवर अत्यंत प्रेम जडलें. परंतु दोन्ही बायकांपासून शाहूस मुळींच पुत्रसंतान झालें नाहीं; त्यामुळें शाहू अगदीं उदासीनपणानें राहूं लागला. रोजचे साधे व्यवहारही त्याचे हातून नीट होईनात. एकदां निजामाकडील सरदार* जानराव निंबाळकर (रावरंभा) शाहूच्या भेटीस आला, म्हणून हुजऱ्यांनीं जलदी करून पागोटें आणून दिलें व विनंती केली. "जवाहीर,पोषाख घालून सरदार आले आहेत त्यांची भेट घ्यावी." तेव्हां महाराज बोलले "आमचे भेटीस येणार किंवा पागोट्याच्या ?" असें म्हणून खंड्या+म्हणून जवळच अत्यंत जिवलग कुत्रा होता, त्याला अलंकार घालण्याची आज्ञा करून शाहू दरबारांत तसाच बोडक्यानें भेट घेण्यास गेला. इतक्यांत हुजऱ्यानें कुत्रा आणला, त्यालाच शाहूनें आपलें पागोटें घातलें.शाहूच्या या वर्तनानें निंबाळकरास मोठें आश्चर्य

* करमाळ्याच्या रंभाजी निंबाळकराचा मुलगा.

+ याची छत्री माहुलीस आहे.

वाटलें. खंड्या कुत्र्यानें शाहूस शिकार करीत असतांना वाघाच्या तडाक्यांतून सोडविलें होतें. तेव्हांपासून शाहूची मर्जी त्याच्यावर बसली. एकदां लहरींत शाहूनें त्याला जहागिरीची सनद करून दिली; व पालखीचा सरंजाम त्याजकडे चालविला होता. शाहूनें ह्या भेटीपासून पागोटें अर्जीबात सोडलें, व बराच वेळ तो शिकारींत घालवूं लागला. याप्रमाणें कांहीं वर्षें लोटलीं.

६. इतक्यांत शाहूची लाडकी बायको सगुणाबाई क्षयानें आजारी पडली. शाहूची तिच्यावर अत्यंत प्रीति होती. त्यामुळें ती बरी होण्यासाठीं त्यानें नाना उपाय केले. शेवटीं तिला बरोबर घेऊन शाहू देवदर्शनाकरितां जेजुरीस गेला. तेथें त्यानें बराच दानधर्म व औषधोपचार केले; पण गुण आला नाहीं. शेवटीं तें दुखणें विकोपास जाऊन शके १६७०च्या भाद्रपदांत सगुणाबाईचा अंत झाला. तिच्या वियोगामुळें शाहूचें मन प्रपंचांतून अगदीं उडून गेलें. कांहीं दिवस त्याला भ्रमसुद्धां झाला होता. सकवारबाईच्या तापट स्वभावामुळें तर शाहूचें दुःख अतिशय वाढलें. याच वेळीं शाहूच्या मर्जीतील मदारी नांवाचा हत्ती मेला. तेव्हांपासून त्यानें साताऱ्यांत राहणें सोडून, माहुली व सातारा यांच्यामध्यें एक वाडी आहे तेथें तो राहूं लागला; यावरून त्या वाडीस 'वनवासवाडी' असें नांव पडलें.

७. शके १६७० (सन १७४८)च्या आषाढांत निजामुल्मुल्क बऱ्हाणपूर येथें *वारला. त्याच्या गादीवर त्याचा दुसरा मुलगा नासिर-

---

* निजामुल्मुल्क १०४ वर्षांचा होऊन वारला हें चुकीचें आहे. निजामुल्मुल्क सन १६७१ त जन्मला व सन १७४८, २१ मेस वारला असें 'मसिर उल उमरा (भाग ३ पृष्ठें ८३७–८४७)' या ग्रंथांत लिहिलें आहे. याचा कर्ता पुढील एका निजामाचा मुख्य मंत्री असल्यामुळें ती माहिती विश्वसनीय मानणें योग्य होय. अर्व्हिन हा शोधपूर्वक लिहिणारा ग्रंथकार (Storia भाग ४, १४० टीप) म्हणतो कीं, निजाम १६७१

जंग हा बसला. इतक्यांत निजामुल्मुल्काचा नातू मुजफरजंग, चंदासाहेब व फ्रेंच यांनीं ऐक्य करून अर्काटचा नबाब अन्वरुद्दीन यास ठार केलें व ते हैदराबादेवर चालून येणार असें नासिरजंगानें ऐकलें. तेव्हां त्यानें रघूजीपाशीं मदत मागितली व कर्नाटकांतील सर्व मुसलमान सरदार हाताखालीं घेऊन मुजफरजंगाचें बंड मोडण्याकरितां तो कर्नाटकांत गेला. त्यामुळें निजामाच्या राज्यांत स्वारी करण्यास मराठ्यांस ही उत्तम संधी होती; पण पुढील कारणामुळें मराठ्यांची स्वारी यावेळीं निजामाच्या मुलुखावर झाली नाहीं. नुकत्याच झालेल्या सगुणाबाईच्या मृत्यूमुळें शाहू उदासीन झाला होता, व त्याची प्रकृति हळू हळू क्षीण होत चालली होती. आतां आपल्यास संतान होईल ही शाहूची आशा नाहींशी झाली. म्हणून त्यानें दत्तक घेण्याचा विचार केला. त्यानें मुख्य मुख्य सरदारांस साताऱ्यास बोलाविलें; त्यावरून बाळाजी पस्तीस हजार फौज घेऊन साताऱ्यास गेला.

८. खानवटे, मुंगी, हिंगणी इत्यादि ठिकाणीं मालोजीचा भाऊ विठोजी याचे वंशज भोंसले रहात होते. त्यांपैकीं एखाद्या शाहण्या मुलास दत्तक घेण्याचें शाहूच्या मनांत होतें. इतक्यांत ताराबाई साताऱ्याच्या किल्ल्यांत बंदींत होती. तिनें सांगून पाठविलें कीं, "दुसरा मुलगा कां पाहतां? माझा मुलगा शिवाजी याचा मुलगा रामराजा मीं गुप्तरूपें ठेविला आहे तो असतांना दत्तक कशाला?" यावरून शाहूनें पानगांवास रामराजाबद्दल चौकशी करण्यास गोविंदराव चिटणिसास पाठविलें. चौकशींअंतीं रामराजा खरा ठरला. मग शाहूनें त्याच्या रखवालीसाठीं पांचशें घोडेस्वार पाठवून दिले व त्यासच

आगष्ट ११ रोजीं जन्मला. यावरून निजाम आपल्या वयाच्या ७७ व्या वर्षीं वारला असें होतें. १०४ वर्षांचा होऊन तो वारला ही गप्प पहिल्यानें ऑर्मनें उठविली व तेथून तिचा प्रसार झाला. (मराठी रियासत. मध्यविभाग २, पृष्ठ ३२७).

आपल्या मागून गादीवर बसविण्याचा विचार ठरविला. हें पाहून शाहूची थोरली बायको सकवारबाई हीस फार राग आला. रामराजा गादीवर बसल्यावर ताराबाईचें प्रस्थ माजेल; मग आपणास कोण विचारतो, असें तिला वाटलें. तिनें निराळाच एक मुलगा दत्तक घेण्याचें ठरविलें. तिनें जगजीवनराव प्रतिनिधि व त्याचा मुतालिक यमाजी शिवदेव या दोघांस आपणाकडे अनुकूल करून घेतलें, कोल्हापूरच्या संभाजीसही वश करून घेतलें व सातारच्या किल्ल्यावरील शिबंदीचा बंदोबस्त करून ताराबाईस विशेष प्रतिबंधांत ठेविलें. आतां शाहूची प्रकृति दिवसेंदिवस जास्त जास्त बिघडूं लागली. सकवारबाईनें शाहूभोंवतीही नीट बंदोबस्त ठेवून त्याची व बाळाजी वगैरे रामराजातर्फेच्या सरदारांची गांठच पडूं न देण्याची व्यवस्था केली. एकदां तर बाळाजी शाहूच्या भेटीस आला असतां तिनें त्याजवर मारेकरी घातले. पण बाळाजी अत्यंत सावधगिरीनें वागत असल्यामुळें तिचा बेत फसला. इतक्यांत शाहूचें दुखणें जास्त वाढलें, तेव्हां राज्याची आपल्या पाठीमागें व्यवस्था लावण्यास बाळाजीशिवाय दुसरा कोणी समर्थ नाहीं. असें पाहून त्यानें बाळाजीस एक खदस्तुरची यादी करून दिली. "कोल्हापूरचें राज्य एक करूं नये. माझ्या पाठीमागें रामराजास गादीवर बसवून तुम्हीं राज्य चालवावें. तसेंच पूर्वीप्रमाणें सर्वांचें आहे तसेंच चालवून राज्याचें संरक्षण ×करावें" हाच तिचा तात्पर्यार्थ होता. या यादीनें मराठी साम्राज्यांतील बडिलकीचा मान पेशव्यांस प्राप्त झाला व शाहूपुढील सातारकर महाराज नादान निघाल्यामुळें सर्व राज्याची व्यवस्था आपल्या मुखत्यारीवर करणें पेशव्यांस जरूर पडलें.

९. शाहूचें दुखणें अनावर झालें, तेव्हां सकवारबाईनें त्यास राजवाड्यांत आणलें व त्याच्याभोंवतीं जास्तच कडेकोट बंदोबस्त

×इतिहाससंग्रह, ऐतिहासिक स्फुट लेख, भाग ४ था, लेख ५ वा.

ठेविला. प्रतिनिधि व यमाजी शिवदेव यांजकडून ती सैन्य जमा करूं लागली व कोल्हापूरच्या संभाजीस फौज घेऊन तिनें लवकरच बोलाविलें. तो सैन्य घेऊन निघाला; पण त्याच्या कारभाऱ्यानें 'यांत यश येणार नाहीं' असें सांगितल्यावरून त्यानें तो नाद सोडला. बाळाजी फौजबंद होताच. त्यानें सातारच्या किल्ल्यावर आपले लोक पाठवून सकवारबाईच्या लोकांस हाणून पाडून किल्ला आपल्या हातांत आणण्याची सिद्धता करून ठेविली; तसेंच रामराजाला आणण्यास पानगांवास गोविंदराव चिटणीस यास पाठवून दिलें. पुढें थोड्याच दिवसांत शके १६७१ मार्गशीर्ष वद्य ३ स (१५।१२।१७४९) शाहू मृत्यु पावला. सर्व सरदारांस दुःख झालें. बाळाजीस तर अत्यंत वाईट वाटलें. पण सकवारबाईच्या पक्षांतील मंडळी दगा करतील अशी भीति असल्यामुळें त्यांचा तावडतोब बंदोबस्त करण्याचा पेशव्यानें निश्चय केला, शहरांत फौज पाठवून तेथें नाकेबंदी केली. आणि यमाजी शिवदेव व जगजीवनराव प्रतिनिधि यांस कैद केलें. सकवारबाईनें पाहिलें कीं, आपला बेत डासळून प्रधानपंतांची सरशी झाली. आतां जीव ठेवण्यांत अर्थ नाहीं. असा विचार करून तिनें सहगमन करावयाचें ठरविलें. नंतर सर्व राजोपचार, वस्त्रें, अलंकार, जवाहीर वगैरे घालून दोन पालख्या तयार झाल्या. त्यांत शाहूचें शव व सकवारबाई यांस घालून संपूर्ण मंडळी कृष्णावेण्यासंगमीं माहुलीस आली. तेथें यथाशास्त्र सर्व विधि होऊन सकवारबाईनें सहगमन केलें. जेथें सकवारबाई सती गेली, तेथें शाहूचें पाषाणाचें लिंग व सकवारबाईची मूर्ति स्थापन करण्यांत आली. तीं अजून तेथें आहेत.

---

५७ सांगोल्याची स्वारी.

(शके १६७२; इ. स. १७५०)

शाहूच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांनीं रामराजाला साताऱ्यास आणलें. इतक्यांत रघूजी भोंसले साताऱ्यास येऊन पोहोंचला. त्याचें म्हणणें असें पडलें कीं, ताराबाईनें रामराजाबरोबर एका ताटांत जेवण करावें, म्हणजे रामराजा तिचा खरा नातू, असें मी मानण्यास तयार आहें. तेव्हां रामराजाबरोबर ती एका ताटांत जेवली व रघूजी भोंसले आदिकरून मराठे सरदारांची रामराजाच्या खरेपणाविषयीं खात्री झाली. नंतर शके १६७१ च्या पौष महिन्याच्या आरंभीं रामराजास राज्याभिषेक झाला. मग रघूजीस रामराजाबरोबर शाहूच्या मृत्युपत्राप्रमाणें व्यवस्था करण्याकरितां येण्यास सांगून स्वतः बाळाजी पुण्यास आला.

२. ताराबाई पंचाहत्तर वर्षांची झाली होती तरी तिची अधिकार गाजविण्याची हौस मुळींच कमी झाली नव्हती. शाहूनें पेशव्यास दिलेल्या चिठ्ठीप्रमाणें सर्व अधिकार पेशव्यांच्या हातीं गेल्यावर आपणास माशा मारीत बसावें लागेल असें तिला वाटलें, व पेशव्यांचा अधिकार स्थिर होण्याच्या अगोदर जुन्या मराठे सरदारांस अनुकूल करून घेऊन पेशव्यांचा नक्षा उतरविण्याचा तिनें बेत केला. प्रथम सचिवाचें मन वळविण्याकरितां ती सिंहगडास गेली. माझ्या नवऱ्याच्या छत्रीची पूजा करण्यास मी जात आहें, अशी लोकांत तिनें प्रसिद्धि केली. पण सचिव व ताराबाई यांच्या कारस्थानाची बातमी लवकरच बाळाजीस लागली. तेव्हां त्यानें चिमणाजी नारायण सचिव यास कैद केलें; व ताराबाईची समजूत करून तीस पुण्यास आणलें. इतक्यांत रामराजाही पुण्यास आला. नंतर ह्या दोघांच्या संमतीनें बाळाजीनें

पुढीलप्रमाणें राज्याची व्यावस्था लाविली. त्यानें वऱ्हाड, गोंडवण व बंगाल या प्रांतांच्या नव्या सनदा रघूजीस करून दिल्या, व अर्ध्या गुजराथेच्या सनदा यशवंतराव दाभाड्यास पाठविल्या. अष्ट प्रधानांचीं कामें पूर्वीप्रमाणें राहिलीं नव्हतीं. तरी त्यांचीं इनामें त्यांजकडे कायम केलीं. रघूजी भोंसले वगैरे सरदारांच्या विनंतीवरून जगजीवन परशुराम प्रतिनिधि व त्याचा मुतालिक यमाजी शिवदेव या दोघांस पेशव्यानें बंधमुक्त केलें; तसेंच फत्तेसिंग भोंसल्यास त्याच्या जहागिरीवर कायम केलें. बाळाजीनें अशी राज्यव्यवस्था लावली: इतक्यांत एक नवीनच भानगड उत्पन्न झाली.

३. प्रतिनिधीचा मुतालिक यमाजी यांचा सुटका होतांच तो पंढरपुराजवळ सांगोल्यास गेला, व तेथील किल्ल्याचा बंदोबस्त करून त्यानें तेथें पेशव्यांविरुद्ध बंड केलें. तेव्हां तें मोडण्याकरितां बाळाजीनें बरोबर फौज देऊन सदाशिवरावभाऊस पाठविलें. यमाजी शिवदेवास इतर कोणताही सरदार मिळूं नये, याकरितां भाऊबरोबर रामराजाचीही रवानगी झाली. सांगोल्याचें ठाणें भाऊनें तेव्हांच कबीज केलें. नंतर सदाशिवरावभाऊ रामराजासह पुण्यास आला. रामराजास खर्चासाठीं साडेपांसष्ट लक्ष रुपये देण्यांत आले; मग ताराबाई व रामराजे यांचा आदर करून बंदोबस्तास बरोबर त्र्यंबक सदाशिव ऊर्फ नाना पुरंदरे यास फौजेनिशीं देऊन साताऱ्यास त्यांची रवानगी केली. ताराबाईच्या प्रसन्नतेसाठीं पेशव्यांनीं सातारच्या गडावर आपले लोक ठेविले होते ते काढून फिरून पूर्वीचे गडकरी नेमिले, व त्यांस ताराबाईच्या आज्ञेंत राहण्याविषयीं पेशव्यांनीं हुकूम दिला.

सांगोल्याच्या मुक्कामीं असतांनाच रामराजानें, 'पेशव्यांनींच सर्व राज्यांतील कारभार पहावा, आपण मुळींच राजकारणांत पडणार नाहीं; साताऱ्याजवळ कांहीं मुलूख आपल्या खर्चाकरितां पेशव्यांनीं

बावा म्हणजे झालें. ' अशी एक यादी लिहून दिली. त्याचप्रमाणे सर्व राज्यांतील पदें व मुलूखमहाल यांचा बंदोबस्त सदाशिवरावभाऊनें रामचंद्रबाबा व गोविंदराव चिटणीस यांच्या विचारें रामराजाकडून करून घेतला. रामराजा अगदीं नाकर्ता निघाला. त्यामुळें यानंतर सातारच्या छत्रपतींनीं कांहींच कारभारी केली नाहीं. व त्यांच्या हातीं कोणताच अधिकार राहिला नाहीं. यापुढें सर्व राज्यकारभाराची जबाबदारी पेशव्यांच्या अंगावर पडली. व त्यांस सर्व कारभार आपल्या मुखत्यारीवर चालविणें भाग पडलें. त्यावरून एव्हांपासून पुणें ही मराठी राज्याची राजधानी झाली. दाभाडे, गायकवाड, प्रतिनिधि, नागपूरकर भोंसले इत्यादि जुने सरदार पेशव्यांस आपल्या बरोबरीचे समजत व त्यांच्या मनांत पूर्वीपासून पेशव्यांबद्दल मत्सर धुमसत होता. आतां पेशवे आपल्या मुखत्यारीवर मुख्य राज्यसूत्रें चालविणार हें पाहून त्या मत्सराग्नीचा भडका झाला.तथापि सर्व राज्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेण्याची इच्छा व कुवत त्यांच्यापैकीं एकाच्याही अंगीं नव्हती: तेव्हां बाळाजी बाजीरावानें धूर्तपणा व मर्दुमी यांच्या जोरावर या सर्व जुन्या सरदारांस तेव्हांच नरम आणिलें व हिंदुपदपातशाही स्थापण्याचें काम पुढें चालविलें.

४. सांगोल्याची स्वारी चालली असतां एक नवीनच विघ्न उत्पन्न झालें व त्यामुळें पेशव्यांच्या वराण्यांत गृहकलह माजणार अशी भीति वाटूं लागली. रामचंद्र मल्हार शेणवी हा सांवतवाडी संस्थानांतील अरवली गांवचा कुळकर्णी होता. तेथें वसुलाचें काम त्याच्या हातून नीट न झाल्यामुळें तो साताऱ्यास पळून आला. तेथें राजगुरु कचेश्वरबाबा अर्तातकर याच्या नोकरीस तो राहिला. त्यानें बाजीराव पेशव्याजवळ त्याची शिफारस केली. त्यावरून बाजीरावानें त्याची लष्करी व मुलकी कामांतील हुषारी पाहून त्यास राणोजी शिंद्याचा दिवाण नेमलें. रामचंद्रबाबानें शिंद्याच्या कारभारांत खूप द्रव्य मिळ-

विले; त्यानें पुण्यांत विस्तृत जागा घेऊन सात मजली वाडा बांधिला व तसेंच घाट, देवस्थानें, दानधर्म वगैरे कामीं मोठमोठे खर्च करून सर्व हिंदुस्थानभर आपलें नांव केलें. मल्हारराव होळकर व जयाजी शिंदे यांचें वितुष्ट आलें होतें. त्यांत बाबा नेहमीं होळकराची बाजू घेई. तेव्हां रामचंद्रबाबाचा डोईजडपणा जयाप्पास सहन न होऊन त्यानें बाबास दिवाणागिरीवरून काढून टाकिलें. पुढें रामचंद्रबाबानें सदाशिरावभाऊतर्फे शिंद्याची दिवाणागिरी आपणास पुनः मिळवून देण्याबद्दल बाळाजीस गळ घातली. पण जयाप्पाचें मन बाबाविरुद्ध पूर्णपणें विटलें असल्यामुळें बाळाजीनें त्यास शिंद्याची दिवाणागिरी दिली नाहीं. व रामाजी अनंत दाभोळकर या फडाणिशीकडील हुशार कारकुनास शिंद्यांचा कारभारी नेमिलें (सन १७५०). यापुढें रामचंद्रबाबा भाऊसाहेबाचा दिवाण झाला. सांगोल्याच्या स्वारीवर असतां त्यानें भाऊच्या मनांत बाळाजीविरुद्ध बरेंच भरविलें. चिमाजी-आप्पा जसा बाजीरावाचा सर्व कारभार करीत, तसा मला तुमचा करूं द्या, असें बाळाजीपाशीं मागणें करण्यास सदाशिवरावभाऊस त्यानें भर दिली. महादोबा पुरंदरे हा बाळाजीचा कारभारी होता, व त्याचे बाळाजीवर फार उपकार झाले होते. तेव्हां सदाशिवरावभाऊस कारभारी नेमून महादोबाचें मन दुखविणें बाळाजीस पसंत पडलें नाहीं. म्हणून त्यानें सदाशिवरावभाऊचें मागणें नाकबूल केलें. इतक्यांत सदाशिवरावभाऊस आपली पेशवाई देण्याविषयीं कोल्हापूरकर सरकारनें बोलणें काढलें व 'पांच हजारांचा सरंजाम व तीन किल्ले देतों' असें कोल्हापूरच्या राजाकडून भाऊस पत्र आलें. सदाशिवरावभाऊ कोल्हापुरास जाण्यास तयार झाला व पेशव्यांच्या घरांत दुफळी होण्याचा प्रसंग जवळ येऊन ठेपला. पण अकल्पित रीतीनें तो प्रसंग टळला. याच सुमारास ताराबाईचें मन मिळवून घेऊन सातारची व्यवस्था लावावी असें महादोबाचें म्हणणें पडल्यामुळें पेशवे व महा-

दोवा पुरंदरे यांजमध्यें तेढ आली होती. तेव्हां सदाशिवरावभाऊ कारभार हातीं घेऊं इच्छितात हें पाहून 'मी कारभारीपद सोडण्यास तयार आहें, तुम्हीं तें भाऊसाहेवांस द्यावें' असें महादोवानें वाळाजीस सांगितलें व आपण स्वतः रुसून* घरीं वसला (पौष शु॥ ८ शके १६७२). नंतर सदाशिवरावभाऊ रामचंद्रवावाच्या मदतीनें कारभार पाहूं लागला. पण रामचंद्रवावाचें व भाऊचें फार दिवस पटलें नाहीं. पुढें लवकरच पेशवे व महादोवा पुरंदरे यांजमध्यें गोडी होऊन महादोवा पुनः सरकारकामें करूं लागला (१९ जुलै १७५२).

---

५८. ताराबाईचें कारस्थान.

सांगोल्याच्या स्वारीनंतर रामराजा व ताराबाई या दोघांची समजूत करून बाळाजीनें त्यांस साताऱ्यास पाठविलें. तेथील सर्व कारभार गोविंदराव चिटणीस, यशवंतराव खासनीस व देवराव लपाटे करूं लागले. ताराबाईस आपल्या हातांत अधिकार असावा असें फिरून वाटूं लागलें व ती रागावून सातारच्या किल्ल्यांत जाऊन किल्ला वळकावून वसली. तिची समजूत करण्याकरितां कांहीं लोक वरोवर घेऊन रामराजा गेला; तेव्हां पेशव्यांच्या हातांत वाहुलें होऊन राहण्याचें सोडून स्वतंत्र रीतीनें राज्य चालविण्याचा ताराबाईनें त्याला फार उपदेश केला. पण तो मान्य न करतां रामराजा तसाच

---

*मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ६, पुरंदरें रोजनिशी, पृष्ठ ६०. महादोवानें या वेळीं स्वार्थत्याग करून पेशव्यांच्या घरांतील गृह-कलह टाळला असें ग्रँट डफ लिहितो; पण त्याचें म्हणणें वरील नोंदी-वरून व इतर कागदपत्रांवरून खरें दिसत नाहीं.

शहरांत परत आला.पुढें ताराबाईनें दमाजी गायकवाडास पुढील निरोप पाठविला.—"या वेळीं पेशवे निजामच्या राज्यांत गेले आहेत; तेव्हां ब्राह्मणांच्या जांचापासून राज्याचें रक्षण करण्यास ही संधी उत्तम आहे. जलदी करून साताऱ्यास यावें." दमाजीनें हें म्हणणें कबूल केलें व फौज घेऊन तो निघाला. ताराबाईनें दमाजीच्या आगमनाची खात्रीची बातमी ऐकतांच चंपाषष्ठीच्या दिवशीं रामराजास भोजनासाठीं किल्ल्यावर बोलाविलें. रामराजा आला तेव्हां तिनें त्याची बरीच निंदा केली व ती म्हणाली, 'मी तुला राज्यावर बसवून फसलें; तूं माझा नातू नव्हेस. तूं भोंसल्यांच्या किंवा मोहित्यांच्या कुळांतील खचित नाहींस. तूं खास गोंधळी आहेस. तुला नातू कबूल केल्याबद्दल मी कृष्णेत जाऊन प्रायश्चित्त घेईन. तेव्हां मला कांहीं तरी बरें वाटेल.' असें बोलून तिनें रामराजाला तेथेंच कैद करून किल्ल्यांत ठेविलें (मार्गशीर्ष शुद्ध ६ शके १६७२, २४।११।१७५०).

२. ही बातमी कळल्यावर नाना पुरंदरे, गोविंदराव चिटणीस वगैरे पेशव्यांकडून साताऱ्च्या व्यवस्थेस राहिलेल्या मंडळीस, या म्हातारीस वेड खचित लागलें, असें वाटलें. इतक्यांत दमाजी गायकवाड भलें मोठें सैन्य घेऊन साताऱ्यावर चाल करून येत आहे असें त्यांस कळलें. तेव्हां त्यांना ताराबाईचें खरें स्वरूप कळून चुकलें. लागलीच नाना पुरंदऱ्यानें सैन्य जमा करून कृष्णाकांठीं अरळे गांवीं तळ दिला. दमाजी गायकवाड सालपे घाटांतून चालून आला. नाना पुरंदऱ्यानें हल्ला केला, पण तो नीट लागू पडला नाहीं. त्यामुळें दमाजीचा जय झाला व पुरंदऱ्यास लिंबपर्यंत हटावें लागलें. दमाजीनें ताराबाईची भेट घेतली व सातारजवळचे किल्ले तिच्या स्वाधीन केले. त्या वेळीं बाळाजी रायचूरपाशीं कृष्णातीरीं होता. तेथें त्याला दमाजीच्या स्वारीची हकीकत कळली; तेव्हां निजामापासून दोन लाख खंडणी घेऊन तो साताऱ्यावर कूच करून आला.

पण पेशवा येण्यापूर्वीच नाना पुरंदऱ्यानें दमाजीवर हल्ला करून त्यास जेरखेऱ्यांत हांकून लाविलें. दमाजीस कऱ्हाडाहून प्रतिनिधि मिळणार होता व गुजराथेतून त्याची आणखी फौज यावयाची होती. परंतु कोंकणचा सुभेदार संक्राजीपंत हा आपल्या मागच्या बाजूस फौज जमवीत आहे व पुढून पेशवे तेरा दिवसांत चारशें मैल येऊन पोहोंचले, असें पाहून दमाजी घाबरला व त्यानें बाळाजीकडे तह करण्यास एक माणूस पाठविला. बाळाजीनें तह करण्याचें कबूल केलें. डभईच्या लढाईनंतर झालेल्या कराराप्रमाणें गुजारथच्या उत्पन्नापैकीं अर्धा भाग पेशव्यांतर्फे सरकारांत भरावयाचा असें ठरलें होतें; परंतु दमाजी गायकवाडानें आजपर्यंत गुजारथच्या वसुलांतील सरकारी देण्याचा भरणा केला नव्हता. बाळाजीनें दमाजीस मागील सर्व बाकी चुकती करण्यास सांगितलें. तेव्हां त्यानें उत्तर केलें, "मी काय चाकर: दाभाडे आमचे मालक, त्यांस बाकी मागा." या उद्धटपणाच्या उत्तरावरून बाळाजीनें दमाजीस कैद करून पुण्यास आवजी कवडे यांच्या वाड्यांत ठेविलें. दाभाडेही बाकीविषयीं कांहीं बोलेना. तेव्हां तळेगांवास सैन्य पाठवून यशवंतराव दाभाडे व त्याची आई उमाबाई यांस पकडून आणून होळकरांच्या वाड्यांत ठेविलें (वैशाख शके १६७३, मे १७५१). पुढें कित्येक महिन्यांनीं दमाजीनें पेशव्यांशीं सलोखा करून आपली सुटका करून घेतली. गुजारथच्या मागील बाकीबद्दल पंधरा लक्ष रुपये पेशव्यास दमाजी कडून मिळावे. यापुढें निम्मी गुजराथ दमाजीनें पेशव्याचे स्वाधीन करावी. गुजराथेपैकीं जो जो नवीन मुलूख सुटेल त्यापैकींही निम्मा हिस्सा द्यावा, पेशव्यांची ठाणीं बसविण्यास मदत करावी. सरकारी स्वारी जे समयीं होईल तेव्हां दहा हजार फौज घेऊन सरकारची चाकरी करावी. दाभाडे यांच्या मुतालिकीबद्दल पांच लक्ष पंचवीस हजार रुपये दरसाल देत जावे, शिवाय सातारच्या

महाराजांच्या खर्चासही कांहीं रक्कम देत जावी. असा ठराव झाला.

३. येणेंप्रमाणें पेशव्यांविरुद्ध बंड केल्याचें प्रायश्चित्त दमाजी गायकवाडास भोगावें लागलें. बाळाजीनें ताराबाईच्या वाटेस न जातां तिचे बेत सिद्धीस जाऊं न देण्याच्या खटपटी केल्या व त्यांत त्यास यश आलें. दमाजी गायकवाडाचा पराभव झाल्यावर ताराबाईनें निजामाचा दिवाण रामदासपंत याचे पुतण्यास पेशवाई देण्याचें कबूल करून त्याशीं कारस्थान चालविलें. पण रामदासपंत शके १६७४ च्या वैशाखांत (७।४।१७५२) ठार मारला गेला व तेंही कारस्थान फसलें. मग जगजीवनराव प्रतिनिधि आपल्यास अनुकूल होत नाहीं असें पाहून त्याला प्रतिनिधिपदावरून दूर करण्याचा तिनें बेत ठरविला व तें पद पेशव्याचा हाडवैरी बारामतीकर बाबूजी नाईक यास देण्याचें ठरविलें. नाईक फौजेसुद्धां साताऱ्यास आला व प्रतिनिधीचे तालुके घ्यावयास गेला. तांदुळवाडीनजीक लढाई होऊन नाइकास जखम झाली व तो बारामतीस पळून गेला. शेवटीं ताराबाईचा त्रास अगदीं बंद व्हावा म्हणून बाळाजीनें दादोपंत वाघ यास दहा हजार फौज देऊन चंदनवंदनानजीक कायमचें ठेवून दिलें. तेव्हांपासून ताराबाईस स्वस्थ बसणें भाग पडलें. रामराजास कैदेतून सोडविण्यासाठीं बाळाजीनें आरंभीं खूप खटपट केली. पण १४-९-१७५२ रोजीं जेजुरीस बाळाजी व ताराबाई यांची भेट झाली. त्या वेळीं रामराजा अस्सल नाहीं असें ताराबाईनें शपथेवर सांगितलें. तेव्हां रामराजाचा नाद सोडून यापुढें संभाजीस आणून सातारा व कोल्हापूर येथील गाद्या एक करण्याचा बाळाजीनें प्रयत्न केला. पण तो सफल झाला नाहीं. रामराजा तेरा वर्षें सातारा किल्ल्यावर कैदेंत होता. पुढें कार्तिक शु. १२ शके १६८३ (९ । ११ । १७६१) रोजीं ताराबाई पंचायशींव्या वर्षीं मृत्यु पावली. नंतर माधवराव पेशव्यानें रामराजास किल्ल्यावरून खालीं

शाहूनगरांत आणून सिंहासनावर बसविलें (चैत्र शु. १४शके १६८५, २८।३।१७६३).

---

५९ शाबास ! शिंदेहोळकर, शाबास !!

(शके १६७२ –७३; इ. स. १७५०–५१)

तारावाई व निजामचा दिवाण रामदासपंत या दोघांचीं कारस्थानें हाणून पाडण्यांत बाळाजी गुंतला होता; त्याच वेळीं मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे या दोघां मराठे सरदारांनीं, दिल्लीच्या बादशहाच्या वजिरास साहाय्य करून मराठ्यांचें नांव सर्व हिंदुस्थानभर दुमदुमावयास लाविलें. त्याविषयींची माहिती या प्रकरणांत द्यावयाची आहे.

२. शके १६७०च्या चैत्र शु॥१३स (१४।४।१७४८) दिल्लीचा बादशहा महंमदशहा वारला. त्याच्यामागून त्याचा मुलगा अहमद अहमदशहा ही पदवी घेऊन गादीवर बसला. त्यानें अयोध्या प्रांताचा नबाब सफदरजंग ह्यास आपला वजीर नेमिलें. त्यामुळें सफदरजंगाचें वजन दिल्लीदरबारीं अतोनात वाढलें. अयोध्या प्रांताच्या पश्चिमेकडे व गंगेच्या उत्तरेकडे रोहिले लोकांचा मुलूख होता. रोहिलखंडावर या वेळीं हफीज रहमतखान रोहिला हा अंमल करीत असे. त्याचा सेनापति दुंदेखान हा होता. त्याचप्रमाणें गंगा व यमुना या नद्यांच्या मधील प्रदेशांत--त्यास अंतर्वेद किंवा दुआब म्हणतात--पठाण लोकांचा अम्मल असे. या पठाणांचा मुख्य कायमखान बंगष पठाण हा होता. सफदरजंगास वजिरी मिळतांच त्यानें अयोध्या प्रांतालगत राज्य करणाऱ्या पठाण व रोहिले या दोघांचाही हळूहळू

नाश करण्याचा निश्चय केला. त्यानें पहिल्यानें बादशहातर्फे रोहिल-खंडावर अंमल बसविण्याकरितां नवीन फौजदार पाठविले. परंतु रोहिले लोकांचा सेनापति दुंदेखान यानें कोणत्याही फौजदाराची डाळ शिजूं दिली नाहीं. तेव्हां सफदरजंगानें पठाण व रोहिले या दोघांत फूट पाडून त्या दोघांचा परस्पर नाश करण्याची युक्ति केली. सफदरजंग वजिराच्या फुशीवरून पठाणांचा मुख्य सरदार कायम-खान बंगष रोहिल्यांवर चालून गेला. बदाऊनजवळ त्यांचें युद्ध झालें. त्यांत कायमखान ठार झाला. आपला एक शत्रु आपोआप नाहींसा झाला हें पाहून सफदरजंग वजिरास समाधान झालें. त्यानें दुआबमधील पठाणांचा सर्व प्रांत खालसा करून आपल्या राज्यास जोडला; व त्या सर्व मुलुखाचा अम्मल आपला दिवाण नवलराय यास सांगून तो दिल्लीस निघून गेला.

३. परंतु या व्यवस्थेनें त्या प्रांतांत स्वस्थता झाली नाहीं. कायम-खान पठाणाचा मुलगा अहमदखान बंगष यास रोहिले युद्ध करण्या-विषयीं सारखे चिथवीत होते. एके दिवशीं नवलरायाच्या लोकांनीं एका पठाण स्त्रीचा अपमान केला. तेव्हां ती अहमदखानाकडे जाऊन म्हणाली, "तुझ्या समक्ष एका पठाण स्त्रीचा काफिरांनीं अपमान केला तरी तुला राग येत नाहीं ना ? यापेक्षां तुझ्या बापास अल्लानें मुलगी दिली असती तर फार बरें झालें असतें !" हें भाषण ऐकून अहमदखानाचा स्वाभिमान जागृत झाला. त्यानें दुआबांतील राज-धानीचें शहर फरुकाबाद फिरून घेण्याचा निश्चय केला. वजिरानें त्या शहरीं एक कोतवाल ठेवला होता त्यास अहमदखानानें ठार केलें. व फरु-काबादेस पुनः पठाणांचा झेंडा उभारला. शेवटीं त्यानें सफदरजंगाचा दिवाण राजा नवलराय याशीं युद्ध करून कालीनदी येथें त्याला ठार केलें (श्रावण शुद्ध १२ शके १६७२, ३।८।१७५०). मग रोहिले व अहमदखान पठाण यांनीं एक होऊन अयोध्या प्रांतावर स्वाऱ्या

करण्यास सुरुवात केली. या सर्व प्रकाराची बातमी कळतांच वजीर अगदीं घाबरून गेला. आपल्या हातचा अयोध्या प्रांतच जातो कीं काय असें त्याला वाटूं लागलें. त्यानें वेळ न दवडतां भरतपूरचा संस्थानिक सुरजमल जाट यांचें सैन्य आपल्या मदतीस घेऊन अहमदखान पठाणावर स्वारी केली. परंतु युद्धांत वजिराची फजिती होऊन त्याचा हत्तीच नाहींसा झाला. त्याबरोबर सर्व सैन्यांत गोंधळ होऊन तें सैरावैरा पळूं लागलें. खुद्द वजिरास जखमा लागल्या व त्याला पळून जाणें भाग पडलें. पठाण व रोहिले जय मिळाल्यामुळें फुगून गेले. व आतां काय आपण अयोध्या प्रांताचे धनी झालों, असें वाटून ते आनंदांत पोहूं लागले. दिल्लीस सफदरजंगाचा मत्सर करणारे लोक होतेच. त्यांसही आतां फावलें. त्यांनीं बादशहाचें मन कलुषित करून सफदरजंगास वजिरीवरून दूर करण्याचा प्रयत्न चालविला. अशा रीतीनें वजिराचा चोहोंकडे दुर्लौकिक झाला व चहूंबाजूंनीं त्याच्यावर संकटें कोसळलीं. अयोध्या प्रांत हातचा जातो, शिवाय वजिरीही हातांत रहात नाहीं. अशा पेंचांत सफदरजंग सांपडला होता. अशा संकटसमयीं मराठे सरदारांची मदत मागण्याची सद्बुद्धि त्यास सुचली. त्यामुळें त्याचा बचाव झाला; इतकेंच नव्हे, तर तो पहिल्यापेक्षां जास्त वैभवास चढला.

४. या वेळीं मराठे सरदार मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे हे जयपुराजवळ होते. त्यांची वजिरानें भेट घेतली. मग यमुना उतरून मराठे कादरगंजाजवळ आले. तेथें दहा हजार फौजेसह एक पठाण सरदार होता. त्याचा मराठ्यांनीं तेव्हांच नाश केला. इतक्यांत अहमदखान पठाण प्रयाग प्रांतीं आश्रय करून होता, तो फरुकाबादेस आला. तेव्हां मराठ्यांनीं चाल करून लागलीच त्या शहरास मोर्चेबंदी केली. एकसारखें पंचवीस दिवस युद्ध चाललें होतें. परंतु पठाणांस गंगेच्या पलीकडून रोहिले मदत करीत होते, त्यामुळें पठा-

णांचा पाडाव होईना. सफदरजंग वजीर मराठ्यांपासून पांच कोसांवर कनोजनजीक होता. त्यास मराठ्यांनी गंगेस नावांचा पूल बांधण्यास सांगितलें. मग मराठ्यांची फौज गंगापार झाली, आणि तिकडे रोहिले व पठाण मिळून तीस हजार फौज होती तिला गांठून मराठ्यांनीं तिचा फन्ना उडविला. त्याच दिवशीं रात्रीं अहमदखान पठाण फरुकाबादेंतून निसटून पळून जाऊं लागला. पण मराठ्यांनीं त्याचा पाठलाग करून त्यास अगदीं हैराण केलें व त्याचे हत्ती, घोडे, उंट, निशाणें सर्व लुटून आणलीं (चैत्र शु॥ ५ शके १६७३;२०।३।१७५१). अशा रीतीनें सफदरजंगाच्या शत्रूंचा नाश करून मराठ्यांनीं सफदरजंगावर उपकार केले.

५. या वेळीं स्वारींत शिंदेहोळकरांस पुष्कळ द्रव्य मिळालें, व अन्तर्वेदींत सोळा लक्ष रुपयांचा मुलूख मराठ्यांच्या हस्तगत झाला. पुढें या मुलुखाची वांटणी होऊन साडेनऊ लक्षांचा मुलूख पेशव्यानें आपल्याकडे घेतला व बाकी साडेसहा लक्षांचा शिंदेहोळकरांमध्यें वांटून दिला. पण या वेळीं झालेला महत्त्वाचा लाभ म्हटला म्हणजे पेशव्याच्या नांवानें बादशहाकडून शिंदेहोळकरांनीं एक फर्मान करून घेतलें. त्यांत मुलतान, पंजाब, राजपुताना व रोहिलखंड या सर्व मुलुखांत चौथाई वसूल करण्याचा हक्क बादशहानें मराठ्यांस दिला. या चौथाईचा मोबदला म्हणून पुढील गोष्टी आम्ही करूं अशी जयाजी शिंदे व मल्हारराव होळकर यांनीं बादशहा व नबाब वजीर यांस हमी दिली. "जेणेंकरून आपल्या अखंड राज्याचें व खुद्द हुजूरचें कल्याण होईल तशी तजवीज करूं. आम्ही दोघे व इतर अमीर उमराव नित्याप्रमाणें हुजूरच्या सेवेंत राहूं. अबदाली वगैरेचें पारिपत्य करण्याचें कामीं आमचाच सल्ला हुजूर ऐकतील तर तें काम आम्ही स्वतःच बजावूं. आम्ही यजमानांच्या व हिंदूंच्या धर्माचें संरक्षण करूं. जे जहागीरदार जहागिरी खाऊन आज्ञेंत रहात नाहींत त्यांच्या

जहागिरी हुकुमाप्रमाणें जप्त करूं व त्यांतून आपली चौथ कापून घेऊं. दीन व धर्म व महादेवजी व खंडेरावजी दरमियान आहेत+" बादशाहीचा बोज राखण्यासाठीं हा करारनामा अर्ज व उत्तर या स्वरूपांत ठरला. एकंदरीनें या करारनाम्यानें मराठ्यांनीं सिंधपासून काशीपर्यंतच्या बादशाही मुलुखाचें संरक्षण करण्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेतली व वजीर सफदरजंग याच्यातर्फे मोंगल बादशहा मराठ्यांच्या कह्यांत आला. परंतु ही गोष्ट पठाण, रोहिले,रजपूत इत्यादि प्रतिस्पर्ध्यांस सहन झाली नाहीं. यापुढें रोहिल्यांनीं अफगाणिस्थानचा राजा अहमदशहा अबदाली याशीं कारस्थानें चालविलीं व अबदाली अनेक वेळां दिल्लीवर चालून आला. अर्थातच दिल्लीदरबारीं आपलें वर्चस्व कायम ठेवण्यासाठीं वरील सर्व शत्रूंशीं झगडणें मराठ्यांस प्राप्त झालें. या करारनाम्याच्या आधारावरच हिंदुपदपातशाही स्थापन करण्याची योग्य व उच्च आकांक्षा मराठ्यांनीं धरिली; तेव्हां दिल्ली हें साहजिकपणें त्यांच्या हालचालींचें केंद्रस्थान बनलें व हा करारनामा त्या हालचालींस बीजभूत झाल्यामुळें मराठ्यांच्या इतिहासांत त्याला अत्यंत महत्त्व आहे.

६. या युद्धांत शिंदे—होळकरांनीं जो पराक्रम केला त्याची बातमी जेव्हां बाळाजी बाजीरावास समजली, तेव्हां त्यानें एक पत्र पाठवून त्यांचें अभिनंदन केलें. त्या पत्रांत पुढीलप्रमाणें मजकूर आहे:— " शाबास तुमच्या हिमर्तीची ! व दिलेरी रुस्तुमीची ! व शाबास लोकांची ! आमच्या दक्षिणच्या फौजांनीं यमुनागंगापार होऊन रोहिले-पठाणांशीं युद्ध करून आपण फत्ते पावावें हें कर्म लहान सामान्य न झालें. तुम्ही एकनिष्ठ कृतकर्मे सेवक. या दौलतीचे स्तम्भ आहां ! ! पहिलीं यशावह कर्मे संपादिलींत त्याहून अधिक

+ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १, लेखांक १; म. इ. सा. खंड ६, ले. १९९.

हें यश संपादिलेंत. या यशास जोडच नाहीं. इराणतुराणपावेतों लौकिक झाला कीं वजीर मोडला, पळाला असतां फिरून फत्तेच्या मसनदीवर बसविला. याहून यश कोणतें अधिक ×आहे ? "

---

६०. दक्षिणच्या सुभेदारास शह.

हैद्राबादचा निजाम प्रसिद्ध निजामुल्मुल्क वारल्यावर (सन १७४८) त्याचा दुसरा मुलगा नासिरजंग हा हैद्राबादच्या गादीवर बसला. निजामुल्मुल्काचा वडील मुलगा गाजीउद्दीन हा दिल्लीस होता. युरोपांतून व्यापाराकरितां हिंदुस्थानांत इंग्रज, पोर्तुगीज, डच, वगैरे लोकांप्रमाणें फ्रेंच लोकही आले होते, व त्यांनीं कर्नाटकांत पांडिचरी येथें आपली बखार काढली होती; त्यांनीं नासिरजंग गादीवर बसल्यावर थोड्याच दिवसांनीं कर्नाटकांत गडबड करण्यास सुरुवात केली. निजामुल्मुल्क कर्नाटकांत बंदोबस्त करण्यास गेला होता, तेव्हां त्यानें अन्वरुद्दिनाची अर्काटच्या नबाबाच्या जागीं नेमणूक केली होती (सन १७४३). चंदासाहेब म्हणून एक इसम ' जुन्या अर्काटच्या घराण्याशीं माझा संबंध आहे व म्हणून अर्काटच्या गादीवर माझा हक्क आहे, ' असें म्हणत असे. फ्रेंच लोकांचा पांडिचरी येथील गव्हर्नर डुप्ले यानें त्याला हाताशीं धरिलें. याशिवाय हैद्राबादच्या गादीवर हक्क सांगणारा निजामुल्मुल्काच्या मुलीचा मुलगा मुजफरजंग हाही फ्रेंचांस मिळाला. तेव्हां डुप्लेस अत्यंत आनंद झाला. अर्काटचा नबाब अन्वरुद्दीन ह्याशीं फ्रेंचांचें युद्ध होऊन त्यांत तो मारला गेला. डुप्लेनें

× का. सं. पत्रें, यादी वगैरे १६२; (ज्येष्ठ शु. ९, शके १६७३, २२।५।१७५१).

लागलीच चंदासाहेबास अर्काटच्या गादीवर बसविलें व मुजफरजंगास हैद्राबादची गादी मिळवून देण्याच्या प्रयत्नास डुप्ले लागला. इतक्यांत नासिरजंगास फ्रेंचांनीं उभारलेल्या बंडाची हकीकत समजली. तो ताबडतोब मोठें सैन्य जमा करून कर्नाटकांत जाण्यास निघाला; पण त्याच्या सैन्यांत फूट पाडण्याच्या डुप्लेच्या प्रयत्नास दुर्दैवानें यश आलें व नासिरजंग मारला गेला. फ्रेंचांनीं मुजफरजंगास हैद्राबादचा निजाम केलें; परंतु तोही सैन्यांतील लोकांकडून ठार झाला. शेवटीं डुप्लेनें निजामुल्मुल्काचा तिसरा मुलगा सलाबतजंग यास निजाम केलें (जानेवारी सन १७५१). व मुसाबुसी यास सैन्यासह निजामाच्या दरबारीं व्यवस्था ठेवण्याकरितां त्याच्याबरोबर दिलें; मग सलाबतजंग हैद्राबादेस येण्यास निघाला.

२. निजामच्या राज्यांत चाललेल्या या घालमेलीकडे बाळाजी बाजीरावाचें सारखें लक्ष होतें. फ्रेंचांचें वर्चस्व झालेलें बाळाजीस मुळींच आवडलें नाहीं. निजामाचें राज्य निःसत्त्व झालें तर त्यांत मराठ्यांचा तोटा होता असें नाहीं. उलट तें निःसत्त्व करण्यासाठींच बाळाजीची सर्व खटपट होती. परंतु मधल्यामध्यें फ्रेंचांचें वाढणारें सामर्थ्य मात्र मराठ्यांस इष्ट नव्हतें; तेव्हां हैद्राबादच्या निजामास मराठ्यांचा अंकित करून ठाकण्यास बाळाजीनें निराळीच एक युक्ति काढिली. दिल्लीहून निजामुल्मुल्काचा वडील मुलगा गाजीउद्दीन यास आणून हैद्राबादच्या गादीवर बसविण्याचा बाळाजीनें बेत केला. त्यानें शिंदेहोळकरांस कसेंही करून गाजीउद्दिनास दक्षिणेंत आणण्याविषयी पत्रें लिहिलीं व सलाबतजंग हैद्राबादेस पोंचण्यापूर्वीच त्याला गांठण्यासाठीं स्वतः बाळाजी कृष्णातीरीं रायचुराजवळ मोठ्या सैन्यानिशीं दाखल झाला. तेथें तो सलाबतजंगास चांगलाच दपटणार. इतक्यांत मागें एका गोष्टींत सांगितल्याप्रमाणें दमाजीच्या बंडाची बातमी त्याला समजली. त्यामुळें दोन लाखांची चिरमिरी घेऊन त्याला सातार्‍याकडे यावें लागलें. या वेळीं बाळाजी

मोठ्या संकटांत सांपडला होता. ताराबाईचीं त्याच्याविरुद्ध सारखीं कारस्थानें चाललींच होतीं. बाळाजीस आणखी एक मोठा कारस्थानी शत्रु उत्पन्न झाला. तो सलाबतजंगाचा दिवाण रामदासपंत हा होय त्याचें फ्रेंचांशीं सख्य होतें व तो फार कारस्थानी होता. त्यानें ताराबाईशीं संगनमत करून पेशवेपदावरूनच बाळाजीचें उच्चाटन करण्याचा प्रयत्न चालविला. आपल्या पुतण्यास पेशवाई मिळावी असा त्यानें ताराबाईशीं ठराव केला. व निरनिराळे मराठे सरदार बाळाजीविरुद्ध फोडून आपल्या कटांत सामील करून घेण्याचा जारीनें प्रयत्न चालविला. बाबूजी नाईक व रघुजी भोंसले तेव्हांच फुटले. खुद्द मल्हारराव होळकरास फितवण्याची त्यानें शक्कल लढविली. बाळाजीनें न डगमगतां आपल्या सरदारांत एकी राखण्याविषयीं खटपट चालविली व शिंदे-होळकरांस गाजीउद्दिनास बेऊन येण्याविषयीं निकड लाविली. शके १६७३ (सन १७५१) चा पावसाळा संपतांच बाळाजी गाजीउद्दिनाच्या मसलतीचें खलबत करण्याकरितां पुण्याहून औरंगाबादेच्या रोखें निघाला.

३. याच वेळीं मुसाबुर्सी व रामदासपंत यांनीं पेशव्यांच्या मुलुखावरच स्वारी करण्याचा बेत केला व निजामाचें सैन्य अहमदनगरास आलें. ही निजामाची स्वारी एकाएकी झाल्यामुळें मराठे सावध नव्हते. मग चाळीस हजार घोडेस्वार जमवून गनिमी काव्यानें शत्रूच्या सैन्यास जेरीस आणण्याची बाळाजीनें तयारी केली. फ्रेंचांच्या तोफखान्यामुळें मराठ्यांचा बेत लवकर सिद्धीस जाईना. एके दिवशीं रात्रीं मराठी फौजेचा तळ कुकडी नदीवर होता. त्या रात्रीं चंद्रग्रहण* असल्यामुळें लष्करांतील लोक धार्मिक विधींत गुंतले होते. अशा वेळीं बुसीनें मराठ्यांवर हल्ला केला. मराठ्यांची तयारी नव्हतीच; त्यामुळें फ्रेंचांचा हल्ला चांगला लागू झाला. मराठ्यांची गडबड उडाली, व खुद्द पेशव्यांचीं

* मार्गशीर्ष शु. १५ शके १६७३; २२ नोव्हेंबर १७५१.

सोन्याचीं भांडीं निजामास सांपडलीं. या जयामुळें शेफारून निजामाचें लष्कर पुढेंपुढें पुण्याकडे सरकूं लागलें.परंतु मराठ्यांनींही निकरानें लढण्यास सुरुवात केली. निजाम तळेगांवदमंढरे या गांवच्यापुढें आला. मग एके दिवशीं घोडनदीजवळ महादाजीपंत पुरंदरे आणि दत्ताजी व महादजी शिंदे यांनीं मिळून निजामाच्या सैन्यावर असा निकराचा हल्ला केला कीं, त्या दिवशीं निजामाचा चुराडाच झाला असता. परंतु फ्रेंचांच्या तोफखान्यामुळें निजाम बचावला. या युद्धांत कोन्हेर त्रिंबक एकबोटे नांवाच्या मराठे सरदारानें अद्भुत पराक्रम केला. त्यावरून त्याला +फाकडे हा किताब मिळाला व घोड्याच्या पायांत रुप्याचा तोडा घालण्याचा मान मिळाला. आणखी दोन वर्षांनीं कर्नाटकावरील स्वारींत पेशव्यांनीं होळीहुन्नूरला वेढा दिला तेव्हां या फाकड्यानें आपला जीव धोक्यांत घालून किल्ल्यावर हल्ला चढविला व तो सर केला (१७५३). पुढें सावनूरवरील हल्ल्याच्या वेळीं गोळा लागून तो स्वामिकार्यावर कामास आला(मे १७५६); तेव्हां पेशव्यानें इनाम देऊन त्याच्या कुटुंबाची योग्य समजाविशी केली.

४. मराठ्यांनीं पराभव केला तरी निजाम भीमेच्या कांठच्या कोरेगांवीं आला. तेथें तहाचीं बोलणीं होऊं लागलीं. इतक्यांत कोणा एका मराठा सरदारानें त्रिंबक किल्ला घेतल्याची बातमी आली. त्यावरून सलाबतजंगानें अगोदर त्रिंबक परत मिळविण्याकरितां तिकडे चालून जाण्याचे ठरविलें. परंतु निजाम जेव्हां तिकडे जाऊं लागला तेव्हां तो वाटेतील अडचणी व मराठ्यांकडून होणारा त्रास या दोन्ही गोष्टींस कंटाळला व शेवटीं तह करण्यास कबूल झाला. नंतर शिंगवे परगणे राहुरी या ठिकाणीं तात्पुरता तह करून सलाबतजंग हैद्राबादेस जाण्यास परत निघाला (माघ शु. २ शके

+ एकंदर फाकडे तीन. १ कोन्हेर त्रिंबक एकबोटे; २ मानाजी शिंदे; ३ इष्टुर फाकडे (क्याप्टन स्टुअर्ट).

१६७३, ७।१।१७५२). या तहानें कोणाचेंच समाधान झालें नाहीं. रामदासपंत हा ताराबाई, कोल्हापूरकर वगैरेशीं आपलीं कारस्थानें फिरून चालवूं लागला. बाळाजी बाजीरावानें केवळ निरुपाय म्हणून तह केला होता. त्यानें शिंदे व होळकर यांस एक पत्र लिहिलें आहे. त्यांत रामदासपंताच्या एकंदर कारस्थानांचें वर्णन करून तो पुढें लिहितो, "तेव्हां सल्लख केला. त्रिंबक एका महिन्यानें परत देऊं असें कबूल केलें. कां कीं तुम्हांस पत्रें गेलीं आहेत, तुम्ही यालच. तुम्ही आल्यावर तुमच्या विचारें जें होईल तें करावें. गाजुद्दीखानास आणावें, मोंगल व सर्व मराठे बऱ्हाणपुरावर येऊन भेटतील. सर्व गाजुद्दीखानास अनुकूल पडतील. दुसरें, तुम्ही तिकडून गाजुद्दीखान दहा पंधरा हजार, आम्ही इकडून, येणेंप्रमाणें मनसुबा उभा राहतांच सर्व कामें होऊन जातील. सारांश रामदासपंतानें अब्रू घेतली ही एकदां हर तजवीज करून त्यास पुरती जरब देणें घडल्यावांचून तुम्हांस कैलासवासी यांनीं वाढविलें व तुम्ही इराणतुराणपावेतों लौकिक केला तो सर्व व्यर्थ! आम्हीं रायाचे वंशीं व्यर्थ जन्म घेतला. याउपरी तुम्हीं खामखा त्यास आणावें.शपथपूर्वक हा मनसबा करावा,तरच उत्तम×आहे'

५. शके १६७४ च्या वैशाख शु॥४ स(७।४।१७५२)रामदासपंत भालकी येथें मारला गेला. पेशव्यांचें पत्रही शिंदेहोळकरांस पोंचून त्यांनींही गाजीउद्दिनास घेऊन दक्षिणेकडे जाण्याचा बेत केला. शेवटीं शिंदे–होळकर गाजीउद्दिनास घेऊन निघाले. बाळाजी बाजीरावही त्यांस मिळण्याकरितां बऱ्हाणपुराकडे चालला. मग बाळाजी बाजीराव, शिंदे, होळकर व गाजीउद्दिनाच्या बाजूचे मुसलमान सरदार, असें दीड लाख लष्कर बऱ्हाणपुराहून गाजीउद्दिनास घेऊन औरंगाबादेकडे चाललें. गाजीउद्दीन सलाबतजंगाचा वडील भाऊ,

×का.सं,पत्रें यादी वगैरे १६१(चैत्र व॥ ८ शके १६७४, २७।३।१७५२).

शिवाय दिल्लीच्या बादशहानें दक्षिणचा निजाम व्हावा म्हणून पाठविलेला, तेव्हां त्याला सहज गादी मिळणार असा रंग दिसूं लागला. तापी व गोदावरी या दोन नद्यांमधील वऱ्हाडच्या पश्चिमेचा सर्व भाग गादीवर बसविल्याबद्दल मराठ्यांस देण्याचा बाळाजीनें गाजीउद्दिनापासून करार लिहून घेतला. सर्व जमून आलें होतें. पण एके दिवशीं रात्रीं गाजीउद्दिनानें मेजवानीचें आमंत्रण पत्करिलें; त्या वेळीं जेवणांत विषप्रयोग होऊन गाजीउद्दीन वारला (७ सप्टेंबर सन १७५२). त्यामुळें सलाबतजंगाची हैद्राबादच्या गादीवरून उचलबांगडी झाली नाहीं. पण गाजीउद्दिनास गादीवर बसविण्याबद्दल त्याच्याकडून मराठ्यांस जी मिळकत व्हावयाची होती ती मात्र त्यांना देणें सलाबतजंगास भाग पडलें. कारण त्या वेळीं सर्व मराठी फौजा एके ठिकाणीं जमल्या होत्या व त्यांनीं प्रसंग पडल्यास युद्ध करूनही ती मिळकत मिळविण्यास सोडलें नसतें. मुसाबुसीनें मराठ्यांशीं शांततेनें वागण्याचा सल्ला दिला. नंतर भालकी मुक्कामीं तह ठरला (डिसेंबर, सन १७५२). त्यांत गाजीउद्दिनानें देऊं केलेला तापी व गोदावरी यांमधील प्रांत पेशव्यांस देण्याचें सलाबतजंगानें कबूल केलें. रघूजी भोंसल्यानें पैनगंगेच्या अलीकडे वसविलेलीं ठाणीं उठवावींत अशी अट होती. ती रघूजीनें तात्काळ कबूल केली.

---

६१ राघोबाची हिंदुस्थानांत पहिली भरारी.

शके १६७५–७७ (सन १७५३--५६).

भालकीचा तह झाल्यावर बाळाजीचा धाकटा भाऊ राघोबादादा गुजराथेंत अहमदाबाद घेण्याकरितां निघाला. अहमदाबादेस जवान-

मर्दखान बाबे म्हणून एक मोंगलांचा सुभेदार होता. तो दमाजी गायकवाडास दाद देईना. गुजराथेचा बंदोबस्त करण्यासाठीं राघोबा तीन वर्षें सारखा जात होता. पण अजून त्या प्रांताचा बंदोबस्त झाला नव्हता. तेव्हां खुद्द अहमदाबाद आपल्या ताब्यांत घेण्याचा राघोबानें बेत केला. त्याच्याबरोबर सखाराम भगवंत बोकील हा कारभारी होता. अहमदाबादेला वेढा घातल्यावर थोड्याच दिवसांत तें शहर मराठ्यांच्या हातीं आलें. या वेढ्यांत विठ्ठल शिवदेव दाणी (विंचूरकर) व नारो शंकर दाणी (राजेबहादर) या दोघां मराठे सरदारांनीं खूपच पराक्रम गाजविला. अहमदाबादच्या वसुलासंबंधीं दमाजी गायकवाडाशीं ठराव करून व त्या शहरच्या बंदोबस्तास श्रीपतराव नांवाचा एक सुभेदार पेशव्यांच्या वतीनें नेमून राघोबा हिंदुस्थानास जाण्यासाठीं थालनेरास आला. मग माळव्यांतून राजपुतान्यांत शिरून रजपूत राजांपासून खंडणी घेत घेत राघोबा चंबळा नदी ओलांडून जाटांच्या मुलुखाजवळ आला.

२. इ. स. १७५१ च्या आरंभीं अफगाणिस्थानचा बादशहा अहमदशहा अबदाली हिंदुस्थानावर चालून आला; तेव्हां दिल्लीचा बादशहा अहमदशहा यानें त्याला लाहोर व मुलतान हे दोन प्रांत –हल्लींचा पंजाब–देऊन बाटेस लाविलें. त्या वेळीं सफदरजंग वजीर रोहिल्यांशीं युद्ध करण्यांत गुंतला होता. नंतर तो दिल्लीस परत आला. तेव्हां लाहोर व मुलतान हे प्रांत गेल्याबद्दल त्याला फार वाईट वाटलें व पुढें तो व दिल्लीचा बादशहा यांच्यामध्यें खूप वैर वाढलें. शिंदे–होळकर निजामुल्मुल्काचा वडील मुलगा गाजीउद्दीन यास हैद्राबादच्या गादीवर बसविण्याकरितां दक्षिणेंत घेऊन गेले; त्याला विषप्रयोग होऊन तो कसा मृत्यु पावला हे मागील गोष्टींत सांगीतलेंच आहे. त्याचा मुलगा मीरशहाबुद्दीन हा मागें दिल्लीस होता. तो बादशहास मिळाला. बादशहानें त्याला गाजीउद्दीन हा किताब देऊन आपली वक्षीगिरी

सांगितली. त्याचप्रमाणें सफदरजंगाची वाजिरी काढून घेऊन ती खानखानान नांवाच्या दुसऱ्याच सरदारास दिली (सन १७५३).तेव्हां सफदरजंग चिडून गेला व त्यानें भरतपूरचा संस्थानिक सुरजमल जाट यास आपल्या मदतीस बोलावून दिल्लीस वेढा घातला. पुढें सहा महिनेपर्यंत भांडून सफदरजंग कंटाळला व लखनौस गेला. गाजीउद्दिनानें सफदरजंगाविरुद्ध आपल्या साहाय्यास मल्हारराव होळकर व जयाजी शिंदे यांस बोलाविलें होतें. इतक्यांत राघोबाही येऊन पोंचला. तेव्हां राघोबा, मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे या सर्वांनीं मिळून सफदरजंगास साहाय्य केल्याबद्दल सुरजमल जाटास तंबी पोंचविण्यासाठीं त्याच्या कुंभेरी किल्ल्यास वेढा घातला. वेढा चालू असतां मल्हारराव होळकराचा एकुलता एक मुलगा खंडेराव–प्रसिद्ध अहिल्याबाई होळकरणीचा नवरा–मोर्चांत निशाणापाशीं सहज गेला होता. त्याला बंदुकीची गोळी अकस्मात् लागून तो ठार झाला (फाल्गुन व।।११ शके १६७५, १९।३।१७५४).

३. मल्हाररावास मुलाच्या मरणामुळें अत्यंत दुःख झालें. त्यानें प्रतिज्ञा केली कीं, " सुरजमल जाटाचा शिरच्छेद करीन व कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन तरच जन्मास आल्याचें सार्थक. " हा होळकराचा पण ऐकून सुरजमल जाट घाबरला व आतां कसा तरी जीव वांचविला पाहिजे, असा विचार करून त्यानें जयाजी शिंद्यास शरण जाण्याचा निश्चय केला. त्यानें आपल्या दिवाणाचा मुलगा तेजराम याजबरोबर शिंद्यास 'आजचे समयीं तुम्ही वडील बंधु व मी धाकटा बंधु आहें, कळेल त्या रीतीनें बचाव करावा' असा निरोप पाठविला व आपली पगडी त्याच्याजवळ दिली. तेजरामानें जयाप्पाकडे येऊन आपल्या धन्याचा निरोप सांगितला; व बरोबर आणलेली पगडी जयाप्पाच्या डोक्यास घालून त्याची पगडी आपण घेतली. तेव्हां शिंदे मोठ्या विचारांत पडला. पण शेवटीं शरणागताचें रक्षण करणें हेंच

आपलें कर्तव्य (!) असें ठरवून त्यानें जाटास अभयपत्र दिलें.

४. हें वर्तमान सुरजमल जाटास कळतांच त्याला पुनर्जन्म झाला असें वाटलें. शिंदे अंग चोरून काम करूं लागल्याबरोबर वेढ्याचें काम नीट होईना. शिवाय बाहेरून जाटास दाणा, दारूगोळा इत्यादि सामानाचा पुरवठा होऊं लागला. शेवटीं जयाप्पानें राघोबास सांगितलें कीं, 'जाट जेरीस आला आहे. सध्यां तह करून मोकळे व्हावें. एका ठिकाणीं एवढी मोठी फौज फार दिवस गुंतवून निभावयाचें नाहीं.' थोड्याच दिवसांनीं जयाप्पास मारवाडांतील एका राजाकडून साहाय्य करण्याविषयीं बोलावणें आलें. तेव्हां जयाप्पानें कुंभेरीचा वेढा लवकरच संपविण्याविषयीं जास्तच नेट लाविला. या शिंद्याच्या वर्तनावरून मल्हाररावास मोठा राग आला व शिंदेहोळकरांमधील वितुष्ट वाढलें. त्यांच्यामध्यें यापुढें खरें सख्य असें केव्हांच झालें नाहीं. शिंदे आपलें सैन्य घेऊन गेल्यावर आपल्या एकट्यास जाटाचें पारिपत्य करणें जड जाईल हें मल्हारराव ओळखूनच होता. तेव्हां त्यानें जाटाशीं तह करून टाकण्यास संमति दिली. मग जयाजी शिंद्याच्या मध्यस्थीनें+ तीस लक्ष खंडणी ठरून तह झाला (वैशाख शु॥ ११ शके १६७६; १७।५।१७५४). नंतर होळकर व राघोबा उत्तरेस दिल्लीकडे गेले व शिंदे मारवाडांत गेले. मध्यंतरीं अहमदशहाची सुरजमल जाटास अंतःस्थ मदत असल्याचें उघडकीस आलें होतें. तेव्हां गाजीउद्दिनानें अहमदशहास पदच्युत करण्याचें ठरविलें. त्यानें मल्हारराव होळकराच्या मदतीनें प्रथम बादशहास दिल्लींत कोंडलें. मग बादशहा शरण आल्यावर त्याचे डोळे काढून त्याला कैदेंत टाकिलें व मोंगल राजवंशांतील दुसऱ्या एका इसमास 'आलमगीर' (दुसरा) ही पदवी देऊन गादीवर बसविलें (३ जुलै १७५४). लागलीच या नव्या बादशहानें गाजीउद्दिनास वजिरी दिली. दिल्लीस ही जी

× बाळाजी बाजीराव याची रोजनिशी, भाग १, पृष्ठ १४८.

राज्यक्रान्ति झाली ती मराठ्यांच्या साहाय्यामुळेंच गाजीउद्दिनास घडवून आणतां आली. यापुढें राघोबादादा आठ नऊ महिनेपर्यंत दिल्लीकडेच होता. मराठ्यांचीं रोहिलखंडांत व अंतर्वेदींत जीं ठाणीं होतीं त्यांत अम्मल बसविण्यांत त्यानें इतका वेळ घालविला. रोहिलखंडांत कुमाऊनच्या पहाडापर्यंत त्यानें स्वारी केली, मथुरा, वृंदावन इत्यादि हिंदूंचीं धर्मक्षेत्रें सोडविलीं, व गाजीउद्दीन वजिरास साहाय्य करून दिल्लीदरबारीं त्याचें वजन स्थिर केलें. इतकीं कामें करून राघोबा शके १६७७ च्या (सन १७५५) पावसाळ्याच्या आरंभीं पुण्यास परत आला.

---

६२ शिंद्यांचे मारवाडांतील पराक्रम.

शके १६७६–७७. (इ. स. १७५४–१७५५).

राजपुतान्यांत जोधपूरचें एक संस्थान आहे. तेथील राजा अभयसिंग हा शके १६७६त वारला. त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा रामसिंग हा राज्याचा वारस; पण तो जात्याच कमकुवत असल्यामुळें जोधपूरची गादी त्याचा कर्तृत्ववान् चुलतभाऊ बिजेसिंग यानें उपटली. तेव्हां रामसिंग आपल्या आयुष्याचे कंटाळवाणे दिवस अजमिरास घालवीत होता. शेवटीं त्याला युक्ति सुचली कीं, शिंद्यासारख्या बलिष्ठ सरदाराची मदत घेऊन आपली गादी मिळवावी. मग मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें त्यानें शिंद्याशीं बोलणें लाविलें व शिंद्यानेंही मारवाडावर स्वारी करण्याचा निश्चय केला.

२. जयाजी शिंदे प्रथम अजमिरास गेला. तेथें रामसिंग होता. त्याचीं व शिंद्याचीं तेथें करारपत्रें ठरलीं. जयाजीनें ही रजपुतांची

मसलत आपल्या एकट्याच्या अंगावर घेतल्यामुळें तो ती पार पाडण्याविषयीं फार उत्सुक झाला होता. त्यानें आपल्या सैन्यांतील मुख्य मुख्य लोकांचा दरबार भरवून मोठ्या वीरश्रीचें भाषण केलें. जीव गेला तरी बेहेत्तर, पण यश हें मिळविलेंच पाहिजे, असें त्यानें सर्व मंडळीस निक्षून सांगितलें. त्यानें सैन्याच्या दोन ठोळ्या केल्या. एक त्यानें आपल्या स्वतःच्या हाताखालीं घेतली व दुसरीवर त्यानें आपला धाकटा भाऊ दत्ताजी यास मुख्य नेमिलें. अशी व्यवस्था झाल्यावर मराठी फौज अजमिराहून कूच करून निघाली. तिकडे बिजेसिंगानें पन्नास हजार फौज जमविली व मेडतें या गांवीं तळ दिला. मराठे मेडत्यापासून दहा कोसांवर आले, तों बिजेसिंगही आपल्या सैन्याभोंवतीं तोफा लावून शिंद्याची वाट पहात मेडत्याबाहेर येऊन बसला. इकडून जयाप्पाही चालून गेला. दोन्ही सैन्यें कांहीं अंतरावर होतीं, तोंच तोफांच्या सरबत्तीस सुरुवात झाली. तिरांचा वर्षाव पावसासारखा होऊं लागला. धुरानें व धुळीनें दिशा धुंद झाल्या. कोणाचें तोंड कोणास दिसेना. घोडीं बिचकून स्वारांच्या हुकुमांत रहातनाशीं झालीं. असा आगीचा कडाका झाला. इतक्यांत दोन्ही सैन्यें जवळ जवळ आलीं. दोहोंकडून घोडेस्वार चवताळून चालून गेले. तोंच तलवारींचा खणखणाट होऊं लागला. रजपूत मोठ्या आवेशानें लढले. पण शेवटीं विजयश्रीनें मराठ्यांस माळ घातली. खुद्द बिजेसिंग एका खटाऱ्यांत बसून कसा तरी निसटून नागोरास गेला. मराठ्यांचे पांचसातशें लोक पडले व दीड हजार जखमी झाले. रजपुतांचे दोन हजार लोक ठार झाले.

३. जयाप्पानें मेडत्याची लढाई जिंकल्यावर नागोरास वेढा घालून बिजेसिंगास वठणीस आणण्याचा निश्चय केला; व वेळ न दवडतां नागोरास जाऊन मोर्चेबंदी केली. सर्व जमीन रेताड असल्यामुळें सुरुंग लावून तटाला खिंडारें पाडणें शक्य नव्हतें. मोर्चेबंदी चांगली

करून रसद बंद करावी म्हणजे शहर हस्तगत होईल, असें शिंद्यास वाटलें. सात आठ महिने झाले, पण शहर हस्तगत होईना. तेव्हां एके ठिकाणींच सर्व फौज गुंतवून ठेवणें बरें नव्हे, असा विचार करून त्यानें आपला मुलगा जनकोजी यास बरोबर देऊन रामसिंग यास मेडतें सर करण्याकरितां पाठविलें.

४. ईर्षेस पडून फार नुकसानकारक अशा लढाईंत पडण्यांत अर्थ नाहीं, अशा अर्थाचीं बाळाजी बाजीरावाचीं शिंद्यास सारखीं पत्रें येत होतीं. शिवाय सफदरजंग वजिरास साहाय्य केल्यापासूनच त्याच्याकडून काशी व प्रयाग हीं दोन्ही क्षेत्रें सोडवून घेण्याविषयीं बाळाजीचा शिंद्यास आग्रह होता. परंतु तें शिंद्याच्या हातून झालें नाहीं. आतां तरी सफदरजंगाचा मुलगा सुजाउद्दवला यास वजिरी देऊन क्षेत्रें सोडविण्याचें काम करून घ्यावें, असें बाळाजीनें शिंद्यास लिहिलें. पण तिकडे दुर्लक्ष करून नागोरचा वेढा जयाप्पानें चालविला. रजपुतांची रग जिरवून मग क्षेत्रें सोडविण्याचें जयाप्पाच्या मनांत होतें; पण तें साधलें नाहीं.

५. वेढ्यास सात आठ महिने झाले तरी शिंद्याची हिम्मत कायम होती; व त्यानें आपलें काम नेटानें चालविलें होतें. त्यामुळें विजेसिंग बराच जेरीस आला. त्यानें संरक्षणाकरितां इतर रजपूत संस्थानांची मदत मागितली. शेवटीं त्यानें जयाप्पाचा नुकताच प्रतिस्पर्धी बनलेल्या मल्हारराव होळकराचीही मदत मागितली. पण कोणीच साहाय्य करीना. तेव्हां मोंगलाई–मसलत करून आपला बचाव करण्याचें त्यानें ठरविलें, व जयाप्पाचा नीचपणानें घात करण्याकरितां तीन मारेकरी पाठविले. पूर्वी बिजेसिंगाचा चुलता अभयसिंग यानें पिलाजी गायकवाडाचा याचप्रमाणें नीचपणानें खून घडवून आणिला होता. शके १६७७च्या ज्येष्ठ वद्य७स (३०।६।१७५५) जयाप्पा चौरंगावर स्नान करून तोंडावर रुमाल टाकून डोळे चोळीत होता. इतक्यांत

बिजेसिंगाकडून गुप्तपणें आलेले तिघे मारेकरी घोड्यापुढें दाणे वेंचीत होते ते धांवले, व एकदम दोघांनीं दोन सुरे जयाप्पाच्या कुशींत खुपसले. त्याबरोबर जयाप्पा धाडकन् जमिनीवर पडला. जवळ अबदागिऱ्या होता. तो शरिरानें धष्टपुष्ट होता. त्यानें एक मारेकरी आपल्या कवेंत धरिला. दोघे पळाले. इतक्यांत लष्करांत बातमी समजून गडबड उडाली. एकजण सांपडला; पण दुसरा मात्र जीव घेऊन पळाला व त्यानें नागोर शहर गांठिलें. नंतर थोड्याच अवकाशांत जयाप्पाच्या खुनाची भयंकर बातमी दत्ताजीस कळली; तेव्हां त्यास अत्यंत दुःख झालें. जयाप्पाचा अजून प्राण गेला नव्हता. त्याला डेऱ्यास नेऊन दत्ताजी शोक करीत बसला. इतक्यांत ती बातमी नागोर गांवांत गेली; तेव्हां बिजेसिंगास नवीन दम चढला व तो फौजेसह मराठ्यांशीं युद्ध करण्यास निघाला. शत्रूची फौज चालून आली हें ऐकून मराठी फौजेंत जास्तच गोंधळ माजला. जयाजी शिंदे मोठ्या हिंमतीचा सरदार अजून सावध होता. डोळे उघडून पाहिलें तो धाकटा बंधु दत्ताजी शोक करीत असलेला दिसला. तेव्हां त्यास धीर देऊन तो बोलला. "वैरी युद्धास आला आणि तूं रांडेसारखा रडतोस ! हें क्षात्रधर्मास उचित नाहीं. आतां मजला कांहीं होत नाहीं. तुम्हीं शत्रूचा पराभव *करावा." या भाषणानें दत्ताजीस शत्रूची फार चीड येऊन तो फौजेची व्यवस्था करून रजपुतांशीं सामना देण्यासाठीं गेला. निकराचें युद्ध होऊन बिजेसिंग हटून गांवांत जाऊन बसला. मग दत्ताजी परत आला तों जयाप्पाचें प्राणोत्क्रमण झालें होतें. दत्ताजीनें फारच शोक केला. शेवटीं प्रेताचें दहन झालें. ताऊस सरोवर म्हणजे मोराचें सरोवर त्याजवळ जयाप्पाची छत्री आहे. थोड्याच दिवसांत जनकोजी मेडतें सर करून आला. बापाच्या मरणाच्या बातमीनें त्याचें अंतःकरण करपून गेलें. मग

* भाऊसाहेबांची बखर, पृष्ठ १५.

दत्ताजी व जनकोजी या दोघांनीं नागोरच्या वेढ्याचें काम जोरांत चालविलें. जयाजीच्या मृत्यूची बातमी पुण्यास समजतांच बाळाजीस फार वाईट वाटलें. त्यानें दत्ताजीस सांत्वनपर पत्र लिहून अंताजी माणकेश्वरास शिंद्याची कुमक करण्यास पाठविलें. अंताजी माणकेश्वर दहा हजार सैन्यानिशीं राजपुतान्यांत चालून गेला, व बिजेसिंगास मदत करणाऱ्या रजपूत संस्थानांत लूट करण्यास त्यानें सुरुवात केली. हा शह पोंचतांच बिजेसिंग कमजोर झाला. नागोरास अठरा महिने वेढा पडला होता. अखेरीस निरुपाय होऊन बिजेसिंगानें मराठ्यांशीं तह केला. त्यांत रामसिंगास नागोर, मेडतें वगैरे प्रांत मिळाले, व मराठ्यांस लढाईचा खर्च, अजमीर शहर व जवळचा कांहीं मुलूख मिळाला.

६ याच सुमारास बुंदीचा राजा वारला होता. त्याचा मुलगा लहान होता, तेव्हां इतर वारस उभे राहून राज्यांत घोटाळा होऊं लागला. तेव्हां त्या लहान मुलाच्या आईनें राज्याचा बंदोबस्त करण्याविषयीं दत्ताजीचें साहाय्य मागितलें. दत्ताजीस पैसा पाहिजे असल्यामुळें त्यानें साहाय्य करण्याचें ताबडतोब कबूल केलें. तेथें जाऊन बंडखोरास कैद करून पाऊणकोट रुपये कामाबद्दल घेऊन तो उज्जनीस आला. नंतर फौजेचा पगार चुकता करून दोघे चुलतेपुतणे मर्दुमकी गाजवून विजयध्वज फडकावीत चांभारगोंद्यास आले.

---

६३ मराठ्यांच्या आरमारास जबर धक्का.

(शके १६७७; इ. स. १७५५, ५६)

१. मराठ्यांचे कोंकणांतील मुख्य दर्यावर्दी अधिकारी आंगरे होत.

बाजीरावानें संभाजी व मानाजी या आंगरे बंधूंचा सन १७३५ त समेट करून दिला, तथापि त्या दोघां बंधूंचे तंटे मिटले नाहींत. पुढें संभाजी सन १७४१त मृत्यु पावला. त्याच्यामागून विजयदुर्गची व्यवस्था व सरखेल हें पद कान्होजीचा दासीपुत्र तुळाजी आंगरे याजकडे गेलें. तुळाजी शरिरानें भव्य व देखणा असून शूर व काटक असे. दर्यावर्दी कामांत तो पटाईत असल्यामुळें बाणकोटपासून सांवतवाडीपर्यंतच्या कोंकणपट्टींतील जंजिरे त्यानें बळकट राखिले होते व आपलें आरमार बलिष्ट ठेवून तो समुद्रसंचार करण्यास नेहमीं सिद्ध असे. तीस हजार फौज त्याजपाशीं जय्यत होती. त्याच्या तोफखान्यावर अनेक युरोपियन नोकर लष्करी व आरमारी कामें झटून करीत होते. त्याच्या आरमारांत साठांवर जहाजें असून हत्ती दारूगोळा व शस्त्रास्त्रें यांचा चांगला पुरवठा होता. शत्रूचीं जहाजें व बंदरें लुटून त्यानें अपार संपत्ति व सामुग्री मिळविली होती. कोणतेंही जहाज त्याच्या तावडींत सांपडलें म्हणजे सहसा सुटून जात नसे. तुळाजीच्या इंग्रजांशीं अनेक झटापटी झाल्या; त्यांत त्यानें इंग्रजांचीं अनेक जहाजें पकडलीं व विजयदुर्ग बंदरांत आणून ठेविलीं. अर्थातच इंग्रज आदिकरून पाश्चत्त्य व्यापाऱ्यांवर त्याचा विलक्षण वचक बसला. तो इतका कीं, तुळाजी आहे तेथवर आपला पश्चिम किनाऱ्यावर बिनधोक वावर होणें, आपल्या देशाशीं आपला व्यापार निर्वेध चालणें, किंबहुना आपलीं बंदरें आपल्या हातीं रहाणें शक्य नाहीं, असें इंग्रजांच्या मनानें घेतलें;व ते 'येन केन प्रकारेण' तुळाजीचें आरमार बुडविण्यास टपून बसले.

२. आंग्र्याच्या शक्तीस कान्होजीच्या मृत्यूपासूनच एक मोठें विघ्न उत्पन्न झालें होतें. तें विघ्न म्हटलें म्हणजे आंगरे बंधूंत माजलेला गृहकलह होय. शेवटीं या गृहकलहाच्या पायींच आंग्र्यांचा नाश झाला. शाहूनें तुळाजी व मानाजी या सावत्र बंधूंत समेट

करून देण्याचा प्रयत्न इ. स. १७४२त केला; पण तो सफल झाला नाहीं व त्या दोघां बंधूंची तेढ कायम राहिली. तुळाजी मर्द व कर्तबगार होता. त्यामुळें त्याच्यापुढें मानाजीचा एकव्याचा निभाव लागणें शक्य नव्हतें. तेव्हां मागाजीनें पेशव्यांचें साहाय्य घेऊन आपल्या प्रबळ बंधूपासून कसा तरी आपल्या मुलुखाचा बचाव करून घेतला. तुळाजी मोठा दर्यावर्दी असून त्यानें पश्चिम किनाऱ्यावर आपला चांगला दरारा बसाविला होता खरा. परंतु दमाजी गायकवाड व रघूजी भोंसले इत्यादि सरदारांप्रमाणें तो पेशव्यांशीं उद्दामपणानें वागत असे. बाळाजी बाजीरावाचा ताराबाईशीं तंटा चालू असतां तुळाजीनें ताराबाईची बाजू उचलून धरिली. पुढें ताराबाईस स्वस्थ बसावें लागलें व मराठी राज्याचा सर्व कारभार पेशव्यांच्या तंत्रानें होऊं लागला. तेव्हां तर तुळाजीनें पेशव्यांच्या सत्तेस अजीबात धुडकावून देऊन आपल्या मुलुखांतील ब्राह्मण प्रजेचा छळ चालविला. या वेळीं पेशव्यांचा कोंकणांतील सरसुभेदार रामाजी महादेव बिवलकर हा होता. त्याचे तुळाजीशीं एकसारखे खटके उडूं लागले. रामाजी महादेव मोठा कारस्थानी व दीर्घसूत्री असे. त्यानें आपल्या मनाशीं असें ठरविलें कीं, तुळाजीची सत्ता पुरती नाहींशी केल्याशिवाय आपल्याला या प्रांतांत स्वस्थता मिळावयाची नाहीं. १७४०त इंग्रजांनीं मानाजी आंग्ऱ्यास मदत केली होती, तेव्हांपासून मराठी दरबारांत इंग्रजांबद्दल अनुकूल मत झालें असून पुढें सन १७५१ त त्यांनीं कर्नाटकांत फ्रेंचांविरुद्ध जय मिळविले तेव्हां तर त्यांचा लौकिक खूप वाढला. तेव्हां इंग्रजांच्या मदतीनें तुळाजीस चीत करण्याचें रामाजी महादेवानें ठरविलें. एक तर बाळाजी बाजीरावाचा रामाजी महादेवावर पूर्ण विश्वास होता व कोंकणच्या कारभारांत प्रत्यक्ष लक्ष घालण्यास त्याला फुरसत नव्हती. अर्थातच त्यानें कोंकणचा कारभार रामाजी महादेवावर पूर्णपणें सोंपविला असल्यामुळें त्याच्या

तुळाजीस चीत करण्याच्या योजनेस पेशव्यांची सहज मंजुरी मिळाली.

३. तुळाजी मोठा धाडसी असून इंग्रज जहाजांवर हल्ले करून त्यांतील मालमत्ता लांबवीत असल्यामुळें त्याच्या विजयदुर्ग किल्ल्यावर चालून जाण्याचा इंग्रजांचा फार वर्षांचा मानस होता; व त्यांनीं एक दोन वेळां तसा प्रयत्न करून पाहिला; पण तुळाजीची जागरूकता व सामर्थ्य यांजपुढें इंग्रजांस हात टेकावे लागले. पुढें रामाजी महादेवाच्या विद्यमानें जेव्हां पेशव्यांनींच तुळाजीच्या पारिपत्याकरितां इंग्रजांची मदत मागितली तेव्हां मुंबईचा गव्हर्नर बुर्शियर यास आनंद झाला,व त्यानें लगबगीनें रामाजी महादेवाशीं तुळाजीच्या पारिपत्याबद्दलचा करार केला (१९ मार्च १७५५). त्या करारनाम्यांत पुढील मुख्य कलमें होतीं. (१) मोहिमेच्या वेळीं आरमार इंग्रजांच्या ताब्यांत असावें, परंतु सर्व कारभार उभयतांच्या संमतीनें चालावा. (२) तुळाजी आंग-याकडून जीं जहाजें काबीज होतील तीं इंग्रज-मराठ्यांनीं निम्मेनीम वांटून घ्यावीं. (३) मदतीबद्दल बाणकोट, हिंमतगड व तेथील सावित्री नदीच्या दक्षिण कांठावरील पांच गांवें इंग्रजांस मिळावीं.(४)आंग-याच्या किल्ल्यांत जें द्रव्य, सामान आणि दारूगोळा व तोफा इत्यादि लष्करी सामुग्री सांपडेल ती मराठ्यांस मिळावी.

४. आंग-याचें बळकट किल्ले सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग हे दोन होते. पहिल्यानें त्यांपैकीं सुवर्णदुर्ग घ्यावयाचें ठरलें. इंग्रजांचें आरमार वुइल्यम जेम्स याच्या हाताखालीं मुंबईहून निघालें. चौल बंदरांतून मराठी आरमारास मिळवून घेऊन तें सुवर्णदुर्गास पोंचलें. पण त्याच्या अगोदरच तुळाजीचीं जहाजें तेथून दक्षिणेकडे निघून गेलीं होतीं.तेव्हां दोस्तांच्या आरमारानें त्यांचा जयगडपर्यंत पाठलाग केला. पण कांहीं उपयोग न होतां तुळाजीचीं जहाजें दक्षिणेस निसटून गेलीं. नंतर परत येऊन इंग्रजांनीं समुद्रांतून सुवर्णदुर्गावर तोफांचा भडिमार चालविला.रामाजीपंताच्या फौजेनें जमिनीवर उतरून किल्ल्यावर मारा

केला. तेव्हां या दुहेरी मारामुळें चौथ्या दिवशीं किल्ला हस्तगत झाला (६ एप्रिल १७५५). इकडे समशेरबहादर व दिनकरपंत यांच्या हाताखालीं पुण्याहून फौज आली होती, तिनें खुष्कीवरून आंग-ऱ्याचा मुलूख व किल्ले काबीज करण्याचा सपाटा चालविला. पुढें मराठी फौजेनें रत्नागिरीस वेढा दिला. पण पावसाळा जवळ आला म्हणून इंग्रजी आरमार परत गेले व मोहिमेचें काम तहकूब राहिलें. पुढील वर्षी ॲडमिरल वॉटसन व कर्नल क्लाइव्ह हे जंगी आरमार व फौज घेऊन मुंबई बंदरांत दाखल झाले. विजयदुर्ग अत्यंत बळ-कट अशी ख्याति होती. तेव्हां बुर्शियरनें क्लाइव्ह व वॉटसन या प्रसिद्ध दुकलीची तो किल्ला घेण्यासाठीं रवानगी केली. पावसाळा संपल्याबरोबर मराठी फौजेनें खंडोजी माणकराच्या हाताखालीं विजय-दुर्गानजीक तळ दिला होता. जंगी इंग्रज आरमार आपल्या पारि-पल्याकरितां येतें असें कळतांच आपल्या लोकांकडून आपल्याला सवलती मिळतील असा विचार करून किल्ल्यावरून मराठी लष्क-रांत तहाचीं बोलणीं करण्याकरितां तुळाजी गेला. अर्थातच आतां विजय-दुर्गावर हल्ला करण्याचें कारण राहिलें नाहीं. पण द्रव्यलोभी इंग्रज अधि-काऱ्यांस हा विवेक कोठून सुचणार? मराठ्यांनीं एकट्यांनींच तुळाजीशीं बोलणीं सुरू करण्यांत करारांचीं कलमें मोडिलीं असा त्यांनीं गिल्ला सुरू केला व वॉटसननें समुद्रावरून व क्लाइव्हनें मराठी सैन्य व किल्ला यांज-मध्यें येऊन जमिनीवरून किल्ल्यावर मारा चालविला. जवळच खाडींत तुळाजीचें आरमार होतें, त्यांतील एका जहाजावर इंग्रजांनीं गोळे टाकिले. तेव्हां तें जळूं लागलें. लवकरच ती आग चोहोकडे पसरून आंग-ऱ्याचें सर्व आरमार भस्मसात् झालें. शेवटीं किल्ल्यांतील लोकांचाही नाइलाज होऊन ते इंग्रजांस शरण गेले. लागलीच इंग्रजांनीं तो किल्ला आपल्या ताब्यांत घेतला (१३।२।१७५६). मराठ्यांकडील कोणाही इसमास किल्ल्यांत न घेण्याची खबरदारी ठेविली, करारांतील कलमें

मोडून किल्ल्यांत लूट केली व मिळालेले दहा लाख रुपये दहा इंग्रज अधिकाऱ्यांनीं आपसांत वांटून घेतले. नंतर इंग्रज अधिकारी तुळाजीस आमच्या स्वाधीन करा असें रामाजी महादेवास म्हणूं लागले. पण त्यानें तसें करण्याचें साफ नाकारिलें. यापुढें तुळाजीस मृत्यूपर्यंत कैदेंत रहावें लागलें. प्रथम त्याला वंदन किल्ल्यावर ठेविलें होतें. तेथें त्यानें फंदफितुऱ्या केल्या, त्यावरून त्याची सोलापूरच्या किल्ल्यांत रवानगी झाली. तेथें तो मृत्यु पावला (इ. स. १७६९). त्याचे दोन मुलगेही कैदेंत होते. ते चौदा वर्षांनीं पळून मुंबईस गेले, तेव्हां इंग्रजांनीं त्यांना आश्रय दिला.

५. पुढें पहिल्या कराराप्रमाणें इंग्रजांस मुलूख द्यावयाचा, व पेशव्यांनीं विजयदुर्ग ताब्यांत घ्यावयाचा. पण इंग्रज विजयदुर्ग सोडण्यासच तयार होत ना. पेशव्यांनीं सुवर्णदुर्ग काबीज झाल्याबरोबर बाणकोट व पांच गांवें इंग्रजांच्या स्वाधीन केलीं होतीं. आतां बुर्शियर म्हणूं लागला कीं,तो मुलूख तुम्ही परत घ्या व त्याच्या बदलीं विजयदुर्ग आमच्याकडे राहूं द्या. यावर बाळाजी बाजीरावानें इंग्रजांस लिहिलें कीं, आम्हीं विजयदुर्ग किल्ला घेण्यासाठीं तर तुमची मदत घेतली आणि तोच आम्हीं तुम्हांस दिल्यावर लोक आम्हांस काय म्हणतील ? विजयदुर्ग आपल्याकडे राहूं दिल्यास गोव्याच्या पोर्तुगीजांपासून आम्ही तुमचें रक्षण करूं असेंही सांगण्यास इंग्रजांनीं कमी केलें नाहीं. दोन महिने एकसारखा तंटा चालला होता. शेवटीं इंग्रजांचे दोन वकील स्पेन्सर व बायर्फील्ड हे पुण्यास आले तेव्हां इंग्रज व पेशवे यांचा अठरा कलमी तह ठरला व या आंगरे प्रकरणाचा निकाल लागला (१२–१०–१७५६). ह्या तहांत पुढील कलमें मुख्य होतीं. "स्पेन्सर परत निघाल्यापासून चोवीस दिवसांच्या आंत इंग्रजांनीं विजयदुर्ग सोडावा; पेशव्यानें बाणकोट व जवळचे दहा गांव इतका मुलूख इंग्रजांच्या हवालीं करावा. पेशव्यानें इंग्रजांस मागील कोणत्याही बाबतीं-

बद्दल मागणी करूं नये व तुळाजीस घाटाखालीं मुळींच मुलूख देऊं नये. बाणकोटच्या खाडींत सिद्दी चौथाई जकात वसूल करी त्याची समजूत पेशव्यानें दुसरीकडे काढावी, व इंग्रजी मालावर मराठी राज्यांत पूर्वीपेक्षां अधिक जकात घेऊं नये." नंतर गोविंद शिवराम खाजगीवाले यास पाठवून पेशव्यानें विजयदुर्ग आपल्या ताब्यांत घेतला. यापुढें विजयदुर्ग हें पेशव्यांच्या आरमाराचें मुख्य ठिकाण झालें व आरमाराचा एक स्वतंत्र सुभा होऊन त्यास 'सुभा आरमार' असें नांव मिळालें. या सुभ्यावर दर्यावर्दी कामांत निपुण अशा अधिकाऱ्याची नेमणूक होई. आनंदराव धुळप या नामांकित दर्यावर्दी पुरुषाकडे मराठी आरमाराचें आधिपत्य सन १७६४ ते १७९४पर्यंत तीस वर्षें होतें. पेशव्यांनीं मानाजी आंगऱ्यास कुलाब्यास पूर्वीप्रमाणेंच कायम ठेविलें. मानाजीनें दरसाल दोन लक्ष खंडणी देण्याचें व जरूर लागेल तेव्हां सरकारचाकरी करण्याचें कबूल केलें. इ. स. १७५९त मानाजी वारला तेव्हां त्याचा मुलगा रघूजी याजकडे कुलाबा संस्थान व वजारतमाब हा किताब हीं चालू झालीं.

६. विजयदुर्ग परत देतांना इंग्रजांनीं केलेलें अकांडतांडव व एकंदर मोहिमेंतील त्यांचा शिरजोरपणा यांजवरून त्यांचा स्वार्थी हेतु बाळाजी बाजीरावाच्या लक्षांत आला. पुढें सिद्दीपासून जंजिरा घेण्याच्या कामीं पेशव्यांनीं मदत मागितली असतां इंग्रजांनीं ती देण्याचें साफ नाकारिलें. उलट मराठ्यांनीं जंजिऱ्यास वेढा घातला तेव्हां इंग्रजांनीं सिद्दीस धान्य व दारूगोळा यांचा पुरवठा केला. त्यामुळें जंजिरा मराठ्यांचे हातीं आला नाहीं (सन १७५९). उंदेरीसही मराठ्यांनीं वेढा घातला होता, तें बेट मात्र पुढील वर्षी सर झालें (सन १७६०). तुळाजी आंगरे इंग्रजांच्या जहाजांवर धाड घाली. अर्थातच त्याचा नाश होण्यांत इंग्रजांचा स्वार्थ गुंतला होता व म्हणूनच त्याचा मोड करण्यास पेशव्यास इंग्रजांनीं मदत केली. तुळाजीचा मोड झाल्यानंतर

सर्व कोंकणपट्टींत इंग्रजांवर वचक बसवूं शकेल असा कोणीच सत्ताधारी राहिला नाहीं. या दृष्टीनें परकीय इंग्रजांच्या मदतीनें तुळाजीचा मोड करण्यांत बाळाजी बाजीरावाच्या हातून भयंकर चूक झाली असें म्हणणें भाग पडतें. या वेळीं मराठी आरमाराच्या शक्तीस जबर धक्का बसला. त्यामुळें इंग्रजांस सर्व पश्चिम किनारा उघडा सांपडला. पुढें पानिपतावर अफगाण व मराठे यांजमध्यें तुंबळ युद्ध होऊन मराठी सत्ता व दिल्लीची मुसलमानी सत्ता या दोन्ही हीनबल झाल्यामुळें हिंदुस्थानच्या अन्तर्गत राजकारणांतही आपलें घोडें दामटण्यास इंग्रजांस आयती संधि मिळाली. तुळाजीच्या दराऱ्यामुळें पश्चिम किनाऱ्यावर इंग्रजांची गडबड बंद होती. पुढें पानिपतनंतर पश्चिम किनाऱ्यावरील वळकट ठिकाणें घेण्याच्या खटपटीस ते लागले. सन १७६५त यशवंतगड व शिवाजीनें मोठ्या उमेदीनें बांधिलेला सिंधुदुर्ग हे दोन्ही जंजिरे इंग्रजांनीं काबीज केले. ते कोल्हापूरकरांच्या ताब्यांत होते, त्यांस इंग्रजांविरुद्ध चरफडण्याखेरीज दुसरा कांहीं मार्ग राहिला नाहीं. येणेंप्रमाणें आरमाराकडे पेशव्यांचें दुर्लक्ष झाल्यामुळें व चांगल्या स्थितींत असलेलें तुळाजी आंग्र्याचें आरमार त्यांनीं बुडविल्यामुळें इंग्रज शेर झाले व त्यांना गप्प बसविण्याचें सामर्थ्य कोणाच्याही अंगीं राहिलें नाहीं. कदाचित् दिल्लीची व्यवस्था केल्यावर इंग्रजांचा बंदोबस्त करण्याचा बाळाजीचा हेतु असेल व पानिपतावर बाजू अंगलट आल्यामुळें त्याचे सर्व बेत फिसकटले असें म्हणतां येईल. परंतु प्रत्यक्ष परिणामावरून पाहतां पेशव्यानें मराठी आरमार बलिष्ठ व पाश्चात्त्यांच्या बरोबरीचें करण्याचा प्रयत्न केला नाहींच, उलट बलिष्ठ आरमार बाळगून असलेल्या तुळाजीस परकीय इंग्रजांच्या मदतीनें बुडविलें यांत रामाजी महादेव बिवलकर याजवर विसंबून त्यानें अत्यंत अदूरदृष्टि दाखविली असेंच म्हणणें ओघास येतें. तुळाजी

आंगऱ्यासारख्या शूर, कर्तबगार, बाणेदार व उत्कृष्ट दर्यावर्दी पुरुषाच्या गुणांचा राष्ट्रास उपयोग झाला नाहीं व येवढा मोठा मोहरा फुकट गेला हा दैवदुर्विलास होय.

६४. मराठी राज्याचा कर्नाटकांत विस्तार.

मराठ्यांची कर्नाटकावरील पहिली स्वारी बाजीराव पेशव्याच्या हस्तें शके १६४७—४८ (इ. स. १७२६) त झाली. पुढें उत्तर प्रांतांतील मोहिमा करण्यांतच त्याचा काळ गेला. शके १६६२ (इ. स. १७४१) त रघूजी भोंसल्यानें पूर्व कर्नाटकची स्वारी केली; त्यावर सदाशिवरावभाऊनें बहादुरभेंडा घेतला ती एक स्वारी झाली. शिवाजीच्या ताब्यांत जे प्रांत होते त्यांस स्वराज्य म्हणत. या स्वराज्यांत तुंगभद्रेपर्यंतचा मुलूख येऊन तिच्या दक्षिणचे–शिरें, बंगळूर होस्कोटे, कोल्हार, बाळापूर हे पांच परगणे व पाइनघाटांतील बारामहाल, जिंजी, वेलोर इत्यादि प्रांत व स्थळें आणि तंजावरपैकीं शिवाजीचा हिस्सा, इतका मोठा कर्नाटकाचा भाग अन्तर्भूत होत होता. चौथाई, सरदेशमुखी व स्वराज्य यांच्या सनदा महंमदशहापासून बाळाजी विश्वनाथानें आणल्याचें मागें सांगितलेंच आहे. पण 'स्वराज्याची' सनद मिळाली म्हणजे औरंगजेबानें जिंकून घेतलेलें सर्व 'स्वराज्य' परत मराठ्यांच्या हातांत आलें असें नाही. औरंगजेबापासून मुख्य महाराष्ट्राचें मराठे रक्षण करितात तोंच शाहूची सुटका होऊन मराठ्यांची आपसांत दुही माजली. पुढे निजामुल्मुल्क हैद्राबादच्या गादीवर येऊन मराठ्यांची सत्ता संपुष्टांत अणण्यास त्यानें आरंभ केला. त्यावरून बाजीराव पेशव्याचें लक्ष निजामाचा मोड करण्यांत गुंतलें. त्यानें निजामाचा पुरा मोड करून माळवा हाताखालीं घातला, व दिल्ली-

पर्यंत स्वाऱ्या केल्या. बाळाजी बाजीरावाचीही निर्म्मा कारकीर्द उत्तरेकडचा बंदोबस्त व शाहूच्या मृत्यूमुळें उत्पन्न झालेला घोटाळा मोडण्यांत गेली. तें झाल्यावर हैद्राबादची सत्ता खिळखिळी करून टाकण्याची बाळाजीनें खटपट केली. भालकीचा तह झाल्यावर बाळाजीस जरा स्वस्थता मिळाल्यामुळें त्यानें आपला मोर्चा कर्नाटकाकडे वळविला. शके १६७५ (इ. स. १७५३) पासून दरवर्षी मराठ्यांची स्वारी कर्नाटकावर होऊं लागली.

२ कर्नाटकाकडे मराठ्यांचें दुर्लक्ष झाल्यामुळें त्या प्रांतींचें नबाब व पाळेगार आडदांड बनले होते. कृष्णा व तुंगभद्रा यांचेमधील दुआबांत सावनूरच्या नबाबाचा अंमल फैलावला होता. तुंगभद्रेखालीं कर्नूल व कडप्पा येथील नबाब व म्हैसूरचें राज्य हीं बळावलीं होतीं. तुंगभद्रेच्या खालचे मराठ्यांच्या स्वराज्यांतील बरेंच परगणे कडप्याच्या नबाबानें घेतले होते. गुत्तीस संताजी घोरपड्याच्या वंशांतील मुरारराव घोरपडे याचा अंमल होता, परंतु तो मुख्य सत्तेशीं मिळून वागत नसे. शिवाय बिदनूर, सोंधे वगैरे तद्देशीय लोकांचीं संस्थानें होतीं. पेशव्यांच्या स्वाऱ्या सुरू झाल्या त्या वेळीं कर्नाटक प्रांताची अशी स्थिति होती.

३. पेशव्यांनीं शके १६७५ पासून श्रीरंगपट्टण, होळिहुन्नूर व बिदनूर, या ठिकाणांवर तीन वर्षेपर्यंत अनुक्रमानें स्वाऱ्या केल्या. शके १६७७ च्या शेवटीं (इ. स. १७५६) बाळाजीनें सावनूरची स्वारी केली. ही मोहीम मोठी जंगी होती. तिचें कारण असें कीं, मुझफरखान नांवाचा एक गारद्यांचा सरदार पेशव्यांच्या नोकरीस होता; तो महादाजी अंबाजी पुरंदरे याजबरोबर एकदां कर्नाटकांत गेला असतां त्याच्याशीं भांडून सावनूरच्या नबाबापाशीं जाऊन राहिला. पेशव्यानें मुझफरखानास आपल्या स्वाधीन करण्याविषयीं सावनूरच्या नबाबास मागणें घातलें. तें नबाबानें ऐकिलें नाहीं. तेव्हां उभयपक्षीं युद्धाची

तयारी झाली. गुत्तीकर मुरारराव घोरपडे व कडपे-कर्नूळचे नबाब हे सावनूरकरास मिळाले. सदाशिवरावभाऊ व बाळाजी मोठी फौज घेऊन सावनुरास गेले व तावडतोब त्यांनीं सावनुरास वेढा घातला. सलाबतजंगही सैन्यासह पेशव्यास येऊन मिळाला. सावनुरावर कित्येक महिनेपर्यंत मोठ्या जारीनें लढाई सुरू होती. शेवटीं मुरारराव्याच्या मध्यस्थीनें सावनूरकर पेशव्यास शरण आला. पूर्वी भाऊनें बहादुरबेंड्याची स्वारी केली होती; त्या वेळीं सावनूरच्या नबाबापासून छत्तीस परगणे घेतले होते. या वेळीं नबाबानें मराठ्यांस आणखी कांहीं मुलूख दिला, व अकरा लक्ष रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें. सोंधें व बिदनूर या दोन संस्थानांपासून खंडणी घेण्याचा आपला हक्कही त्यानें मराठ्यांस देऊन टाकिला. मग पेशव्यानें गोपाळराव गोविंद पटवर्धन यास सोंध्याची खंडणी वसूल करण्याकरितां पाठविलें; व आपण स्वतः तुंगभद्रेच्या दक्षिणतीरीं बिदनुरास जाऊन तेथील खंडणी घेऊन परत पुण्यास गेला. दहा वर्षांपूर्वी मराठ्यांच्या स्वराज्याची सरहद्द कृष्णेवर होती ती आतां तुंगभद्रेपर्यंत येऊन पोंचली.

४. शके १६७८ (जानेवारी १७५७) च्या शेवटीं बाळाजी व सदाशिवरावभाऊ, साठ हजार फौजेसह कर्नाटकच्या स्वारीस निघाले. वाटेनें त्यांस मुरारराव घोरपडे सहा हजार फौजेनिशीं मिळाला. त्यांनीं म्हैसूरचें राजधानीचें शहर श्रीरंगपट्टण यास वेढा दिला. वेढा बसण्यापूर्वी तेथील राजाचा दिवाण नंदराज यानें थोडी रक्कम देऊन शहरास वेढा न घालण्याबद्दल पेशव्यांची फार विनवणी केली. परंतु पेशव्यांनीं त्याचें म्हणणें न ऐकतां शहरास वेढा दिला व तीस तोफांचा मारा त्या शहरावर सुरू केला. नंदराजानेंही पुष्कळ दिवस मोठ्या नेटानें त्या स्थळाचें संरक्षण केलें. परंतु त्याचा कांहीं उपाय न चालून शेवटीं तें शहर काबीज होण्याच्या बेतास आलें. इतक्यांत एके दिवशीं असें झालें कीं, त्या शहरांत श्रीरंगाचें देवालय प्रसिद्ध आहे,

त्याच्या शिखरास बाहेरील तोफेचा गोळा लागून शिखर मोडलें व त्याच वेळीं बाहेरच्या तोफखान्यांतील एक तोफ फुटून किल्येक गोलंदाज ठार झाले. तेव्हां उभयपक्षीं हा अपशकुन झाला असें ठरविण्यांत येऊन तहाचें बोलणें सुरू झालें. त्यांत बत्तीस लक्ष रुपये खंडणी घेऊन मराठ्यांनीं वेढा उठविण्याचें कबूल केलें. नंदराजानें रोख पांच लक्ष रुपये दिले व बाकीच्या रकमेच्या फेडीबद्दल उत्तम सुपीक असे चौदा महाल मराठ्यांकडे लावून दिले. पेशव्यांनीं या चौदा महालांचा वसूल करण्याकरितां कमाविसदार नेमिले, व त्यांच्या बंदोबस्तास सहा हजार फौज ठेवून स्वराज्याचे पांच परगणे सोडविण्याचें काम हातीं घेतलें. प्रथम बाळाजीनें शिरें काबीज केलें. इतक्यांत पावसाळा जवळ आल्यामुळें बाकीचे प्रांत जिंकण्याचें काम बळवंतराव गणपत मेहेंदळे या सरदारावर सोंपवून बाळाजी पुण्यास परत आला.

५. कडप्याचा नबाब प्रबळ होता. मराठ्यांचें त्या प्रांतांतील बहुतेक 'स्वराज्य' त्यानेंच लाटलें होतें. बळवंतरावानें आपली मोहीम भर पावसाळ्यांतच सुरू केली. कडप्याच्या नबाबानें, सावनूर व कर्नूळ येथील नबाब, मुरारराव घोरपडे व त्या देशींचे पाळेगार, या सर्वांस मराठ्यांविरुद्ध चेतवून आपल्या पक्षास मिळवून घेतलें. त्यानें मद्रासकर इंग्रजांसही मदतीस बोलाविलें. मराठ्यांचें जूं झुगारून देण्याची सर्वांची इच्छा होती. परंतु ते सर्व एक होण्याच्या पूर्वीच बळवंतरावानें आश्विन महिन्यांत कडप्याच्या नबाबास एकटेंच गांठलें. त्या प्रसंगीं बळवंतरावाचा जय होऊन कडप्याचा नबाब मारला गेला व हजारों पठाणांची कत्तल उडाली. त्या नबाबाचा मुलगा मोठ्या हिंमतीनें लढला, तथापि शेवटीं त्याचा पराभव करून मराठ्यांनीं अर्धें राज्य काबीज केलें. मग बळवंतरावानें अर्काटच्या नवाबास खंडणी देण्याचा तगादा लाविला. मद्रासचें इंग्रज त्या नबाबाचे साहाय्यकारी असल्यामुळें त्यानें बरेच आढेवेढे घेतले. पण शेवटीं त्याला साडेचार लक्ष खंडणी मरा-

ऱ्यांस द्यावी लागली.

६. याच सुमारास बिदनूरच्या संस्थानांत घोंटाळा माजला होता. स्वराज्याचे प्रांत सोडविल्यावर तें संस्थान पादाक्रांत करण्याची बळवंतरावास पेशव्यांची आज्ञा होती. म्हैसूरचा दिवाण नंदराज यानें हैदर नांवाच्या आपल्या राज्यांतील एका सरदाराच्या सूचनेवरून मराठ्यांस दिलेले परगणे परत घेऊन तेथें आपला अम्मल बसविला होता. तेव्हां म्हैसूरवर स्वारी करणें अवश्य होतें. पुढील वर्षी म्हैसूरवर बळवंतरावानें स्वारी करावी असा बाळाजीचा बेत होता, व गोपाळ गोविंद पटवर्धन याच्या हाताखालीं दहा हजार फौज देऊन त्यास बळवंतरावाच्या मदतीस बाळाजी पाठविणार होता; परंतु इतक्यांत महाराष्ट्रांत काम निघाल्यामुळें गोपाळरावास तर पाठवितां आलें नाहींच, पण उलट बळवंतरावास सर्व फौज घेऊन ताबडतोब निघून येण्याविषयीं हुकूम पाठवावा लागला (फाल्गुन, शके १६७९).

७. म्हैसूरकरानें चौदा परगणे परत घेतले, याचा पेशव्यास अत्यंत राग आला होता. तेव्हां त्यानें संधी सांपडतांच गोपाळराव गोविंद पटवर्धन व आनंदराव रास्ते या दोघां सरदारांच्या हाताखालीं शके १६८० च्या शेवटीं कर्नाटकांत फौज पाठवून दिली. त्या फौजेनें पहिल्यानें चौदा परगणे परत घेऊन तेथें आपलीं ठाणीं बसविलीं, मग थेट बंगलूरला जाऊन त्या शहरास वेढा दिला. त्या फौजेपैकीं एका टोळीनें जंगली मुलुखांतून पश्चिमेकडे वळून चेनापट्टण हें ठाणें सर केलें. इतक्यांत म्हैसूरकरानें हैदराच्या हाताखालीं फौज देऊन त्यास मराठ्यांशीं लढण्यासाठीं पाठविलें. हैदरनें मोठ्या हिकमतीनें मराठ्यांपासून चेनापट्टण परत घेतलें. नंतर तीन महिनेपर्यंत मराठ्यांच्या व त्याच्या एकसारख्या चकमकी होत होत्या. शेवटीं दोन्ही बाजू युद्धास कंटाळल्या व तह ठरला. मराठ्यांनीं म्हैसूरकरांपासून वर्त्तीस लक्ष रुपये खंडणीदाखल घ्यावे व चौदा महाल सोडावे असा

करार झाला. लागलीच हैदरनें सोळा लक्ष रुपये रोख दिले, व बाकीच्या सोळा लक्षांबद्दल मराठ्यांच्या लष्करांतील सावकारांची हमी दिली. येणेंप्रमाणें कर्नाटकांत जंगी फौज न गेल्यामुळें म्हैसूर-कराशीं आंतबट्ट्याचा तह करावा लागला, व त्या प्रांतीं मराठी अंमल बसविण्याचें काम अर्धवट राहिलें !

---

६५. निजामच्या दरबारशीं तंटा.

हैद्राबादचा निजाम सलाबतजंग फ्रेंचांच्या मदतीनें गादीवर बसला होता (शके १६७२; इ. स. १७५१ जानेवारी). त्याच्या अंगांत विशेष कर्तृत्व नव्हतेंच. त्यामुळें डुप्लेनें त्याच्याबरोबर दिलेल्या बुसी या फ्रेंच सरदाराचें वजन अतोनात वाढलें. शिवाय बुसीजवळ कवाईत शिकलेलें सैन्य व उत्तम तोफा असल्यामुळें तो म्हणेल ती पूर्व-दिशा,अशी निजामच्या दरबारची स्थिति झाली होती.हा फ्रेंचांचा वाढता अधिकार सलाबतजंगाचा दिवाण शहानवाजखान यास नकोसा झाला होता. बाळाजी बाजीराव सावनूरच्या मोहिमेवर असतां निजाम त्याच्या मदतीस गेला होता. तेथें बुसीही बरोबर होता. बाळाजीसही निजामाच्या दरबारीं फ्रेंचांची सत्ता वाढणें इष्ट नव्हतें. 'तुझ्या चाकरीची निजामास गरज नाहीं,' असें सावनूर हातीं आल्यावर थोड्याच दिवसांनीं बुसीस कळविण्यांत आलें. तेथें बुसी शत्रूंच्या तावडींत सांपडल्यामुळें त्याला मुकाट्यानें आपला रस्ता सुधारणें भाग पडलें. बुसीनें सावनुराहून निघतांच आपली स्थिति पांडिचरीस कळविली, व आणखी सैन्य मदतीस बोलाविलें. मग हैद्राबादेस जाण्याचा त्यानें निश्चय केला. बुसी निघाला तेव्हां त्याच्या पाठलागास जानोजी निंबाळकर व

+रामचंद्र जाधव यांना नेमिलें. त्यांनीं सुरतेहून बुसीच्या मदतीस येणाऱ्या सहाशें सिद्दी लोकांचीं लेधा उडविली. शेवटीं बुसी हैद्राबादेस पोंचला. तेथें त्याच्याभोंवतीं जमलेल्या निजामाच्या सैन्यापासून त्याला आपलें संरक्षण करावयाचें होतें. त्यानें निजामाकडील रामचंद्र जाधव व जानोजी निंबाळकर या दोघां मराठे सरदारांस युक्तीनें आपल्या बाजूकडे वळविलें. इतक्यांत मच्छलीपट्टणाहून निघालेलें सैन्य त्याच्या मदतीस येऊल पोंचलें. त्याबरोबर सलाबतजंगानें त्याच्याशीं समेट केला (१३।११।१७५६); व यापुढें निजामच्या दरबारांत फ्रेंचांच्या सल्ल्याशिवाय एक पानसुद्धां हलेनासें झालें.

२. गोदावरी नदीच्या मुखाजवळचा उत्तर-सरकार हा प्रांत फौजेच्या खर्चासाठीं सलाबतजंगानें फ्रेंचांस सन १७५३पासून तोडून दिला होता; शके १६७८ (इ. स. १७५६) च्या शेवटीं त्याची व्यवस्था लावण्यास बुसी गेला. तो गेल्यावर शहानवाजखानानें रामचंद्र जाधवापासून मागें फ्रेंचांस मदत केल्याबद्दल बरीच जहागीर हिसकून घेतली. यापुढें शहानवाजखान व बाळाजी बाजीराव या दोघांनीं एक गुप्त मसलत योजिली. सलाबतजंगास दोघे भाऊ होते. एक बऱ्हाणपूरचा सुभेदार निजामअली व दुसरा अदोनीचा सुभेदार बसालतजंग. त्यांपैकीं बसालतजंग शके १६७९ च्या पावसाळ्यांत सलाबतजंगाजवळ राहिला होता, व त्या दोघां भावांनीं पावसाळ्यांत औरंगाबादेस ठाणें दिलें होतें. पेशवे व शहानवाजखान या दोघांसही सलाबतजंगाच्या कमकुवतपणामुळें तो गादीवर आहे तेथवर फ्रेंचांस घालवून देणें अशक्य आहे, असें वाटूं लागलें होतें. म्हणून त्यांनीं अशी मसलत काढली कीं, सलाबतजंगास दौलताबादच्या किल्ल्यांत कैदेत ठाकावयाचें, बसालतजंग किंवा निजामअली यांपैकीं एकास गादीवर बसवावयाचें आणि मग फ्रेंचांची हकालपट्टी करावयाची.

+चंद्रसेन जाधवाचा मुलगा.

३. या मसलतीप्रमाणें निजामच्या लष्करांतील शिपायांनीं, आमच्या पगाराची बाकी द्या व शहानवाजखानास दिवाणगिरीवरून काढून बसालतजंगास दिवाण नेमा, अशी मागणी करून एक खोटेंच बंड उभारलें. सलाबतजंगानें त्यांच्या म्हणण्याप्रमाणें करण्याचें ठरविलें. तरी सैन्यांतील दंगा मोडेना. शहानवाजखानास दौलताबादेच्या किल्ल्याचा आश्रय करावा लागला. तेथें सैन्यानें वेढा घातला व शहानवाजखान स्वतःचा बचाव करूं लागला. दौलताबादेस सलाबतजंग शहानवाजखानाचें सांत्वन करण्याकरितां जाईल व मग तेथें त्याला पकडून ठेवणें सोईचें होईल अशी ही मसलत होती. परंतु कांहीं हितचिंतकांनीं वेळींच इशारा दिल्यामुळें सलाबतजंग दौलताबादेस गेला नाहीं. शहानवाजखान किल्ल्याचें रक्षण करण्याकरितां गोळे सोडूं लागला. सलाबतजंगानें शहानवाजखानाचें रक्षण करण्याचें कबूल केलें; परंतु त्यानें किल्ला न भांडवितां शरण यावें असा आग्रह धरला. इकडे शहानवाजखान शरण न येतां किल्ला भांडविण्याची जास्तच तयारी करूं लागला; अशी ही मसलत बदलली. तेव्हां शहानवाजखानानें आपलें रक्षण करण्याविषयीं बाळाजीस लिहिलें.

४. सलाबतजंगानें किल्ला घेण्यासाठीं आपला भाऊ निजामअली यास बऱ्हाणपुराहून बोलाविलें. इतक्यांत बाळाजीनें निजामच्या दरबारीं कारस्थानें चालवून दौलताबादचा वेढा उठविला व निजामअलीस परत जाण्याविषयीं निजामाकडून लिहविलें. या वेळीं त्यानें, मराठ्यांची फौज आपला मुलगा विश्वासराव आणि जनकोजी व दत्ताजी शिंदे यांच्या हाताखालीं गोदावरीच्या दक्षिणतिरीं ठेवून दिली होती. निजामानें परत जावें असें लिहिलें तरी निजामअली परत न जातां तसाच औरंगाबादेस आला. खाद्दून रामचंद्र जाधवही निजामच्या सैन्यास मिळण्याकरितां वर जाऊं लागला. निजामाचें सैन्य एकत्र जमूं लागलें, असें पाहतांच विश्वासरावानें रामचंद्र जाधवाच्या सैन्यावर एकदम

हल्ला करून त्याला शिंदखेडांत कोंडलें. त्याची बातमी औरंगाबादेस पोंचल्यावर सलाबतानें स्वतः न हालतां निजामअलीस रामचंद्राच्या मदतीस पाठविलें. शिंदखेडाजवळ निजामअली येतांच त्याची व मराठ्यांची निकराची लढाई झाली. तींत दत्ताजी शिंद्यानें अतिशयच पराक्रम केला. निजामअलीचा मोड होऊन त्यानें तहाचें बोलणें लाविलें. या तहानें मराठ्यांस पंचवीस लक्ष रुपयांचा मुलूख मिळाला. निजामाच्या राज्यांत राज्यक्रांति घडवून आणण्याचा बेत जरी सिद्धीस गेला नाहीं, तरी मराठ्यांस मुलूख मिळून फायदा झालाच. शिवाय राजक्रांतीचा मुख्य उद्देश जें फ्रेंचांचें उच्चाटन तें थोड्याच दिवसांनीं आपोआप घडून आलें. मद्रासकडे फ्रेंच सत्तेच्या जिवावरच बेतल्यामुळें बुसीस निजामच्या दरबारांतून परत बोलावण्यांत आलें (जून १७५८); व तिकडे पुढें थोड्याच दिवसांनीं इंग्रज व फ्रेंच यांची वांदिवाश येथें लढाई होऊन तींत फ्रेंचांचा सपशेल पराभव झाला (जानेवारी १७६०).

---

६६. भगवा झेंडा अटकेवर फडकतो !

शके १६८० (सन १७५८).

वजीर गाजीउद्दीन याचें मराठ्यांच्या साहाय्यामुळें दिल्लीदरबारीं मोठें प्रस्थ माजलें दुसरा आलमगीर हा नांवचा बादशहा असून गाजीउद्दिनाच्या हातांतील बाहुले बनला. हा मराठ्यांच्या आश्रयानें गाजीउद्दिनाचा वाढता अधिकार कित्येक मुसलमानांस रुचला नाहीं. अशा मत्सरग्रस्त लोकांत गाजीउद्दिनानेंच प्रसिद्धीस आणलेला नजीबखान रोहिला प्रमुख असून तो आपल्या धन्याविरुद्ध कारस्थानें करूं लागला.

त्यानें अफगाणिस्थानचा बादशहा अहमदशहा अबदाली यास गाजीउद्दिनाचें पारिपत्य करण्याकरितां बोलाविलें. अबदालीनें पूर्वीच्या स्वारींत लाहोर व मुलतान हे दोन प्रांत घेतले होते; ते वजीर गाजीउद्दिनानें परत घेतले होते. तेव्हांपासून अबदाली स्वारी करून येणारच होता. तो शके १६७८ (सन १७५६)चा पावसाळा संपतांच हिंदुस्थानांत उतरला. त्यानें आल्याबरोबर अगोदर लाहोर व मुलतान हे प्रांत हस्तगत केले व सतलज नदी उतरून तो सरहिंदास आला. तेव्हां वजीर अगदीं घाबरून गेला. अबदालीनें दिल्लीवर चाल करून बादशहा व गाजीउद्दीन या दोघांसही कैद केलें व शहर लुटलें.

२. अहमदशहा अबादली हिंदुस्थानांत आला, ही बातमी ऐकतांच बाळाजी बाजीरावानें राघोबा गुजराथेंत होता त्यास उत्तर हिंदुस्थानांत चालून जाऊन अबदालीचें पारिपत्य करण्याविषयीं लिहिलें. त्याप्रमाणें राघोबा सखारामबापूसह उत्तरेकडे जाण्यास निघाला. वाटेंत इंदुरास मल्हारराव होळकर त्याला मिळाला. अबदालीचें पारिपत्य चांगल्या रीतीनें करतां यावें म्हणून दत्ताजी शिंद्याची रवानगी लवकरच करून देण्याबद्दल राघोबानें बाळाजीस लिहिलें. राघोबा उत्तरेकडे जात असतां अबदाली दिल्लीहून खालीं आला. त्यानें मथुरा लुटली व आग्र्यास वेढा घालून तो किल्ला हस्तगत केला. यापुढें, बंगाल प्रांत घेऊन दक्षिणेवर स्वारी करण्याचा त्याचा बेत आहे, अशा बातम्या उठल्या होत्या. त्यामुळें चहूंकडे गडबड उडून गेली होती. पण अबदालीच्या लोकांस इकडला उन्हाळा सहन न झाल्यामुळें अबदाली उन्हाळ्याच्या आरंभींच परतला. मग त्यानें आग्र्यापुढें न येतां दिल्लीस जाऊन आलमगिरास गादीवर कायम केलें. गाजीउद्दिनास वजिरी सांगून व नजीबखानास बक्षीगिरी देऊन तो परत स्वदेशास जाण्यास निघाला. गाजीउद्दीन व नजीबखान या दोघांच्या चढाओढींत दिल्लीदरबारीं आपला शह कायम राहील अशी

अबदालीची अटकळ होती. पुढें त्यानें सरहिंद येथें समदखानाच्या हाताखालीं दहा हजार फौज ठेवून दिली. नवीन जिंकलेल्या लाहोर व मुलतान या प्रांतांवर आपला मुलगा तैमूरशहा यास ठेविलें व त्याच्या दिमतीस जहानखान याची नेमणूक केली. नंतर अबदाली अफगाणिस्थानांत परत गेला (एप्रिल १७५७).

३. इकडे वजीर गाजीउद्दिनाचें नजीबखानाशीं मुळींच पटत नव्हतें; तेव्हां त्यानें राघोबा व मल्हारराव होळकर यांस दिल्लीकडे लवकर चालून येण्याविषयीं निकड लाविली. त्यावरून शक्य तितक्या त्वरेनें राघोबा दील्लीप्रांतीं येऊन दाखल झाला (जून १७५७). अबदाली अगोदर परत गेल्यामुळें राघोबास त्याच्या स्वारीमुळें दिल्लीदरबारीं मराठ्यांचें वजन उठलें होतें तें पुनः स्थापित करण्याचें तेवढें काम राहिलें. दिल्ली शहर नजीबखानाच्या ताब्यांत होतें व बादशहा आलमगीर त्याच्या तंत्रानें वागत असे. तेव्हां दिल्ली कबीज करण्यासाठीं राघोबानें विठ्ठल शिवदेव दाणी (विंचूरकर) याची रवानगी केली. नजीबखानानें पंधरा दिवसपर्यंत तो किल्ला भांडविला. शेवटीं विठ्ठल शिवदेवानें मोठा पराक्रम करून दिल्ली हस्तगत केली. या वेळीं नजीब मराठ्यांच्या हातीं सांपडला होता व त्याची पुरती खोड मोडण्याचा राघोबाचा बेत होता. पण मल्हारराव होळकर त्याला आपला ' धर्मपुत्र ' मानीत असल्यामुळें तो बचला. आतां मराठ्यांचा पक्षपाती गाजीउद्दीन याची सत्ता दिल्लींत स्थापित झाली व बादशहा त्याच्या हातीं आला. दिल्ली कबीज करितांना गाजविलेल्या पराक्रमाबद्दल विठ्ठल शिवदेवास बादशहाकडून पोषाख, जवाहीर, उमदेतुल्मुल्क हा किताब व चांदवड तालुक्यांत विंचूर आदिकरून गांव जहागीर मिळाले. तेव्हांपासून विठ्ठल शिवदेव विंचूरकर या नांवानें तो प्रसिद्ध झाला. स्वतः राघोबा पावसाळा लागण्याच्या सुमारास दिल्लीस येऊन पोंचला. त्यानें तो सबंध पावसाळा दिल्लीदरबारीं

गाजीउद्दिनाच्या मदतीनें बंदोबस्त करण्यांत घालविला. पुढें काशी, प्रयाग घेऊन बंगालवर चालून जाण्याचा त्याचा विचार होता. परंतु लाहोर व मुलतान हे परगणे अबदालीच्या हातांतून अगोदर सोडविण्याचें ठरल्यामुळें तो बेत राहिला. मग राघोबा लाहोरकडे चाल करून गेला. वाटेंत सरसिंद येथें अबदालीचा अधिकारी समदखान रोहिला याशीं लढून राघोबानें त्याला पकडिलें. तेव्हां राघोबा लाहोरास पोंचण्यापूर्वीच तैमुरशहा व जहानखान यांनीं अफगाणिस्थानांत पळ काढिला. म्हणून लाहोर प्रांत घेण्यास मराठ्यांस मुळींच श्रम पडले नाहींत. याच सुमारास अबदाली व इराणचा शहा यांजमध्यें युद्धें होऊन त्यांत अबदालीचा अगदीं मोड झाला. तेव्हां इराणच्या शहाकडून राघोबाशीं तहाचीं बोलणीं सुरू झालीं. शहानें आपण दोघे मिळून अबदालीस नाहींसा करूं आणि मराठी सत्ता व इराणी सत्ता यांच्यामध्यें अटक नदीची हद्द करावी असें बोलणें लाविलें. त्यासंबंधीं राघोबा पेशव्यास लिहितो:" इराणचे पातशहाचे स्वदस्तुरचे कागदही आह्मांस व मल्हारबास आले होते कीं, लौकर कंदाहारेस यावें आणि याचें पारिपत्य करून अटकेची हद्द करावी. परंतु आह्मी तरी काबूलचा सुभा अबदुल रहीमखान स्वामींनीं पाठविला त्यास देतों. फौज वगैरे थोडें बहुत साहित्यही करितों. काबूल कंधार हे अटकेपारचे सभे हिंदुस्थानकडे अकबरपासून आलमगीरपावेतों होते, ते आह्मीं विलायतेंत कां द्यावे ? यास्तव तूर्त येथें सुभे देतों. त्यासही (इराणच्या शहास) या सुभ्यांची दरकार नसेल. तो इराणचा अंमल करील. आह्मी कंधारपावेतों अंमल बसवून तूर्त त्यास गोडच जाब पाठविणार आहों."* राघोबानें लाहोर व मुलतान हे प्रांत काबीज केले तेव्हां पंजाबच्या आसपास चोहोंकडे मराठ्यांची जरब बसली व तिक-

* इतिहाससंग्रह ऐ. स्फु. ले. ११ (सन १९१६); चैत्र वा॥ १२ शके १६८० (४-५-१७५८).

डील राजेरजवाड्यांनीं राघोबाशीं तहाचीं बोलणीं सुरू केलीं. साहजिकपणेंच राघोबाच्या महत्त्वाकांक्षेनें उसळी मारिली, व काबूल, कंदाहार हे पूर्वीचे मोंगल बादशाहींतील प्रांत हस्तगत करण्याचा त्यानें बेत केला. पण इतक्यांत पावसाळा सुरू झाल्यामुळें व 'तुह्मीं ताबडतोब दक्षिणेंत निघून यावें' अशीं पेशव्याचीं पत्रें आल्यामुळें उत्तरेकडे नवीन प्रांत जिंकण्याचें व जिंकलेल्या प्रांतांचा बंदोबस्त करण्याचें काम तसेंच टाकून तो पुण्यास जाण्यास निघाला. परत जातांना पंजाब प्रांताचा जुना माहीतगार अदिनाबेग यास राघोबानें कारभारी नेमिलें व त्याच्या मदतीस कांहीं मराठी फौज ठेविली.

४. लाहोरची स्वारी म्हणजे मराठ्यांच्या राज्यवैभवाच्या मंदिराचा कळसच होय. या वेळीं कृष्णाकांठचे घोडे हिंदुस्थानच्या वायव्य सीमेवरील अटक नदीचें पाणी प्याले व मराठ्यांचा भगवा झेंडा हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवर फडकला! या स्वारींत मराठी लष्कराची फारच चंगळ झाली. पेंढारी व लष्कर केवळ कुबेर बनलें. राघोबाच्या भोळेपणामुळें या स्वारींत पेशव्यांस मात्र कांडीचेंही उत्पन्न न होतां उलट एक कोट रुपये दौलतीला कर्ज मात्र झालें. राघोबा पुण्यास परत जाण्यास निघाला; तेव्हां अंताजी माणकेश्वरानें राघोबास सांगितलें कीं, अबदाली पुढल्या वर्षी खात्रीनें येईल; यासाठीं तुम्ही सरहद्दीचा नीट बंदोबस्त करून जा. परंतु पावसाळा फारच निकट आल्यामुळें राघोबास तसेंच पुण्यास परतणें भाग पडलें. राघोबा परत जात असतां ह्याला वाटेंत पहिल्यानें जनकोजी शिंदा भेटला. त्यास राघोबानें एकांतीं मोठ्या कळकळीनें सांगितलें कीं, "नजीबखान रोहिला याचें पारिपत्य करा; त्यास जिवंत सोडूं नका." शिंद्यानें राघोबाचें म्हणणें कबूल केलें. पुढें दत्ताजी शिंदे याची गांठ पडली. त्यासही नाजिबाचें पारिपत्य करण्याविषयीं राघोबानें मोठ्या आग्रहानें सांगितलें.

५. पुढें जनकोजी व दत्ताजी या दोघांसही मल्हारराव होळकर भेटला. त्यानें त्या दोघांसही राघोबाच्या उलट उपदेश केला. " बाबा, तुमचा मूळ-स्वभाव. अटकेपासून रामेश्वरापर्यंत एकछत्री राज्य झालें. हिंदुस्थानांत एक नजीबखान मात्र खळी राहिला आहे. त्याचें पारिपत्य केल्यास पेशवे जासुदाच्या हातून अटकेपासून पैसे आणवितील. मग तुम्ही आम्ही सहजच निर्माल्यवत् झालों. मग कोणी पुसणार नाहीं. यास्तव येवढा खळी रक्षून काय करणें तें करावें. स्वारीस आतां आम्हांस मुळूख कोणता असें विचाराल, तर नजीबखानाच्या साहाय्यानें भागिरथीस पूल बांधून खुशाल बंगालवर स्वाऱ्या करा. पण हें न करतां जर तुम्ही नजीबखानाचें पारिपत्य कराल तर पेशवे तुम्हांस धोतरें बडवावयास लावितील हें पक्कें लक्षांत *ठेवा. " पूर्वी शिवाजीच्या वेळीं ' मराठा तेतुका मेळवावा ' असा दिव्य उपदेश श्रीसमर्थ रामदासस्वामी यांनीं शिवाजीस केला. व त्याप्रमाणें वागून शिवाजीनें स्वराज्यस्थापना केली. पण आतां मल्हारराव्यानें ' मराठी राज्याच्या विरुद्ध कां होईना, पण आपला स्वार्थ साधून घ्या व मराठी राज्याचा शत्रु नजीबखान याचें केवळ स्वार्थ साधण्यासाठीं रक्षण करा,' असा कानमंत्र शिंद्याच्या कानांत सांगितला. जनकोजी शिंद्यांस हा कानमंत्र मुळींच रुचला नाहीं. दत्ताजी शिंद्यांस मात्र मल्हारराव्याचें बोलणें खरें वाटलें; व त्यानें नजीबखानाचें रक्षण केलें. त्यामुळें दत्ताजी तर प्राणास मुकलाच. शिवाय पानिपतचा भयंकर प्रसंग मराठी राज्यावर कोसळून हिंदुपदपातशाही स्थापन करण्यासाठीं अटोकाट मेहनत करणाऱ्या बाळाजीस वेड लागून " भाऊ भाऊ " करीत पर्वतीवर प्राण सोडावा लागला ! आणि हिंदुपदपातशाहीचा बेत अशक्य कोटींतील होऊन बसला. या कानमंत्राप्रमाणें दत्ताजी शिंदे वागला, व त्यानें आपल्या स्वतःचा

*भाऊसाहेबांची बखर, पृष्ठ ३९.

नाश कसा करून घेतला, याचा वृतांत पुढें येईलच. पण हा कानमंत्र म्हणजे मराठेमंडळांत पडलेल्या दुहीचें उत्तम उदाहरण आहे. ही दुही व मत्सर पानिपतास मराठ्यांस कशीं भोंवली त्याचेंही वर्णन पुढें येणारच आहे.

---

६७. अर्धी दक्षिण सर झाली !

उदगीरची लढाई, शके १६८१ (सन १७६०).

राघोबादादा अटकेवर मराठी अंमल बसवून आला. स्वतः बाळाजीनें श्रीरंगपट्टणावर चाल करून बराच कर्नाटक घेतला. महाराष्ट्रांत विश्वासराव व शिंदे मंडळींनीं निजाम जेरीस आणिला. अशी या वेळीं मराठ्यांची चोहोंकडे फत्ते होत होती. याच सुमारास बाळाजी व सदाशिवरावभाऊ यांच्या मनांत प्रचंड कल्पना घोळूं लागल्या. सर्व हिंदुस्थानभर एक दोन वर्षांत मराठी साम्राज्य पसरविण्याचा त्यांनीं बेत केला. या मसलतीस अनुसरून त्यांनीं दत्ताजीस लाहोरचा बंदोबस्त करून काशी, प्रयाग, बंगाल या प्रांतांकडे वळण्याविषयीं सांगितलें. दत्ताजी प्रयागास येतो न येतो तोंच राघोबानें त्यास जाऊन मिळावें व दोघांनीं मिळून बंगाल आसमुद्र जिंकून-टाकावा असें त्यांनीं ठरविलें. सुजाउद्दवल्यानें साहाय्य केल्यास अर्धा प्रांत त्यास द्यावा असाही त्यांचा संकेत होता. हिंदुस्थान सोडविण्याचें काम दत्ताजी, जनकोजी व राघोबा या तिघांवर सोंपवून दक्षिणेचा बंदोबस्त करण्याचें काम बाळाजी, सदाशिवराव व विश्वासराव या तिघांनीं आपल्या अंगावर घेतलें. शके १६८२ (इ. स. १७६०) मध्यें सगळी दक्षिण मोकळी करण्याचा पेश-

ब्यांचा बेत होता. अगोदर निजामास चांगलाच चेपून त्याला होता कीं नव्हतासा करून टाकावयाचा व मग श्रीरंगपट्टणाकडे वळून तें राज्य काबीज करावयाचें अशी ही योजना होती.

२. हैद्राबादेस निजामअली दिवाण झाला होता, व राज्याचा सर्व कारभार तोच पहात असे. त्यानें शिंदखेडची लढाई झाल्यावर मराठ्यांस दहा लाखांचा मुलूख व नगर आणि परिंडा हे दोन किल्ले देण्याचा करार केला होता, पण तो आतां मुलूख व किल्ले देईना. तेव्हां मराठ्यांस लढाई करणें भाग पडलें. बाळाजीनें या वेळीं निजामास चांगलाच चोप देण्याचा निश्चय केला. सदाशिवरावभाऊ शके १६८१ (१।९।१७५९) च्या दसऱ्यास डेरेदाखल होऊन फौज जमा होईपर्यंत गारपिरावर डेरे देऊन होता. इतक्यांत अहमदनगरचा किल्लेदार कविजंग याशीं भेद करून विसाजी कृष्ण विनीवाल्यानें तो किल्ला घेतल्याची बातमी आली. त्यामुळें मराठ्यांच्या बाजूस जास्त उत्तेजन आलें. मग बाळाजी नगराकडे गेला व सदाशिवरावभाऊ राक्षसभुवनकडे गेला. निजामअली आतां ती जहागीर व किल्ले देण्यास तयार झाला. पण आतां त्याचें म्हणणें पेशवे बरे ऐकतील? तेव्हां लढाईस उभें राहणें निजामास भाग झालें. या वेळीं निजामाची मोठी हलाकीची स्थिति होती. मुसाबुसी त्याला सोडून पांडिचरीस गेला होता, व इब्राहिमखान गारदी भांडून त्याच्याकडून निघून आला. त्यास सदाशिवरावभाऊनें आपल्या चाकरीस ठेविलें.

३. निजामाचें बरेंच सैन्य धारुरास जाऊन बसलें व स्वतः सलाबतजंग व निजामअली हे तोफखाना व सात आठ हजार सैन्य यांजसह उदगिरावर राहिले. तेथें त्यांच्या व मराठी सैन्याच्या चकमकी चालल्या होत्या. मग ते दोघे भाऊ आपल्या धारूर येथील सैन्यास मिळण्याकरितां चालले. इब्राहिमखान गारदीच्या तोफखा-

न्याचा त्यांच्या सैन्यावर फार मारा होऊं लागला. निजामाचें सैन्य अगदीं त्रासून गेलें. मग मरूं कीं मारूं अशा निराशेमुळें उत्पन्न झालेल्या धैर्यानें त्यांनीं इब्राहिमखानाच्या पलटणावर मोठ्या जोराचा हल्ला केला. त्यामुळें इब्राहिमखानाच्या लोकांत बरीच चलबिचल झाली. इतक्यांत मराठे घोडेस्वारांनीं निजामाच्या उजव्या बाजूवर शोकतजंग म्हणून एक सरदार होता त्याच्या पथकावर चाल करून तीन हजार माणूस लोळविलें. या लढाईंत निजामाचे अकरा हत्ती, पंधरा तोफा इतकें सामान मराठ्यांस सांपडलें. तेव्हां निजामअली अतिशय घाबरून गेला. त्यानें भाऊकडे आपले शिक्के पाठवून देऊन 'तुमच्या मर्जीस येतील त्या शर्तींवर तह करा,' असें बोलणें लाविलें. मग उभयपक्षीं तह ठरला. त्यांत अशिरगड, बऱ्हाणपूर, + दौलताबाद, साल्हेर, मुल्हेर व नगर असे सहा किल्ले मराठ्यांस मिळाले व अंबेड, फुलंबरी, नांदेड व विजापूर हे चार प्रांत म्हणजे साठ लक्षांचा मुलूख मराठ्यांच्या हस्तगत झाला. येणेंप्रमाणें फत्ते होऊन निजामाचा बहुतेक प्रांत पेशव्यांस मिळाला. निजामाचा पुरताच नक्षा उतरला व पेशव्यांचें तेज वृद्धिंगत होऊं लागलें.

+दौलताबाद स्वाधीन करून घेण्यास गोपाळ गोविंद पटवर्धन या सरदाराची रवानगी झाली. निजामाचा किल्लेकरी किल्ला सोडीना, व तो हातीं घेण्यास बरेच दिवस लागले. किल्ला सर होण्यापूर्वी बाळाजी बाजीरावानें गोपाळरावास खालील पत्र लिहिलें. त्या पत्रावरून सरदारांवर आपली छाप ठेवून त्यांजकडून स्वामिकार्य करवून घेण्याची बाळाजीची पद्धति उत्तम व्यक्त होते.

"वारंवार लिहितां कीं हीं स्थळें दुर्घट आहेत. शहास गुंततां येत नाहीं, विचारें कार्यसिद्धि करावी लागत्ये, यास्तव हल्ला राहविली, म्हणोन लिहितां अपूर्व वाटतें! विचार दूरंदेशी तुम्हांसच कळते हें पूर्ण प्रत्ययास येऊन गेलें! परंतु हें राजकारण प्रथम नरम धरिलेंत, रस्त बंद केली, या गोष्टीची तारीफ चिरंजीव भाऊ वगैरे सर्व शहाणे फार करितात.

तुम्हांस स्थळें अवघड वाटतात, परंतु श्रीकृपेनें तृणप्राय आहेत. मल्हार-रावांनीं धोडप हल्ला करून घेतली, तें स्थळ हल्ला करून यावयाचें होतें ? कालच्या मोंगलांवर उभयतां चिरंजीवांना सफेजंगी केली. एका लढाईत मोंगल चक्काचूर केला हें कोणाचे तर्कांत येत होतें. ? लाखों असाध्य कामें श्रीकृपातेजप्रतापामुळें तृणप्राय आहेत ! परंतु करणारासारखें फळ होतें. तुम्ही सख्त जलद शिपाई असें जाणून मीं तुम्हांला पाठविलें होतें. तुम्हीच आम्हांस विचार लिहिणार इतकें कळलें असतें तर एकादे लहान सहान पथके पाठविले असते. तो प्रथम दिवशींच रस्ता बंद करिता. कांहीं द्यावयाचें न बोलता, म्हणजे आज काम जाहलें असतें. तुम्ही मातबर, तुम्हांस कार्य झाल्यावांचून आणतां नये, यास्तव तुम्हांस यश यावें म्हणून तुम्हांसच आज्ञा करितों. तें तुम्ही करित नाहीं या गोष्टीस इलाज कोणता करावा ? गोपाळरावजी ! हे दौलता-बाद तुम्हांस दुर्घट वाटते, परंतु दो महिन्यांत सक्तीनें वेढा घालून एक रुपया न देतां घेऊं ! कां कीं त्याची कुमक कोणी करीत नाहीं ! मोंगलानें कुमक केली तर पुनरपि श्रीकृपेनें पन्नास हजार फौज जमा करून अगदीं मोंगल दक्षिणेंत होता कीं नव्हतासा करूं ! हें मोंगल समजले आहेत. तुम्ही समजत नाहीं यास इलाज काय करावा ? तुम्हांस बहुत दूरंदेशी समजते. रागें भरून लिहिलें म्हणोन तुम्हांस राग येईल. परंतु तुम्ही वारंवार आम्हांस विचार लिहितां यास्तव लिहिणें प्राप्त झालें. या पत्रापूर्वी कार्य जाहलें असेल तर उत्तम आहे. नाहीं तर परिच्छिन्न शहरपन्ना घेऊन वेढा बस-विणें. श्रीकृपेनें कार्य होईल. जों जों तुम्ही राजकारण करितां तों तों काम नासतें! याउपर या पत्रावरून, जितका राग येईल तितका त्याजवर काढणें. जर कार्य जाहलें असेल तर व्यर्थ राग येऊं न देणें. तुमचा स्वभाव रागीट, यास्तव इतके दिवस सख्त लिहिलें नाहीं. आतां वारंवार तुम्ही विचार लिहूं लागला, तेव्हां नाइलाज जाणून लिहिलें आहे. हे पत्र कोणास ठाऊक नाहीं. लेंकरादाखल सेवकावर एकांतीं रागें भरल्यास वाईट मानूं नये." (ऐतिहासिक लेखसंग्रह, पुस्तक १, लेखांक १५; चैत्र व॥ १ शके १६८२ १।४।१७६०).

४. याच सुमारास श्रीरंगपट्टणकडे मराठी राज्याचा विस्तार करण्याची उत्तम संधी प्राप्त झाली होती. म्हैसूरचा राजा चिक कृष्णराज सर्वस्वी नालायक होता व राज्याचा सर्व कारभार त्याचा दिवाण नंदराज हाच पहात असे. नंदराजास कारभारावरून काढून टाकावें व आपण राज्य आटोपावें अशी तेथील सेनापति हैदर हा एकसारखा खटपट करीत होता. परंतु याच वेळीं मराठ्यांनीं नंदराजास साहाय्य करून हैदरचें पारिपत्य करावें व नंदराजाचें कारभारीपद कायम राखावें अशीं राजकारणें चालू होतीं. तेव्हां पेशव्यांनीं आपला म्हैसूरचा वकील मुकुंदराव श्रीपत याला लिहिलें, "नंदराज सर्वाधिकारी व हैदर यांत जीद वाढला आहे. या समयीं अंतरंगीं संदर्भ लावून नंदराजाकडून करारनामा आणवावा कीं, चौथाई व सरदेशमुखीचा अंमल बसवून द्यावा. येणेंप्रमाणें आपले मोहरेनिशीं लिहून दिलिया हैदर नाइकाचें पारिपत्य करून नंदराजाची स्थापना करावी." त्यावर मुकुंदराव श्रीपत यानें पेशव्यांस खालील उत्तर पाठविलें, "बजिन्नस त्याचे मोहरेचा करारनामा येथें ठेविला आहे. त्याची नक्कल सेवेशीं पाठविली आहे.....नंदराज याजकडे हैदर नाईक यांनीं राजकारण लाविलें होतें कीं, लक्ष होनांचें राज्य तुम्हांस देतों. खाऊन सुखी राहणें. परंतु सेवकांनीं इकडून वरचेवर धीर देऊन पत्र लिहीत गेले, व स्वामींचें अभयपत्र त्यास होतें तें प्रविष्ट केल्यावरून त्यांस धैर्य येऊन हैदरनाइकाची गोष्ट कबूल न करतां स्वामींचे ठायीं निष्ठा धरून म्हटल्याप्रमाणें कबूल करून करारनामाही लिहोन पाठविला. हल्लीं त्यांचा अभिमान धरून नाईक मजकुराचें पारिपत्य होईल तें करणार स्वामी समर्थ आहेत. सारांश, हल्लींचा समय पुढें येणें नाहीं. हल्लीं अल्प कष्ट करून नंदराजाची स्थापना होऊन **चौथ-सरदेशमुखीचा अंमल बसतो, पुर्तें संस्थान आपलें होतें.** हे समयीं खामखा स्वामींनीं याजवर कृपा करून पांच हजार फौज

सडी जलदीनें पाठविली *पाहिजे." या वेळीं नंदराज म्हैसुरांत असून हैदरानें त्या शहरास वेढा दिला होता. तेव्हां संकटांतून सुटावें म्हणून नंदराजाचा हा धांवा होता.

५. सदाशिवरावभाऊनें दक्षिण सोडविण्यापैकीं अर्धें काम करून टाकलें व आतां श्रीरंगपट्टणच्या तजविजीस तो लागणार होता. परंतु उत्तरेकडे अबदालीनें येऊन शिंद्याचा पराभव केल्यामुळें शिंद्यास मदत करणें पेशव्यांस भाग पडलें व दक्षिण सोडविण्याचा बेत तूर्त बाजूस ठेवावा लागला. भाऊ गोविंदपंत बुंदेल्यास लिहितांना म्हणतो, " या झुंजानें मोंगलांत बाकी न राहतां साठ लक्षांची जहागीर व सदर्हूप्रमाणें स्थळें घेतलीं. याउपरी इकडील गुंता उरकला. चिरंजीव राजश्री दादा दरमजल त्या प्रांतीं येतील. इकडे मुलूख स्थळें चांगलीं मिळालीं; पण खर्च झाला. कर्नाटकची स्वारी न झाली. तितडेही अबदालीचा पेंच. पैका मिळायाचें झालें नाहीं. तिकडील पेंचामुळें इकडे आटोपावें लागलें. नाहीं तर सारी दक्षिण +मोकळी होती. "

---

६८ विश्वासघातकी नजिबानें पुरता दगा दिला!

दत्ताजी शिंदे जेव्हां हिंदुस्थानांत जाण्यास निघाला तेव्हां बाळाजीनें त्याला पुढीलप्रमाणें कामगिऱ्या सांगितल्या होत्या. लाहोर प्रांताचा योग्य बंदोबस्त करावा, नजीबखान रोहिल्याचें पारिपत्य करावें; व सुजाउद्दवल्याच्या मदतीनें बंगालवर स्वारी करावी. यांतील पहिली कामगिरी करण्यास दत्ताजीनें शके १६८१च्या आरंभीं सुरुवात केली. तो सतलज नदीपर्यंत गेला, व तेथून साबाजी शिंदे व त्रिंबक बापूजी

---

* इतिहाससंग्रह, ऐतिहासिक टिपणें, भाग २ रा टिपण ३४.

+ म. इ. सा. खंड १, लेखांक १६६. (फाल्गुन शु. ३शके १६८१).

या दोघां मराठे सरदारांस पंजाबच्या बंदोबस्तासाठीं लाहोरकडे पाठवून तो स्वतः बंगालच्या कामगिरीकरितां परत आला. सुजाउद्दवल्यानें, 'मला दिल्लीची वजिरी द्या, मी तुम्हांस पन्नास लक्ष रुपये देतों,' असें दत्ताजीशीं बोलणें लाविलें. तसेंच नजीबखान रोहिलाही बक्षीगिरी मिळाल्यास तीस लक्ष रुपये देण्यास तयार झाला. दत्ताजीनें त्या दोघांचेंही म्हणणें बाळाजीपुढें मांडलें. त्या दोन्ही मसलती बाळाजीस पसंत पडल्या नाहींत. नजीबखानासंबंधीं तर बाळाजीनें दत्ताजी शिंद्यास मोठें खरमरीत पत्र लिहिलें. "नजीबखानास बक्षीगिरी दिल्यास तीस लाख रुपये देतो म्हणून लिहिलें. ऐशियास नजीबखान पुरा हरामखोर आहे. गुदस्तां चिरंजीव दादाशीं त्याची कांहीं मजा राहिली नाहीं. तो दिल्लींत प्रविष्ट झाल्यास अबदालीचेंच दिल्लींत पक्कें ठाणें बसलें असें जाणावें. बेमान हरामखोर आहे. त्यास वाढविणें सर्पास दूध पाजल्याप्रमाणें आहे. फावलेमानी त्याचें पारिपत्यच करावें. नजीबखान बाट अर्धा अबदाली, त्याचें राजकारण न* करावें" असा पेशव्याकडून टोमणा आला. तरी मल्हाररावानें केलेला दुष्ट उपदेश शिंद्याच्या डोक्यांत असल्यामुळें त्यानें नजीबखानाशीं सलोखा करण्याचा निश्चय केला, व त्याचीच मदत घेऊन सुजाउद्दवल्यावर स्वारी करावी व तसेंच पुढें बंगाल्यावर चालून जावें, असा शिंद्यानें घाट बांधला. नजीबखान अगदीं हलाखींत होता. त्याला शिंदे आपल्याशीं समेट करण्यास तयार आहेत असें कळतांच तो दत्ताजीच्या भेटीस आला (एप्रिल १७५९). त्यानें गोड बोलून दत्ताजीस खूष केलें, व अयोध्येवर स्वारी करण्यासाठीं एक महिन्याच्या आंत शुक्रतालजवळ गंगेस पूल बांधून देण्याचें कबूल करून तो परत निघून गेला. दत्ताजी नजिबावर अगदीं खूष झाला. पण त्याला नजिबाचे खोल बेत कोठें माहीत होते? नजीबखानानें

* काव्येतिहाससंग्रह, पत्रें यादी. ले. ३६२. (फाल्गुन वद्य ७ शके १६८०).

दत्ताजीस चरकरणी नम्रपणा दाखवून खुशाल सुजाउद्दवल्याशीं आंतून सूत्र चालू ठेविलें, व मराठ्यांस हांकून देण्यासाठीं त्याला अत्यंत लवकर येण्यासाठीं आग्रह केला. इतकेंच करून तो विश्वासघातकी नजीब थांबला नाहीं. त्यानें खुद्द दिल्लीच्या बादशहाकडून अबदालीस हिंदुस्थानावर स्वारी करण्यासाठीं बोलाविलें. एक महिना झाला तरी पूल पुरा झाल्यासंबंधीं नजिबाकडून कांहींच बातमी येईना. तेव्हां दत्ताजीनें त्याला लवकर काम संपविण्याविषयीं लिहिलें. त्या वेळीं सुजाउद्दवल्याशीं चाललेलें राजकारण पक्कें झालें असल्यामुळें पावसाळ्यानंतर पाहून घेऊं, असा नजिबानें दत्ताजीस निरोप पाठविला.

२. हा निरोप ऐकतांच दत्ताजीच्या तळव्याची आग मस्तकास गेली. नजिबाच्या नीचपणाचा आतां त्याला प्रत्यक्ष अनुभव आला. त्यानें त्याचें पुरतें पारिपत्य करण्याचा बेत केला. कुंजपुऱ्यास जाऊन त्यानें यमुना ओलांडली व तो अन्तर्वेदींत आला. नजिबास इटाव्याकडून शह देण्यास त्यानें गोविंदपंत बुंदेल्यास लिहिलें. मग अन्तर्वेदींतला नजिबाचा प्रांत घेऊन तो शुक्रतालास गंगा नदी उतरून खुद्द रोहिलखंडांत आला. इतक्या अवधींत गोविंदपंतानेंही गंगा उतरून जलालाबादेस ठाणें दिलें (२०।१०।१७५९). मग ते दोघे नजिबास मध्यें चेपणार तोंच सुजाउद्दवल्याची फौज नजिबाच्या साहाय्यास येत आहे अशी बातमी आली. सुजाउद्दवल्याच्या फौजेस नजीबखानास मिळूं न देण्याचा बंदोबस्त करण्याविषयीं दत्ताजीनें गोविंदपंतास लिहिलें; पण गोविंदपंताच्या हातून तें काम झालें नाहीं. सुजाउद्दवला व उमरावगीर गोसावी हे दोघे दहा हजार फौज घेऊन जलालाबादेस आले. तेव्हां अर्थातच मराठी फौज कमी असल्यामुळें ती गंगेअलीकडे आली (कार्तिक शके १६६१, नोव्हेंबर १७५९). इतक्यांत अबदाली लाहोरास आला अशी बातमी येऊन पोहोंचली.

४. दत्ताजीस नजिबाच्या तंबीचें काम तसेंच टाकून अबदालीशीं

टक्कर देण्याची तयारी करणें प्राप्त झालें. तो कुंजपुऱ्यावर यमुना उतरून लागलीच त्या कामास लागला. लाहोरकडे ठेविलेलीं साबाजी शिंदे व त्रिंबक बापूजी यांचीं पथकें अबदालीपुढें सरकत सरकत मागें आलीं. त्यांचे वाटेनें फार हाल झाले. शेवटीं त्या पथकांतील माणसें उघडींबोडकीं अशीं दत्ताजीच्या लष्करांत दाखल झालीं. ह्याच सुमारास कांहींतरी निमित्त काढून गोविंदपंत दत्ताजीपाशीं निरोप मागूं लागला. ह्याचा राग येऊन दत्ताजी अबदालीला रेटण्यास एकटाच निघाला व त्यानें गोविंदपंतास परत जाण्यास परवानगी दिली. ह्याच सुमारास अबदालीचें अरिष्ट हिंदुस्थानवर आणल्याबद्दल गाजीउद्दीन वजिरानें दिल्लीस आलमगीर बादशहास ठार केलें व तो गोविंदपंताच्या पथकाबरोबर पाठीमागें राहिला. अबदाली आल्याची बातमी ऐकतांच दत्ताजीनें मल्हारराव होळकरास जलद येण्याविषयीं पत्रें पाठविलीं; पण तोही आला नाहीं. तेव्हां एकट्या शिंद्यावरच मोहिमेचा सर्व भार पडला. शिंद्याच्या अबदालीशीं दोन चार झटापटी झाल्या. पौष शुद्ध ५ स मोठें जंगींच युद्ध झालें, त्यांत मराठ्यांचा जय झाला. अबदालीस आपल्या एकट्याच्या हातून शिंद्याचें पारिपत्य होत नाहीं असें दिसतांच तो अन्तर्वेदींत शिरला; व तेथें नजीबखान रोहिल्यास बरोबर घेऊन त्यानें दिल्लीचा रोंख धरला. इकडे दत्ताजी शिंदेही दिल्लीस यमुनेच्या दक्षिणतीरीं येऊन पोहोंचला. दोघांमध्यें केवळ यमुनेचें पात्र तेवढें होतें. पौष व॥ ८ स संक्रांतीच्या दिवशीं दिल्लीजवळ बदाऊंच्या घाटावर अबदाली व मराठे या दोघांत तुंबळ युद्ध होऊन दत्ताजी पडला व जनकोजी जखमी झाला (१०।१।१७६०). जनकोजीस कोटपुतळीस आणिला, तेथें मल्हारराव होळकर शिंद्यास मदत करण्याकरितां येत होता तो भेटला.शिंद्यांवर आलेला घोर प्रसंग पाहून मल्हाररावास अतिशय दुःख झालें;आणि तो शोक करूं लागला.तेव्हां त्याची स्त्री गौतमाबाई निषेध करून म्हणाली,

"सुभेदार,तुमचें वृद्धपण झालें. शिंदे यांचीं मुलें म्हणजे काय ? त्यांचे तोंडाचा अजून जार वाळला नाहीं. त्यांनीं एवढा पराक्रम करून मारतां मारतां मेले. एरवीं हा मृत्युलोकच आहे, परंतु इहलोकीं कीर्ति करून परलोक साधन करणें हेंच दुर्लभ. तुमचे दिवस समीप आले. तरी हिम्मत धरून मारतां मारतां मरावें." असें बोलतांच मल्हारराव तींस म्हणाला, "तुझ्या चित्तांत आम्ही मरावें असें आहे." यावर गौतमाबाईनें उत्तर केलें, "सदैव असतां वैधव्याची आस्था धरील अशी कोण चांडाळीण आहे ? अहेवपणानें हळदकुंकूमंडित मरावें. परंतु जसें पूर्व आचरण असेल तसें घडेल. आपले पदरीं लौकिक भारी. तुम्ही आपलें घोंगडी विणायाचें काम करीत असतां, तरी सहजच वांचावयाची आस्था धरावी. वाण सतीचें घेतलें तसें संभाळावें, असेंच धर्मशास्त्र* आहे." होळकरानें जनकोजीचें समाधान केलें, व त्या दोघांनीं मिळून अबदालीशीं झुंजण्याचा प्रयत्न केला. पण होळकराच्या फौजेचाही मोड झाला.

४. शिंद्याचा पराभव झाल्याची बातमी पुण्यास गेली. त्यामुळें सरदारांची अब्रू रक्षण करण्याकरितां व अबदालीचा चांगलाच समाचार घेण्याकरितां पुण्याहून फौज पाठविणें पेशव्यास भाग झालें व मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें सदाशिवरावभाऊस सर्व दक्षिण मोकळी करण्याचें काम तहकूब करावें लागलें.

---

६९. स्वारीची जंगी तयारी.

शके १६८२, पानिपतची मोहीम, पूर्वार्ध. सन १७६१.

शिंद्याच्या पराजयाची बातमी पेशव्यास येऊन समजली तेव्हां

---

* भाऊसाहेबांची बखर पृष्ठ ७८.

तो उदगीरच्या मोहिमेवर गुंतला होता. उदगीरची मोहीम संपतांच रंगपंचमीच्या दिवशीं बाळाजी बाजीराव व सदाशिवरावभाऊ हे अबदालीचें पारिपत्य करण्याचा उपाय योजण्याकरितां पुडदुरास भेटले. तेथें आठ दिवसपर्यंत त्यांचें खलबत चाललें होतें राघोबादादा मागील खेपेस जेव्हां स्वारीवर गेला होता तेव्हां अबदाली निघून गेल्यामुळें त्याशीं झुंजण्याचें कारणच पडलें नाहीं. तेव्हां रजपूत राजांचा बंदोबस्त, मामलेदार लोक पैशाचीं अफरातफर करीत त्यांस शासन, नजीबखानाचें पारिपत्य, इत्यादि कामें करण्यास राघोबास फुरसत होती. पण यांपैकीं एकही काम त्याच्या हातून झालें नाहीं. उलट एक कोट रुपये कर्ज करून मात्र तो आला. राघोबा म्हणजे भोळा सांब; त्याला मल्हारराव होळकरासारखे हुशार लोक सहज फसवीत. तेव्हां बाळाजी बाजीरावानें या वेळीं राघोबास न पाठवितां सदाशिवरावभाऊसच उत्तर हिंदुस्थानांत पाठविण्याचें ठरविलें. भाऊ शके १६७२पासून सर्व कारभार पहात असे; त्यांत त्याचें शहाणपण दिसून आलें होतें. तो मोठा हुशार होता, त्याला फसविण्याची कोणाचीही प्राज्ञा नव्हती. शिवाय लढाईचाही त्याला राघोबापेक्षां कमी अनुभव होता असें मुळींच नव्हतें. त्याच्या युद्धचमत्कारांस बहादुरभेंड्याच्या स्वारीपासून सुरुवात होऊन बाळाजीच्या कर्नाटकावरील स्वाऱ्यांत तोच अग्रेसर असे. नुकताच त्यानें उदगीरच्या लढाईंत जय मिळविला होता. तेव्हां बाळाजीनें अबदालीच्या पारिपत्यासाठीं भाऊसारख्याची निवड करणें स्वाभाविक होतें.

२. नाना पुरंदरे, बळवंतराव मेहेंदळे, महिपतराव चिटणीस ह्या मंडळीसह भाऊ व बाळाजीचा वडील मुलगा विश्वासराव पन्नास हजार फौज घेऊन निघाले,ते १६८२ चैत्र व.४(४।४।१७६०)रोजीं बऱ्हाणपुरास पोंचले. भाऊबरोबर समशेरबहादर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, मानाजी धायगुडे,अंताजी माणकेश्वर, माने, निंबाळकर ही मंडळी पहिल्यापासून

होती. दमाजी गायकवाड, इब्राहिमखान गारदी व संताजी वाघ हे पुढें गेले होते, ते वाटेंत येऊन मिळाले. मग या सरदारमंडळीस बरोबर घेऊन भाऊ पुढें चाल करून जाऊं लागला. निघाल्यापासून तो गोविंदपंत बुंदेल्यास पत्रें पाठवीत होता. त्यांत गोविंदपंतास सुजाउद्दवल्याशीं राजकारण लावून त्याला आपल्या बाजूला ओढण्याविषयीं त्यानें अत्यंत आग्रह केला. रजपूत राजांसही चाकरीस सिद्ध करावें हेंही काम भाऊनें गोविंदपंतास सांगितलें. शिवाय पंचवीस लाख रुपये गोविंदपंताकडे बाकी होती, तीही लवकर देऊन टाकण्याविषयीं भाऊनें तगादा लाविला. भाऊ वैशाख शुद्ध ११स सिहोरास आला. तेथून त्यानें रजपूत संस्थानिकांना येऊन मिळण्याविषयीं पत्रें व वकील पाठविले. रजपूत संस्थानिकांनीं दोन्ही डगरीवर हात ठेविले होते. भाऊचे वकील गेले तेव्हां त्यांनीं मराठ्यांस मिळण्याविषयीं रुकार दिला, पण तें केवळ सोंग होतें. सिहोरच्या आसपासच्या दंगेखोरांचें पारिपत्य करून भाऊ खेचीवाड्यांतून ग्वालेरीस गेला. सुजाउद्दवल्यास आपल्या बाजूस मिळवून घेण्याविषयीं जसा मराठ्यांचा जोराचा प्रयत्न चालला होता तशीच अबदालीचीही जोराची खटपट होती. अबदाली स्वतः अन्तर्वेदींत अनुपशहरीं राहिला होता. त्यानें सुजाशीं स्नेह जोडण्यासाठीं नजीबखानास पाठविलें. पण गोविंदपंत बुंदेल्याचा प्रांत दरम्यान असल्यामुळें नजिबास गोविंदपंताचीं ठाणीं घेतल्याशिवाय सुजाची भेट घेणें शक्य नव्हतें. सुजाउद्दवल्यास जोंवर नजीब भेटला नव्हता तोंवर तो 'मी मराठ्यांकडचा' असें म्हणत असे. सुजाउद्दवल्यास स्नेही करण्याचें जबाबदारीचें काम भाऊनें गोविंदपंतावर सोंपविलें होतें. तेव्हां नाजिबाची सुजाशीं भेट न होऊं देण्याकरितां आपलीं ठाणीं बसाविण्याची पराकाष्ठा गोविंदपंतानें करावयास पाहिजे होती. पण दुर्दैवानें त्यानें ती केली नाहीं. नजीबखानानें इटाव्याला वेढा घातला, तोंच तों पुढें स्वारी करणार या

अवईनेंच गोविंदपंताचे ठाणेदार पळून गेले. मग नजीबखान खुशाल जाऊन सुजास बिठुरास भेटला; व त्यानें सुजाचें मन अबदालीकडे वळविलें.

३. इतक्यांत भाऊ चंबळा उतरून आषाढ व।। ८स शिंदे. होळकरांस भेटला. ' तुम्ही लवकर जवळ आलां म्हणजे सुजास धीर येऊन तो आपल्या बाजूस मिळेल ' असें गोविंदपंतानें लिहिलें; त्यावरून भाऊनें लवकर आग्र्यास पोंचण्याची जलदी केली; परंतु गंभीर नदीस पाणी आल्यामुळें त्याचे दहा पंधरा दिवस फुकट गेले. इतक्यांत सुजाउद्दवला अबदालीच्या बाजूस मिळाल्याची त्याला बातमी समजली. तेव्हां भाऊनें असा बेत केला कीं, सुरजमल जाट याच्यासह आग्र्याजवळ यमुना ओलांडून नजीबखान व अबदाली यांचेमध्यें उतरून दोघांचे निरनिराळ्या दिशेनें पारिपत्य करावें. अबदाली या वेळीं अनुपशहरीं होता. नजीबखान व सुजाउद्दवला बिठुरास होते व गोविंदपंत त्या दोघांमध्यें इटाव्यास होता. अबदालीजवळ तीस हजार फौज, नजीब व सुजा यांच्याजवळ वीस हजार फौज, व गोविंदपंताजवळ सरासरी आठ दहा हजार फौज होती. आग्र्याजवळ यमुना उतरून पश्चिमेकडून गोविंदपंताला मिळता घेऊन प्रथम नजीब व सुजा यांचें पारिपत्य करावें व नंतर अबदालीची खोड मोडावी, असा भाऊचा बेत होता. याकरितां गोविंदपंताला आपल्या प्रांतांतील सर्व नावा तावडतोब यमुनेच्या दक्षिणतीरीं आणून ठेवण्यास भाऊनें सांगितलें. शिवाय मानाजी धायगुडे व तीन हजार जाट यमुनेपलीकडे पाठवून सकुराबादेस मराठ्यांचें ठाणें भाऊनें बसविलें. इतक्यांत सुजा व नजीब अबदालीकडे जात आहेत असें कळलें. तेव्हां सरदार व जाट यांजसह भाऊ लवकर आग्र्यास आला. पण तेथें गोविंदपंतानें नावा मुळींच जमविल्या नव्हत्या ! नदीस पाणीही फारच आलें होतें. त्यामुळें भाऊस अबदालीच्या सैन्याच्या


नकाशा
पानिपतची मोहिम.
कुंजपुरा
पानिपत
शुक्रताल
हस्तिनापूर
वागपत
जलालाबाद
दिल्ली
गाजुद्दीननगर
गढमुक्तेश्वर
शिकंदरा
अनुपशहर
रेवाडी
यमुना नदी
गंगा नदी
अलीगढ
वृंदावन
काळजलेश्वर
मथुरा
फरुकाबाद
भरतपूर
आग्रा
मकुंगवाद
कनोज
गंभीर नदी
इटावा
विटूर
ग्वाल्हेर
कानपूर

दोन तुकड्या एक होण्यापूर्वी त्यांचें निरानिराळें पारिपत्य करण्याचा बेत रहित करावा लागला.

४. नर्जाब व सुजाउद्दवला हे दोघेही शिकंदऱ्यास अबदालीला मिळाले. तेव्हां भाऊनें अबदालीच्या पारिपत्याची नवीन योजना केली. मथुरा, दिल्ली, कुंजपुरा, हीं यमुनेच्या दक्षिणतीरचीं ठाणीं घेऊन उत्तरेकडून यमुना उतरून अबदालीस रेटावयाचें ठरलें. या योजनेप्रमाणें भाऊ उत्तरेकडे चालता झाला. गोविंदपंतानें अलीगडपर्यंत मराठ्यांचीं ठाणीं बसवावीं, अबदालीच्या भोंवतालचा मुलूख जाळून लुटून फस्त करावा, रोहिल्यांच्या मुलुखांत उतरण्याची अवई घालावी व सुजाउद्दल्याच्या मुलुखांत दंगे माजवावे अशी कामगिरी भाऊनें गोविंदपंतास सांगितली. भाऊ श्रावण शु॥ ४(१६।७।१७६०)स मथुरेस आला व तेथून त्यानें बळवंतराव मेहेंदळे व शिंदे-होळकर यांस दिल्ली घेण्याकरितां पुढें पाठविलें. लवकरच दिल्ली शहर बळवंतरावानें घेतलें व सदाशिवरावभाऊ येऊन दाखल झाल्यावर श्रावण व॥ ५ स किल्लाही मराठ्यांच्या हातीं आला.

५ दिल्ली शहर म्हणजे हिंदुस्थानच्या बादशाहीचें मुख्य ठिकाण; तें अबदालीच्या लोकांपासून हिसकावून घेतल्यावर मराठ्यांचा चहूंकडे दरारा बसला. अबदालीच्या सैन्यांतील लोकांस त्याच्याबद्दल संशय येऊं लागला व ते त्याला सोडून जाण्याचा प्रयत्न करूं लागले. हफीज राहमतखान, अहमदखान बंगष, सादुल्लाखान, फैजुल्लाखान, या रोहिल्यांचीं भाऊस मिळण्याबद्दल बोलणीं सुरू झालीं. कित्येक गिलचे व आफ्रिदी लोकही अबदालीस सोडून निघाले. सुजाउद्दवल्यासही आपण अबदालीस येऊन मिळालों याचा खेद वाटूं लागला. अबदालीनें सुजावर मारेकरी घातले व तो त्याच्यापाशीं पैसे मागूं लागला. तेव्हां तर सुजास त्याच्या संगतीचा फारच त्रास वाटूं लागला; व त्यानें भाऊशीं सख्यत्वाचें बोलणें सुरू केलें. अबदालीला त्याच्या

सर्व साथीदारांनीं सोडून जाण्याचा विचार सुरू केला; तेव्हां नजिबाच्या नादीं लागून व्यर्थ संकटांत सांपडलों असें त्याला वाटूं लागलें. दिल्ली घेतल्यापासून मराठ्यांची चढती व अबदालीची उतरती कमान होती. त्या वेळीं पावसाळा असल्यामुळें मराठ्यांनीं सुमारें दोन महिने दिल्लीस तळ दिला होता. अबदालीनें आपली विपन्न स्थिति पाहून सुरक्षित स्वदेशीं पोंचण्याचा निश्चय केला, व तो भाऊशीं तह करण्यास उत्सुक झाला. त्याप्रमाणें भाऊशीं बोलण्याकरितां त्यानें वकील पाठविले. उत्तम सैन्य, जंगी तोफखाना, व शिद्याबद्दलचा सूड उगविण्याची अनिवार इच्छा, या तीन कारणांमुळें अबदालीस आतां सोडावयाचें नाहीं असा भाऊचा निश्चय झाला होता. शिवाय अबदालीचें सैन्यही कमी कमी होत चाललें होतें. तेव्हां अशा स्थितींत अबदालीनें मनासारखा तह केला तरच त्यास स्वदेशीं सुखरूप परत जाऊं द्यावयाचें; नाहींतर अंतर्वेदींत कोंडून किंवा आंत तडफडून यमुना उतरून अलीकडे आल्यास बाहेरून गांठून त्यास तंबी द्यावयाची, असा भाऊनें व्यूह रचिला.

६. भाऊनें पावसाळ्याचे सुमारें तीन महिने दिल्लीस काढले. मागील वर्षीं गाजीउद्दीन वजिरानें आलमगीर बादशहास ठार मारल्यापासून दिल्लीची बादशाही गादी रिकामी होती. भाऊनें आलमगीरचा मुलगा अलीगोहर यास गादीवर बसविण्याकरितां दिल्लीस बोलाविलें. पण तो स्वतः आला नाहीं. त्यानें आपला मुलगा जवानबक्त यास पाठवून दिलें. भाऊनें नाना पुरंदरे व आप्पाजी जाधवराव यांच्या हस्तें जवानबक्तास वलीअहद केलें(युवराज पद दिलें), व अलीगोहरास शहाआलमपद देऊन त्याच्या नांवाचे राजाशिक्के चालविले (१०।१०। १७६०). वजिरी आपण स्वतः करावयाची असा भाऊचा बेत होता. या भाऊच्या कृत्यानें सुजाउद्दवल्याची वजिरी मिळविण्याची आशा नष्ट झाली व तो फिरून अबदालीशीं संगनमतानें वागूं लागला.

आश्विन व॥ ५ नंतर (१४।१०।१७६०) अबदाली, नजीब व सुजा हे मराठ्यांच्या विरुद्ध एकसूत्रानें वागूं लागले. भाऊनें दिल्लीच्या 'दिवाण इ आम' या राजवाड्यांतील छत काढलें. त्याची किंमत तीन लाख रुपये भरली. भाऊनें ते पैसे सैन्यास पगार देण्यास खर्चिले. छत काढलें त्यावरून सुरजमल जाट फारच रागावला व आपले लोक घेऊन परत निघून गेला.

७. दिल्लीस असतां भाऊनें नारो शंकर दाणी यास 'राजेबहादर' ही पदवी देऊन पांच हजार फौज त्याच्या हाताखालीं ठेविली; आणि दिल्ली शहर व किल्ला या दोन्ही ठिकाणांचा बंदोबस्त त्याजकडे सोंपविला. नंतर पावसाळा संपतांच आश्विन शु॥६स भाऊ कुंजपुऱ्यास गेला व पूर्वीच्या योजनेप्रमाणें अबदालीच्या पारिपत्याच्या तयारीस लागला. भाऊनें गोविंदपंतास पूर्वी सांगितलेल्या कामागिऱ्या करण्याविषयीं ताकीद केली; व आपण स्वतः कुंजपुरा घेण्याची खटपट चालविली. कुंजपुरा हें स्थळ फार मजबूत असून नाकेबंदीचें होतें. आंत समदखान म्हणून अबदालीचा सरदार पांच सहा हजार फौजेसुद्धां होता. मराठ्यांच्या सैन्याला अंगावर घेऊन आपण पळत सुटावें व मागून अबदालीनें येऊन मराठ्यांवर अचानक हल्ला करावा असा समदखानाचा बेत होता. परंतु बळवंतराव मेहेंदळे व जनकोजी शिंदे या दोघांनीं एकदम कुंजपुऱ्यास वेढा घातला, व समदखाननाची दोन हजार फौज पळून जात होती ती लुटली. त्यामुळें समदखानाचा बेत फसला. अश्विन शु॥८स कुंजपुऱ्याचें ठाणें मराठ्यांच्या हातीं आलें. तेथें विजयादशमीचा सण मराठ्यांनीं मोठ्या आनंदानें साजरा केला (१९।१०।१७६०). पुढें अबदालीवर चाल करून जाण्याकरितां यमुना उतरणें भाऊस जरूर होतें; त्याकरितां त्यानें सारंगपुऱ्याच्या घाटाकडे कूच केलें.

८. इतक्यांत भाऊस अशी बातमी लागली कीं, अबदाली बाग-

पतावर यमुना उतरून पानिपतकडे आला. भाऊनें कुंजपुरा घेतला, ही बातमी समजल्यावर अंतर्वेदींत रहाणें अबदालीस धोक्याचें वाटलें. म्हणून बागपताजवळ मोठ्या कष्टानें तो यमुना उतरला व मोठ्या कष्टानें पण सावधगिरीनें त्यानें पानिपतचा रोख धरला. या वेळीं अबदाली भाऊच्या चांगला कचाटींत सांपडला होता. समोर भाऊची फौज तयारीनें उभी होती. पाठीमागें दिल्लीस नारो शंकर त्याला पायबंद देण्यास तयार होता. त्यामुळें यमुनेच्या उजवीकडे अबदालीचा मुळींच लाग नव्हता. त्याला अंतर्वेदींत व रोहिलखंडांत जे नजीबखानाचे प्रांत होते त्यांतून मदत होण्याचा संभव होता. पण तोही नाहींसा करण्याची तजवीज भाऊनें केली होती. भाऊनें अबदालीस त्या प्रांतांतून मिळणारी रसद बंद करण्याविषयीं गोविंदपंतास फिरून सक्त हुकूम केला. "तुम्हीं जलदीनें यमुनेपलीकडून येऊन बागपतेपर्यंत धुमामा चालवून अबदालीस रसद न पोहोंचे, फौजेस शह पडे, असें करावें. गिलच्यांचा पेंच तिकडे नाहीं, यास्तव लांब लांब मजलीनें येणें. या कामास दिरंग न लावणें. नजीबखानाचे प्रांत जाळावे. अबदालीस मागें रसद बंद होऊन बोभाट होय असें करणें. इरे धरून तडकून येऊन ×काम करणें."

९. या वेळीं अबदाली अगदीं भिऊन गेला होता. मराठी सैन्यामध्यें व अबदालीच्या सैन्यामध्यें अंतर दोन चार कोसांचें होतें. अबदालीच्या लष्करांत महागाई झाली होती. आश्विन वा। १० चे दिवशीं अबदाली व मराठे या दोघांचें एक लहानसें युद्ध झालें. त्यांत मराठ्यांचा जय झाला. अबदालीचा मोड करण्याचा हुरूप सर्व मराठी सैन्यांत भरला होता. अबदालीला आपण खास गिळणार असें भाऊस वाटत होतें. कृष्ण जोशी संगमेश्वरकर यानें आश्विन वा। १३च्या पत्रांत त्या वेळच्या स्थितीचें वर्णन केलें आहे. तो

× म. इ. सा. खंड १, ले. २६१. (आश्विन व॥ १ शके १६८२).

लिहितो, "श्रीमंतानीं चोहोंकडे तोफखाना पसरला आहे. यवनास थोर भय झालें आहे. पुढें येववत नाहीं. आमचे सैनिक नित्य शेंपन्नास यवन मारून उंट, घोडीं आणतात. दोन हत्ती पेंढारीयांनीं काल आणले. आमच्या सैन्यांत सवंगाई आहे. आणखी दोन चार दिवसांत यवन चालून तोफांवरी येईल तरी क्षणमात्र बुडेल. न ये तर आमचे लोक जाऊन युद्ध करणार. सर्व सैन्यांत उत्साह आहे कीं, अबदाली व नजीबखान व सुजाउद्दवला आठ चौ दिवसांत क्षयास जातील. अबदाली शहानशहा म्हणवीत होता. त्यानें युद्धें बहुत केलीं आहेत, परंतु तो दो कोसांवरी येऊन आठ दिवस बसून कांहीं पराक्रम होत नाहीं. यामुळें आमची फौज बहुत शेर आहे. अबदालीनें स्वदेशास जावें तरी मार्ग नाहीं. युद्ध करावें तरी परिणाम नाहीं. याप्रमाणें विचारांत पडला *आहे."

---

७०. घनघोर संग्राम ! भाऊ ! भाऊ ! !

पानिपतची लढाई, उत्तरार्ध.

—:०:—

(शके १६८२; सन १७६१.)

गोविंदपंताकडून अबदालीची रसद बंद करून त्याला हैराण करण्याचा व आपण स्वतः अबदालीवर चालून जाऊन समोरून लढाई देण्याचा व त्यास चीत करण्याचा सदाशिवरावभाऊनें बेत केला. या योजनेंत गोविंदपंतावर फारच जबाबदारीची कामगिरी सोंपविली होती. गोविंदपंतानें जबाबदारी न ओळखतां कुचराई चालविली. या कुच-

* मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १, लेखांक २६५. (५।११।१७६०)

राईनें भाऊचा सर्व बेत फिसकटण्याचा रंग दिसूं लागला. शेवटीं भाऊनें गोविंदपंतास एक निर्वाणीचें पत्र कार्तिक शु॥ ७स पाठविलें. त्यांत भाऊ लिहितो, " लिहिलेप्रमाणें एकही काम होऊन न आलें. फार दिवस खावंदानें लहानाचें थोर केलें, वाढविलें त्याचें सार्थक केलें. अजून तरी सावध होऊन लिहिलेप्रमाणें येऊन पोंचणें. " परंतु याही पत्रावरून गोविंदपंतानें अळटळं करण्याचें सोडलें नाहीं. यामुळें लढाईचा रंग पालटतो कीं काय, अशी भीति वाटूं लागली. अबदालीची रसद तोडणें हें अत्यंत महत्त्वाचें काम होतें. तेव्हां भाऊनें या कामावर एखाद्या मातबर सरदाराची योजना करावयास पाहिजे होती. पण तसें न करितां गोविंदपंतावरच भाऊनें सर्व भिस्त टाकिली. अर्थातच अबदालीची रसद बंद पडून त्याची उपासमार होण्याचें दूरच राहिलें. कारण अबदालीची फौज दिल्लीच्या व मराठी फौजेच्या मध्यें होती.तिला दाणागल्ला यथास्थित मिळत होता. शिवाय कोणी त्रास देण्यासही नव्हता. तेव्हां तिनें स्वस्थपणें मराठ्यांस दिल्लीहून जाणारी रसद मारण्याचा क्रम चालविला. भाऊ अबदालीची रसद बंद करून त्यास जेरीस आणणार होता. तोच प्रसंग स्वतः त्याच्यावर आला. अबदालीनें ही मराठ्यांची स्थिति ओळखली, व उपासमारीनें मराठ्यांस पूर्ण जेरीस आणून मग त्यांचें यथेच्छ पारिपत्य करण्याचा त्यानें बेत केला.

२. मराठ्यांस उपासमार काढीत तसेंच बसविण्यांत अबदालीचा फायदा होता; व लवकर युद्ध करून अबदालीचा शह उठविण्यांत मराठ्यांचा नफा होता. हा फायदा ओळखून मराठे अबदालीच्या सैन्यावर कार्तिक वद्य १स (२३।११।१७६०) चालून गेले. त्यांची अबदालीच्या सैन्याशीं मोठी लढाई झाली. जनकोजी शिंद्यानें अतुल पराक्रम करून जय मिळविला. त्या युद्धांत सहाशें गिलचे ठार झाले; व मराठ्यांकडील सोळ अडीचशें लोक पडले. मराठ्यांनीं अब-

दालीच्या सैन्यास रेटीत रेटीत त्याच्या गोटापर्यंत नेलें. मराठ्यांचें अबदालीशीं दुसरें युद्ध कार्तिक व॥ अमावास्येस (७ डिसेंबर) झालें. त्यांतही अबदालीचाच पराजय झाला. अबदालीकडील दीड हजार माणूस त्याच्या तळापुढें मरून पडलें. मराठ्यांकडील दीडशें ठार व सहाशें जखमी झालें. पण या युद्धांत बळवंतराव मेहेंदळे पडला. त्यामुळें मराठ्यांचें मोठेंच नुकसान झालें. या दोन्ही युद्धांत मराठ्यांस जय मिळाला खरा; पण यापासून त्यांचा विशेष फायदा झाला नाहीं. स्वतः अबदाली दोन्ही वेळां युद्धांत सामील झाला नाहीं, व म्हणून त्याचें कोणत्याही प्रकारें धैर्य खचलें नाहीं. मराठे उपासमारीनें अगदीं जर्जर होऊन जाण्याच्या अगोदर त्यांच्याशीं युद्ध न करण्याचा अबदालीनें निश्चय केला होता.

३. इतक्यांत भाऊ अबदालीकडून कोंडला गेल्याची बातमी पुण्यास बाळाजी बाजीरावास समजली. तेव्हां तो पंचवीस तीस हजार फौज घेऊन भाऊच्या साहाय्यास निघाला. तो मार्गशीर्षांत बऱ्हाणपुरापर्यंत आला. स्वतः पेशवेच हिंदुस्थानांत येत आहेत ही बातमी गोविंदपंतास लागतांच धन्यापाशीं आपली अब्रू कायम रहावी या ईर्षेनें गोविंदपंत चार लाख रुपये घेऊन दिल्लीस आला. खजिनानारो शंकराच्या स्वाधीन करून गोविंदपंत स्वतः पानिपतच्या रोखें गाजिउद्दीननगराकडे निघाला.परंतु त्या शहराजवळ अबदालीचा सरदार आतईखान त्याच्यावर चालून आला. मग दोघांचें युद्ध होऊन त्यांत गोविंदपंत मार्गशीर्ष पौर्णिमेला मारला गेला(२२।१२।१७६०).इतक्या उशिरानें कां होईना पण गोविंदपंताच्या हातून जर अबदालीची रसद तोडली गेली असती तर त्यापासून मराठ्यांस पुष्कळ फायदा झाला असता. पण गोविंदपंत मारला जाऊन मराठ्यांचा शेवटचा आशातंतुही नष्ट झाला. पुढें मार्गशीर्ष वद्य ३०स पाराशर दादाजी वाघ, पांचशें स्वार व दीड लाख खजिना घेऊन दिल्लीहून पानिपतास

जाण्यास निघाला; पण चुकीनें तो अबदालीच्या सैन्यांत शिरला ! तेथें त्याचे कांहीं स्वार मारले गेले, कांहीं दिल्लीकडे परत गेले. हा पानिपतास कोंडलेल्या मराठी लष्करास साहाय्य करण्याचा दुसरा व शेवटला प्रयत्न निष्फळ झाला. येणेंप्रमाणें मराठी सैन्यास साहाय्य मिळालें नाहीं. मराठी लष्करांत तीन रुपयास शेर इतकेंही धान्य मिळेनासें झालें. लोकांस उपोषणें होऊं लागलीं; व हत्ती, उंट, घोडे वगैरे जनावरांस चैरण न मिळाल्यामुळें तीं मरूं लागलीं. असा प्रकार झाल्यावर सर्व मराठे सरदार भाऊकडे आले, व त्यांनीं भाऊस विनंति केली कीं, ' भाऊसाहेब, आह्मांस रणांत मारावें, पण अन्नाशिवाय मारूं नये. ' तेव्हां भाऊनें कोंडी फोडून दिल्लीकडे जाण्याचा निश्चय केला.

४. पौष शुद्ध ८स (१४।१।१७६१) बुधवारीं पहाट झाली होती. अजून सूर्योदयास एक प्रहर अवकाश होता. अशा समयीं भाऊ व विश्वासराव उठले, व सर्व सरदारांस लवकर निशाणापाशीं येऊन दाखल होण्याचा भाऊनें हुकूम केला. आज्ञा होतांच सर्व सरदार भगव्या झेंड्यापाशीं जमा झाले व त्यांनीं भाऊस मुजरे केले. शिंदे, होळकर आदिकरून सर्व सरदारांस सन्निध बोलावून भाऊनें वीरश्री उद्दीपित करणारें भाषण केलें. " आजचा निदान समय, सतीचें वाण घेतलें. त्यापरती दुसरी गोष्ट अणुमात्र चित्तांत आणूं नये. तुम्ही पुरातन कैलासवासी रावसाहेब व आप्पासाहेब यांच्या वेळचे यख्त्यारी आहां. आजपर्यंत अन्न भक्षिलें त्याचें आज सार्थक करून दाखवावें. स्वर्गी रावसाहेब व आप्पासाहेब भले म्हणतील तें कर्म करावें! रायांनीं दौलतसुद्धां आम्हांस तुमच्या हवालीं करून कैलासभुवनास गेले. त्या गोष्टीची शरम तुम्हांस असावी. यश किंवा अपयश हें तुमचें तुम्हीं सांभाळावें. " यावर सरदारांनीं भाऊस उत्तर केलें, " आम्ही जीविताची तमा धरीत नाहीं ! महाराजांचें पुण्य आमच्या

मस्तकीं असतां इराणीचीं बिशाद काय ? मारून गर्दीस मिळवून देऊं. आपण कांहीं चिंता न करावी. " इतकें झाल्यावर मराठी फौज शत्रूवर चालून जाण्यासाठीं व्यवस्थेनें उभी राहिली. मध्यावर खासे भाऊ व विश्वासराव हुजरातीसह होते. उजवीकडे जनकोजी शिंदे व मल्हारराव होळकर आपल्या सेनेसह सज्ज होते. डावीकडे दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार, अंताजी माणकेश्वर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर व समशेरबहादर हे सरदार होते. सर्व सैन्यापुढें तोफखाना असून त्यावर इब्राहिमखान गारदी होता. पाठीमागें बुणगें असून त्यामागें कांहीं किरकोळ पथकें होतीं. अशा तयारीनें मराठी फौज तळावरून निघाली. तेव्हां शिंगें, ताफे, नगारे इत्यादि वाद्यांच्या नादानें आकाश दुमदुमून भरून गेलें. मराठी फौज तळापासून दीड कोस पुढें आली. अबदाली वाट देऊन एकीकडे झाला तर लढाई न करितां तसेंच दिल्लीस जाण्याचा भाऊचा बेत होता.

५. परंतु मराठ्यांस उपासमारीनें जर्जर केल्यावर अबदालीनें त्यांस शांतपणें जाऊं देणें केवळ अशक्य होतें. मराठे निघाले ही बातमी कळतांच त्यानेंही आपलें सैन्य युद्धास तयार केलें. मध्यभागीं त्याचा वजीर शहावलीखान म्हणून होता. उजव्या बाजूस रोहिले सरदार व डाव्या बाजूस नजीबखान व सुजाउद्दवला असे होते. सर्व सैन्यापुढें त्याचा तोफखाना होता. खासा अबदाली मागेंच राहिला होता.

६. मराठी फौज तळावरून निघाल्यावर थोड्याच वेळानें तोफांच्या माऱ्यास दोहोंकडून सुरुवात झाली. त्याबरोबर धुरानें दशदिशा भरून गेल्या. इतक्यांत सूर्य क्षितिजावर आला; पण धुरानें दशदिशा व्याप्त झाल्यामुळें बराच वेळ सूर्यदर्शन झालें नाहीं. मग दोन्ही फौजा जवळ येतांच मराठ्यांच्या डावीकडील यशवंतराव पवार व

विठ्ठल शिवदेव पुढें जाऊन लढाई करूं लागले. परंतु ते हटत हटत फिरून आपल्या जाग्यावर आले; तेव्हां इब्राहिमखान गारदी यानें तोफांचा मारा सुरू केला व आपली पलटणें पुढें काढलीं. त्याचें व रोहिल्यांचें युद्ध होऊं लागलें. प्रहर दिवसाचे सुमारास सर्व बाजूंकडे लढाई सुरू झाली. इब्राहिमखानानें एक निकराचा हल्ला करून आठ हजार रोहिले ठार केले. इकडे भाऊ व विश्वासराव हे वजीर शहावलीखान मध्यावर होता त्याच्यावर चालून गेले. त्यांनीं पहिल्या तडाक्यासच पंधरा हजारांची फळी फोडून तीन हजार लोक मारिले व खुद्द वजिराचा मुलगा ठार केला. मुलगा पडतांच वजीर घाबरला व त्याचे लोक पळूं लागले. वजिराकडील बाजू पराभव पावून पळूं लागली हें समजतांच नजीबखान भाऊशीं लढण्यास आला. नजिबानें आपला मोर्चा भाऊकडे वळविला असें पाहतांच जनकोजी शिंदे भाऊच्या मदतीस आला. तेथें मोठें तुंबळ युद्ध सुरू झालें. रोहिल्यांच्या तोफांच्या मारामुळें शिंद्याकडील बरेच लोक पडूं लागले, पण एकंदरीनें मराठ्यांचें पाऊल पुढें पडत होतें. डाव्या बाजूस पवार, गायकवाड, व इब्राहिमखान या सरदारांनीं गिलच्यांस मुळींच पुढें येऊं दिलें नाहीं. लढाईंत मराठ्यांस जय येत चालला व गिलच्यांच्या फौजेंत पळ सुरू झाला. हें पाहून अबदालीनें आपल्याजवळ शिल्लक ठेविलेली ताज्या दमाची चार हजार फौज पळणाऱ्या लोकांवर पाठवून त्या सर्वांस परत लढाईस नेलें. यामुळें भाऊवर आणखी दहा हजार फौज एकदम चाल करून आली. अगोदर नजीबखान भाऊशीं झुंजत होताच, त्यांत आणखी ही नवी भर पडली.

७. सुमारें दोन वाजले होते. मराठे अगदीं निकरानें लढत होते. इतक्यांत दुर्दैवानें विश्वासरावास एक बंदुकीची गोळी अचानक येऊन लागली; व तो मरणोन्मुख होऊन पडला. याच वेळीं डाव्या बाजूस विठ्ठल शिवदेवाच्या लष्करांतील हजार पठाणांनीं आपल्या

डोक्यावरील भगवीं फडकीं काढून टाकिलीं; व मराठ्यांच्या बुणग्यांत पराभव झाल्याचा पुकारा केला. त्यावरोबर मराठ्यांच्या फौजेंतील बुणगें पळूं लागलें. इतक्यांत विश्वासरावास गोळी लागल्याची बातमी भाऊस कळल्यामुळें त्यानें आपला हत्ती विश्वासराबाजवळ नेला. त्याची स्थिति पाहून भाऊच्या मनास धक्का बसला. पण भयंकर जखम झाली होती तरी विश्वासरावानें " तुम्ही चला, लढाई बिघडेल" असें भाऊस सांगितलें. विश्वासराव कांहीं आतां बांचत नाहीं, हें पाहून भाऊ जिवावर उदार झाला. हत्ती टाकून तो घोड्यावर स्वार झाला, व गर्दीत घुसून मोठ्या निकरानें लढूं लागला. इतक्या वेळांत मराठ्यांची पिछाडी पळूं लागली व तीन जरीपटक्यांशेजारीं थोडे कुलीन लोक तेवढे लढत होते. मराठे पळतात हें पाहून अबदालीचे लोक दोहों बाजूंनीं बुणग्यावर घुसले व कत्तल सुरू झाली. भाऊ, शिंदे, समशेरबहादर व इब्राहिमखान येवढ्यांचे लोक मात्र शेवटपर्यंत लढत होते. बाकी सारे सरदार पळून गेले अगर ठार झाले. भाऊनें पळ थांबविण्यासाठीं जयवाद्यें वाजविलीं; पण कोणीही परत आलें नाहीं. जरीपटक्याभोंवतीं लढाई जोरांत चालली होती. " हाणा हाणा " म्हणतां म्हणतां भाऊच्या तोंडास कोरड पडली. शेवटीं आपल्या फौजेपैकीं बहुतेक सर्व नाहींशी झाली असें पाहून त्वेषानें शत्रूवर चाल करून जाऊन भाऊ गर्दीत मिसळला. जनकोजी शिंदे पाठोपाठ होता. पण त्यास मध्येंच शत्रूनें कैद केलें व ठार मारलें. याप्रमाणें सायंकाळीं लढाई आटोपून मराठ्यांचा पूर्ण पराभव झाला. मराठ्यांचें सर्व सामानसुमान शत्रूच्या हातीं लागलें. सर्व रणांगणावर प्रेतांचे ढीगच्या ढीग पडले होते; जे लोक दडून बसले होते त्या सर्वांस गिलच्यांनीं कैद केलें व दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांपैकीं बायकांमुलांस गुलाम म्हणून ठेवून घेऊन पुरुषांस एका दावणींत उभें करून, एकानें चार भाजलेले दाणे प्रत्येकाच्या हातावर टाकावयाचे,

नंतर भिस्त्यानें त्याच्या ओंजळींत चुळकाभर पाणी टाकावयाचें, व तिसऱ्यानें येऊन त्याचा वध करावयाचा. अशा क्रूरपणानें गिलच्यांनीं त्यांची कत्तल केली.

८. पळापैकीं सुमारें पांच सात हजार लोक दिल्लीकडे आले. त्यांत समशेरबहादर, मल्हारराव होळकर व भाऊची बायको पार्वतीबाई वगैरे माणसें होतीं. शिवाय विठ्ठल शिवदेव, दमाजी गायकवाड, महादजी शिंदे, नाना फडणीस वगैरे मंडळी जशी ज्यास वाट मिळेल तशी निघून आली. सुरजमल जाटानें पळाच्या लोकांस विशेषच साहाय्य केलें व त्यांची माळव्यांत रवानगी केली. इतक्यांत बाळाजी बाजीराव भाऊच्या मदतीस निघाला होता, तो नर्मदापार होऊन सिरोंजेस येऊन पोहोंचला होता. येथें त्याला पानिपतचें भयंकर वर्तमान समजलें, " दोन मोत्यें गळालीं, सत्तावीस मोहोरा हरवल्या आणि रुपये व खुर्दा यांचा पत्ताच नाहीं, " अशी व्यापारी खबर लागली. इतक्यांत पळाचे लोकही येऊन मिळाले. पानिपतचें वर्तमान ऐकून बाळाजीस जबर धक्का बसला. त्याचें मस्तक फिरून त्याला भ्रम झाला. त्याच्या मनांतून पुढें चाल करून जावयाचें होतें; पण सरदारांनीं त्यास मागें फिरविलें. तो पुण्यास आला तो सारखा "भाऊ भाऊ " म्हणून ओरडत होता. शेवटीं या मानसिक दुःखाचा त्याच्या प्रकृतीवर परिणाम होऊन तो शके १६८३ च्या ज्येष्ठ वद्य ६ स (२३।६।१७६१) पर्वतीवर मृत्यु पावला.

९. इ. स. १७५० त शिंदे–होळकरांनीं पेशव्याच्या नांवें पातशाही फर्मान (सनद) मिळवून दिल्लीच्या पातशाहीचें संरक्षण करण्याची जड जबाबदारी अंगावर घेतली. तेव्हां दिल्लीस आपलें वर्चस्व पूर्णपणें बसविण्यासाठीं मराठ्यांच्या त्या प्रांतीं स्वाऱ्यांवर स्वाऱ्या होऊं लागल्या. बाजीरावानें उत्तरेकडे मोहिमा करून माळवा हस्तगत करण्याची शिकस्त केली, तेव्हांपासूनच मराठ्यांस अनु-

कूल व प्रतिकूल असे दोन पक्ष दिल्लीदरबारीं उत्पन्न झाले होते. आतां ते दोन्ही पक्ष पुनः जोरानें काम करूं लागले. अनुकूल पक्षाचा पुढारी गाजीउद्दीन वजीर हा झाला व दुसऱ्या पक्षाचीं मुख्य सूत्रें मराठ्यांचा पक्का द्वेष्टा नजीबखान रोहिला याच्या हातीं गेलीं. दुसऱ्या पक्षास मुसलमानांनीं मराठ्यांची मदत घेणें मुळींच आवडत नव्हतें व दिल्लीस मुसलमानांची निर्भेळ सत्ता चालावी यासाठीं त्याची खटपट होती. मग एतद्देशीय मुसलमानांच्या हातून ही कामगिरी पार न पडल्यास इराण, अफगाणिस्तान येथील सत्ताधाऱ्यांची मदत आणून ही गोष्ट सिद्ध करण्यास त्या पक्षाची ना नव्हती. याच हेतूनें या पक्षानें अबदालीस हिंदुस्थानवर पुनः पुनः आणिलें. या दुसऱ्या पक्षाचा मुख्य हिंदुद्वेष्टा नजीबखान यास कडक शासन करून या पक्षाचा नायनाट करावा अशी बाळाजी बाजीरावाची सरदारांस आज्ञा होती. परंतु मल्हारराव होळकराच्या अदूरदृष्टीमुळें दुष्ट नजीब वांचला व पानिपताचा प्रसंग मराठी राष्ट्रावर कोसळला. पानिपतच्या स्वारीच्या वेळीं अबदाली सन १७५९ च्या नोव्हेंबरांत हिंदुस्थानांत उतरला तो पुढें दीड वर्ष इकडेच होता. या अवधींत अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला हा प्रबळ मुसलमान सरदारही त्याच्या बाजूस मिळाला, व मराठ्यांच्या बाजूस उत्तरेकडील कोणीच बलाढ्य मुसलमान सरदार राहिला नाहीं. तेव्हां या झगड्यास 'हिंदु विरुद्ध मुसलमान' असें धर्मयुद्धाचें अनिष्ट स्वरूप प्राप्त झालें. मात्र या वेळींही जाट व रजपूत राजे हे मराठ्यांस मिळाले नाहींत व हिंदूंत पुरी एकी नांदली नाहीं. एकाकी राहूनच मराठ्यांस संकलित मुसलमानांशीं टक्कर द्यावी लागली. तथापि सदाशिवरावभाऊची हिंमत विलक्षण होती व त्यानें तोफखान्याच्या साह्याच्यानें अबदालीस रगडण्याचा पुरा बेत केला होता; तेव्हां यमुनेच्या पश्चिमतीरानें दिल्लीहून वर उत्तरेकडे जाऊन त्यानें कुंजपुरा हें ठाणें सर केलें, व पुढें यमुना

उतरून तो अबदालीशीं गांठ घालणार होता. इतक्यांत अबदालीनें अचानकपणें बागपतावर यमुना उतरून सदाशिवरावास उत्तरेकडे अडकविलें. पुढें गोविंदपंत बुंदेल्याकडून अबदालीची रसद तुटली नाहीं व उपासमारीनें जर्जर झालेल्या मराठी फौजेस अबदालीवर चालून जावें लागलें. युद्धांत गोळी लागून विश्वासराव हा मराठ्यांचा मोहरा पडला व त्यांचा पूर्ण पराभव झाला. पानिपतवर मराठ्यांमधील कर्तबगार पुरुषांची जवळजवळ एक सबंध पिढी गारद झाली; व मुसलमानी सत्ताही खिळखिळी झाली. त्यामुळें मोंगल बादशहा व अयोध्येचा नबाब यांस हातीं धरून उदयोन्मुख इंग्रजांस आपला उत्कर्ष करून घेण्यास उत्तम संधि मिळाली. तथापि पानिपतच्या पराभवामुळें मराठे मुळींच हताश झाले नाहींत.लवकरच बाळाजी बाजीरावाचा मुलगा माधवराव या तरुण व तडफदार पेशव्यानें चोहोंकडे आपला वचक बसविला; पानिपतच्या युद्धानंतर अवघ्या दहा वर्षांच्या आंत महादजी शिंदे व विसाजी कृष्ण बिनीवाले या मराठे वीरांनीं 'दुसरा शहाआलम' हा मोंगल बादशहा इंग्रजांचा हस्तक बनून अलाहाबादेस राहिला होता, त्याची दिल्लीस स्थापना केली व दिल्लीच्या पातशहाचे कारभारी बनून हिंदुपदपातशाही गाजविण्याचें आपलें धोरण पुनः चालू केलें. नंतर कवायती फौजांचा आश्रय करून महादजी शिंद्यानें दिल्ली-दरबारीं मराठ्यांचें वजन स्थिर केलें. पुढें सन १८०३मध्ये इंग्रज सेनापति लेक यानें दिल्ली घेतली तेथवर तें कायम होतें. त्या वेळीं मात्र आपसांतील दुही, कर्तबगार पुरुषांचा अभाव, लष्करची अव्यवस्था इत्यादि कारणांनीं मराठी साम्राज्यसत्ता नष्ट झाली. त्यापुढें साम्राज्याचे तुकडे पडून कित्येक मराठी संस्थानें मात्र इंदूर, ग्वालेर, बडोदें इत्यादि ठिकाणीं इंग्रजांच्या आश्रयानें जीव धरून राहिलीं आहेत.

---

७१. पेशव्यांच्या घरांत कलीनें प्रवेश केला !

बाळाजी बाजीरावास एकंदर तीन मुलगे होते. त्यांपैकीं सर्वांत वडील विश्वासराव पानिपतांत पडला. त्याच्या मागें दोघे होते. थोरला माधवराव सतरा वर्षांचा, व धाकटा नारायण सहा वर्षांचा. बाळाजी बाजीराव वारल्यावर एक महिन्यानें माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं; व तो अजून लहान असल्यामुळें त्याचा चुलता राघोबा राज्याचा सर्व कारभार पाहूं लागला.

२. पानिपत येथील अपजयामुळें मराठ्यांचा दरारा अगदीं नाहींसा झाल्यासारखा होता. दिल्लीदरबारीं रोहिल्यांचें वजन वाढलें व अंतर्वेदींतील मराठ्यांची सत्ता पार उठली. चंबळेजवळचे जाट व रजपूत संस्थानिकही मराठ्यांस मुळींच मोजीतनासे झाले. पण ते लांब उत्तरेकडे तरी होते. दक्षिणेंतसुद्धां मराठ्यांच्या शत्रूंस जोर आला. हैद्राबादच्या गादीवर सलाबतजंग होता; पण सर्व अधिकार त्याचा धाकटा भाऊ निजामअलीच गाजवीत असे. पानिपतास पराभव झाल्यामुळें मराठे हतवीर्य झाले आहेत व बाळाजीसारख्या कर्त्या पेशव्याच्या जागीं त्याचा लहानसा मुलगा पेशवा झाला आहे;तेव्हां आपला उदगीरच्या लढाईंत मराठ्यांनीं घेतलेला प्रांत परत मिळविण्यास ही उत्तम संधी आहे,असें पाहून निजामअलीनें मराठी मुलुखावर खुद्द पुण्यापर्यंत स्वारी करण्याचा बेत केला. त्यानें औरंगाबादेजवळ मोठी फौज जमा केली; व तो चाल करून पुढें येऊं लागला. उत्साहाच्या भरांत त्यानें गोदावरीच्या कांठच्या टोकें येथील देवस्थानचा विध्वंस केला. राघोबाची मुळींच तयारी नव्हती. मात्र निजामाची फौज चाल करून येत आहे असें कळतांच मराठी फौज हळू हळू जमूं लागली. शेवटीं फौज ऐशीं नव्वद हजार जमली. शिवाय टोक्याचा नाश निजामानें केल्यामुळें रामचंद्र जाधव

हा निजामाकडील हिंदु सरदार फुटून मराठ्यांकडे आला व त्यानें निजामअलीचा धाकटा भाऊ मीरमोंगल यासही फितवून आपल्याबरोबर आणिलें. पण इतक्या गोष्टी जरी अनुकूल होत्या तरी मराठे सरदारांत उत्पन्न झालेलीं भांडणें मिटवून एकीनें शत्रूवर हल्ला चढविण्याचें काम राघोबाकडून झालें नाहीं. त्यामुळें निजाम पुण्यापासून चौदा मैलांवर उरळी या गांवीं आला. तेथें मात्र त्याच्यावर हल्ला चढवून मराठ्यांनीं त्यास कोंडून टाकिलें. तेव्हां त्यानें निरुपाय झाल्यामुळें तहाचें बोलणें सुरू केलें. तरी निजाम कसा एकदां परत जातो याची राघोबास इतकी चिंता लागली होती कीं, उदगीरच्या लढाईनंतर झालेल्या तहांत मिळालेल्या मुलुखांपैकीं औरंगाबाद व बेदर या परगण्यांचा सत्तावीस लाखांचा मुलूख निजामास परत देण्याचें त्यानें ठरविलें; अनायासें मिळालेला तो मुलूख घेऊन निजाम परत गेला. राघोबानें निजामाशीं जो नुकसानीचा तह केला त्याला एक दुसरें अंतःस्थ कारण होतें. राघोबा हा सखारामबापूच्या तंत्रानें चाले. सदाशिवरावभाऊचा मामा त्रिंबकरावमामा पेठे, बाबूराव फडणीस, गोपाळराव पटवर्धन, बाबूजी नाईक, व रास्ते या मंडळींशीं सखारामबापूचें वांकडें होतें. या सर्व मंडळीस राघोबाच्या हातीं कारभार राहणें आवडत नव्हतें. तेव्हां ही मंडळी आपल्या विरुद्ध उलटली तर निजामाची मदत घेऊन तीस चिरडतां यावें म्हणून राघोबानें निजामास आपला दोस्त करून ठेविलें. मग बाबूजी नाइकानें 'सखारामबापूस दिवाणगिरीवरून काढून टाका' असा हट्ट धरला; व गोपाळराव पटवर्धनानें, 'मला कर्ज फार झालें आहे; तेव्हां मला देऊं केलेली मिरज माझ्या लवकर हवालीं करा;' असा तगादा लाविला. तेव्हां राघोबा रागावून घरीं बसला व सखारामबापूनें दिवाणगिरी सोडून दिली. तेव्हां माधवरावाची आई गोपिकाबाई हिनें बाबूराव फडणीस व त्रिंबकरावमामा पेठे या दोघांस कारभारी

नेमिलें. मग माधवराव व त्रिंबकरावमामा दाक्षिणेकडे फौज घेऊन गेले. मिरज गोपाळराव पटवर्धनाच्या हवालीं करून व तुंगभद्रेपर्यंत स्वारी करून शके १६८४ (इ० स० १७६२) च्या पावसाळ्याच्या आरंभीं ते पुण्यास परत आले.

३. गोपिकाबाईनें त्रिंबकरावमामा व बाबूराव फडणीस यांच्या साहाय्यानें कारभार चालविला, हें राघोबास व विशेषतः सखारामबापूस मुळींच सहन झालें नाहीं. त्यानें पुण्यांत बसून गुप्तपणें विठ्ठल शिवदेव विंचूरकर, नारो शंकर, आबा पुरंदरे इत्यादि सरदारांशीं कारस्थानें चालविलीं, व थोड्याच दिवसांत राघोबास फिरून अधिकार मिळवून देण्याची व्यवस्था केली. भाद्रपद महिन्यांत राघोबा रुसून पुण्याजवळील वडगांवास गेला. त्याची समजूत करण्यासाठीं गोपिकाबाई स्वतः गेली होती, पण तो परत आला नाहीं. सखारामबापूनें आपल्या पक्षाच्या सरदारांस राघोबाच्या वतीनें सैन्य जमविण्याची इशारत केली; व निजामाची मदत मागण्याकरितां राघोबा औरंगाबादेकडे गेला. ही मराठ्यांत झालेली दुफळी निजामाच्या पथ्यावरच होती. तेव्हां त्यानें आपला दिवाण विठ्ठल सुंदर परशुरामी व मुरादखान यांजबरोबर राघोबाच्या मदतीस सैन्य दिलें; व आपण स्वतः मागून साहाय्यास येण्याचें आश्वासन दिलें. राघोबानें वाटेनें येतांना पैठण लुटलें व तो पुण्यावर चाल करून येऊं लागला.

४. राघोबा चाल करून येऊं लागला तेव्हां त्याच्याशीं टक्कर देण्याची तयारी त्रिंबकरावमामा व बाबूराव फडणीस करूं लागले. आनंदराव रास्ते, नरसिंगराव घायगुडे व पटवर्धन सरदार यांजवर माधवरावाच्या पक्षाची सर्व मदार होती. राघोबाशीं युद्ध करण्याकरितां माधवरावाची फौज पुण्याहून पुढें चालून गेली. दोन्ही सैन्यांची गांठ घोडनदीवर पडून तेथें लढाई झाली (कार्तिक व॥ ६ शके १६८४, ७।११।१७६२). राघोबानें केलेला हल्ला माधव-

रावाच्या फौजेनें मोठ्या शर्तीनें परत फिरविला. नंतर समेटाचें बोलणें होत होतें. इतक्यांत माधवरावाची फौज हटत हटत आळेगांवीं आली. पेशव्यांनी आपल्या हस्तगत व्हावें अशी राघोबानें अट घातली. राघोबाशीं युद्धांत आपला टिकाव लागणार नाहीं, हें माधवराव जाणून होता. म्हणून चुलत्याच्या स्वाधीन व्हावें असा त्याचा बेत होता. परंतु सरदारांनीं राघोबाशीं फिरून लढाई करण्याचा निश्चय केला. तह न ठरल्यामुळें राघोबा माधवरावाच्या फौजेचा पाठलाग करीत तसाच आळेगांवास आला. तेथें संध्याकाळच्या वेळीं मोठ्या निकराचें युद्ध झालें (कार्तिक व॥११; १२।११।१७६२). सखारामबापूनें माधवरावाच्या फौजेंत फितूर केला होता. त्यामुळें बरेच लोक पळून गेले. माधवरावानें व पटवर्धन मंडळीनें मोठा पराक्रम केला; पण शेवटीं त्यांस पराजय आला. तेव्हां माधवरावाचें सैन्य भीमा उतरून अलीकडे आलें. तरी राघोबा पाठलाग करण्याचें सोडीना. साऱ्या फौजेस दोन दिवसांचा उपास; तोफांचे बैल थकले; बहुतेक सरदार आपली फौज घेऊन पळून गेले; स्वतः माधवरावाची प्रकृतिही ज्वरामुळें हैराण; अशा स्थितींत राघोबा जवळ आला. तेव्हां निरुपाय म्हणून माधवरावानें राघोबाशीं समेट करण्याचें कबूल केलें. समेट करण्याचें ठरतांच गोपाळराव पटवर्धन मिरजेस निघून गेला. बाबूराव फडणीस व त्रिंबकरावमामा बारामतीस गेले. बाकीच्या फौजेसह माधवराव राघोबाच्या स्वाधीन झाला. आतां राज्याचा अधिकार फिरून राघोबा, व सखारामबापू यांच्या हातीं आला. इतकें होतें तों निजामअली आपल्या फौजेसह भीमेच्या कांठीं पेडगांव येथें दाखल झाला. त्याला राघोबानें एकावन लक्षांचा मुलूख देण्याचा करार केला होता. आतां त्याचें कांहीं काम नव्हतें; तेव्हां करारापैकीं कांहीं मुलूख त्यास देऊन राघोबानें निजामाची समजूत केली.

५. राघोबा व सखारामबापू यांच्या हातीं कारभार येतांच

माधवरावाच्या पक्षाच्या मंडळींचें पारिपत्य करण्याचा तडाखा सुरू झाला. गोपिकाबाई सिंहगडावर रहात असे. तिला पुण्यांत शनवार-वाड्यांत ठेविलें. शनवारवाड्यांत गारद्यांचा पहारा बसला व माधवरावाच्या डेऱ्याभोंवतींही पहारा बसला. भानूंच्या घराण्यांतून फडणिशी निघून चिंतो विठ्ठल रायरीकर यास ती मिळाली. श्रीनिवास गंगाधर ऊर्फ भवानराव याजकडून प्रतिनिधिपद काढून राघोबानें तें आपला अल्पवयी मुलगा भास्करराव यास दिलें व नारो शंकरास त्याचा मुतालीक नेमिलें. त्यानें पुरंदर व सिंहगड हे किल्ले पुरंदऱ्यांच्या हवालीं केलें. विठ्ठल-राव विंचूरकरास न्यायाधिशी व मोठी जहागीर मिळाली. बाबूराव फडणीस व त्रिंबकरावमामा हेही राघोबाच्या हातीं आले. इतकें झाल्या-वर राघोबानें पटवर्धनांचें पारिपत्य करण्याचें ठरविलें. यासाठीं मिरज त्यांच्यापासून घेण्याचें ठरवून राघोबा पुण्याहून निघाला. गोविंद हरि पटवर्धन मिरजेंत होता; व त्याचा मुलगा गोपाळराव गोविंद कृष्णा-कांठीं कुडचीस तळ देऊन होता. राघोबानें मिरजेस वेढा घातला व गोपाळरावावर दहा हजार फौजेसह आबा पुरंदऱ्यास पाठवून त्याच्या सैन्याचा धुव्वा उडविला. तेव्हां गोपाळराव कुमक मागण्यासाठीं निजामाकडे गेला. इकडे सव्वा महिन्यांत राघोबानें मिरज सर केली. नंतर तेथून पुढें त्याचा कर्नाटकांत जाण्याचा बेत होता. इतक्यांत निजामाचा उद्दामपणाचा निरोप कळल्यामुळें त्यास परत फिरावें लागलें.

---

७२. निजामाशीं युद्ध.

शके १६८५, राक्षसभुवनची लढाई, इ. स. १६६३.

राघोबा कारभार पाहूं लागला तेव्हां भवानराव प्रतिनिधि,

त्याचा मुतालीक गमाजी यमाजी व गोपाळराव पटवर्धन हे सरदार निजामाकडे गेले. तेव्हां निजामास मराठ्यांचा मुलूख जिंकण्यास ही उत्तम संधी आहे, असें वाटलें. या वेळीं निजामअलीचा दिवाण विठ्ठल सुंदर हा मागील रामदासपंताप्रमाणेंच कारस्थानी होता. त्यानें निजामास आपला होईल तितका फायदा करून घेण्याची सल्ला दिली. इतक्यांत मराठ्यांचा पाडाव करण्यास एक उत्तम साधन निजामास मिळालें. नागपुरास रघूजी भोंसल्याच्या गादीवर त्याचा मुलगा जानोजी होता.त्याच्याकडे प्रतिनिधीचा उलाढाल्या मुतालीक गमाजीबाबा गेला, व 'मी तुला सातारची गादी मिळवून देतों' असें त्यानें जानोजीस सांगितलें. तें ऐकतांच जानोजी अगदीं हुरळून गेला ! निजामअली व विठ्ठल सुंदर यांस येऊन तो भेटला; तेव्हां त्यांनीं त्याला सातारचा छत्रपति करण्याचें कबूल केलें. नंतर जानोजी भोंसले व निजाम या दोघांत "साठ-चाळिशीचा" तह झाला. म्हणजे जो नवा मुलूख जिंकावयाचा त्याचे साठ हिस्से निजामानें घ्यावे व चाळीस जानोजीस मिळावे. पेशव्यांशीं युद्ध करण्याचा निश्चय कायम झाला, व निजामानें आपल्याकडे आलेल्या सर्व मराठे सरदारांस मोठमोठ्या जहागिरी देण्याचें कबूल केलें. यामुळें ज्या ज्या मराठे सरदारांत भांडणें होतीं, त्यांतील एक पेशव्याकडे तर त्याचा प्रतिस्पर्धी निजामाकडे, अशी स्थिति झाली ! निजामाचें मोठें सैन्य जमलें. मग तो राजधानीकडे जात होता तो मोर्चा फिरवून भीमानदीच्या कांठाकांठानें सोलापूर जिल्ह्याकडे येऊं लागला. याच वेळीं म्हणजे शके १६८४ (सन १७-६३) च्या शेवटीं त्यानें पेशव्यास पुढीलप्रमाणें उद्दामपणाचा निरोप पाठविला:— "प्रतिनिधि, पटवर्धन वगैरे सरदारांच्या जहागिरी ज्या तुह्मीं जप्त केल्या त्या त्यांच्या त्यांस परत द्याव्या. जानोजी भोंसल्यास आणखी नवीन जहागीर द्यावी, भीमेअलीकडचें तुमचें सर्व राज्य आह्मांस देऊन टाकावें, व आह्मी सांगू तो कारभारी नेमून

कारभार चालवावा. इतकें करीत असाल तर आमचें तुमचें सख्य राहील. नाहींतर आह्मी तुमच्यावर चालून येऊन आमच्या म्हणण्याप्रमाणें तुम्हांस वागावयास लावूं. ''

२. हा असा उद्दामपणाचा निरोप येतांच राघोबा परत फिरला. निजामाची या वेळीं एक लाख फौज जमली होती. एवढ्या मोठ्या फौजेशीं आपल्या पंचेचाळीस हजार फौजेच्या साहाय्यानें टक्कर द्यावयाचें अवघड काम मराठ्यांस करावयाचें होतें. सखारामबापूनें राघोबास स्पष्ट सांगितलें कीं, 'समोरासमोरच्या लढाईंत आमचें कांहीं चालावयाचें नाहीं; तर या वेळीं गनिमी काव्याचाच उपयोग करावा. निजाम आपल्या मुलुखांत यावयाच्या अगोदर आपण त्याच्या व भोंसल्याच्या राज्यांत धुमाकूळ मांडावा. म्हणजे त्याला आपल्या पाठीवर येणें भाग पडेल. या युक्तीनें आपल्या राज्याचें रक्षण होईल.' सखारामबापूची ही मसलत सर्वांस पसंत पडली; यानंतर राघोबानें पहिल्यानें वऱ्हाडांत जाण्याचा बेत केला. पांच सात हजार फौज मिरजेकडे ठेवून पंचेचाळीस हजार फौजेनिशीं राघोबानें कूच केलें. मराठ्यांचें सैन्य मिरजेहून निघालें तें चौदाव्या मुक्कामीं त्यानें औरंगाबाद गांठलें. तेथें शहराच्या सुभेदाराकडून दोन लाख रुपयांची चिरीमिरी घेऊन तें नेमकें वऱ्हाडांत उतरलें. पेशव्यांच्या सैन्यानें जानोजीचा मुलूख उध्वस्त करण्याचा तडाका चालविला. इतक्यांत दहा लक्ष रुपयांची नवी जहागीर देण्याचें पेशव्यांनीं कबूल केल्यावर मल्हारराव होळकर येऊन पेशव्यांच्या लष्करांत सामील झाला.

३. आपल्या प्रांतांत जाऊन पेशव्यांच्या सैन्यानें लुटालूट चालविली आहे, हें पाहून जानोजी भोंसल्यानें निजामास पेशव्याच्या सैन्याचा पाठलाग करण्याविषयीं तगादा लाविला. तेव्हां निजाम व जानोजी हे दोघेही फौजा घेऊन सपाट्यानें वऱ्हाडाकडे निघाले.

त्यांच्या तोफा, डेरे, बुणगे, पायदळ, उंदेरीचा घांट चढून गेले मात्र, तों पेशव्यांच्या फौजेनें त्यांशीं लढाई करण्याची हूल दाखवून त्याच दिशेनें कांहीं मजल चाल केली. पेशवे लढाई करण्यासाठीं येत आहेत असें कळतांच सैन्याची व्यवस्था करून निजाम त्यांची वाट पहात बसला. पण पेशव्यांची फौज त्याच्याजवळ येऊन एकदम जी झुकली ती औरंगाबादेकडे गेली. मग पेशव्यांनीं आपणास फसविलें असें कळतांच निजाम खालीं आला. तों औरंगाबादेहून निघून करमाळे उजवें टाकून पेशव्यांचें सैन्य पार सोलापूर–तुळजापूरकडे गेलें. तुळजापुराहून मराठी सैन्य बेदरास गेलें. तेथें त्याच्या तीन टोळ्या करण्यांत आल्या. एकीवर मुख्य राघोबा व माधवराव, दुसरीवर मल्हारराव व नारो शंकर. आणि तिसरीवर बाबूजी नाईक व रामचंद्र गणेश कानडे असे होते. या तिन्ही टोळ्यांनीं वीस पंचवीस मैल अंतरावर राहून बेदरपासून हैद्राबादेपर्यंत मुलूख लुटून जाळून बेचिराख केला.

४. निजामास पेशव्यांचा पाठलाग करणें अशक्य आहे हें कळून चुकलें. जानोजी भोंसले वगैरे मराठे सरदारांनीं, पेशवे जसे तुमच्या राज्याजा विध्वंस करावयास गेले आहेत तसेंच तुम्ही त्यांच्या राज्यांत धुमाकूळ घाला, अशी निजामास मसलत दिली. मग निजाम औरंगाबादेहून निघाला व अहमदनगराकडे येऊं लागला. निजामानें आपल्या सैन्याचे तीन भाग केले; एका भागावर विठ्ठल सुंदरास मुख्य नेमून त्याला नाशीक-जुन्नराकडे पाठविलें. दुसऱ्यावर गमाजीबावास अधिकारी नेमून साताऱ्याकडे रवाना केलें; व भोंसले, धायगुडे, पटवर्धन यांसह आपण स्वतः पुण्याचा रोंख धरिला. निजाम चाल करून येत आहे अशी बातमी पुणेंकरांस कळतांच त्यांची जी कांहीं त्रेधा झाली ती विचारूं नये! पुष्कळ लोक जेवढी संपत्ति घेववेल तितकी घेऊन लोहगड, सिंहगड वगैरे किल्ल्यांच्या आश्रयास किंवा तळ–कोकणांत निघून गेले. तरी

इकडले लोक निजामाकडे असल्यानें निजामास सर्व ठिकाणांचा पत्ता लागला. पेशवेसरकारचे कारखाने सिंहगडच्या पायथ्याशीं होते. ते भोंसल्याचा सरदार रघोजी करांडे यानें लुटले. लोहगडच्या पायथ्याशीं पुण्याचे लोक जाऊन राहिले होते, त्यांजवर निजामानें छापा घालून बीस लक्ष रुपयांची जिनगी लुटली. पुण्यांतील वाडे खणून जाळून टाकण्याचा निजामाचा बेत होता. तेव्हां पुण्यांतील अधिकारी नारो आप्पाजी तुळशीबागवाले यानें गोपाळराव पटवर्धनाच्या मध्यस्थीनें साडेतीन लक्ष रुपये घेऊन निजामानें प्रांतांतून निघून जावें, असा तह केला. तिकडे विठ्ठल सुंदर व गमाजीबावा यांनींही यथेच्छ लुटालूट चालविली होती. इतक्यांत पावसाळा समीप आल्यामुळें निजामानें आपल्या मुलुखांत जाऊन बेदरास छावणी करण्याचा निश्चय केला; व तो परत जाऊं लागला.

५. या वेळपर्यंत पेशव्यांनींही निजामाच्या मुलुखांत चांगलीच चंगळ मारिली. निजामानें मराठ्यांच्या मुलुखांत जाऊन दंगा केला, यास कारण त्याच्याकडे गेलेले मराठे सरदार होत, हें आतां सर्व मराठी मुत्सद्यांच्या मनांवर पक्कें बिंबलें होतें. तेव्हां त्यांची समजूत केल्यावर निजामास सहज चेपतां येईल, हेंही त्यांस कळण्यास वेळ लागला नाहीं. तेव्हां त्यांच्याशीं एकी करण्याचें ठरलें. त्यांतील प्रमुख म्हणजे जानोजी भोंसले हा होता. मल्हारराव होळकराच्या मध्यस्थीनें त्याच्याशीं समेट झाला. बत्तीस लक्षांचा मुलूख त्याला देण्याचें पेशव्यांनीं कबूल केलें. भवानराव प्रतिनिधीस त्याची जहागीर परत देण्यांत आली. नारो शंकराकडची मुतालिकी काढून ती पुनः गमाजीबावास देण्यांत आली. फडाणिशी बाबूरावास देण्याचें राघोबानें कबूल केलें. पटवर्धनासही मिरज परत देण्याचें ठरलें.

६. असें ठराव झाल्यावर पावसाळा जवळ आला म्हणून निजामाचा निरोप घेऊन फिरून दसरा झाल्यावर येऊं, अशी त्याला थपा

देऊन त्याच्याकडे गेलेले मराठे सरदार त्याच्या लष्करापासून वीस पंचवीस कोसांवर आले. इतक्यांत निजामानें बेदरचा रस्ता सोडून औरंगाबादचा रस्ता धरिला. ही बातमी जानोजीनें पेशव्यांस कळवून निजामानें गोदावरी ओलांडिली नाहीं तोंच त्यांस गांठावें असा इशारा दिला. तेव्हां पेशव्यांनीं जलद कूच केलें व आषाढ व॥ अमावास्येस ते राक्षसभुवनापासून आठ कोसांवर आले. तेथें त्यास अशी बातमी लागली कीं, निजामानें गोदावरी ओलांडिली आहे; पण दहा पंधरा हजार निवडक स्वार, पांच सात हजार गारदी व आठ दहा तोफा येवढ्यांसह विठल सुंदर मात्र अजून अलीकडल्या तीरीं आहे. हें ऐकतांच मध्यरात्रीच्या सुमारास मराठी सैन्यानें कूच केलें व शके १६८५ श्रावण शु० १ स (१०।८।१७६३) सूर्योदयानंतर विठ्ठल सुंदरास गांठलें.आबा पुरंदरे व हुजूरपागेचे सरदार अघाडीस होते. त्यांच्यावर निजामाच्या फौजेनें तोफा सुरू केल्या. पण थोडक्याच वेळांत निजामाच्या तोफखान्यांतच घोंटाळा झाला. लाबरोबर संधि साधून आबा पुरंदरे व विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांनीं शत्रूच्या मोर्चावर हल्ला केला व तो उधळून लावून ते शत्रूच्या सैन्यांत शिरले. तों मागून खुद्द राघोबा सैन्याची टोळी घेऊन कापाकापी करीत आंत गेला. इतक्यांत विठ्ठल सुंदरानें आपल्या लोकांनिशीं मोठ्या आवेशानें हल्ला करून पुरंदरे व विंचूरकर यांस पार हुसकून दिलें. नंतर सारें निजामाचें सैन्य, मध्यभागीं सांपडलेल्या एकट्या राघोबावर तुटून पडलें. त्या वेळीं राघोबानें पराक्रम करून बराच वेळ आपला बचाव केला; परंतु शेवटीं तो शत्रूच्या हातीं लागतो कीं काय असें वाटूं लागलें. अशा कठिण प्रसंगीं कुमक पाठवून राघोबास माधवरावानें सोडविलें. या युद्धांत सैन्यांत स्वतः हिंडून माधवराव व्यवस्था पहात होता व लोकांस उत्तेजन देत होता. एकदां राघोबा सुटल्यावर मराठ्यांनीं असा निकराचा हल्ला केला कीं, त्यामुळें शत्रूची अगदीं गाळण

उडाली. खुद्द विठ्ठल सुंदर मारला गेला. आणखी निजामाचे बारबास सरदार जखमी होऊन कैद झाले. निजामाचें बहुतेक सैन्य कापलें गेलें! निजामअली उत्तर तीरावर होता व तिकडून प्रथम त्यानें मराठ्यांवर तोफा सुरू केल्या होत्या. पण त्यांचा फारसा उपयोग झाला नाहीं. रात्र पडतांच सर्व जड सामान जेथल्या तेथें टाकून तो औरंगाबादेस पळून गेला. या युद्धांत मराठ्यांस जें यश आलें तें माधवरावाच्या शौर्यामुळें व मेहनतीमुळें होय. ही गोष्ट राघोबानें गोपिकाबाईस लिहिलेल्या एका पत्रांत कबूल केली. "चिरंजीव रायांनीं यंदां शिपायीगिरींत व मेहनतींत कांहीं कमी केली नाहीं. आम्हांपेक्षां अधिक झाले. इतके दिवस त्यांनीं लढाई देखिली नव्हती. पहिली लढाई पाहिली. यांत सर्व प्रकारें तरतूद अधिक केली. ह्यांचा पुढें कर्तेपणाचा भरंवसा आम्हांस आला. सांप्रत कारभार चिरंजीव करीत* आहेत."

७. आठ दिवसांनीं गोदावरीचें पाणी उतरतांच मराठी लष्कर उत्तर तीराला जाऊन औरंगाबादेकडे चाललें. तेथें जाऊन पेशव्यांनीं त्या शहरास वेढा दिला. पण आतां दोन्ही बाजू युद्धास कंटाळल्या होत्या. पावसाळा असल्यामुळें लष्करांतील लोकही घरीं जाऊं लागले. तेव्हां उभयपक्षीं तह ठरला. निजामानें उदगीरच्या लढाईंत मराठ्यांनीं घेतलेला बासष्ट लक्षांचा प्रांत बहुतेक परत घेतला होता. या तहांत निजामानें एकंदर ब्यायशीं लक्षांचा मुलूख मराठ्यांस दिला. अशा रीतीनें पेशव्यांपासून भीमेअलीकडचा सर्व प्रांत मागणारा निजाम बाळाजी बाजीरावाच्या वेळेप्रमाणें नरम आला. याप्रमाणें यशस्वी होऊन व सर्व सरदारांस कबूल केल्याप्रमाणें जहागिरी व अधिकार देऊन राघोबा व माधवराव दोघेही आश्विन महिन्यांत पुण्यास आले.

* ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग दुसरा, लेखांक ३४७.

७३. हैदरचा पुंडावा.

—:०:—

निजामाशीं चाललेलें युद्ध संपून पुण्यास परत आल्यावर राघोबानें सर्व राज्यकारभार माधवरावावर सोंपविला, व आपण स्वतः स्नानसंध्या करण्याकरितां नाशिकास निघून गेला. माधवरावाच्या हातीं कारभार येतांच त्याला पहिली गोष्ट करावी लागली ती हैदरअलीचें पारिपत्य ही होय. त्याची हकीकत समजण्यापूर्वी 'हैदर कोण? त्याचें पारिपत्य करण्याची कां जरूर पडली?' या गोष्टी कळणें अवश्य आहे.

२. महाराष्ट्राच्या दक्षिणेस असलेल्या कर्नाटक प्रांताचे, तुंगभद्रेच्या उत्तरेकडचा उत्तर कर्नाटक व दक्षिणेकडचा दक्षिण कर्नाटक असे दोन भाग आहेत. त्यांपैकीं दक्षिण कर्नाटकांत म्हैसूरचें संस्थान असून त्याची राजधानी श्रीरंगपट्टण असल्याची माहिती मागें आलीच आहे. म्हैसूरच्या राज्यांत हैदर नांवाचा, एका गरीब नाइकाचा मुलगा होता. म्हैसूरच्या राजाचा प्रधान नंदराज यानें एकदां बंगळूरजवळच्या देवनहळ्ळी या किल्ल्यास वेढा घातला होता. त्या वेळीं हैदराचा पराक्रम व हुशारी नंदराजास दिसून आली. त्यानें लागलीच हैदरास पन्नास स्वार व दोनशें पायदळ येवढ्या फौजेचा नाईक नेमिलें. नासिरजंग जेव्हां मुजफरजंगाचें बंड मोडण्यास गेला त्या वेळीं व पुढें इंग्रजांस फ्रेंचांविरुद्ध मदत करण्याकरितां नंदराजानें सैन्य पाठविलें होतें, या दोन्ही मोहिमांत हैदरनाईक हजर होता; व त्यानें त्या स्वाऱ्यांत असतां लुटालूट व लुच्चेगिरी करून आपलें बळ बरेंच वाढविलें. १५०० स्वार ३००० गारदी, २००० प्यादे व चार तोफा इतका मोठा सरंजाम तो बाळगूं लागला. नंदराजाची हैदरावर बहाल मर्जी झाली; व त्यानें त्यास दिंदिगल या डोंगराळ मुलुखाचा फौजदार नेमिलें. त्या

प्रांतांत व्यवस्था राखण्यास आपल्यास किती त्रास पडतो, याचीं खोटीं रसभरित वर्णनें तो सरकारांत लिहून धाडीत असे. नंदराजास भुरळ पडून हैदरचें म्हणणें खरें वाटूं लागलें. हैदरनें फौजेची गणती करतांना खोटे आंकडे देऊन खुशाल पैसे उपटावेत. जर कोणी अंमलदार वरून तपासणीस आले तर त्यांची मूठ दाबून धडधाकट लोकांच्या पायास हळदीचीं फडकीं गुंडाळावीं, व या ढोंगी जखमी लोकांची परेड करून जखमपट्टीची जादा रक्कम उपटावी! अशा युक्त्या करून हैदरनें खूप पैसा मिळविला. त्यानें पांडिचरीहून फ्रेंच कारागीर आणून तोफा ओतण्याचा व दारू गोळा तयार करण्याचा कारखाना घातला! अशा रीतीनें हैदरचें सामर्थ्य इतकें वाढलें कीं, थोड्याच दिवसांत म्हैसूरच्या राज्यांत हैदर करील ती पूर्वदिशा असें झालें.

३. म्हैसूरचा हिंदु राजा चिक् कृष्णराज सर्वस्वी नालायक असून राज्याचा सर्व कारभार त्याचा दिवाण नंदराज हाच पहात असे, व हैदरानें नंदराजास कारभारांतून काढून टाकण्यासाठीं सारख्या खटपटी चालविल्या होत्या. हें मागें प्रकरण ६७, कलम ४ मध्यें सांगितलेंच आहे. शेवटीं त्यानें एक खाशी युक्ति केली. दिंदिगल, कोइमतूर, बंगलूर व मराठ्यांकडून परत मिळालेले चौदा सुपीक परगणे, म्हणजे म्हैसूरच्या राज्यापैकीं सुमारें अर्धा भाग, हैदरानें जहागीर म्हणून लाटला होता. त्यामुळें म्हैसूरच्या खजिन्यांत त्या वेळीं पैशाची टंचाईच होती. अशा स्थितींत सैन्याची बऱ्याच दिवसांची बाकी तुंबली होती. म्हैसूरच्या सैन्यांतील सर्व लोकांस हैदर प्रिय झाला होता. एकदां त्यानें सैन्यांतील लोकांस आपल्या घरीं बोलावून 'तुम्ही बाकीबद्दल धरणें धरून बसा' असें सांगितलें व पुढें काय काय करावयाचें हें सर्व पढवून ठेविलें. प्रथम ते लोक हैदरच्या घरीं धरणें देऊन बसले. हैदरनें त्यांस सांगितलें "मजकडे काय? राज्याचा कारभार नंदराज पाहतात त्यांजकडे तुम्ही जा व त्यांस आपला पगार मागा." मग

त्या लोकांनीं असा हट्ट धरिला कीं, " तुम्ही आम्हांबरोबर येऊन नंदराजाकडून आम्हांस पगार मिळवून द्यावा. " या लोकांच्या हट्टापुढें आपलें कांहीं चालत नाहीं असें ढोंग करून हैदरनें त्या लोकांसह नंदराजाच्या घरीं जाऊन धरणें दिलें. सैन्याचें धरणें आपल्या घरीं आलेलें पाहून नंदराज अगदीं घाबरून गेला. तो सैन्यास म्हणाला, " बाबांनो, माझ्यानें आतां कारभार होत नाहीं. मी कारभार सोडून कोठें तरी जाऊन स्वस्थ हरिहरि म्हणत बसणार. मग मला आतां पगाराबद्दल कशाला बरें त्रास देतां ? " मग ते लोक म्हणाले, "बरें, तर आम्ही राजाकडे जाऊं. आमची उपासमार होत आहे. आजच्या आज पगार मिळाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाहीं. " इतकें बोलून हैदरास पुढें घालून ते राजद्वारीं गेले. नंतर राजानें हैदरकडून सर्व लोकांसमक्ष " मी राजाशीं इमानानें वागेन, नंदराजाप्रमाणे बेइमान होणार नाहीं, " अशी शपथ घेवविली. ही शपथ हैदरनें घेतल्याबरोबर राजानें जाहीर केलें कीं, ' आजपासून नंदराजास काढून टाकून हैदरअलीस आम्हीं दिवाण नेमिलें आहे. फौजेच्या देण्याची तजवीज ते करतील. ' हें राजाचें बोलणें ऐकतांच धरणें उठलें व लोक घरोघर निघून गेले (शके १६८२, इ. स. १७६०).

४. पुढें एक दोन वर्षांत हैदरनें राजास आपल्या पूर्ण कब्यांत आणिलें. शेवटीं हैदरनें राजास तीन लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख तोडून देऊन तें उत्पन्न खात बसावयास लाविलें; व तेव्हांपासून हैदर स्वतःच म्हैसूरचा राजा झाला ! मराठ्यांचा पानिपतास पराभव झाल्याची खबर ऐकतांच या खारीनें खुशाल उत्तरेकडे पाय पसरण्यास सुरुवात केली. त्याने तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील सर्व मुलूख जिंकला. चित्रदुर्ग, रायदुर्ग, हरपनहळ्ळी येथील संस्थानिकांपासून खंडण्या घेतल्या व बिदनुरावर चाल करून तो सर्व प्रांत हाताखालीं घातला. बिदनूरच्या वायव्येस कारवार जिल्ह्यांत सोंधे संस्थान होतें,

तेंही त्यानें काबीज केलें, व आतां तुंगभद्रेच्या उत्तरेस त्याची गडबड सुरू झाली. सावनूरच्या नबाबास तंबी देऊन त्याच्यापासून हैदरनें दोन लक्ष खंडणी काढली. नंतर मीरफैजुल्ला नांवाच्या आपल्या सरदारास दक्षिण महाराष्ट्र म्हणजे हल्लींचे बेळगांव, धारवाड व विजापूर हे जिल्हे जिंकण्याच्या कामगिरीवर ठेवून तो स्वतः बिदनुरास परत गेला. मीरफैझुल्लयानें धारवाड वगैरे पुष्कळ ठाणीं घेतलीं; व त्याच्या स्वाऱ्या वर्धा, घटप्रभा, मलप्रभा या नद्या ओलांडून जवळ जवळ कृष्णातीरापर्यंत होऊं लागल्या. मराठी राज्याच्या दक्षिणेस हैदरचा असा दंगा चालला होता, त्या वेळीं माधवराव निजामाशीं लढण्यांत गुंतला होता. औरंगाबादेचा वेढा आटोपून लवकर तह उरकून घेण्याची माधवरावानें घाई केली, त्याचें कारण हैदरअलीनें चालविलेला दंगाच होय.

---

७४. हैदरअलीवरील पहिली स्वारी.

(शके १६८१-८६, इ. स. १७६४-६५)

माधवराव शके १६८५च्या पौषाच्या आरंभीं हैदरवर स्वारी करण्यास निघाला. अजून सैन्य जमलें नव्हतें. सैन्य जमेपर्यंत दक्षिण महाराष्ट्रांतील किरकोळ कामें करून घेण्याचा माधवरावानें विचार केला. माधवरावास पुण्याहून निघून सुमारें तीन महिने झाल्यावर मराठ्यांची फौज जमा झाली. या स्वारींत पंधरा हजार हुजरात व इतर जहागीरदारांची फौज मिळून एकंदर चाळीस हजार फौज जमली होती. पेशवे हैदरचा समाचार घेण्यास येत आहेत असें कळतांच सावनूरच्या नबाबास आनंद झाला.सावनूरकर नबाब व गुत्तीचा मुरारराव घोरपडे हे दोघे येऊन मिळाल्यावर पेशव्यांची फौज सत्तर हजारपर्यंत

झाली. पण इतकी फौज लढाईस कधींच तयार नसे. पुष्कळ लोक ठाणीं काबीज करण्यास व काबीज केलेल्या ठाण्यांचें संरक्षण करण्यास लागत. सामान्यतः पेशव्यांबरोबर लढती फौज तीस हजार स्वार, पांच हजार गारदी व वीसपर्यंत तोफा इतकीच असे.

२. मराठे आपल्यावर चाल करून येत आहेत असें पाहतांच हैदरनेंही लढाईची तयारी केली. मराठ्यांशीं मैदानांत आपला टिकाव लागावयाचा नाहीं हें हैदर जाणून होता. याकरितां डोंगराचा व जंगलाचा आश्रय करून आपण रहावें व मराठ्यांच्या सैन्यावर गुप्त छापे घालून त्यांस जेर करावें असा त्यानें बेत केला. त्यानें मीर फैजुल्ल्यास दहा पंधरा हजार फौजेसह धारवाड प्रांतीं ठेविलें व स्वतः तीस हजार गारदी, बारा हजार स्वार, पन्नास तोफा व सुमारें वीस हजार कानडी प्यादे यांजसह तुंगभद्रेच्या आसपास अनवडी येथें छावणी केली.

३. माधवरावानें पहिल्यानें तुंगभद्रेच्या अलीकडचीं हैदरानें घेतलेलीं कांहीं ठाणीं सोडविलीं; पण लवकरच ठाणीं घेण्यांत व्यर्थ वेळ न घालवितां तुंगभद्रेपार जाऊन चित्रदुर्ग, हरपनहळ्ळी इत्यादि ठिकाणच्या संस्थानिकांपासून खंडणी काढावी व तिकडील मुलूख उध्वस्त करावा, असा माधवरावानें संकल्प केला. आपण दूर गेलों ही बातमी ऐकून हैदर जर मैदानांत येऊन आपल्या ठाण्यांस त्रास देऊं लागेल, तर आपण उलटावें व झटदिशीं त्याच्या सैन्यास गांठून त्याचा संहार करावा, असा माधवरावानें बेत केला; व सावनूरकराचें रक्षण करण्याचें काम गोपाळराव पटवर्धनास सांगून माधवराव तुंगभद्रा उतरून चित्रदुर्गाकडे गेला. पेशवे लांब गेले असें पाहतांच हैदरानें अनवडीहून छावणी हालवून सावनूरच्या राज्यांतील रटेहळ्ळीस आणिली व तो आसपास घिरट्या घालूं लागला. तो बंकापुरापासून पांच कोसांवर आल्याची बातमी माधवरावास सात आठ दिवसांत कळली. त्याबरोबर त्यानें लष्कर परत फिरविलें व चैत्र व॥ अमावास्येच्या

सुमारास माधवराव सावनूरच्या आसपास आला. हैदर बेसावध होता. त्याच्यावर रटेहळ्ळीजवळ सर्व मराठी फौजेनें असा जोरानें हल्ला चढविला कीं, आपण यांतून कसें वांचतो असें हैदरास झालें. पण लवकरच रात्र पडली; त्यामुळें हैदरचा बचाव झाला, व सकाळीं तो आपल्या छावणींत जाऊन दाखल झाला. आतां पावसाळा समीप आला होता. तेव्हां माधवरावास त्या प्रांतींच छावणी करावयाची कीं काय हा विचार करणें प्राप्त झालें.त्यानें शेवटीं हैदरचा पक्का बंदोबस्त केल्याशिवाय परत जावयाचें नाहीं असें ठरवून त्याच प्रांतीं छावणी करण्याचें ठरविलें.

४. पेशव्यांचा छावणी करण्याचा निश्चय ठरला हें पाहून हैदरास वाईट वाटलें. पण करतो काय ? आलेल्या प्रसंगास तोंड देणें त्याला भाग होतें. त्याची धारवाडप्रांतीं धारवाड, बंकापूर व शिरहट्टी हीं तीन मुख्य ठाणीं होतीं. त्यांपैकीं बंकापूर हें ठाणें सावनुरापासून तीन कोसांवर होतें. तेव्हां तेथील फौज वाढवून सावनुरास त्रास देण्याचा हैदरनें क्रम आरंभिला. पण गोपाळराव पटवर्धनाची माधवरावानें तिकडे रवानगी केल्याबरोबर हैदरचें कांहीं चालेनासें झालें. भाद्रपद महिन्यांत माधवरावानें धारवाडास वेढा घेतला; व आंतील शिबंदीस हैदराकडून मदत पोहोंचूं नये म्हणून गोपाळराव पटवर्धनास जवळच टेहेळणी करण्यास ठेविलें. इकडे हैदरनें सावनुरास त्रास देण्याचा सारखा क्रम चालविला होता; पण त्यापासून मराठ्यांचें विशेषसें नुकसान झालें नाहीं. कार्तिक शुद्ध १२स धारवाड पेशव्यांच्या हातीं आलें. मग माधवरावानें हैदरास गांठून लढाई करण्याचा निश्चय केला. हैदर या वेळीं अनवडीस होता. तिकडेच मराठ्यांच्या फौजा चालल्या. नंतर एक टेकडी हैदरच्या लष्कराजवळ उत्तम माऱ्याची जागा म्हणून सखारामबापूप्रभृतींनीं पसंत केली. तीवर तोफा चढवून माधवराव तिच्या पायथ्याशीं राहिला. टेकडीपासून हैदरच्या छावणीपर्यंत जंगल

होतें; त्या जंगलाच्या तोंडीं पटवर्धन व मुरारराव घोरपडे यांस ठेविलें. मग टेकडीवरून तोफांचा मारा सुरू झाला. त्याबरोबर हैदरच्या लष्करांतील लोक पटापट मरूं लागले. हैदर अगदीं कावून गेला. त्यानें हल्ला करून टेकडीवरील तोफा घेण्याचा धाडसी बेत केला. झाडीच्या तोंडाशीं तो अकस्मात् प्रगट झाला. तेथें मुरारराव व पटवर्धन यांनीं लढण्याची शिकस्त केली, पण हैदरच्या तोफांपुढें त्यांचें कांहीं चालेना. त्यांचे लोक पळून जाऊं लागले; तरी मुरारराव न डगमगतां तसाच झुंजत होता. इतक्यांत माधवरावास हें वर्तमान कळलें; व तो घोड्यावर स्वार होऊन हुजरातसह धांवून आला. तेथील स्थिति पाहतांच माधवराव मारामार करीत शत्रूच्या व्यूहांत शिरला; व त्यानें गारद्यांच्या कत्तलीस सुरुवात केली. तितक्यांत घोरपडे, विंचूरकर व पटवर्धन यांनींही एकदम हल्ला केला. त्यामुळें हैदर हतवीर्य होऊन फौजेसह पळूं लागला. मराठ्यांनीं झाडींत शिरून शत्रूचा पाठलाग केला; व त्याच्या पांचही तोफा, तीन हजार बंदुका व सातशें घोडे इतकी लूट मिळवून आणली. एव्हांपासून माधवरावाचा हैदरास असा कांहीं वचक बसला कीं, तो स्वतः ज्या फौजेंत असेल तिच्याशीं झुंजण्याचें धाडस हैदरनें यापुढें केलें नाहीं; व त्याच्या लष्करापासून वीस पंचवीस कोसांच्या टापूंत तो कधीं फिरकला नाहीं.

५. या लढाईच्या दुसऱ्या दिवशीं माधवरावानें सर्व लष्कर अनवडीस आणलें; हैदरास बिदनूरकडून धान्याचा पुरवठा होत असे, तो मराठ्यांनीं बंद केला; व त्याला चोहों बाजूंनीं घेरिलें. तेव्हां तेथें राहिल्यास आपणास खास उपाशी मरावें लागेल, असा विचार मनांत येऊन हैदर आपलें सर्व लष्कर घेऊन झाडींतून बिदनुरास जाऊं लागला. पण माधवरावानें बिदनूरच्या वाटेंत आपल्या सैन्याचा एक भाग नेऊन ठेवला असल्यामुळें हैदरास लढाईस उभें राहणें भाग पडलें. मराठ्यांनीं चोहोंकडून एकदम हल्ला केला. हैदरचे कित्येक हजार

गारदी ठार झाले. पंचवीसशें स्वार व दहा हजार पायदळ इतक्यांनिशीं हैदर बिदनुरास पळून गेला. हजारों घोडे, उंट, बाजारबुणगें, तोफा, व बंदुका मराठ्यांस मिळाल्या! (मार्गशीर्ष शु.९शके१६८६, १।१२।१७६४). यानंतर हैदरकडून तहाचें बोलणें करण्याकरितां वकील आला. पण अटी न जुळल्यामुळें लढाई चालू राहिली.

६. राक्षसभुवनच्या लढाईनंतर राघोबानें नाशिक येथें स्नानसंध्या करून राहण्याचा पेशा उचलला होता, तरी हलक्या लोकांच्या नादीं लागून पुतण्याविरुद्ध कारस्थानें करण्यासही सुरवात केली होती. ही बातमी ऐकून माधवरावास चिंता पडली व त्यानें राघोबास कर्नाटकांत बोलाविलें. त्याप्रमाणें राघोबा दसऱ्यास नाशिकाहून निघाला.माधवराव चित्रदुर्ग, हरपनहळ्ळी वगैरे संस्थानांची खंडणी घेण्यास जात होता, त्यास माघ शु. ६स (२७।१।१७६५)राघोबा मिळाला. खंडण्या घेतल्यावर हैदरास मैदानांत काढण्याकरितां श्रीरंगपट्टणावर हल्ला करण्याचा मराठ्यांचा बेत होता.पण अशा रीतीनें हैदरास वठणीस आणण्यास बरेच दिवस लागतील असें वाटल्यामुळें शेवटीं बिदनूरवरच चालून जाण्याचें ठरलें. या मसलतीप्रमाणें मराठे बिदनूरपासून दहा कोसांवर येऊन दाखल झाले. हें पाहतांच आपले सर्व उपाय थकले, असें वाटून हैदर मराठ्यांस शरण आला. मग उभयपक्षीं समेट झाला. उत्तर कर्नाटकपैकीं हैदरनें घेतलेला मराठ्यांचा सर्व मुलूख परत द्यावा, म्हैसूरच्या खंडणीबद्दल मराठ्यांस बत्तीस लक्ष रुपये द्यावे व सावनूरकर नबाब व मुरारराव घोरपडे या दोघांस त्यानें यापुढें मुळींच त्रास देऊं नये, असें ठरलें. हा तह हैदरास फायदेशीर झाला असें माधवरावाचें मत होतें, व म्हणून त्यास तो मुळींच आवडला नाहीं. पण मोहिमेचा सर्व अधिकार आतां राघोबास दिला असल्यामुळें त्यास कांहीं बोलतां आलें नाहीं.

---

७५. राघोबाची उत्तरहिंदुस्थानावरील३री स्वारी

(शके १६८८;इ. स. १७६६;)

हैदरवरील स्वारी संपवून राघोबा परत आला नाहीं तोंच त्यानें राज्याची अर्धी वांटणी देण्याबद्दल माधवरावाशीं भांडण लाविलें. तेव्हां माधवराव बोलला, "राज्य कोणाचें ! आम्ही वांटणार कोण ? आमच्यानें वांटवत नाहीं. सर्व राज्य तुमचेंच आहे. आम्ही चार बारगीर तसे तुम्हांजवळ असों. सर्व तुम्हीं *करणें." याच सुमारास माधवरावानें राघोबाचा दिवाण चिंतो विठ्ठल रायरीकर यास एक चिठ्ठी लिहिली.

" ही दौलत मोठी. या दौलतेस सर्व लहानमोठ्यांनीं अनुकूल असून जेणेकरून दौलत नीट होय तेंच सर्वांनीं करावें; तें येकीकडे राहून दौलत दोहों जागा करावी हेंच तीर्थरूपांचें मानस. त्यास आम्हांस कांहीं करणें नाहीं. कारण कीं, ही दौलत पहिल्यापासून एकांनींच करावी, वरकडाचा भार करणारावर असावा; याप्रमाणें चालत आलें असतां, आतां वडिलांचें मानस कीं, ' आम्हांस गुजराथ द्यावी. आणि सर्व किल्ल्यांचा बंदोबस्त आम्हींच करूं ' म्हणतात. त्यास आम्हास कांहीं करणें नाहीं. कांकीं अशानें ही दौलत चालणार नाहीं. व दोहों जागा दौलत जाल्यानें लवकीकही वाईट, यास्तव सर्व वडिलांनींच करावें. आम्ही स्वस्थ भलते जागा राहूं. आपल्या आपल्यांत भांडून दौलत बुडविली हा लवकीक कशास पाहिजे ? सर्व त्यांनींच करावें हें फार चांगलें, आम्ही स्वस्थ राहूं. वडिलांनीं नीट केल्यावर आम्हांस सांगतील तेव्हां आम्ही जवळच आहों. हेंच प्रस्तुत काळीं बरें. तुम्हांस लिहावयाचें कारण इतकेंच कीं, सर्व लोक म्हणतात; 'ही दौलत थोर, तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब चिंतोबांचे हातीं; तेव्हां चिंतोबांनीं वडिलांस समजून सांगावें, आणि या गोष्टीचा बंदोबस्त पाडावा.' हे

*ऐतिहासिक लेखसंग्रह भाग तिसरा, लेखांक ५७४(२५।६।१७६५).

येकीकडेच राहून नव्या गोष्टी निघतात हें काय ? तेव्हां या गोष्टीचा शब्द तुम्हांवर, लोक आणतात. तुम्ही तर बडिलांस आपल्या तर्फेनें सांगतच असाल. परंतु बडिलांचा इतबार तुम्हांवर, तेव्हां शब्द तुम्हांवर आणितात. तुम्ही तर नीट करितां; परंतु लवकीक बाहेर कसा आहे हा तिराइतास पुसावा. ही चिटी वाचून फाडून टाकणें, दुसऱ्यास एकंदर कळऊं न देणें. दुसऱ्यास कळवाल तर शफत असे. हेंच बोलणें रुबरू बोलावेंसें होतें, परंतु वर्तमान ऐकिलें कीं, तुम्हांस बरें वाटत नाहीं. यास्तव चिटी लिहिली +असे " शेवटीं माधवराव आपलें ऐकत नाहींसें पाहून राघोबानें वांटणीचा आग्रह सोडला.

२. राघोबा केव्हां उलटेल याचा नेम नव्हता. अशा स्थितींत भोंसले व निजाम हे जर दोघे त्यास मिळाले, तर त्याचें बंड यशस्वी होण्याचाही संभव होता. म्हणून याच वेळीं माधवरावानें निजामाशीं कायमचें सख्य करून टाकलें. परस्परांनीं एकमेकांस मदत करावी; जो एकाचा शत्रु तो दुसऱ्याचा शत्रु अशी परस्पर वागणूक असावी; व कर्नाटकाच्या मोहिमा दोघांनीं मिळून कराव्या असें ठरलें. यानंतर पहिल्यानें जानोजी भोंसल्याचें पारिपत्य करण्याचें पेशवे व निजाम या दोघांनीं मिळून ठरविलें. मागें निजामाकडे फितूर होऊन बत्तीस लक्षांचा मुलुख जानोजीनें लाटला होता; म्हणून माधवरावाचा त्याच्यावर राग होता; व आयत्या वेळीं आपल्या पक्षास सोडून पेशव्यास जाऊन मिळाला म्हणून निजामअलीही त्याच्यावर रागावला होता. शके १६८७ (सन १७६५) च्या कार्तिकाच्या आरंभीं माधवराव पुण्याहून वऱ्हाडच्या रोखें निघाला. कायगांव-टोक्याजवळ निजामाचा दिवाण रुकनुद्दवला सात आठ हजार फौजेसह त्यास मिळाला. राघोबादादा फौजेसह नाशिकाहून निघून कसबे भंडारी (परगणे

+ ग. इ. सा. खंड १३, पत्रांक ८४ (ज्येष्ठ शके १६८७).

बाळापूर) येथें माधवरावास मिळाला. येवढ्या फौजेबरोबर लढण्याची जानोजी भोंसल्याची तयारी नव्हती, यामुळें राघोबादादामार्फत त्यानें तहाचें बोलणें लाविलें. शेवटीं तह ठरून दोन वर्षांपूर्वी मिळालेल्या बत्तीस लक्षांच्या मुलुखापैकीं चोवीस लक्षांचा मुलूख परत देण्यास जानोजी तयार झाला. या चोवीस लक्षांच्या मुलुखांपैकीं नऊ लक्षांचा आपल्याकडे ठेवून बाकी पंधरा लक्षांचा मुलूख माधवरावानें कायमची दोस्ती राखण्यासाठीं निजामास देऊन टाकला.

३. पानिपतच्या लढाईनंतर उत्तर प्रांतीं रोहिले, पठाण, अयोध्येचा नबाब या सर्वांनीं मराठ्यांचें वर्चस्व कमी करण्याचा व त्यांचा मुलूख बळकाविण्याचा उपक्रम केला होता. त्याचप्रमाणें माळव्याच्या उत्तर, वायव्य व पश्चिम सीमांवर रजपूत संस्थानिक, जाट व बुंदेलखंडांतील संस्थानिक यांनींही बंडाळी माजविली होती. मराठ्यांच्या पानिपत येथील पराभवानें इंग्रजाचें तर चांगलेंच फांवलें. प्लासीच्या लढाईनें (सन १७५७) बंगाल त्यांच्या हातीं पडला होता. पुढें मीरकासीम या बंगालच्या सुभेदाराचें व इंग्रजाचें भांडण झालें. तेव्हां अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला व मोंगल बादशहा शहाआलम (दुसरा) यांनीं मीरकासीमशीं संगनमत केलें व त्या तिघांचें मिळून इंग्रजांशीं बहार प्रांतांत बक्सार येथें युद्ध झालें (२३।१०।१७६४). त्यांत इंग्रजांचा जय झाला. नंतर इंग्रज फौज अयोध्या प्रांतावर चालून गेली. तिनें बनारस व अलाहाबाद ही ठिकाणें काबीज करून पुढें अयोध्या प्रांताची जुनी राजधानी फैजाबाद ही घेतली व अयोध्येच्या नबाबाचा सर्व मुलूख हस्तगत करण्याचा सपाटा चालविला. बादशहा शहाआलम इंग्रजांच्या स्वाधीन झाला होता; सुजाउद्दवल्यानें मात्र इंग्रजांचें वर्चस्व एकदम मान्य केलें नाहीं. त्यानें मल्हारराव होळकर व रोहिल्यांचा मुख्य सरदार हफीज रहमतखान यांच्याशीं तह करून इंग्रजांस तंबी देण्याचा बेत केला. मराठी फौज दुआबांत

शिरली. तेथें 'कुडा' शहराजवळ इंग्रज व मराठे यांजमध्यें युद्ध झालें (३।५।१७६५). तोफांच्या साहाय्यामुळें त्यांत इंग्रजांची सरशी झाली व मराठी फौजेस यमुनेच्या दक्षिणेस हटावें लागलें. पण पुनः जमवाजमव करून मराठे दुआबांत शिरले. एक तुकडी अलाहाबादेकडे गेली व दुसरीनें मुख्य इंग्रज फौजेशीं गांठ घातली. 'पण इंग्रजांपाशीं तोफांचा मार फार. तेव्हां मल्हारबा काल्पीस आले. सुजाउद्दवल्याचें लष्कर इंग्रजांनीं लुटलें. मल्हारबा फार खट्टे झाले.' नंतर इंग्रज सेनापति क्लेचर यमुना उतरून दक्षिणेस आला (मे १७६५), व त्यानें मराठ्यांचा पाठलाग आरंभिला. लागलीच मल्हारराव ग्वालेरकडे निघून गेला; तेव्हां इंग्रज फौज अलाहाबादेस परत गेली. सुजाउद्दवल्याची खात्री झाली कीं, इंग्रजांपुढें आपलें कांहीं चालत नाहीं. म्हणून त्यानें अलाहाबाद येथें इंग्रजांशीं तह केला (१६।८।१७६५). त्यांत त्यानें इंग्रजांस लढाईच्या खर्चाची भरपाई म्हणून पन्नास लाख रुपये देण्याचें कबूल केलें, व इंग्रजांनीं फौजेचा खर्च घेऊन अयोध्या प्रांताचें शत्रूपासून संरक्षण करण्याची हमी दिली. तसेंच बादशहा शहाआलम यास इंग्रजांनीं अलाहाबादेस स्थापिलें. त्यानें इंग्रज कंपनीस बंगाल, बहार व ओरिसा या प्रांतांच्या दिवाणीची, म्हणजे वसूल-व्यवस्थेची सनद दिली. त्याचा मोबदला म्हणून इंग्रजांनीं त्याला बंगालच्या उत्पन्नांतून दरसाल सव्वीस लक्ष रुपये नजराणा देण्याचा करार केला व त्याच्या खर्चास अलाहाबाद व कराकुडा हे अयोध्या प्रांतांतील दोन परगणे तोडून देवविले (१९।८।१७६५). अशा रीतीनें अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला व मोंगल बादशहा शहाआलम हे इंग्रजांचे सर्वस्वी अंकित बनून गेले.

४. मराठ्यांचें उत्तर हिंदुस्थानांतील वर्चस्व अगदीं कमी झालें हें पाहून माधवरावानें राघोबास हिंदुस्थानांत पाठविण्याचें ठरविलें व

राघोबानेंही स्वारीवर जाण्याचें कबूल केलें. भोंसल्याशीं तह ठरतांच राघोबा हिंदुस्थानच्या स्वारीस निघाला. त्याच्याबरोबर जानोजी भोंसल्यानें आपला भाऊ मुधोजी यास पांच सात हजार फौजेसह दिलें, नारो शंकर व विठ्ठल शिवदेव विंचूरकर ह्या सरदारांस माधवरावानें राघोबाबरोबर पाठविलें होतें. माळव्यांत गेल्यावर राणोजी शिंद्याचा मुलगा महादजी शिंदे, पवार व मल्हारराव होळकर हे सरदार येऊन मिळाले. एकंदर फौज चाळीस हजार झाली.

५. राघोबानें हिंदुस्थानांत दोन कामें करण्याचें ठरविलें होतें. एक, रोहिले व अयोध्येचा नबाब यांशीं राजकारण करून दिल्लीच्या बादशाहीचा बंदोबस्त करण्याचें; व दुसरें, जाट संस्थानिक व रजपूत राजे यांस ताळ्यावर आणावयाचें. त्यांपैकीं प्रथम कोणचें करावें याविषयीं वाटाघाट चालली असतां शके १६८८ वैशाख शु० ११ स (२०।५। १७६६) मल्हारराव होळकर मृत्यु पावला. त्यामुळें राघोबाचे बेत विस्कळित होऊन तो कालपी येथें पावसाळ्यांत छावणी देऊन राहिला. पावसाळा संपतांच पहिल्यानें जाटांचा समाचार घेण्याचें राघोबानें ठरविलें. या जाटांपैकीं ग्वालेरीजवळील गोहदचा राणा फार प्रबळ झाला होता. बाजीराव पेशव्याच्या वेळीं मराठ्यांची कामगिरी बजावल्यामुळें त्यास बाजीरावाकडून गोहदचा परगणा व किल्ला जहागीर मिळाला होता. परंतु पानिपतच्या स्वारीनंतर तो राणा स्वतंत्र झाला व त्यानें मराठ्यांचा बराच मुलूख बळकाविला. तेव्हां राघोबानें त्याचें शासन करण्याचा निश्चय करून गोहदेस वेढा घातला. गोहदकर शूर संस्थानिक असून आपल्या राजधानीचें संरक्षण करण्याकरितां मोठ्या निकरानें झुंजत होता, व राघोबाही हट्टास पेटून मोर्चे लावून बसला. मराठ्यांचे कहींचे लोक धान्य गोळा करण्याकरितां आसपास हिंडत असतां जाट छापा घालून हत्ती व घोडीं धरून नेऊं लागले. त्यामुळें लष्करांत महागाई झाली. शेंकडा वीस रुपये

व्याज कबूल करूनही कोठें पैसा मिळेना. त्यामुळें लष्करचे रोजमुरे तुटले व फौजेंत दंगे होऊं लागले. गायकवाड व मल्हारराबाचा नातू मालीराव लष्कर सोडून गेले ! व आणखीही बरेच लोक जाऊं लागले. राघोबाजवळ अवघी वीस हजार फौज राहिली. तींत महादजी शिंद्याची दहा हजार होती. अशा स्थितींत गोहदकरास मदत करण्याकरितां भरतपूरचा जाट चंबळेपर्यंत आला. आतां विलंब न करितां हल्ला करून किल्ला घ्यावा असा राघोबानें बेत केला. महादजीनें हल्ला करूं नये म्हणून सल्ला दिला, पण राघोबानें न ऐकतां हल्ला चढविला. तीनदां हल्ला केला, पण तीनही वेळीं परत फिरावें लागलें. वेढ्याचें काम तसेंच रेंगाळत चाललें होतें. शेवटीं शिंद्याच्या मध्यस्थीनें पंधरा लक्ष खंडणी घेऊन राघोबानें वेढा उठविला.

६. चंबळेपार तळ देऊन भरतपूरकर जाट अजून युद्धास सज्ज होताच. रोहिलेही यमुनेचे घांट रोखून बसले होते. इंग्रज व सुजाउद्दवला यांनींही मराठ्यांच्या प्रतिकाराची तयारी केली होती. या सर्व शत्रूंस गप्प बसावयास लावण्याइतकी राघोबाची तयारी नव्हती. यामुळें बुंदेलखंडांत बहिरो अनंत व विठ्ठल शिवदेव या दोघांस बंदोबस्तास ठेवून राघोबा उज्जनीस गेला.

७. तेथें एक नवीनच मसलत उपस्थित झाली. मल्हारराबाच्या मागें त्याचा नातू मालीराव यास सरदारीचीं वस्त्रें दिलीं होतीं. पण तो लवकरच वारला. तेव्हां होळकराचा दिवाण गंगाधर यशवंत चंद्रचूड यानें राघोबाशीं ठरविलें कीं, मालीरावाची आई अहल्याबाई हिच्या मांडीवर एखादा अज्ञान मुलगा दत्तक देऊन गंगाधरपंतानें सर्व कारभार चालवावयाचा व अहल्याबाईच्या हातीं काडीइतकीही सत्ता ठेवावयाची नाहीं. ही मसलत अहल्याबाईसारख्या बाणेदार बायकोस मुळींच पसंत पडली नाहीं. तिनें राघोबास निरोप पाठविला कीं, " माझ्या राज्यांत मी आपल्या मालकीनें व्यवस्था करणार. गंगो-

वास हात घालण्याचें कांहीं कारण नाहीं. याउप्पर जर तुम्ही मध्यें पडाल तर मी लढाईस तयार आहें. माझा पराभव झाल्यास मी बायकोमाणूसच आहें; पण तुमचा पराभव झाल्यास बेअब्रूस पारावार नाहीं." माधवरावासही अहल्याबाईचें म्हणणें मान्य होतें. तेव्हां राघोबानें आपला हेका सोडला. मल्हारराव्याच्या भाऊबंदांपैकीं तुकोजी नांवाचा एक शूर सरदार होता. त्यास अहल्याबाईनें आपल्या फौजेवर मुख्य नेमिलें व गंगोबास दिवाणगिरीवरून काढून सर्व जहागिरीचा बंदोबस्त तिनें आपल्या हातीं घेतला. आपला बेत फसल्याबद्दल विषाद मानून राघोबा परत आनंदवल्लीस आला.

७६ राज्यकारभार

पानिपतासारखें भयंकर अरिष्ट मराठ्यांवर कोसळलें, राघोबानें घरगुती तंटे करण्यास सुरुवात केली, निजामअली व हैदर या महत्त्वाकांक्षी लोकांनीं मराठी राज्याचे लचके तोडण्याचा उपक्रम केला; अशा बिकट स्थितींत तरुण माधवरावानें मराठी राज्याचा जम बसवून निजाम व हैदर या दोघांसही थप्पड देऊन कसें गप्प बसावयास लाविलें, याची हकीकत मागें आलीच आहे. शके १६८७ व ८८ या दोन सालांतील पावसाळ्यांत माधवरावास कांहींशी फुरसत सांपडली. तिचा उपयोग त्यानें आपण नेमलेले अधिकारी करवसुलीच्या बाबतींत कसे काय वागतात हें पाहण्याकडे केला. त्याच्या दरबारांत बाळाजी जनार्दन भानू ऊर्फ नाना फडणीस, मोरोबादादा फडणीस, महादजीपंत गुरुजी, नारो आप्पाजी तुळशीबागवाले, हरिपंत फडके, रामराव चिटणीस, माधवराव जाधवराव, गोविंद शिवराम खासगीवाले, कृष्णराव बल्लाळ काळे वगैरे हुशार माणसें होतीं. त्यांच्या साहाय्यानें

राज्यांतील अंतःस्थिति सुधारून प्रजेस सुख लागावें यासाठीं माधवरावानें फार खटपट केली. दोनही वर्षें महालोमहालींचे हिशेब तपासण्याचें काम

श्रीमंत थोरले माधवराव पेशवे.

संशोधकः—गो. वि. आपटे. भा. इ. सं. मं. पुणें.

त्यानें जोरानें चालविलें. माधवरावास लबाडी बिलकूल खपत नसे व तो जाल्याच हुशार असल्यामुळें त्यास फसविणेंही शक्य नव्हतें. एखाद्यानें

गुन्हा केला कीं तो आप्त असो कीं मर्जीतील असो, त्यास शिक्षा केल्याशिवाय तो रहात नसे. बातमी राखण्याच्या कामांत तर त्याची कमाल असे. लक्ष्मण कोन्हेर म्हणून गंगथडीचा मामलेदार होता. त्यानें दरबारांतील लोकांस लांच भरून खोटे हिशेब सरकारांत गुदरले होते. माधवरावास ही बातमी समजतांच त्यानें एकदम त्या मामलेदाराच्या घरावर जप्ती नेऊन कच्चे कागद जप्त करून आणले, व त्यानें पावणेचार लक्ष रुपये मामलेदारींत खाल्ल्याचें शाबीत केलें! आरमाराच्या हिशेबाची तपासणी केली, त्यांत अधिकाऱ्यांनीं पन्नास हजार रुपये खाल्ल्याचें नजरेस आलें. तोफखान्याच्या हिशेबांतही लबाडी असल्याची कुणकुण कानावर आल्यामुळें तेथील रुमाल एकदम जप्त करण्यांत आले. अशी ही कडक तपासणी झाल्यामुळें सर्व लोकांस जरब बसून ते आपलें काम जास्त सचोटीनें करूं लागले.

२. त्या वेळीं सरकारी किंवा अधिकाऱ्यांच्या मालाची नेआण करावयाची असल्यास शेतकरी लोकांकडून ती फुकट करून घेण्यांत येई. या पद्धतीस वेठ म्हणत. माधवरावास या पद्धतींत अन्याय दिसून आला व त्यानें हुकूम पाठवून आपल्या राज्यांतील वेठ बंद करून टाकली. तरी ती पद्धति अधिकाऱ्यांच्या हाडींमासीं खिळली असल्यामुळें ते उघड नाहीं तर लपून वेठीचा व्यवहार करीतच होते. याच रीतीनें वसईचा सुभेदार विसाजी केशव लेले यानें कांहीं मौल्यवान् माल वेठीनें नेला. परंतु ही बातमी पेशव्यास समजली तेव्हां त्यानें लागलीच तो सर्व माल सरकारांत जप्त केला. वेठीसाठीं धरलेल्या लोकांस त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला दिला; व विसाजीपंतास जबर दंड ठोठावला. यानंतर माधवरावानें वेठीबद्दल जास्त कडक हुकूम काढले; तेव्हांपासून मात्र वेठ पार बंद झाली.

३. याच ठिकाणीं माधवरावाच्या कडकपणाबद्दल एक व शहाणपणाबद्दल एक अशा दोन आख्यायिका सांगणें जरूर आहे. राक्षस-

भुवनची लढाई झाल्यानंतर राघोबानें सर्व राज्यकारभार माधवरावाच्या स्वाधीन केला; तेव्हांपासून माधवराव कारभार पाहूं लागला. राघोबासारख्या भोळसटाच्या जागीं माधवरावासारखा तरबेज यजमान आलेला पाहतांच कांहीं कामचुकार व फाजील शिष्टाई मिरविणाऱ्या वृद्ध लोकांची बडेजावी कमी झाली. त्यामुळें राघोबा कामावरून गेला, हें अशा लोकांस आवडलें नाहीं. गंगाधर यशवंत चंद्रचूड अशाच लोकांपैकीं एक होता. एके दिवशीं दरबार भरला होता. तेव्हां दरबारांत गंगोबा म्हणाला, " हल्लीं राज्यकारभाराचा बोज कांहींच नाहीं; एका लहान मुलाच्या हातांत कारभार गेल्यानें जिकडे तिकडे पोरखेळ माजला आहे." ही त्या म्हाताऱ्याची बटबट ऐकून माधवरावास त्वेष आला. तो एकदम गादीवरून उठला; व गंगाधर यशवंताच्या जवळ जाऊन त्यानें सर्व मंडळीच्या देखत जोरानें एक त्याच्या थोबाडींत लगावली.

४. एकदां पुण्यांतील शास्त्रीलोकांचीं भाषणें ऐकून जपजाप्य, स्नानसंध्या, वगैरे धार्मिक कृत्यांत बराच वेळ घालवावा, असें माधवरावास वाटूं लागलें. त्याप्रमाणें रोज स्नानसंध्या, जपजाप्य यांत त्याचा बराच वेळ जाऊं लागला. रामशास्त्री प्रभुणे हा बाणेदार गृहस्थ त्या वेळीं न्यायाधीश होता. तो माधवरावास कांहीं राजकीय कामानिमित्त भेटण्याकरितां आला असतां त्याला असें कळलें कीं, पेशवे जपांत गुंतले आहेत; तेव्हां तो परत गेला. असें एक दोन दिवस झालें. तेव्हां रामशास्त्री तिसऱ्या दिवशीं निराळ्याच वेळीं माधवरावाकडे गेला व म्हणाला, " मी आपल्या जागेचा राजीनामा देतों, मला काशीस जाऊन रहावें असें वाटूं लागलें आहे." माधवरावानें रामशास्त्र्याच्या बोलण्यांतील हेतु तेव्हांच ताडला व तो म्हणाला, "मी काल जपांत गुंतल्यामुळें तुमची भेट घेण्यास अवकाश मिळाला नाहीं याबद्दल आपण मला क्षमा करा." रामशास्त्र्यानें यावर उत्तर

केलें, " तुम्ही आपणास राजे म्हणवितां व प्रजेचें काम पाहण्यास तुम्हांस वेळ सांपडत नाहीं. मला तर असें वाटतें कीं. राजास जर मोक्ष पाहिजे तर त्यानें प्रजेच्या हिताविषयीं तत्पर रहावें म्हणजे झालें. याउपर तुम्हांस जर जपच करावयाचा असेल तर राज्य सोडून मजबरोबर कार्शास चला व मग खुशाल आपला वेळ स्नानसंध्येत घालवा. " माधवरावास रामशास्त्र्याचा हा सुंदर उपदेश पटला व जपजाप्यांत गुंतून राहण्याचें त्यानें सोडून दिलें.

---

७७. गृहशत्रूचा मोड.

हैदरावर पहिली स्वारी केली त्या वेळीं दरसाल बर्त्तीस लक्ष रुपये खंडणी देण्याचें त्यानें कबूल केलें होतें; पण तो खंडणी देईना; त्यामुळें माधवरावास त्याजवर दुसऱ्यानें चालून जाणें भाग झालें. त्याच्यावर दुसरी स्वारी करण्यास दुसरें एक कारण होतें. अलीकडे निजाम व इंग्रज या दोघांत सख्य झालें होतें. पहिल्यानें दोघांनीं मिळून हैदरवर स्वारी करावयाची व मग मराठ्यांवर चालून जावयाचें असें त्या दोघांनीं मेतकूट केलें होतें (नोव्हेंबर १७६६). तेव्हां त्या दोघांचे बेत हाणून पाडण्यासाठीं शके १६८८च्या पौषांत कृष्णा उतरून माधवराव हैदरवर चालून गेला. त्यानें हैदरच्या राज्याचा पूर्वभाग उध्वस्त केला, व शिरें घेतलें. तेव्हां हैदर जेरीस येऊन शरण आला. ज्येष्ठ महिन्यांत तह ठरला. बाळाजी बाजीरावाच्या कारकिर्दीत जितका मुलूख मराठ्यांच्या ताब्यांत होता तितका हैदरनें परत देण्याचें कबूल केलें. शिवाय त्याचेकडून मराठ्यांना तेहेतीस लक्ष रुपये खंडणी मिळाली. हैदरनें संस्थानिकांच्या वाटेस न जाण्याचें व मुरारराव यास उपद्रव न देण्याचेंही कबूल केलें. इतकें

ठरल्यावर माधवराव लवकर पुण्यास परत आला. लवकर परत येण्याचें कारण असें कीं, राघोबा नुकताच हिंदुस्थानांतून परत आला होता व राज्याचा अर्धा वांटा घेण्याचा हेतु त्यानें फिरून जाहीर केला होता.

२. अलीकडे राघोबास पेशव्याचा बराच राग आला होता. मानाजी फाकड्यास शिंद्याच्या गादीचीं वस्त्रें द्यावीं, असें राघोबाचें म्हणणें होतें; पण माधवरावाच्या भिडेखातर तीं महादजी शिंद्याचा पुतण्या केदारजी शिंदे यास द्यावीं लागलीं, व त्यामुळें राघोबास अप्रिय अशा महादजी शिंद्याच्या हातींच सर्व अधिकार गेला. नुकतीच अहिल्याबाईप्रकरणांतही माधवरावाच्या मध्यस्थीमुळें राघोबास पड खावी लागली होती. या कारणांनीं कांहीं दिवस शांत असलेला राघोबाचा मत्सराग्नि भडकला व राघोबानें पुतण्याशीं फिरून भांडण सुरू केलें. राघोबाशीं सलोख्याचें बोलणें करण्याकरितां आनंदवल्लीस जाण्याविषयीं माधवरावानें सखारामबापूस सांगितलें. पण बापूस माहीत होतें कीं, या चुलत्यापुतण्यांचें भांडण कायमचें मिटणें अशक्य आहे.तेव्हां त्यानें कानावर हात ठेविलें. मग गोविंद शिवराम खासगीवाले यास राघोबाकडे पाठविलें. राघोबा पुतण्याची भेट घेण्यास अगदीं नाखूष होता. पण शेवटीं त्यानें भेट घेण्याचें कबूल केलें. भेटीसाठीं जाण्याचें ठरल्यामुळें माधवरावानें गोपाळराव पटवर्धनास तीन हजार फौज जमविण्यास सांगितलें. तसेंच रास्ते व बिनीवाले यांस आणखी तीन हजार फौजेचा हुकूम केला. पुण्यास फौज जमा होत आहे असें कळतांच भेटीसाठीं नगरकडे येणारा राघोबा घाबरला व त्यानें एकदम उलट खाऊन अर्शारगडास जाऊन त्या किल्ल्याचा आश्रय घेण्याचें ठरविलें. राघोबा घाबरलेला पाहून फौज मागें ठेवून सदेंच भेटण्याविषयीं सखारामबापूनें माधवरावास सुचविलें. पण दोन्ही पक्ष लढाईपर्यंत जाण्यास सिद्ध असतां फौजेशिवाय भेटणें गैरमुत्सद्देगिरीचें आहे असें इतर मुत्सद्यांचें मत पडलें. त्या-

वरून माधवराव फौजेसह तसाच नाशीककडे चालला. राघोबा दारणा-सांगवीवर होता. त्यानें पुतण्या जवळ आला, आतां भेटण्याशिवाय इलाज नाहीं, असें पाहून भेटण्याचें ठरविलें. दोघांच्या गांठीं विंचुरापासून सहा कोसांवर क्रुरुडगांवीं पडल्या (भाद्रपद, शके १६८९). या भेटींत माधवरावानें चुलत्यास स्पष्ट सांगितलें कीं, एक कारभार तरी करा किंवा मिळालेल्या जहागिरीवर संतुष्ट तरी रहा. राघोबानें स्नानसंध्या करून राहण्याची आपली इच्छा सांगितली. मात्र मला पंचवीस लक्ष रुपये कर्ज झालें आहे तें दिवाळीच्या अगोदर फेडावें, असें त्यानें पुतण्यास सांगितलें. कर्ज फेडण्याचें माधवरावानें कबूल केलें. सातारा, शिवनेरी, नगर व अशीरगड हे चार किल्ले राघोबादादाच्या ताब्यांत होते, ते माधवरावानें आपल्या ताब्यांत घेतले. माधवरावास जरी पुष्कळ त्रास सोसावा लागला तरी राघोबा एकदांचा स्वस्थ बसावा म्हणून त्यानें पंचवीस लक्ष रुपये कर्ज दिवाळीच्या आंत फेडून टाकिलें. आतां राघोबा स्वस्थ बसेल व मराठी राज्यवृक्षावर अंतःकलहानें जळून जाण्याची पाळी येणार नाहीं अशी आशा करण्यास पुष्कळ जागा होती. पण भवितव्यतेपुढें कोणाचें काय चालणार?

३. शके १६९० (एप्रिल १७६८) चा चैत्र महिना संपला न संपला तोंच राघोबानें फिरून उचल खाल्ली. आनंदवल्लीहून फौज जमा करीत राघोबा दारणासांगवीवर गेला. चिंतो विठ्ठल रायरीकर त्याचा कारभारी होता, तो व शागीर्दमंडळी पूर्वीप्रमाणें भोंवतीं जमा झाली. गंगाधर यशवंत चंद्रचूडास माधवरावानें आपल्या ममतेंत घेण्याचा बराच प्रयत्न केला होता. पण आयत्या वेळेस तो राघोबाकडे गेला. दमाजी गायकवाडानें आपला मुलगा गोविंदराव याजबरोबर कांहीं फौज राघोबाच्या मदतीस पाठविली. जानोजी भोंसलेही याच उद्देशानें नागपूर येथें फौज जमवीत होता. राघोबाजवळ पंधरा हजारांवर फौज जमली होती. पुढेंमागें इंग्रजांची कुमक मिळ-

ण्याची त्याला आशा होती. यावेळीं निजाम कर्नाटकची मोहीम करून परत आला होता. राघोबानें त्याच्याकडेही राजकारण लाविलें होतें. " तुम्हांस मुलगा नाहीं, तेव्हां तुम्हांस राज्य काय करावयाचें " असें म्हणण्यास कोणास जागा राहूं नये, म्हणून त्यानें कोंकणांतील भुस्कुटे उपनांवाच्या ब्राह्मणाचा मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव " अमृतराव " ठेविलें. हें दत्तविधान नाशिकास झालें. मुलगा घेतल्याबद्दल संतोषाची साखर व वस्त्रें त्यानें माधवरावाकडे पाठविलीं! त्यानें तीं घेतलीं नाहींत हें सांगावयास नकोच.

४. भोंसले राघोबाच्या मदतीसाठीं फौज जमवीत आहे व निजामाकडे राघोबाचीं राजकारणें लागलीं आहेत, हें पाहून हे दोघे येऊन मिळण्यापूर्वीच राघोबाचें बंड मोडून टाकिलें पाहिजे, असा माधवरावानें बेत केला. लागलीच गोपाळराव पटवर्धनाची फौज कुलबुर्ग्याकडे होती ती माधवरावानें बोलाविली. तुकोजी होळकर व महादजी शिंदे हे दोघें यावेळीं दक्षिणेंतच होते, त्यांसही बोलाविलें. शिवाय विनीवाले, रामचंद्र गणेश कानडे, रास्ते, धायगुडे व हुजरातीकडील, मिळून एकंदर माधवरावाची चाळीस हजार फौज जमा झाली. पुण्यास फौज जमत असल्याचें ऐकतांच राघोबा दारणासांगवीहून निघून धोडप किल्ल्याचा आश्रय घेण्यास चालला. फौज जवळ आली असें पाहतांच राघोबानें पंचवीस हजार फौजेनिशीं पुतण्यावर चाल केली. फार मोठी लढाई झाली नाहीं. एका चकमकींत राघोबाच्या दिवाणाचा भाऊ मोरो विठ्ठल रायरीकर पडला. हें पाहून राघोबाच्या फौजेनें पलायन केलें. नंतर राघोबा धोडपच्या किल्ल्यांत शिरला, त्याबरोबर त्या किल्ल्यास सर्व बाजूंनीं गराडा घालून मोर्चेबंदी करण्याचा माधवरावानें उपक्रम केला. शेवटीं राघोबाचा निरुपाय होऊन तो सहकुटुंब किल्ल्याखालीं येऊन माधवरावाच्या स्वाधीन झाला. नंतर राघोबाचा जहागिरीचा मुलूख ताब्यांत घेण्याकरितां रामचंद्र गणेश कानडे व विसाजी

कृष्ण बिनीवाले या दोघांस तीन हजार फौजेसह नाशीक प्रांतीं ठेवून माधवराव परत पुण्यास आला. त्यानें राघोबास शनिवारवाड्यांत बंदी-बस्तानें कैदेंत ठेविलें(आषाढ शु.९ शके १६९०,२३।६।१७६८).

---

७८. भोंसल्यावर दुसरी स्वारी.

शके १६९०-९१ (इ. स. १७६९).

मराठी राज्यांत खूळ उत्पन्न करणाऱ्या राघोबास धोडपहून कैद करून आणल्यावर त्याच्या साथीदारांच्या शासनास सुरुवात झाली. गंगाधर यशवंत चंद्रचूडावर माधवरावाचा फारच रोष झाला होता.तो वेषांतर करून धोडपहून पळून जात असतां वाटेंत होळकराच्या लोकांनीं त्यास पकडलें व माधवरावाच्या हवालीं केलें. माधवरावानें त्याच्या पायांत बिड्या घालून त्यास कैदेंत ठेविलें, व सुटका करण्या-साठीं अतोनात दंड मागितला. दमाजी गायकवाडानें आपला मुलगा गोविंदराव याच्याबरोबर राघोबास मदत करण्यासाठीं सैन्य पाठविलें होतें. माधवरावानें गोविंदरावास पकडून कैदेंत ठेविलें.इतक्यांत दमाजी मृत्यु पावला. तेव्हां त्याच्या चौघां मुलांत तंटे सुरू झाले. सर्व भावांत गोविंदरावच वयानें वडील होता. बरेच दिवस वाटाघाट झाल्यावर माध-वरावानें गोविंदरावासच सरदारी देण्याचें ठरविलें. त्या वेळीं गोविंदरावा-नें राघोबास मदत केल्याबद्दल दंड तेर्वीस लक्ष, सरदारीच्या वस्त्रांबद्दल नजराणा एकवीस लक्ष, मागील वर्षाच्या खंडणीच्या बाकीपैकीं पांच लक्ष व इतर कांहीं किरकोळ, मिळून एकंदर साडे पन्नास लक्ष रुपयांची रक्कम पेशव्यास देण्याचा करार केला. शिवाय पेशवेसरकारच्या नोकरीस, मुलुखगिरी नसेल तेव्हां तीन हजार व मुलुखगिरी असेल तेव्हां चार

हजार फौज हजार ठेवण्याचेंही त्यानें कबूल केलें. राघोबाकडे जाऊं पाहणारा तिसरा बडा सरदार जानोजी भोंसले होता. त्याचें पारिपत्य करण्यासाठीं धोडपची स्वारी होऊन परत येतांच निघण्याचा माधवरावाचा विचार होता. पण पावसाळा सुरू झाल्यामुळें त्यानें तो बेत तहकूब केला.

२. पावसाळ्यांत माधवरावानें निजाम व हैदर या दोघांशीं बोलणें सुरू केलें कीं, आपण तिघे एकत्र होऊन इंग्रजांचा मोड करूं या ! हें राजकारण केवळ बाह्यात्कारीं होतें, तरी त्यांत माधवरावाचें किती तरी पेंच होते ! माधवराव केव्हां तरी आपल्यावर स्वारी करणार हें जानोजीस माहीत होतें. पण नुकत्याच चाललेल्या राजकारणावरून त्याला वाटलें कीं, माधवराव इंग्रजांचा मोड करण्याच्या भरीस पडले, आतां यंदा कांहीं त्यांची स्वारी आपल्यावर होणार नाहीं. याच सुमारास पेशव्यांचें आरमार मुंबईजवळ येऊन उतरलें. हें पाहून मुंबईचे इंग्रज घाबरले व त्यांनीं पेशव्यांचा वसईचा सुभेदार विसाजीपंत लेले यास कारण विचारलें. त्यानें पोर्तुगीजांची दोन गलबतें इकडे येणार आहेत त्यांचें पारिपत्य करण्याकरितां आरमार आलें आहे असें उत्तर दिलें. त्यावरून इंग्रजांचें समाधान न होतां उलट त्यांस भीति मात्र वाटूं लागली. त्यांना वाटलें कीं, निजाम व हैदर यास मिळवून घेऊन पेशवे आपल्यावर खचित स्वारी करणार. त्यामुळें आम्ही तुमच्या वाटेस जात नाहीं, तुम्हीही आमच्या वाटेस जाऊं नका, असें सलोख्याचें बोलणें त्यांचा वकील बोलूं लागला. इंग्रजांशीं लढण्याकरितां कुमक करूं, असें भासवून हैदराकडून कर्नाटकांत फौज न धाडतां खंडणी काढण्याचा माधवरावाचा विचार होता. पण हैदर कसला लबाड ! त्यानें एकदम पुकारा केला कीं, आपण इंग्रजांशीं समेट करणार व मराठ्यांच्या मुलुखावर स्वारी करणार !

३. शके १६९० (सन १७६९) च्या पौषांत माधवराव फौज

घेऊन जानोजीवर स्वारी करण्यासाठीं पुण्याहून निघून औरंगाबादेकडे चालला. निजामानें आपला दिवाण रुकनुद्दवला व रामचंद्र जाधव या दोघांच्या हाताखालीं सात आठ हजार फौज पेशव्याच्या मदतीस पाठविली. एकंदर फौज साठ हजार जमली. मग वाशिमच्या घाटानें वऱ्हाडांत जाऊन जानोजीच्या मुलुखाच्या जप्तीस सुरुवात झाली. वऱ्हाडांत पेशवे व निजाम यांचा जेथें जेथें प्रांत होता तेथें तेथें भोंसल्याचे देशमुखी व घांसदाणा हे हक्क होते, ते आतां सर्व जप्त करण्यांत आले. शिवाय जहागीर व इनामें म्हणून जो मुलूख त्याच्या ताब्यांत होता तोही हस्तगत करण्यांत आला. मग वर्धानदी उतरून माधवराव खुद्द नागपुरावरच चालून गेला. तेथें जानोजी नव्हता. त्यामुळें तें शहर पेशव्यांच्या लष्करानें स्वस्थपणें लुटलें. तेथून सोळा कोसांवर असलेला भंडाऱ्याचा भुईकोट किल्ला घेऊन नंतर सर्व लष्कर चांद्यास आलें. तो किल्ला बराच बळकट असून आंत भोंसल्याचा किल्लेदार महिपतराव परभू म्हणून होता, त्यानें तें स्थळ निकरानें झुंजविण्याचा निश्चय केला.

४. माधवराव वऱ्हाडांत आले असें कळतांच जानोजी गाविलगडास गेला व तेथें आपलीं मुलेंमाणसें ठेवून तो रामटेकास आला. पेशव्यांचा वेढा चांद्यास बसतो असें कळतांच किल्लेकऱ्यांची कुमक करण्याकरितां तो चांद्याकडे आला. माधवरावास जानोजीच्या आगमनाची बातमी समजतांच त्यानें गोपाळराव पटवर्धनास जानोजीवर टेहेळणी करण्याकरितां लष्करापासून नऊ कोसांवर ठेविलें, व किल्ल्याच्या मोर्चेबंदीचें काम जारीनें चालविलें. पंचगव्हाण येथें भोंसल्याचे सरदार नरहरपंत रिसबुड व बापू करांडा हे दोघे उतरले होते. त्यांजवर गोपाळरावानें आनंदराव गोपाळ,नरसिंगराव धायगुडे व बाळाजीपंत सप्रे यांस पाठविलें. उभयपक्षीं सुमारें पांच सहा तास लढाई होऊन भोंसल्याच्या सरदारांचा सपशेल पराभव झाला. नरहर-

पंत रिसबुड तर पडला; व करांडा पंचवीस स्वारांनिशीं पळून गेला. चांद्याहून पेशव्यांच्या सैन्यांतील टोळ्यांनीं भोंसल्याच्या राज्यांतील बराच मुलूख काबीज केला व कित्येक किल्ले व ठाणींसुद्धां घेतलीं. इतक्या बड्या फौजेशीं झुंजण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें जानोजी भटकत होता.

५. इतक्यांत जानोर्जास स्वसंरक्षण करण्याची एक युक्ति सुचली. पेशव्यांच्या मुलुखांत जाऊन लुटालूट करण्याचा त्यानें बेत केला. असें केलें कीं, पेशवे व निजाम यांचीं सैन्यें आपल्या पाठीवर धांवून येतील व मग लढाईची धामधूम त्यांच्या मुलुखांत माजेल, असा त्याचा तर्क होता व तो बरोबर ठरला. मग आपण येथेंच आहों असें शत्रूस भासविण्याकरितां डेरे, राहुट्या व कांहीं फौज त्यानें तळावर तशीच ठेविली; व निवडक पंधरा हजार घोडेस्वार घेऊन लांब लांब मजला करीत तो माहूरकडे चालला. ही बातमी पेशव्यास कळतांच त्यानें रामचंद्र गणेश कानडे व गोपाळराव पटवर्धन या दोघां सरदारांस पंचवीस हजार फौजेसह टाकोटाक भोंसल्याच्या पाठलागास पाठविलें; तों चहूंकडून भोंसले पुण्यावर येणार अशीं वर्तमानें उठलीं व पुणें ओस पडूं लागलें.

६. इतक्यांत निजामाकडून मदतीस आलेला रामचंद्र जाधव जानोजी भोंसल्यास फितूर असल्याचें माधवरावास कळलें. भोंसले व प्रतिनिधि पूर्वीपासून ऋणानुबंधी, ते एक झाल्यावर सातारचें राजमंडळ आपल्या विरुद्ध होईल कीं काय, याचीही चिंता माधवरावास पडली. शिवाय राघोबा सुटला म्हणजे मग आणखीही बरेच सरदार भोंसल्यास मिळाल्याशिवाय रहावयाचे नाहींत; मग ही आग कोठवर पेटेल याचा नेम नाहीं, असे नानाप्रकारचे विकल्प माधवरावाच्या मनांत आले. शिवाय ही मोहीम एका बड्या मराठा सरदारावरच असल्यामुळें इतर मराठे सरदारांस प्रिय नव्हती. पेशवे प्रत्यक्ष हजर असल्या-शिवाय कोणीही सरदार खुषीनें काम करण्यास तयार नव्हता.

म्हणून रामचंद्र गणेश व गोपाळराव या दोन सरदारांची रवानगी झाल्यावर थोड्याच दिवसांनीं चांद्याचा वेढा उठवून व थोडीशी फौज वऱ्हाडच्या बंदोबस्ताकरितां ठेवून माधवराव झपाट्यानें औरंगाबादेकडे आला. पेशव्याबरोबर फौज मात्र झटपट आली नाहीं. ती दर मुक्कामास दोन दोन चार चार कोस मागें राहतां राहतां शेवटीं फारच मागें राहिली. यापुढें या मोहिमेंत तिचा मोठासा उपयोग झाला नाहीं.

७. पुण्यावर चाल करण्याच्या उद्देशानें जानोजी माहुराहून उमरखेडपर्यंत आला. इतक्यांत रामचंद्र गणेश व खुद्द पेशवे आपल्या पाठीवर येत आहे ही बातमी कळतांच पुण्याचा रोंख सोडून तो पूर्वेस निर्मळाकडे चालला. पेशव्यांचे सरदार त्याचा सारखा पाठलाग करीत होते, तेव्हां तो फिरून पश्चिमेस बेदराकडे आला. हरप्रयत्न करून जानोजीस वऱ्हाडाकडे हुसकून लावण्याचा माधवरावानें आतां निश्चय केला होता. त्यानें पाथ्री येथें आपलें बुणगें व जड सामान ठेविलें व तो सड्या सामानानिशीं आपल्या सरदारांना मिळण्यास चालला. जानोजीच्या सैन्यांतून बापू करांडा पेशव्यांच्या बुणग्यावर अकस्मात् येऊन पडला व थोडेंसें बुणगें त्यानें लुटून नेलें. इतक्यांत पेशव्यांच्या फौजेनें चोहोंकडून येऊन जानोजीस घेरलें; तेव्हां निरुपाय होऊन तो पेशव्यास शरण आला. मग उभयपक्षीं भीमातीरीं कनकापूर येथें समेट झाला (फाल्गुन व॥ १ शके १६९०, २३।२।१७६९). जानोजीस राक्षसभुवनच्या युद्धानंतर मिळालेल्या जहागिरीपैकीं चोवीस लाखांची जहागीर पहिल्या स्वारींत पेशव्यांनीं परत घेतली होती; आतां बाकीची आठ लाखांचीही परत घेण्यांत आली. दिल्लीचा बादशहा, अयोध्येचा नबाब, रोहिले, इंग्रज व निजाम यांपैकीं कोणाशींही पेशव्यांच्या परवानगीशिवाय भोंसल्यानें कोणतेंही बोलणें करूं नये, भोंसल्यानें दरसाल पांच लक्ष रुपये खंडणी पांच हप्त्यांनीं द्यावी, आपली फौज पेशव्यांच्या सम-

तीशिवाय कमजास्त करूं नये, व जरूर पडेल तेव्हां फौजेसह सरकारकामास हजर रहावें; या पुढें भोंसल्यानें पेशव्यांच्या मुलुखांत 'घांसदाणा' वसूल करण्याचें बंद करावें व निजामच्या मुलुखांतील घांसदाण्याबद्दल ठरीव रक्कम निजामापासून घ्यावी; फक्त वसुलासंबंधीं बोलणीं करण्यासाठीं भोंसल्याचे वकील निजामच्या दरबारीं व ओरिसा प्रांतीं इंग्रजांच्या दरबारीं रहावेत; पेशव्यांनीं उत्तरेकडे सैन्य नेतांना भोंसल्यांच्या मुलुखास उपद्रव पोहोंचवूं नये व शत्रूपासून त्याचें रक्षण करावें; हीं समेटाचीं मुख्य कलमें होतीं. मग फौजेस निरोप देत देत माधवराव शके १७९१ (सन १६६९)च्या ज्येष्ठांत पुण्यास आला. येणेंप्रमाणें माधवरावानें भोंसल्यांचा ताठा मोडून काढिला व मुख्य सत्तेच्या हुकुमांत वागण्याविषयीं त्याच्याकडून कबुली घेतली.

८. ही मोहीम चालू असतां राघोबानें कैदेतून पळून जाण्याचा प्रयत्न केला. माघ वद्य एकादशीस बारा घटका रात्रीं राघोबा पळून जाणार होता, पण वेळींच ही गोष्ट नाना फडणिसास समजली, व त्यानें ताबडतोब बंदोबस्त केल्यामुळें राघोबाचा बेत फसला. नानानें फितुरांत सामील असलेल्या पन्नास साठ लोकांस बिड्या ठोकल्या व राघोबावर रात्रंदिवस खडे पहारे ठेवून बंदोबस्त राखिला. आपला बेत फसला हें पाहून राघोबानें प्राण देण्यासाठीं उपोषणें सुरू केलीं. तेव्हां माधवरावानें राघोबाची समजूत घालण्याकरितां बाबूजी नाइकास आणविलें. त्यानें पुष्कळ प्रकारें सांगितलें. पण राघोबानें त्याचें ऐकलें नाहीं. तो फार तर एखादे दिवशीं साखरपाणी व खारीक खाई. त्याचें म्हणणें होतें कीं, "दत्तक मुलास पुण्यास आणवावा. त्याला दोन लक्षांची जहागीर व एक किल्ला द्यावा, आपणास पांच लक्ष रुपये द्यावे. त्यांपैकीं गाडदी व राऊत वगैरे नेमणुक-खर्च तीन लक्ष रुपये कमकसर होईल तो होईल, राहील तो द्यावा. त्याचा

दानधर्म करूं." माधवरावाचें यावर उत्तर असें होतें, कीं "-आपणास किल्ले व जहागीर नेमून दिली होती त्या वेळीं दानधर्म करीत होता ते कागदपत्र आहेतच, त्याअन्वयें ऐवज नेमून देऊं. आम्ही कर्जदार आहों. इतका ऐवज कोठून द्यावा !" त्यास राघोबा बोलला " ते समयीं आम्ही धर्म कसाही करीत होतों. त्याचा दाखला आतां कशास पाहिजे? तेव्हां आम्ही कैदेत कोठें होतों? आतां कैदेत आहों. तुमच्या कर्जवामाशीं व दौलतीच्या ओढीतोडीशीं आम्हांस गरज काय? नाहीं तरी आम्ही उपास करतां करतांच मरों." शेवटीं दोन लक्ष रुपये धर्मदायासाठीं देण्याचें माधवरावानें मान्य केलें व मग राघोबा जेवला.

७९. हैदरअलीवरील तिसरी स्वारी.

शके १६९१-९४ (इ. स. १७६९-७२)

भोंसल्याचें पारिपत्य करण्यांत माधवराव गुंतला होता, त्याच वेळीं हैदरचें इंग्रजांशीं चाललेलें युद्ध संपून तो रिकामा झाला. त्यानें पेशवे दुसरीकडे गुंतले आहेत असें पाहून शिरें, मदगिरी, बाळापूर वगैरे मराठ्यांनीं जिंकलेले प्रांत परत घेण्याचा बेत केला. पहिल्यानें चित्रदुर्ग व हरपनहळ्ळी हीं जीं दोन संस्थानें मराठ्यांच्या अंकित होतीं व ज्यांना त्रास न देण्याचें हैदरनें कबूल केलें होतें त्यांच्यापासून त्यानें जबर खंडणी उपटली. नंतर तो मोठी फौज जमा करून मराठ्यांच्या हरिहर तालुक्यांत आला. शेवटीं तो तुंगभद्रा उतरून सावनूरच्या नबाबाच्या मुलुखांत आला. असा जेव्हां हैदरचा दंगा झाला तेव्हां माधवरावानें त्याच्यावर तिसरी स्वारी करण्याचें ठरविलें.

२. शके १६९१ च्या आश्विन वद्यांत माधवराव पुण्याहून डेरेदाखल झाला. तो तुंगभद्रेवर गेला. तेथें माधवराव व गोपाळराव पटवर्धन

यांनीं अशी मसलत ठरविली कीं, हैदर जोंवर तुंगभद्रेच्या आसपासच्या अनवडीच्या रानांत आहे तेथवर गोपाळरावानें पंधरा हजार फौज घेऊन त्याच्यावर टेहेळणी करण्याकरितां त्याच्यापासून वीस पंचवीस कोसांवर रहावें व माधवरावानें बाकीची फौज घेऊन तुंगभद्रापर होऊन हैदरच्या राज्यांतील प्रदेश पूर्वेकडून जिंकीत श्रीरंगपट्टणावर जावें. मग ठरल्याप्रमाणें गोपाळराव सावनुराजवळ येऊन राहिला व माधवराव तुंगभद्रा उतरून ठाणीं घेत घेत चालला. तो ठाणीं घेत घेत कोल्हार–चिक्बाळापूरपर्यंत गेला, तों हैदर रानांतून निघून तरिकिऱ्यास गेला. तो तरिकिऱ्यास गेला त्याबरोबर गोपाळराव हरिहरास पुढें सरकला. तरिकिऱ्यापासून चिक्बाळापूर खालीं पन्नास कोस आहे व हरिहर वरती तीस कोस आहे. हैदरनें विचार केला कीं, मराठी लष्करें आपल्यापासून बरींच लांब आहेत, आतां आपण पेशव्यांनीं जिंकलेलीं ठाणीं परत घ्यावीं व मग शिरें, मदगिरी या मराठी मुलुखावर स्वारी करावी. या बेताप्रमाणें त्यानें कित्येक ठाणीं घेतलीं. इतक्यांत माधवरावाकडून हैदरास तंबी देण्याकरितां तीन हजार फौज आली व गोपाळरावही जवळ येऊन मतोड येथें राहिला. त्यामुळें मात्र हैदरचे बेत तसेच राहिले. हैदर अनवडीच्या झाडींत होता; तेव्हां त्याचा सावनुरावर छापा घालण्याचा बेत गोपाळरावानें हेरून पाडला. आतां तो तरिकिऱ्यास येऊन मराठी मुलुखावर स्वारी करणार, तों गोपाळराव त्याच्या वाटेंत मतोडास येऊन बसला. तेव्हां हैदरची अगदीं निराशा झाली.

३. एके दिवशीं रात्रीं गोपाळरावावर छापा घालून त्याच्या फौजेचा बंदोबस्त केल्याखेरीज हें झेंगट आपल्या पाठीमागून सुटावयाचें नाहीं अशी हैदरची खात्री झाली. पण गोपाळराव फारच सावधगिरीनें वागत असल्यामुळें ही मसलत साधणेंही कठिण होतें. हैदरनें आपण श्रीरंगपट्टणाकडे गेलों असल्याची खोटी बातमी उठविली; व माघ

व॥ अमावास्येच्या रात्रीं बारा तेरा हजार गारदी, चार हजार घोडेस्वार, पंचवीस तोफा व बाणांचे पन्नास उंट घेऊन तो जो आडवाटेनें निघाला तो पहाटे पांच घटका रात्र असतां पहारे चुकवीत मराठ्यांच्या लष्कराजवळ येऊन ठेपला. ती वेळ इतकी भयंकर होती कीं, सर्व लष्करचें लष्कर शत्रूच्या स्वाधीन झालें असतें. पण तोफेचा पहिला बार ऐकल्याबरोबर गोपाळराव घोड्यावर स्वार झाला आणि नौबत व निशाण घेऊन गोटाच्या अघाडीस हैदरच्या फौजेसमोर येऊन उभा राहिला. नौबत वाजूं लागतांच फौज व सरदार पटापट जमूं लागले.आतां आपल्याला गोटावर हल्ला करितां येणार नाहीं असें हैदरास वाटलें, व त्यानें मराठी फौज हुसकून लावण्याकरितां तिच्यावर तोफांचा भयंकर मारा केला व बाणांचाही केवळ वर्षाव केला. तथापि मराठ्यांच्या नौबती वाजतच होत्या व फौजही खंबीरपणानें उभी होती. गोळे लागून माणसें मरतच होतीं व घोडीं पडतच होतीं! गोपाळरावाजवळ त्याचा हुजऱ्या उभा होता, त्याच्या डोक्याला गोळा लागून ठिकऱ्यासारखे तुकडे झाले व त्याचें रक्त गोपाळरावावर उसळून त्यास रक्तस्नान झालें. परशुरामभाऊ पटवर्धनाची एक घोडी पडली; म्हणून तो दुसरीवर बसला. तीं दुसरीही पडली! त्या पांच घटकांत पांचशें गोळा सुटला असेल; परंतु तसलाही मार सोसून मराठी फौज तशीच ठांसून उभी राहिल्यामुळें सारें लष्करचें लष्कर वचावलें (२५।२।१७७०).

४. इकडे माधवरावाचें किल्ले व मूलुख काबीज करण्याचें काम खंड न पडतां चाललें होतें. किल्ले घेतां घेतां तो बंगलुरास आला.बंगलूर व श्रीरंगपट्टण हीं दोन्ही ठिकाणें फारच बळकट होतीं. पावसाळा सुरू होण्यास फक्त महिन्या दीड महिन्याचा अवकाश राहिला होता; तेव्हां बंगलुरास वेढा देऊन तें इतक्या थोड्या अवधींत हातीं येणें अशक्य वाटल्यामुळें माधवराव वायव्येकडे चाल करून जाऊं लागला. या

वेळीं हैदर बाणावरास होता. त्यानें तर्क केला कीं, मराठे आपल्यावर दौड करून येत आहेत. त्यामुळें तो घाईघाईनें निघून श्रीरंगपट्टणास गेला. आपण किल्ले घेण्याच्या नादांत गढून गेलों, असें दाखवून हैदर बाणावरास आहे तोंच त्यावर लांब मजलीनें चालून जाऊन त्याच्याशीं मैदानांत गांठ घालावी, असा खरोखरच माधवरावाचा बेत होता. पण हैदर पडला धूर्त ! त्यानें ती मसलत ओळखून तत्काळ पोबारा केला.

५. हैदर श्रीरंगपट्टणास गेल्यामुळें त्याच्यावर टेहेळणी करण्याचें काम उरलें नाहीं. तेव्हां माधवरावानें गोपाळरावास आपल्याकडे बोलावून घेतलें व मग निजगलच्या किल्ल्यास वेढा दिला. वेढा चौदा दिवस चालू होता. वेढ्याचें काम चालू असतां माधवरावाचा धाकटा भाऊ नारायणराव हल्ल्याचें काम पहात उभा असतां त्यांस गोळीची हलकीशी जखम लागली. शेवटीं वैशाख शु० ५स (३०।४।१७७०) मराठ्यांनीं हल्ला करून किल्ला घेतला. आतांपर्यंत मराठ्यांनीं एक कोट रुपये उत्पन्नाचा मुलूख लुटून फस्त केला, किल्ले घेतले व पाडिले. पण हैदर अजूनही मराठे मागत होते तितकी खंडणी देण्यास तयार होईना. पावसाळा तर जवळ आला. तेव्हां छावणीस रहावयाचें कीं काय, याची चर्चा होऊं लागली. शेवटीं त्रिंबकरावमामा पेठे याच्या हाताखालीं कर्नाटकांत फौज ठेवून माधवराव स्वतः पुण्यास परत आला.

६. पावसाळ्यांत त्रिंबकरावमामानें स्वस्थ न बसतां गुरमकोंडा प्रांत काबीज केला. श्रीरंगपट्टणहून गुरमकोंड्याची मदत करण्यास फौज येईल म्हणून गोपाळराव वाटेवर टेहेळणी करण्याकरितां राहिला होता. अदमासाप्रमाणें हैदरअलीची चार पांच हजार फौज गुरमकोंड्याकडे आली. तिचा गोपाळरावानें पार फन्ना उडवून दिला. पुढें विजयादशमीच्या मुहूर्तानें माधवराव फिरून स्वारीस निघाला. परंतु त्याची प्रकृति बिघडली होती ती अजून चांगली बरी झाली नव्हती. मध्येंच

चार दिवस बरें वाटावें, फिरून तब्येत बिघडावी, असें होऊं लागलें. माधवराव फिरून स्वारीस निघतात असें कळतांच हैदरनें आपला वकील आप्पाजी राम यास पुण्यास तहाचें बोलणें करण्यास पाठविलें होतें. परंतु तो कांहीं तरी गुळमुळीत व धरसोडीचीं उत्तरें देई; त्यामुळें तह ठरेना व माधवराव तसाच पुढें जाऊं लागला. शेवटीं तो रहिमतपुरावरून मिरजेजवळ येऊन पोहोंचला. तेथें आठ मुक्काम होते. माधवरावाची प्रकृति अधिकच बिघडली व क्षीणता भासूं लागली. तेव्हां पुढें जाणें योग्य नाहीं असा विचार करून माधवरावानें आप्पा बळवंत मेहेंदळे व मल्हारराव पानशे यांजबरोबर फौज देऊन त्यांस कर्नाटकांत पाठविलें व तो स्वत: दोन दोन कोसांच्या मजली करीत हळूहळू पुण्यास परत आला.

७. अदोनी प्रांताची खंडणी पेशव्यांनीं गोपाळराव पटवर्धनास लावून दिली होती. पावसाळा संपतांच दोन वर्षांची बाकी वसूल करण्यासाठीं गोपाळराव तिकडे गेला, व बसालतजंगाजवळून त्यानें ती वसूल केली नंतर तो कनकागिरीस मुक्काम करून राहिला. त्याची प्रकृति आतां अगदीं क्षीण झाली होती. त्यांतच त्याला जलोदराची भावना झाली व त्याला वाटलें कीं आपण आतां खात्रीनें वांचत नाहीं. त्यानें आपला बाप गोविंद हरि यास मिरजेस हें वर्तमान लिहिलें. तेव्हां तिकडून त्याचा भाऊ वामनराव लष्कर ताब्यांत घेण्याकरितां आला, तों गोपाळरावाचा वाखा फारच झाला होता. तथापि त्यास तशाच स्थितींत मिरजेस पाठविण्यांत आलें. तेथें पोंचल्यावर तिसरे दिवशीं शके १६९२ (१७।१ १७७१) माघ शुद्ध २ स गोपाळराव मरण पावला. त्याच्यामागें पटवर्धनांची सरदारी त्याचा भाऊ वामनराव यानें पांच वर्षें चालविली. त्यापुढें पटवर्धनांतील मुख्य सरदार म्हटला म्हणजे त्याचा चुलतभाऊ परशुराम रामचंद्र पटवर्धन हाच होय.

८. पावसाळा संपल्यावर त्रिंबकरावमामानें बिदनूर प्रांतावर स्वारी

करण्याचा बेत केला व तो तिकडे जाऊं लागला. बिदनूरचा प्रांतच काय तो हा वेळपर्यंत मराठ्यांच्या तावडींतून वांचला होता. शिवाय तो हैदरास विशेष प्रिय असे.म्हणून त्यानें मराठे बिदनूर प्रांतांत जाण्यासाठीं झाडींत शिरले कीं, त्यांच्यावर छापे घालघालून त्यांस हैराण करावें, असा बेत केला. नंतर तो पंचवीस हजार गारदी, आठ हजार घोडेस्वार, व पंचेचाळीस तोफा, इतक्या सैन्यासह श्रीरंगपट्टणापासून पांच कोसांवर मेलकोट्यास आला. ही बातमी त्रिंबकरावास लागली. तेव्हां त्यानें सखाराम हरी गुप्ते नांवाच्या हुशार परभू सरदारास हैदरची बारीक बातमी काढण्यासाठीं पाठविलें. त्यानें सर्व तपास काढून मामास पत्र लिहिलें. पत्र पावतांच त्रिंबकरावानें कूच केलें व तो मेलकोट्यास आला. तेथें एक दोन दिवस झटापटी होऊन मराठ्यांनीं हैदरास चहूंकडून कोंडलें. त्याला श्रीरंगपट्टण किंवा बिदनूर यांपैकीं कोणत्याही स्थळीं पळून जाण्यास वाट ठेविली नाहीं. हैदरची रसद बंद झाली. त्याच्या लष्करांत नाचणीचें पीठ रुपयाला तीन शेर विकूं लागलें. शेवटीं हैदरानें कसें तरी करून श्रीरंगपट्टणास जाण्याचा निर्धार केला. तेथून तें शहर पांच कोस होतें. फाल्गुन वद्य ७ स रात्रीं सहा घटकांच्या सुमारास हैदर मेलकोट्याहून निघून झाडींत शिरून श्रीरंगपट्टणकडे चालला. मराठ्यांनीं वाटेंत ठेवलेल्या टोळीस तें कळलें. त्याबरोबर तिनें त्रिंबकराव वैगेरे सरदारांकडे सांडणीस्वार पाठविले, व स्वतः हैदरावर चालून घेतलें. हैदरास वाटलें कीं, मराठी फौजेच्या एका मोठ्या टोळीनें आपल्यावर हल्ला केला आहे. म्हणून त्यानें तोफा सोडण्यास सुरुवात केली. सर्व मराठ्यांस आयतीच बातमी लागली व भराभर मराठी फौजा चहूंकडून हुल्लड करूं लागल्या. अर्थात् हैदरची चाल फारच थोडी होऊं लागली. मेलकोट्याच्या झाडींतून बाहेर पडावयास उजाडलें. म्हणजे त्यास दोन कोस जाण्यास नऊ तास लागले. मग सकाळच्या वेळीं

मोठेंच युद्ध जुंपलें. मराठ्यांनीं एकदम चहूंकडून हल्ला केला. त्यामुळें हैदरचे लोक घाबरून पळूं लागले. त्या वेळीं भयंकर कत्तल झाली. स्वतः हैदर उजवीकडे डोंगर आहे तिकडे पळून गेला. त्याचा मुलगा टिपू सुलतान फकिराचा वेष घेऊन निसटला. हैदरचें सर्व सामान मराठ्यांस सांपडलें. या लढाईस 'मोतीतलावाची लढाई' असें म्हणतात (फाल्गुन व।। ८ शके १६९२,८।३।१७७).

९. यापुढें चैत्र शु.१ शके १६९३ च्या (१७।३।१७७१) मुहूर्तानें त्रिंबकरावानें श्रीरंगपट्टणास वेढा घातला. पण तें ठिकाण बळकट,शिवाय भोंवतालचा मुलूख हैदरनें अगदीं रूक्ष करून टाकला होता. तेव्हां मामास वेढ्याचा बेत तहकूब करावा लागला. त्यानें पावसाळा लागेपर्यंत कावेरीच्या लगत्याच्या प्रांतांत दंगा मांडला व पुढें बेळूर येथें छावणी दिली. आश्विनाचा महिना लागतांच मुलुखांत दंगा मांडण्याचें काम सुरू झालें. याच सुमारास त्रिंबकरावास तंजावरच्या राजाचें पत्र आलें. त्यांत, ' आमच्या राजधानीस अर्काटचा नबाब महंमदअली यानें वेढा घातला आहे, तेव्हां कुमकेस यावें' असा मजकूर होता. त्यावरून वामनराव पटवर्धनास वर घाटीं ठेवून मामा तंजावरकडे गेला. मराठे आले असें कळतांच महंमदअली वेढा उठवून गेला. त्रिंबकरावानें तंजावरकरापासून चार लक्ष खंडणी व अर्काटच्या नबाबापासूनही आणखी कांहीं खंडणी घेतली. त्याचप्रमाणें त्यानें घाटाखालीं हैदरच्या बारामहाल प्रांतांत शिरून गांवोगांव जबर खंडण्या घेतल्या. आप्पा बळवंत मेहेंदळे फौज घेऊन कोइमतूरकडे गेला होता. तोही मुलूख त्यानें लुटून बेचिराख केला. फाल्गुनअखेरपर्यंत घाटाखालचे हैदरचे प्रांत उध्वस्त केल्यावर त्रिंबकरावमामा वर घाटीं आला.आतां सर्व सरदारांस मिळून बिदनूरवर स्वारी करावी आणि त्या मुलुखांतील गढ्या व किल्ले पाडून टाकून तो मुलूख अगदीं बेचिराख करावा, असा त्यानें संकल्प केला. पण इतक्यांत मामास पेशव्यांचीं पत्रें आलीं कीं;

" आपण आतां दुखण्यांतून वांचूं असें वाटत नाहीं; तर हैदरशीं बनेल तसा तह करून सर्व फौजांसह तुम्हीं देशीं परत यावें. " शेवटीं तह ठरला. शिवाजीच्या ताब्यांत कर्नाटकांत " स्वराज्य " म्हणून जेवढा मुलूख होता तेवढा सर्व मराठ्यांच्या हातीं आला. त्यांतील एक बंगलूर मिळालें नाहीं, पण त्याऐवजीं मदगिरी मिळाली. शिवाय गुरमकोंड्याचा मुलूख मराठ्यांनीं घेतला होता तो त्यांच्याकडेच राहिला. बाकी जिंकलेला सर्व मुलूख हैदरास परत देण्याचें ठरलें. हैदरनें पेशव्यास खंडणीची बाकी व लढाईचा खर्च यांजबद्दल पन्नास लक्ष रुपये व त्रिंबकरावमामा वगैरे सरदारांस ' दरबार–खर्चाबद्दल ' दहा लक्ष रुपये देण्याचें कबूल केलें. तसेंच यापुढें दरसाल चौदा लक्ष रुपये खंडणी पेशव्यांकडे नियमितपणें भरण्याचें त्यानें मान्य केलें. नंतर शके १६९४ (१५।६।१७७२) च्या ज्येष्ठ शु।। पौर्णिमेस मराठी फौजा परत निघाल्या, त्या आषाढ संपतां संपतां तुंगभद्रेवर येऊन महाराष्ट्रांत आपापल्या ठिकाणांस गेल्या.

---

८०. पानिपतचा सूड.



शके १६८८ सालीं (इ. स.१७६६) राघोबानें उत्तर हिंदुस्थानावर जी स्वारी केली तिचें काम अर्धवट कसें झालें याची हकीकत मागें आलीच आहे.त्या वेळीं मराठ्यांचे पानिपतचे शत्रु रोहिले, सुजाउद्दवला व पठाण यांस तंबी पोंचविण्याची तयारी नसल्यामुळें राघोबा परत आला.गोहदच्या राण्याचेंसुद्धां शासन त्यास यथास्थित करतां आलें नाहीं. भरतपूरकर जाटही अलीकडे उन्मत्त झाला होता; त्याचाही समाचार न घेतां राघोबा तसाच देशीं परत गेला. हें पाहून तर वर सांगितलेले मराठ्यांचे शत्रु अगदीं शेफारून गेले. तेव्हां त्यांचें पारिपत्य करणें

अवश्य होतें. माधवरावाची भोंसल्यावरील दुसरी स्वारी संपतांच हिंदुस्थानांत फौज पाठविण्याचें ठरलें. या फौजेवर रामचंद्र गणेश कानडे हा मुख्य नेमून, विसाजी कृष्ण बिनीवाले यास त्याचा कारभारी नेमिलें. त्यांच्या हाताखालीं पंधरा हजार फौज होती. शिवाय तुकोजी होळकर व महादजी शिंदे हे दोघेही पंधरा पंधरा हजार फौजेसह स्वारींत हजर होते. म्हणजे एकंदर सैन्य पन्नास हजार होतें.

२. पावसाळा लागण्याच्या अगोदर सर्व फौज नर्मदा उतरून पलीकडे जावी या हेतूनें माधवरावानें सर्व सरदारांस ताबडतोब कूच करण्याविषयीं हुकूम केला होता. तथापि महादजी शिंद्यानें कांहींच सामानसुमानाची तयारी न करतां तसेच कांहीं दिवस लोटले. थेउरास जातांना शिंद्याची फौज अजून बिनतयारीनें तशीच असल्याचें माधवरावाच्या नजरेस आलें. त्याबरोबर महादजीस त्यानें ताबडतोब बोलावून आणून सांगितलें कीं, 'पाटील, मी परत येतांना तुमच्या तळावर जर एक तंबू दिसला तर सर्व गोट लुटून तुमची जहागीर जप्त करीन. यासाठीं आतांच्या आतां कूच करून चला.' माधवरावाचा सर्व सरदारांवर कांहीं विलक्षण दाब होता. महादजीनें मुकाट्यानें आपला गोट आवळून माधवराव परत येण्याच्या आंत कूच केलें!

३. नर्मदा उतरून गेल्यावर शके १६९१ चा पावसाळा मराठी सैन्यानें बुंदेलखंडांतील बंडखोरांचा बंदोबस्त करण्यांत घालविला. पावसाळा संपतांच सर्व फौजा सागरापाशीं एक होऊन जाटांच्या मुलुखावर चालून गेल्या. त्या वेळीं भरतपूरच्या गादीवर केसरी नांवाचा अल्पवयाचा मुलगा असून राज्याचा कारभार त्याचा चुलता नवलसिंग हा पहात असे. मराठे आपल्यावर चालून येतात असें कळतांच नवलसिंगानें लढाईची खूप तयारी केली, व तो भरतपुराहून पुढें आठ कोस चालून आला. तेथें त्याची व मराठ्यांची गांठ पडली. जाट मोठ्या शौर्यानें लढले; पण मराठी फौजेपुढें त्यांचें कांहीं चालल

नाहीं.शेवटीं नवल दीडशें फौजेनिशीं पळून गेला. हजारों जाट मारले गेले. हत्ती, घोडे, दारूगोळा व हत्यारें वगैरे सर्व समान मराठ्यांच्या हातीं आलें. मग मराठी लष्कर जाटांचा सर्व मुलूख उध्वस्त करूं लागलें; तेव्हां नवलसिंग शरण आला. त्याचा चुलता सुरजमल जाट यानें मराठ्यांचा आग्रा प्रांत व किल्ला बळकावला होता, तो आतां नवलसिंगानें त्यांचा त्यांस परत दिला, व पांसष्ट लक्ष रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें.

४. पुढें मराठे आपल्या पानिपतच्या स्वारींतील शत्रूंचा समाचार घेण्याकरितां निघाले. मराठ्यांवर पानिपतचा घोर प्रसंग आणण्यास कारणीभूत झालेला मराठ्यांचा हाडवैरी नजीबखान रोहिला हा होता. पण वैर विसरून त्याच्याशीं राजकारण करणें या वेळीं मराठ्यांस जरूर झालें. मराठे आले असें कळतांच नजीबखान अगदीं घाबरून गेला, व आपलें रक्षण करण्याविषयीं अगदीं गयावया करूं लागला. त्यानें शिंदे घराण्यांतील दत्ताजी, जनकोजी अशा वीरांस दुष्टपणानें तोंडघशी पाडलें होतें. तेव्हां महादजी शिंद्याच्या मनांत त्याचा सूड उगविण्याचें फार होतें. पण शेवटीं मराठ्यांनीं त्याच्याशीं सख्यच केलें. पानिपतच्या लढाईपूर्वी दुआबांतील मुलूख मराठ्यांकडे होता, तो आतां नजिबानें बळकाविला होता. त्याच्या सनदा फिरून शहाजादा जवानबख्त याजकडून नजिबानें मराठ्यांस करून दिल्या; व तो आतां मराठी लष्करांतच राहूं लागला. मराठे बरेच दिवस दिल्लीस होते. तेथें पठाणांवर स्वारी करण्याचें ठरवून ते अन्तर्वेदींत शिरून गंगेच्या कांठीं रामघाट येथें शके १६९२ च्या पावसाळ्यांत राहिले. मागें नजिबानें दत्ताजी शिंद्यास असेंच अन्तर्वेदींत आणून त्याचा विश्वासघात केला होता. त्याप्रमाणेंच आतांही पठाणांशीं त्याचें आंतून सूत्र असल्याचें मराठ्यांस कळलें. पण इतक्यांत नजीब एकाएकीं मृत्यु पावल्यामुळें (आक्टोबर १७७०) पुढील प्रसंग टळला.

५. कार्तिकाचा महिना सुरू होतांच मराठे दुआबांत पसरून सर्व मुलूख उध्वस्त करूं लागले. पठाणांचा मुख्य सरदार अहमदखान बंगष हा होता, व त्याची राजधानी फरुकाबाद येथें होती. रोहिले आपला सरदार हफीज रहमत याच्या हाताखालीं पठाणांना मदत करण्यास अन्तर्वेदींत आले. रोहिले व पठाण यांची मिळून आतां सत्तर हजार फौज झाली. तरी पण मराठ्यांपुढें त्यांचें कांहींच चाललें नाहीं. दर युद्धांत त्यांचा पराजय झाला. एका फरुकाबादेखेरीज सारा दुआब प्रांत मराठ्यांनीं लूटून फस्त केला. इटावा व त्या प्रांतांतील इतर मोठमोठे किल्ले मराठ्यांनीं घेतले. शेवटीं शके १६९३ च्या उन्हाळ्यांत हफीज रहमत रोहिलखंडांत पळून गेला. नंतर मराठ्यांचा मारा एकट्या पठाणांवरच पडला. तेव्हां त्यांची हड्डी चांगलीच नरम होऊन अहमदखान बंगष शरण आला. त्यानें पानिपतच्या लढाईनंतर बळकाविलेला सर्व मुलूख मराठ्यांस परत दिला व आपला बचाव करून घेतला.

६. शहाआलम बादशहा अलाहाबादेस इंग्रजांचा अंकित बनून राहिला होता, त्यास दिल्लींत जाऊन आपल्या पूर्वजांच्या राजधानींत राहण्याची मोठी इच्छा होती. इंग्रज ती पूर्ण करीत ना. तेव्हां शहाआलमानें मराठ्यांचा आश्रय केला आणि महादजी शिंदे व विसाजी कृष्ण बिनीवाले यांनीं शहाआलमास दिल्लीस नेण्याची खटपट चालविली. शेवटीं त्यांच्या प्रयत्नास यश येऊन शके १६९३च्या मार्गशीर्षांत (२५।१२।१७७१) शहाआलमाचा दिल्लींत प्रवेश झाला व पानिपतच्या अरिष्टानंतर अवघ्या दहा वर्षांत दिल्लीदरबारीं पुनः मराठ्यांचें वजन बसलें. या वेळीं बादशहा व मराठे या दोघांमध्यें पुढीलप्रमाणें ठराव झाला. "मराठ्यांकडे पानिपतच्या लढाईपूर्वी ज्या ज्या जहागिरी होत्या त्या पुन्हां त्यांजकडे सुरू कराव्या; व महंमदशहाच्या कारकीर्दीपासून चौथाईची बाकी तुंबली होती ती द्यावी;

याबद्दल मराठ्यांनीं बादशहाच्या शत्रूंचें पारिपत्य करावें.शत्रूवर दोघांनीं मिळून मोहिमा कराव्या व होणारी मिळकत सारखी वांटून घ्यावी."

७. आतां मराठ्यांचा रोहिल्यांची खोडकी मोडण्याचा बेत कायम झाला; याच सुमारास रामचंद्र गणेशास पेशव्यांनीं परत बोलाविलें व स्वारीचा मुख्य अधिकार विसाजीपंत बिनीवाले यास दिला. नजीबखानाचा मुलगा झबेताखान हा शुक्रतालास जाऊन राहिला होता. मराठ्यांनीं शुक्रतालास वेढा दिला, व मोठमोठ्या तोफांचा मारा सारखा सुरू केला. त्यामुळें झबेताच्या फौजेंत कहर उडाला. शेवटीं एके रात्रीं झबेता पळून जाऊन गंगा उतरून बिजनार जिल्ह्यांत गेला. मराठेही ताबडतोब गंगा उतरण्यासाठीं चंडीघाटावर आले. झबेतानें पलीकडे बातेऱ्या लाविल्या होत्या व दोन फौजा ठेविल्या होत्या. पण मराठ्यांनीं नदी उतरून तोफा हस्तगत केल्या व दोन्ही फौजा धुळीस मिळविल्या.नंतर सर्व बिजनार जिल्हा त्यांनीं लुटून फस्त केला. मराठे आपल्या पाठीवर आले हें पाहून झबेता नजीबगडांतून पळाला. लागलीच मराठ्यांनीं जाऊन नजीबगड काबीज केला. नंतर त्यांनीं फत्तरगड सर केला. तेथें नजीबउद्दवल्यानें पानिपतच्या वेळीं लुटून घेतलेली अपार संपत्ति भरलेली होती, ती सर्व आतां मराठ्यांच्या हातीं आली. झबेताचीं बायकामुलेंही सांपडलीं. नंतर सर्व रोहिलखंडभर मराठी फौज पसरली व मुलूख उध्वस्त करूं लागली. रोहिले लोक शूर खरे,पण मराठ्यांपुढें त्यांची अगदीं गाळण उडाली. ते सैरावैरा पळत सुटले. त्यांना मराठ्यांचा असा वचक बसला कीं, कितीही बळकट किल्ला असो, त्यांच्या फौजेचा तळ कितीही बळकट व अडचणीच्या जागेंत असो, एखादा मराठा स्वार दिसला कीं, रोहिले छावण्या सोडून पळ काढीत. त्यांचे सर्व मोठमोठे सरदार उत्तरेकडे तिरईच्या रानांत पळून गेले.

८. इतक्यांत पावसाळा लागल्यामुळें कांहीं मराठी फौज दुआ-

बांत राहिली व कांहीं दिल्लीस परत गेली. पावसाळा संपल्यावर मराठे फिरून रोहिलखंडावर स्वारी करणार अशी बातमी ऐकल्यामुळें रोहिले सरदारांची अगदीं पांचावर धारण बसली. ते अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला यास शरण गेले व 'चाळीस लक्ष रुपये तुला देऊं, तूं आमचें रक्षण कर' असें म्हणाले. रोहिलखंडामागून मराठे आपल्यावर चालून येतील अशी सुजास भीति होती. शिवाय मराठ्यांपुढें आपल्या एकट्याचा टिकाव लागावयाचा नाहीं हेंही तो जाणून होता. तेव्हां त्यानें या मसलतींत इंग्रजांना घेण्याचें ठरविलें. मग सुजा, रोहिले व इंग्रज या तिघांनीं मिळून मराठ्यांच्या स्वारीपासून रोहिलखंडचें रक्षण करावयाचें असा ठराव झाला (जून १७७२). पुढें मराठ्यांची अपेक्षित स्वारी झाली नाहीं; तरी सुजा चाळीस लाख रुपये मागूं लागला. रोहिल्यांचा नकार येतांच सुजानें इंग्रजांच्या मदतीनें रोहिलखंडावर स्वारी करून तो देश लुटला व अपार संपत्ति मिळविली (एप्रिल १७७४).

---

८१. दक्षिणचा दिवा मालवला ! हिरा हरपला !

(कार्तिक व॥ ८ शके १६९४; १८।११।१७७२).

(पोवाडा.)

एकछत्र करुनि गेले माधवराव।
थरथरा कांपत होते अष्ट उमराव।
वसविलें हस्तिनापूर राज्य पाच्छाव।
दादासि मोकळें केलें राज्य करावें।
तुटली आयुष्याची दोरी नाहीं ×उपाव।

× 'अॅक्कर्थ वें शाळिग्राम'कृत पोवाडे, पृष्ठ ११९.

माधवराव हुशार, उद्योगी व न्यायी होता; पण या गुणांचा आपल्या राष्ट्रास पूर्ण उपयोग होण्यास एक मोठी अडचण होती. ती ही कीं, त्याची प्रकृति वरचेवर बिघडत असे. व्यायाम करण्याची त्याला लहानपणापासूनच संवय होती. पण व्यायामानेंही त्याचें शरीर निरोगी व स्वाऱ्याशिकाऱ्यांचे श्रम सहन करण्यास केव्हांच समर्थ झालें नाहीं. एकदां त्याची आई गोपिकाबाई हिनें त्यास एका पत्रांत लिहिलें, " तालीम तुमच्या प्रकृतीस मानवत नाहीं; तर ती करण्याचें तुम्हीं सोडून द्यावें. " त्यावर माधवरावानें उत्तर लिहिलें, " मला वडिलांच्या आज्ञेपेक्षां तालीम अधिक आहे कीं काय ? तालीम सोडिली. हल्लीं नमस्कार मात्र घालीत असतों." शके१६९२ चा पावसाळा संपल्यावर तो हैदरवरील स्वारीस निघाला असतां केवळ प्रकृति नीट नसल्यामुळें त्यास परत यावें लागलें, हें मागें आलेंच आहे. शके १६९४चा उन्हाळा सुरू होतांच त्याची प्रकृति पुन्हां बिघडली व दिवसेंदिवस शक्तिपात होऊं लागला. शके १६९३च्या फाल्गुनांत तो थेउरास येऊन राहिला होता. आपल्या राज्याचें पुढें काय होईल याची त्यास सारखी काळजी लागून राहिली होती. आपल्यामागें नारायणरावाच्या हातून राघोबाचा बंदोबस्त होणार नाहीं, याकरितां त्यानें राघोबास कैदेतून सोडण्याचा बेत केला. नाना व मोरोबा फडणीस यांच्याही मनांत राघोबास सोडावें असेंच होतें. शेवटीं सोडण्याचा बेत कायम करून राघोबास पुण्याहून थेउरास नेलें. तेथें माधवरावानें सात लक्षांची जहागीर व त्रिंबक किल्ला देऊन त्याचें समाधान केलें. आपण स्नानसंध्या करून स्वस्थ राहूं, राज्यकारभारांत मन घालणार नाहीं व बंड फितूर करणार नाहीं, असें राघोबानें कबूल केलें. याच वेळीं मोरोबा फडाणिसाकडून कारभार काढून तो माधवरावानें सखारामबापूला दिला. आपल्यामागें आपल्या भावाचें राज्य

निर्विघ्नपणें चालावें याकरितांच माधवरावानें इतक्या गोष्टी केल्या. त्या वेळचे प्रसिद्ध वैद्य गंगा विष्णु, रणछोड व रूपेश्वरबाबा यांनीं रोग असाध्य म्हणून ठरविलें; तरी औषधें, अनुष्ठानें वगैरे सर्व उपाय सारखे चालू होते. परंतु सर्व व्यर्थ! शके १६९४च्या श्रावणापासून प्रकृति अगदीं बेताल झाली. दररोज अंगांत ताप भरे व तो भरला म्हणजे अंगाची इतकी भयंकर काहिली होई कीं, आरोळ्या व शंखवाद्य करण्यापर्यंत मजल येई ! त्या यातना दुःसह झाल्यामुळें माधवराव हा राघोबा व सखारामबापू यांस विनंती करी कीं, 'मल या यातना सहन होत नाहींत. एक खंजीर आणून द्या, तो खुपसून मी मरून जातों !'

२. माधवरावाची इतकी भयंकर स्थिति होती तरी राघोबानें दसऱ्याच्या मुहूर्तानें माधवरावाच्या मरणानंतर गादी आपणास मिळावी ह्मणून सैन्य जमविण्यास सुरवात केली. दोन हजार स्वार व कांहीं गारदी त्या नोकरीस ठेविले, आणि निजाम, हैदर व भोंसले यांस मदत करण्याविषयीं पत्रें लिहिलीं. ही सर्व बातमी माधवरावास समजतांच त्यानें राघोबा तुळापुरास गेला होता त्यास धरून आणिलें; व सर्व फितुरांस कडक शासन केलें. या वेळीं राघोबास फिरून कैदच झाली असती, पण माधवरावानें गुन्हा माफ केल्यामुळें तो प्रसंग टळला. येणेंप्रमाणें राघोबानें माधवराव अगदीं मरणास टेकला असतांही त्यास त्रास दिला. या वेळीं माधवरावाजवळ नाना फडणीस, त्रिंबकराव मामा पेठे, सखारामबापू, रास्ते व पटवर्धन वगैरे सरदार, इत्यादि मंडळी हजर होती. ज्वर येऊन गेला म्हणजे माधवराव कांहीं वेळ ग्लानि येऊन निपचित पडे. मग सखारामबापू, राघोबा व नारायणराव यांस पुढें राज्यकारभार कसा चालवावा, याविषयीं तो सांगत असे. राघोबास कुटुंबांत कलह व राज्यांत फंदाफितुर न करण्याविषयीं त्यानें पुनः पुनः सांगितलें व नारायणरावाचा हात

त्याच्या हाती देऊन त्याचा सांभाळ करण्याविषयीं फिरून फिरून त्याची निरवणूक केली. नारायणरावाचा स्वभाव तामसी व उतावळा होता. लहान वयामुळें पेंचपाच व भारदस्तपणा त्याच्या अंगीं मुळीं नव्हता. यामुळें त्यालाही पुढें कोणाशीं कसें वागावयाचें याचा उपदेश केला. ' माझ्या जिवांत जीव आहे तेथवर मी नारायणरावास अंतर देणार नाहीं,' असें सखारामबापूपासून त्यानें वचन घेतलें.

३. हरिपंत फडक्यावर माधवरावाचें फार प्रेम होतें. प्रत्येक स्वारींत पेशव्याबरोबर असल्यामुळें तो पहिल्यानें कारकुनी पेशाचा असतांही त्याला कारस्थानाचीं धोरणें समजलीं व लष्करी अनुभव मिळाला. आतां माधवरावानें त्याच्यावर खुष होऊन त्यास आपलें श्रीवर्धनचें खाजगी वतन करून दिलें. कोंकणचा सुभेदार रामाजी महादेव बिवलकर नुकताच वारल्यामुळें तो सुभाही त्यानें हरिपंतासच सांगितला. आश्विन शु ४स माधवरावानें आपले कारभारी सखारामबापू व नाना फडणीस यांस एक नऊ कलमी *याद करून दिली, व 'नऊ कलमें सदरहू लिहिलेअन्वयें श्री गणपतीची शपथपूर्वक करूं ' असें बापू व नाना यांनीं लिहून दिलें. तींत दौलतीचें कर्ज कसेंही करून लवकर वारावें, काशी व प्रयाग हीं क्षेत्रें घेण्याचें बाळाजी बाजीरावाच्या मनांत फार होतें तीं हरप्रयत्न करून सोडवावीं, आणि पांच लक्षांपर्यंत जहागीर देऊन राघोबास शान्त राखावें, हीं कलमें महत्त्वाचीं होतीं.

४. शके १६९४ (७।११।१७७२) च्या कार्तिक शुद्ध १२स माधवरावानें सर्व प्रायश्चित्त घेतलें. त्या प्रसंगीं त्यानें लाखों रुपये दानधर्म केला. नाना फडणीस व हरिपंत फडके नेहमीं जवळ असत. त्यांना माधवरावानें सांगितलें कीं, मला माझे रयत लोक पहावेसे

*इतिहाससंग्रह; ऐ स्फु. ले. भाग ३, लेखांक २३.

वाटतात; तेव्हां मजकडे येण्यास कोणासही बंदी करूं नका. हा हुकूम सुटतांच हजारों लोक दर्शनास येऊं लागले. आपला अंतकाळ समीप आलासें पाहून माधवरावानें वैद्याची प्रार्थना केली कीं, मला मरणसमयीं कफ न होतां अतिसार व्हावा अशी योजना करा; कारण कीं, कफ झाल्यास वाचा बंद होऊन परमेश्वराच्या स्मरणास मी अंतरेन ! कार्तिक वद्य ८स सकाळीं मोठे वैदिक व तपस्वी ब्राह्मण बोलावून त्यांस माधवरावानें नमस्कार केला; व 'आम्ही महायात्रेस जातों' आमची तयारी करा' असें सांगून स्मृतींत (शुद्धीवर असतां) ' गजानन गजानन ' असा नामघोष करीत असतां मोठ्या योग्याप्रमाणें नेत्रद्वारें त्याचा प्राण गेला (१८।११।१७७२).पूर्वसंकल्पाप्रमाणें रमाबाई सती गेली. सती जाण्यापूर्वी तिनें आपलें जडजवाहीर व अलंकार गरिबांस वांटले व धर्मशिळेवर उभें राहून नारायणरावाचा हात राघोबाच्या हातीं देऊन त्यास 'वडिलांप्रमाणें सर्वांचें यथास्थित चालवावें,' असा तिनें बोध केला. मग सर्वांचा निरोप घेऊन शान्तवृत्तीनें चितारूढ होऊन अग्नीच्या ज्वालांत ती महासती अदृश्य झाली. थेऊरचा गणपति व त्याजवळचें सती रमाबाईचें वृंदावन पाहून अद्यापि त्या दुःखद प्रसंगाची आठवण होते.

५. पूर्वी बाळाजी बाजीराव व सदाशिवरावभाऊ यांनीं हिंदुपदपातशाही स्थापण्याचा संकल्प करून तो अंमलांत आणण्याचा अटोकाट प्रयत्न केला; इतक्यांत दुर्दैवानें पानिपतचें अरिष्ट मराठी राष्ट्रावर कोसळून मराठी राज्याच्या चिंध्या चिंध्या होतात कीं काय अशी भीति वाटूं लागली ! परंतु अशा संकटसमयीं माधवरावासारखा तरुण असून वजनदार, शरीर रोगग्रस्त असतांही तडफदार, व दंग्याधोप्याच्या काळांतही न्यायाने व समतेनें वागणारा, असा कर्तबगार नायक मराठी राष्ट्रास मिळाला, व अवघ्या पांच दहा वर्षांतच निजाम शमला, हैदर नमला, उत्तरेकडील रोहिले आदिकरून शत्रुही

हरले ! मराठी राष्ट्राचें कीर्तितेज एकसारखें वृद्धिंगत होत होत बाळाजी बाजीरावाच्या काळाप्रमाणें किंबहुना जास्तच तळपूं लागलें ! लवकरच हिंदुपदपातशाही स्थापण्याचा संकल्प पूर्णपणें फळास येण्याचा रंग दिसूं लागला ! पण निर्घृण कालानें आचानक घाला घातला ! माधवरावास मराठे अंतरले ! दिवा मालवला ! हिरा हरपला ! !

---

८२. नारायणराव पेशवे.



नारायणराव व राघोबा पेशवाईचीं वस्त्रें आणण्याकरितां साताऱ्यास गेले व शके १६९४ च्या मार्गशीर्ष वद्य ४स (१४।१२।१७७२) नारायणरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. त्या वेळीं त्याचें वय सतरा वर्षांचें होतें, व अजून त्याचा लहानपणचा उतावळेपणा गेला नव्हता. अशा स्थितींत हाताखालच्या लोकांस शिस्तीनें वागविणें त्याच्या हातून झालें नाहीं. एकदां सखारामबापूची रदबदली न ऐकतां नारायणरावानें त्याचें मन दुखविलें. तेव्हांपासून तो वृद्ध, अनुभवी पण कुटिल स्वभावाचा मुत्सद्दी अगदीं उदासीन झाला व त्यानें आपलें अंग कारभाराबाहेर टाकलें. नारायणरावाची वाटेल त्या माणसाच्या बोलण्यावर विश्वास टाकण्याची लहान मुलासारखी वृत्तिही अजून गेली नव्हती. त्यामुळें हलक्या लोकांचा दरबारांत मान होऊं लागला, व अब्रूदार मुत्सद्दी दरबारकामांत फारसा पुढाकार घेतनासे झाले.

२. राघोबा, आनंदीबाई व त्यांची शागीर्दमंडळी यांची फंदफितुरी सुरू झाल्याचें नारायणरावास कळलें. त्यावरून त्यानें पूर्ण चौकशी न करतां राघोबास फिरून कैदेंत टाकिलें. मग फाल्गुन महिन्यांत नारायणराव आईस भेटण्याकरितां गंगापुरास गेला. ती संधी साधून राघोबानें बंडावा करण्याचा प्रयत्न केला. त्यानें गुप्तपणें ठिकठिकाणीं

फौज जमविली, आणि हैदरचा वकील आप्पाजी राम याच्या मार्फत आपल्याला साहाय्य करण्याविषयीं हैदरास पत्रें पाठविलीं. आतां वाड्याबाहेर तो निघून जाणार तोंच फितुराची बातमी फुटून शहरचा मुख्य अधिकारी नारो आप्पाजी तुळशीबागवाले यानें शहरची नाकेबंदी केली व शनिवारवाड्याभोंवतीं खडे पहारे ठेविले. या बातम्या गंगापुरास जाऊन नारायणराव तावडतोब पुण्यास निघून आला. फितुरीचे कागदपत्र पकडून व आप्पाजी राम याची निर्भर्त्सना करून बेडी घालून त्यानें त्याला सिंहगडास पाठविलें व इतर फितुरही कैदेत ठेविले.

३. नागपूरचा जानोजी भोंसले माधवरावापूर्वी कांहीं महिने वारला (वैशाख शु० १५, शके १६९४). त्याला मुलगा नव्हता. तेव्हां त्यानें आपला भाऊ मुधोजी याचा मुलगा रघूजी यास दत्तक घेऊन त्यास सेनासाहेबसुभ्याचें पद मिळावें अशी व्यवस्था केली होती. पण मुधोजी हा राघोबाच्या पक्षाचा होता, तेव्हां नारायणरावानें रघूजीकडून जहागीर व सेनासाहेबसुभा हें पद, हीं दोन्ही काढून तीं मुधोजीचा भाऊ साबाजी यास दिलीं. त्यावरून त्या दोघां भावांत तंटा सुरू झाला. जानोजीची बायको दर्याबाई मुधोजीस मिळाली. तेव्हां त्याचा पक्ष बळावला हें पाहून नारायणरावानें खंडेराव दरेकर व निजामानें आपला सरदार रुकनुद्दवला ह्यांस साबाजीच्या मदतीस पाठविलें. मुधोजीस एलिचपूरच्या नबाबाचा आश्रय होता. तेव्हां या फौजांसह साबाजीनें एलिचपुरास वेढा घातला; इतक्यांत बाहेरून येऊन मुधोजीनें वेढा घालणाऱ्या सैन्याची अन्नसामुग्री तोडली. त्यामुळें साबाजीनें वेढा उठविला; व तो सहा कोसांवर जाऊन राहिला. साबाजीची बाजू अशा तऱ्हेनें लंगडी झालेली पाहून राघोबाच्या पक्षाच्या मंडळीस आनंद झाला.

४. दुसरें एक प्रकरण या वेळीं पुण्यास उद्भवलें होतें. हें म्हणजे ब्राह्मणांनीं परभूंवर फिर्याद आणिली. तिचा निकाल आजपर्यंतच्या

वहिवाटीस अनुसरून "पूर्वी चालत आलें आहे तसें चालवावें; नवें करूं नये, जुनें मोडूं नये," असा न देतां नारायणरावानें "परभू क्षत्रिय नाहींत, वेदोक्तकर्माचा त्यांना अधिकार नाहीं; त्यांनीं शूद्राप्रमाणें वागावें," असा दिला; व त्या अर्थाचा नऊ कलमांचा करार त्या जातींतील लोकांकडून लिहून घेतला. त्यावरून परभू जात खवळून गेली व तिनें राघोबाचा पक्ष धरिला.

५. माधवराव पेशवे मरण पावल्याबरोबर हैदरच्या मनावर बसलेला मराठ्यांचा वचक बराच कमी झाला. आपला मराठ्यांनीं घेतलेला मुलूख जिंकण्यास ही उत्तम संधी आहे असें त्यास वाटलें; व त्याकरितां फौज जमविण्याच्या कामास तो मोठ्या नेटानें लागला. हा हैदरचा बेत जेव्हां नारायणरावास कळला, तेव्हां त्यानेंही दसरा झाल्यावर हैदरावर स्वारी करण्यास जाण्याचा निश्चय केला; व त्यासाठीं विसाजी कृष्ण बिनीवाले व तुकोजी होळकर या दोघांसही दक्षिणेंत निघून येण्याविषयीं तांतडीचे हुकूम पाठविले. दिल्ली, दुआब, रोहिलखंड वगैरे प्रांतांत ते सरदार जम बसवीत होते व पानिपतच्या खडकावर आपटून मागें परतलेल्या मराठी साम्राज्यसमुद्राच्या लाटा फिरून दिल्ली, दुआब, रोहिलखंड येथवर जाऊन थडकल्या होत्या! पण माधवराव पेशव्याच्या मृत्यूचा धक्का बसून मराठी साम्राज्य फिरून आंत आंत येऊं लागलें.

---

८३. 'ध' चा 'मा'!

मुधोजी भोंसले व राघोबा यांचें आंतून सूत्र होतें, हें मागें सांगितलेंच आहे. एलिचपुरास साबाजीनें वेढा घातला होता. पण त्या शहराच्या मदतीस मुधोजी आल्यामुळें साबाजीच्या सैन्यांत

धान्याची टंचाई पडली व त्यास वेढा उठवावा लागला. साबाजीचा असा पराजय झाला. तेव्हां नारायणरावानें स्वतः त्याच्या मदतीस जाण्याचें ठरविलें; तों मुधोजीवर पेशव्यांची स्वारी होऊं नये म्हणून पुण्यांत राघोबाच्या वतीनें कट होऊं लागले. प्रथम या कटवाल्यांचा बेत फक्त राघोबाची सुटका करण्याचा होता. त्यांत मुधोजीचे कारकून व्यंकटराव काशी, लक्ष्मणराव काशी व राघोबाच्या मर्जीतील सरदार सखाराम हरि गुप्ते, असे तिघे परभू आरंभीं होते. पण या कटांत जसजशीं बडीं बडीं धेंडें शिरूं लागलीं, तसतशी राघोबाची सुटका हा त्या कटाचा मूळचा साधा हेतु जाऊन त्याच्या जागीं नारायणरावास कैदेंत टाकावयाचें व राघोबास पेशवे करावयाचें हा भयंकर हेतु आला. या धेंडांत सर्वांत प्रबळ म्हटला म्हणजे सखारामबापू होय. नारायणरावानें आपल्या उतावळ्या स्वभावानें बापूचें मन दुखविलें होतें हें मागें आलेंच आहे. बापू मोठा कारस्थानी व माधवरावाच्या वेळेपासून राघोबाचा पक्षपाती असे. कटांत सामील झालेले बापूच्या खालचे लोक म्हटले म्हणजे भवानराव प्रतिनिधि, रामचंद्रबाबा शेणव्याचा मुलगा सदाशिव रामचंद्र, चिंतो विठ्ठल रायरीकर, इत्यादि होत. या कटांतील मंडळींनीं नारायणरावास धरण्याचें काम पेशव्यांच्या पदरच्या गारदी लोकांकडून पार पाडण्याचें ठरविलें. गारद्यांपैकीं खरकसिंग, सुमेरसिंग व महंमद इसफ या तीन जमादारांस पांच लक्ष रुपये देण्याचा करार झाल्यावर गारदी खुषीनें पेशव्यास धराबयास तयार झाले; व 'नारायणरावास धरावें' असा हुकूमही राघोबानें गारद्यांस दिला.

२. पण या धरण्याच्या कटाच्या आंत कांहीं निवडक मंडळींनीं राघोबाची कारस्थानी व दुष्ट बायको आनंदीबाई हिच्या सम्मतीनें, आणखी एक कट उभा केला. नारायणरावास धरण्याच्याऐवजीं ठार मारून टाकावें, हा या मंडळींचा हेतु होता. राज्यासाठीं हपापलेली

आनंदीबाई व तिचा खिजमतगार तुळया पवार, हीं दोघें या आंतल्या कटाचीं चालक होतीं. आनंदीनें 'नारायणरावास धरावें' या हुकुमाच्या वाक्यांतील 'ध' च्या ठिकाणीं 'मा' केला! व गारद्यांस बोलावून आणून पेशव्यास धरण्यापेक्षां मारणें कसें जास्त फायदेशीर व अवश्य आहे तें सांगितलें. ही कामगिरी बजावल्यास त्यांना आपल्या नवऱ्यानें देऊं केलेले पांच लक्ष रुपये देऊन शिवाय साष्टी, नगर व पुरंदर हे तीन किल्लेही देण्याचें तिनें अभिवचन दिलें; आणि नारायणरावास ठार मारूं, अशाबद्दलचा सुमेरसिंग वगैरे तीन गारद्यांकडून बेलभंडार उचलून घेतला. अशारीतीनें पुढें होणाऱ्या घोर अनर्थाची पूर्वतयारी अगदीं कडेकोट झाली.

३. ही मसलत सिद्धीस जाण्यास राघोबास इतर गोष्टीही अनुकूल होत्या. पावसाळ्यामुळें फौजेस घरीं जाण्यास निरोप मिळाला होता व पुण्यांत सारी मिळून तीन चार हजार फौज होती. आपल्यास धरण्याची मसलत घाटत आहे. हें नारायणरावाच्या स्वप्नींही नव्हतें. शके १६९५ (३०।८।१७७३) च्या भाद्रपद शुद्ध १३स सोमवारीं प्रातःकाळीं नारायणरावानें कुलाब्याहून नुकत्याच आलेल्या रघूजी आंगऱ्याची भेट घेतली. मग पर्वतीचें दर्शन घेऊन सासुरवाडीस नारायणराव सहकुटुंब भोजनास गेला. भोजन करून त्यानें विडा घेतला तोंच त्यास कोणीं अशी सूचना केली कीं, गारद्यांचा दंगा चालू आहे; कृपा करून आपण वाड्यांत जाऊं नये. नारायणरावास गारदी दंगा करणार आहेत ही बातमी पर्वतीवरच समजली होती. तेव्हां त्यानें हरिपंत फडक्यास त्यांचा बंदोबस्त करण्यास सांगितलेंच होतें. पण हरिपंतास कोठें जेवावयास जावयाचें होतें. तेव्हां जेवण झाल्यावर बंदोबस्त करण्याचें त्यानें ठरविलें.

४. इकडे नारायणराव जेवण झाल्यावर थोड्याच वेळानें निघून शनिवारवाड्यांत आला. तिसऱ्या मजल्यावर खबूतरखाना होता तेथें

तो अम्मळ उभा होता. इतक्यांत सुमेरसिंग, खरकसिंग व महंमद इसफ असे तिघे गारदी आले व ह्मणाले, "महाराज, आमची तलब चढली, याची वाट काय ? आमचा रोजमुरा फडशा करून द्यावा," पेशव्यांनीं आज्ञा केली, 'तिसरे प्रहरीं कचेरीस विनती करावी.' गारद्यांनीं उत्तर केलें, "आह्मांस कचेरीची काय गरज! आपण धनी; आपण फडशा करावा." तों नारायणराव जिना उतरूं लागला. गारद्यांनीं लगट करून ह्मटलें "आह्मांस ऐवज द्या. नाहींतर खालीं उतरूं देत नाहीं." इच्छारामपंत ढेरे ह्मणून कारकून जवळ होता, तो रागें भरून बोलला, "असा दंगा केल्यानें ऐवज मिळतो कीं काय?" हें ऐकतांच गारद्यांनीं तरवारी उपसून इच्छारामपंताचा तेथल्या तेथें प्राण घेतला. खालीं चौवांत पूजेच्या दोन गाई बांधल्या होत्या त्या गारद्यांच्या नागव्या तरवारी पाहून बुजल्या व दावीं तोडून गारद्यांच्या अंगावर आल्या. त्यामुळें नारायणरावास पुढें जाण्यास वेळ मिळाला. गाई आडव्या येतांच गारद्यांनीं तरवारीनें ठार केल्या ! तों नारायणराव घाबरून सदाशिवरावभाऊची बायको पार्वतीबाई हिच्या खोलींत जाऊन म्हणाला, "काकू, मला गारदी मारतात." पार्वतीबाई म्हणाली, " मी तुला लपवितें, तूं भिऊं नकोस." इतक्यांत नारायणरावास काय वाटलें कोणास ठाऊक ? तो एकदम म्हणाला, " मी दादासाहेब यांजकडे जातों. " गारदी नारायणरावाच्या मागें लागलेच होते. एक कुणबीण आडवी आली. तिला त्यांनीं ठार मारलें. नारायणरावानें जाऊन राघोबाच्या कमरेस मिठी घातली व तो मोठ्या दीनपणानें म्हणाला, " काका ! मला मारूं नका! किल्ल्यावर पीठमीठ लावून ठेवा !मारूं नका." हें ऐकून राघोबास त्याची दया आली व तो गारद्यांस म्हणाला, " यास मारूं नका. " गारदी म्हणाले, " आतां यास आम्ही जिवंत सोडणार नाहीं. सर्पास दुखवून कोणी सोडील काय ? मुकाट्यानें तुम्ही यास सोडा; नाहींतर दोघेही

मराल." इतकें बोलून गारद्यांनीं वार केला; त्याबरोबर राघोबाच्या कपाळास व हातास जखम झाली. लागलीच त्यानें नारायणरावास सोडून दिलें. आनंदीचा खिजमतगार तुळ्या पवार यानें नारायणरावाचा पाय ओढून त्यास खालीं पाडलें. तोंच चापाजी टिळेकर म्हणून पेशव्यांचा विश्वासू खिजमतगार होता तो नारायणरावाच्या अंगावर पडला. व जीव न घेण्याविषयीं गारद्यांची विनवणी करूं लागला. पण त्या क्रूर गारद्यांस कसची दया येणार! त्यांनीं तरवारी चालवून दोघांसही ठार केलें. नारायणराव साखरभात जेवला होता तो पोटांतून तसाच बाहेर पडला!

५. नंतर गारद्यांनीं राघोबाच्या नांवानें शनिवारवाड्यांत द्वाही फिरविली. सर्व वाडा गारद्यांनीं आपल्या ताब्यांत घेतला होताच. आतां त्यांनीं दिल्लीदरवाजा लाविला. शहरांत बातमी पसरली; तेव्हां सर्व लोकांस दुःख झालें व गारद्यांवरील क्रोध अनावर झाला. तोफखान्याचे पानसे म्हणाले. "तोफा आणून उडवून देतों." त्रिंबकरावमामा घोड्यावर बसून हातांत भाला घेऊन आंत चालला. गारदी म्हणाले, "मामासाहेब. आपण पुढें येऊं नये. आला असतां गोळी घालूं. आपण सडे आंत यावें." त्यावर मामा पायउतारा होऊन दिंडींतून आंत गेला व राघोबाकडे जाऊन त्यास म्हणाला. "श्रीमंत बाजीरावसाहेब यांचे पोटीं पोरगी जन्मास आला असतास तर एक्या ब्राम्हणाचें घर उभें राहतें? हें काय केलेंस*!!!" ते शब्द ऐकून राघोबा कपाळास हात लावून तसाच बसला. मग कांहीं वेळानें मामास म्हणाला, "आतां पुढें याच्या दहनाचा विचार करावा." मामा बोलला, "अरे दहन कसलें करतोस? मलाही मारून टाक म्हणजे झालें! तुझ्या घरीं ब्राह्मण कोण येतो? दहन कोण करतो?"

६. दुसऱ्या दिवशीं गांवांतील शिष्ट ब्राह्मण बोलावून प्रायश्चित्त

* हरिवंशाची बखर, पृष्ठ—४३.

काय घ्यावें, याचा राघोबानें विचार आरंभिला. त्या समेंस रामशास्त्री प्रभुण्यासही बोलाविलें. तेव्हां त्यानें आपलीं मुलेंमाणसें माहुलीस लावून दिलीं, व मग तो समेंस आला. बरकड पंडित म्हणाले, " गारदी यांनीं नारायणरावास ठार मारलें. शब्ददोष श्रीमंतांवर आला आहे. तर यावर कांहीं प्रायश्चित करावें, म्हणून आपणांस बोलाविलें. " तेव्हां रामशास्त्री बोलला, " प्रायश्चित्त कसचें करितां व कोणास देतां? ब्रह्महत्या, गोहत्या, स्त्रीहत्या, बालहत्या जेथें झाल्या तेथें कोणचें प्रायश्चित्त पुस्तकांत लिहिलें आहे ? एक प्रायश्चित्त, यास देहान्तप्रायश्चित्त करावें ! शिसें तापवून प्राशन करावें, किंवा दर्भाचें गृह करून आंत बसावें आणि अग्निसंस्कार करावा. यांतून वांचल्यास पुढें प्रायश्चित्त करावें. " असें ऐकतांच सर्व पंडित म्हणाले, " शास्त्रीबोवा आपण असें काय म्हणून बोलतां ? " त्यावर त्या निःस्पृह रामशास्त्र्यानें उत्तर केलें, " मला यांचे राज्यांत रहावयाचें नाहीं. तुम्हांस रहावयाचें असेल म्हणून तुम्ही ग्रंथास विरुद्ध भाषण करतां. मी मुलेंमाणसें रवाना करून सोवळ्यानेंच आलों. मी असाच निघणार. कालपासून जलस्पर्श देखील केला नाहीं. मी जीवित्वास उदार झालों ! मर्जी असल्यास आणखी एक ब्रह्महत्या ×करावी. " याप्रमाणें शास्त्रीबोवा बोलतांच कोणीएक बोलेनासें झालें. शास्त्रीबोवा तसाच निघून माहुलीस गेला. नंतर त्यानें अन्नव्यवहार केला. म्हटलें आहे ' निःस्पृहस्य तृणं जगत् ' !

---

८४ ओट घटकेचें राज्य.

नारायणरावाचा खून करून गारद्यांनीं राघोबाच्या नांवाची

×हरिवंशाची बखर, पृष्ठ ४४.

द्वाही फिरविली व ते शनिवारवाड्यांत बंदोबस्तानें राहिले. लागलीच दंग्याचें वर्तमान शहरांत कळलें. तेव्हां सखारामबापू, नाना फडणीस, त्रिंबकरावमामा पेठे, मोरोबादादा, वगैरे मुत्सद्दी कोतवालचावडींत जमा झाले व त्यांनीं स्वार जमा करून शहराची नाकेबंदी केली. इतक्यांत वाड्यांतून राघोबाची सखारामबापूस चिठ्ठी आली कीं, " आतां व्यर्थ खटपट कशास करितां ! चिरंजीव राव गारद्यांच्या कटकटींत मारले गेले; मीही गारद्यांच्या कैदेंतच आहें. तुम्हीं आंत येऊन भेटून जावें. " ही चिठ्ठी मिळाल्यावर बापू शनिवारवाड्यांत गेला. आंतला भयंकर देखावा पाहून त्यास कसेंसेंच झालें. तो राघोबास म्हणाला, " आमचे शरीरीं समाधान नाहीं. आम्ही घरास जातों. लेखणीचे धनी फडणीस. त्यांशिवाय आपलें चालावयाचें नाहीं. त्यांस बोलावून आणा. " इतकें बोलून तो घरीं निघून गेला. नंतर नाना व मोरोबा या दोघांस राघोबानें बोलावून नेऊन "तुम्ही पूर्वीप्रमाणें आपलीं कामें करीत जा, " असें सांगून मोरोबाकडून राज्यांतील सर्व सरदारांस पत्रें लिहविलीं. त्यांत ' नारायणराव दुर्दैवानें मारले गेले. ईश्वरी इच्छेस उपाय नाहीं. तुम्हीं आपआपल्या जागीं सावध असावें व मागून हुकूम येतील त्याप्रमाणें वर्तत जावें. ' असा मजकूर होता.

२. सर्व सरदारांनीं व मुत्सद्दी मंडळींनीं राघोबाच्या म्हणण्यास तात्पुरती संमति दिली व राज्यकारभार सुरू झाला. पहिलें काम गारद्यांस वाड्यांतून बाहेर काढावयाचें. आतां करारप्रमाणें त्यांस पांच लक्ष रुपये व तीन किल्ले द्यावयाचे. पण किल्ले देणें म्हणजे राज्याचें नाकच त्यांचे हातीं देण्यासारखें होतें. त्यामुळें बरीच वाटाघाट होऊन शेवटीं आठ लक्ष रुपये घेऊन व आपल्या जिवास अपाय होणार नाहीं, याबद्दल राघोबापासून जामीन घेऊन गारद्यांनीं वाडा सोडला. राघोबाच्या मनांत आपल्या स्वतःस पेशवाईचीं वस्त्रें घेण्याचें

नव्हतें, याचें कारण काय तर सातारचा 'हल्लींचा राजा अपेशी' अशी त्याची समजूत झाली होती! माधवराव व नारायणराव या दोघांस याच राजानें पेशवाईचीं वस्त्रें दिलीं व तीं त्यांस फार दिवस लाभलीं नाहींत. याकरितां आपला दत्तक मुलगा अमृतराव यास पेशवा करावा, असें राघोबाच्या मनांत होतें. पण राघोबाची प्रियपत्नी आनंदी हीस अजून आपणास पुत्र होईल अशी आशा होती. याकरितां तिनें राघोबास स्वतःस वस्त्रें घ्यावीं असें हट्टानें सांगितलें. तेव्हां अमृतराव व बजाबा पुरंदरे यांस साताऱ्यास पाठवून अपेशी राजाकडूनच शेवटीं राघोबानें आपणाकरितां पेशवाईचीं वस्त्रें आणविलीं.

३. राघोबास पेशवाई मिळाल्यावर त्याचे साहाय्यकारी भोंवतीं जमूं लागले. मुधोजी भोंसले व हैदरअली यांचे वकील त्याच्या दरबारांत मोठ्या मिजासीनें वावरूं लागले. प्रथम राघोबानें सेनासाहेबसुभा हें पद पुनः रघूजीस देऊन मुधोजीस त्याचा पालक नेमिलें. जुन्या सरदारांच्या जाहागिरी कमी करून त्या सदाशिव रामचंद्र, बाजीराव बर्वे व विठ्ठल विश्राम या तिघांस द्याव्या व पंधरा हजार सैन्याचे हे नवे तीन सरदार बनवावे, असा राघोबाचा बेत होता. भवानराव प्रतिनिधीस प्रतिनिधिपद देण्याचें त्यानें आश्वासन दिलें. गंगाधर यशवंत चंद्रचूडास 'तूं माझी उत्तम कामगिरी केलीस, तुला होळकराची दिवाणगिरी फिरून द्यावयाची' असें सांगितलें. चिंतो विठ्ठल रायरीकरास तर राघोबानें पेशवाई मिळतांच आपली दिवाणगिरी दिली. अशा रीतीनें आपल्या कच्छपीं असलेल्या लोकांस त्यानें भरारा खैरात केली व या लोकांच्या जिवावर राज्य हांकण्याची उमेद धरली. सखारामबापू, नाना फडणीस, हरिपंत फडके, त्रिंबकरावमामा पेठे, मोरोबादादा फडणीस, कृष्णराव बल्लाळ काळे, व नारो आप्पाजी तुळशीबागवाले, वगैरे जुने मुत्सद्दी व पटवर्धन, रास्ते, धायगुडे आणि खुद्द शिंदेहोळकर, हे सरदार नाखुषीनें राघोबाच्या राज्यांत आपलीं पूर्वीचीं

कामें करीत होते. यांपैकीं कोणाचेंही अंतःकरण राघोबाविषयीं शुद्ध नव्हतें. राघोबा राज्य करूं लागला, तेव्हां राज्याची अंतःस्थिति अशी होती.

४. आतां राज्याबाहेर कशी स्थिति होती ती पाहूं. मुंबईचे इंग्रज नारायणरावाचा खून झाल्यापासून सज्ज होऊन साष्टीवर घाला घालण्यासाठीं टपले होते. पोर्तुगीज व हब्शीही गडबड करीत होते. पण हे झाले क्षुद्र शत्रु; बडे शत्रु म्हटले म्हणजे साबाजी भोंसले, निजामअली व हैदरअली हे होत. निजामअलीनें साबाजीस मदत केली. हैदरनें तुंगभद्रेच्या दक्षिणेचा माधवरावानें जिंकलेला सर्व मुलूख लुटण्याचा सपाटा चालविला. यामुळें राघोबानें पुढील अनुक्रमानें शत्रूंवर स्वाऱ्या करण्याचें ठरविलें. पहिल्यानें निजामअली व साबाजी यांजवर चालून जावयाचें; त्यांचें पारिपत्य करून हैदरवर मोर्चा फिरवावयाचा व त्याला तंबी पोंचवून अर्काटच्या नबाबावर स्वारी करावयाची, याप्रमाणें बेत ठरला.

५. चाळीस हजार स्वार,पांच हजार गारदी,व दोनशें तोफा,इतक्या फौजेनिशीं राघोबा पहिल्यानें निजामावर चालून गेला. निजाम बेदरकडे होता; तिकडे मराठी सैन्य चाललें. इतक्यांत साबजी भोंसल्यानें दहा हजार फौजेसह येऊन आंबेड व पैठण हे दोन परगणे लुटले. तेव्हां दहा हजार फौज बरोबर देऊन, त्रिंबकरावमामा पेठे व आनंदराव रास्ते या दोघांस साबाजीचें पारिपत्य करण्यास राघोबानें पाठविलें. इकडे बेदरास निजामाला कोंडल्यामुळें त्यानें तहाचें बोलणें लाविलें. तह मराठ्यांस बराच फायदेशीर असा झाला. निजामानें मराठ्यांस बीस लक्षांची जहागीर व औरंगाबाद देण्याचें कबूल केलें (९।१२।१७७३). इतक्यांत निजाम राघोबाच्या भेटीस आला व त्यानें अशा कांहीं गोड थापा दिल्या कीं, राघोबानें अगदीं भुलून जाऊन या तहानें झालेली सर्व मिळकत निजामास परत दिली ! त्यांत शर्त एवढीच

ठेविली कीं, मोठेंसें काम पडेल तेव्हां निजामानें आपली कुमक करावी. ही शर्त निजामानें मोठ्या आनंदानें कबूल केली.

६. मग राघोबा हैदरअलीवर चाल करून निघाला, तो निवृत्ति-संगमावर+ कृष्णा उतरून रायदुर्गाच्या रोखें चालला. यापूर्वीच हैदरकडून आप्पाजी राम हा वकील येऊन तहाचीं कलमें ठरवून गेला होता. राघोबास अर्काटवर स्वारी करण्याची फार इच्छा होती; व हैदरची फौज या स्वारींत कुमकेस नेण्याचा त्याचा बेत होता. शिवाय त्यास पेशाची फार जरूर होती. सबब माधवरावानें मोठ्या प्रयासानें जिंकलेल्या तिकडील राज्यापैकीं तीन परगणे राघोबानें थोड्याशा रकमेसाठीं हैदरास विकून टाकले. पुढें राघोबा अर्काटवर स्वारी करण्यास निघणार होता. इतक्यांत पुण्याहून कांहीं विलक्षण बातम्या आल्या. त्या ऐकून पुढें न जातां मागें फिरणें राघोबास भाग झालें. त्या कोणत्या त्या पुढील प्रकरणांत पाहूं.

---

८५. राज्यक्रान्ति–बारभाई.

—:०:—

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें राघोबास पेशवाई प्राप्त होतांच त्याचे मित्र भराभर वर चढूं लागले व जुने मुत्सद्दी मागें पडले. खुद्द सखारामबापूसही राघोबा फारसा विचारींत नसे. मग

+जेथें कृष्णेस तुंगभद्रा (भवनाशी) नदी मिळते, त्या ठिकाणास निवृत्तिसंगम हें नांव आहे. हा संगम कर्नूळच्या ईशान्येस चोवीस मैलांवर असून, धर्मदृष्ट्या पवित्र तीर्थांत त्याची गणना आहे. दक्षिणदिग्विजयाच्या वेळीं यात्रेकरूनें करावयाचे सर्व धर्मविधी शिवाजीनें येथें केले होते. त्याचप्रमाणें भीमा व कृष्णा यांचे संगमास कपिलासंगम हें नांव असून तो रायचूरच्या उत्तरेस आठ कोस आहे.

इतरांची कथा काय? या गोष्टीचा परिणाम सखारामबापूवर अतिशयच झाला. शिवाय नारायणरावाचा खून झाला, हीही गोष्ट त्याचे मनास फार लागून राहिली होती. खुनाच्या दुसरे दिवशींच पोरेंबाळें सारीं घरीं टाकून तो जो दुपारीं बाहेर पडला तो पर्वतीच्या आसपास एकटाच निराश मुद्रेनें भटकत भटकत चांगला चार पांच कोस दूर गेला होता. त्याची चित्तवृत्ति इतकी क्षुब्ध झाली होती कीं, राघोबास पेशवाई पचूं न देतां लवकरच कांहीं तरी चांगली व्यवस्था लावावी, असें त्याच्या मनानें घेतलें. इतक्यांत नारायणरावाची स्त्री गंगाबाई गरोदर आहे असें त्यास समजलें, तेव्हां या आधारावर नवीन व्यूह रचण्याचा त्यानें निश्चय केला.

२. पुणेंदरबारांत सखारामबापूची व नाना फडणिसाची अशा दोन फळ्या होत्या. फडणिसाच्या फळींत त्रिंबकरावमामा पेठे, मोरोबा फडणीस, कृष्णराव काळे, हे मुत्सद्दी होते व या फळीच्या लगामीं पटवर्धन, रास्ते, धायगुडे हे सरदार असत. शिंदेहोळकरांकडेही बापूपेक्षां नानाचेंच वजन ज्यास्त पडण्यासारखें होतें. सखारामबापूस जुने देशस्थ सरदार अनुकूल होते; आणि कोल्हापूरकर, नागपूरकर भोंसले व निजामअली आणि हैदरअली यांजकडेही त्याचीं सूत्रें होतीं. गंगाबाईचा जीव वांचवावा, राघोबास पदच्युत करून तिच्या नांवाची द्वाही फिरवावी, तिला पुत्र झाला तर बरेंच; नाहींतर तिच्या मांडीवर दत्तक देऊन त्याच्या नांवें राज्यकारभार चालवावा, अशी बापूची मसलत होती. नाना फडणीस व तत्पक्षीय मंडळी आपल्या पक्षास सहज अनुकूल होतील, असा त्यास सुमार दिसला. मग दोन्ही पक्ष एक होऊन बापूची मसलत अंमलांत आणण्याचें ठाम ठरलें. यांत बारा मंडळी मुख्य होती म्हणून ही मसलत 'बारभाईंचें कारस्थान' या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे.

३. राघोबा स्वारीस निघाला तो पहिल्यानें निजामावर गेला.

पेडगांवच्या मुक्कामीं असतांच बापू आजारीपणाचें सोंग करून परत आला. नाना, मोरोबा व हरिपंत फडके कांहींना कांहीं निमित्त काढून पुण्यास परत आले. आतां पूर्वी ठरलेली मसलत अंमलांत आणण्यास सुरुवात झाली. नारो आप्पाजी तुळशीबागवाले यानें पुण्याच्या कोतवालाच्या मुसक्या बांधून शहर ताब्यांत घेतलें आणि गंगाबाई व पार्वतीबाई यांस शनिवारवाड्यांतून काढून पुरंदर किल्ल्यावर नेऊन ठेविलें. राघोबाच्या पक्षाच्या लोकांची मालमत्ता जप्त करून बायकामुलें कैदेंत घातलीं. सखारामबापू व नाना फडणीस यांनीं राघोबास सातारच्या महाराजांकडून पदच्युत करून पेशवाईचीं वस्त्रें गंगाबाईच्या नांवें आणविलीं; व शिंदे, होळकर, फत्तेसिंग गायकवाड, इत्यादि सरदारांस आपण काय केलें हें कळविण्यासाठीं पत्रें पाठविलीं. रुकनुद्दवल्याच्या मार्फतीनें निजामाशीं स्नेह झाला. राघोबानें मुधोजीस सेनासाहेबसुभ्याचा पालक नेमिलें होतें; ही व्यवस्था रद्द करून कारभाऱ्यांनीं सेनासाहेबसुभा हें पद साबाजीस दिलें. साबाजी भोंसले, त्रिंबकरावमामा पेठे, व गंगाधरराव रास्ते हे आतां एक झाले. त्यांच्याजवळ वीस हजारपर्यंत फौज होती. शिवाय पुण्यास हरिपंत फडके आणखी फौज चाकरीस ठेवीत होता.

४. या बातम्या राघोबास समजतांच त्यानें कर्नाटकाची मोहीम तहकूब केली, व परत कूच केलें. परत येण्यास निघण्यापूर्वी कारभाऱ्यांविरुद्ध आपला साहाय्यकर्ता कोणी तरी असावा, म्हणून त्यानें हैदरअलीशीं कल्याणदुर्ग येथें तह केला. माधवरावानें मोठ्या मेहनतीनें मिळवलेल्या तुंगभद्रेच्या दाक्षिणेचा मुलूख तर त्यानें हैदरास देऊन टाकलाच; पण येवढेंच करून राघोबा थांबला नाहीं. त्यानें कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील सर्व मुलूख हैदरास बहाल केला. त्या मुलुखांत पटवर्धन व रास्ते या दोघांच्याही जहागिरी होत्या. हे दोघे सरदार कारभाऱ्यांस मिळाले होते. तेव्हां त्यांचें पारिपत्य करण्यास राघो-

बानें ही युक्ति योजिली ! राघोबा परत फिरून शके १६९५ (सन १७७४) च्या फाल्गुनांत कृष्णा उतरला. मग पटवर्धन व रास्ते या दोघांच्या जहागिरींत लुटालूट करण्याचा त्यानें सपाटा चालविला. इतक्यांत त्रिंबकरावमामा, साबाजी भोंसले व रुकनुद्दवला हे पन्नास हजार फौज घेऊन चाल करून आल्यामुळें राघोबा उत्तरेस पळूं लागला. येवढ्या वेळांत त्रिंबकराव व हरिपंत फडके हे जवळ जवळ आले, व त्यांचा वीस हजारांवर फौजेचा जमाव झाला असल्यामुळें भोंसले व निजाम यांस मागें टाकून ते राघोबाचा निकरानें पाठलाग करूं लागले. राघोबा सांगोल्यावरून पंढरपुराकडे आला; व तो पुढें जाणार अशी बातमी होती. मागून मामाची फौज पाठलाग करीत होती; तिचा मुक्काम कासेगांवीं होता. इतक्यांत राघोबानें पुढें पळण्याचा बेत रहित करून मामाच्या फौजेशीं कासेगांवीं गांठ घातली (२६।३।१६७४). या लढाईंत त्रिंबकरावाचा पराभव झाला व तो स्वतः जखमी होऊन दुसरे दिवशीं मरण पावला. हा कारभाऱ्यांच्या फौजेवर मोठाच प्रसंग होता. पण हरिपंत फडक्यानें मुळींच कच न खातां फौजेस भरंवसा देऊन फिरून एकत्र केलें, आणि साबाजी भोंसले व निजामअली यांशीं राजकारण करून त्यांस आपणाकडे मिळवून घेऊन राघोबाचा पाठलाग सुरू केला. तेव्हां फडक्यांचें पारिपत्य करून पुण्यास येऊन कारभाऱ्यांचें पारिपत्य करावें ही मसलत करण्याचें राघोबास धैर्य होईना. सबब तो उत्तरेस बऱ्हाणपुराकडे पळत सुटला. हरिपंतही, साबाजी भोंसले व निजामाची फौज यांसह त्याचा पाठलाग करीत चालला.

५. इतकें होतें तों शके १६९६चा अधिक वैशाख महिना लागला. शुद्ध ७ मीच्या (१८।४।१७७४) दिवशीं पुरंदर किल्ल्यावर गंगाबाई प्रसूत होऊन मुलगा झाला. जन्मोत्सवाचा दिवस कारभाऱ्यांनीं फारच

थाटामाटाचा केला. पूर्वसंकेताप्रमाणें या मुलाचें नांव माधवराव असें ठेविलें. नंतर माधवरावाच्या वयाच्या चाळिसाव्या दिवशींच कारभाऱ्यांनीं त्याच्या नांवें पेशवाईचीं वस्त्रें आणविलीं (२७।५।१७७४). पुढें माधवरावास कौतुकानें सवाईमाधवराव म्हणूं लागले. ही बातमी, राघोबास कळतांच पेशवाई मिळण्याची त्याची आशा नष्ट झाली. त्यानें बाबूजी नाइकातर्फे बोलणें लावलें कीं, " आपण कारभारांत बोलणार नाहीं; स्वस्थ पुण्यांत राहूं; तसें नसल्यास पूर्वीची जहागीर द्यावी, स्वस्थ स्नानसंध्या करून राहूं." तें बोलणें कारभाऱ्यांनीं मान्य केलें नाहीं. तेव्हां पुन्हां राघोबाकडून चिंतो विठ्ठल व विसाजी केशव समेट करण्याकरितां आले. कारभाऱ्यांना आतां धीर आला होता; म्हणून त्यांनीं साफ सांगितलें कीं, फक्त दानधर्माकरितां दोन लक्ष रुपये घेऊन राघोबानें आनंदवल्लीस रहावें. तें होत नसेल तर अंगांत दम असेपर्यंत भटकत रहावें. पुढें व्हावयाचें तें होतच आहे.

---

८६ राघोबाचा पळ.

—:o:—

कारभाऱ्यांच्या अटी राघोबास मान्य झाल्या नाहींत व तो तसाच पुढें पळत चालला. मागें हरिपंत होताच. त्यानें राघोबा नर्मदा उतरून माळव्यांत शिरणार असें ताडलें. लागलीच महादजी शिंद्यास त्यानें लिहिलें कीं, राघोबाचे तिकडे येण्याचे मार्ग अडवावे, म्हणजे आम्ही येऊन गांठ घालतों. पण शिंदे सरळपणानें कसे वागणार ! राज्यांत उत्पन्न झालेलें राघोबाचें खूळ एकदम मोडून टाकलें तर आपला उदय होणार नाहीं, असें महादजी शिंद्यास वाटलें. त्यानें हरिपंतास लिहिलें कीं, माळव्यांत येण्यास हांड्याचा घाट व बडव्याचा घाट असे दोन मार्ग आहेत. हांड्याच्या घाटाचा बंदोबस्त

आमच्यानें होणार नाहीं, तो तुम्हीं करावा. बडव्याच्या वाटेनें मात्र आम्ही राघोबास येऊं देत नाहीं. त्याप्रमाणें हरिपंतानें केलें व राघोबा बडव्याच्याच वाटेनें कांहींएक अडथळा न होतां अचूक इंदुरास गेला ! राघोबाच्या पाठोपाठ नर्मदा नदी उतरण्यास हरिपंत येतो तों त्यास शिंद्याचीं पत्रें आलीं कीं, 'तुम्हीं पुढें येऊं नये. राघोबाची समजूत काढून लवकर त्यास देशीं घेऊन येतों.' यंदांच राघोबाच्या मसलतीचा फडशा पाडावा असा हरिपंताचा हेतु होता. पण शिंद्याच्या मध्यस्थीमुळें त्यास नर्मदेच्या अलीकडे रहावें लागलें.

२. एक महिना झाला तरी शिंदे समजूत घालीना. तेव्हां जरब दाखविण्याकरितां हरिपंत नर्मदा उतरून एक मजल पलीकडे गेला. त्याबरोबर शिंद्याचें पत्र आलें कीं, 'मला फौजेचें पांच सात लक्ष रुपये देणें झालें आहे तें हरिपंतानें दिलें, म्हणजे मी तुमच्याबरोबर देशीं येतों,' असें राघोबानें आम्हांजवळ कबूल केलें आहे. याकरितां त्याचें फौजेचें देणें फेडावें म्हणजे काम होईल. यावर हरिपंतानें राघोबाकडे रुपये पाठविले. रुपये हातीं पडतांच राघोबा इंदूर सोडून सुजाउद्दवल्याकडे जाण्याकरितां एक मजल पुढें गेला. तेव्हां पाठोपाठ येऊन महादजीच्या फौजेनें राघोबाच्या फौजेस गराडा दिला, व कबूल केल्याप्रमाणें देशीं चलावें नाहींतर कटकट होईल, असें सांगून पाठविलें. हा शिंद्याचा निग्रह पाहून राघोबा दक्षिणेकडे येऊं लागला. परंतु त्यानें शिंद्यास सांगितलें कीं, वाटेंतून हरिपंत दूर झाला पाहिजे. यावरून रुकनुद्दवला व भोंसले यांस रजा देऊन हरिपंत वऱ्हाडच्या सरहद्दीवर वेरुळजवळ तळ देऊन घाटाखालीं छावणीस राहिला.

६. शिंदेहोळकरांबरोबर राघोबा शके १६९६ (सन १७७४) च्या आषाढ महिन्यांत खानदेशांत आला. पण त्याचें वर्तन सलोख्याच्या विरुद्धच चालू होतें. वाटेनें त्यानें अशीरगड घेण्याचा प्रयत्न केला. ठिकठिकाणीं रुसून कारभाऱ्यांपासून पैसा काढावा, मामले-

दारांस धरून त्यांजपासून दंड घ्यावे, रयतेस चोप देऊन पैसा उकळावा, असले खेळ त्यानें एकसारखे चालविले होते. इकडे पुरंदरास बापू व नाना यांस शिंद्याचे वकील, पुढीलप्रमाणें बोलूं लागले. "दादासाहेबांस दहा लक्षांची जहागीर व मध्यम प्रतीचे तीन किल्ले स्वदेशीं द्यावे. त्यांची मध्यस्थी आम्हांकडे आहे तर्शीच असावी. तुम्हांवर श्रीमंतांचा विश्वास नाहीं, याकरितां त्यांच्या बंदोबस्तासंबंधें हरएक काम पडेल तें तुम्हीं न करितां आम्हांस सांगावें. आम्ही करीत जाऊं." हें बोलणें बापू व नाना यांनीं मान्य केलें. शिंद्यानें या वेळीं लाख पन्नास हजार रुपये व शिंदखेड वगैरे गांव स्वतःकरितां मागितले, तेही कारभाऱ्यांनीं दिले. नंतर कारभाऱ्यांच्या डोक्यावर आपले उपकार जास्त लादण्याकरितां शिंद्यानें भाद्रपदांत असें लिहून पाठविलें कीं, तुम्ही समीप आल्याशिवाय काम भागत नाहीं. कारभाऱ्यांच्या मनांत बालपेशव्यास सोडून लांब जावयाचें नव्हतें, पण कसा तरी एकदां राघोबाचा बंदोबस्त करावा अशी त्यांची फार इच्छा होती. तेव्हां पुरुषोत्तमरावदाजी पटवर्धन नांवाच्या विश्वासू गृहस्थावर पुरंदरचा बंदोबस्त सोंपवून ते निघाले. जातांना त्यांनीं बरोबर पंधरा हजार फौज मात्र घेतली होती. आतां पावसाळा संपल्यामुळें औरंगाबादेहून निजामअली निघाला व नागपुराहून साबाजी भोंसलेही येऊं लागला. तेव्हां आतां आपल्यास कारभाऱ्यांपासून कांहीं मिळणार नाहीं, हें महादजीस कळून चुकलें. म्हणून तो आतां नवीनच बोलणीं बोलूं लागला. तेव्हां कारभाऱ्यांनीं रागावून शिंद्यास लिहिलें, " तुम्हीं मध्यस्थींत पडून दादासाहेबांकरितां आम्हांकडून पंधरा लक्ष रुपये देवविलेत. श्रीमंतांकरितां किल्ले व जहागीर तुम्हीं जी मागितली ती अगदीं तुमच्या म्हणण्याप्रमाणें करार करून दिली. शिवाय तुम्ही स्वतःकरितां जें जें मागत आलां आहांत तें तें आजपर्यंत आम्ही देत आलों आहोंत; इतकें असून कराराप्रमाणें श्रीमंतांस बागविणें तुम-

च्यानें निभत नसल्यास त्यांस खुशाल वाटेल तें करूं द्यावें; ते व आम्ही बघून घेतों." शिंद्यानें या निरोपाप्रमाणें अक्षरशः वर्तन केलें! चोहोंकडून फौजा चालून येतात असें पाहून, राघोबानें एके दिवशीं अकस्मात् उत्तरेकडे पलायन केलें! या वेळीं १६९६ चा मार्गशीर्ष महिना चालला होता. शिंदेहोळकर पाठलाग करूं लागले व आपणांस लवकर येऊन मिळण्याकरितां त्यांनीं हरिपंतास निरोप पाठविला. त्याप्रमाणें हरिपंत त्यांस मिळाला व पाठलाग सुरू झाला. कारभाऱ्यांनीं आपल्याजवळील फौज हरिपंताकडे पाठविली व निजामअली व साबाजी भोंसले यांस निरोप देऊन ते पुण्यास माघारे आले. साबाजी भोंसले नागपुरास गेला. त्याचा भाऊ मुधोजी याचा पक्ष आतां अगदीं हीनबल झाला होता. तेव्हां मुधोजीनें आपण शरण येण्यास तयार आहों असें भावास कळविलें. नंतर त्या दोघांची भेट होण्याचें ठरलें. मग भेटीच्या प्रसंगीं मुधोजीनें साबाजीस गोळी घालून ठार केलें (पौष वद्य १०, शके १६९६; २६।१।१७७५). तेव्हां रघूजीस सेनासाहेबसुभ्याचें पद फिरून मिळालें व नागपूरची सत्ता मुधोजीच्या हातीं गेली. परंतु मुधोजीनें आतां राघोबाचा पक्ष अगदीं सोडून दिल्यामुळें या अधिकारक्रान्तीपासून एकंदर मराठ्यांच्या राजकारणावर विशेष परिणाम झाला नाहीं.

४. इकडे राघोबा जो पळत सुटला तो धारेस गेला. नंतर आनंदीबाई गरोदर होती म्हणून तीस तेथेंच ठेवून तो पुढें उज्जनीस गेला. तेथें गेला तोंच पाठलाग करणाऱ्या फौजा आल्या, अशी त्यास बातमी समजली. तेव्हां त्यानें गुजराथेंत धूम ठोकून एकदम बडोदे गांठलें. तेथें शिंदे, होळकर, हरिपंत येऊन पोंचतात तों राघोबा अहमदाबादेकडे चाल करूं लागला. त्याचा मुक्काम मही नदीच्या पलीकडे असतां शिंदे, होळकर व हरिपंत अलीकडील तीरीं येऊन पोंचले. तेथें राघोबावर चालून जाण्याचा हरिपंताचा

बेत होता. परंतु शिंदेहोळकरांनीं तहाचें बोलणें लाविलें. त्यामुळें त्यास आपला बेत रहित करावा लागला. तेथें सतरा दिवस बोलणें चाललें होतें. परंतु राघोबाच्या मनांत आतां सल्ला करावयाचा नव्हता. त्याचें मुंबईकर इंग्रजांशीं सूत्र लागलें होतें. तें सिद्ध होण्यास थोडा वेळ पाहिजे होता; तो सल्ल्याचें ढोंग करून त्यानें काढला. या वाटाघाटीपासून कांहींच निष्पन्न होत नाहीं, असें पाहून हरिपंत बडोद्यास आला. तेथें शिंदे-होळकरही आले व हरिपंतास म्हणूं लागले, "आमच्याविषयीं तुम्हांस संशय येऊं लागला आहे तर आतां आम्हीच राघोबाशीं युद्ध करितों. तुम्ही उगीच आमच्यामागें रहा, म्हणजे झालें." तें म्हणणें मान्य करून बाजारबुणगें बडोद्यास ठेवून सड्या स्वारीनें हरिपंत. शिंदेहोळकरांबरोबर परत आला. पण पुढें महीनदीच्या पैलतीरीं शके १६९६च्या माघ वद्य२स युद्ध झालें; त्यामध्यें शिंदेहोळकरांनीं फारशी कामगिरी बजावली नाहींच. या लढाईंत राघोबाचा पूर्ण पराजय होऊन त्याच्या फौजेची दाणादाण झाली व तो मोठ्या शिकस्तीनें जीव बचावून सुरतेस पळून गेला.

८७. इंग्रजांशीं लढाई.

हिंदुस्थान देश श्रीमंत म्हणून येथें व्यापारासाठीं पोर्तुगीज, फ्रेंच, व इंग्रज वगैरे युरोपियन लोक आले होते. पण हे लोक केवळ व्यापार करण्याच्या उद्योगांतच फार दिवस राहिले नाहींत. त्यांनीं समुद्रकिनाऱ्यालगत मुलूख मिळविला. पोर्तुगीजांनीं गोवें व उत्तर कोंकण हीं व्यापलीं होतीं. पण त्यांपैकीं उत्तर कोंकण चिमाजीआप्पानें महाप्रयासानें सोडविलें. बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीपासून फ्रेंच व पोर्तुगीज या लोकांचें प्रस्थ अगदीं नाहींसें झालें होतें. इंग्रजांचा

मात्र मद्रास व बंगाल इकडे उत्कर्ष होऊन माधवरावाच्या कारकीर्दीच्या आरंभीं त्यांनीं त्या दोन्ही प्रांतांत बराच मुलूख मिळविला होता. तेव्हांपासून मुंबईकडेही प्रांत मिळविण्याची त्यांस फार इच्छा झाली; पण इकडे मराठी राज्य खंबीर असल्यामुळें त्यांचा एकदम शिरकाव होईना. माधवरावाच्या दरबारांत गृहकलह होण्यासारखा आहे कीं नाहीं, यासंबंधी सूक्ष्म तपास ठेवण्यासाठीं मोस्टीन नांवाचा वकील त्यांनीं पुणेंदरबारीं ठेवून +दिला. पुढें नारायणरावाचा खून झाला तेव्हां राघोबा पेशवा झाला. फिरून कारभाऱ्यांनीं गंगाबाईचा पक्ष घेऊन राघोबाविरुद्ध कारस्थान रचलें. या गोष्टी पाहून इंग्रजांस साष्टी व वसई घेण्यास ही वेळ उत्तम आहे असें वाटलें, व त्यांनीं बाळाजी बाजीरावाशीं झालेल्या सख्य राखण्याच्या तहाची मुळींच फिकीर न करतां साष्टी हल्ला करून घेतली. इतक्यांत राघोबा उत्तरेकडे पळूं लागला; हरिपंत त्याचा पाठलाग करीत होता. हा मराठी राज्यांत दुही उत्पन्न करणारा राघोबा शेवटीं निरुपाय होऊन मार्गील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें इंग्रजांचा आश्रय मिळविण्याकरितां सुरतेस गेला, आणि पळपुट्या राघोबास आश्रय देण्याचें मुंबईच्या गव्हर्नरानें मोठ्या खुषीनें कबूल केलें. 'इंग्रजांनीं राघोबास पेशवाईच्या गादीवर बसविण्याकरितां तीन हजार फौजेची कुमक करावी. राघोबानें ह्या फौजेच्या खर्चाबद्दल दरमहा दीड लाख रुपये द्यावे, व ही रक्कम नियमितपणें इंग्रजांस पोंचवावी याची जामिनकी म्हणून अमोद, हसोद, बलसाड व अंकलेश्वर हे गुजराथेंतील चार महाल त्यानें तात्पुरते इंग्रजांच्या हवालीं करावे. आणखी या संकटसमयीं मदत केल्याबद्दल इंग्रजांनीं घेतलेली साष्टी त्यांजकडे ठेवून शिवाय वसई, जंबूसर, ओलपाड वगैरे प्रांत असा सव्वा एकोणीस लक्षांचा मुलूख राघोबानें इंग्रजांस कायमचा तोडून द्यावा." असा

* ग्रँट डफकृत मराठ्यांचा इतिहास, पृष्ठ ३४०.

ठराव राघोबा व इंग्रज या दोघांमध्यें शके १६९६ (६।३।१७७५)च्या फाल्गुन शु।। ५स सुरत येथें झाला. राघोबानें आपलें वचन पाळावें यासाठीं तारण म्हणून इंग्रजांनीं राघोबापासून सहा लक्ष रुपयांहून अधिक किंमतीचें जवाहीर गहाण ठेवून घेतलें. पुढे राघोबाचा पुत्र 'दुसरा बाजीराव' यास पुण्यास नेऊन गादीवर बसविल्यावर त्यास तें जवाहीर त्यांनीं इ. स. १८०३मध्यें परत दिलें.

२. मग कर्नल कीटिंग याच्याबरोबर अडीच हजार फौज राघोबाचे मदतीस निघाली. नंतर इंग्रज व राघोबा या दोघांच्या फौजा शके१६९७ च्या चैत्रांत खंबायतेजवळ एक होऊन पुण्यावर चाल करून येऊं लागल्या. राघोबाचा पाठलाग करीत गुजराथेंत शिंदे,होळकर,व हरिपंत हे तिघे सरदार आले होते. परंतु राघोबा इंग्रजांकडे गेला असे कळतांच त्याच्या पारिपत्याची सर्व जबाबदारी हरिपंतावर टाकून शिंदे व होळकर हे दोघेही बडे सरदार खुशाल उज्जनी व इंदूर येथें जाऊन स्वस्थ बसले! त्यामुळें राघोबास अडाविण्याचें काम एकट्या हरिपंतावर पडलें. हरिपंताजवळ फौज कमी नव्हती; पण रोजमुरा न मिळाल्यामुळें तिला अगदीं उपवास पडत असत. त्यांतून ती फौज फितविण्याचा राघोबा सारखा प्रयत्न करीत होता. तथापि असल्याही बेदिल फौजेनिशीं हरिपंतानें कर्नल कौटिंगच्या लष्करास बराच त्रास दिला.इंग्रजांशीं त्याच्या चार पांच झटापटी झाल्या; त्यांपैकीं एकीस 'नापारची लढाई' असें म्हणतात. या लढाईंत इंग्रजांचे चारपांचशें लोक ठार झाले व तीनचारशें जाया झाले.मराठ्यांनीं इंग्रजांकडील दोन तोफा सोडाविल्या होत्या. पण ओढण्यास बैल नसल्यामुळें त्या नेण्यास फावलें नाहीं. तेव्हां तोफांच्या कान्यांत खिळे घालून त्या जाया करून टाकल्या. तोफांचे गाडे जाळून टाकले. मराठ्यांचेंही नुकसान झालें. बरेच लोक जखमी झाले. शेवटीं पावसाळा जवळ आला, म्हणून इंग्रजांनीं भडोच येथें छावणी केली. हरिपंतानें थोडीशी फौज गुजराथेच्या

बंदोबस्तास ठेवून बाकीच्या फौजेसह खानदेशांत येऊन छावणी दिली.

३. शके १६९७च्या पावसाळ्यानंतर फिरून लढाई सुरू व्हावयाची. परंतु मध्यंतरीं नवीनच प्रकरण उद्भवल्यामुळें लढाई तूर्त तहकूब झाली. त्या वेळीं हेस्टिंग्ज म्हणून कलकत्त्याचा गव्हर्नर होता. हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या सर्व मुलुखावर त्याचाच अधिकार चालावा असा नुकताच इंग्लंडच्या पार्लमेंटाचा ठराव झाला होता. पुतण्याचा खून करून राज्य मिळवूं पाहणाऱ्या राघोबास, मुंबईचा गव्हर्नर साहाय्य करण्यास कबूल झाला, हें हेस्टिंग्जला मुळींच आवडलें नाहीं. त्यानें मुंबईकरास तात्काळ हुकूम केला कीं, " तुम्हीं आपल्या अधिकाराबाहेर वर्तन केलें; हुकूम पाहतांच लढाई बंद ठेवावी, आम्ही पेशवेसरकारच्या कारभाऱ्यांकडे वकील पाठवितों, तो तुमचा व त्यांचा तह ठरवून देईल." त्यानें सखारामबापूस कळविलें कीं,'मुंबईकरानें सुरू केलेलें युद्ध आम्हांस मुळींच मान्य नाहीं. आम्ही तुम्हांकडे बोलणें करण्याकरितां वकील पाठवितों. यासाठीं तुम्हीं तूर्त लढाई बंद ठेवावीं." कारभाऱ्यांनीं हें बोलणें तात्काळ मान्य केलें; व तुम्ही आहां तेथेंच लढाईच्या तयारीनें रहा; पण याउपरी लढाईची आगळीक आपणाकडून होऊं नये असा हरिपंतांस त्यांनीं निरोप पाठविला.

४. इकडे कलकत्त्याहून कर्नल अप्टन तह करण्यासाठीं पुरंदरास आला. तहाचें बोलणें सुरू झालें. बरीच वाटाघाट झाली, पण निकाल लागेना. याचें कारण असें कीं, अप्टन हा मुंबईकरानें लढाई अन्यायानें सुरू केली हें कबूल करी;पण तीपासून इंग्रजांस मिळालेला फायदा सोडण्यास मात्र तो मुळींच कबूल नव्हता. कारभाऱ्यांनीं बेरच आढेवेढे घेतले. पण साष्टी वगैरे मुलूख कसाही मिळालेला असो, तो सोडण्यास आम्ही तयार नाहीं, असें इंग्रज वकील साफ सांगूं लागला. तेव्हां बापू व नाना यांस मोठें कोडें पडलें. इकडे मराठी राज्यांत हैदर व कोल्हापूरकर या दोघांनीं दंगा मांडला होता. पुणेंदरबारास अतिशय

कर्ज होऊन त्याची सावकारांजवळ मुळींच पत राहिली नव्हती. तिकडे हरिपंताचें सैन्यही उपाशी मरत होतें. अशा स्थितींत तह झाला नाहीं व इंग्रज लढाईस उभे राहिले तर आपल्याला फार जड जाईल असें कारभाऱ्यांस वाटलें. म्हणून साष्टी कां जाईना पण तूर्त मुलुखांत स्वस्थता होईल व राघोबा हातीं लागल्यावर एक मोठा कांटा निघून जाईल. असें समजून बापू व नाना यांनीं शके १६९७ (२९।२।१७७६) च्या फाल्गुन शुद्ध ११स इंग्रजांशीं तह कायम केला. या पुरंदरच्या तहांत पुढीलप्रमाणें महत्त्वाचीं कलमें होतीं.'साष्टी, भडोच शहर व त्याजवळील तीन लक्षांचा मुलूख इंग्रजांस मिळावा. इंग्रजांनीं आपल्या फौजा परत न्याव्या. राघोबानें आपल्या फौजेस फांटा देऊन कोपरगांवीं येऊन रहावें व त्यास खर्चाकरितां २५००० रुपये दरमहा मिळावेत. राघोबानें किंवा पेशव्यांच्या राज्यांतील इतर कोणीं बंड केल्यास इंग्रजांनीं त्यास मदत करूं नये.' खुद्द पेशव्यांच्या घरांतील बाइलबुद्धि राघोबा राज्यलोभानें अंध होऊन इंग्रजांचा आश्रित बनला; व स्वजनांशीं द्रोह करून इंग्रजांच्या साहाय्यानें पेशवाई पटकाविण्याची दुष्ट आशा त्यानें धरली. तेव्हां राज्यास शांततेची अत्यंत जरूर आहे असें जाणून कारभाऱ्यांनीं इंग्रजांचें अन्याय्य मागणें कबूल केलें. आतां दौलतीस स्वस्थता लाभणार अशी बळकट आशा वाटूं लागली. परंतु दैवगति विचित्र आहे. ' राघोबाचें खूळ ' मराठी राज्याच्या मुळावर आलें असल्यानें त्याच्यापासून राज्याची सहज सुटका झाली नाहीं ! !

---

८८. मराठी राज्यांतील दंग्यांचा मोड.

इंग्रजांशीं चाललेली लढाई थांबली. तेव्हां कारभाऱ्यांचा हा शत्रु

नाहींसा झालेला पाहून आतां आपली टंगळमंगळ चालावयाची नाहीं, असें शिंदेहोळकरांस वाटलें, व ते शके १६९८ (सन १७७६) च्या उन्हाळ्यांत पुण्याकडे आले. नानानें आतां राज्यांतील दंगे मोडण्याचें ठरविलें. इंग्रजांशीं लढाई चालली होती ती संधी अत्यंत अनुकूल आहे असें पाहून मराठी राज्याच्या शत्रूंनीं राज्याचें चहूं बाजूंनीं लचके तोडण्यास सुरुवात केली होती. निजामअलीनें दरडावणी दाखविली तेव्हां त्याला अठरा लक्षांचा मुलूख देऊन त्याचें तोंड कारभाऱ्यांनीं मिटविलें. हैदरानें कर्नाटक बळकाविलें. कोल्हापूरकर पेशव्यांचा मुलूख गिळूं लागला. कित्तूरकर देसायानें बंड केलें, प्रतिनिधीनें दंगा केला, घाटबंधारीस कोळ्यांचाही दंगा झाला. अशीं सर्व बाजूंनीं अरिष्टें कोसळलीं व तोतयाच्या बंडानें तर सर्वांवर कळस केला! माधवरावाच्या कारकीर्दीत 'मी (पानिपतच्या लढाईंत नाहींसा झालेला) भाऊसाहेब आहें' असें सांगणारा एक तोतया निर्माण झाला होता. पुढें तो खोटा ठरला तेव्हां त्याला दौलताबादेच्या किल्ल्यांत बंदींत ठेविलें. नुकताच निजामअलीस तो किल्ला दिल्यामुळें त्या तोतयास रत्नागिरीस नेऊन ठेविलें. या वेळीं रामचंद्रनाईक परांजपे म्हणून रत्नागिरीस मामलेदार होता; त्यानें हा तोतया नसून खरा भाऊसाहेब आहे असें जाहीर केलें. मग काय विचारावें? लागलीच कोंकणांत त्या तोतयास भराभर लोक मिळूं लागले. त्यानें सर्व कोंकण काबीज करून पुण्यावर स्वारी करण्याचा उद्योग आरंभिला. त्याच्या चौक्या बोरघाटांत राजमाचीपर्यंत बसल्या होत्या. याच वेळीं नानानें महादजी शिंद्याशीं गट्टी केली; व त्यास तोतयाचा मोड करण्याची कामगिरी सांगितली. भिवराव पानसे यास अगोदर तोतयावर पाठविलें होतेंच. त्यानें दोन तीन लढाया करून तोतयास मागें सारलें होतें, इतक्यांत महादजी शिंदे तेथें गेला. मग एक मोठी लढाई झाली. तींत तोतयाचा पूर्ण पराभव झाला. तेव्हां तो इंग्रजांकडे जाऊं लागला.

इतक्यांत त्यास वाटेंत धरून रघूजी आंगऱ्यानें पुण्यास आणलें. मग पंचांमार्फत त्याची चौकशी होऊन तो खोटा ठरला. शके १६९८च्या मार्गशीर्ष शु॥८स (१८।१२।१७७६) चार घटका दिवसास त्याला मेखसूनें डोकें फोडून ठार मारलें. नंतर या तोतयाच्या बंडांत सामील झालेल्या लोकांचें नानानें मोठ्या कडक रीतीनें शासन केलें.

२. हैदरअलीनें तुंगभद्रेच्या पलीकडचा सर्व मुलूख घेतला, पण येवढेंच करून तो स्वस्थ बसला नाहीं. त्याचे सरदार भरारा तुंगभद्रेच्या अलीकडे स्वाऱ्या करूं लागले. एका सरदारानें तर धारवाडास वेढा घातला. तेव्हां परशुरामभाऊ पटवर्धन तिकडे गेला. मग त्यानें वेढा उठविला. हरिपंततात्याही थोड्याच दिवसांनीं तिकडे जाऊन पोहोंचला. निजामअलीचा सरदार जाबितजंग धौशाही फौजेसह हरिपंतास मिळाला. पण आतां पावसाळ्यास सारा दीड महिना अवकाश होता, म्हणून तो तेव्हांच परत निघून गेला.हरिपंताचे मनांत छावणी करून हैदरचें पारिपत्य केल्यावर देशीं यावयाचें होतें. पण फौजेस रोजमुरा नसल्यामुळें ती राहण्यास कबूल होईना. शेवटीं परशुरामभाऊनें कांहीं पैशाची व्यवस्था केली,व छावणीस राहण्याचें ठरलें. शके १६९९ (सन १७७७) च्या पावसाळ्यांत त्यांनीं तुंगभद्रेच्या अलीकडच्या सर्व मुलुखावर अंमल बसविला. तुंगभद्रेच्या पलीकडचें चित्रदुर्ग येवढेंच एक संस्थान मराठ्यांच्या आश्रयाखालचें राहिलें होतें. त्यास हैदरनें वेढा घातला होता. पावसाळा संपतांच हरिपंत व परशुरामभाऊ यांनीं बेत केला कीं, तुंगभद्रा उतरून शत्रूच्या मुलुखांत जाऊन पोट भरावें, म्हणजे हैदरास जरब बसेल व चित्रदुर्गकरास धीर येईल. असा विचार करून धौशास येण्याविषयीं निकडीचीं पत्रें पाठवून ते अदोनीकडे खंडण्या वसूल करीत चालले. इतक्यांत हैदर चित्रदुर्गाचा वेढा उठवून पन्नास हजार सैन्यासह मराठ्यांपुढें अर्ध्या कोसावर अचानक येऊन उभा राहिला. त्याच्या या धार्ष्ट्याचें

कारण असें होतें कीं, मराठी सैन्यांत त्यानें फितूर केला होता, व हैदर आला कीं ही फितूर झालेली मंडळी त्यास मिळणार होती. पण वेळींच बातमी लागल्यामुळें फितुरांचें शासन झालें. त्यामुळें वेळ निभावली व हरिपंत हटत हटत तुंगभद्रेपर्यंत परत आला. इतक्यांत धौशा येऊन मिळाला. मग हरिपंतानें आपलें बुणगें सुरक्षित स्थळीं ठेवून तो फिरून हैदरवर चाल करून निघाला. इतक्यांत पुण्याहून नानाचीं पत्रें आलीं कीं, "मोरोबादादा व तुकोजी होळकर एक होऊन राज्यांत मोठें खूळ माजलें आहे. तुम्हीं इकडल्या बातमींत असावें." हीं पत्रें येतांच हरिपंत व परशुरामभाऊ चिन्ताक्रान्त होऊन परत फिरले.

३. तिसरा दंगा कोल्हापूरकराचा. तो मोडण्याचें काम पहिल्यानें रामचंद्र गणेश कानडे यास सांगितलें होतें. त्यानें कोल्हापूरकराच्या सरदारांचा पराभव केला. इतक्यांत नानानें महादजी शिंद्याची समजूत घालून तिकडे त्याची रवानगी केली (शके १६९९ मार्गशीर्ष). प्रथम 'दहा लक्ष रुपयांची जहागीर व अशीरगड किल्ला मला अगोदर द्या व मग मी मोहिमेस जातों,' असें महादजी म्हणत होता. नानानें भेलसे प्रांतीं दहा लक्षांची जहागीर देण्याचें कबूल केलें व मोहिमेहून आल्यावर तुम्ही उज्जनीस जाऊं लागाल तेव्हां अशीरगडचें बोलूं, असें सांगितलें. तेव्हां महादजी शिंदे एकदांचा कोल्हापुराकडे गेला. तिकडे गेल्यावर त्यानें एकामागून एक ठाणीं सर केलीं, व शेवटीं कोल्हापुरास वेढा घातला. तेव्हां कोल्हापूरकर जेरीस येऊन तह ठरला. त्यांत कोल्हापूरकरानें पेशव्यास वीस लक्ष रुपये द्यावे; चिकोडी, मनोळी वगैरे पेशव्यांचा मुलूख सोडावा, आणि राघोबा व हैदर यांशीं संबंध ठेवूं नये अशीं मुख्य कलमें होतीं. इतकें होतें तोंच नानाचीं महादजीस पत्रें आलीं कीं, कोल्हापूरकराच्या बंदोबस्तास पुरेशी पांच सहा हजार फौज ठेवून तुम्हीं ताबडतोब पुण्यास निघून यावें.

इंग्रजांचा पराभव.

(पौष शके १७००, वडगांवचा तह, इ. स. १७७९ जानेवारी.)

कलकत्त्याचा गव्हर्नर जनरल हेस्टिंग्ज यानें मुंबईकरास टोमणा मारून पुणेंदरबाराशीं तह केला. त्यामुळें मुंबईकरास राग आला व त्यानें तहाच्या प्रत्येक कलमास हरताळ फांसण्याचा निश्चय केला. दोन्ही पक्षांनीं आपल्या फौजा परत न्याव्या असें कलम तहांत असतां इंग्रजांनीं आपली फौज सुरत व भडोच येथें लढाईच्या तयारीनें ठेविली. राघोबास आश्रय देऊं नये असें कलम तहांत होतें, तरी त्यास न जुमानतां त्यांनीं दरमहा दहा हजार रुपये खर्चासाठीं देण्याचें कबूल करून राघोबास मुंबईस ठेवून घेतलें ! पुरंदरच्या तहांत पेशव्यांच्या प्रजेपैकीं कोणीं बंड केल्यास इंग्रजांनीं त्यास कोणत्याही प्रकारें मदत करूं नये, असें एक कलम होतें. तें धाब्यावर बसवून तोतया भाऊसाहेबास मदत केल्याशिवाय इंग्रज राहिले नाहींत. अशा रीतीनें पुरंदरच्या तहांतील कलमें आपण स्वतः मोडून इंग्रज भडोचजवळचा तीन लक्ष उत्पन्नाचा मुलूख वर मागूं लागले. तेव्हां नानानें इंग्रजांस ताळ्यावर आणण्यासाठीं, सेंट ल्युबिन नांवाचा एक फ्रेंच वकील आला होता त्याचें मोठें प्रस्थ माजविलें. हा सेंट ल्युबिन 'चौल बंदर आम्हांस वखार घालण्यास द्या म्हणजे आम्ही इंग्रजांस हांकून देऊं' असें म्हणत होता. नानास इंग्रज व फ्रेंच या दोघांचाही प्रवेश महाराष्ट्रांत होणें इष्ट नव्हतें. पण आपण फ्रेंच वकिलाचा मान केल्यास इंग्रजांस भीति पडून ते तहाप्रमाणें वागूं लागतील असें नानास वाटलें. पण फ्रेंच वकिलास मान दिल्यानें इंग्रज ताळ्यावर न येतां मराठ्यांनीं तह मोडला, असा त्यांनीं मोठमोठ्यानें पुकारा केला, कलकत्तेकर व मुंबईकर हे एक झाले; आणि फ्रेंच व मराठे यांजविरुद्ध मुंबईकरास

साहाय्य करण्यासाठीं कर्नल लेस्लीच्या हाताखालीं कलकत्तेकरांची एक फौज काल्पीजवळ यमुना उतरून बुंदेलखंडांतून खुष्कीच्या मार्गानें मुंबईकडे येऊं लागली (इ. स. १७७८ मे).

२. मुंबईकरास पुणेंदरबाराशीं पुनः लढाई सुरू करण्यास आणखी एक अनुकूल गोष्ट घडून आली. सखारामबापू व नाना फडणीस या दोघांनीं बारभाईच्या कारस्थानांत पुढाकार घेतला होता. नानाचा चुलतभाऊ मोरोबादादा फडणीस यास त्यांनीं कारभारांतून अजीबात वगळलें होतें. तें मोरोबास सहन झालें नाहीं. तेव्हां तो राघोबातर्फे निरनिराळ्या कटांत सामील होई. पण त्याचेविरुद्ध दस्तऐवजी पुरावा न मिळाल्यामुळें नानास त्याचें शासन करतां येईना. शके १६९९ च्या शेवटीं शेवटीं हरिपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन, महादजी शिंदे हे कर्नाटक व कोल्हापूर इकडे गुंतले होते, व पुरंदर येथून सर्व कारभार नाना फडणीसच पहात असे. नानाचें कारभारांत वजन वाढत चाललेलें पाहून सखारामबापूच्या मनांत त्याच्याविषयीं मत्सर उत्पन्न झाला होता. अशा स्थितींत या दोघांत फूट पाडण्याचें मोरोबानें ठरविलें. तुकोजी होळकर त्या वेळीं फौजेसह पुण्यास होता. त्याला पहिल्यानें मोरोबानें आपल्याकडचें करून घेतलें. नंतर तो सखारामबापूस भेटला व त्या दोघांनीं पुढील मसलत केली. "राघोबा बडील आहे, त्यास सवाईमाधवरावाचा पालक म्हणून राज्यकारभारांत आणण्यास हरकत नाहीं. तेव्हां त्यास घेऊन येण्याविषयीं इंग्रजांस निमंत्रण करावयाचें व कारभारांतून नानाची उचलबांगडी करावयाची."

३. नानास या मोरोबाच्या कारस्थानाची माहिती होती. परंतु त्याचे तिघे साहाय्यकारी कर्नाटकांत गुंतले असल्यामुळें त्यानें सर्व कारभार मोरोबाचे हातीं दिला, व आपण बालपेशव्याच्या संरक्षणाचें काम आपल्याकडे घेऊन तो पुरंदरास राहिला. त्यानें मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें शिंदे, फडके व पटवर्धन यांस लवकर परत येण्या-

विषयीं पत्रें पाठविलीं व तोंपर्यंत मोरोबाशीं सलोख्यानें वागून दिवस काढण्याचें ठरविलें.इंग्रजांस पुण्यास येण्याविषयीं मोरोबानें निकड लाविली.उलट इंग्रज सखारामबापूकडून लेखी आमंत्रण मागूं लागले. पण बापू स्वतःस अडकावून घेणारा नव्हता. त्यानें साफ सांगितलें कीं, आपण नाहीं बुवा लिहूनबिहून देणार!! त्यामुळें इंग्रजांचें तूर्त पुण्यावर येणें राहिलें.इतक्यांत महादजी शिंदे व हरिपंत हे पुण्याजवळ येऊन पोंचले. मग तर काय? मोरोबाच्या पक्षाच्या चिंध्या उडाल्या. महादजीनें पहिल्यानें आल्याबरोबर होळकरास कटांतून फोडलें, मग मोरोबास कैद केलें (आषाढ व॥ ३, शके१७००;१२।७।१७७८) सखारामबापूही कैदेंत पडावयाचा; पण पुरंदरच्या तहावर त्याची सही झाली असल्यामुळें इंग्रजांस तह मोडण्यास निमित्त होईल, म्हणून बापूचें पारिपत्य नानानें या वेळीं केलें नाहीं. अशा रीतीनें मोरोबाच्या पक्षाचा चुराडा होऊन आतां इंग्रज किंवा राघोबा पुण्यास येणार नाहींत असें वाटूं लागलें.

४. मोरोबानें राघोबा व इंग्रज यांस पुण्यावर आणण्यासाठीं चिंतो विठ्ठल रायरीकर यास मुंबईस पाठविलें होतें (मे १७७८), तो मुंबईस होता. त्यानें व राघोबानें इंग्रजांस असें सांगितलें कीं,'मोरोबा कैद झाला, होळकर नानास मिळाला, या गोष्टी खऱ्या आहेत. पण तेवढ्यामुळें आपणांस पुण्यावर चालून जाण्यास काय हरकत आहे? आपण जवळ गेलों नाहीं तोंच मोरोबा सुटून आपल्यास येऊन मिळेल, व होळकरसुद्धां मिळाल्याशिवाय राहावयाचा नाहीं.' मुंबईकर इंग्रजांस पुण्याच्या दरबारांत राघोबाचा कसा एकदां शिरकाव होतो व मग आपल्याला घाटापर्यंतचा मुलूख केव्हां एकदांचा मिळतो, असें झालें होतें. तेव्हां त्यांनीं शके १७००चा पावसाळा संपतांच पुण्यावर चालून जाण्याकरितां कर्नल इगर्टन याच्या हाताखालीं चार हजार फौज पाठविली. या फौजेबरोबर राघोबा व त्याचा दत्तक पुत्र अमृतराव हे दोघे

असून त्यांजकडे तोफांसहित सुमारें पांच हजार मराठी फौज होती.

५. इंग्रज चालून येतो असें कळतांच नानानें भिवराव पानशे यास चार हजार पायदळ, पांच हजार स्वार, व सात तोफा देऊन इंग्रजांचा रस्ता रोंखण्यासाठीं बोरघाटाकडे पाठविलें. तिकडे भिवराव पानशे व इंग्रज यांच्या दोन चार चकमकी झाल्या. कार्ले येथील एका चकमकींत इंग्रजांचा अघाडीवरील प्रसिद्ध सरदार क्यॅप्टन स्टुअर्ट (इष्टुर फाकडा) ठार झाला. या वेळीं "गनिमी काव्यानें" लढाई करण्याचा मराठ्यांनीं निश्चय केला होता. शत्रूच्या फौजेभोंवतीं घिरट्या घालाव्या, जवळचा मुलूख जाळून लुटून ओस करावा, व शत्रूस दाणावैरण मिळूं देऊं नये, अशा धोरणानें लढाई केली कीं, इंग्रज आपल्या स्वाधीन होतील, असा मराठ्यांचा अंदाज होता. इंग्रज घाट चढून वर आले तोंच मराठ्यांकडून त्यांच्या अघाडी-पिछाडीस त्रास होऊं लागला. चिंतो विठ्ठलानें सांगितलें होतें त्याप्रमाणें मराठे सरदरांपैकीं कोणीच इंग्रजांस येऊन मिळाला नाहीं. त्यांनीं स्वारीबरोबर शिधासामुग्री आणली होती. ती आतां सरत आली होती. मुंबईहून पुरवठा व्हावा तों मराठ्यांची वीस हजार फौज कोंकणांत उतरून बोरघाटाच्या पायथ्यापासून पनवेल-पर्यंत पसरली होती, तिनें मुंबईचें दळणवळण बंद केलें. अशा संकटांत इंग्रज दाभाड्याच्या तळेगांनानजीक आले. तेथें मराठ्यांची फौज त्यांच्या दृष्टीस पडली. तिजवर महादजी शिंदे व हरिपंत फडके हे मुख्य होते. दोहींकडून तोफांची सरबत्ती होऊं लागली. मराठ्यांनीं हल्ला करण्याचा डौल दाखविला, तेव्हां इंग्रज लढाईच्या तयारीनें त्यांजवर चालून गेले. पण मराठ्यांस लढाई करावयाची नसल्यामुळें ते मागें सरून उभे राहिले. त्याच वेळीं मराठ्यांच्या कांहीं टोळ्या इंग्रजांच्या मध्यभागास व पिछाडीस त्रास देत होत्या. त्या

सर्वांस मोठ्या कष्टानें हुसकून लावून इंग्रज तळेगांवांत शिरले. लगेच मराठेही कोसा दोन कोसांच्या अंतरानें त्यांना गराडा देऊन राहिले. तळेगांवांत एकदेखील माणूस किंवा गुरूं इंग्रजांच्या दृष्टीस पडलें नाहीं, आणि वैरणीची पेंढी किंवा मूठभर धान्यही त्यांना दिसलें नाहीं. सर्व गांव जाळून भस्मसात् केला होता. पुण्यापर्यंत वाटेंतील सर्व गांवें व खुद्द पुणेंशहरही अशाच रीतीनें जाळून फस्त करण्याची नानानें तजवीज केली आहे, अशी पक्की बातमी इंग्रजांस लागली. अशा स्थितींत आपण हट्टानें पुढें गेलों तर सर्व फौज उपासानें हैराण करून मराठे आपल्याला कैद करतील असें इंग्रजांच्या ध्यानांत आलें व त्यांनीं मुंबईस परत जाण्याचा निश्चय केला.

६. नंतर शके १७०० तील पौष वद्य ९ (११।१।१७७९)च्या रात्रीं आपल्या मतें शत्रूस चाहूल न लागूं देतां इंग्रज परत जाण्यास निघाले. परंतु मराठ्यांच्या चौक्या त्यांच्या भोंवतीं होत्या; त्यांस चाहूल लागून त्यांनीं वर्दी देतांच सर्व मराठी फौज धांवली. त्या फौजेशीं लढत लढत इंग्रज उजाडतांच वडगांवास पोंचले. तेव्हां मराठ्यांनीं त्यांस फारच घाबरें केलें; त्यांचें चारपांचशें माणूस मारलें; पांच तोफा व दोन गरनाळा हस्तगत केल्या.अशी दुर्दशा झाल्यामुळें इंग्रज वडगांवांत शिरले. इतक्यांत मराठ्यांनीं येऊन त्या गांवास गराडा दिला. सबंध दिवस मराठ्यांनीं इंग्रजांवर तोफांचा भडिमार व बाणांचा वर्षाव केला, व दुसरे दिवशीं प्रातःकाळीं स्वार व पायदळ मिळून हल्ला केला. तो हल्ला इंग्रज मोठ्या शर्तीनें मागें फिरवितात तोंच दुसऱ्या हल्ल्याची तयारी झाली. तेव्हां इंग्रजांनीं आपला निभाव लागत नाहींसें पाहून नाना, बापू व शिंदे यांजकडे निरोप पाठविला कीं, "आमचा इलाज थकला,आम्ही शरण आलों.आम्हांस परत जाऊं द्यावें." मग उभयपक्षीं पुढीलप्रमाणें ठराव झाला (१३।१।१७७९). 'साष्टी, उरण व जंबूसर वगैरे गुजराथचे महाल इंग्रजांनीं घेतले आहेत

ते झाडून परत द्यावे,व श्रीमंत नानासाहेब व माधवरावसाहेब यांजपासून तहनामा चालत आला आहे त्याप्रमाणें वागावें; राघोबास हवालीं करून द्यावें; व बुंदेलखंडांतून मुंबईकडे जी बंगालची फौज चालून येत आहे तिला परत जाण्यास सांगावें." नंतर साष्टी वगैरे ठाण्यांसाठीं फार्मर व स्टुअर्ट हे दोघे इंग्रज ओलीस राहिले. लागलीच राघोबा ठरावाप्रमाणें इंग्रजांपासून निघून शिंद्याचे गोटांत येऊन राहिला. मग इंग्रजांची फौज मुंबईस परत गेली.

---

९०. इंग्रजांशीं चाललेल्या लढाईची समाप्ति.

—:o:—

(शके १७०४; साल्बाईचा तह; इ. स.१७८३.)

वडगांवचा तह झाल्यावर मराठी लष्कराचा मुक्काम एक महिनाभर तळेगांवासच होता. कारभाऱ्यांनीं राघोबापासून "माझा पेशवाईच्या पदाशीं कांहींएक संबंध नाहीं," असें लिहून घेतलें. बुंदेलखंडांत बारा लक्षांची जहागीर घेऊन त्यानें झांशीस रहावें असें ठरलें. तेथें त्याचा बंदोबस्त ठेवून त्याच्याविषयीं फिरून सरकारांत बोभाटा येऊं न देण्याविषयीं शिंद्यानें हमी घेतली. मग शिंद्यानें दोन हजार स्वारांसह हरी बाबाजी केतकर हा आपला सरदार बरोबर देऊन राघोबाची झांशीकडे रवानगी केली. आतां राघोबाची चांगली व्यवस्था लागली म्हणून नानास बरें वाटलें; पण राघोबा अजूनही मराठेशाहीस भोंवणार होता! चोळीमहेश्वरासमीप नर्मदा उतरत असतां त्यानें शिंद्याच्या फौजेवर अकस्मात् तुटून पडून तिचा नाश केला व भडोचेस पळून जाऊन तेथें इंग्रजांचा आसरा धरिला (इ.स.१७७९मे).

२. बुंदेलखंडांतून मुंबईकडे चालून येणाऱ्या फौजेवरील सरदार

कर्नल लेस्ली वाटेंत मरण पावला; तेव्हां त्याच्या जागीं कर्नल गॉडर्ड याची नेमणूक झाली. पुढें गॉडर्ड नर्मदा उतरून (२।१२।१७७८), हुशंगाबादेस मुक्काम करून राहिला. तेथें त्याला वडगांव येथें झालेल्या विपत्तीची बातमी समजली. इंग्रजांच्या मनांत जर तह पाळावयाचा असता तर गॉडर्डनें परत जावयास पाहिजे होतें. पण मुंबईकर तो तह कबूल करीना; व गॉडर्ड परत न जातां तसाच गुजराथेंत शिरला. त्यानें वडगांवचा तह कबूल न करतां पुरंदरच्या तहाच्या धोरणावर तह करण्यासाठीं नानाशीं बोलणें लाविलें. नानानें तें मुळींच ऐकिलें नाहीं. तेव्हां शके १७०१ (सन १७७९) चा पावसाळा संपतांच गॉडर्डनें गुजराथेंत लढाईस सुरुवात केली. त्यानें फत्तेसिंग गायकवाडास मराठमंडळांतून फोडून त्याची मैत्री संपादिली व थोड्याच दिवसांत डभई व अहमदाबाद हीं दोन शहरें काबीज केली. आपल्या ताब्यांतून राघोबा पळून गेला म्हणून आपण गुजराथेंत उतरून राघोबास धरून आणावें व गॉडर्डच्या फौजेचें पारिपत्य करावें म्हणजे आपल्यावर आलेला अपवाद जाईल, असा विचार करून महादजी शिंदे शके १७०१च्या शेवटीं गुजराथेंत उतरला. इंग्रजांस तहाच्या नादीं लावून हंगाम घालवावा व मग शके १७०२ (सन १७८०) च्या पावसाळ्यांत जलमार्ग बंद झाल्यावर चोहोंकडून ताण बसवावा, अशी महादजीची कल्पना होती. पण गॉडर्ड तहाचें बोलणें ऐकेना. त्याच्या मनांत शिंद्याशीं समोर सामना करावयाचा होता. शिंदे होतां होईल तो लढाई चुकवीत होता. गॉडर्डनें पुष्कळ प्रयत्न केला. पण व्यर्थ खेपा घालून त्यानें आपल्या फौजेस शिणविलें. एकदोनदां त्यानें शिंद्यावर छापा घातला; पण शिंदे सावध असल्यामुळें कांहीं नुकसान झालें नाहीं. इतक्यांत पावसाळा आला. गॉडर्डास मुंबईकरांनीं वर्सई घ्यावयासाठीं उत्तर कोंकणांत बोलाविलें; त्यामुळें गुजराथेचा कसाबसा बंदोबस्त करून तो कोंकणांत आला व शिंद्याच्या मुलुखावर गोहद-

च्या राण्याची मदत घेऊन इंग्रजांनीं स्वारी केल्यामुळें महादजीस तिकडे जावें लागलें. तिकडे इंग्रजी फौजेनें लाहार व ग्वालेर हे दोन किल्ले सर केले होते.

३. शके १७०२चा पावसाळा संपतांच कोंकणांत लढाईस सुरुवात झाली. गॉडर्डनें वसईस वेढा घातला. ही बातमी नानास कळतांच त्यानें रामचंद्र गणेश कानडे यास वेढा उठविण्यासाठीं पाठविलें. रामचंद्र गणेश आपल्यावर चालून येतो असें कळतांच गॉडर्डनें कर्नल हार्ट्ली नामक सरदारास त्याच्याशीं मुकाबला देण्यास रवाना केलें. वसईच्या पूर्वेस नऊ मैलांवर देवगड ठिकाण आहे, त्याच्या आसपास हार्ट्ली व रामचंद्र गणेश यांची गांठ पडून तीन दिवस मोठें तुमुल युद्ध झालें. व दोन्ही पक्षीं पुष्कळ नाश झाला. तिसरे दिवशीं रामचंद्र गणेश यानें आपली फौज अशा हिंमतीनें व चतुराईनें नेली कीं, त्या दिवशीं इंग्रजांचा पराभवच व्हावयाचा; पण आयत्या वेळीं शूर रामचंद्र गणेश अकस्मात् पतन पावला म्हणून मराठी फौज मागें हटली. आदल्या दिवशीं गॉडर्डानें वसई घेतली होती (मार्गशीर्ष शु. १३ शके १७१२; ११।१२।१७८०).

४. दोनदां तह झाले तरी इंग्रज लढाई तशीच पुढें चालवीत आहेत हें पाहून नानास त्यांची फारच चीड आली. त्यानें इंग्रजी सत्ता पालथी घालण्याकरितां एक प्रचंड व्यूह रचिला. शिंदे, होळकर, भोंसले, निजामअली, हैदर व फ्रेंच या सर्वांचा एकोपा करून त्यानें अशी मसलत काढली कीं, शिंदे, होळकर व भोंसले या तिघांनीं मिळून बंगालवर स्वारी करावी; निजामअली, हैदर व फ्रेंच यांनीं मद्रासवर चालून जावें; व स्वतः पेशव्यानें मुंबईकराची हड्डी नरम करावी. पण ती योजना नीट अंमलांत आली नाहीं. शिंद्याच्या मुलुखावर इंग्रजी फौज आल्यामुळें त्याला तिकडे गुंतून रहावें लागलें; भोंसल्यास सोळा लक्षांचा लांच भरून वॉरन हेस्टिंग्जनें गप्प बसविलें.

निजामअलीचा तर काय मोंगलाई कारखाना ! अजून त्याची फौज तयार व्हावयाची होती ! हैदरनें मात्र फ्रेंचांच्या मदतीनें मद्रासवर चालून जाऊन मद्रासकरास त्राहि त्राहि करून सोडलें. त्या वेळीं मद्रास-कडील फौज मराठ्यांशीं लढण्यांत गुंतली होती, त्यामुळें हैदरचें चांगलेंच फावलें. मद्रासकडून शह बसतांच इंग्रज मऊ आले. तिक-डून कलकत्तेकर मुधोजी भोंसल्यातर्फे तह करण्यासाठीं झटूं लागला. इकडे गॉडर्डनेंही नानाशीं तहाचें बोलणें लाविलें. तेव्हां नानानें सांगितलें कीं, हैदरच्या संमतीशिवाय आम्ही तह करीत नाहीं.

५. यावर गॉडर्डनें विचार केला कीं, आपण पुण्यावर चालून जावें म्हणजे घाबरून जाऊन नाना तह करण्यास तयार होईल. या बेताप्रमाणें गॉडर्ड सुमारें सात हजार फौजेसह बोरघाट चढून आला. इंग्रज घाटावर चालून येणार ही बातमी कळतांच नानानें त्यांस मागें हटविण्याकरितां मोठ्या उत्साहानें तयारी केली. कोंकणांतून गॉडर्डची रसद तोडण्याकरितां परशुरामभाऊ पटवर्धन बारा हजार फौजेसह मुंबई व बोरघाट यांच्यामध्यें तळ देऊन बसला. इकडून हरि-पंत, तुकोजी होळकर व नाना पंचवीस तीस हजार फौजेसह गॉडर्डवर चालून गेले. तेव्हां गॉडर्डची पुढें येण्याची छाती होईना, व तो घाटमाथ्यावर बातेऱ्या बांधून (मोर्चे लावून) स्वस्थ बसला. परशु-रामभाऊनें त्याची रसद बंद केली. एकदां क्यॅप्टन मॅके या नांवाचा सरदार दोन पलटणें व तोफाखाना घेऊन पनवेलीहून गॉडर्डच्या छावणीकडे धान्य वगैरे सामुग्री आणीत होता. त्याच्यावर परशुरामभा-ऊनें अकस्मात् हल्ला केला. तेव्हां लढाई होऊन तींत इंग्रजांचे शंभर लोक पडले. मग भाऊनें क्यॅप्टन मॅकेस चहूं बाजूंनीं घेरले. इतक्यांत गॉडर्डकडून त्याच्या साहाय्यास फौज आली व तिच्या मदतीनें तो कसाबसा गॉडर्डच्या छावणींत पोंचला.

६. आणखी एकदां कर्नल ब्राऊन नांवाचा इंग्रज सरदार धान्य

आणण्याकरितां पनवेलीस जात असतां भाऊनें त्यास गांठलें. इंग्रजांकडचे पुष्कळ लोक पडले व हजारों बैल मराठ्यांच्या हातीं लागले. ब्राऊन पनवेलीस गेल्यावर मुंबईकरांनीं त्याच्या मदतीस फौज पाठविली. ही बातमी कळतांच नानानें तुकोजी होळकरास भाऊच्या मदतीसाठीं घाटाखालीं पाठविलें. मग कर्नल ब्राऊन रसद घेऊन येऊं लागला; तेव्हां भाऊ व तुकोजी यांनीं तीन दिवसपर्यंत त्याला मनस्वी त्रास दिला. तथापि त्यानें शर्थीनें लढून रसद पोंचविली.

७. शेवटीं गॉडर्डनें परत जाण्याचा बेत ठरविला. मग एके दिवशीं फौज घेऊन गॉडर्ड घाटाखालीं चालला. तो घाटाखालीं उतरल्याबरोबर हरिपंताच्या फौजेनें त्याचा पाठलाग करून तोफा, राहुट्या, बंदुकीच्या दारूच्या पेट्या, व तोफांचे दोन हजार गोळे, इत्यादि सामान लुटून घेतलें. पुढें गॉडर्ड पनवेलीस जाण्यास निघाला. तेव्हां हरिपंत, होळकर व भाऊ यांनीं पुढून व मागून हल्ले करून व तोफांचा जबर मार देऊन इंग्रजांस जर्जर केलें. इंग्रजांचे पांचशें लोक मेले व जखमी झाले; त्यांचें पुष्कळ सामान मराठ्यांच्या हातीं लागलें. शेवटीं घाटाखालून निघाल्यापासून चौथ्या दिवशीं गॉडर्ड कसावसा पनवेलीस जाऊन दाखल झाला (चैत्र वद्य ३०, शके १७०३; २३।४।१७८१).

८. उत्तरेस कर्नल क्यॅमॅक यानें शिंद्याच्या मुलुखावर स्वारी केली, तो आतां सिरोंजपर्यंत चालून आला. तेथें महादजीनें इंग्रजांभोंवतीं घिरट्या घालून त्यांस दाणावैरण मिळूं दिली नाहीं. त्यामुळें इंग्रज बेजार झाले. कर्नल मूर क्यॅमॅकच्या मदतीस आला, मग त्या दोघांनीं शके १७०३ (सन १७८१) च्या पावसाळ्यांत शिंद्याच्या मुलुखांत छावणी दिली. तेव्हां शिंद्यानें स्वारांच्या लहान लहान टोळ्या इंग्रजी फौजेभोंवतीं पसरून तीस चैन पडूं दिलें नाहीं. पावसाळ्यांत कर्नल मूर व महादजी शिंदे या दोघांचा स्वतंत्र तह झाला (१३।

१०।१७८१). त्यांत शिंद्यानें मध्यस्थ होऊन इंग्रजांचा पेशव्यांशीं तह करून देण्याचें कबूल केलें; त्याच्या बदली इंग्रजांनीं शिंद्याचा जिंकलेला सर्व मुलूख सोडून दिला व दिल्लीप्रकरणीं वाटेल तसें वागण्यास त्यास मुभा दिली. नंतर इंग्रजांची फौज यमुना उतरून परत गेली.

९. शके१७०३च्या अखेरीस अॅन्डर्सन(इंद्रसेन)हा इंग्रजांचा वकील शिंद्याच्या लष्करांत आला व तहाचीं बोलणीं सुरू झालीं. नानाचें म्हणणें पडलें कीं, अगोदर राघोबास आमच्या स्वाधीन करा व मग तह करा. शिवाय हैदरअलीस वगळून आम्हांस तह करावयाचा नाहीं, असें नाना म्हणत होता. या दोन प्रकरणांसाठीं तह बरेच दिवस घोळत पडला. मग इंग्रजांनीं साष्टीशिवाय बाकीचा सर्व मुलूख परत करण्याचें ठरविलें. त्यांनीं साष्टीही परत दिली असती; पण इतक्यांत हैदर मरण पावला. त्यामुळें जास्त ओढून धरणें उपयोगीं नाहीं असें नानास वाटलें व त्यानें शके १७०४ (सन १७८३) च्या माघांत तहाच्या कागदावर सही केली. या तहास साल्बाईचा तह म्हणतात. यांत सतरा कलमें होतीं. त्यांतील मुख्य पुढीलप्रमाणें होतीं. इंग्रजांनीं लढाई सुरू झाल्यापासून घेतलेल्या मुलुखापैकीं साष्टीखेरीज सर्व मुलूख मराठ्यांस परत द्यावा; राघोबानें तह ठरल्यापासून चार महिन्यांच्या आंत पेशव्याकडे जावें, महादजी शिंदे हा तह दोहों बाजूंकडून पाळला जाईल याबद्दल हमीदार आहेत. इंग्रजांशीं स्पर्धा करणाऱ्या कोणाही टोपीवाल्याशीं पेशव्यांनीं दोस्ती करूं नये, व मराठ्यांशीं द्वेष करणाऱ्या पगडीवाल्याशीं इंग्रजांनीं दोस्ती करूं नये. हा तह घडवून आणण्यांत महादजीनें केलेल्या कामगिरीबद्दल इंग्रजांनीं भडोंचें परगणा त्यास दिला.

१०. साल्बाईचा तह झाल्यावर निरुपाय होऊन राघोबा आपली बायको आनंदीबाई व पुत्र बाजीराव व अमृतराव यांसह कोपरगांव

येथें येऊन राहिला. तेथें तहानंतर अकरा महिन्यांनीं म्हणजे शके १७०५ च्या मार्गशीर्ष व॥ ३स (११।१२।१७८३) तो मरण पावला. त्या वेळीं आनंदीबाई गरोदर होती. ती पुढें प्रसूत होऊन पुत्र झाला. त्याचें नांव चिमाजीआप्पा हें होय. साल्बाईचा तह ठरल्यावर मराठे व इंग्रज यांत पुन्हां वितुष्ट माजण्यास एक कारण उपस्थित झालें. या वेळीं पेशव्यांच्या आरमारावरील मुख्य सरदार आनंदराव धुळप हा समुद्रावरच फिरत असल्यामुळें त्याला तह ठरल्याचें माहीत नव्हतें; त्यामुळें मलबारकडे जाणाऱ्या इंग्रजांच्या रिव्हेंज नांवाच्या जहाजावर जोराचा हल्ला करून त्यानें तें विजयदुर्ग येथें नेलें. ही बातमी ऐकून मुंबईकरास संताप आला. पण नानानें त्यांची वेळींच समजूत घातल्यामुळें साल्बाईच्या तहांतील सर्व कलमें सुरळीतपणें अंमलांत आलीं.

---

९१. भाग्यवान् सवाईमाधवराव पेशवे.

सवाईमाधवराव शके १६९६ (सन १७७४) अधिक वैशाख शुद्ध ७ स जन्मल्याचें वृत्त मागें सांगितलेंच आहे. त्याच्या जन्माच्या पूर्वी गंगाबाईस पुत्र व्हावा म्हणून सर्व प्रजा अगदीं आतुर झाली होती! गंगाबाईस पुत्र होणें प्रजेस जितकें सुखावह होतें तितकेंच तें आनंदी व राघोबा या दुकलीस दुःखावह होतें. तेव्हां अर्थातच गंगाबाईचा गर्भपात करण्याविषयीं आनंदीबाईनें अतिशय खटपट केली. पण कारभाऱ्यांनीं अतिशय खबरदारी ठेवून गंगाबाईस पुरंदरास व्यवस्थेनें ठेविलें होतें; त्यांच्या प्रयत्नास सुदैवानें यश येऊन गंगाबाई सुरक्षितपणें प्रसूत झाली. माधवरावाचें बालपणही आनंदीनें त्याचा घात करण्याचा प्रयत्न केल्याशिवाय जाऊं दिलें नाहीं. पण

तेव्हांही ईश्वरानें खैर केल्यामुळें तिचें कांहीं चाललें नाहीं. इंग्रजांनीं वडगांवचा तह झाल्यावर शके १७०१ च्या वैशाख शु.५स(२१।४।१७-७९) नानानें बालपेशव्यास पुण्यास आणून त्याची मुंज मोठ्या थाटानें पर्वतीस केली. जन्मापासून या वेळपर्यंत बाल माधवराव पुरंदरासच होता. आतां राघोबा आपल्या हातीं आला आहे, व इंग्रजांचेंही योग्य पारिपत्य झालें आहे, तेव्हां राज्यास कांहीं फारसें भय उरलें नाहीं, असें पाहून नानानें यापुढें पेशव्यास पुण्यासच ठेविलें. शके १७०४ मध्यें माधवरावाचें लग्न झालें, त्यावेळीं सातारचा शाहू, हैद्राबादच्या निजामअलीचा मुलगा व इतर मराठे सरदार जमले होते. समारंभ मोठ्या थाटाचा झाला. सर्व मराठे लोक एकत्र जमले, व मराठे लोकांत अजूनही एकी आहे हें सर्व हिंदुस्थानभर जाहीर झालें.

२. माधवराव पुण्यांत शनिवारवाड्यांत राहूं लागल्यापासून त्याच्या थोर पदास उचित असें शिक्षण त्याला देण्याविषयीं नानानें तजवीज केली. तिरंदाजी व दांडपट्टा ह्यांचा अभ्यास माधवरावानें केला. सायंकाळीं तालीमखान्यांत जाऊन तेथें तो व्यायाम करीत असे. मुद्गल पेलणें शिकून तो लेजीमही खेळे. जोडी फिरविणें व बोथाट्या खेळणें यांचाही त्यानें उत्कृष्ट अभ्यास केला. तसेंच हत्तींच्या किलाब्यांत बसून हत्ती चालविणेंही तो शिकला. त्याचप्रमाणें त्याच्या बौद्धिक शिक्षणाचीही सोय झाली होती. त्याला बोधपर व मनोरंजक गोष्टी वाचावयास सांपडाव्या व मोडी वाचावयाचाही सराव व्हावा म्हणून नानानें बापूजी गोविंद गोखले नांवाच्या विद्वान् गृहस्थाकडून भारत व भागवत यांच्या सारांशरूपानें मराठी बखरी लिहविल्या व सारिका-शतक नांवाचा चमत्कारिक गोष्टींचा ग्रंथ रचविला. पेशवा मोठा होऊं लागला तेव्हां सायंकाळीं चार घटका दरबारांत येऊन त्यानें बसावें असा नानानें प्रघात पाडला. हळूहळू दरबारांत परकीय राज्यां-तील वकील आला असतां त्याला उत्तरें देणें वगैरे कामें नाना पेश-

व्याकडूनच करवून घेऊं लागला. कोणतेंही काम पेशव्यास नीट समजावें यासाठीं नानाची सारखी खटपट असे. अशा रीतीनें प्रयत्न चालल्यावर माधवराव मूळचाच चलाख बुद्धीचा असल्यामुळें थोड्याच काळांत राज्यकारभाराच्या निरनिराळ्या बाबी त्यास कळूं लागल्या.

३. एकदां सवाईमाधवरावानें आपली आजी गोपिकाबाई हीस "मी अज्ञान बालक, नित्यव्यवहार कसा करावा हें आपण मला लिहून धाडावें," म्हणून पत्र लिहिलें होतें. गोपिकाबाई नाशिकजवळ गंगापुरास रहात असे. तिनें माधवरावास एक पत्र धाडिलें. त्यांत त्यांस उत्तम बोध केला. त्या पत्रापैकीं महत्त्वाचा भाग पुढें दिला आहे:—

"प्रातःकाळचे घटका रात्रौ उठोन दिशेस जाऊन पादप्रक्षालन मुखप्रक्षालन करून दिवाणखान्यांतील मृत्तिकागणपतीचें दर्शन घेऊन प्रातःस्मरणाचे श्लोक म्हणावे. वैद्याकडून प्रकृतीअन्वयें औषध घेतल्यावर लिहायास बसावें. मग तालीमखान्यांत जाऊन दंड काढावे. दिवसेंदिवस शक्तीअन्वयें चढते दंड असावे. स्नान झाल्यावर संध्या थोडकी पण न बोलतां करावी. कचेरींत यावें ते समयीं सर्वांस दर्शन देऊन योग्यतेनुरूप नेत्रलाभ वं भाषण होत असावें. कचेरींत लघु शब्द बोलूं नये. मनुष्यपरीक्षा असावी. गैरवाका एखाद्यानें समजाविल्यास पक्केपणीं विचार करून अपराधी ठरल्यास दुसऱ्याकडून त्यास निषिद्ध करवावें. आपण नेत्रकटाक्ष करून पहावें. अपराधानुरूप पारिपत्य व्हावें. परंतु संभावित गृहस्थ, बहुत दिवस पदरींचा अज्ञानें रदबदली केल्यास क्षमा करावी. दुसऱ्याचें क्षुद्र काढूं नये. येणेंकरून त्याचा अपमान होतो व तो त्याच्या मनांत देश रहातो. साधल्यानुरूप नाश करील आणि आपल्यास लघुपणा येईल. सन्निधानीं लोभांत लघु मनुष्य राखिल्यास जें केलें त्यास ते रुकार देतात; पण जनलोक वाईट म्हणतात, थोरपणास हानि होते. भोजनाचे पूर्वी सोवळें झाल्यावर थोरल्या देवघरांत जाऊन फुलें घालून नमस्कार करून ब्राह्मणास उदक सोडून भोजनास बसावें. ते समयीं भाषण करणें तें राजसूययज्ञांतील ब्राह्मणभोजन—प्रकरणीं वगैरे योग्य सर्वांस दिसेल तें बोलावें. भोजन झाल्यावर राजविलास खेळ खेळावे. नंतर शास्त्री यांज-

चळ विराटपर्वापासून भारताची चिंतनिका करावी. व वृद्ध मनुष्यें पदरचीं बहुत दिवशीं व अन्यत्र शहाणे असतील त्यांशीं दिल्लीप्रकरणीं व महाराजप्रकरणीं गोष्टी कशा झाल्या त्या ऐकण्यांत असाव्या. आपले वडिलांच्या गोष्टी कारभारी यांस एकांतस्थली विचारीत असावें, तसबिरा व नकाशे अनेक पहात असावें, ते समयीं शहाणे बुद्धिमान् असतील ते जवळ असावे. घोडीं फिरावयास चार रोजांनीं जावें; ते समयीं बरोबर पटवर्धन मंडळी व अन्यत्र सरदार असावे. त्यांशीं भाषण करणें तें संतोषवृत्तीनें करावें. परंतु अत्यंत लोभही नसावा व विरुद्धही न दाखवावें. कांहीं अंतर झाल्यास क्षमा होणार नाहीं, असें भय असावें. दिवाण यांनीं राजकारणाचें वर्तमान व पुढील योजना करावयाचा विचार करून विनंती करीत असावी, या समयीं अन्यत्र कोणीं असूं नये. व त्यांतील अभिप्राय दुसऱ्याशीं निघूं नये. म्हणजे मसलत असाध्य होत नाहीं. बातमी हरतऱ्हेची राखावी. म्हणजे मसलतीस बल बहुत आहे. पदरच्या मनुष्यांचें चालवावयाचें त्यास जिकीर करूं नये. तिरंदाजी करावयास जावें. तेथें बरोबर सरदार, पागे व मानकरी असल्यास तीर कोण कसे मारतात हें ध्यानांत असावें, व हरएक खेळ पाहावयाचे ते समवेत पहावे, दीपदर्शन झाल्यानंतर संध्येस वस्त्रान्तर करून बसावें. रात्रीच्या भोजनानंतर कार्याकारण मंडळी जवळ असावी. ते समयीं बातमीदारांनीं गुप्त वर्तमान सांगत असावें. हरएक बातमीचीं पत्रें पहावयाजोगीं असतील तीं पहावीं. बाकीचीं पत्रें विश्वासूक माणूस कोण असेल त्याजकडे काम योजावें. त्यांनीं सांगावें व त्यावर ही बातमी प्रमाण कीं अप्रमाण सांगतात याची चौकशी असावी. नंतर निद्रेस×जावें. "

---

१२. टिपूशीं लढाई.

मराठ्यांची इंग्रजांशीं लढाई सुरू झाल्यापासून म्हैसूरकर हैदर-अलीस दक्षिणेकडे दंगा करण्यास चांगलीच फुरसत सांपडली होती.

×काव्येतिहाससंग्रह, पत्रें यादी वगैरे, पत्रांक ४५२.

त्यानें तुंगभद्रा नदीपर्यंत आपल्या राज्याची सीमा फारच थोड्या दिवसांत वाढविली व स्वाऱ्या करीत करीत उत्तरेकडे येऊन त्यानें कृष्णेपर्यंत बहुतेक मुलूख व्यापिला. मराठ्यांस रिकामपण नसल्यामुळें त्याच्याकडे दुर्लक्ष करणें लांस भाग पडलें. साल्बाईचा तह होत असतांच हैदर वारल्याचें मागें आलेंच आहे. त्याच्या पश्चात् त्याच्या गादीवर त्याचा महत्त्वाकांक्षी व गर्विष्ठ मुलगा टिपू हा बसला.

२. राघोबानें मराठ्यांवर आणलेल्या घोर संकटांतून पुणेंदरबार एकदांचें सुटलें; पण त्याचा पहिला तकवा आतां राहिला नाहीं. टिपूवर स्वारी करण्याचें एकट्या पेशव्यांत सामर्थ्य राहिलें नाहीं. म्हणून नानानें निजामअलीची शके १७०६ च्या ज्येष्ठांत (जून १७८४) कृष्णा व भीमा यांच्या संगमाजवळ यादगीर गांव आहे तेथें भेट घेतली. तेथें दोघांनीं मिळून टिपूवर चालून जावयाचें असें ठरलें.

३. टिपू सुलतान फारच उन्मत्त झाला होता. तो पेशवे व निजाम या दोघांसही कस्पटाप्रमाणें मानीत असे. यादगीरच्या भेटीचें वर्तमान कळतांच त्यानें निजामअलीस सांगून पाठविलें कीं, "तुम्ही आमचे मांडलिक आहां, याकरितां आमच्या राज्यांतील वजनें व मापें तुम्हीं आपल्या राज्यांत चालू केलीं पाहिजेत." या अपमानानें निजामअली टिपूवर अगदीं चिडून गेला व त्यानें मराठ्यांपाशीं मदत मागितली.पण त्या वेळीं ती देतां आली नाहीं.व टिपूच्या पारिपत्याचें काम तसेंच राहिलें.

४. नरगुंदकर भावे यांचें संस्थान पूर्वी पेशव्यांच्या ताब्यांत होतें. पण तें कृष्णेपलीकडच्या मुलुखांत असल्यामुळें हैदरच्या ताब्यांत गेलें. पेशवे जितकी खंडणी घेत, तितकीच खंडणी हैदरास देण्याचें नरगुंदकर भाव्यांनीं कबूल केलें,त्यावरून हैदरनें नरगुंद भाव्यांकडेच ठेविलें.आतां टिपूच्या मनांत तें संस्थान बुडवावयाचें होतें, म्हणून तो जबर खंडणी मागूं लागला. यावर नरगुंदकरानें नानास आपल्याविषयींची टिपूपाशीं रदबदली करण्याची विनंती केली. नानानें टिपूस निरोप

पाठविला कीं, एका सरकारच्या ताब्यांतून दुसऱ्या सारकारच्या ताब्यांत एखादें संस्थान गेलें एवढ्या सबबीवर त्याची खंडणी वाढविणें बरोबर नाहीं. टिपूनें उत्तर पाठविलें कीं, मी आपल्या प्रजेस वाटेल तसें वागवीन; या कामीं तुह्मांस मध्यस्थी करण्याचें कारण नाहीं. इतकें झाल्यावर नरगुंदचा किल्ला बलात्कारानें घेण्याकरितां त्यानें फौज पाठविली. नानानें परशुरामभाऊ व गणेशपंत बेहरे यांस नरगुंदच्या रक्षणार्थ पाठवून दिलें. लढाईचा प्रारंभ शत्रूकडून झाल्याशिवाय तुम्हीं हल्ला उपसूं नये, अशी या फौजेस नानानें ताकीद केली होती. भाऊ व बेहरे नरगुंदजवळ जातात तों टिपूच्या फौजेंतील लोकांनीं त्यांस चीड येण्यासारखा निरोप पाठविला. त्यायोगानें भाऊ व बेहरे यांनीं रागावून टिपूच्या फौजेवर हल्ला केला व तिची दाणादाण केली. इतक्यांत टिपूच्या फौजेच्या पाठीमागें गारद्यांचीं पलटणें होतीं तीं सरकून पुढें आलीं; तेव्हां भाऊ व बेहरे मागें सरले. कांहीं तयारी नसतां सरदारांनीं लढाईस प्रारंभ केल्याचें ऐकून नाना पंचाइतींत पडला. शेवटीं त्यानें लढाई चालू ठेवणेंच इष्ट असें जाणून तुकोजी होळकरास तिकडे पाठविलें. त्यावरून टिपूस जरब बसून त्यानें तहाचें बोलणें लाविलें. त्यांत सत्तावीस दिवसांत दोन वर्षांची खंडणी देतों, व नरगुंदकरास मी पीडा देणार नाहीं, असें त्यानें कबूल केलें. नानानेंही निजामअलीच्या आग्रहामुळें टिपूचें बोलणें मान्य करून तह केला.

५. टिपूच्या मनांत नुसती हूल दाखवावयाची होती. ठरविलेल्या मुदतीस त्यानें खंडणी दिली नाहींच; पण मराठी फौज परत गेल्यावर नरगुंदकरास विश्वास दाखवून त्याचा किल्ला काबीज केला (इ.स. १७८५ जुलै); व त्यास सर्व कुटुंबासुद्धां कैदेत ठेवून हालहाल करून ठार मारिलें. टिपूनें कृष्णेपलीकडील प्रांतांतील पुष्कळ हिंदु लोकांच्या सुंता केल्या. तेव्हां या अपमानापेक्षां मरण बरें असें वाटून दोन हजार ब्राह्मणांनीं आत्महत्या केली ! या बातम्या ऐकून नानास राग आला

व त्यानें टिपूची पुरती खोड मोडण्याची तयारी चालविली.

६. शके १७०७ (सन १७८५) चा पावसाळा फार लांबल्यामुळें पौष मासास प्रारंभ झाल्यावर हरिपंत, तुकोजी होळकर, गणेशपंत बेहेरे हे सरदार जंगी फौज घेऊन पुण्याहून निघाले! नाना पंढरपुरास फौजेंत येऊन दाखल झाला. तेथून ही फौज यादगीर येथें गेल्यावर मुधोजी भोंसले व निजामअलीही येऊन मिळाले. मग सर्वानुमतें असा निश्चय झाला कीं, टिपूचें राज्य जिंकून त्याचे सहा भाग करावयाचे. त्यांपैकीं दोन भाग पेशव्यास,दोन निजामास. आणि एकएक शिंदे व होळकर यांस मिळावे. प्रथम कृष्णा व तुंगभद्रा यांमधील मुलूख सोडविण्याचें ठरलें. इतकें झाल्यावर २५००० फौज तहवारजंग याचे हाताखालीं देऊन निजामानें त्यास मोहिमेवर पाठविलें; व तो स्वतः परत भागानगरास (हैद्राबाद) गेला.

७. कित्तुराकडे एक हैदरचा सरदार होता, त्याची रग जिरवण्याकरितां तुकोजी व गणेशपंत यांची रवानगी कित्तुरकडे झाली व बाकीची सारी फौज बादामीवर चालून गेली.तिनें शके १७०८च्या अक्षय्यतृतीयेच्या दिवशीं (१।५।१७८६)बादामीस वेढा दिला. किल्लेकऱ्यांनीं मोठ्या शौर्यानें तीन आठवडेपर्यंत किल्ला लढविला. बादामी सर झाल्यावर नाना व भोंसले परत गेले. हरिपंत गजेंद्रगड घेण्यास जात होता. इतक्यांत टिपू अदोनीस आल्याची बातमी त्यास लागली.तेथें निजामअलीचे पुतणे होते. त्यांच्या मदतीस हरिपंतानें निजामाची सर्व फौज व आपल्या फौजेपैकीं वीस हजार लोक पाठविले. त्यांनीं वेढा उठविला. होळकरानें कित्तूरच्या आसपासच्या टिपूच्या लोकांस पिटाळून लाविलें, व सावनूरच्या नबाबाशीं मैत्री करून टिपूचा सरदार बुऱ्हाणउद्दीन याचा पराभव केला.हरिपंतानें गजेंद्रगड व बहादुरभेंडा ही दोन स्थळें काबीज केलीं, व तो कोपळ सर करणार इतक्यांत टिपू आपल्या सर्व फौजेसह तुंगभद्रा उतरून अलीकडे आला. हरिपंत पुढें चालून

गेला; पण टिपू अडचणीच्या जागेंत असल्यामुळें हरिपंतास त्याजवर हल्ला करतां येईना. टिपूनें मराठे व निजाम यांजवर दोन तीनदां छापा घालण्याचा प्रयत्न केला; पण तो साधला नाहीं. हरिपंताच्या लष्करांत दाणावैरणीची अडचण पडूं लागली, म्हणून तो सावनूर-जवळ जाऊन तळ देऊन राहिला. तेथेंही टिपूनें एक छापा घातला. पण हरिपंताच्या सावधगिरीमुळें व हिमतीमुळे त्याचा लाग साधला नाहीं. हरिपंतानें तोफा लावून शिरहट्टी घेतली. पण टिपू डोंगरी मुलुखाचा आसरा करून राहिला, व मराठ्यांपुढें मैदानांत येईना. पण इतक्यांत इंग्रजांची लढाईची तयारी चाललेली पाहून टिपू घाबरला व त्यानें एकदम तहाचें बोलणें लाविलें. तह ठरला; त्यांत टिपूनें मागील खंडणीबद्दल ४५ लक्ष रुपये देण्याचें कबूल करून त्यांपैकीं तीस लाख रोख दिले व बाकीचे एक वर्षानें देण्याचा करार केला. त्यानें अदोनी शहर निजामास परत दिलें व मराठ्यांस कित्तूर, बादामी व नरगुंद हे प्रांत दिले. हा तह शके १७०९ (एप्रिल १७९७)च्या चैत्र महिन्यांत झाला.

---

९३. दिल्लीच्या बादशाहीचीं सूत्रें मराठ्यांच्या हातीं आलीं.

इ. स. १७७१ च्या डिसेंबरांत मराठ्यांनीं शहाआलम बादशहास दिल्लीस नेऊन त्याच्या पूर्वजांच्या गादीवर बसविलें. नंतर दोन वर्षांनींच मराठी फौज दक्षिणेकडे गेली व तिकडे नारायणराव पेशव्याचा खून होऊन राघोबाचें खूळ मराठी राज्यांत उभें राहिलें.त्यांतून इंग्रजांशीं लढाई निघून ती चालविण्यांत कित्येक वर्षेपर्यंत सर्व मराठ-

मंडळाचे श्रम खर्ची पडले. शेवटीं सन १७८२सालीं इंग्रजांशीं तह झाला व युद्ध थांबलें. तेव्हां साहजिकपणेंच मध्यंतरीं आठ दहा वर्षेंपर्यंत मराठ्यांस दिल्लीदरबारकडे लक्ष पुरविण्यास फुरसत सांपडली नाहीं. इ. स. १७७३त मराठी सैन्य दक्षिणेकडे गेलें असें पाहून दिल्लीच्या बादशहाचा पिढीजाद वजीर अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला यानें मराठ्यांना चमेलीपार घालवून देऊन त्यांचें दिल्ली-दरबारांतील वजन पार नाहींसें करण्याचा बेत केला. लागलीच त्यानें इटाव्याच्या ठाण्यांतून मराठ्यांची हकालपट्टी केली. त्याचा एक हस्तक मिर्झा नजफखान यानें आग्र्यास वेढा घातला. लवकरच सुजा त्याच्या मदतीस गेला; मग त्या दोघांनीं मिळून तो किल्ला सर केला. नंतर सुजानें मिर्झा नजफखान यास बादशहा शहाआलम याजपाशीं आपला मुखत्यार नेमिलें. हा नजफखान मोठा शूर व कारस्थानी होता. त्यानें बादशहाचा कारभार बरींच वर्षें मोठ्या व्यवस्थित रीतीनें चालविला. त्या वेळीं दिल्लीच्या बादशहाच्या खास अंमलाखालीं दिल्ली व आग्रा यांच्या आसपासचा मुलूख तेवढा राहिला होता. त्या मुलु-खास दक्षिणेकडून जाटांचा व उत्तरेकडून शिखांचा एकसारखा शह असे.अशा बिकट परिस्थितींत नजफखानानें बादशाही बंदोबस्त राखिला व मुलुखांत कांहींशी स्वस्थता केली. पुढें कांहीं वर्षांनीं नजफखान मृत्यु पावला (४।४।१७८९). त्यानें मुसलमानी सत्ता दिल्लीस पुनः चालू केली होती व बादशहाचें वजन स्थिर केलें होतें. नजफखान म्हणजे परदेशांतून हिंदुस्थानांत उतरलेल्या पुरुषांतून निघालेल्या कर्तबगार मुत्सद्यांपैकीं अखेरचा होय. त्याच्या मृत्यूनंतर दिल्लीस कोणीच बाद-शाहीचा सांभाळ करण्याइतका समर्थ व शूर पुरुष मुसलमानांत निघाला नाहीं व लवकरच राज्यांत तंटे माजून गोंधळ उडून गेला.

२. साल्बाईचा तह झाल्यावर महादजी शिंद्यानें लढाईच्या वेळीं

आपल्याविरुद्ध गेलेल्या लोकांस कडक शासन करण्याचा बेत केला. शिंद्यास दगा दिलेल्या लोकांत पहिला नंबर गोहदकर जाटाचा होता. त्यानें इंग्रजांस मिळून ग्वालेरचा किल्ला मिळविला होता. तेव्हां महादजीनें प्रथम ग्वालेरीस वेढा घातला व लवकरच तो किल्ला सर केला (२१।७।१७८३). पुढें त्यानें खुद्द गोहदला वेढा घातला व तो किल्ला सर करून (२४।२।१७८४) राण्यास ग्वालेरींत कैदेंत ठेविलें. खेचीवाड्यांतील राघोगडचा संस्थानिक बलवंतसिंग हाही इंग्रजांस मिळाला होता व अलीकडे नजराणा देण्याचें नाकारून त्यानें शिंद्याशीं भांडण केलें होतें. तेव्हां त्याच्यावरही शिंद्यानें रामजी पाटील जाधव व खंडूजी इंगळे यांच्या हाताखालीं सैन्य रवाना केलें. तसेंच बुंदेलखंडांत बंडाळी माजली होती, ती काढून तेथें शांतता प्रस्थापित करण्यासाठीं त्यानें खंडेराव हरि भालेराव ऊर्फ खंडेरावआप्पा याच्या हाताखालीं फौज देऊन त्याची तिकडे रवानगी केली. याच सुमारास आपल्या सैन्यांत कवायती फौजेचा अन्तर्भाव करून महादजीनें आपलें लष्करी सामर्थ्य वाढविलें. इंग्रजांशीं झालेल्या लढाईच्या वेळीं वडगांवास आणि गुजराथेत कवाईत व सुधारलेलीं हत्यारें यांची मातबरी त्यानें पाहिली होती. तेव्हां डी बॉईन हा फ्रेंच सैनिक नोकरी पाहण्याकरितां ग्वालेरीस आला होता, त्यास शिंद्यानें आपल्या नोकरीस ठेविलें.महादजीनें त्याला दोन पायदळ पलटणी(Battalion) तयार करण्यास सांगितलें. दर पलटणींत साडेआठशें लोकांची भरती होती. दर शिपायामागें डी बॉईनला आठ रुपये द्यावयाचे व खाशाला दरमहा एकहजार रुपये पगार द्यावयाचा, या दोन गोष्टी शिंद्यानें मान्य केल्या. सँगस्टर नांवाचा एक स्कॉच इसम डी बॉईनचा स्नेही होता. त्यानें पुढें शिंद्याची नोकरी पत्करून आग्रा किल्ल्यांत तोफा व बंदुका ओतण्याचा आणि दारूगोळा तयार करण्याचा कारखाना काढिला. अशा रीतीनें शिंद्याची कवाईत शिकलेली फौज

तयार झाली. व तो लष्करी दृष्ट्या जबरदस्त सरदार बनला. प्रथम महादजीनें डी बॉईनला खंडेरावआप्पाच्या मदतीस बुंदेलखंडांत पाठविलें,तिकडे कलिंजरच्या वेढ्यांत त्याने उत्कृष्ट कामगिरी बजाविली व लवकरच त्या दोघांनीं त्या प्रांतांतील अंदाधुंदी नाहींशी केली.

३. औरंगजेबानंतरचे मोंगल बादशहा नामधारी असत. तथापि मोंगल बादशाहीच्या नांवाचा सर्व हिंदुस्थानच्या लोकांच्या मनावर एक प्रकारचा विलक्षण पगडा होता. तेव्हां सर्व हिंदुस्थानावर सत्ता गाजविण्याची जे सत्ताधारी महत्त्वाकांक्षा धरीत त्यांची मोंगल बादशहास आपण आपल्या हातीं आणावा ह्मणजे आपलें ध्येय साध्य होईल अशी समजूत असे. साम्राज्यसत्ता मिळविण्याची मराठ्यांची खटपट असल्यामुळें तेही बादशहास आपल्या हातीं आणण्यासाठीं अत्यंत झटत. इ.स. १७७१त त्यांनीं याच हेतूनें बादशहास दिल्लीस आणिलें. नजफखान वारल्यावर दिल्लीस गोंधळ माजला. याच वेळीं इंग्रजांशीं लढाई संपून मराठे रिकामे झाले. साल्बाईचा तह घडवून आणण्यांत मध्यस्थी केल्यामुळें कलकत्त्यास व पुण्यास असें दोन्ही ठिकाणीं महादजीचें वजन खूप वाढलें होतें. गव्हर्नर जनरल हेस्टिंग्ज लढाईंत झालेल्या खर्चाच्या पायीं अगदीं टेकीस आला होता. अर्थातच मराठ्यांशीं तह झाला तेव्हां त्याला हायसें वाटलें यांत नवल नाहीं. इंग्रजांना हिंदुस्थानांत साम्राज्यसत्ता स्थापावयाची नव्हती असें नाहीं. परंतु मराठ्यांनीं अनेक वेळां दिल्लीस कारभार केला होता व या वेळीं महादजी शिंदे जवळच ग्वालेरीस असून दिल्लीची व्यवस्था आपल्या अंगावर घेण्याची त्याची तयारी होती. उलट इंग्रजांना दिल्ली हा लांबचा पल्ला होता, त्यांचा खर्चाची ओढाताण होती, व त्यांची अजून टिपूशीं लढाई चालू होती. शिवाय साल्बाईचा तह मराठ्यांकडून आगळीक झाल्याशिवाय आपण मोडणें हेस्टिंग्जला वरें वाटलें नाहीं. म्हणून त्यानें दिल्लीदरबारीं कोणत्याही प्रकारची ढवळाढवळ न करण्याचें धोरण

स्वीकारलें. शहाजादा जवानबख्त इंग्रजांची मदत मागण्यासाठीं गेला होता; त्याची हेस्टिंग्जनें लखनौस गांठ घेतली व त्याचा मोठा सन्मान केला (एप्रिल सन १७८४). परंतु दिल्लीचा बंदोबस्त करून देण्याचें काम अंगावर घेण्याचें त्यानें साफ नाकारिलें व त्या बाबतींत शिंद्याची मदत मागण्याविषयीं शहाजाद्यास त्यानें सुचविलें. अर्थातच यापुढें दिल्लीच्या बादशहाच्या बंदोबस्ताचें काम महादजीकडे आलें व तें त्यानें मोठ्या उत्साहानें करण्याचें ठरविलें. याच सुमारास पुण्याहून नाना फडणिसानें आपल्या दिल्ली येथील वकिलास पाटीलबाबांनी दिल्लीची मसलत अवश्य केली पाहिजे असें कळविलें. नाना लिहितो. " नजफखान वारल्याचें लिहिलें तें कळलें. त्यास येथें वर्तमान येतांच राजश्री पाटीलबाबांस व तुम्हांस पेशजी लिहून पाठविलें कीं, खान वारले, तेव्हां इंग्रज बादशहाकडे अनुसंधान लावून, लोभ भारी दाखवून बादशहास हाताखालीं घालून; आगरे वगैरे जागा दाबावयास चुकणार नाहींत. त्यास पाटीलबावा ग्वालेरीजवळ आहेत, तेथून दिल्लीचा पल्ला जवळ आहे. तेथपर्यंत जाऊन बादशहाचें अनुसंधान दुसरीकडे न लागतां आपले हाताखालीं घातल्यास मोठीच गोष्ट आहे, व समय हाच आहे, म्हणून विस्तारेंकरून पत्र पाटीलबाबांना पाठविलें आहे. बादशहास ममतेंत घेऊन बंदोबस्त आपले लगामीं लावून घेतल्यानें मोठीच गोष्ट आहे. दूरदेशीनें पाहिल्यास ध्यानांत येईल. जरूर करावेंच करावें. पैकाही तिकडे मिळेल सर्वही केल्यास घडावयाजोगें आहे. ÷"

४. नजफखान वारल्यावर त्याची जागा आपल्याला मिळावी म्हणून दिल्लीस दोघां पुरुषांची खटपट सुरू झाली; एक त्याचा भाचा मिर्झा शफी व दुसरा त्याचा दत्तक पुत्र अफ्रासियाबखान. परंतु

÷ काव्येतिहाससंग्रह, पत्रें यादी वगैरे, पत्रांक २९३, (२०।५।१७८२).

ते दोघेही फारसे कर्तबगार नव्हते. लवकरच त्यांचीं भांडणें विकोपास गेलीं. महंमदबेग हमदानी हा नजफखानाचा एक हस्तक असून आग्रा प्रांताचा बंदोबस्त त्याजकडे होता. मिर्झा शफीशीं त्याचें वाकडें होतें. एकदां त दोघे हत्तीवर अंबारींत बसून चालले असतां महंमदबेगानें शफीच्या अंबारींत उडी टाकिली व त्याचा खून केला (२३।९।१७८३). या खुनानंतर अफ्रासियाबखान बादशहाचा कारभार निर्बंधपणें पाहूं लागला. पण आतां एक नवीन अडचण उत्पन्न झाली. महंमदबेग अफ्रासियाबखानाचे हुकूम मानीना व आग्र्यास स्वतंत्रपणें वावरूं लागला. तेव्हां अफ्रासियाबखानास त्याचें पारिपत्य करणें जरूर झालें. या समयीं त्यानें महादजी शिंद्यास मोठ्या काकुळतीला येऊन बादशाहीचा बंदोबस्त करून देण्याविषयीं आग्रह चालविला.मग त्या दोघांची आग्र्यास मोठ्या समारंभानें भेट झाली(२२।१०।१७८४). आग्र्याच्या किल्ल्यांत महंमदबेग होता. तेव्हां पुढें त्या किल्ल्यास वेढा घालण्याचीं त्यांचीं बोलणीं होऊं लागलीं. इतक्यांत मिर्झा शफीचा भाऊ जैन-उल-अबदीन यानें आपल्या भावाच्या खुनाचा सूड उगविण्याचें ठरवून अफ्रासियाबखानाची भेट घेण्याचें मिष केलें व त्याचा खून केला (२।११।१७८४). अफ्रासियाबखानाच्या खुनानंतर दिल्लीदरबारचा बंदोबस्त करण्याच्या कामीं महादजीशीं स्पर्धा करणारा कोणीच मुसलमान इसम राहिला नाहीं व त्याचें दिल्लीदरबारीं मराठ्यांचें वजन बसविण्याचें काम सुलभ झालें. लागलीच दिल्लीदरबारांतील निरानिराळे सरदार येऊन महादजीस मिळाले. त्यांतच अनुपगीर ऊर्फ हिम्मतबहादर गोसावी हा आपल्या फौजेसह त्यास येऊन मिळाला.

५. अफ्रासियाबखानाबरोबर शहाआलम बादशहासुद्धां आग्र्यास आला होता. महादजीनें फत्तेपुरास त्याची भेट घेतली व त्यास बादशाहीचा बंदोबस्त करून देण्याचें वचन दिलें. तेव्हां बादशहानें

खूष होऊन त्याला आपली वजिरी देण्याचें बोलणें काढिलें. महादजी मोठा महत्त्वाकांक्षी असून त्याला पोकळ नांवाची मुळींच आवड नव्हती. नेहमीं खरी सत्ता आपल्या हातीं असावी यासाठीं त्याची एकसारखी खटपट असून 'पाटीलबावा' हेंच साधें नांव त्याला प्रिय होतें. मग बादशहानें 'वकील-इ-मुताल्लिक' (पातशहाचे खास प्रतिनिधि) हें थोर पद श्रीमंत सवाईमाधवराव पेशवे यास द्यावें व महादजीस त्याचा नायब (मुखत्यार) नेमावें अशी तोड निघाली. शेवटीं दरबार भरवून पंतप्रधानस्वामी यांच्या नायबीचीं वस्त्रें महादजीस अर्पण करण्याचा मोठ्या थाटाचा समारंभ झाला (१।५।१७८५). येणेंप्रमाणें महादजीस मोठा अधिकार प्राप्त झाला. याच प्रसंगीं त्यानें जेथें जेथें बादशाही सत्ता चालते तेथें तेथें गोवध होऊं नये असा बादशाही हुकूम मिळविला. बादशहानें पाटीलबावास 'अमीर-उल-उमराव' असा बहुमानदर्शक किताब दिला. त्या समयीं महादजीनें शिरस्त्याप्रमाणें पांच लाख होन बादशहास नजर केले. बादशहानें खूष होऊन दिल्ली व आग्रा हे प्रांत व आपली फौज शिंद्याच्या ताब्यांत दिली; व शिंद्यानें बादशहाच्या खाजगी खर्चाकरितां महिना पांसष्ट हजार रुपयांची नेमणूक करून द्यावी असें ठरलें. पुढें बादशहाबरोबर आपला जांवई लाडोजी देशमुख शितोळे याच्या हाताखालीं दोन हजार स्वार व चार पलटणें इतका सरंजाम देऊन महादजीनें त्याची दिल्लीस रवानगी केली. खुद्द महादजीनें यापुढें श्रीक्षेत्र मथुरा हें आपल्या वस्तीचें मुख्य ठिकाण केलें. तें क्षेत्र महादजीस अत्यंत प्रिय असे. तें स्थळ केवळ धार्मिक दृष्ट्याच नव्हे तर बादशाही मुलुखाच्या मध्यावर असल्यामुळें राजकीय दृष्टीनेंही वस्तीस सोईचें होतें.

६. नंतर महादजीनें बादशाही मुलुखाचा बंदोबस्त करण्याचें काम जोरांत चालविलें. आग्र्याचा किल्ला महंमदबेग हमदानीच्या

ताब्यांत होता, तो किल्ला स्वाधीन करीना. तेव्हां महादजीचा सरदार रायाजी पाटील यानें किल्ल्याला वेढा दिला. शेवटीं महंमदबेग शरण आला व त्यानें आग्रा मराठ्यांच्या स्वाधीन केला (१७-३-१७८५). महंमदबेग व त्याचा पुतण्या इस्मालबेग या दोघांसही बादशाही नोकरींत कायम ठेवण्याचें महादजीनें कबूल केलें; व त्यांच्या हाताखालीं फौज होती तेव्हां त्यांस दूर पाठविणें जरूर असें जाणून राघोगड घेण्यास गेलेल्या सैन्याच्या मदतीस खेचीवाड्यांत त्यांची रवानगी केली. अन्तर्वेदींतील अलीगड, कोल इत्यादि ठाणीं सर होऊन लवकरच त्या प्रांतीं शिंद्याचा अंमल बसला. दीगचा किल्ला लवकरच मराठ्यांच्या हातीं आला. महादजीनें उत्तरेस दिल्लीपासून पानिपतपर्यंत शिखांचा बंदोबस्त करण्याचें काम अंबाजी इंगळे या शूर सरदाराकडे सोंपविलें. याच सुमारास झबेताखान मृत्यु पावला. त्याची उत्तर अन्तर्वेदींतील जहागीर शिंद्यानें त्याचा मुलगा गुलामकादर याजकडे चालविली. यापूर्वी बादशहा अगदीं नादान असल्यामुळें जहागीरदारांकडून खंडणी मुळींच वसूल होत नसे. आतां बादशहाचा कारभार फौजबंद व कर्तबगार महादजी शिंदे याजकडे आल्यामुळें सर्व संस्थानिकांस व जहागीरदारांस त्यानें खंडणीची मागणी केली, व शिस्तीनें वसूल चालविला. क्लाइव्हनें बादशहा शहाआलम याजपासून इ. स. १७६५ त जेव्हां बंगालच्या दिवाणीची सनद मिळविली, तेव्हां त्या प्रांताबद्दल आपण बादशहास दरसाल खंडणी भरूं असें कबूल केलें होतें. परंतु इ. स. १७७१त शहाआलम दिल्लीस आला, तेव्हांपासून इंग्रजांनीं मुळींच खंडणी भरली नाहीं. आतां आजपर्यंतच्या बाकीसह सर्व खंडणीची महादजीनें मागणी केली. परंतु शिंद्यानें ही मागणी केल्याबरोबर आपल्याला घुस्सा आला अशी इंग्रजांनीं बतावणी केली व खंडणी देण्याचें साफ नाकारिलें. या वेळीं महादजीसही इंग्रजांपासून सक्तीनें खंडणी वसूल करण्याची

फुरसद व ताकद नसल्यामुळें त्यानें ती मागणी पुढें चालविली नाहीं. साल्बाईच्या तहानंतर इंग्रजांच्या दरबारीं महादजीचें वजन फारच वाढलें होतें. इतकें कीं, पुणेंदरबारला इंग्रजांशीं एखाद्या क्षुल्लक विषयासंबंधीं बोलणें करावयाचें असलें तरी तें महादजीच्या द्वारेंच करावयाचें असा प्रघात पडला होता. यामुळें पुणेंदरबारची मोठी कुचंबणा होई. या वेळीं महादजीचें वजन कमी करण्यासाठीं गव्हर्नर जनरल मॅकफर्सन यानें मुंबईकर इंग्रजांस आपला मॅलेट नांवाचा वकील पुण्यास ठेवण्याची परवानगी दिली (इ. स. १७८६). येणेंप्रमाणें महादजीनें दिल्लीच्या बादशाहीचीं सूत्रें हातीं घेतलीं; तेव्हां इंग्रजांसही मराठी सत्तेचा धाक वाटूं लागला. मराठ्यांचा मोठा लौकिक झाला व मराठ्यांचें हिंदुपदपातशाहीचें ध्येय अंशतः सिद्धीस गेलें.

१४. महादजी शिंद्याची मर्दुमकी.

महादजी शिंद्यानें दिल्लीदरबारीं मराठ्यांचें वजन स्थापिलें हें पठाण, रोहिले इत्यादि कडव्या मुसलमानांस सहन झालें नाहीं. त्याचप्रमाणें उत्तरेकडील जाट, रजपूत इत्यादि हिंदु सत्ताधाऱ्यांसही ही गोष्ट नापसंत होती. मोंगल बादशाहीच्या पडत्या काळांत सर्वांस स्वतंत्रतेनें वागतां येई. तेव्हां जोरदार मुख्य सत्ता स्थापन होणें कोणासही इष्ट नव्हतें. महादजीनें बादशहाचा कारभार हातीं येतांच निरनिराळ्या सरदारांस व संस्थानिकांस चाकरी सांगून व खंडणी मागून शिस्तीनें वागविण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबर सर्व उत्तर हिंदुस्थानांतील लोक त्याच्यावर नाराज झाले व संधि सांपडतांच त्याचा नाश करण्यासाठीं टपून बसले. राघोगड सर झाल्यावर महादजीनें महंमदबेगास आपलें सैन्य कमी करण्याचा हुकूम केला; तेव्हां तो हुकूम अंमलांत

आणण्याची महंमदबेगानें अळंटळं चालविली आणि रजपुतांशीं व मुसलमान सरदारांशीं महादजीविरुद्ध कारस्थानें चालविलीं. याच सुमारास जयपूर, जोधपूर, उदेपूर वगैरे ठिकाणच्या रजपुतांपासून महादजीनें बादशहाच्या नांवानें खंडण्यांची मागणी केली. जयपूरकरावर त्यानें साठ लक्ष रुपये खंडणी बसविली. जयपूरकर राणा प्रतापसिंह यानें ती हप्त्याहप्त्यांनीं देण्याचें कबूल केलें. परंतु पहिला हप्ता देऊन पुढील हप्ता त्यानें चुकविला. तेव्हां महादजीनें आपला सरदार रायाजी पाटील याच्या हाताखालीं फौज देऊन खंडणी वसूल करण्यासाठीं त्यास जयपूरकडे पाठविलें. जयपूरकरानें प्रथम ' आज देतों, उद्यां देतों ' असें बोलणें लावून शेवटीं खंडणी देण्याचें साफ नाकारिलें. याचें कारण उघड होतें. त्यानें जोधपूरकर अभयसिंगाशीं आतां संगनमत केलें होतें; आणि बादशाहींतील मुसलमान सरदार व लष्करांतील उत्तरेकडील हिंदु रांगडे शिपायी महादजीवर खूष नाहींत हें ताडून त्या दोघां रजपूत राजांनीं महादजीच्या सैन्यांत फितूर करून त्याच्याशीं आपल्याला सहज लढाई देतां येईल अशी अटकळ बांधिली होती.

२. जयपूरकराच्या उद्दामपणाची बातमी जेव्हां महादजीस कळली तेव्हां त्यानें कसेंहीकरून जयपूरकरास वठणीवर आणण्याचा निश्चय केला. शिंदे घराण्याचें रजपुतांशीं पुरातन वैर होतें व पाटीलबावांनीं या वेळीं त्यांना कडक शासन करण्याचा बेत केला हें अगदीं स्वाभाविक होतें. याच सुमारास उत्तरेकडे शिखांनीं गडबड उडविली होती. तेव्हां हेबतराव फाळके व अंबाजी इंगळे या दोघांच्या हाताखालीं फौज देऊन महादजीनें त्यांची ताबडतोब उत्तरेकडे रवानगी केली. अशा रीतीनें रजपुतांवर चालून जाण्याच्या ऐन प्रसंगीं महादजीचें सैन्यबळ कमी झालें. तसेंच हिल्लीदरबारीं पुष्कळ मुसलमान सरदार त्याच्याविरुद्ध खटपट करीत होते. तथापि या सर्व अडचणींस

न जुमानतां जंगी फौज घेऊन रजपुतांवर चालून जाण्याचा आपला निश्चय महादजीनें कायम केला, व इ.स. १७८७च्या भर उन्हाळ्यांत जयपुराकडे चाल केली. राणेखानभाई, डी बॉईन, खंडेरावआप्पा, बाळोजी इंगळे, शिवाजी विठ्ठल विंचूरकर, इत्यादि प्रसिद्ध सरदार त्यानें बरोबर घेतले. हें काम बादशाहीच्या बंदोबस्ताचें असल्यामुळें महंमदबेगाच्या हाताखालचीं व इतरही मोंगल फौज महादजीबरोबर निघाली. मागें बादशहाच्या व राजधानीच्या रक्षणार्थ लाडोजी देशमुख व शहानिजामुद्दीन हे कांहीं फौजेसह दिल्लीस राहिले. रजपुतांनींही लढाईची जोराची तयारी केली. जोधपूरकर अभयसिंगानें आपला सेनापति भीमसिंग याच्याबरोबर वीस हजार राठोड जयपूरकराच्या साहाय्यास पाठविले. रजपुतांची एकंदर फौज पस्तीस हजारपर्यंत जमली.

३. प्रथम कांहीं दिवस सामोपचाराचीं बोलणीं चाललीं होतीं; परंतु त्यांचा उपयोग न होऊन शेवटीं दोन्ही पक्ष लढाईस सिद्ध झाले. त्यांची गांठ जयपूरच्या पूर्वेस त्रेचाळीस मैलांवर लालसोट येथें पडली. आरंभींच मराठ्यांच्या बाजूचें एक मोठें नुकसान झालें. महंमदबेग व त्याचा पुतण्या इस्माइलबेग हे दोघे आपल्या फौजेसह रजपुतांस जाऊन मिळाले. तथापि महादजी डगमगून गेला नाहीं. लवकरच दोन्ही पक्षांत एक निकराची लढाई झाली (२८ जुलै १७८७); तींत मराठ्यांनीं राठोडांचा जोराचा हल्ला परतविला, व शत्रूवर जोरानें चालून जाऊन त्याचा पराभव केला. या दिवशींच्या लढाईत मराठ्यांच्या तोफखान्याकडील एक गोळा लागून फितुरी महंमदबेग पडला. या वेळीं मराठी फौजेंत जर ऐक्यभाव असता तर या लढाईंत मराठ्यांचा शेवटीं खास जय झाला असता. परंतु बादशाही फौजेंत रांगड्यांचा फार भरणा होता, त्यांनीं महादजीस दगा देण्याचा विचार ठरविला. दुसरे दिवशीं सात हजार शिपायांनीं

सहा महिन्यांची आपल्या पगाराची तुंबलेली बाकी चुकती करण्याविषयीं बोलणें सुरू केलें. प्रसंग कठिण जाणून महादजीनें त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण तो निष्फळ होऊन एकशें-तीन तोफा व दारूगोळा यांजसह बादशाही फौज जाऊन रजपुतांस मिळाली. अर्थात यानंतर लढाई करणें अशक्य होतें. या भयंकर प्रसंगीं महादजी मुळींच गडबडून गेला नाहीं. लागलीच त्यानें आपल्या मुख्य अधिकाऱ्यांचा सल्ला घेऊन तूर्त पिछेहाट करण्याचें ठरविलें. मग पुनः जम बसवून रजपुतांचा समाचार घेऊं असा विचार करून राहिली होती तेवढ्या फौजेनिशीं व्यवस्थितपणें मागें सरकत तो दींग येथें आला; या प्रसंगीं त्यानें जाटांस दींगचा किल्ला देऊन खूष केलें. दिगेस येतांच त्यानें आपलें जड सामान व कबिले ग्वालेरीस पाठवून दिले. अलवार व भरतपूर येथील जाटांनीं या वेळीं त्याला चांगली मदत केली. महादजी स्वतः अलवारला राहिला. नंतर आपल्या तोफा भरतपूरच्या बळकट किल्ल्यांत ठेवून आग्रा व अलीगड या दोन्ही ठाण्यांतील शिबंदीची त्यानें चांगली तरतूद केली. या अवकाशांत रजपूत आपल्या विजयानंदांतच गुंग होऊन राहिले व त्यांनीं महादजीचा पाठलाग केला नाहीं. नाहींतर दुसरें 'पानिपत' व्हावयाचा प्रसंग होता. पण सुदैवानें तें संकट टळलें.

४. लालसोट येथें झालेल्या पराजयाची बातमी पसरतांच दिल्लीदरबारीं व उत्तर हिंदुस्थानांत मराठ्यांचा दरारा एकदम नाहींसा झाला, व मराठ्यांच्या शत्रूंस अत्यंत आनंद झाला. इस्माइलबेग लवकरच राजपुतान्यांतून परत आला व त्यानें आग्ऱ्याच्या किल्ल्यास वेढा घातला. गुलामकादरनेंहि या वेळीं डोकें वर उचललें. दिल्लींतील बादशहाच्या भोंवतालचे मुसलमान सरदार मराठी अंमलाविरुद्ध होते. त्यांनीं गुलामकादरास साहाय्य करण्याचें ठरविलें. तेव्हां महादजीनें दिल्लीस ठेविलेले लाडोजी देशमुख व शहानिजामुद्दीन यांना तेथून पळून जाणें

भाग पडले. बादशहानें गुलामकादरास अमीर-उल-उमराव हें पद दिलें व आपला कारभार सांगितला. यापुढें अन्तर्वेदींत खालीं येऊन गुलामकादरानें तिकडील एकामागून एक ठाणीं सर केलीं. शेवटीं त्यानें अलीगडास वेढा घातला. याप्रमाणें दिल्ली प्रांतीं चोहों बाजूंस मुसलमानांची सरशी झाली. तेव्हां महादजी चमेली नदी (चंबळ) उतरून दक्षिणेस आला व ग्वालेरजवळ आठ मैलांवर कुवेरी नदीच्या कांठीं तळ देऊन तो राहिला (२१।१२।१७८७). या वेळीं उत्तरेकडील मुसलमान, रजपूत व रांगडे यांचा मराठ्यांविषयीं द्वेष प्रदीप्त झाला होता. चंबळेच्या उत्तरेस आग्रा व अलीगड हीं दोनच स्थळें मराठ्यांकडे राहिलीं. ' जितके हिंदुस्थानी, मोंगलिये, व राजे जयपूरकर व जोधपूरकर या सर्वांचें मानस कीं राजश्री पाटीलबावास अवघे एकत्र होऊन चमेलपार करून द्यावें. व निदान बनल्यास व मऊ लागल्यास ग्वालेर प्रांत देखील खालीं करून द्यावा. ऐसी सर्वांची मसलत आहे. व राजश्री पाटीलबावा यांचें मानस कीं, सर्वस्व वेंचावें, परंतु जयपूरकरांचें व जोधपूरकरांचें पारिपत्य करावें व पातशहाच्या घरची मुखत्यारी करावी. "*

५. या बिकट प्रसंगीं महादजीनें नानाजवळ मदत मागितली व तो कदाचित् मदत करणार नाहीं असें वाटून पुढील पत्र लिहिलें.

" मी म्हणजे अगदीं निराश झालों आहें असें नाहीं; पण रजपूत राजे व बादशहा यांशीं इंग्रजांनीं राजकारण केलें आहे, असें मला वाटतें. तेव्हां इंग्रजांच्या ताब्यांत हिंदुस्थानांतील प्रांत गेले असतां त्यांचें वर्चस्व किती वाढेल व त्यापासून मराठी राष्ट्रास किती धोका पोहोंचेल याचा तुम्हीं आपल्याशीं विचार करून पहावा. तुम्हांविषयीं माझ्या मनांत मत्सरबुद्धि खचित वसत नाहीं. ती मजविषयीं तुमच्या मनांत वसत असेल

---

*इतिहाससंग्रह, दिल्ली येथील मराठ्यांची राजकारणें, लेखांक २३४; (मार्गशीर्ष शु॥ ९ शके १७०९;१९।१२।१७८७).

तर ती काढून टाकावी. होळकर, हरिपंत व परशुरामभाऊ यांस तुम्ही असें विचारा कीं, मी त्यांच्या इच्छित हेतूस कधीं आड आलों आहें काय ? आणि माझे सर्व प्रयत्न मराठी राष्ट्राच्या उन्नतीकरितांच चालले आहेत कीं नाहींत ? आपल्या दोघांचा धनी एकच. त्याचें ज्यांत हित तेंच आपणांस कर्तव्य; तें करण्याविषयीं आपण दोघे झटूं या. फक्त मजविषयीं तुम्हांस मत्सर वाटत असेल तर तुम्ही आपल्या मनास असें विचारा कीं, मोरोबादादानें तुम्हांविरुद्ध कारस्थान उभें केलें तेव्हां तुम्हांस पाठबळ कोणीं दिलें ? तुमचे प्रतिस्पर्धी सखारामबापू यांस तुमच्या ताब्यांत कोणीं आणून दिलें ? तोतयाचें बंड कोणीं मोडलें ? तळेगांवास इंग्रजांचा पराजय कोणीं केला ? लढाईचा बहुतेक भार आपल्या शिरावर घेऊन शेवटीं इंग्रजांशीं फायदेशीर तह कोणीं करून दिला ? निरानिराळ्या प्रसंगीं मी किती उपयोगीं पडलों याचा विचार करा, आणि जे दुष्ट लोक चुगल्या सांगत असतील त्यांचीं तोंडें बंद करा. ते आपणां दोघांचेही हितशत्रु आहेत. कोणीकडून हिंदुस्थानांत मराठ्यांची सत्ता कायम रहावी; आपणांमध्यें कलह उत्पन्न होऊन सर्व राष्ट्राचा नाश न व्हावा, एवढी गोष्ट झाली म्हणजे *झालें."

नानाच्या मनांत शिंद्याविषयीं कितीही स्पर्धा असली तरी तो आपणास मदत करणार नाहीं ही शिंद्याची समजूत चुकीची होती. शिंद्याचा बेत हळूहळू पेशव्यापासून स्वतंत्र होण्याचा होता. त्याच्या मात्र नाना विरुद्ध होता. बाकी शिंद्यावर प्रसंग आला असतां नाना स्वस्थ बसणें अगदीं असंभाव्य होतें. पूर्वी उत्तरेकडे पेशव्यांचीं फौज जाई व शिंदेहोळकर तिला साहाय्य करीत. या वहिवाटीस अनुसरून मस्तानीचा नातू व समशेरबहादराचा मुलगा अलीबहादर याजबरोबर फौज देऊन त्यास उत्तरहिंदुस्थानांत मुलूखगिरीस पाठविण्याचा नानाचा विचार होता. इतक्यांत शिंद्याचीं मदतीविषयीं पत्रें आलीं. तेव्हां नानानें अलीबहादर व तुकोजी होळकर यांची उत्तरेकडे रवा-

* डफकृत 'मराठ्यांचा इतिहास', भाग ३, पृष्ठ २४–२५.

नगी केली. ही मदत केली तेव्हां नानानें शिंद्याशीं पुढीलप्रमाणें ठराव केला. चंबळेच्या उत्तरेस जितका मुलूख जिंकला जाईल, त्याच्या तीन वांटण्या, पेशवे, शिंदे व होळकर यांनीं सारख्या वांटून घ्यावा.

६. इकडे महादजी पुण्याहून फौज येत होती, तिजवरच अवलंबून राहिला नाहीं. आग्रा व अलीगड हीं जीं दोन ठाणीं चंबळेच्या उत्तरेस त्याच्या हातीं राहिलीं होतीं, त्यांपैकीं अलीगडचें ठाणें लवकरच पडलें. मात्र आग्र्याचा किल्ला शेवटपर्यंत मराठ्यांच्याच हातीं राहिला. इस्माइलबेगानें शहर ताब्यांत घेऊन त्या किल्ल्यास कित्येक महिने वेढा दिला होता, व अलीगड काबीज केल्यावर गुलामकादरही त्याच्या मदतीस आला. तथापि आग्रा मुसलमानांस घेतां आला नाहीं. त्या ठाण्याचें संरक्षण करण्याचें काम महादजीनें आपला विश्वासू व शूर सरदार लखबादादा ऊर्फ लक्ष्मण अनंत लाड याजकडे सोंपविलें होतें. मुसलमानांनीं अनेकदां किल्ल्यावर हल्ले चढविले. पण लखबादादानें स्वतः मोठी अंगमेहनत करून व अद्वितीय पराक्रम गाजवून आपल्या अनुयायांची कर्तव्यबुद्धि जागृत राखिली, व आग्र्यांतील शिबंदीनें वेढा घालणाऱ्या मुसलमान सैन्यास दाद न देतां कित्येक महिने तो किल्ला भांडविला. या वेळीं उत्तर हिंदुस्थानांत मराठ्यांचा दरारा कायम राखण्यास लखबादादाच्या शौर्याचा मोठा उपयोग झाला. महादजीनें आग्र्यास वेढा घालणाऱ्या मुसलमान फौजेवर हल्ला करून किल्ल्यांतील शिबंदीस अप्रत्यक्ष मदत करण्याकरितां रायाजी पाटील, खंडेरावआप्पा, डी बॉईन, भरतपूरचा जाट, व राणेखानभाई इत्यादि सरदारांच्या हाताखालीं फौजेची योजना केली. आपल्यावर हल्ला करण्यासाठीं मराठी फौज तयार होते असें पाहतांच इस्माइलबेग व गुलामकादर यांनीं तिजवर चाल केली. भरतपूरजवळ चकसान येथें लढाई झाली, तींत मराठी फौजेस माघार घ्यावी लागली (२४।४।१७८८). पुढें लवकरच गुलामकादरच्या

जहागिरीच्या मुलुखापैकीं सहाराणपुरावर शिखांनीं चाल केल्यामुळें तो घोसगडाकडे निघून गेला व मग आग्र्यास एकटा इस्माइलबेग राहिला. आतां मराठी फौजेचा जम चांगला बसला होता. तेव्हां राणेखान-भाई इस्माइलबेगावर चालून गेला. आग्र्याजवळ लढाई झाली; तींत इस्माइलबेगाचा पूर्ण पराभव झाला (१७।६।१७८८). त्याचे हत्ती, घोडे, तोफा व इतर सामुग्री मराठ्यांच्या हातीं लागली. खुद्द इस्माइलबेगास जखम लागली व मराठी सैन्यापासून सुटण्यासाठीं यमुनेत उडी मारून पोहून तो परतीरास कसा तरी पोंचून गुलामकादरास जाऊन मिळाला. या विजयानें व आग्र्याच्या ठाण्याच्या बचावामुळें मराठ्यांचा चोहोंकडे लौकिक झाला. यापूर्वीच महादजी चंबळ उतरून उत्तरेस आला होता; आतां त्यानें मथुरेस छावणी दिली. महादजीची खात्री होती कीं, गुलामकादर व इस्माइलबेग फार वेळ एकीनें वागणें शक्य नाहीं. कांहीं काळ जातो तों ते एकमेकाशीं भांडणार व हतबल होणार, तेथवर पुण्याचीही फौज येऊन पोंचेल व मग आपण आपलें वजन पुनः दिल्लीस बसवूं, अशी महादजीनें अटकळ बांधिली व दिल्लीच्या बाजूस आपला जम बसविण्याच्या उद्योगास तो लागला.

७. इकडे गुलामकादर व इस्माइलबेग या दोघांनीं आतां चोहोंबाजूंनीं मराठे आपणांस घेरतात असें पाहून दिल्लीस जाऊन तेथें लूट मिळविण्याचा बेत केला. मग ही दुक्कल दिल्लींत शिरली. राजवाड्यांत पैसा मिळविण्याचें काम गुलामकादरानें आपल्या अंगावर घेतलें, व शहरची लूट मिळविण्याच्या उद्योगास इस्माइलबेग लागला. या वेळीं गुलामकादरानें बादशहा शहाआलम व राजघराण्यांतील मंडळी यांजवर अनन्वित अत्याचार केले; त्यानें शहाआलमास बेदम मारिलें व त्याचे डोळे फोडून त्यांच्या खाचा बनविल्या. नंतर त्यास बादशाही पदावरून पदच्युत करून त्याच्या जागीं बेदरबख्त या

नव्या बादशहाची स्थापना केली. हे सर्व प्रकार लपवून ठेवलेलें धन शहाआलमानें आपल्याला द्यावें ह्मणून गुलामकादरनें केलें. पण गुप्त धन नव्हतेंच, तर तें शहाआलम कसें दाखविणार व देणार ! गुलामकादरच्या या अत्याचारांमुळें व लुटीचा पैसा बहुतेक सर्व त्यानेंच घेतल्यामुळें इस्माइलबेग त्याच्यावर नाखुष झाला. याच सुमारास महादजीनें दिल्लीकडे राणेखान इत्यादि आपले सरदार पाठविले होते. तेव्हां त्यांच्या ' सलूखा ' च्या बोलण्यास इस्माईल कबूल झाला, व तो शिंद्यास येऊन मिळाला. अर्थातच गुलामकादरला दिल्लींतून निघून जाण्याखेरीज मार्ग राहिला नाहीं. लागलीच तो दिल्लीच्या किल्ल्यांत मिळविलेली लूट घेऊन यमुना उतरून चालता झाला. मागें दिल्लीचा किल्ला राणेखानाच्या हातीं आला(११।१०।१७८८). गुलामकादराच्या खानदानीवरून तो भयंकर अत्याचार करील अशी कोणाचीं कल्पना झाली नाहीं, त्यामुळेंच महादजीनें सावकाश जम बसवीत दिल्ली घेण्याचें ठरविलें होतें. इतक्यांत अलीबहादर पेशव्यांची फौज घेऊन येऊन पोंचला. मग शहाआलम बादशहाचें महादजीनें समाधान केलें व त्याची पुनः व्यवस्था लावून दिली. या वेळीं बादशहानें खूष होऊन महादजीकडे पूर्वीचीं पदें कायम केली व त्यास ' मदार–उल–महाम' व 'अलिजा–बहादर ' असे नवे किताब दिले. राणेखानभाई व अलीबहादर यांनीं प्रथम गुलामकादरास पकडण्याचें काम अंगावर घेतलें. मिरतच्या किल्ल्यांत गुलामानें तळ दिला होता. त्या ठिकाणास मराठ्यांनीं वेढा देऊन दाणावैरण बंद केली. तेव्हां एके रात्रीं निराशेनें गुलाम पळून जाऊं लागला. पण जवळच्या शेतकऱ्यांनीं पकडून त्यास मराठ्यांच्या हवालीं केलें. पुढें अतिशय हाल हाल करून महादजीनें त्याचा वध करविला (३।३।१७८९). येणेंप्रमाणें बादशहाची विटंबना करणाऱ्या त्या नराधमास कडक प्रायश्चित्त मिळालें. यापुढें दिल्ली, आग्रा व अन्तर्वेदींतील प्रांत महादजीनें आपल्या खास अंमला-

खालीं घेतले व सर्व मुलुखाची नीट व्यवस्था लाविली.

८. अलीबहादराशीं महादजीचें फार दिवस पटलें नाहीं. लवकरच त्या दोघांत मोठा तंटा माजून राहण्याचा एक चमत्कारिक प्रसंग घडून आला. एकदां महादजी खप आजारी पडला. पुष्कळ औषधोपचार केले; पण गुण येईना. तेव्हां अशी कल्पना निघाली कीं, जयपूरकर राजा प्रतापसिंह व शिंद्याच्या लष्करांतील हिंमतबहादर गोसावी यांनीं महादजीच्या जिवास अपाय व्हावा म्हणून 'मंत्रप्रयोग' चालविले आहेत व त्याचा हा परिणाम आहे. नंतर दानधर्म केला व शान्ति केल्या; तेव्हां महादजीस गुण आला. पुढें महादजीनें आपल्या जिवावर मंत्रप्रयोग करणाऱ्या हिंमतबहादरास पकडण्याचें ठरविलें. हिंमतबहादराच्या तळावर महादजीचे सरदार आले व त्यांनीं हिम्मतबहादरास पकडून शिंद्याच्या लष्कराकडे चालविलें. मध्यें अलीबहादराचा तळ होता. हिम्मतबहादरानें घाई करून अलीबहादराचा डेरा गांठला व 'आपण निरपराधी आहों, आपलें रक्षण करावें' असें म्हणून तो अलीबहादरास शरण गेला. पुढें अलीबहादर व महादजी यांजमध्यें हिम्मतबहादराबद्दल वाटाघाटी सुरू झाल्या. शेवटीं अलीबहादरानें साफ सांगितलें कीं, पुण्याहून हुकूम आल्याखेरीज आपण गोसाव्यास स्वाधीन करीत नाहीं. पुढें पुण्याहून हुकूम येण्यापूर्वीच हिम्मतबहादर लखनौस निसटून गेला व अलीबहादरानें त्याच्यातर्फे जयपूरकराशीं शिंद्याविरुद्ध स्वतंत्र कारस्थानें चालविलीं. या एकंदर प्रकरणावरून महादजीस अलीबहादराचा मनस्वी राग आला व लढाईपर्यंत मजल येणार असें वाटूं लागलें. परंतु याच सुमारास महादजीनें रजपुतांवरील मोहीम हातीं घेण्याचें ठरविल्यामुळें अलीबहादराशीं चाललेला तंटा त्यानें मिटता घेतला, व त्याची कांहीं फौज मदतीस बोलाविली. यापुढें स्वतः अलीबहादर बुंदेलखंडांत गेला, हिम्मतबहादर गोसाव्याच्या साहाय्यानें

तिकडे त्यानें पाऊण कोटी उत्पन्नाचा मुलूख सोडविला, व त्याप्रांताचा बंदोबस्त करण्यासाठीं तो बांदा येथें कायम वस्ती करून राहिला.

९. इ. स. १७८९त बादशाहीचीं सूत्रें पुनः हातीं आल्यावर उत्तर हिंदुस्थानांतील आपली सत्ता बळकट करण्यासाठीं महादजीनें आपल्या हाताखालीं मोठी कवायती फौज ठेवण्याचें ठराविलें. गुलामकादरचें पारिपत्य झाल्यावर डी बॉइननें शिंद्याची नोकरी सोडली व तो लखनौस जाऊन व्यापार करूं लागला. कवायती फौज वाढविण्याचें ठरतांच महादजीनें त्याला परत बोलाविलें व दहा पलटणींचा एक कंपू (Brigade, ब्रिगेड) तयार करण्यास सांगितलें (इ. स. १७९०).लवकरच डी बॉइननें एक कंपू तयार केला. कंपूत दहा पायदळ पलटणी, पांचशें लोकांच्या शिबंदीची एक तुकडी, पांचशें तुरुक स्वार व साठ तोफा इतकी भरती होती. या फौजेंत अयोध्या, रोहिलखंड व अन्तर्वेद या मुलुखांतील लोकांचा खूप भरणा होता.सर्व पायदळ पलटणींस कवाईत थेट इंग्रजी पद्धतीची शिकविली जाई व हुकुमांचे शब्दही इंग्रजी असत. प्रत्येक फलटणीवर दोन तरी अधिकारी युरोपियन नेमावयाचे असा डी बाईनचा नियम होता, व ते फ्रेंच, डच, इटालियन, जर्मन, इंग्लिश इत्यादि अनेक युरोपियन राष्ट्रांचे प्रजाजन असत. कंपूत एकंदर सुमारें दहा हजार लोक असत. कंपूतील दहा पलटणींपैकीं सात पलटणींस 'तेलिंगा' हे नांव असून त्यांचीं हत्यारें व पोषाख इंग्रजांच्या पलटणींप्रमाणें असत. बाकीच्या तीन पलटणींस 'नजीब' ह्मणत; त्यांचे पोषाख पर्शियन तऱ्हेचे असत व त्यांच्या हत्यारांतही थोडा फरक होता. या फौजेस वापरण्यास लागणारीं हत्यारें व दारूगोळा आग्र्याच्या कारखान्यांतून पुरविलीं जात. आपल्या फौजेंत डी बॉइन श्वेतकमलें (White Lilies) हें आपल्या फ्रेंच राष्ट्राचें निशाण वापरी! खरोखर, ही भाडोत्री फौज सर्वस्वी परकीय लोकांच्या हातीं असून केव्हां दगा देईल याचा नेम नव्हता. कदाचित कांहीं

वर्षांनीं महादजीनें तींत योग्य तो बदल करून तींस 'स्वदेशी' स्वरूप आणिलें असतें; परंतु तसा योग आला नाहीं. तथापि प्रथम मात्र या फौजेचा महादजीस मोठा उपयोग झाला. पुढें कवायती कंपूंचा आपल्याला चांगला उपयेाग होतो असें पाहून महादजीनें डी बॉईनला आणखी दोन कंपू तयार करण्याचा हुकूम केला. फौजेचा पगार वेळचे वेळीं मिळावा म्हणून त्यानें दिल्लीपासून मथुरेपर्यंत समोरचे अन्तर्वेदींतील बारांस लक्ष उत्पन्नाचे बावन्न परगणे कवायती फौजेच्या खर्चाकरितां डी बॉईनला तोडून दिले व तेथील मुलकी व फौजदारी सर्व अधिकार त्याजकडे सोंपविला. डी बॉईननें अलीगड हें आपल्या वस्तीचें मुख्य ठिकाण केलें व कारभाराच्या व्यवस्थेनें व चोखपणानें त्या प्रांतांचें उत्पन्न तींस लक्षांपर्यंत वाढविलें. डी बॉईनला दरमहा दहा हजार रुपये पगार ठरला होता व प्रांतांच्या व्यवस्थेसाठीं वसुलावर दोन टक्के मिळावे असाही करार होता. अर्थातच थोड्याच वर्षांत डी बॉईननें लाखों रुपये मिळविले.

१०. पहिला कवायती कंपू तयार होतांच महादजीनें त्याच्या जोरावर रजपुतांस नरम आणण्याचा बेत केला. इस्माइलबेग महादजीपासून फुटून रजपुतान्यांत गेला होता व त्याला जोधपूरचे राठोड मिळाले होते. महादजीनें प्रथम महंमदबेग व राठोड यांच्या संयुक्त फौजेचा जयपुराजवळ पाटण येथें पूर्ण पराभव केला (१९।६।१७९०). पुढें लवकरच महादजीची जबरदस्ती पाहून जयपूरकर प्रतापसिंह त्याला शरण आला. नंतर, जोधपूरच्या अभयसिंगानें लालसोटच्या लढाईनंतर 'अजमीरचा किल्ला व प्रांत' शिंद्यापासून घेतला होता, तो परत मिळविण्यासाठीं महादजीनें जोधपूरकरावर मोर्चा वळविला. मेडतें येथें भयंकर युद्ध होऊन हजारों राठोड पडले व जोधपूरकराचा पूर्ण पराभव झाला (१०।९।१७९०). तेव्हां जोधपूरकरानें जबर खंडणी भरली आणि अजमीर प्रांत व किल्ला शिंद्यास परत दिला. त्या

प्रांताचा बंदोबस्त करण्यास महादजीनें लखबादादास नेमिलें; नंतर तो उदेपुरास गेला. त्या संस्थानांत अतिशय अंदाधुंदी माजली होती, ती नाहींशी करून तेथील कारभार पाहण्यासाठीं महादजीनें अंबाजी इंगळे या सरदाराची नेमणूक केली. त्या प्रांतीं पुढें आठ वर्षेंपर्यंत अंबाजीनें सुभेदार या नात्यानें उत्कृष्ट कारभार केला. नंतर उज्जनीस जाऊन महादजीनें आपल्या सैन्याची बाकी चुकती केली व आपल्या मुलुखाची व्यवस्था लाविली. त्यानें निरनिराळ्या प्रांतांवर निरनिराळे अधिकारी नेमून गोपाळरावभाऊ चिटणीस याची सर्वांवर मुख्य अधिकारी म्हणून योजना केली. बादशाहीचीं सूत्रें महादजीनें हातीं घेतल्याबरोबर मुसलमान सरदार व रजपूत राजे यांनीं त्याच्याविरुद्ध बंड केलें. त्याच वेळीं उत्तरेकडून शीख व पूर्वेकडून इंग्रज त्याला शह देण्यास सारखे टपले होते. अशा बिकट प्रसंगीं न डगमगतां महादजीनें मुसलमानांस मोडून काढिले व जंगी कवायती फौज उभारून रजपुतांस रगडिलें. तेव्हां मराठी सत्ता उत्तर हिंदुस्थानांत पुनः कायम झाली. दुर्दैवानें याच सुमारास मराठ्यांमधील बेकीनें उचल खाल्ली. पेशव्यांकडून मदतीस आलेले अलीबहादर व तुकोजी होळकर यांशी महादजीचें बुंदेलखंड व रजपुताना यांतील मुलुखासंबंधीं एकसारखे तंटे होऊं लागले. तेव्हां पुण्यास जाऊन या भानगडींचा एकदा पुरता निकाल लावून घ्यावा असें महादजीस वाटूं लागलें. शिवाय 'दाक्षिण' सोडून त्याला बरींच वर्षें झालीं होतीं. त्यामुळें साहाजिकपणेंच आपल्या मुलुखाचा बंदोबस्त केल्यावर त्यानें देशीं जाण्याचा बेत केला (इ. स. १७९२).

---

९५. दोस्तांची टिपूवर स्वारी.

शके १७१२-१४ (सन १७९०-९२).

धारवाडचा वेढा.

शके १७०८ (इ. स. १७८६) त मराठ्यांनीं टिपूवर जी मोहीम केली तिच्यामुळें टिपूस पुरती दहशत बसली नाहीं व तेव्हां घाईघाईनें तह करण्यांत आला. तेव्हां अर्थातच मराठे व निजाम ह्या दोघांसही टिपूस चांगला नरम आणण्याची उत्कण्ठा लागून राहिली होती. इतक्यांत शके १७११ (१७८९ डिसेंबर) मध्यें अखेर टिपूनें इंग्रजांचा मित्र त्रावणकोरचा संस्थानिक किरीटी रामराजा यावर स्वारी केली. तेव्हां इंग्रजही टिपूशीं युद्ध करण्यास उद्युक्त झाले. मग मराठे, निजाम व इंग्रज या तिघांमध्यें स्वारीचा करार ठरला. त्याचीं तीन कलमें होतीं. १ पावसाळ्यापूर्वी व त्यानंतर मराठे व निजाम यांनीं टिपूच्या उत्तर सरहद्दीवर पंचवीस पंचवीस हजार फौजेनिशीं स्वारी करून साधेल तितका मुलूख ताब्यांत घ्यावा. २ लॉर्ड कार्नवॉलिस (इंग्रज गव्हर्नर जनरल) ज्या वेळीं मागेल त्या वेळीं एक महिन्याच्या मुदतींत दोघांनींही दहा हजार स्वार इंग्रजांच्या मदतीस पाठवावे. या स्वारांचा खर्च इंग्रजांनीं द्यावा. स्वारीवर नमूद झालेल्या मराठे व निजाम यांच्या सैन्यांच्या मदतीस इंग्रजांनीं दोन दोन पलटणें व सहा सहा तोफा द्याव्या. त्यांचा खर्च मराठे व निजाम यांनीं चालवावा. ३ टिपूचा जितका मुलूख काबीज होईल तितका तिघांनीं सारखा वांटून घ्यावा. या करारावर ज्येष्ठ वा॥ ४ शके १७१२ (१।६।१७९०) रोजीं पेशव्यांची सही झाली व नंतर एक महिन्यानें निजामानें सही केली.

२. या स्वारीवर निघालेल्या मराठी फौजेचें आधिपत्य तासगां-

वचा परशुरामभाऊ पटवर्धन याजकडे होतें. त्याच्याबरोबर नानानें करारप्रमाणें पंचवीस हजार मराठी फौज देण्याची व्यवस्था केली. त्याशिवाय माधवराव कृष्ण पानसे याजबरोबर तोफांचा मुबलक सरंजाम देण्यांत आला; व सरकारांतून पांच हजार गारदी देण्यांत येऊन परशुरामभाऊनें आणखी पांच हजार गारदी चाकरीस ठेवावे असें ठरलें. त्याखेरीज इंग्रजांची मुंबईहून दोन पलटणें यावयाचीं होतीं तीं निराळींच. मद्रासेहून इंग्रज सरदार जनरल मिडोज हा टिपूच्या राज्यांत शिरल्याचें वर्तमान येतांच आपलीं लष्करें कृष्णापार होऊन शत्रूच्या मुलुखांत हंगामा सुरू करतील, असें नानानें इंग्रज वकिलास आश्वासन दिलें होतें. त्यामुळें परशुरामभाऊ लवकरच पुण्याहून निघून तासगांवास गेला व फौजेची जमवाजमव करूं लागला. इकडे पुण्यासही फौजेची उभारणी होत होती. कराराइतकी फौज जमण्यास दोन तीन महिने लागतील असा अंदाज होता. इंग्रजांनीं मात्र मराठ्यांच्या मदतीस पाठवावयाच्या पलटणांचीं रवानगी मुंबईहून ज्येष्ठ महिन्यांत केली व तीं जयगडच्या खाडीनें संगमेश्वरास उतरलीं आणि आंबेघाट चढून अधिक आषाढ महिन्यांत तासगांवास दाखल झालीं. त्यांत दोन पलटणें आणि त्यांबरोबर गोलंदाज वगैरे सरंजामानिशीं सहा तोफा, असा एकंदर अडीच हजार सैनिकांचा जमाव होता. त्या फौजेवर क्याप्टन लिटल हा मुख्य अधिकारी असून त्यास मराठे ' लिटली ' म्हणत. जुलैअखेर भाऊजवळ पांच हजार स्वार व दोन हजार पायदळ इतकीच फौज जमली. आणखी फौज जमल्यावर भाऊ कूच करणार होता. परंतु लिटल यानें निघण्याविषयीं भाऊस तगादा लाविला. निजामाच्या लष्करांतून गोविंदराव काळे याचींहीं पत्रें लवकर निघण्याविषयीं येऊं लागलीं. " मोंगल सरदार सत्वर कृष्णा नदी उतरून पलीकडे जाणार. आपणही उतरावें. यांत गुण व फायदे बहुत आहेत. न उतरल्यास दोष

इंग्रजांचा येतो, व सरकारची नुकसानी आहे. आतां रहावें हे सलाह वकत नाहीं. कोइमतूर वगैरे जागे इंग्रजांनीं घेतले.आपण सत्वर (कृष्णा नदी)* उतरावें. " नानानेंही लवकर कूच करण्याविषयीं लिहिलें.

३. चहंकडून अशी इशारत आल्यामुळें जमा झाली तेवढ्याच फौजेनिशीं परशुरामभाऊनें लागलीच कूच केलें व श्रावण शु॥ १३ रविवारीं पहाटेच्या दोन घटका रात्रीस उगारानजीक तो कृष्णा उतरला. धारवाड प्रांत शत्रूनें काबीज केला होता, तो पहिल्यानें सोडवावा असा भाऊनें निश्चय केला. आठ पंधरा दिवसांत जाडरहेबळीचें ठाणें घेऊन तेथें त्यानें धोंडोपंत गोखले यास ठेविलें व पुढें जुनी व नवी हुबळी हीं दोनही स्थळें सर केलीं. भाऊ हुबळीकडे गेला असें पाहून शत्रूनें धारवाडहून धोंडोपंत गोखल्यावर छापा घातला; परंतु मोठ्या मर्दुमकीनें लढून त्यानें शत्रूच्या लोकांस पिटून लाविलें. पुण्याहून नवी नवी फौज येऊन मिळतच होती. शिवाय कोइमतूरकडे इंग्रजांनीं ताण बसविल्यामुळें टिपूस धारवाडकडे दुर्लक्ष करणें भाग पडलें. भाऊनें लवकरच दोडवाड, मिश्रीकोट हीं ठाणीं घेतलीं. रायचूर-दुआबांत कुतुबुद्दीन म्हणून टिपूचा सरदार होता, त्याच्यावर निजामअलीकडील सरदार दाराजहां चालून गेला व त्यानें कुतुबुद्दिनास श्रीरंगपट्टणाकडे पिटून लाविलें. भाऊनें शत्रूचा मुलूख लवकरच पादाक्रांत करण्याचें ठरविलें व निरनिराळे सरदार पाठवून तुंगभद्रेअलीकडील बहुतेक सर्व ठाणीं सर केलीं.

४. या वेळीं खुद्द परशुरामभाऊ धारवाडला वेढा देऊन बसला होता. धारवाड हें ठाणें काबीज करणें कठीण होतें. कारण टिपूचा सरदार बद्रीजमालखान हा दहा हजार पायदळ, हजार दोन हजार स्वार व पुष्कळ तोफा या सरंजामानिशीं तेथें होता. शिवाय हा किल्ला मूळचाच बळकट असून टिपूनें अलीकडे सात लक्ष रुपये खर्चून

* ऐतिहासिक लेखसंग्रह भाग ८, लेखांक ३२०९;(१४।८।१७९०).

त्याची अधिक मजबुती केली होती. भाद्रपद शु॥ ६ (१४।९।१७९०) रोजीं भाऊ धारवाडापासून तीन कोसांवर नरेंद्र या गांवीं राहिला. तेथून दररोज धारवाडाजवळ जावें व किल्ल्यावर तोफा मारून अस्तमानीं गोटांत परत यावें, असा क्रम कांहीं दिवस चालला. शत्रूस बाहेरून दाणावैरणीचा पुरवठा यथास्थित होत होता. पुढें लवकरच भाऊनें किल्ल्यासभोंवतीं दहा कोस चोहोंकडे फौज पसरविली व शत्रूला दाणावैरण पोंचविणारे अथवा शत्रूकडील फितूर यांस कडक शासनें करण्याची त्यानें व्यवस्था केली. दूर राहून वेढ्याचें काम नीट होत नाहीं, असें पाहून आश्विन व॥८ स नरेंद्राहून गोट हालवून धारवाडपासून एक कोसावर नवलूर येथें जाऊन त्यानें तळ दिला. तेथून खरें मोर्चेबंदीचें काम सुरू झालें, व खासा भाऊ मैराळ टेकडी म्हणून एक किल्ल्याजवळ देवालय होतें तेथून मोर्चाचें काम कसें होतें तें पाहूं लागला. आश्विन व॥ ९ स सकाळीं एक मोठें युद्ध झालें. त्यांत मराठ्यांनीं शत्रूच्या तीन तोफा हस्तगत केल्या. शत्रूचें दीडशेंपर्यंत माणूस ठार व दोनशेंपर्यंत जखमी झालें. मराठ्यांकडील तीस घोडे ठार, व पन्नास जखमी झाले. एकंदर शें दीडशें माणूस जखमी झालें. 'यश चांगलें आलें. त्या दिवशीं इंग्रजानें बहुत तर्फेनें लढाई केली. त्याच्या (इंग्रजांच्या) फौजेचे बार दहा आंखांस [अंकांस] एक बार याप्रमाणें यावत् लिटली फिरून भाऊसाहेबापाशीं येई तावत्पर्यंत मार सारखा धरला होता. मग बंद केला. वडिलीं [भाऊनें] लिटलीची * तारीफ केली.'

५. मार्गशीर्ष शु॥ ६स भाऊनें धारवाडच्या पेठेवर हल्ला करून ती घेतली; मग खुद्द किल्ल्याच्या तटास शुक्रवार पेठेतून मोर्चेबंदी केली. धारवाड लवकर काबीज होत नाहीं असें पाहून मुंबईकर इंग्रजांनीं आणखी दोन तीन पलटणें भाऊच्या मदतीस पाठविलीं.

* ऐतिहासिक लेखसंग्रह भाग ८, पत्रांक ३२३८; (९।११।१७९०).

त्यांजवर मुख्य अधिकारी कर्नल फ्रेडरिक हा होता. यानंतर इंग्रजी पलटणांचें आधिपत्य त्याजकडे गेलें. किल्ल्याची तटबंदी ढांसळल्याखेरीज तो हातीं येणार नाहीं हें समजून भाऊनें आणखी तोफा आणविल्या होत्या. त्या तोफा आपल्या जिमेस घेऊन फ्रेडरिकनें किल्ल्यावर मारा सुरू केला. परंतु लवकरच दारूगोळा संपला. तेव्हां फ्रेडरिकनें मराठ्यांनीं तरी किल्ल्यावर स्वतंत्र हल्ला करावा किंवा आपणास तरी तसें करूं द्यावें असें बोलणें काढिलें. हल्ला करून धारवाड़चा किल्ला इतक्यांत सर करितां येणार नाहीं, असें भाऊस वाटत होतें, म्हणून त्यानें फ्रेडरिकचें मन वळविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण तो आपला हेका सोडीना. तेव्हां भाऊनें 'तुम्ही हल्ला करा' अशी परवानगी दिली. खंदक भरण्यास शेराचे भारे व शिड्या भाऊनें त्याच्या हवालीं केल्या. शके १७१२ माघ शु॥ ४स (७।२।१७९१) इंग्रजांनीं एकाएकीं हल्ला केला. खंदकांत भारे टाकले होते त्यांना किल्लेकऱ्यांनीं आगी लाविल्या व इंग्रजांवर तोफांचा मारा सुरू केला. तेव्हां इंग्रजांचा नाइलाज होऊन ते तसेच परत आले.हल्ल्यांत आलेल्या अपयशानें कर्नल फ्रेडरिक यास धक्का बसून तो आजारी पडला व १२ मार्च रोजीं त्याचें देहावसान झालें! शेवटीं भाऊचे मोर्चे अगदीं किल्ल्याच्या रेवर्णापर्यंत गेले. किल्ल्यांत अन्नाची टंचाई झाल्यामुळें किल्लेकऱ्यांनीं कांहीं बायकापोरें बाहेर हांकून दिलीं; परंतु मराठ्यांनीं त्यांस पिटून परत किल्ल्यांत पाठविलें. फाल्गुनअखेर शत्रु अगदीं जेरीस आला व शके १७१३ चैत्र शु ॥३स (६।४।१७९१) किल्ला मराठ्यांचे हातीं आला व पेशव्यांचें निशाण त्यावर फडकूं लागलें.तुंगभद्रेच्या उत्तरेकडचा सर्व मुलूख आतां मराठ्यांच्या हातीं आला होता.

६. पुढें चैत्र शु॥ ३सच भाऊ तुंगभद्रा उतरला व महाराष्ट्राशीं आपलें दळणवळण निर्बाध रहावें म्हणून मार्गावरील ठाणीं घेत घेत जलद श्रीरंगपट्टणकडे त्यानें जाण्याचें ठरविलें. रघुनाथराव कुरुंदवाडकर

याजबरोबर तोफा देऊन त्याची रवानगी अघाडीस केली. त्यानें संतीबिदनूर, मायकोंडा, हुपेगिरी, चेनगिरी हीं ठाणीं घेतलीं. बिदनूरकडे गणपतराव मेहेंदळे होता, त्यानें उडगणीस वेढा घातला होता. इतक्यांत शिवमोघ्याच्या ठाण्यांतील टिपूच्या सैन्यानें त्यास हुसकून लावून त्यानें घेतलेलीं ठाणीं परत घेतलीं; हें वर्तमान येतांच भाऊनें काशीपंत रानड्यास गणपतरावाच्या मदतीस पाठविलें. मग त्या दोघांनीं मिळून फिरून ठाणीं सर केलीं. शिवमोघेकरांनीं गडबड करूं नये म्हणून मोहीम संपेपर्यंत भाऊनें त्या दोघांस पांच सहा हजार फौजेसह त्याच प्रांतीं ठेविलें. विजयदुर्गाहून पेशव्यांचें आरमार कारवारांत गेलें व तेथें त्यानें वरींच ठाणीं काबीज केलीं. पावसाळ्यांत बाबूराव साळोंखे यास त्या ठाण्यांचें संरक्षण करण्यास ठेवून आरमार परत विजयदुर्गास गेलें. तिकडे साळोंखे याच्या व टिपूच्या सैन्याच्या झटापटी होऊन कांहीं ठाणीं टिपूच्या हातीं गेलीं. शिवाय भाऊनें नरसिंगराव देबाजी यास कांहीं पायदळ बरोबर देऊन कारवारकडे पाठविलें होतें. त्यानें चंदावर, होनावर, गिरिसोप, धारेश्वर वगैरे तमाम ठाणीं घेतलीं. इतक्यांत शिवमोघ्याहून शत्रूचे लोक त्याच्यावर चालून गेले. एकमेकांचीं ठाणीं पुनः पुनः काबीज करावीं असें झोंबट सारखें चाललें होतें.

७. वैशाखांत भाऊ चित्रदुर्गाकडे होता. लवकरच श्रीरंगपट्टणाला जाऊन पोंचण्याचा नानानें त्याला तगादा लाविला. स्वारीच्या पहिल्या करारांत मराठे व निजाम यांनीं इंग्रजांच्या मदतीस दहा हजार स्वार देण्याचें ठरलें होतें. तशी मागणी कॉर्नवॉलिसकडून झाल्यावरून निजामाचा मुलगा शिकंदरजहा याच्या हाताखालीं निजामाची फौज इंग्रजांच्या मदतीस गेली. त्याचप्रमाणें मराठ्यांची फौज त्यांच्या मदतीस जाणें जरूर होतें. त्यासाठीं शके १७१२ च्या फाल्गुनांत हरिपंत फडके याचीही रवानगी पुण्याहून या मोहि-

मेवर झाली. तो पानगल येथें निजामाची भेट घेऊन चैत्रांत गुत्ती-जवळ आला, व श्रीरंगपट्टणकडे कूच करूं लागला. आपण पोंचण्यापूर्वीच इंग्रजांनीं जर श्रीरंगपट्टण घेतलें तर आपणांस टिपूच्या राज्यांतील हिस्सा मिळणार नाहीं, ही भीति मराठे सरदारांस असल्यामुळें ते श्रीरंगपट्टणकडे जाण्यास उत्सुक होते. इतक्यांत बंगलूर घेऊन कॉर्नवॉलिस पुढें पट्टणकडे न जातां मद्रासकडून रसद येत होती ती हातीं घेण्याकरितां उलट जात आहे, असें वर्तमान आलें. तेव्हां तात्या (हरिपंत फडके) व भाऊ हे दोघेही बुचकळ्यांत पडले. परंतु लवकरच कॉर्नवॉलिस याचें पत्र आलें कीं, आम्ही पट्टणकडे जात आहों, तर तुम्ही भाऊस मिळवून घेऊन सत्वर इकडे यावें. तें पत्र येतांच तात्या व भाऊ आपआपले तळ हालवून पट्टणच्या रोखें कूच करूं लागले.

८. इकडे टिपूनें इंग्रज लष्करच्या आसपास राहून भोंवतालचा मुलूख इतका बेचिराख केला कीं, इंग्रजांस दाणावैरण मुळींच मिळेना. तेव्हां तें लष्कर अगदीं मेटाकुटीस आले. तथापि तें तसेंच नेटानें श्रीरंगपट्टणकडे चाललें. शके १७१३च्या वैशाख शु॥ १२स १५।५।१७९१) अरिकेरा येथें लढाई झाली. तींत टिपूचा मोड झाला. १९ मे रोजीं कॉर्नवॉलिस पट्टणच्या पश्चिमेस कनियामबाडी येथें उतरला. आतां पट्टणास मोर्चे लावावयाचे; परंतु इंग्रजांत इतकी ताकद उरली नव्हती. शिपाई व सोजीर यांस दोन दोन दिवस फाके पडावे? घोड्यास गवताचें दर्शन न झाल्यामुळें घोडदळाचें आपोआप पायदळ बनत होतें! तेव्हां कॉर्नवॉलिसनें ॲबरक्रांबीची फौज पश्चिमेकडून येत होती तिला परत जाण्यास हुकूम केला व आपल्या लष्करचा तळ हालवून बंगलूरकडे कूच केलें.

९. भाऊ व हरिपंत यांचीं लष्करें त्याच दिवशीं एकत्र झालीं होतीं, व त्यांच्या अघाडीची फौज पट्टणच्या बाजूनें तलावा काढण्यास

गेली होती. त्या मराठी फौजेचें इंग्रजांस जेव्हां दर्शन झालें, तेव्हां त्यांस अत्यंत आनंद झाला ! मराठ्यांनीं त्या वेळीं दुष्काळग्रस्त इंग्रजांस धान्याचा उदारपणानें पुरवठा केला. दहा पंधरा दिवस सर्व लष्कर एके ठिकाणीं राहिल्यावर पुढें ठराव झाला कीं, इंग्रज फौज व निजामाची फौज यांनीं बंगलुरास रहावें, हरिपंतानें शिऱ्यास रहावें व भाऊनें चित्रदुर्गाच्या आसपास असावें; पावसाळा झाल्यावर सर्वांनीं मिळून श्रीरंगपट्टणावर चालून जावें. हरिपंताजवळ पैसा नसल्यामुळें इंग्रजांपासून निराळें राहून शत्रूच्या मुलुखावर आपली गुजराण करण्याचा त्याचा विचार होता. परंतु इंग्रजांनीं बारा लाख रुपये दिल्यामुळें त्यास निराळें राहण्याचें कारण न राहून तो बंगलुरास इंग्रजांबरोबर राहिला. भाऊ बिदनूर प्रांतांत राहिला. तिकडे त्यानें त्या प्रांतांतील बहुतेक ठाणीं कबीज केलीं.

१०. शके १७१३चा पावसाळा संपल्यावर इंग्रज फौजेनें बंगलुराहून कूच केलें. तिच्याबरोबर निजामाचा मुलगा शिकंदरजहा व हरिपंत यांच्याही फौजा होत्या. हें सर्व सैन्य माघ शु. १३ (५।२।१७९२) रोजीं पट्टणास पोंचलें. टिपू पट्टणाबाहेर होता. त्यावर एकट्या इंग्रजांनीं तिसऱ्या दिवशीं रात्रीच्या वेळीं हल्ला केला. त्या वेळीं टिपूचा मोड होऊन तो शहरांत गेला. मग इंग्रजांनीं पट्टणास मोर्चेबंदी केली. लवकरच ॲबरक्रांबीचें सैन्य मलबाराकडून येऊन पोंचलें. त्यानें पश्चिमेकडे मोर्चे बांधिले. दक्षिणेची बाजू मोकळी होती. भाऊनें लवकरच तिकडे मोर्चे बसवावें असा कॉर्नवॉलिसचा मानस होता, व त्याप्रमाणें त्यानें भाऊस कळविलें होतें. ता. २२ फेब्रुवारीस टिपूनें ॲबरक्रांबीच्या सैन्यावर जोरानें हल्ला केला. परंतु त्याचा मोड होऊन त्यास शहरांत पळून जावें लागलें. आपले सर्व उपाय थकले असें पाहून टिपू शरण गेला; व शत्रु म्हणतील त्या शर्तींवर तह करण्यास कबूल झाला. इंग्रजांच्या मनांतून तह करावयाचा नव्हता. परंतु टिपूची दौलत

गारद झाल्यास इंग्रज फार प्रबळ होतील, याकरितां त्याचा समूळ उच्छेद होऊं द्यावयाचा नाहीं अशी मराठे व निजाम यांची अगोदरच मसलत ठरली होती. त्यामुळें हरिपंतानें भीड घातली व कॉर्नवॉलिस तह करण्यास कबूल झाला. लढाई बंद होते तों फाल्गुन शु॥२स भाऊ पट्टणास येऊन पोंचला. लागलीच त्यानें दक्षिणेकडून टिपूस मिळणारी रसद बंद केली, व हरतऱ्हेनें त्याला उपद्रव देण्याची पराकाष्ठा केली. तेव्हां टिपू अगदीं चवताळून गेला व भाऊचा समाचार घेऊं द्या ह्मणून कॉर्नवॉलिस यास त्यानें निरोप पाठविला. परंतु आतां तह ठरला असल्यानें तो युद्धप्रसंग टळला.

११. तहाच्या शर्ती पुढीलप्रमाणें होत्या. तीन कोटि रुपये व आपलें अर्धे राज्य टिपूनें दोस्तांस द्यावें. व या शर्तींची हमी ह्मणून आपले दोन मुलगे इंग्रजांकडे ओलीस द्यावे. हीं कलमें टिपूस असह्य होतीं. पण नाइलाज ह्मणून त्यानें तीं कबूल केलीं. या तहानें मराठ्यांच्या वांटणीस एक कोटि रुपये खंडणी व चाळीस लक्षांचा मुलूख आला. हा मुलूख ह्मणजे कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील टापू होय. यांत सावनूरचें संस्थान, पटवर्धनी जहागिरीचें लक्ष्मेश्वर, कुंदगोळ वगैरे परगणे व धारवाडचा सुभा यांचा समावेश होतो. क्यॅप्टन लिटल याचीं फलटणें भाऊबरोबर होतीं, त्यांस परत पाठवून देण्याविषयीं कॉर्नवॉलिस याजकडून लिहून आल्यावरून भाऊनें लिटल यास बहुमानार्थ हत्ती दिला आणि तो व त्याच्याबरोबरचे सात गोरे अंमलदार यांस वस्त्रें देऊन निरोप दिला. मग सर्व लष्करें परत कूच करून चाललीं. इतक्यांत महादजी शिंदे पुण्यास येत असल्यामुळें नानानें भाऊ व हरिपंत या दोघांसही फौज घेऊन लवकर परत येण्याविषयीं लिहिलें. शिंदे येण्यापूर्वी हरिपंत पुण्यास गारपिरावर येऊन दाखल झाला (शके १७१४ज्येष्ठ शु॥ ४, २५।५।१७९२).

---

९६. महादजीचा पेशव्यांचे कारभारी होण्याचा प्रयत्न.

—:०:—

महादजी शिंद्यानें आपल्या राज्याची व्यवस्था केली व मग तो मोठी फौज घेऊन दक्षिणेकडे निघाला. मोठी फौज घेऊन शिंदे येतो ही बातमी कळतांच इंग्रजांचीं दोन फलटणें नानानें मागितलीं. या मागणीप्रमाणें पलटणें आलीं नाहींत, पण शिंद्यांस मात्र जरब बसून त्यानें आपली बरीच फौज परत पाठविली. श्रीरंगपट्टणाकडे गेलेला हरिपंत महादजी बऱ्हाणपुरास येण्याच्या अगोदरच पुण्यास येऊन दाखल झाला, तेव्हां नानास थोडा धीर आला.

२. शिंदे पुण्यास कां येत आहे याविषयीं त्या वेळीं निरनिराळे तर्क सुरू झाले. कोणी म्हणत कीं, निजामअलीचें राज्य घेण्याचें त्याच्या मनांत आहे. कोणास वाटलें कीं, होळकर व अलीबहादर यांस परत बोलवावें म्हणून पेशव्यांच्या दरबारीं खटपट करण्याकरितां तो आला आहे. इंग्रजांस वाटे कीं, आमचें पुण्यास पडलेलें वजन कमी करण्याकरितांच शिंद्याचा मोर्चा इकडे वळला आहे. नाना फडणिसास पेशव्यांच्या कारभारांतून काढून टाकण्यासाठीं निजामाचा दिवाण मशीरउल्मुल्क यानें मुद्दाम शिंद्यास आणविलें, असेंही लोक म्हणत. निजामाकडे कित्येक वर्षांची बाकी थकली होती. ती वसूल करण्याकरितां नानानें अलीकडे तगादा लाविला होता. त्यास कंटाळून जाऊन मशीरउल्मुल्कानें ही खटपट केली असावी असा अंदाज होता! पहिल्यानें महादजी शिंदे जामगांवास गेला. तेथें त्यानें आपला नातू दौलतराव याचें लग्न उरकलें, व ज्येष्ठ व॥ ७ शके १७१४ (११ जून सन १७९२) रोजीं तो पुण्यास येऊन संगमावर डेरे देऊन

राहिला. 'इकडून श्रीमंत (सवाईमाधवराव) गणेशखिंडीपावेतों सामोरे गेले. तिकडून पाटीलबावा आपले बरोबरील सरदार घेऊन आले. इकडील मुत्सद्दीमंडळी व सरदारमंडळींच्या व त्यांच्या भेटी झाल्या. नंतर पाटीलबावा येऊन श्रीमंतांचे पायांवर डोई ठेवून भेटले. श्रीमंतांनीं आपले गळ्यांतील मोत्यांची माळ पाटीलबावांचे गळ्यांत घातली. येणेंप्रमाणें समारंभानें भेट बहुत चांगली * झाली.'

पुढें नाना फडणीस व महादजी शिंदे यांच्या भेटी झाल्या. त्यांत त्यांचीं निखालसतेचीं बोलणीं होऊन त्याचें वर्तमान नानानें पेशव्यांचा हैद्राबादचा वकील गोविंदराव काळे यास लिहिलें. त्या पत्रास काळ्यानें लिहिलेलें उत्तर मराठ्यांच्या वैभवाचें व नानाच्या कामगिरीचें रसभरित वर्णन होय. तें उत्तर पुढीलप्रमाणें होतें.:—

विनंति ऐसी जे:—"राजश्री पाटीलबावा जामगांवास आलियावर तुकोजी शिंदे यांचे नातू दौलतराव शिंदे, वय बारा वर्षांचें, यांचे लग्नाचा निश्चय करून, श्रीमंतांस व मंडळीस अक्षद द्यावयाकरितां फडणिसास पाठविलें. त्यांनीं श्रीमंतांस व सर्व मंडळीस अक्षद दिली. सरकारांतून राजश्री गोविंदराव बाजीबरोबर अहेर पाठविला. आम्हीं आपला अहेर वेदमूर्ति राजश्री गोविंदभट यांजबरोबर पाठविला. त्यांसी व पाटीलबावांसीं निखालसतेचें बोलणें जालें. त्यांत निखालसता बहुत पाहिली. नंतर मागाहून राजश्री आबा चिटणीस पुढें आले. त्यांसीं बोलणें होऊन, परस्परें निखालसतेचा विध (परस्परांचा संशय दूर करण्याचें कृत्य) राजश्री हरिपंततात्यासुद्धां जाला. नंतर भेटीचा समारंभ जाला. कोणे गोष्टीचा संशय राहिला नाहीं. तुम्हांस कळावयाकरितां लिहिलें×" म्हणोन आज्ञा.

ऐशियास पत्र पाहतांच रोमांच उभे राहून अति संतोष जाला. याचा विस्तार पत्रीं किती लिहूं? सीमा असे. यावरून ग्रंथांचे ग्रंथ मनांत आले. ते लिहिल्यानें बहुचकपणा दिसतो. दिसो, परंतु जें मनांत आलें त्यांतून किंचित्

---

* इतिहाससंग्रह, ऐतिहासिक टिपणें भाग १, टिपण ९.

× येथवर नानाच्या पत्रांतील मजकूर.

अमर्याद करून लिहितों. एक एक रक्कम१ मनांत आणून दीर्घ दृष्टीनें तोलून पाहिल्यास खरें आहे असेंच निघेल. तें काय ? तपशील:-अटक नदीचे अलीकडे दक्षिण समुद्रपावेतों हिंदूंचें स्थान-तुरुकस्थान नव्हे-हे आपली हद्द पांडवांपासोन विक्रमाजितपावेतों. त्यांनीं राखून उपभोग केला. त्यामागें राज्यकर्ते नादान निघाले. यवनांचें प्राबल्य जालें. २चक-त्यांनीं हस्तनापूरचें पद घेतलें. शेवटीं आलमगिराचे कारकीर्दीत यज्ञोपवीतास साडेतीन रुपये जेजया बसून, ओलें अन्न विकावें, सर्वांनीं द्यावें, हे ३ नौबत गुजरली.

त्या दिवसांत कैलासवासी शिवाजीमहाराज **शककर्ते** व **धर्मराखते** निघाले. त्यांनीं किंचित् कोन्यांत धर्मसंरक्षण केलें. पुढें कैलासवासी नानासाहेब, भाऊसाहेब **प्रचंड प्रतापसूर्य** असे जाले कीं, असें कधीं झालें नाहीं. अमुक ब्राह्मणांनीं राज्य केलें असें शास्त्रीं पुराणीं वर्णन नाहीं. परशुराम-अवतारीं काय असेल तें असो. त्या गोष्टी यांस शिंदे होळकर दोन बाजू होऊन प्राप्त जाल्या. हल्लीं श्रीमंतांचे पुण्य-प्रतापेंकडून व राजश्री पाटीलबावांचे बुद्धि व तरवारेच्या पराक्रमेंकडून सर्व घरास आलें. परंतु जालें कसें ? प्राप्त जालें तेणेंकडून मुलभता वाटली. अगर मुसलमान कोणी असे, तरी मोठे मोठे तवारीखनामे४ जाले असते. यवनाच्या जातींत तिळाइतकी चांगली गोष्ट जाल्यास गगनाबराबर करून शोभवावी; आमचे हिंदूंत गगनाइतकी जाली असतां उच्चार न करावा हे चाल आहे. असो. अलभ्य गोष्टी घडल्या. उग्याच दौलती पुसत घरास आल्या. यांचें संरक्षण करणें परम कठिण ! दोस्त दुष्मन फार. यवनांचे मनांत कीं ५काफरशाही जाली हें बोलतात.

लेकिन६ ज्यांनीं ज्यांनीं हिंदुस्थानांत शिरें उचललीं, त्यांचीं शिरें पाटीलबा-बांनीं फोडिलीं. कोणाच्याही मनांत हे वहाडले, तें शेवटास जाऊं नये. यास्तव, नाना स्वरूपें व युक्तीकडून नाश करावे ऐसे आहेत. न लाभाव्या त्या गोष्टी लाभल्या. त्यांचा बंदाबस्त शककर्त्याप्रमाणें होऊन उपभोग घ्यावे हें पुढेंच आहे. कोठें पुण्याईत उणें पडेल आणि काय **दृष्ट लागेल** न कळे.

१ गोष्ट. २ मोंगलांनीं. ३ नौबत गुजरली=द्वाही फिरली.
४ बखरी. ५ लबाड लोकांची बांदशाही. ६ परंतु.

झाल्या गोष्टी यांत केवळ मुळख, राज्य प्राप्त, इतकेंच नाहीं, तरी वेद-शास्त्ररक्षण, धर्मसंस्थापन गोब्राह्मणप्रतिपालन, सार्वभौमत्व, हातीं लागणें, कीर्ति यश यांचे नगारे वाजणें, इतक्या गोष्टी आहेत. हे १किमया संभाळणें हक्क आपला व पाटीलबावांचा ! यांत वेत्यास पडला कीं, दोस्त दुष्मन मजबूद. संशय दूर जाले, हें अति चांगलें ! अति चांगलें ! या-उपरी हे जमाव व या फौजा लाहोरच्या मेदानांत असाव्या. त्यांचे मनसबे दौडावे, वेत्यास पडावे, तमाशे पहावे, असे जन जे आहेत ते उशापाय-थ्यास लागून आहेत. चैन नव्हतें. आतां आपण लिहिल्यावरून स्वस्थ जालें. जितकें लिहिलें इतक्याचें उगेच मनन व्हावें. खरें कीं लटकें हें समजावें. रवाना छ ११ जिल्काद हे विनंती*" (आषाढ शु॥ १३ शके १७१४, २।७।१७९२).

३. पुण्यास आल्यावरोबर बादशहानें पेशव्यास दिलेलीं फर्मानें पोशाक, व राजचिन्हें अर्पण करण्याबद्दल महादजीनें बोलणें काढलें. बादशहानें दिलेलें महाराजाधिराज हें पद पेशव्यानें धारण केल्यास सातारच्या राजाचा अपमान होईल असें नानाचें म्हणणें होतें. म्हणून तें पद स्वीकारूं नये असा नानाचा हेतु होता. पण शिंद्यानें सातारच्या राजाकडून परवानगी आणिली. तेव्हां नानास आपलें म्हणणें परत घ्यावें लागलें.आषाढ शु॥ ३स (२२।६।१७९२) शिंद्यानें संगमाजवळ एक जंगी दरबार भरवून सवाईमाधवरावास 'वकील-इ-मुताल्लिक'चीं वस्त्रें अर्पण करण्याचा मोठा समारंभ साजरा केला. समा-रंभ आटपल्यावर सवाईमाधवराव मोठ्या थाटानें मिरवत शनिवार-वाड्यांत परत आला. नंतर त्याच बैठकींत पेशव्यानें महादजीस 'वकी-ल-इ-मुताल्लिक'च्या नायबीचीं वस्त्रें दिलीं. त्या वेळीं महादजीनें मोठ्या विनयानें भाषण केलें:-" बादशहानें मला राजे महाराज, मदारउ-लमहाम अलिजाबहादर असे लांब किताब दिले, यांचें भूषण वाटत

१अद्भुत कृति. *इतिहाससंग्रह, ऐतिहासिक टिपणें भाग १, टिपण १३.

नाहीं. मला श्रीमंतांचे जोडे उचलण्याच्या कामांतच धन्यता वाटते!"

४. महादजीस पुणेंदरबारांतील सर्व कारभार आपल्या हातांत घ्यावयाचा होता, त्यासाठीं त्याची खटपट सुरू झाली. त्यानें प्रथम पेशव्याचें मन आपल्याकडे ओढण्याच्या युक्त्या चालविल्या. महादजीच्या अंगीं वक्तृत्व चांगलेंच होतें ! गोड व अघळपघळ बोलून भुरळ पाडण्यांत त्याचा हात धरणारा फारच विरळा ! सवाईमाधवराव अजून लहान वयाचाच असल्यामुळें नाटकी आविर्भावास भुलण्यासारखीच त्याची मनोरचना होती. महादजी दरबारास नेहमीं जाऊं लागला. सवाईमाधवरावासही शिंद्याविषयीं प्रेम उत्पन्न झालें, व नानाच्या गंभीर वृत्तीचा व नियमितपणाचा कंटाळा आला. इकडे पेशव्याच्या मनांत अशा तऱ्हेचे विचार उत्पन्न करून दरबारच्या कामांतही महादजी ढवळाढवळ करूं लागला. एके दिवशीं महादजी भर दरबारांत बोलला. "इतके दिवस स्वाऱ्या व मुलुखगिऱ्या करून पुष्कळ देश जिंकले; व वजिरात वगैरे करून श्रीमंतांचा लौकिक अटकेपर्यंत केला. तर आतां शेवटची इच्छा हुजूरच्या जवळ राहून दौलतीचा कारभार करण्याविषयीं आहे. यासाठीं माझे दौलतीचा हिशेब आपण घ्यावा, व सरकारचे दौलतीचा हिशेब मला द्यावा!!" हें भाषण ऐकून शिंद्याचा हेतु सर्वांस कळला. नाना आणि हरिपंत यांस अत्यंत वाईट वाटलें. इतक्यांत उत्तर हिंदुस्थानांत शिंदे व होळकर यांच्या सैन्यांत चुरस पडून शेवटीं लाखेरीस युद्ध झालें(२०।९।१७९२); त्यांत होळकराचा पूर्ण पराजय झाला. तेव्हां होळकरानें त्वेषानें जाऊन उज्जनी शहर जाळून फस्त केलें. या बातम्या पुण्यास येतांच येथेंही असाच हातघाईचा प्रसंग आल्यास आपल्याकडून तयारी असावी म्हणून नानानें परशुराभाऊस दोन हजार स्वारांनिशीं बोलावून आणिलें. त्यामुळें शिंद्यासही फौज वाढविण्यास सवड झाली. पण नाना व शिंदे दोघेही शहाणे. याकरितां दोघांनीं पेशवे सांगतील

त्याप्रमाणें ऐकावें असें ठरलें. पण हा ठराव फार दिवस चालला नाहीं.

५. महादजीनें पेशव्यास बरोबर घेऊन शिकारीस जाण्याचा परिपाठ पाडला होता. शिंद्याबरोबर जेव्हां पेशवा जाईल तेव्हां त्याच्याबरोबर परशुरामभाऊ पटवर्धन यानें जावें अशी नानानें तजवीज केली होती. शिवाय पेशव्यांचे नोकर नानाच्या बळणाचे असत; त्यामुळें शिंद्यास पेशव्याशीं राज्यकारभारांतील मसलतीविषयीं बोलण्यास संधी सांपडत नसे. परंतु एके दिवशीं पेशवे व महादजी पर्वतीहून परत येत असतां हिराबागेच्या मागें पर्वतीच्या तलावांत नावेंत बसून चालले. तेव्हां नावाड्याशिवाय दुसरा कोणी परका माणूस तेथें नव्हता. ही संधी उत्तम आहे असें पाहून महादजीनें कारभार आपल्या हातीं देण्याविषयीं पेशव्यास विनंती केली. तेव्हां सवाईमाधवरावानें उत्तर केलें: "नाना व तुम्ही माझे दोन हात; उजवा हात नाना व डावा हात तुम्ही. या दोन हातांपैकीं कोणताही हात कमी झाला तरी मी लंगडा होणार ! याकरितां आहे हीच व्यवस्था चालवावी हें उत्तम !" या उत्तरानें महादजी खजील होऊन स्वस्थ बसला.

६. पुढें ही हकीकत नानास समजली, तेव्हां त्यानें पेशव्यास एकांतीं गांठून भाषण केलें. "पाटीलबावांनीं मराठी शिलेदारांस निरोप देऊन परक्या लोकांची कवायती फौज तयार केली व तीवर टोपीवाले अधिकारी नेमिले. यावरून ब्राह्मणांस निर्माल्यवत् करून सर्व सत्ता आपल्या हातीं घेण्याचा त्यांचा इरादा दिसतो. सरकारचीही मर्जी त्यांजवर विशेष. मीं आड यावें तर सरकारचें मला पाठबळ नाहीं. श्रीमंत गर्भस्थ होते. तेव्हांपासून इमानानें सेवा करून मराठी राज्य मीं इतक्या नांवारूपास आणिलें. आतां ब्राह्मणी सत्तेचा विनाशकाल आलेला दिसतो. त्याकरितां ती वेळ येण्यापूर्वीच कोठें तरी एकांतांत बसून कालक्षेप करावा असें मनांत आलें आहे. श्रीमंतांनीं कृपा करून मला काशीस जाण्यास निरोप द्यावा." हें भाषण करितांना

नानाच्या डोळ्यांतून पाणी आलें. नानाचें भाषण ऐकून पेशव्यास गहिवर आला व नानाच्या गळां पडून तो म्हणाला, " आजपर्यंत

गोळपकर–जोशी–संग्रह. संशोधक–द. वा. पोतदार. भा. इ. स. मं. पुणें.

तुम्हीं मला मोठें केलेंत व प्रत्यक्ष पितासुद्धां करणार नाहीं असें प्रेम

मजवर केलेंत आणि आज मला सोडून जाण्याची गोष्ट बोलतां ! काशीस जाण्याची गोष्टसुद्धां बोलूं नका. इतःपर शिंदे बोलतील तें मी ऐकूनसुद्धां घेणार नाहीं. " याप्रमाणें पेशवे व नाना यांचीं मनें निर्मळ झालीं. शेवटीं या वादाचा निकाल लावण्यासाठीं हरिपंतानें महादजीची भेट घेतली. त्यानें महादजीस सांगितलें कीं, मी व नाना दोघेही काशीस जातों; तुम्हांस दौलतीचा कारभार पहावयाचा तो खुशाल पहावा. यावर " माझ्या मनांत कारभार करावयाचें होतें; पण खावंदांची मर्जी दिसत नाहीं, तेव्हां मीं तो नाद सोडला आहे; तुम्हीं कारभार पहावा; " असें महादजीनें उत्तर दिलें. एव्हांपासून त्याचा नानाशीं एकोपा झाला. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं. पुढें थोड्याच दिवसांनीं नवज्वराची भावना होऊन वानवडी येथें महादजी शके १७१५ माघ शु. १३ स (१२।२।१७९४) वारला. पानिपतचें युद्ध म्हणजे मराठी सत्तेवरील एक गंडांतरच येऊन गेलें. त्यानंतर मराठी राज्यास सावरून धरणारे जे कर्ते पुरुष निघाले त्यांत महादजीची प्रमुखत्वानें गणना होते. इंग्रजांशीं 'कारभाऱ्यांनीं' जी लढाई दिली तींत महादजीचा त्यांस पुष्कळ उपयोग झाला. नंतर त्यानें आठ दहा वर्षें स्वतंत्रपणें दिल्लीचा कारभार केला व मग तो दक्षिणेंत आला. शेवटीं तो व नाना यांचें ऐकमत्य झालें; व मराठी सत्ता पुनः जोरदार होणार अशीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. इतक्यांत महादजी वारला. पुढें लवकरच हरिपंत फडके, अहल्याबाई होळकर व तुकोजी होळकर हीं मोलवान् मोहरीं गळून पडलीं. त्यामुळें मराठी राज्याचे एकामागून एक आधारस्तंभच नाहींसे झाल्यासारखे झाले. महादजीला संतती नव्हती. त्यानें आपला धाकटा भाऊ तुकोजी याचा नातू दौलतराव यास दत्तक घेण्याविषयीं पुष्कळदां गोष्ट काढिली होती. पुढें तेरावे दिवशींच पेशव्यांच्या सम्मतीनें दौलतरावास सरदारीचीं वस्त्रें देण्यांत आलीं.

---

१७. खर्ड्याची लढाई.

(शके १७१६; इ. स. १७९५)

—:o:—

निजामअलीकडील चौथाईची बाकी वसूल करण्यासाठीं नानानें तगादा चालविला होता हें मागील गोष्टींत सांगितलेंच आहे.पण निजामाचा दिवाण मशीरउल्मुल्क हा मुळींच दाद देईना. शिंदे वारला व पुढें थोड्याच दिवसांनीं मराठ्यांचा दुसरा पराक्रमी सरदार हरिपंत फडके हाही शके १७१६च्या ज्येष्ठ व॥७ स वारला. या दोघांच्या मृत्यूमुळें मराठ्यांशीं लढाईचा प्रसंग आला तरी हरकत नाहीं, असा निजामास धीर वाटूं लागला. पेशव्यांचा निजामच्या दरबारचा वकील गोविंदराव काळे यानें निजामअलीस नानानें तयार केलेली एक याद दाखविली व सांगितलें कीं, या यादीप्रमाणें दोन कोटि सात लक्ष रुपये पेशव्यांचें निजामाकडे येणें निघतें. त्यावरून मशीरउल्मुल्काचा व काळ्याचा मोठा कडाक्याचा वाद झाला. शेवटीं मशीर म्हणाला, "या यादींतील कलमांचा अर्थ आम्हांला समजत नाहीं.तो समजावून देण्यासाठीं तुमच्या नानास येथें आणिलें पाहिजे." यावर गोविंदरावानें उत्तर केलें, " नानांस उद्योग आहेत, ते सोडून ते येथें कसे येतील?" लागलीच मशीर आवेशानें बोलला, "ते येथें कसे येतील? पहा, त्यांस लवकरच येथें आणतों !" एके दिवशीं मशीर दरबारांत म्हणाला, 'पेशव्यांपासून आम्हीं पुष्कळ अपमान सोशिला. यापुढें पेशवे नीट वागले तर बरें. नाहींतर पेशव्यांस लंगोटी नेसवून हातीं भोपळा देऊन काशीस गंगेच्या कांठावर जप करण्यासाठीं धाडल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाहीं ! ' याप्रमाणें लढाई करण्यासाठीं मराठ्यांचीं मनें चेतविण्याची कोणतीही गोष्ट करण्याचें निजामाच्या लोकांनीं ठेविलें नाहीं. एकदां दरबारच्या करमणुकीसाठीं त्यांनीं तमाशा

करवून त्यांत नाना व सवाईमाधवराव यांचीं सोंगें आणण्याचें सुद्धां धाडस केलें ! त्या वेळीं मात्र गोविंदराव काळ्यानें उठून सांगितलें कीं, " येथें आमच्या धन्याचीं सोंगें आणलीं जातात, त्याअर्थी आम्ही आतां पुण्यास परत जातों. मात्र इतकेंच सांगतों कीं, या अपमाना-बद्दल तुमचे दिवाण मशीरउल्मुल्क यांस धरून नेऊन पुण्यास दारो-दार हिंडवूं. " याप्रमाणें बोलणें झाल्यावर काळे पुण्यास आला. हैद्राबादच्या हकीकती कळतांच नानानें लढाई करण्याचा निश्चय केला.

२. नानानें दौलतराव शिंद्यास आपली हिंदुस्थानांतील फौज व प्रख्यात सरदार जिऊबादादा बक्षी यांस तुम्हीं आणावें, असा हुकूम केला. त्याचप्रमाणें त्यानें होळकर, भोंसले, गायकवाड, पटवर्धन, रास्ते, प्रतिनिधि इत्यादि सर्व जहागीरदारांस जलदीनें पुण्यास येण्याविषयीं लिहिलें. निजामअलीच्या पारिपत्यासाठीं दीड लाख मराठी फौज जमली. या सैन्याचें आधिपत्य नानानें परशुरामभाऊ पटवर्धनास दिलें. शके १७१६ (डिसेंबर सन १७९४) च्या पौषांत पुण्याहून पेशवे व नाना कूच करून चालले. वाटेंत शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले, पटवर्धन, वगैरे सरदारांच्या फौजा मिळाल्या. दोन महिन्यांनीं सैन्य सरहद्दीवर जाऊन पोहोंचलें.

३. अघाडीस ऐशीं हजार उत्कृष्ट फौज दीडशें तोफांसह चालत होती. दहा पंधरा हजार पेंढारी शत्रूच्या मुलुखांत शिरून लुटालूट करीत होते. बुणगें व तोफा वगैरे जड सामान बरोबर ठेवून पेशवे व नाना एक मुक्काम मागें असत. याप्रमाणें स्थिति असतां निजामअली एक लक्ष दहा हजार फौज बरोबर घेऊन येत होता. त्याची व मराठ्यां-ची परिंड्याच्या आसपास फाल्गुन वद्याच्या आरंभीं गांठ पडूं लागली. षष्ठीच्या दिवशीं (११।३।१७९५) परशुरामभाऊनें शिंदेहोळकर यांच्या फौजा व हुजरातीच्या पागा वगैरे लढाईच्या तयारीनें उभ्या केल्या व शत्रु कसा चालून येत आहे, हें पाहण्यासाठीं तो स्वतः थोडके लोक

बरोबर घेऊन पुढें गेला. तेथें बरीच लढाई होऊन पठाणांनीं भाऊस जखमी करून मागें हटविलें. द्वितीयेच्या दिवशीं हरिपंत फडक्याचा मुलगा रामचंद्र हरि ऊर्फ बाबा फडके यानें घाईघाईनें हल्ला केला असतां शत्रूनें त्यास मागें हटविलें होतें. या दोन ठिकाणीं शत्रूची सरशी झाल्यामुळें मराठी फौजेंत गडबड उडाली. ही बातमी नानास कळतांच पेशव्यांसह आपण मागें हटावें, असें त्यास वाटूं लागलें. त्यानें भोंसले, शिंदे वगैरे सरदारांकडे सांडणीस्वार पिटाळून त्यांस विचारलें कीं, निजामाची सरशी होत असतां तुम्ही स्वस्थ कां बसला ? तेव्हां शिंद्याच्या फौजेवरील सरदार जिऊबादादा बक्षी यानें चिठी लिहिली कीं, " थोडेसें लढाईचें तोंड लागलें. इतक्यामुळें सरकार घाबरून सांडणीस्वार रवाना केला, त्यास हल्लीं विनंति लिहिली आहे. लढाईची सरशी करून नबाब निजामअलीखानास धरून आणूं किंवा डोकें कापून आणूं. " ही चिठी वाचून नानास धीर आला.

४.इकडे मराठ्यांच्या सज्ज फौजेशीं सामना देण्यास निजामाकडील सरदार असदअलीखान हा घोडेस्वार व सतरा हजार गारदी यांसह मराठ्यांवर चालून आला. तेव्हां भोंसल्यानें निजामावर बाणांचा पाऊस पाडला व शिंद्यानें तोफांचा भडिमार फारच केला. या दोन्ही माऱ्यांपुढें निजामाचे स्वार पळून गेले, व खाशा निजामअलीच्या मनांत भीति उत्पन्न होऊन तो मागें हटला. इतक्यांत गारद्यांसही मागें फिरण्याविषयीं निजामअलीकडून हुकूम आल्यामुळें गारदीही हटले. तेव्हां सूर्यास्त झाला होता. अंधार पडल्यावर तें निजामाचें घाबरलेलें सैन्य खर्ड्याच्या गढीच्या आसऱ्यास उतरलें होतें, त्यावर मराठे छापा घालावयास आल्याची खोटीच हूल उठून तें सारें आपलाच खजिना लुटून घेऊन रानोमाळ पळत सुटलें. वाटेंत मराठ्यांचे पेंढारी फिरत होते, त्यांनीं निजामाकडील पळपुट्या लोकांस गांठून त्यांची सर्व चिजवस्त लुटून घेतली. आपल्या सैन्याची अशी दुर्दशा झालेली

पाहून निजामअली दहा हजार फौजेसह खर्ड्याच्या गढींत शिरला. दुसऱ्या दिवशीं मराठ्यांनीं त्यास चोहींकडून घेरून तोफांचा मारा सुरू केला. नंतर दोन दिवस पराकाष्ठेचे हाल सोसल्यावर तिसऱ्या दिवशीं निजामानें तहाचें बोलणें लाविलें. परंतु 'अगोदर माशिरास आमच्या हवालीं करा. मग तह करूं' असें पेशव्यांचें बोलणें पडलें. तेव्हां निजाम मोठ्या पेंचांत पडला. त्या समयीं तो स्वाभिभक्त मशीर निजामास बोलला कीं, 'माझ्या जाण्यानें दौलत वांचत असेल तर मी खुषीनें जातों.' मग निजामअलीनें 'मशीर देतों. काय वाटेल तें देतों; पण मला या विपत्तींतून सोडवा' असा निरोप पाठविला.

५. पेशव्यांनीं मशिरास आपल्या ताब्यांत घेतलें व मग तह ठरला. त्यांत पुढीलप्रमाणें कलमें कायम झालीं. "परिंड्यापासून उत्तरेस तापीपर्यंत पूर्वी उदगीरच्या लढाईच्या वेळीं सदाशिवरावभाऊनें जिंकलेला सर्व मुलूख निजामानें मराठ्यांस द्यावा. लढाईचा खर्च व मार्गील बाकी यांजबद्दल मराठ्यांस तीन कोटी रुपये मिळावे. रघूजी भोंसल्याच्या गंगथडींतील घांसदाण्याच्या हक्काबद्दल तीन लक्ष अठरा हजार रुपये उत्पन्नाचा मुलूख निजामानें भोंसल्यास द्यावा. शिवाय त्याला वऱ्हाडच्या वसुलापैकीं वांटणीच्या बाकीबद्दल एकुणतीस लक्ष रुपये व यापुढें वऱ्हाडच्या वसुलाची वांटणी पूर्वीप्रमाणें निजामाकडून मिळावी." याप्रमाणें तह ठरल्यावर मराठ्यांनीं निजामास सोडून दिलें. नंतर सारें लष्कर परत निघालें, तें शके १७१७ (सन १७९५) च्या वैशाखाच्या प्रारंभीं पुण्यास आलें. नवीन मुलूख सरदारांस वांटून देण्याचें काम झाल्यावर निरानिराळे सरदार आपआपल्या ठिकाणीं परत गेले.

६. पूर्वी थोरला माधवराव पेशवा मृत्यु पावला (इ. स. १७-७२); तेव्हां राघोबा हा कलिपुरुष मोकळा सुटला व त्यानें कोवळ्या नारायणरावाचा खून करविला. त्यामुळें मराठी राष्ट्रावर अरिष्ट कोस-

ळलें व मराठी राज्याची धडगत कशी राहणार याचा संशय वाटूं लागला. अशा कठिण प्रसंगीं कार्यनिष्ठ मराठी मुत्सद्दी व सरदार यांनीं बाळाजी बाजीरावाचा वंश पेशवेपदावर कायम करण्याचा निश्चय केला. त्याबरोबर घरबुडव्या राघोबानें सुरतेस जाऊन इंग्रजांचा आश्रय घेतला. तेव्हां मराठ्यांस हिकमती इंग्रजांशीं लढावें लागलें. सात वर्षें युद्ध चालून त्यांत नाना फडणिसाच्या मसलतीमुळें व महादजी शिंद्याच्या शौर्यामुळें मराठ्यांस शेवटीं जय आला व राघोबास नाक घाशीत कोपरगांवास येऊन स्नानसंध्या करीत रहावें लागलें (इ. स. १७८३). या संकटकालीं हैदरनें दक्षिणेकडून मराठी मुलुखावर धाड घालून कोपळ, बादामी, धारवाड इत्यादि मुलूख घेतला व आपल्या राज्याची सरहद्द कृष्णेपर्यंत पुढें रेटली; निजामअलीनें एकंदर तीस लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख लाटला; व उत्तरेस दिल्लीकडे नजफखान या कारस्थानी मुसलमान सरदारानें दिल्लीदरबारांतून मराठ्यांची हकालपट्टी केली. इंग्रजांशीं युद्ध संपल्यावर या सर्व शत्रूंचा समाचार घेणें मराठ्यांस भाग पडलें. हैदरचा मुलगा टिपू याजवर त्यांनीं दोन जंगी स्वाऱ्या करून आपली सरहद्द पुनः तुंगभद्रेस नेऊन भिडविली. उत्तरेस महादजी शिंद्यानें कवायती फौजेच्या जोरावर मराठी सत्तेचें वजन दिल्लीदरबारीं स्थापित केलें. पुढें सर्व मराठी फौजा निजामअलीवर चालून गेल्या व खर्ड्याच्या लढाईंत त्याचा पुरा मोड करून त्याजपासून त्यांनीं चौथाईची बाकी व लढाईचा खर्च चोपून घेतला (इ. स. १७९५). या वेळीं सर्व मराठे सरदार एकीनें वागले व त्यामुळें मराठी सत्तेचा दरारा हिंदुस्थानांतील सर्व राज्यकर्त्यांवर बसला. येणेंप्रमाणें नारायणरावाच्या खुनानंतरच्या बावीस वर्षांच्या काळांतील पहिलीं अकरा वर्षें एका भयंकर युद्धांत मराठ्यांनीं आपलें संरक्षण केलें व पुढील अकरा वर्षांत चढाई करून पुनः मराठी सत्तेचा दरारा वाढविला. तसेंच प्रथमार्धांत त्यांनीं बराच मुलूख

गमावला; परंतु द्वितीयार्धांत त्यांनीं तो सर्व कमावला. या बावीस वर्षांपैकीं पहिल्या भागांत मराठ्यांच्या अन्तःशत्रूंची व बहिःशत्रूंची चलती होती; परंतु दुसऱ्या भागांत ते सर्व हतप्रभ होऊन मराठी दौलतीची एकसारखी भरभराट झाली व ती कळसास चढणार असा रंग दिसूं लागला.

---

१८. सवाईमाधवरावाचा मृत्यु.

——:o:——

सवाईमाधवरावाच्या जन्मापासून नाना फडणिसानें उत्कट स्वामिनिष्ठा धरून मराठी राज्याचा संभाळ केला, व शेवटीं सर्व मराठे सरदारांचें ऐक्य करून खर्ड्याची लढाई जिंकली. हा जय म्हणजे नानाच्या राज्यकारभारांतील यशाचा अत्युच्च बिंदु होय. या वेळीं चोहों बाजूंनीं नानास अनुकूल परिस्थिति होती. दौलतराव शिंद्याच्या मनांत नानाविषयीं आदर होता. तुकोजी होळकर आतां म्हातारा व अशक्त झाला होता. त्यामुळें तोही नानाच्या विरुद्ध जाण्याचा संभव नव्हता. रघूजी भोंसले तर पूर्णपणें नानाच्या कह्यांत आला होता व ब्राह्मण जहागीरदार तर पहिल्यापासूनच पेशवाईचे हितचिंतक होते. अशा रीतीनें सर्व मराठ्यांवर पेशवाईची छाप पडल्यामुळें मराठी राज्यांत एकी होऊन तें फिरून वैभवास चढेल, असें वाटूं लागलें होतें. सवाईमाधवरावही हळूहळू कारभारांत लक्ष घालूं लागला होता. पुण्यास घाशीराम नांवाचा कोतवाल होता.तो लोकांवर फार जुलूम करीत असे. त्याच्या जुलुमाला ब्राह्मणलोक अगदीं कंटाळून गेले होते.एके दिवशीं ब्राह्मणांनीं घाशीरामाच्या जुलुमाची हकीकत पेशव्याच्या कानावर घातली. तेव्हां पेशव्यानें चौकशी करून घाशीरामास देहान्त प्रायश्चित्त भोगावयास लाविलें (३१।८।१७९१). पुढें त्यानें खर्ड्या-

च्या स्वारीस निघतांना एक ब्राह्मणांची पंचाईत तोडली. अशाप्रकारें राज्यकारभार स्वतः पेशवा हळूहळू करूं लागला. सवाईमाधवराव आतां बावीस वर्षांचा झाला होता, तो राज्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेईल व नाना आदिकरून मराठमंडळानें 'नानासाहेबांचा वंश' पेशवाईवर कायम करण्याकरितां जी जिवापाड मेहनत केली तिचें चीज करील अशी आशा वाटूं लागली.

२. राघोबाचें कुटुंब कोपरगांवीं रहात होतें; तेथें आनंदीबाईच्या जिवास समाधान नाहींसें झालें. म्हणून नानानें तीस व तिच्या मुलांस ×आनंदीवल्लीस नेऊन ठेविलें. तेथें गेल्यावर लवकरच आनंदी बारली (१२।३।१७९४). या वेळीं तिचा थोरला मुलगा बाजीराव याचें वय एकोणीस वर्षांचें होतें, व धाकटा चिमाजीआप्पा बारा वर्षांचा होता; याशिवाय राघोबाचा दत्तक पुत्र अमृतराव हाही आनंदवल्लीस होता. बाजीराव देखणा असून त्याचें भाषण इतकें मोहक होतें कीं, जेणेंकरून माणूस कसा कां शहाणा असेना, तो त्यास भुलून जाई. राघोबाच्या मुलांविषयीं व विशेषतः बाजीरावाविषयीं नानाच्या मनांत धास्ती असे. खर्ड्याच्या लढाईस जाण्यापूर्वी त्यानें तिघांही मुलांस शिवनेरीस पक्क्या बंदोबस्तानें ठेविलें होतें. याचें कारण असें कीं, बाजीराव राज्यप्राप्तीसाठीं कांहीं कारस्थान केल्याशिवाय रहावयाचा नाहीं, अशी नानास भीति होती. पुढें स्वारीहून परत आल्यावर नानानें त्या तिघांस शिवनेरीस तसेंच ठेविलें.

३. पराचा कावळा करण्याची लोकांस संवय असतेच. त्या बुद्धीस

×चावडस हें खेडें नाशिकापासून मैल दीड मैलावर आहे. चावडस व आनंदवल्ली एकच. राघोबाची बायको आनंदीबाई हिच्या नांवावरून या खेड्यास आनंदवल्ली हें नांव पडलें. आनंदीबाईची या स्थळावर फार प्रीति होती व तिच्या मनांत येथील वस्ती वाढवीत वाढवीत नाशिकपर्यंत न्यावी असें होतें.

अनुसरून लोकांत बाजीरावाच्या गुणांची फारच प्रसिद्धि होऊं लागली, व नानानें ठेविलेला कडक बंदोबस्त लोकांस क्रूरपणाचा वाटला. अशा स्थितींत राघोबास चाहणाऱ्या लोकांनीं नानाच्या वर्तनाबद्दल गवगवा केला, आणि बाजीरावाचा सारखा स्तुतिपाठ चालविला. लागलीच घोड्यावर बसणें, दांडपट्टा खेळणें, तिरंदाजी करणें, या कामांत बाजीराव फार पटाईत आहे आणि भाला व बोथाटी खेळण्याच्या कामांत त्याच्यासारखा साऱ्या गंगथडींत कोणी नाहीं; अशा गप्पा चहूंकडे सुरू झाल्या. शिवाय संस्कृत विद्येतही त्याची फारच गति आहे असा लोकप्रवाद होता. लवकरच ही प्रशंसा पेशव्याच्या कानावर गेली, व बाजीरावास आपण आपला कारभारी करावें असें त्यास वाटूं लागलें. ही गोष्ट नानास समजली तेव्हां त्यानें पेशव्याचा चांगला निषेध केला, पण जों जों निषेध करावा तों तों पेशव्याची बाजीरावाच्या ठायीं अधिकच प्रीति जडली; त्यामुळें नानाचें मन चिंताक्रांत झालें व त्यानें पेशवे कोठें जातात, काय करतात, इत्यादि गोष्टींवर जास्त नजर ठेविली. शिवनेरीवर बाजीराव होता, तेथलाही बंदोबस्त त्यानें जास्त कडक केला. पण शिवनेरीच्या बंदोबस्तास ठेविलेला बळवंतराव नागनाथ वामोरीकर बाजीरावास वश झाला होता. बाजीरावानें पेशव्यास असा निरोप पाठविला कीं, " तुमच्या व आमच्या स्थितींत कांहीं फरक नाहीं. तुम्ही शनिवारवाड्यांत कैदेत आहां, मी शिवनेरीस आहें, इतकेच. असें जरी असलें तरी आपण मजवर प्रेम ठेवावें. पुढें मागें आपण आपल्या पूर्वजांसारखा पराक्रम करूं." यानंतर त्यांचा गुप्त पत्रव्यवहार सुरू झाला. ही गोष्ट नानास समजतांच त्यास पराकाष्ठेचा राग आला. त्यानें लागलीच बळवंतराव नागनाथास कैदेत टाकिलें व बाजीरावावर सक्त पहारा ठेविला. इतकेंच करून न थांबतां पेशव्याच्या हातचीं पत्रें बाजीरावाकडे गेलीं होतीं तीं पेशव्यास दाखवून त्यानें त्याचा फार निषेध केला.

४. वरील गोष्टी घडल्या तेव्हां शके १७१७ (तन १७९५) चा आश्विन महिना लागला होता. नवरात्रांत सवाईमाधवरावास ताप येऊं लागला, व त्यांत कांहीं वातविकृतिही होऊं लागली. वायूच्या लहरीमध्यें त्याच्या हातून भलतेंच कांहीं न घडावें म्हणून त्याच्या-भोंवतीं सारखा माणसांचा पहारा असे. दसऱ्याच्या दिवशीं पेशव्याची स्वारी शिलंगणास निघाली असतां बेहोष होऊन अंबारीखालीं उडी टाकण्याचा त्यानें प्रयत्न केला. तेव्हां खवासखान्यांत आप्पा बळवंत मेहेंदळे होता. त्यानें पेशव्यास एका हातानें आवरून दुसऱ्या हातानें कमरेचा शेला सोडून त्यायोगें पेशव्यास व आपणास गच्च बांधून घेतलें. ही बातमी लोकांत पसरतांच सर्व समारंभाचा विरस होऊन सालाबादप्रमाणें स्वारी अवशीच्या दोन घटका रात्रीं परत यावयाची ती चार घटका दिवसासच वाड्यांत परत आली !

५. या प्रसंगानें माधवरावाच्या प्रकृतीबद्दल सर्वांस अत्यंत काळजी वाटूं लागली. नानानें पेशव्याच्या हातून वायूच्या लहरींत केव्हां काय भयंकर गोष्ट होईल याचा नियम नाहीं असें जाणून त्याच्याभोंवतीं रात्रंदिवस पहाऱ्यास माणसें ठेविलीं. पण दैवगति विचित्र असल्यामुळें त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. 'आश्विन शु॥१२ रविवार ते दिवशीं श्रीमंतांस ज्वरांशांत वायू झाला होता. प्रातःकाळीं गणपतीचे दिवाणखान्यावर रंगमहाल आहे, तेथें निद्रेचें स्थान, तेथें गेले व पलंगावर बसले होते. वायूचे भरडींत काय मनास वाटलें न कळे, पलंगावरून उठोन दक्षिणेकडील खिडकींत उभे राहिले. खिजमतगार यानें शालेस (शालजोडीस) हात लाविला कीं येथें उभें राहणें ठीक नाहीं. तों एकाएकींच तेथून उडी टाकली. खालीं दीड भाला खोल कारंजीं हौद आहे, तेथें कांठावर पडून आंत पडले. उजवी मांडी मोडून हाड बाहेर निघालें. दांतांची कवळी पडली. नाकावाटें रक्त निघालें. तेथून उचलून राजश्री नानांनीं ऐनेमहालांत नेलें. तबीब आणून हाड बसवून टांके

देऊन शेक केला. चहूं घटकेनंतर शुद्धीवर येऊन डोळे उघडले. वायूचा प्रकोप होताच, कांहीं सावध होऊन बोलत; कांहीं वेळ भ्रंश होऊन *बोलत. " पेशव्याच्या जिवास आराम पडावा म्हणून नानानें पुष्कळ उपचार केले; पण प्रकृतीस गुण आला नाहीं. पेशवे कांहीं शुद्धीवर व कांहीं बेशुद्धींत असे पौर्णिमेच्या सायंकाळपर्यंत होते. पौर्णिमेस मंगळवारीं प्रथम घटका रात्रीं सवाईमाधवराव कैलासवासी झाला.

९९. पेशवे परतंत्र झाले ! !

सवाईमाधवराव वारल्यावर जो हाहाकार उडाला त्यास सीमा नव्हती. नानास तर अत्यंत दुःख झालें. त्यानें जिवापाड मेहनत करून पेशवाईचें रक्षण केलें होतें, त्याचें शेवटीं चीज झालें नाहीं. अजूनही राघोबाच्या वंशास पेशवाईची गादी मिळूं न देण्याचा नानाचा निश्चय कायम होता. त्यानें दौलतराव शिंदे, रघूजी भोंसले वगैरे सरदारांस परत बोलावलें व सर्वांच्या संमतीनें 'यशोदाबाई ही माधवरावाची स्त्री जरी लहान आहे, तरी तिच्या मांडीवर दत्तक बसवून त्याच्या नांवानें राज्यकारभार चालवावा' असा ठराव केला. पण वरील ठरावास बाह्यात्कारीं जरी सर्वांनीं सम्मति दिली, तरी सर्वांस अंतर्यामापासून कांहीं नानाचें करणें आवडलें नाहीं. बाळाजी विश्वनाथाचा औरस वंश हयात असतां दत्तक घेण्याची कल्पना दौलतराव शिंद्याच्या कारभाऱ्यांस पटली नाहीं. दौलतराव शिंद्याचा कारभारी बाळोबाताल्या पागनीस हा बाजीरावास गादीवर बसवावें या मताचा होता. शिंद्याचे दरबारांतील मंडळी आपणास अनुकूळ आहेत असें पाहतांच बाजीरावानें पेशवेपद मिळविण्याविषयीं त्या

* मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड ५, लेखांक २४२.

दरबारांत खटपट चालविली. दौलतराव शिंदे त्या वेळीं बलाढ्य सरदार होता. तो बाजीरावास मिळाल्यास पेशवाई त्याला मिळणार हें निःसंशय होतें. या गोष्टीची खबर नानास लागली. त्यानें लागलीच शिंदे करणार तें आपण अगोदर केल्यास भांडणाचें मूळच राहणार नाहीं, असें पाहून परशुरामभाऊकडून शिवनेरीहून बाजीरावास सोडवून आणिलें व एकदम पेशवाईचीं वस्त्रें देऊन टाकण्याचें ठरविलें.

२. पण नानाच्या या युक्तीनें भांडण मिटलें नाहीं. शिंद्याचा कारभारी बाळोबातात्या यास नानानें आपणास चकविलें हें कळतांच त्यानें नाना व बाजीराव या दोघांस पकडण्याचें कारस्थान चालविलें. पण नानास त्याची वेळींच खबर लागून तो महाडास पळून गेला. नंतर तेथून त्यानें बाळोबातात्याच्या विरुद्ध होळकर, निजाम, फडके वगैरे मंडळींचें कूट जमविलें. इकडे शिंद्याचा कारभारी बाळोबा व परशुरामभाऊ यांनीं बाजीरावास कैदेंत ठेवून त्याचा धाकटा भाऊ चिमाजीआप्पा यास यशोदाबाईचे मांडीवर दत्तक दिलें, व त्याच्या नांवानें पेशवाईचीं वस्त्रेंही साताऱ्याहून आणविलीं. परंतु या सर्व घडामोडीपासून शिंद्यास म्हणण्यासारखा लाभ कांहींच झाला नाहीं, व आपल्या शेणवी कारभाऱ्यांबद्दल त्याचें मन साशंक झालें. अशा वेळीं नानानें शिंद्याशीं असा ठराव केला कीं, 'शिंद्यानें बाळोबादिकांस कैद करावें. बाजीरावास गादीवर बसविण्यास मदत करावी व नानाच्या हातीं कारभार देऊन हिंदुस्थानांत निघून जावें'. शिंदे जामगांवास पोंचतांच नानानें त्यास ५० लक्ष रुपये द्यावे व गोदावरी उतरल्यावर आणखी ५० लक्ष रुपये द्यावे ! इतक्यांत पुण्यांतील नानाच्या पक्षपाती—बाबा फडके आदिकरून—मंडळींचीं कारस्थानें उघडकीस आलीं. तेव्हां बाजीरावच याच्या मुळाशीं आहे असें समजून बाळोबानें जहागीर देऊन त्यास दूर झांशीकडे ठेवण्याचें ठरविलें, व त्याची पुण्याहून रवानगी केली. बाजीरावाबरोबर शिंद्याची

जी फौज होती तिचा मुख्य सखाराम घाटगे कागलकर हा असून त्याला सर्जेराव हा किताब होता. त्याला बायजाबाई नांवाची एक सुंदर मुलगी होती. ती दौलतराव शिंद्यास देण्याविषयीं घाटग्याचें मन वळवून बाजीरावानें आपल्या पक्षास बळकटी आणिली. मग सर्व सिद्धता झाल्यावर शके १७१८ आश्विन वद्य १२ स शिंद्यानें बाळोबा आदिकरून त्रिवर्ग कारभाऱ्यांस कैद केलें. त्यांनीं पेशवाईच्या गादीवर बसविलेला चिमाजी पळून गेला व त्याचा सांथीदार परशुरामभाऊ यास कैद करण्यांत आलें. नंतर बाजीराव गादीवर बसला व त्याच्यापासून अभयाचें वचन घेऊन नाना कारभार पाहूं लागला (मार्गशीर्ष शु॥ ५ शके १७१८; ४।१२।१७९६).

३. पेशवाई मिळतांच राज्याचा सर्व अधिकार आपल्या हातांत असावा असें बाजीरावास वाटूं लागलें. शके १७१९ (सन १७९७) च्या भाद्रपदांत तुकोजी होळकर वारला, तेव्हां बाजीरावास आपल्या अधिकाराच्या आड येणारा एक कांटा नाहींसा झाल्यासारखें वाटलें. आतां शिंदे लवकरच हिंदुस्थानांत जाईल, व मग नाना शिरजोर होईल, असा बाजीरावानें अंदाज केला. तेव्हां शिंद्याकडून अगोदरच नानास कैद करून टाकावें; म्हणजे मग आपण अगदीं निर्वेध झालों अशी त्याची समजूत झाली, व तीप्रमाणें त्यानें शिंद्याशीं मसलत केली. शिंद्यानें शके १७१९च्या पौष शु० १३स नाना भेटीस आला असतां विश्वासघातानें त्यास पकडून अहमदनगरच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविलें. या वेळीं शिंद्याचा सर्व कारभार त्याचा सासरा सर्जेराव घाटगे हा पहात असे. मग घाटग्यानें पुण्यास नानाच्या बाजूच्या लोकांचे भयंकर रीतीनें हाल करून त्यांजपासून पैका उकाळिला. आतां शिंदे लवकरच उत्तर हिंदुस्थानांत जाईल अशी बाजीरावाची समजूत होती, पण ती खोटी ठरली. शिंदे पुण्याहून जाईना तेव्हां बाजीरावानें

आपला भाऊ अमृतराव याच्या सल्ल्यानें शिंद्यास पकडावयाचें ठरविलें. पण एके दिवशीं अगदीं उत्तम संधी आली असतां बाजीराव कचरला; कारण तो जितका अधिकारलोलुप होता,त्याहून जास्त भित्रा होता. यापुढें शिंदे मात्र सावध झाला. त्यानें बाजीरावाची खोडकी जिरविण्याकरितां नानास सोडलें. बाजीराव बोलण्यांत मोठा मिट्ठा होता. एवढा हुशार नाना फडणीस; पण त्यालासुद्धां बाजीरावानें गोड बोलून चकविलें. एके दिवशीं रात्रीं एकांतीं नानाची भेट घेऊन बाजीराव त्यास बोलला, " तुम्हांस बंदींत टाकलें तें शिंद्यानें; मीं त्यांत मुळींच नव्हतों. उलट मी तुमच्या कारभाऱ्यांस बंदींत टाकण्याचें सोंग करून शिंद्यापासून त्यांचें रक्षण केलें. तुमच्या पायांची शपथ; मी तुम्हांस बापाप्रमाणें मानतों." हें सर्व बोलणें मतलबाचें होतें. पण नानास ते खरें वाटून त्यानें कारभार पाहण्याचें कबूल केलें.

४. पुढें थोड्याच दिवसांत बाजीराव फिरून दगा करणार अशी खात्रीलायक बातमी नानाच्या कानावर आली. तेव्हां 'मी वृद्ध झालों; आतां मला विश्वास दाखवून दगा देण्यास तुम्ही कसे प्रवृत्त झालां?' असें नानानें बाजीरावास विचारिलें; त्यावर बाजीरावानें मी असें कसें करीन वगैरे थापा देऊन नानाचें समाधान केलें. तरी यापुढें नाना फार दिवस वांचला नाहीं. तो मूळचाच अशक्त, त्यांतून म्हातारपण व अलीकडील चारपांच वर्षांतील दगदग, यामुळें त्याच्या शक्तीचा लवकरच ऱ्हास होऊन तो शके १७२१ (१३।३।१८००) च्या फाल्गुन वद्य द्वितीयेला वारला. खरोखर, 'खूप शर्तींनें राज्य राखणारा' नाना फडणीस हा अतिशय बुद्धिमान् पुरुष असून कर्तबगार मुत्सद्दी होता. दक्षिणेस हैदर व टिपू आणि पूर्वेस निजामअली यांसारखे कडवे शत्रु असतां त्यांना थोपवून धरून, घरभेद्या राघोबा इंग्रजांस मिळाला असतांना सर्व मराठी राष्ट्राचा एकोपा करून त्यानें त्यांच्याशीं सात आठ वर्षें एकसारखी लढाई दिली ! शिंदे व होळकर हे सर-

दार चढेल झाले असतां कधीं आर्जवानें तर कधीं धाक दाखवून त्यानें साहेबकामीं त्यांचा उपयोग करून घेतला व दौलतीचें ऐश्वर्य कळसास पोंचविलें. परंतु इतक्यांत सवाईमाधवरावसाहेबांच्या अकस्मात् मृत्यूमुळें त्याच्या सर्व आशांचें मूळच उपटल्यासारखें झालें !! तथापि डगमगून न जातां दौलतराव शिंदे पुण्यांत येऊन बसला असतां कारस्थानावर कारस्थान रचून बाजीरावास त्यानें गादीवर बसविलें, तेव्हां तर त्याच्या कर्तबगारीची व बुद्धिप्रभावाची परकीयांनींही वाहवा केली ! तो वारला आणि मराठशाहींतील जोम व ऐक्य नाहींतशीं होऊन जो गोंधळ माजला, त्यांत बिचाऱ्या मराठशाहीचे धिंडवडे निघून तिचा शोकप्रद रीतीनें अंत झाला !

५. शिंदे दक्षिणेंत राहिला असतां उत्तर हिंदुस्थानांत त्याच्या प्रांतीं एक नवीनच भानगड उपस्थित झाल्यामुळें त्यास तिकडे जावें लागलें. तो प्रकार असा:—तुकोजी होळकर वारला (सन १७९७ ऑगस्ट); तेव्हां त्याला चार मुलगे होते. त्यांपैकीं यशवंतराव होळकर म्हणून एक दासीपुत्र होता. तो मोठा शूर व पराक्रमी असे. तुकोजी वारल्यावर पुण्यांत झालेल्या धांदलींतून निसटून यशवंतराव उत्तरेकडे गेला. तेथें जाऊन त्यानें सैन्य जमविलें, व तो शिंद्याच्या प्रांतावरही स्वाऱ्या करूं लागला. तेव्हां दौलतराव शिंद्यानें सर्जेराव घाटग्याच्या हाताखालीं पांच पलटणें व दहा हजार स्वार देऊन त्यास पुण्यास ठेविलें, व तो स्वतः हिंदुस्थानांत गेला. शिंदे पोंचण्याच्या अगोदर होळकरानें शिंद्याच्या उज्जनी येथील सैन्याचा पराभव करून तें शहर जाळून लुटून फस्त केलें; यावरून शिंद्यास फारच चीड आली. त्यानें सर्जेरावास हिंदुस्थानांत बोलावून नेलें, व त्यास होळकराचा सूड उगविण्यासाठीं इंदूर जाळण्याकरितां पाठविलें. मग होळकर व सर्जेराव घाटगे यांच्या फौजांचें इंदूरजवळ एक मोठें युद्ध झालें. त्यांत यशवंतरावाचा पराभव झाला (आश्विन शु॥ ७ शके

१७२३; १४।१०।१८०१).

६. यापुढें उत्तरेकडे जाण्याची हूल दाखवून यशवंतराव होळकर नर्मदा उतरून पुण्यावर चाल करून येऊं लागला. फत्तेसिंग माने म्हणून होळकराचा सरदार पुढें होता. त्याच्यावर पेशव्याकडून गणपतराव पानसे व नाना पुरंदरे हे चालून गेले. मान्यानें त्यांचा तेव्हांच पराभव केला. शहाअहमदखान या नांवाचा होळकराचा सरदार पुण्याच्या आसपास लुटालूट करीत होता. त्याच्यावर नरसिंग खंडेराव विंचूरकर चालून गेला. पण शहाअहमदानें त्याचा पूर्ण पराभव केला. मग होळकर पुण्याजवळ आला. तेव्हां बाजीरावास फार भीति पडली, व त्यानें होळकराशीं सलोखा करण्याकरितां वकील धाडिले. त्यानें सांगितलें कीं, " मी शिंद्याचें पारिपत्य करण्याकरितां पुण्यावर येत आहें; बाकी मी तुमचा चाकरच आहें." शेवटीं आश्विन महिन्यांत होळकराची व शिंद्याच्या फौजेची पुण्याजवळ गांठ पडली(२५।१०।१८०२).पेशव्यांचें सैन्य शिंद्याकडून लढत होतें.या युद्धांत होळकरानें शिंद्याचा पुरता मोड केला. युद्ध चाललें असतां बाजीराव पर्वतीवरून तें पहात होता. निकाल ऐकतांच तो पळून सिंहगडास गेला. यशवंतराव होळकरानें बाजीरावास परत बोलाविलें व पुणें शहर न लुटण्याविषयीं आपल्या फौजेस ताकीद केली; पण बाजीरावास होळकराचा भरंवसा आला नाहीं, व तो सिंहगडाहून निघून महाडास गेला. नंतर मागें राघोबानें सुरतेस जाऊन जसा इंग्रजांचा आश्रय मागितला, तसाच बाजीरावानें वसईस जाऊन त्यांचा आश्रय घेतला. तेथें शके १७२४ च्या (३१।१२।१८०२) पौष शु॥ ७स उभयपक्षीं तह झाला. "इंग्रजांनीं बाजीरावास पुण्यास नेऊन पेशवेपद त्याच्याकडे कायम करावें; यापुढें इंग्रजांनीं सहा हजार फौज व तोफखाना पेशव्याच्या राज्यांत ठेवावा; या फौजेच्या खर्चाकरितां सव्वीस लक्षांचा मुलूख पेशव्यानें इंग्रजांस तोडून द्यावा, व इंग्रजांचा द्वेष करणाऱ्या कोणत्याही युरोपियन राष्ट्रांतील

माणसास आश्रय देऊं नये; इंग्रजांनीं निजाम व गायकवाड यांच्याशीं असाच तह केला असल्यामुळें त्यांच्याशीं पेशव्यानें जें कांहीं बोलणें बोलावयाचें तें इंग्रजांच्या मध्यस्थीनें बोलावें; या दोघांशिवाय इतर कोणत्याही राज्यकर्त्याशीं, फार काय शिंदेहोळकरांसारख्या आपल्या सरदारांशीं देखील तह करावयाचा किंवा लढाई करावयाची ती इंग्रजांस विचारल्याशिवाय पेशव्यानें करावयाची नाहीं;" अशीं कलमें ठरलीं. नंतर शके १७२५ च्या वैशाख व।।७स (१३।५।१८०३) दोन हजार कवायती फौज बरोबर देऊन इंग्रजांनीं बाजीरावास पुण्याच्या गादीवर नेऊन बसविलें. इंग्रजांचें बस्तान ठीक बसलें; पण एव्हांपासून पेशवाई बुडाली, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

---

१००. स्वातंत्र्याकरितां धडपड.



वसईचा तह करून बाजीराव परतंत्र बनला, ही गोष्ट शिंदे. भोंसले, होळकर इत्यादि मराठे सरदारांस मुळींच पसंत पडली नाहीं, वसईच्या तहानंतर कलकत्त्याच्या गव्हर्नर जनरलनें पेशवे आमचे मित्र बनले आहेत, तसेंच तुम्हींही बनावें, अशी माझी फार इच्छा आहे, असा भोंसले व शिंदे यांस निरोप पाठविला; पण हें सख्य कसल्या प्रकारचें असतें, हें शिंदे व भोंसले या दोघांस पक्कें माहीत होतें. सबब त्यांनीं उत्तर केलें, 'आम्हांस तूर्त हें ऐक्य करण्यास सवड नाहीं, तरी पण आमचा व तुम्हां इंग्रजांचा द्वेष नाहीं. ' असें उत्तर देऊन रघूजी भोंसले व दौलतराव शिंदे हे दोघेही आपल्या फौजा घेऊन निजामच्या हद्दीच्या जवळ राहिले.

२. असें त्यांचें वर्तन पाहून इंग्रजांचा दक्षिणेकडील सेनापति

वेल्स्ली यानें त्या दोघांसही निरोप पाठविला कीं, "तुह्मांस जर शांततेनें राहावयाचें असेल तर आपल्या फौजा परत आपल्या मुलुखांत न्या. नाहींतर युद्ध करण्यास तयार व्हा." मग इंग्रज वकिलाचें व शिंद्याभोंसल्यांचें भांडण झालें. इंग्रज वकील परत आला व लढाईस सुरुवात झाली. नंतर इंग्रजांचा दाक्षिणेंतील सेनापति वेल्स्ली हा शिंदे-भोंसले याजवर चालून गेला. प्रथम अहमदनगर किल्ला इंग्रज फौजेनें काबीज केला. वेल्स्लीची व शिंदे—भोंसल्यांची गांठ असई गांवाजवळ बोकरदन येथें पडली. तेथें युद्ध होऊन त्यांत इंग्रजांचा जय झाला. नंतर इंग्रजांनीं शिंद्याचें अशीरगड व बऱ्हाणपूर हे किल्ले काबीज केले. तसेच भडोच व पावनगड हे गुजराथेंतील किल्ले त्यांनीं घेतले. उत्तरेकडे लेक या नांवाचा इंग्रजांच्या सैन्याचा मुख्य अंमलदार होता. त्यानें अलीगड, दिल्ली व आग्रा हे शिंद्याचे किल्ले सर केले, व शिंद्याच्या उत्तरेकडील फौजेशीं लास्वारी येथें लढाई देऊन तिचा पूर्ण पराजय केला (१।११।१८०३). इकडे वेल्स्ली शिंदे व भोंसले यांचा एकसारखा पाठलाग करीत होता. शेवटीं शिंद्यास जय मिळण्याची निराशा वाटून त्यानें वेल्स्लीशीं तहाचें बोलणें केलें. परंतु भोंसले अजून लढतच होता. त्याची व वेल्स्लीची आडगांव येथें गांठ पडून भोंसल्याचा पराभव झाला (२९।११।१८०३). तेव्हां भोंसल्यानेंही तहाचें बोलणें सुरू केलें.

३. शके १७२५ (डिसेंबर १८०३) च्या मार्गशीर्ष महिन्यांत भोंसले व शिंदे यांनीं निरुपाय म्हणून इंग्रजांशीं तह केले. भोंसल्याशीं देवगांव येथें तह झाला. वर्धा नदीच्या पश्चिमेचा मुलूख व कटक आणि बालासोर हे प्रांत भोंसल्यानें इंग्रजांस देण्याचें कबूल केलें. निजामाच्या मुलुखांतून घांसदाणा यापुढें भोंसल्यानें घेऊं नये असें ठरलें; शिवाय पेशवे व निजाम ह्यांच्याशीं बोलणेंचालणें करण्यास इंग्रजांचा एल्फिन्स्टन हा वकील त्याच्या दरबारीं जाऊन राहिला. शिंद्याशीं सुरजी-अंजनगांव येथें तह ठरला. त्यांत गंगा व यमुना यांजमधील

मुलूख, जयपूर, जोधपूर व गोहद या रजपूत संस्थानांच्या उत्तरेचा मुलूख, आणि अहमदनगर व भडोच हे किल्ले इंग्रजांनीं घेतले. जे रजपूत राजे इंग्रजांचे मित्र असतील त्यांस आपला उपसर्ग लागणार नाहीं, असेंही शिंद्यानें कबूल केलें. मेजर माल्कम नांवाचा इंग्रज वकील शिंद्याच्या दरबारीं राहिला.

४. यशवंतराव होळकर हा शिंदे व भोंसले यांशीं एक होऊन लढाईंत सामील झाला नाहीं, त्यामुळें मराठ्यांची बाजू तितकी लंगडी पडली. पण यापेक्षां विशेष तोटा असा झाला कीं, आतां एकट्या होळकरास सर्व इंग्रज सत्तेबरोबर लढणें भाग पडलें. इंग्रजांचें व शिंदे–भोंसल्यांचें युद्ध चाललें असतां होळकरानें माळव्यांत भली मोठी खंडणी जमा केली; व नंतर तो रजपूत, शीख वगैरे लोकांची मैत्री करण्याचा प्रयत्न करूं लागला. तेव्हां गव्हर्नर जनरलानें होळकरास आपलें लष्कर आपल्या मुलुखांत नेण्यास सांगितलें; व मित्रत्वाचें (!) बोलणें करण्याकरितां वकील पाठवावेत, अशी सूचना केली. होळकरानें वकील पाठविले व कांहीं मागण्या केल्या. त्या इंग्रजांस असह्य वाटून त्यांनीं लढाईस सुरुवात केली.

५. जनरल लेक होळकराचा पाठलाग करूं लागला. इतक्यांत शके १७२६ (सन १८०४) चा पावसाळा लागल्यामुळें होळकरावर दाब राखण्याकरितां कर्नल मॉन्सनच्या हाताखालीं पांच हजार पायदळ व तीन हजार घोडेस्वार इतकी फौज ठेवून जनरल लेक परत गेला. गुजराथेंतून मरेच्या हाताखालीं कांहीं फौज मॉन्सनच्या मदतीस येणार होती; पण शके १७२६च्या ज्येष्ठ महिन्याच्या शेवटीं त्यास अशी बातमी समजली कीं, गुजराथची फौज येत नाहीं; व होळकर आपले स्वार व पायदळ घेऊन आपल्यावर चालून येत आहे. त्या वेळीं मॉन्सन यास काय करावें हें सुचेना. शेवटीं त्यानें परत जाण्याचा निश्चय केला. पण त्याला चंबळेला उतार सांपडेना. तेव्हां त्याला

चंबळेच्या कांठाकांठानें तसेंच वर जाणें भाग पडलें. मग मात्र होळकरानें वारंवार त्याच्या सैन्यावर अचानक हल्ले केले, त्याच्या बऱ्याच तोफा हस्तगत केल्या, व पुष्कळ लोक मारले. शेवटीं शेवटीं तर इंग्रज फौज अगदीं गोंधळून गेली; व जिकडे वाट फुटेल तिकडे ती पळून गेली. शेवटीं पळालेले इंग्रज आग्ऱ्यास राहण्यास गेले.

६. नंतर यशवंतराव होळकर मोठी फौज घेऊन मथुरेपर्यंत गेला. इतक्यांत आपल्यावर लेक मागून चालून येत आहे, अशी त्याला बातमी लागली. त्यावरून होळकर भरतपूरच्या आश्रयास राहिला.पण तेथून इंग्रजांनीं त्यास हुसकून दिलें. मग शिंदे-होळकरांचें सख्य झालें व ते दोघे मिळून कोट्यास आले; पण तेथें आपण दोघे एक झालों तरी इंग्रज मोडणार नाहीं असें शिंद्यास वाटलें; आणि होळकर व शिंदे या दोघांत चुरस उत्पन्न झाली. शिंदे लष्कर सोडून तह करण्याकरितां गेला, व होळकरानें बारा हजार स्वार बरोबर घेऊन पंजाबाकडे कूच केलें. पण तिकडे त्यास शिखांची मदत मिळाली नाहीं. त्यामुळें त्यानें इंग्रजांशीं तहाचें बोलणें लाविलें. तह झाला; त्यांत असें ठरलें कीं, बुंदीच्या डोंगराच्या उत्तरेस होळकराची सत्ता नसावी; इंग्रज व त्यांचें साहाय्यकारी यांच्याजवळ होळकरानें बाकी मागूं नये. त्यानें आपल्या चाकरीस गोरे नोकर ठेवूं नयेत व लेकनें सांगितलेल्या वाटेनें त्यानें माळव्यांत परत जावें. याच वेळीं शिंद्याशीं नवा तह होऊन मागील तहापेक्षां आणखी मुलूख इंग्रजांनीं आपल्या ताब्यांत घेतला.

७, यशवंतराव होळकरानें इंग्रजांशीं हें जें युद्ध केलें त्यांत त्याचें धैर्य, धाडस व धडाडी दिसून आली. परंतु युद्धांत यश येण्यास केवळ '**शिपायीगिरी**' उपयोगीं पडत नाहीं; तें सुरू करतांना व चालवितांना शत्रूचा नक्षा उतरून आपलें हित साधण्यास दूरदृष्टि लागते. तिलाच '**मुत्सद्दीगिरी अथवा सरदारी**' असें म्हणतात. यशवंतरावाच्या ठिकाणीं ती नसल्यामुळें त्याचा शेवटीं पराभव झाला.

याप्रमाणें मराठमंडळाचे सर्व मुख्य सरदार इंग्रजांचे मांडलिक बनले ! पेशवे, गायकवाड, भोंसले, शिंदे व होळकर, या सर्वांच्या एकीवर तर मराठी सत्तेचें अस्तित्व अवलंबून होतें. इंग्रजांनीं मोठ्या युक्तीनें हे मणी निरनिराळे करून त्या सर्वांस आपल्या अंमलाखालीं आणिलें. यांपैकीं भोंसले, शिंदे, व होळकर यांनीं इंग्रजांचा हा बेत कांहींसा ओळखून त्यांच्या ताब्यांत न जाण्यासाठीं बरीच खटपट केली. तथापि ती देखील व्यवस्थितपणें केली असें म्हणतां येत नाहीं.

१०१. मराठी राज्याची अखेर.

बाजीरावास इंग्रजांनीं पुण्यास आणून गादीवर बसविलें, तेव्हां पासून पेशव्यास स्वातंत्र्य असें मुळींच उरलें नाहीं. भोंसले, शिंदे, होळकर वगैरे मराठे सरदारांशीं कसल्या कां विषयांचें बोलणें करावयाचें असेना, तें इंग्रजांच्या परवानगीशिवाय त्यास करतां येईनासें झालें. जर पेशव्याचा एखादा वकील भोंसले, शिंदे वगैरेंच्या दरबारीं गेला, तर हे सर्व मिळून आमची सत्ता हाणून पाडण्याच्या मसलती करीत आहेत, असा इंग्रजांस संशय यावा व त्यांनीं लागलीच बाजीरावास जरब देऊन विचारावें, असें होऊं लागलें. पेशव्यास कोठें स्वारीस जाणें झाल्यास इंग्रजांचा हुकूम होईल तेव्हां कोठें त्यानें बाहेर कोपरगांव, नाशिक, गुहागर व पंढरपूर येथें जावें. सारा हुकूम इंग्रजांचा चालू झाला.

२. असें इंग्रजांचें सामर्थ्य वाढीस लागलें. या वेळीं पेशवाईच्या गादीवर बसलेला बाजीरावही, त्यांचें सामर्थ्य आणखी वाढविण्यास व मराठ्यांचें कमी करण्यास कारण झाला. इंग्रज पेशव्यास दटावीत,तसेंच पेशवा आपल्या सर्व जहागीरदारांस दटावूं लागला. पण या धोरणामुळें

सरदारांचीं मनें बाजीरावाविषयीं चिडून गेलीं. अर्थातच पेशव्यास मराठे सरदार, जहागीरदार वगैरे लोकांचा आधार नाहींसा झाला व त्यास सर्वस्वी इंग्रजांवर अवलंबून रहावें लागलें. याच वेळीं परशुराम श्रीनिवास प्रतिनिधि व त्याची आई या दोघांमध्यें भांडण लागलें. तेव्हां पेशव्यानें बापू गोखले (नरहर गणेश गोखले) या सरदारास प्रतिनिधीवर पाठविलें. गोखल्यानें प्रतिनिधीस कैद करून वसंतगडावर ठेविलें. पण येवढ्यानें बंड मोडलें नाहीं. ताई तेलीण नांवाची प्रतिनिधीची एक राख होती. तिनें वसंतगडावरून प्रतिनिधीस सोडविलें. मग फिरून प्रतिनिधीचा अम्मल त्याच्या मुलुखांत सुरू झाला. तेव्हां पेशव्यानें पुनः गोखल्याची रवानगी केली. नंतर प्रतिनिधि लवकरच हातीं आला. या वेळीं युद्धांत प्रतिनिधीचा एक हात तुटला; म्हणून तो 'थोटे पंत' या नांवानें प्रसिद्ध आहे. पुढें ताई तेलणीनें वासोटा किल्ला आठ महिने भांडविला. तेव्हां बाजीरावानें रागावून प्रतिनिधीची सर्व जहागीर बापू गोखल्यास देऊन टाकिली (शके १७३०, सन १८०८). पुढें पेशव्यानें आपली सत्ता दृढ झाली असें पाहून जहागिरी जप्त करण्याचा सपाटा चालविला. त्यानें प्रतिनिधीकडील मुलूख गोखल्याकडून सरकारांत मागितला. लहान लहान जहागीरदार आपल्या मनाप्रमाणें वागले नाहींत या सबबीवर त्यांचीं संस्थानें जप्त केलीं. रास्ते इंग्रजांच्या प्रीतींतले होते. एकदां इंग्रजांचा कांहीं अपराध रास्यांच्या हातून झाला. तेव्हां त्यांचें पारिपत्य करण्याचें काम आपल्या हातांत घेऊन बाजीरावानें त्यांचा मुलूख जप्त केला. पटवर्धनांची जहागीर जप्त करण्याचेही त्याचे खूप प्रयत्न चालले होते. अशारीतीनें आपल्या राज्यांतील सर्व मराठे जहागीरदारांचीं मनें बाजीरावानें दुखविलीं; त्यामुळें मराठे लोकांत एकी होणें अशक्य झालें.

३. बाजीरावानें राज्याचा कारभार पाहण्यासाठीं सदाशिव माणकेश्वर याची नेमणूक केली होती. हा माणकेश्वर टेंभुर्णी गांवचा

देशपांड्या. त्यानें आपल्या आयुष्याचे बरेच दिवस पुण्यास कीर्तन करून घालविले होते; व हा चांगला कवि व वाद्यें वाजविण्यांत कुशल आहे अशी त्याची चहूंकडे प्रसिद्धि झाली होती. याप्रमाण उत्तम कथा कशी करतां येईल हें ध्येय पुढें ठेवून त्याच्यासाठीं तयारी करण्यांत ज्यानें आपल्या आयुष्याचे उत्कृष्ट दिवस घालविले त्या माणसावर राज्यकारभाराचा बोजा येऊन पडला. मग राज्यांत व्यवस्था काय विचारावयाची आहे ? मुलुखांतील किल्लेकोट यांचे खर्च तोडिले. मामलती मक्तयानें देण्याचें काम झपाट्यानें सुरू होऊन शेतकरी लोकांस मक्तेदार अगदीं पिळून काढूं लागले. रयतेची दाद कोणीच घेईना. अशी राज्याची व्यवस्था झाली. या वेळीं राज्यांत दुसरा वजनदार पुरुष त्रिंबकजी डेंगळे हा होता. त्यास इंग्रजांशीं मध्यस्थी करण्याच्या कामावर बाजीरावानें नेमिलें होतें. पुढें तर तो मोठ्या योग्यतेस चढला. त्याच्याशिवाय राज्यकारभाराचें कोणतेंही महत्त्वाचें काम होईनासें झालें. या त्रिंबकजीचें क्रूरत्व कांहीं विलक्षण होतें. एकदां एक सराफ एका मक्तेदारास जामीन राहिला होता. या मक्तेदारानें सरकार-काम बरोबर बजाविलें नाहीं. त्यामुळें त्रिंबकजीनें जामीन राहिलेल्या सराफास बोलावून आणिलें. तो येतांच त्रिंबकजीनें रागावून त्याच्या डोक्यावर जोरानें एक ठोसा लगाविला; तेव्हां त्याच्या हातांतील जोडवीं व आंगड्या यांचा तडाका मर्मी लागून तो ब्राह्मण तेथल्या तेथें मरण पावला !

४. राज्यांत अशी अंदाधुंदी असतां आपल्या बापानें नारायणरावास मारिलें या पापाची निष्कृति करण्याच्या खटपटींत बाजीराव गुंतलेला असे. त्यानें पुण्याभोंवतीं एक लक्ष आंब्याचीं झाडें लाविलीं; व पंढरपूरच्या देवासही पुष्कळ द्रव्य दिलें. त्याच्या गुरूनें त्याला सांगितलें कीं, " नारायणरावानें माझ्या स्वप्नांत येऊन म्हटलें कीं, बाजीरावानें लक्ष ब्राह्मणभोजन घालावें; म्हणजे माझ्या खुनाचें पाप

नाहींसें होईल." तें ऐकतांच बाजीरावानें लक्ष ब्राह्मणभोजन घातलें. शिवाय बाजीराव व्यसनी असल्यामुळें त्यांतही त्याचा बराच वेळ जात असे.

५. शके १७३२ (सन १८१०) त रेसिडेंटच्या जागीं एल्फिन्स्टन याची नेमणूक झाली. हा हुशार असून इंग्रजांच्या हिताविषयीं अत्यंत दक्ष असे. त्यानें बाजीराव गबाळ, अन्यायी व मित्रा आहे असें पाहून इंग्रजांचें वर्चस्व पुष्कळच वाढविलें. हें त्रिंबकजी डेंगळे व बाजीराव यांस खपलें नाहीं व इंग्रज आणि पेशवे यांमध्यें नेहमीं भांडणें होऊं लागलीं. गायकवाडाकडे पेशव्याची बाकी होती. तिचा हिशेब करण्याचें काम इंग्रजांतर्फे व्हावयाचें होतें. तें त्यांनीं बराच वेळ लांबणीवर टाकिलें. शेवटीं बाजीरावानें फारच तगादा केल्यावरून इंग्रजांनीं बडोदेकराचा दिवाण गंगाधरशास्त्री पटवर्धन यास हिशेब करण्यासाठीं पुण्यास पाठविलें. तो एकदां सहज पेशव्याबरोबर पंढरपुरास गेला असतां तेथें त्याचा खून झाला (आषाढ शु॥ ८ शके १७३७). इंग्रजांनीं चौकशी केल्यावर तो खून त्रिंबकजी डेंगळ्याच्या सांगण्यावरून झाला असें त्यांस समजलें; लागलीच त्यांनीं त्रिंबकजीस आपल्या हवालीं करण्याबद्दल बाजीरावास निकड लाविली. तेव्हां त्यानें निरुपाय म्हणून त्रिंबकजीस इंग्रजांच्या स्वाधीन केलें. त्याला इंग्रजांनीं ठाण्यास कैदेंत ठेविलें. पण तेथून तो आठ महिन्यांनीं पळून गेला. फिरून बाजीराव व त्रिंबकजी या दोघांचा संबंध आहे, असा इंग्रजांस संशय आला, व त्यांनीं त्रिंबकजीस एक महिन्याच्या आंत पकडून द्यावें, म्हणून बाजीरावास ताकीद दिली. लागलीच त्यानें त्रिंबकजीस धरण्याबद्दल जाहीरनामे काढिले. तरी इंग्रजांचें समाधान न होऊन त्यांनीं पेशव्याशीं नवीन तह केला (ज्येष्ठ व॥ १४; शके १७३९; १३।६।१८१७). तो असा:--"गायकवाडाकडून पेशव्यानें यापुढें बाकी मागूं नये; व राहिलेल्या बाकीबद्दल

वर्षास चार लक्ष रुपये गायकवाडाकडून घेऊन पेशव्यानें स्वस्थ बसावें. इंग्रजांस पलटणीच्या खर्चाकरितां मागें सव्वीस लक्षांचा मुलूख दिला होता, आतांआणखी चौतीस लक्षांचा द्यावा." हा पुण्याचा तह पेशव्यास निरुपाय म्हणून कबूल करावा लागला. पण यापुढें इंग्रजांविषयीं त्याच्या मनांत पक्का द्वेष उत्पन्न झाला. संधि सांपडताच हे इंग्रज आपलें सर्व राज्यच गट्ट करतील असें त्यास वाटलें; व एकदां सोक्षमोक्ष करून पाहण्याचा त्यानें निश्चय केला.

६. शके १७३९ [इ. स. १८१७] च्या पावसाळ्यांत बाजीराव पंढरपुराहून माहुलीस गेला, व तेथें तो इंग्रजांशीं युद्ध करण्याची तयारी करूं लागला. त्याचा मुख्य सेनापति बापू गोखले होता. त्यास पेशव्यानें लढाईची तयारी करण्यास सांगितलें व शिंदे आणि भोंसले यांजकडे वकील पाठविले. त्या वर्षींचा दसऱ्याचा समारंभ पुण्यास मोठ्या थाटानें साजरा झाला. त्या दिवसापासून पेशव्याची पुष्कळ फौज जमा होऊं लागली. पण येवढ्याशा अल्प तयारीनें हुशार इंग्रजांशीं युद्ध करून त्यांत जय मिळविणें अशक्य होतें. मराठे व इंग्रज यांच्या खडकी, कोरेगांव व अष्टी या तीन ठिकाणीं लढाया झाल्या. या तिन्हींतही मराठ्यांचा पराभव होऊन तिसरींत तर मुख्य सेनापति बापू गोखले पडला. नागपूरकर भोंसल्यानें थोडी हालचाल केली; पण त्याचाही पराभव झाला. होळकराच्या फौजेनेंही इंग्रजांशीं महिदपूर येथें गांठ घातली; पण तिचा देखील मोड झाला. अष्टी येथें पराभव झाल्याबरोबर बाजीराव पळूं लागला. शेवटीं तो तापी उतरून बऱ्हाणपुराजवळ खैरी येथें मालकम नांवाच्या इंग्रज सरदाराच्या स्वाधीन झाला (वैशाख व॥ ३० शके १७४०; ३।६।१८१८). तेव्हां इंग्रजांनीं आठ लक्षांची वार्षिक नेमणूक ठरवून देऊन कानपूरजवळ गंगाकांठीं बिठुर ऊर्फ ब्रह्मवर्त येथें त्यास ठेविलें. अशा शोकप्रद रीतीनें पेशवाईचा अंत झाला !!

———

१०२. सातारचे नामधारी छत्रपती.

—:०:—

शके १७४०त बाजीरावास ब्रह्मवर्तास ठेवून पेशव्याचा सर्व मुलूख इंग्रजांनीं आपल्या ताब्यांत घेतला. पण त्या वेळीं मराठे लोक अगदींच असंतुष्ट होऊं नयेत म्हणून सातारच्या राजाकडे चौदा लक्षांचा मुलूख ठेवून त्यांनीं सातारचें संस्थान कायम ठेविलें. शाहू-राजा वारला तेव्हां त्याच्या चिठ्ठीवरून बाळाजी बाजीरावानें त्याच्या-मागून सातारच्या गादीवर बसलेल्या रामराजाकडून सांगोलें येथें असा ठराव करून घेतला कीं, " पेशव्यांनींच सर्व राज्यकारभार करावा; आपण मुळींच राजकारणांत पडणार नाहीं. सातारजवळ कांहीं मुलूख पेशव्यांनीं खाजगी खर्चाकरितां तोडून द्यावा, म्हणजे झालें. " त्या वेळेपासून सातारचे राजे केवळ नांवाचे राजे असा प्रकार झाला. नवीन पेशवे होण्याच्या वेळीं पेशवाईचीं वस्त्रें सातारच्या राजाकडून घेण्याचा परिपाठ शेवटपर्यंत चालला होता. पण सातारच्या राजाकडे खरी सत्ता अशी कोणत्याच गोष्टींत उरली नव्हती. राज्यकारभाराचे सर्व काम पुण्यास पेशवे आपल्या मुखत्यारीनें करीत. त्यांत सातार-च्या राजाचा काडीइतकाही संबंध नव्हता. त्यामुळें रामराजापासून जे सातारचे राजे झाले ते केवळ नामधारी होत.

२. रामराजा शके १६७१पासून १६९९पर्यंत सातारच्य गादीवर होता. त्याच्या अंगीं मुळींच कर्तृत्व नव्हतें. त्याच्यामागून शके १७००मध्यें बावीकर भोंसल्यांच्या वंशांतील एका मुलास शाहू असें नांव देऊन नाना फडणिसानें गादीवर बसविलें. या शाहूच भाऊ चतुरसिंग ह्मणून शूर होता. पेशव्यांची सत्ता नाहींशी करून सातारच्या राजास स्वतंत्र करण्यासाठीं त्यानें अतोनात खटपट केली, पण शेवटीं परशुरामभाऊ पटवर्धनानें त्याचा पराभव केला; तेव्हां तो

उत्तर हिंदुस्थानांत पळून गेला. या शाहूस आबासाहेब म्हणत. हा शके १७३०त वारला. त्याला प्रतापसिंह, शहाजी व रामराजा असे तिघे मुलगे होते. वडील प्रतापसिंह बापामागून गादीवर बसला. याची कारकीर्द चालू असतांच शके १७४०त पेशवाईचा अंत झाला ! तेव्हां इंग्रजांनीं चौदा लक्षांचा मुलूख देऊन प्रतापसिंहासच गादीवर ठेविलें. हा प्रतापसिंह मोठा धोरणी व चतुर होता; व त्यानें सातारच्या संस्थानचा राज्यकारभार योग्य रीतीनें चालविला होता. परंतु इंग्रजांस त्याच्याबद्दल संशय येऊन त्यांनीं शके १७३१त त्यास गादीवरून काढून काशीस नेऊन ठेविलें. त्याच्यामागून त्याचा भाऊ शहाजी हा सातारच्या गादीवर बसला. तो नऊ वर्षें राज्य करून शके१७७०त वारला. त्याला औरस पुत्र नव्हता. मरणापूर्वी-त्यानें दत्तक घेतला होता. परंतु या वेळीं डलहौसी नांवाचा हिकमती इंग्रज कलकत्त्यास गव्हर्नर जनरल होता. संस्थानिकास औरस पुत्र नसला कीं, दत्तक पुत्रास संस्थानची मालकी न देतां तें संस्थान खालसा करावयाचें ह्मणजे इंग्रजी मुलुखास जोडावयाचें, अशी युक्ति तो अंमलांत आणीत असे. त्यानें नागपूर व झांशी येथील राज्यें या सबबीवर खालसा केलीं. त्याचप्रमाणें शहाजीस औरस संतती नव्हती, या निमित्तानें त्यानें सातारचें राज्य खालसा केलें. असा मराठी राज्याचा शेवट झाला ! ! (शके १७७०, सन १८४८).

१०३. मराठी राज्याची अंतर्व्यवस्था.

शिवाजीनें केलेल्या राज्यव्यवस्थेचें वर्णन मागें पंधराव्या प्रकरणांत केलें आहे. राज्याची अंतर्व्यवस्था करण्यास पेशव्यांस कधींच फुरसत मिळाली नाहीं. बाजीराव व बाळाजी बाजीराव यांचा सर्व

वेळ मुलूख काबीज करण्यांतच गेला. पुढें तर पानिपतची लढाई झाल्यावर खुद्द पेशव्यांच्या घराण्यांतच दुही उत्पन्न झाल्यामुळें तिजपासून राज्य वांचविण्यांतच पुढील मुत्सद्यांचा काळ गेला. असें जरी होतें तरी न्यायमनसुबा, गुन्हेगारीचा बंदोबस्त, वसुली वगैरे खात्यांतून उत्कृष्ट व्यवस्था असून प्रजा सुखानें नांदत होती. आतां मराठी राज्यांत मुख्यतः पेशव्यांचे वेळीं जी व्यवस्था चालू होती तिचें वर्णन या प्रकरणांत करावयाचें.

२. **फौज**:—पेशव्यांची हुजरात व दक्षिणेकडील सरदारांची फौज मिळून पन्नास हजार घोडेस्वार असत. मराठ्यांचें पायदळ व तोफखाना हीं कधींच चांगल्या स्थितींत नव्हतीं. किल्ल्यांवरील शिबंदी खेरीज करून पेशव्यांचें दहा हजार पायदळ असे. त्यांत गारद्यांचा व अरबांचाच भरणा विशेष असे. याशिवाय गायकवाड, भोंसले यांचें दहा पंधरा हजार सैन्य, शिंदेहोळकर यांचें कमींत कमी तीस हजार सैन्य, हीं सैन्यें जमेस धरलीं तर पेशव्यांच्या हाताखालीं एकंदर एक लाख सैन्य होतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांत पेंढाऱ्यांची गणती केलेली नाहींच.

३. सुमारें शके १६७२ (सन १७५०) पर्यंत मराठी सैन्याची भिस्त घोडेस्वारांवरच असे. परंतु पुढें फ्रेंच व इंग्रज यांच्यामधील युद्धांत कवायती पायदळ व तोफखाना यांची करामत दिसूं लागली. तेव्हां सदाशिवरावभाऊनें इब्राहिमखान गारदीच्या हाताखालीं पलटणें चाकरीस ठेविलीं. पानिपतच्या युद्धांत या पायदळाच्या जोरावरच आपण गिलच्यांस सहज चेपून टाकूं, असें भाऊस वाटत होतें. तथापि त्या युद्धांत मराठ्यांस पराजय आल्यामुळें ' कवायती फौज ' व तिला अवश्य यंत्रसामुग्री यांजकडे मराठी सेनापतींचें कांहीं काळ दुर्लक्ष झालें. इंग्रजांशीं झालेल्या लढाईंत कवायती फौजेचें महत्त्व फिरून महादजी शिंद्याचे लक्षांत आलें; व त्यानें डी बॉईन या फ्रेंच

सेनापतीच्या हाताखालीं पलटणें चाकरीस ठेविलीं. शिंद्याचें अनुकरण करून मराठ–मंडळांतील इतर सरदारांनींही हा क्रम स्वीकारला. कवायती फौजा ठेवणें जरूर होतें. परंतु या फौजांतून अरब, शीख आदिकरून परदेशी लोकांचा भरणा असल्यानें त्या अगदीं भाडोत्री असत. शिवाय तोफा, बंदुका हीं सुधारलेलीं हत्यारेंही आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर तयार करण्याचे कारखाने निघाले नाहींत. आणि सर्वांत महत्त्वाचा दोष म्हटला म्हणजे फ्रेंच, इंग्रज या परकीय अधिकाऱ्यांपासून 'पलटणांवर हुकमत चालविण्याची कला' स्वदेशी अधिकाऱ्यांनीं उचलली नाहीं. याचा परिणाम असा झाला कीं, शेवटपर्यंत या फौजांवर गोरे अधिकारीच कायम राहिले. पुढें इंग्रजांशीं युद्धाचा प्रसंग येतांच ते चाकऱ्या सोडून गेले, आणि वेल्स्ली व लेक या इंग्रज सेनापतींनीं मराठी सैन्यांचा हां हां म्हणतां धुव्वा उडविला!!

४. **आरमार**:—मराठ्यांच्या आरमाराची स्थापना शिवाजीच्या हातूनच झाली. मालवणचा सिंधुदुर्ग, कुलाबा, सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग इत्यादि जंजिरे (समुद्रकिनाऱ्यावरील किल्ले) त्यानें बांधिले; व हीच मराठ्यांच्या आरमाराचीं मुख्य ठाणीं होतीं. पुढें महाराष्ट्रावर औरंगजेबानें स्वारी केली; तेव्हां कान्होजी आंगरे या दर्यावर्दी मराठ्याचा उदय होऊन त्यानें मराठ्यांचें समुद्रावर नांव राखिलें. इ. स. १७५६ मध्यें बाळाजी बाजीरावानें कान्होजी आंगऱ्याचे मुलगे मानाजी व तुळाजी यांजमध्यें तंटा माजला असतां तुळाजीस इंग्रजांच्या साह्य्यानें चीत करून विजयदुर्ग हें ठाणें आपल्या ताब्यांत घेतलें. तेव्हांपासून पेशव्यांच्या राज्यांत ' सुभा आरमार ' अस्तित्वांत आला. मराठ्यांची इंग्रजांशीं पहिली लढाई चालली असतां आनंदराव धुळप हा आरमारी सुभ्यावरील मुख्य अधिकारी होता. विजयदुर्गच्या आरमारामध्यें लढाऊ लोक सुमारें दोन तीन हजार असत व

चाळीसपासून पन्नासपर्यंत लहानमोठीं जहाजें असत. मोठ्या जहाजास 'पाल' किंवा 'गुराब' अशी संज्ञा असे. त्यास दोन किंवा तीन शिडें असत म्हणून त्यास 'दुघोसी' किंवा 'तिर्कसी' म्हणत. बहुतेक जहाजें बांधण्याचें काम अंजनवेल व रत्नागिरी येथें होई. गलबत बांधण्याचा खर्च १०,००० रुपयांपासून ४०,००० पर्यंत येई व दुरुस्तीचा खर्च ५००० पासून १०,००० पर्यंत असे. गलबतास लांकूड, लोखंड वगैरे सर्व सामान सरकारचें फुकट मिळे, त्याशिवाय हा खर्च लागे. प्रत्येक जहाजावर हशम व दर्यावर्दी असे दोन प्रकारचे लोक असत. हशम म्हणजे लढाऊ शिपाई. त्याशिवाय बाजेहशम म्हणजे लोहार, सुतार, पिंजारी इत्यादि असत. दर्यावर्दी लोकांत सारंग, तांडेल, पांजरी व खलाशी असे चार प्रकार असत. याशिवाय गोलंदाज व बरकंदाजही असत. दर्यावर व्यापार करणारीं जहाजें आरमारी जहजांशिवाय अगदीं निराळीं असत. आरमारी जहाजांपैकीं सर्वांत मोठें जें फत्तेजंग जहाज होतें, त्याच्यावर २२६ इसम, १६ गोलंदाज व १३२ दर्यावर्दी मिळून ३७४ लोक होते. अगदीं लहान गलबत वावडी म्हणून होतें. त्यावर पंधरा लोक असत. आरमारी जहाजांवर युद्धसामग्री चांगली असे. इ. स. १७८३पासून १७८६पर्यंत मराठ्यांच्या आरमाराकडे तोफा लहानमोठ्या २७५ होत्या.

मुलकी व्यवस्था.

५. जमीनमहसूल:—जमाबंदीच्या व्यवस्थेसाठीं पेशव्यांच्या प्रत्यक्ष अमलाखालच्या प्रांताचे बारा सुभे केले होते. पुष्कळ गांवें मिळून एक तर्फ होई. त्यावर शेखदार म्हणून अम्मलदार असे. पुष्कळ तर्फ मिळून महाल. त्यावरील अधिकाऱ्यास मामलेदार म्हणत. पुष्कळ महाल मिळून सुभा होई व त्याच्यावर सुभेदार असे. वसुलाचें काम मामलेदारावरच फार पडे. तो महालांतील देशमुख,

देशपांडे, पाटील, कुळकर्णी यांच्या मदतीनें तें काम करी. पूर्वी मलिकंबरानें जमिनीच्या प्रती लावून धाऱ्याचे नियम बसविले होते. त्याच्या प्रतबंदीस तनखा म्हणत. सदाशिवरावभाऊनें नवीन मोजणी करून जमिनीच्या प्रती लाविल्या व धाऱ्याचे नवीन नियम केले. भाऊची प्रतबंदी फक्त पुण्याच्या सुभ्यांत सुरू झाली होती. तिला "कमाल" म्हणत. जमिनीपासून येणाऱ्या वसुलास "ऐनजमा" म्हणत व बाकीचा वसूल "शिवाय-जमा" या सदराखालीं येई. ज्या ठिकाणीं ऐन जिनसी वसूल घेण्याची वाहिवाट होती त्या ठिकाणीं शेतकऱ्याचा बियाणें, मजुरी इत्यादि सदरांवर झालेला खर्च वजा घालून राहिलेल्या धान्यापैकीं द्वितीयांश किंवा तृतीयांश शेतकऱ्यास राखीत व बाकीचें सरकारी वसूल म्हणून घेत. दक्षिण कोंकणांत भातजमिनीवर दर बिघ्यास दहा मण हा कमालीचा वसूल म्हणून आकारण्यांत येई. जमीन सुपीक नसल्यास अगर शेतकऱ्यास इतर अडचणी जेथें असत तेथें हा वसुलाचा आकार पुष्कळ कमी असे. वसुलाबद्दल जेथें द्रव्य घेण्याची वहिवाट होती तेथें दर खंडी उत्पन्नामागें १५, २० अगर ३० रुपये असा हलका वसुलाचा दर होता. नाशीक जिल्ह्यांत जिराईत चांगल्या काळ्याभोर जमिनीवर दर बिघ्यास २ रुपये कर असून बागाईत जमिनीवर दर बिघ्यास ५ किंवा ६ रुपये होते.

६. **अधिकारी:**—कुलीन घराण्यांतील चांगलीं सचोटीचीं माणसें पाहून त्यांस मामलती देण्यांत येत. नेमणूक व्हावयाच्या वेळीं एक सनद देत. तींत प्रजेशीं व सरकाराशीं इमानानें वागण्याबद्दल ताकीद असे. मागील वर्षांच्या हिशेबावरून महालाच्या जमाखर्चाचें अंदाजपत्रक मामलेदारास प्रथम देण्यांत येई, व वर्षाच्या शेवटीं जमाखर्चाची तपासणी होई. त्यामुळें अन्याय होण्याची फारशी भीति नसे. दरवर्षास मामलेदार बदलावयाचा असा सामान्य नियम असे.

७. **सवलती:**—तळीं, पाणी अडविण्यास बांध, सार्वजनिक रस्ते, प्रवासी लोकांसाठीं विहिरी, इत्यादि लोकोपयोगी कामें करण्यासही सरकार नेहमीं तयार असे. कधीं कधीं लोकांनीं निम्मा खर्च व सरकारनें निम्मा खर्च करावयाचा या रीतीनें, तर कधीं कधीं सर्वच खर्च आपण स्वतः करून असलीं कामें सरकार पार पाडीत असे. एखाद्या गांवची खराबी होऊन जमीन पडित झाल्यास कांहीं वर्षेंपर्यंत वसुलाचा अगदीं हलका दर ठेवून व इतर सवलती देऊन जमीन लागवडीस आणण्यास उत्तेजन मिळे. जमिनीचा सारा वसूल करण्यांतहीं रयतेस सोईस्कर असेच नियम होते. लोकांची फार अडचण दिसली तर सूट देण्यांत येई. शेतकीचीं साधनें जवळ नसल्यामुळें शेतकऱ्याचें काम नडतें असें दिसून आल्यास सरकारांतून थोड्या व्याजानें किंवा बिनव्याजानें पैसा देण्यांत येई. मग सवडीसवडीनें त्याची फेड करून घेण्यांत येई. कुळाकडे बाकी थकली तर ती वसूल करण्याकरितां त्याचें घरदार विकून सरकारानें त्यास भिकेस लाविलें असें कधीं झालें नाहीं.

८. **इतर कर:**—जमीन-महसुलाशिवाय इतर कांहीं कर होते. त्यांतील मुख्य म्हणजे परमुलुखांतून पेशव्यांच्या मुलुखांत येणाऱ्या मालावर घेतली जाणारी जकात होय. मराठ्यांच्या बंदरांत समुद्रावरून येणाऱ्या मालावर जकात घेत ती 'सुभा आरमारा' कडे जमा होई. कल्याण–भिवंडी या सुभ्यांत परमुलुखांतून माल येई; त्यावरील जकातीचें उत्पन्न बाळाजी बाजीरावाचे वेळीं ५५००० रुपये असून सवाईमाधवरावाच्या कारकीर्दीत तें तीन लक्षांपर्यंत वाढलें! त्याचप्रमाणें पुणें सुभ्यांत या बाबीपासून होणाऱ्या उत्पन्नांत तीस हजारांपासून एक लाखापर्यंत वाढ झाली. पुणें आणि अहमदाबाद या दोन शहरांत आयात मालावर जकात घेत व तिजपासून बरेंच उत्पन्न होई. मिठागरांवरही त्या काळीं थोडी जकात होती. दरखंडी मिठा-

वर नागोठण्यास २ रु. १० आणे जकात असून वसईजवळील भायंदर येथें तयार झालेल्या मिठावर दर खंडीस १ रु. ६ आणे प्रमाणें कर पडे. घरें व दुकानें यांजवर 'मोहतर्फा' नांवाचा एक कर वसूल करीत. त्याचप्रमाणें तूप, कुरणें, लग्नविधि, म्हशी इत्यादींवर कर असून मच्छेमारीबद्दलही कांहीं जकात वसुल करीत. नद्यांवर नावा सरकारतर्फे राखण्यांत येत असून त्यांजवर बहुधा कर नसे. पण कोठें कोठें या नावांचे मक्ते देण्यांत येत असून मक्तेदार रयतेकडून भाडें वसूल करीत. अबकारीखात्याचें उत्पन्न त्या काळीं मुळींच नव्हतें झटलें तरी चालेल. फक्त कोंकणांतील भंडारी वगैरे लोकांनीं, आमचें ताडीशिवाय चालत नाहीं, असें सांगितल्यावरून तिकडे दारू तयार होई, व तिजवर जकात घेत. पुण्याजवळही कांहीं थोडी दारू तयार होई. तिजवरही कर होता.

९. **उत्पन्न**:—मराठ्यांच्या एकंदर मुलुखाचें उत्पन्न दहा कोटी रुपये होतें असें म्हणतात; पण तें प्रत्यक्ष साडेसात कोटींचें होतें. खुद्द पेशव्यांच्या अंमलाखालील प्रांताचें उत्पन्न अडीच कोटि होई. पेशव्यांना नेहमीं स्वाऱ्या कराव्या लागत असल्यामुळें दौलत सारखी कर्जाखालीं असे. थोरला माधवराव वारला तेव्हां पेशव्यांस चोवीस लक्ष रुपये कर्ज होतें. पुढें नाना फडणिसानें कर्ज बरेंच कमी केलें व शेवटीं रावबाजीच्या वेळीं तर खजिन्यांत शिल्लकच होती.

न्यायमनसुबा.

१०. **दिवाणी**:—महाराष्ट्रांतील वतन, दत्तक, वांटणी इत्यादि बाबींत जे वाद उत्पन्न होत, त्यांचा निर्णय करणारे सर्वांत खालचे अधिकारी झणजे ज्या ज्या गांवांतील शिष्ट लोकांच्या सभा असत. या सभांस गोत हें नांव असून त्यांनीं करून दिलेल्या निवाडपत्रास गोत-महजर म्हणत. असले गोत-महजर हल्लीं उपलब्ध झाले आहेत.

त्यांवर त्या त्या गांवांतील पाटील, कुळकर्णी, बारा *बलुते, व शेटे महाजन यांच्या सह्या असलेल्या आढळून येतात. एखादा वाद परभारें पाटलाकडे अगर इतर सरकारी अधिकाऱ्यांकडे नेल्यास ते सामान्यतः वाद्यास गोत–महजर करून आणण्यास सांगत. निरनिराळ्या व्यक्तींमध्यें वाद उत्पन्न झाले असतां त्यांचा निवाडा करण्याचें महत्त्वाचें काम महाराष्ट्रांतील खेड्यांतील सामान्य लोकांचे हातीं असल्यामुळें सत्यनिष्ठा, परस्परांच्या वर्तनावर दाब ठेवण्याची हातोटी, आणि तडजोडीनें एकत्र वागून काम करण्याची संवय हे बहुमोल गुण मराठे लोकांत नांदूं लागले.

११. गोतांच्या निवाड्यानें वाद्यांचें समाधान न झाल्यास फिर्याद देशकाकडे जाई. देशकामध्यें हवालदार, कारकून, सरनौबत, सबनीस, हेजीब, चिटणीस, कारखाननीस, सरगुरो, बाजेनाईक, नाईकवाडी, शेटे, महाजन व बलुते इत्यादींचा समावेश होत असे. कज्जा स्थानिक स्वरूपाचा नसून तो प्रांतिक स्वरूपाचा असल्यास, त्याचा निर्णय करण्याचा अधिकार मुख्यत्वेंकरून देशकासच होता. देशकाच्या निर्णय-पत्रास देशक-महजर अशी संज्ञा असे. या गोतांच्या व देशकांच्या सभा सामान्यतः देवालयांत, नदीच्या तीरीं, अथवा दोन नद्यांच्या संगमावर भरत. गोत व देशक यांच्याहून वरिष्ठ अधिकारी म्हटले म्हणजे राजानें नेमिलेला न्यायाधीश व खुद्द राजा हे होत. परंतु न्यायाधीश व राजा निवाडा करीत तो देशकाचे मजालसींसमवेत करीत. यावरून न्यायाच्या कामांत लोकांचा हात अगदीं वरिष्ठ संस्थेपर्यंत होता हें स्पष्ट आहे. जातिभ्रष्टास पावन करून घेणें यासारखा धार्मिक स्वरूपाचा वाद मात्र वरील अधिकाऱ्यांपैकीं कोणा-

* बलुते हे गांवांतील वतनदार लोक असत. हे बारा होतेः सुतार, लोहार, चांभार, महार, मांग, कुंभार, न्हावी, धोबी, गुरव, जोशी, भाट, व मुलाणा.

पुढेंही निर्णयास न येतां त्याचा निकाल करण्याचें काम श्रीशंकराचार्यासारख्या धर्मगुरूकडे सोंपविलेलें असे.

१२. वादाचा निर्णय करण्याचें काम पुढील पद्धतीनें होत असे. पहिल्यानें अग्रवादी व पश्चिमवादी (प्रतिवादी) यांच्याकडून आपण गोत अगर देशक यांच्याकडे निर्णय करण्याचें काम सोंपविण्यास तयार आहों, अशा अर्थाचे लेख लिहून घेत. या लेखांस राजीनामा ही संज्ञा असे. निर्णयास अनुसरून वादी वर्तन करतील अशाबद्दल जामीन घेत. नंतर वाद्यांनीं आपआपली हकीकत सहीनिशीं लिहून द्यावयाची. त्यास तकरीरा म्हणत. तकरीर लिहून घेतल्यानंतर साक्षीपुरावा घेत. साक्षीदारांनीं सहीनिशीं लिहून दिलेल्या हकीकतीस साक्षपत्र म्हणत. इतकें झाल्यावर याज्ञवल्क्यस्मृतीवरील विज्ञानेश्वराची मिताक्षरी टीका यासारख्या धर्मग्रंथाच्या आधारें वादाचा निकाल करीत. तोंडी अगर लेखी पुरावा नच मिळेल तर वादाचा निकाल करण्यास दिव्याचा अवलंब करण्यांत येत असे. एखाद्या देवालयासमीप सात मंडलें करावयाचीं, मग दिव्य करणाराच्या हातावर पिंपळाचीं पानें ठेवून त्यावर लोखंडाचा तापलेला गोळा ठेवावयाचा. तो घेऊन सात मंडलें ओलांडून पलीकडच्या गवतावर तो त्यानें टाकतांच गवतानें पेट घेतला पाहिजे व दिव्य करणाराच्या हातावर एकही फोड येतां कामा नये. असें झालें तर तो खरा असें मानण्यांत येई. दिव्याचा दुसरा एक प्रकार असा होता. तेल अगर तूप एखाद्या काहिलींत तापवावयाचें व तें रसरसल्यावर त्यांत टाकिलेला लोखंडाचा तुकडा दिव्य करणारानें काढावयाचा. जर हातास कांहीं इजा झाली नाहीं तर दिव्य करणारा खरा; इजा झाली तर खोटा. वादांत ज्याचा जय होई त्या वाद्यास जयपत्र करून देण्यांत येई व पराभूत झालेल्या वाद्यापासून जो लेख गोत अगर देशक लिहून घेत त्यास यजितपत्र म्हणत. जय पावलेल्या वाद्याकडून जी रक्कम घेत तीस हरकी अगर

शेरणी ह्मणत, व पराभूत वाद्यापासून घेत तीस गुन्हेगारी हें नांव असे. सामान्यतः गुन्हेगारी हरकीच्या दुप्पट असून या दोहोंपासून उत्पन्न वादविषयाच्या किंमतीच्या शेंकडा पंधरापर्यंत भरे. मराठी राज्यांत सरकारास कर्जापैकीं चौथा, पांचवा अथवा सहावा हिस्सा देण्याचें कबूल करून सरकारतर्फे कर्ज वसूल करून घेण्याचा × मार्ग कोणत्याही सावकारास खुला असे.

१३. **फौजदारीः**—गांवांत बंदोबस्त ठेवण्याचें काम पाटलाकडे असे, व त्याला कुळकर्णी, चौगुला व गांवचा महार हे मदत करीत. मामलेदाराजवळ स्वार बरेच असत. त्यांचाच तो आपल्या महालांत शांतता व व्यवस्था राखण्याच्या कामीं हल्लींच्या पोलीसांसारखा उपयोग करी. एखाद्या गांवांत फौजदारी गुन्हा घडल्यास त्याचा निवाडा गांवच्या पंचांनीं करावा, अशी वहिवाट असे. परगण्याच्या ठिकाणीं फौजदार नांवाचा अंमलदार नेमिला असून त्या परगण्यांतील गुन्ह्यांचा इनसाफ करण्याचा अधिकार त्याजवर सोंपविलेला असे. पुण्यासारख्या मोठमोठ्या शहरांतून कोतवाल असत. त्यांजकडे शहरांतील 'मातबर कजिये' निकालासाठीं येत. निरनिराळ्या पेठांतील साध्या कज्जांचा इनसाफ पेठेचे कमाविसदार करीत. मराठी राज्यांतील सर्व न्यायाधिकाऱ्यांवर एक मुख्य न्यायाधीश असे. व त्याजपुढें फौजदारी व दिवाणी या दोन्ही स्वरूपाचे खटले चालत. या पदावर शके १६८१ (इ. स. १७५९) पासून पुढें बरींच वर्षें न्यायमूर्ति रामशास्त्री प्रभुणे हे होते.

१४. चोरी व दरोडेखोरी या दोन्ही प्रकारचे गुन्हे करणारांस अटकेंत ठेवावयाची, ठार मारण्याची, अगर हात, पाय, कान कापण्याची शिक्षा करण्यांत येई. चोरी अगर दरोडे पडले असतां त्यांचा माग एखाद्या गांवापर्यंत गेला ह्मणजे तेथून पुढें माग तरी काढून

× वाड, भाग २, पृष्ठ १३२, १४६, १४८, १७०.

द्यावा अगर चोरीस गेलेल्या मालाची भरपाई करावी अशी त्या गांवां-तील लोकांवर जबाबदारी असे. राजद्रोह, फंदफितुरी यांजसारख्या भयंकर गुन्ह्यांबद्दल केव्हां केव्हां कैद, मिळकतीची जप्ती, अगर हातपाय तोडणें, तर कधीं कधीं कडेलोट यांसारखी भयंकर शिक्षा देत. दारू पिणें हा गुन्हा मानण्यांत येत असून दारू पिणाऱ्या इसमास जबर गुन्हेगारी द्यावी लागे. विठोजी सातघर नांवाचा एक इसम एकदां दारू प्याला. तेव्हां त्याजपासून दहा हजार गुन्हेगारी घ्यावयाची. परंतु एक वेळ त्यास गुन्हा माफ केला. पुढें अंतर पडेल तर दहा हजार गुन्हेगारी देण्याचें त्यानें कबूल केलें. नंतर विठोजी दारू प्यालेला पुण्यांत कोतवालीकडे सांपडला. तेव्हां गुन्हेगारी देण्यास तो अगदीं असमर्थ असें आढळून आलें; सबब त्याचें पाटि-लकीचें वतन * जप्त करण्यांत आलें ! कोंकणप्रांतांत भुताळ्यांचा अतिशय त्रास होत असे. त्यांच्या बंदोबस्ताकरितां निरनिराळे अधि-कारी नेमण्यांत येऊन बारीक रीतीनें भुताळ्यांचा शोध घेण्यांत येई व गुन्हेगारास द्रव्यदंड व देहदंड यांची कडक शिक्षा करण्यांत येई. फांशीची शिक्षा अगर हातपाय तोडणें इत्यादि भयंकर प्रकार थोरले माधवराव यांच्या कारकीर्दीपर्यंत फारसे अंमलांत नव्हते. पुढें राज्यांत 'राघोबा' सारख्यांचीं खुळें निघाल्यानें व एकंदर दंग्याधोप्याचा जास्त प्रचार झाल्यानें हे प्रकार अंमलांत आले.

१५. **तुरुंगव्यवस्था:**—मराठी राज्यांत लोहगड, सिंहगड, पुरं-दर, राजमाची, अहमदनगर इत्यादि किल्ल्यांचा कैदी ठेवण्यासाठीं तुरुंग म्हणून उपयोग करीत. कैद्यास कोणत्या रीतीनें वागवावयाचें, त्याला खावयास अन्न कोणतें व किती द्यावयाचें हें कैद्याची जात व दर्जा यावरून ठरवीत. कोळी, रामोशी, बेरड इत्यादि जातींतील कैद्यांकडून किल्ल्यांवरील इमारतीचीं कामें करून घेत. तसेंच मोठ्या

* वाड, भाग ८, पृष्ठ ११९.

माणसास नागली एक शेर आणि मुलास अच्छेर याप्रमाणें अन्न मिळे. ब्राह्मण कैदी असल्यास तांदूळ, डाळ, तूप, मीठ हीं देण्यांत येत. कैदी मोठ्या दर्जाचा असल्यास त्याची गैरअब्रू न करण्याबद्दल किल्लेकऱ्यास ताकीद असे. कैद्याच्या पायांत बहुधा बिड्या घालीत. राघोबाचा सांथीदार सखाराम हरि गुप्ते इत्यादि लोकांस किल्ल्यावर कैदेंत ठेवण्यांत आलें; तेव्हां त्यांस 'भोजन घालणें, प्रभु कारकुनास जवळ जाऊं न देणें, धोत्रें अगर शेलापागोटें लागल्यास देणें, जेवणाची व वस्त्रपात्राची आबळ न करणें, बेडी नेहमीं * असों देणें,' असा हुकूम किल्लेकऱ्यास होता. परंतु पुढें सखाराम हरीनें दिलेल्या सवलतींचा दुरुपयोग केला तेव्हां त्यास नागलीचें पीठ द्यावें व नवी बिडी घालावी असा हुकूम झाला. स्त्रियाही कैदेंत पडत. राघोबाचा पक्षपाती बाजीराव गोविंद चर्वे हैदरअलीकडे गेला; तेव्हां त्याच्या दोन स्त्रियांस मंगळवेढें येथें अटकेंत ठेवण्यांत आलें. कैद्याचें घरीं लग्न अथवा इतर धार्मिक कार्य निघाल्यास व त्याची त्या कामीं जरूर असल्यास एखादा इसम जामीन घेऊन त्याची सुटका करीत. कोणत्याही मंगल प्रसंगीं कैदी सोडून देण्याचा हल्लींप्रमाणेंच त्या काळींही प्रघात होता. इ. स. १७४६।४७मध्यें पुत्रोत्साहार्थ कैदी मुक्त केले. तसेंच माधवरावाचे लग्नसमयीं बंदीवान + सोडिले. एकंदरीनें लोकांच्या चालीरीतींस व धर्मसमजुतींस अनुसरून जेवढ्या सवलती देणें शक्य होतें, तेवढ्या सर्व सवलती कैद्यांस देत व वर्षानुवर्ष उपासमार झाल्यामुळें एखादा कैदी तुरुंगांतच मरण पावल्याचें उदाहरण एकसुद्धां नमूद नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

१६. **शिक्षण**:—मराठेशाहींतील शिक्षणाचे तीन भाग करितां येतील. १ वैदिक, २ शास्त्रीय, व ३ व्यावहारिक. वैदिक ब्राह्मण दशग्रंथांचें पठण करीत व पंडित लोकांनीं साही शास्त्रांचा अभ्यास

*वाड भाग ८, पृष्ठ ७४; + वाड भाग २, पृ. ७३, ७५.

भारत-इतिहास-संशोधक मंडळ.

श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचें **हस्ताक्षर.**

[पुरंदर-संग्रह, संशोधक–आबासाहेब मुजुमदार.]



हरिपंत फडके यांचें **हस्ताक्षर.**

[पां. मा. चांदोरकर.]

करण्याचें काम पत्करिलें असे. या दोनही प्रकारच्या विद्वानांस दाक्षिणा व वर्षासनें या रूपानें राजाश्रय होता. आतां तिसरें व्यवहार-शिक्षण. हे बहुतेक सर्व ब्राह्मणांना, वैश्यांना व उच्च प्रतीच्या मराठ्यांना मिळत असे. या वर्गांत बहुधा कारकुनी, शिपाईगिरी अगर शेतकी, व्यापार इत्यादि धंदे करणारे लोक असत. व्यवहारशिक्षणास अक्षरांचे कित्ते गिरविण्यापासून आरंभ होई. पुढें त्यांत हिशेबी गणित, जमाखर्चाच्या पद्धति, भूमापन, पत्रे लिहिण्याचे मायने, मराठी कविता यांचा समावेश होई. याशिवाय वेताळपंचविशी, शुकबहात्तरी, लटकचाळीशी, भारत, भागवत, रामायण यांच्या आख्यानांच्या मराठींतील बखरी, मराठ्यांच्या व मुसलमानांच्या बखरी, वगैरे ग्रंथांचाहीं अभ्यास होई. हें सर्व ज्ञान करून देणाऱ्या पंतोजीस चांगला लोकाश्रय मिळे. खुद्द पेशव्यांच्या घराण्यांतील पुरुषांस संस्कृत ग्रंथही शिकवीत असें दिसतें. दुसरा बाजीराव आनंदवल्लीस असतां 'त्याचा रघुवंशाचा द्वितीय सर्ग जाला. तृतीयाचे पन्नास श्लोक जाले आहेत' असें एका * पत्रावरून आढळतें.

१७. येणेंप्रमाणें समाजांतील उच्च वर्गांच्या शिक्षणाची स्थिति होती. याहून जास्त माहिती पुढें जी कांहीं अनुभवानें प्राप्त होईल ती होईल. हिंदुस्थानच्या बाहेरील देशांचें भूज्ञान अगर इतिहासज्ञान लोकांना कांहींच नसे. खुद्द हिंदुस्थानच्या इतिहासाचें बखरींच्या वाचनानें लोकांस बरेंच ज्ञान होत असे, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. साधुसंतांचें त्या काळीं समाजावर मोठेंच वजन होतें. म्हणून त्यांच्या कथाकीर्तनांनीं धर्माची जागृति राहून समाजांत शुद्ध आचार व विचार यांचा फैलाव होई. शिवाय प्रत्येक संताच्या मठांत हस्तलिखित पोथ्यांचा मोठा संग्रह असून त्याचें पठण व अभ्यास नित्य चालू असे. धंद्याच्या बाबतींत लोकांना शास्त्रीय रीत्या शिक्षण मिळत होतें असें जरी

* इतिहाससंग्रह, ऐतिहासिक टिपणें, भाग ५, टिपण २.

म्हणतां येत नाहीं, तथापि निरनिराळ्या कलाकौशल्याचीं कामें पिढीजाद चालत आल्यानें त्यांत वाकबगार लोकांची कधींच तूट पडली नाहीं; आणि समाजही संपन्न असल्यामुळें कोणत्याही कसबाचें चीज झाल्याशिवाय रहात नसे. त्या काळीं मराठे हे '**राज्यकर्ते**' असल्यामुळें त्यांस लष्करी शिक्षणाची अत्यंत आवड असून जोर, बैठकी यांजसारखा व्यायाम घेऊन शरीर सुदृढ करावें; घोड्यावर बसावें; तरवारी, भाले, इत्यादि हत्यारें चालवावीं; याचें तर त्यांस जसें कांहीं बाळकडूच लागलेलें होतें ! मी लढाईवर जाईन व कीर्ति मिळवीन अशी महत्त्वाकांक्षा हजारों तरुणांत दिसून येईल. पानिपतास घोर अनर्थ घडला तरी दाद न देतां फिरून दहा बारा वर्षांच्या आंत 'मराठी घोडा' सर्व हिंदुस्थानभर यथेच्छ संचार करू लागला, याचें कारण तरी मराठ्यांचा वर सांगितलेला लष्करी बाणाच होय.

१८. **दक्षिणापद्धति**:—पुण्यास दरवर्षी श्रावणांत दक्षिणा वांटण्याचा समारंभ होई. ह्या वेळीं हिंदुस्थानाच्या सर्व भागांतून वैदिक, पंडित, ज्योतिषी, वैद्य इत्यादि विद्वानांच्या झुंडीच्या झुंडी येत; व त्यांना विद्वत्तेनुरूप दक्षिणा मिळे. शिवाय शिफारसपत्रेंही दिलीं जात. साधारण ब्राह्मणांस रमण्यांत दक्षिणा वांटीत. पण जे मोठे विद्वान् असत ते रमण्यांत जाणें कमीपणाचें मानीत. त्यांस सरकारी वाड्यांत येण्यासाठीं आमंत्रण होई; व योग्यतेप्रमाणें कोणास शाली, कोणास द्रव्य, कोणास इतर देणग्या, याप्रमाणें त्यांची संभावना होई. विद्वान् लोकांच्या संभावनेचा खर्च लाख सव्वा लाखापर्यंत होई. अशा प्रकारच्या औदार्यामुळें पुणें शहर म्हणजे विद्वत्तेचें माहेरघर अशी त्याची चोहोंकडे ख्याति झाली. देवालयांस इनामें करून दिलेलीं असत. मुसलमानांच्या मशिदी व दर्गे यांचींही वर्तनें चालविलीं असून कोंकणांत खिस्ती देवळांसही उत्पन्नें होतीं. त्याचप्रमाणें विद्वान् व सदाचरणी ब्राह्मणांस वर्षासनें असून त्यांजवर दरसाल लाखाहून जास्त खर्च होई.

१९ **टपाल**:—जेव्हां मराठी फौजा बाहेर मुलुखास जात, तेव्हां त्यांच्याशीं पत्रव्यवहार करण्याकरितां जासूद किंवा कासीद असत. ह्या जासुदांना थालनेरापासून दिल्लीस जाण्यास अठरा दिवस लागत व महेश्वरापासून तेरा दिवस लागत. सामान्यतः दररोज तीन रुपयेप्रमाणें त्यांना पगार मिळत असे. या व्यवस्थेशिवाय कायमचीं डांक नेण्याची व्यवस्था कांहीं झाली नव्हती. परंतु सावकार वगैरे लोकांनीं आपल्या हुंड्या लांब लांब नेण्यास माणसें ठेवलेलीं असत. तीं ठरीव वेळीं निघत. आपल्या लांब राहणाऱ्या आप्तेष्टांस ज्या कोणास पत्र पाठवावयाचें असे तो सावकाराच्या नोकराजवळ आपलें पत्र देई.

२०. **टांकसाळी व नाणीं**:—इ. स. १६६४मध्यें शिवाजीनें रायगड येथें टांकसाळ उघडून आपल्या नांवचीं नाणीं पाडण्यास सुरुवात केली. सोन्याचे होन, रुप्याचीं नाणीं व तांब्याचे शिवराई हीं नाणीं ह्या वेळचीं होत. शिवराईचें वजन दहा मासे असून बावीस मासे वजनाचे ढबू पैसेही चलनांत होते. शाहू गादीवर आल्यावर टांकसाळीचें काम साताऱ्यास चालू लागलें, व बाळाजी बाजीरावापासून पेशव्यांचे हातीं सर्व अधिकार गेल्यावर टांकसाळही साताऱ्याहून पुण्यास गेली. परंतु पेशवाईंत नाणीं तयार करण्याची परवानगी खाजगी व्यक्तींस देण्यांत येई. इ. स. १७४४ त बाळाजी बापूजी यास नागोठणें येथें टांकसाळ घालून दहामाशी पैसा करण्याचा तीन सालचा मक्ता देण्यांत आला. त्याचप्रमाणें रेवदंडा व किल्ले माहुली येथेंही टांकसाळी काढण्यास परवानगी दिल्याचे दाखले बाळाजी बाजीरावाच्या रोजनिशींत आहेत. सुभे धारवाड येथें खोटीं नाणीं चालू असल्याचें आढळून आलें. तेव्हां १७६० सालीं त्या प्रांतीं चालू असलेल्या सर्व टांकसाळी मोडून पांडुरंग मुरार यानें आपली एक टांकसाळ चालवावी असा त्यास हुकूम मिळाला. त्या टांकसाळींत होन, मोहरा व रुपये हीं नाणीं पाडावयाचीं असा ठराव होता. होनाचें वजन ३॥ मासे ठेवावयाचें असून, रुपया

व मोहोर हीं अनुक्रमें अर्काटचा रुपया व दिल्लीची मोहोर यांच्या वजनाबरोबर करावयाचीं होतीं. पांडुरंग मुरारानें पहिल्या वर्षानंतर १००० नाणीं काढिलीं म्हणजे सहा नाणीं सरकारास मक्तयाबद्दल कर म्हणून द्यावयाचीं असा ठराव होता. त्याचप्रमाणें यापुढें नाशिक, चिंचवड, तळेगांव दाभाडे, चांदवड इत्यादि ठिकाणीं टांकसाळी चालविण्याचे मक्ते दिल्याचे दाखले आढळून येतात. बाळाजी बाजीरावाचा मेहुणा मल्हार भिकाजी रास्ते यानेंही पहिल्यानें बागलकोट व पुढें वाई येथें टांकसाळ चालविली असून ' मल्हारशाई रुपये ' हें नमुनेदार नाणें म्हणून पेशवाईंत प्रसिद्ध असत. त्याशिवाय सरदारांच्या मुलखांतही टांकसाळी होत्या. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हटला म्हणजे नाना प्रकारचीं नाणीं त्या काळीं प्रचारांत येऊन व्यवहारांत बरीच जिकीर पडे. तथापि त्या काळीं आजच्यासारखीं दळणवळणाचीं साधनें विपुल नसून सर्व हिंदुस्थानभर एका बलिष्ठ सत्तेचा अंमल नसल्यानें हें नाण्यांचें वैचित्र्य अपरिहार्य होतें.

२१. पदव्या व इनामें:—माहाराष्ट्रांत त्या काळीं स्वराज्याच्या रक्षणार्थ व त्याच्या अभिवृद्धीकरितां मराठ्यांस सारखे झगडण्याचे प्रसंग येत, व त्यांच्या हातून अगणित पराक्रम होत. अशा मर्दुमकी गाजविणाऱ्या योद्ध्यांस त्या काळीं पदव्या व इनामें देण्यांत येत. कांहीं पदव्यांची नावें खालीलप्रमाणें होतीं. " हिंदुराव, हिंमतबहादर समशेरबहादर, वजारतमहा, सेनापति, सेनाखासखेल, सेनासाहेबसुभा, सेनाधुरंधर, धुरंधर—समशेरबहादर, महाराव हिंमत-बहादर, रस्तमराव समशेरबहादर, फत्तेजंग बहादर, सफेजंग बहादर, सरलष्कर, सेनाबारहजारी. " × कर्तबगार पुरुषांस केवळ पदव्याच देण्याची चाल नसून कांहीं बहुमानही मिळत. पालखींतून बसून जाण्याचा बहुमान पुष्कळ कर्तृत्ववान् पुरुषांस देण्यांत आलेला असून

× वाड भाग २, पृष्ठ १२२.

त्याजबद्दल भोई वगैरेस लागणाऱ्या खर्चाचीही नेमणूक करून देत. त्याचप्रमाणें मशाली, अबदागिरी इत्यादि मान व त्यांच्या खर्चाची तरतूदही सरकारांतून होई. इ. स. १७५०–५१मध्यें विठ्ठल शिवदेव विंचूरकर यास घड्याळ बाळगण्याविषयीं हुकूम झाला, व त्याजबरोबर घड्याळाची नेमणूक ठरवून दिली. लढाईंत पडलेल्या अगर जखमी झालेल्या लढवय्यांच्या कुटुंबांस उदारपणानें इनामें व बक्षिसें देण्यांत कधींही कसूर होत नसे. केव्हां केव्हां मुलाची त्याच्या मृत बापाच्या पदावर नेमणूक होई. एकंदरीनें साहेबकामीं प्राणसर्वस्व खर्ची घातलेल्या पुरुषाच्या कुटुंबाचा योगक्षेम चालविण्यास सरकार कधींही विसरलें नाहीं. आजारी लोकांना फुकट औषधें देण्याकरितां सुप्रसिद्ध व कुशल वैद्य आणि हकीम नेमलेले असत; व या कामगिरीबद्दल त्यांना गांवें इनाम दिलेलीं असत.

२२. **सांपत्तिक स्थिति व बाजारभाव:**—गडी व शिपायी यांच्या पगाराचे दर माहिना ३ रुपयांपासून ७ रुपयांपर्यंत असत. गवंडी, सुतार इत्यादिकांना रोजीं ६ आण्यांपासून १० आण्यांपर्यंत मजुरी पडे. कारकुनांना सात रुपयांपासून १० रुपये महिना पगार मिळे. परंतु त्या वेळचे बाजारभाव पाहिले तर बहुतेक सर्व संसारोपयोगी रोज लागणारे धान्यादि पदार्थ हल्लींपेक्षां तिपटी चौपटीनें स्वस्त होतें. याशिवाय मराठ्यांच्या परमुलुखावर स्वाऱ्या सुरू असल्यामुळें सर्व हिंदुस्थानांतून महाराष्ट्राकडे संपत्तीचा एकसारखा ओघ वहात होता. त्यामुळें सरकारी कर देणें अगर संसार चालविणें हीं कामें लोकांस मुळींच जिकिरीचीं वाटत नसत. या संपत्तीच्या ओघाचें सरस वर्णन करितांना बाळाजी बाजीराव एके ठिकाणीं म्हणतोः—"भगीरथसमान कैलासवासियांनीं उत्तरेकडून दक्षणपावेतों सुवर्णनदीप्रवाह चोवीस वर्षें वाहविला त्यांचें आशीर्वादें अलीकडेही निरंतर वर्धमान वाहात असतां देशाधिकारी व सेनामुख्य व अकृत्रिमास पूर्ण

ल्या नदीनें संतुष्ट केलें. एक तृष्णामात्र ल्या सुवर्णबोधानें वर्धमान केली. दक्षिण देशांतून (कर्नाटकांतून) सुवर्णनदी मागें रघूजी, फत्तेसिंगबाबांनीं आणिली (इ. स. १७२५-२६). परंतु जागां जागां जिरली, मध्यें बहुत दिवस दाक्षिणनदी न वाहिली. एकदां उत्तरेकडील सुवर्णनदी व दाक्षिणेची नदी दोहोंचा संगम सगरकूपसमान पुणें या स्थळीं, मध्यें न जिरतां, पूरयुक्त योग घडणें; तेव्हां ऋणोद्धार श्रमसार्थक इहलोकीं व परलोकीं होईल." *

सन १७६४—६५ तील×बाजारभाव खालीलप्रमाणें होते.

एका रुपयास मापी शेर.

गहूं	१६	डाळ (हरभऱ्याची)	८	तांदूळ	१२
ज्वारी	१६	मूग	१२	तीळ	३

राळे १६

एका वजनी शेरास रुपये.

कथील	१॥	मिरीं	१।	नवसागर	२	तांबें	२
द्राक्षें	१॥।=)	लांकडें	१	खंडीस ७ रुपये		हिंग	५

एका रुपयास वजनी शेर.

गूळ	५	जिरें	२	तूप	१॥। [सुमारें]
सैंधव	२	साखर	२	दूध	११ [सुमारें]
साबण	१।	पोहे	८	शेंगा मुगाच्या	८
सुंठ	२	कणिक	१२	ऊद अदपाव	बदाम १
खोबरें	२	कापूस	४	खडीसाखर	१ सुपारी ३

---

*म. इ. सा. खंड ६, लेखांक १६०; (२६।१२।१७४२).

×पहिले माधवराव यांची रोजनिशी. भाग २, पृष्ठ ३१४; पूर्वीच्याच वर्षी निजामाकडून पुणें प्रांत लुटला गेला होता, तेव्हां महागाईच्या वेळचे हे बाजारभाव होत हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

२३.**व्यापार व उद्योगधंदे**:— अरबस्थानांतील लोक घोड्यांचा व्यापार करीत असत. त्यांस कोंकण बंदरांत वसाहत करून राहण्यास उत्तेजन देण्यांत आलें होतें. त्यांना जकात वगैरे कर माफ केला होता. त्याचप्रमाणें माल घेऊन येणाऱ्या युरोपिअन व्यापाऱ्यांसही सवलती ठेविल्या होत्या. शहरांची भराभराट व्हावी म्हणून नवे नवे धंदेवाले लोक आणून त्यांना वस्ती करण्यास हरएक तऱ्हेनें सरकार मदत करी. जमीन मोफत देत व कर माफ करीत. पुणें शहरांत जे रेशमाचे व कलाबतूचे कारखाने पुढें मोठ्या भरभराटीस आले, ते बऱ्हाणपूर पैठण इत्यादि शहरांतील कारागीर लोकांस पुणें शहरांत घरें बांधण्यासाठीं मोफत जमीन देऊन त्यांना सरकारानें वसाहत करण्यास उत्तेजन दिलें म्हणूनच आले.

---

१०४. उपसंहार.

शिवाजीनें मराठी राज्याची स्थापना केली, व जन्मभर श्रम करून राज्यकारभाराची घडीही नीट बसवून दिली. पण त्यास अकालीं मृत्यु आला. इतक्यांत औरंगजेबास फुरसत सांपडून आपला मराठ्यांचा नाश करण्याचा हेतु साध्य करण्याकरितां तो दक्षिणेवर चालून आला. परंतु मराठी वीरांनी हा हिंदुत्वावरील घाला परतवून लावण्यासाठीं पराकाष्ठा केली व त्यांच्या श्रमाचें चीज होऊन त्यांना या युद्धांत जय आला. पुढें पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दीत तर मराठी राज्याचा विस्तार महाराष्ट्राबाहेरही झाला; व बाळाजी बाजीरावानें सर्व हिंदुस्थान मराठी राज्याच्या छत्राखालीं आणण्याचा संकल्प केला. तो संकल्प खरा होण्याचा अगदीं रंग दिसूं लागला; आणि हिंदु साम्राज्याचा पूर्ण सुखमय उपभोग हिंदुस्थानास घडणार

अशीं शुभ चिन्हें दिसूं लागलीं. पण पानिपतच्या दुर्धर प्रसंगानें मराठ्यांच्या सत्तेची पिच्छेहाट झाली व ती कल्पना स्वप्नवत् होऊन बसली. पुढें माधवराव पेशव्यानें कारभाराचा नीट बोज राखून मराठ्यांची पडती बाजू चांगलीच सांवरून धरली. परंतु त्याला निर्घृण काळानें अल्पवयांत ओढून नेलें ! ! तेव्हांपासून मराठ्यांची बाजू जी लंगडी पडली ती पुढें कधींही चांगली सावरली नाहीं. राघोबानें गृहकलह केला; इंग्रजांशीं झगडा झाला. पुढें दुसरा बाजीराव गादीवर आल्यावर यशवंतराव होळकरानें मुळीं पुण्यावरच स्वारी केली ! तेव्हां बाजीराव पळाला, व इंग्रजांचा आश्रित बनला. या वेळीं मराठी राज्यास ग्रहण लागलें, त्यांतच मराठी राज्याचा शके १७४० (सन १८१८) त पूर्ण ग्रास झाला.

२. मराठी राज्याच्या नाशाचीं कारणें पुष्कळच आहेत, पण त्यांतील ठोकळ पुढीलप्रमाणें. शिवाजीनें स्वराज्यस्थापना केली त्या वेळीं श्रीरामदासांनीं **'मराठा तेतुका मेळवावा'** हा उपदेश केला. त्या वेळीं रामदासांचा हा उपदेश महाराष्ट्रांतील सर्व कर्त्या माणसांस पटला होता असें त्यांच्या आचरणावरून दिसून येतें. परंतु पुढें रामदासासारख्या उपदेशकांची ही परंपरा मुळींच जागृत राहिली नाहीं. बाळाजी बाजीरावाच्या वेळची हिंदुपदपातशाहीची कल्पना कांहीं थोड्या मुत्सद्यांसच पटली असून मराठमंडळापैकीं बरेच सरदार ही कल्पना यशस्वी करण्यासाठीं अंग चोरूनच काम करीत होते असें कबूल करणें भाग आहे. शिवाय पानिपतच्या लढाईनंतर मराठमंडळांतील निरनिराळे सरदार एकीनें असे काय ते खड्यांच्याच लढाईंत लढले. बाकी शिंदे, होळकर, गायकवाड. भोंसले यांपैकीं प्रत्येकजण आपआपला स्वार्थ साधला म्हणजे झालें, एकंदर मराठमंडळ विजयशाली होत आहे कीं अवनत दशेस जात आहे याची फिकीरही नाहीं, अशा स्थितींत आढळून येतो. इकडे पुण्यास पहावें तों राघो-

बानें पेशवा होण्याची हांव धरली. त्यामुळें हें घरगुती विघ्न आवरतांनाच तेथील मुत्सद्यांची तारांबळ उडाली. मराठ्यांचें एकंदरीनें पाऊल पुढें कां मागें, याचा विचार करण्यासही कोणास फुरसत उरली नाहीं. दुसरें असें कीं, शेवटीं मराठी राज्यास—यापेक्षां मराठे सरदारांस म्हटलें तर जास्त बरोबर होईल—इंग्रजांशीं तोंड द्यावें लागलें. सैन्याची शिस्त, लांब पल्ल्याच्या तोफा, व सुधारलेल्या बंदुका, यांचा इंग्रजांस पक्का आधार असल्यामुळें इंग्रज व इकडील लोक यांच्यामध्यें जीं युद्धें झालीं त्यांत थोडक्या इंग्रज सोजिरांना इकडील बऱ्याच मोठ्या सैन्याचाही पराभव करतां येई. बाळाजी बाजीरावाच्या वेळेपासूनच इंग्रज—फ्रेंचांच्या इकडील लोकांशीं लढाया होत असत, व मराठी मुत्सद्यांचें लक्ष या इंग्रजांच्या साधनांकडे वेधावयास पाहिजे होतें; परंतु तसें झाल्याचें फारसें आढळून येत नाहीं. महादजी शिंद्यानें फ्रेंच लोक चाकरीस ठेवून ही शिस्त इकडील लोकांत आणण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट खरी. परंतु तसा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर व सर्व मराठमंडळानें केलेला दिसत नाहीं. आतां याचेंही कारण घरगुती भांडणांतच वेळ व श्रम खर्च होऊन राष्ट्रीय दृष्टीनें कांहींच काम नाना फडणिसासारख्यासही करितां आलें नाहीं हेंच होय! तिसरा मुद्दा असा कीं, पानिपतानंतर मराठमंडळांत कर्ते पुरुष फारसे निघाले नाहींत. पहिले माधवराव, महादजी शिंदे व नाना फडणीस हीं तीन नांवें गाळलीं तर बाकीच्या मंडळींत सर्व मराठी साम्राज्यावर छाप बसवूं शकेल असा पुरुष आढळत नाहीं. यावरून एकी, ज्ञान व सामर्थ्य हीं अनुकूल झालीं तर राज्यस्थापना होते; परंतु त्याच्या उलट यांचा अभाव झाला असतां राज्यें धुळीस मिळतात, हा मुख्य धडा शिकतां येण्यासारखा आहे.

समाप्त.

परिशिष्ट १.

(आख्यायिका.)

या आख्यायिकांपैकीं पहिल्या तीन इतिहाससंग्रह मासिकपुस्तकांतून घेतल्या आहेत. चौथी, पांचवी व सहावी या भारतवर्ष मासिक पुस्तकांत आलेल्या आहेत. सातवी दाभाड्यांच्या बखरींतून घेतली आहे. त्यापुढील दोन लोकहितवादीकृत ऐतिहासिक गोष्टी या पुस्तकांतल्या आहेत. दहावी हरिवंशाच्या बखरीपैकीं आहे. अकरावी काव्येतिहाससंग्रह पत्रें यादींतील पत्रांक ३१४ होय. राहिलेल्या रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन यांजकडून मिळाल्या.

---

१ शिवाजीचा किताब.

औरंगजेब बादशहा महाप्रबळ होऊन त्यानें अनेक हिंदु व रजपूत राजे आपल्या सिंहासनाचे दास करून सोडिले. त्या वेळीं हिंदु व रजपूत यांच्या वतीनें राजे जयसिंग जयपूरवाले यांनीं औरंगजेब बादशहास 'दिल्लीश्वरो वा, जगदीश्वरो* वा' असा किताब दिला. हें वर्तमान शिवाजीमहाराजांस कळलें, तेव्हां त्यांनीं रामदासस्वामींस पत्र लिहिलें; व सर्व हिंदु व रजपूत राजे यांनीं औरंगजेबास 'दिल्लीश्वर' म्हणजे केवळ 'जगदीश्वर' अशा बहुमानास पोंचविलें असें कळविलें. त्याचा आशय तेव्हांच लक्षांत घेऊन श्रीसमर्थ रामदासस्वामी यांनीं शिवाजीमहाराजांस उत्तर पाठविलें. त्यांत पुढील ओव्या लिहिल्याः—

यश कीर्ति प्रताप महिमा । उत्तम गुणांसि नाहीं सीमा ।
नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ॥ १ ॥
देवाचा कैपक्ष घेणें । ब्राह्मणांची चिंता वाहणें ।
बहुजनांसि पाळणें । देणें ईश्वराचें ॥ २ ॥

---

*औरंगजेब दिल्लीश्वर आहे, किंबहुना सर्व जगाचा स्वामी आहे.

याचा आशय असा कीं, औरंगजेबास मनुष्यांनीं किताब दिला, तुम्हांस देणें ईश्वराचें आहे. तुम्हांस देण्यासारखी दुसरी कोणतीच उपमा नाहीं. तुम्ही अनुपम आहां !

त्र्यंबकराव रेटरेकर यांचा इमानी बाणा.

बाळाजी विश्वनाथ पेशवे हब्श्यांच्या त्रासामुळें प्रथम देशावर पळून आले. ते प्रथम रामचंद्रपंत अमात्य–त्या वेळचे मराठी राज्याचे कुलमुखत्यार–यांजकडे शागीर्द मंडळींत नौकरीस राहिले. तेथें न जमल्यामुळें पुढें ते दाभाडे सेनापति यांच्या नौकरींत शिरले, त्या वेळीं दाभाडे यांचे कारभारी भिवराव रेटरेकर हे होते. यांची मर्जी बाळाजी विश्वनाथांवर दिवसेंदिवस जास्त बसत चालली. पुढें यजमान व नोकर हा भेद नाहींसा होऊन ते मित्र बनले. पुढें बाळाजीवर कांहीं संकट आलें त्यांतून भिवरावांनीं त्यांस वांचविलें. बाळाजी विश्वनाथ मोठे होत होत पुढें छत्रपतींचे मुख्य प्रधान झाले. त्या वेळीं भिवराव रेटरेकर वारले. त्यांस बाजीराव व चिमणाजी असे दोघे मुलगे होते. त्यांस त्यानीं मरणसमयीं बाळाजी विश्वनाथांच्या स्वाधीन केलें. पेशव्यांच्या राज्याची अखेर होईपर्यंत या घराण्यांतील पुरुष पेशव्यांच्या हुजूरपागेंत सरदारी करीत. ज्याप्रमाणें पुरंदऱ्यांच्या घराण्याशीं पेशव्यांचा घरोबा होता, त्याचप्रमाणें रेटरेकर मंडळी पेशव्यांच्या कुंटुंबांतील समजली जात असे.

पेशवाईच्या अखेरीच्या सुमारास एल्फिन्स्टन साहेबांनीं जाहिरनामा लाविला कीं, " अमुक मुदतीच्या आंत बाजीराव यांस सोडून जे सरदार आपआपल्या जागीं परत येतील, त्यांच्या जहागिरी त्यांजकडे चालविल्या जातील न येतील त्यांच्या जहागिरी खालसा होतील. " हा जाहिरनामा लागतांच अष्टप्रधानांतील प्रतिनिधि आदिकरून पेशव्यांच्या बरोबरीचे म्हणविणारे सरदार व पटवर्धन आदिकरून पेशव्यांच्या आश्रयानें वैभवास चढलेले बहुतेक सरदार, आपल्या धन्यास सोडून आपल्या जागीं आले व आपली दौलत संभाळून राहिले. त्या वेळीं भिवराव रेटरेकर यांच्या वंशजांपैकीं त्र्यंबकराव रेटरेकर बाजीरावाबरोबर भटकत फिरत होते. त्यांस एल्फिन्स्टनसाहेबांचे गुप्त बातमीदार व साह्यकारी बाळाजीपंत

नातू यांनीं समजावून सांगितलें कीं, 'तुमच्यासारख्यांनीं आतां किती जरी खटपट केली तरी पेशवाई टिकत नाहीं. मग साहेबांच्या मनाप्रमाणें वागून आपली जहागीर कां राखीत नाहीं? मग उगीच कां दवडतां?' यावर त्र्यंबकरावांनीं उत्तर केलें कीं, 'ही नेकीची गोष्ट नव्हे. कांहीं झालें तरी आमची कुळकर्ण्यांची खर्डेघाशी व ज्योतिष्याची पडशी कोणी नेत नाहीं. ती कायमची आहे. आम्ही आपल्या धन्यावरोबर झाडाचा पाला खात हिंडूं व येईल तो हालाझोला सोसूं; परंतु धन्याशीं बेइमानी कधींही होणार नाहीं.'' अखेर पेशवाई बुडाली. रेटरेकरांची जहागीर सर्व गेली. तथापि त्यांची नेकीची व बाणेदार वर्तणूक मनांत आणून, इंग्रजसरकारनें कांहीं गांवांची जहागीर त्यांजकडे चालविली आहे व तिसऱ्या प्रतीच्या सरदारांत त्यांची गणना केली आहे.

२ अलौकिक धैर्याची स्वामिभक्त स्त्री.

कुलाब्याच्या आंगरे घराण्याचा मूळ संस्थापक कान्होजी आंगरे हा होय. त्यानें हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर लढाऊ आरमार तयार करून, परशत्रूंपासून सर्व कोंकण किनाऱ्याचें चांगलें संरक्षण केलें होतें. हा इ. स. १७२९ मध्यें मृत्यु पावला. त्याच्यामागून त्याचा पुत्र सेखोजी यास सरखेलीचीं वस्त्रें मिळालीं. तो इ. स. १७३३ सालीं मृत्यु पावला. त्याची आई लक्ष्मीबाई ही फार चतुर व राजकारणी बायको होती. हिच्या ठिकाणीं रणशूर मराठ्यांच्या स्त्रियांस साजतील असे धैर्य व स्वामिभक्ति हे गुण फार अपूर्व होते. कान्होजी आंगऱ्याच्या पश्चात् आरमाराची व्यवस्था ही बाई स्वतः पहात असे. त्यामुळें पेशव्यांच्या दरबारीं हिचें वजन व प्रतिष्ठा विशेष असे. सेखोजी आंगरे वारल्याचें वृत्त जेव्हां थोरले बाजीरावसाहेब यांस समजलें, तेव्हां त्यांनीं लक्ष्मीबाईचें समाधान करण्यासाठीं एक पत्र पाठविलें. त्या पत्रामध्यें त्यांनीं "पुत्रशोक न करितां विचारानें दुःखाचें परिमार्जन करावें, आणि लोकांचीं समाधानें करावीं," इत्यादि मजकूर लिहिला. हें पत्र वाचून त्या धैर्यवती स्त्रीनें पेशव्यांस उत्तर लिहिलें:—"ईश्वराच्या इच्छेनें जो प्रसंग ज्या समयीं यावयाचा तो येतच आहे. भवितव्यता कधींहि टळणार नाहीं. तेव्हां घडलेल्या

गोष्टीबद्दल खेद करण्यांत काय अर्थ आहे ? दुःखाचें परिमार्जन करून, आमच्या घराण्यानें जो पूर्वापार लौकिक संपादिला आहे त्याचें संरक्षण करणें हाच माझा स्वधर्म आहे असें मी समजतें; आणि स्वामिकार्यावर दृष्टि देऊन तें सिद्धीस नेण्यांतच सर्व कृतार्थता आहे असें मी मानितें. मजला माझ्या पुत्रापेक्षां स्वामिकार्याच्या यशःसिद्धीचें महत्त्व अधिक वाटतें. पुत्रशोकांत गुंतून मी सरदारीचा लौकिक कधींहि गमविणार नाहीं." केवढें हे धैर्य ! केवढी ही स्वामिभक्ति !!

४ शिदनाक महार.

सातारा जिल्ह्यांत तासगांव तालुक्यांत कळंबी म्हणून एक गांव आहे, तेथचा हा वतनदार महार. शाहूराजा मोंगलांच्या हांतून सुटून आला तेव्हां त्यास जे सरदार मिळाले त्यांत हा होता. शाहूस राज्यप्राप्ति झाल्यावर ज्यांनीं त्यास मदत केली होती त्यांस त्यानें त्यांच्या योग्यतेप्रमाणें देणग्या दिल्या. त्या वेळीं शिदनाक यास कळंबी गांव इमान मिळाला. तो अद्यापि त्याच्या वंशाकडे चालत आहे.

या शिदनाकाचा नातू त्याच्याच नांवाचा होता, तो खर्ड्याच्या लढाईंत (शके १७१६) होता. खर्ड्याच्या मैदानावर जेव्हां मराठ्यांच्या फौजेचा तळ पडला तेव्हां सरदार आपल्या लोकांसह मिसलीप्रमाणें उतरले. शिदनाकाच्या गोटाच्या आसपास दुसऱ्या ब्राह्मण व मराठे सरदारांचे गोट होते. पेशवाईंत सोंवळ्या ओंवळ्याचा विचार फाजील वाढत चालला होता. त्यामुळें कित्येकांनीं सवाईमाधवराव कचेरींत डेऱ्यांत बसले असतां त्यास विनंति केली कीं, महाराचा गोट मध्येंच आहे तो बाजूस काढावा. पेशव्यांनीं विनंति ऐकून आपल्या बाजूस बसलेल्या हिरोजी-पाटणकर नांवाच्या वयोवृद्ध सरदाराकडे पाहिलें. तेव्हां तो मराठा सरदार बोलला कीं, ही कांहीं जेवणाची पंगत नव्हे; म्हणून मध्येंच महाराचा गोट असल्यास हरकत नाहीं. ही तरवार धरणाऱ्या शूरांची पंगत आहे येथें जातीचा विचार नाहीं. '**ज्याची तरवार खंबीर तो हंबीर**' पाटणकरांचें बोलणें ऐकून पेशव्यांनीं मान डोलावली.

पुढें लढाईच्या दिवशीं सरदार लोक पेशव्यांस मुजरे करून लढा-

ईस चालले तेव्हां शिदनाकहि मुजऱ्यास आला. मुजरा करून हात जोडून पेशव्यांस म्हणाला, 'महाराज, मी शिदनाक महार आहें. मी महार म्हणून कांहीं लोक माझा तिरस्कार करितात. आज आपल्या पायाचा दास कामागिरी कशी करतो ती पहावी.' असें म्हणून निघून गेला. पुढें लढाई चालू झाली, परशुरामभाऊवर पठाणांनीं मोठी गर्दी करून भाऊस घोड्यावरून खालीं आणिलें; त्या वेळीं मराठे व पठाण यांची जी चकमक झाली तींत शिदनाकानें अप्रतिम शौर्य दाखविलें. त्याची पटवर्धन मंडळींनीं मोठी तारीफ केली.

---

५. आप्पासाहेब निपाणकर.

पेशवाईच्या अखेरीच्या सुमारास आप्पासाहेब निपाणकर म्हणून मोठा शूर पुरुष होऊन गेला. कोणे एके दिवशीं त्याच्या वाड्यांत कीर्तन झालें. आप्पासाहेब कीर्तन ऐकत बसला होता. त्याच्या समोरच एका खांबाशीं टेंकून त्याचा एक कारकून बसला होता. त्याच्या अंगरख्यांत एक ढेंकूण शिरला होता. त्यामुळें तो कारकून वारंवार चुळबूळ करी. त्याच दिवशीं अशी गोष्ट झाली कीं, आप्पासाहेबाच्या पागोट्यांत भला मोठा विंचू जाऊन बसला होता. हुजऱ्यानें तसेंच पागोटें आणून दिलें. तेंच डोकीस घालून आप्पासाहेब कीर्तनास येऊन बसला. कीर्तनास आरंभ झाल्यापासून विंचवानें सारखे डोक्यावर तडाखे मारण्यास आरंभ केला. कथा संपेपर्यंत आप्पासाहेब ते सोशीतच होता. कथा संपल्यावर आप्पासाहेबानें समोर बसलेल्या कारकुनास हांक मारून विचारलें कीं, कथेस आरंभ झाल्यापासून तुझी चलबिचल कसली चालली होती ? कारकुनानें सांगितलें कीं कपड्यांत ढेंकूण शिरल्यामुळें अशी गोष्ट झाली. मग आप्पासाहेबानें डोईचें पागोटें काढून झाडलें, तों त्यांतून भला मुठीसारखा विंचू बाहेर पडला. आप्पासाहेब कारकुनास म्हणाला:—'बेट्या, ढेंकणानें इतकी तुझी तारांबळ उडविली; हा तर प्रहरभर माझें डोकें फोडीत आहे !'

---

६. परशुरामभाऊच्या पुत्रानें सूड उगविला.

परशुरामभाऊस कोल्हापूरकरांनीं मारल्यावर त्याचा पुत्र आप्पासाहेब

(रामचंद्रपंत)यानें आपल्या पित्याच्या मरणाबद्दल सूड उगविण्याचा निश्चय केला. तो अप्रतिम शूर होता. पटवर्धनांचें पुत्र म्हणजे वाघाचे बच्चे !विश्वासराव गायकवाडानें आपल्या पित्यास मारिलें, त्याच्या नरडीचा केव्हां घोट घेईन असें आप्पासाहेबास झालें. पित्याच्या मरणानंतर तो चांगली तयारी करून अचानक कोल्हापुरावर चालून गेला. कोल्हापूरकरांची तयारी चांगलीशी नव्हती. शहरांत जाऊन बातमी पोंचली कीं, आप्पासाहेब आला. विश्वासराव गायकवाड व त्याचे भाऊ नुकतेच जेवावयास बसले होते. त्यांस बातमी कळतांच पुढचीं ताटें बाजूस सारून आईस नमस्कार करून निघाले. निघतांना बोलले कीं, ' आप्पासाहेब सूड घेण्याच्या इराद्यानें आला आहे. निर्वाणीचा प्रसंग आहे. ' गायकवाड व कोल्हापूरचे इतर सरदार आप्पासाहेबाशीं लढाई देण्याकरितां शहराबाहेर पडूं लागले. जसा वाघ आपल्या शिकारीवर नजर ठेवून छपून बसलेला असतो तसा आप्पासाहेब बसला होता. त्याची सगळी दृष्टि गायकवाडावर. तों गायकवाडही शहराबाहेर पडले. तों भलत्याच बाजूनें आप्पासाहेबानें आपला घोडा कोल्हापूरकरांच्या सैन्यांत फेंकला. ते लोक आपली सांवरासावर करीत होते. इतक्यांत त्या पांगलेल्या लोकांतून आप्पासाहेब, गायकवाड जेथें होते तेथें जाऊन पोंचला. आणि त्यानें डोक्यावर उचलून धरलेल्या समशेरीचा हात असा झपाट्यानें व सफाईनें मारला कीं, विश्वासराव व त्याचा एक भाऊ या दोघांचीं शिरें तात्काळ धडापासून वेगळीं झालीं. इतकें करून, लोक चकित होऊन तिकडे पाहतात व हां हां म्हणतात तोंच आप्पासाहेब गेलेल्या वेगानें परत येऊन आपल्या सैन्यांत येऊन उभा राहिला ! याला म्हणतात पाणी !

---

७. धन्य उमाबाई !

जोरावरखां बाबी या नांवाचा दिल्लीच्या बादशहाचा नोकर अहमदाबादेस होता. बडोद्यानजीकच्या महालांत दंगा करून तो तिकडील ठाणीं उठवूं लागला. तेव्हां शाहूनें उमाबाई दाभाडे ही तळेगांवीं होती तिला पत्र लिहिलें कीं, ' दोन्ही मुलांचें अल्पवय, हूड, त्यांचे संरक्षणाकरितां तुम्ही बरोबर जाऊन त्यांस अघाडीस जाऊं न देतां बाबीचें पारि-

पत्य करून अहमदाबादेचें ठाणें घ्यावें.' शाहूची आज्ञा प्रमाण मानून उमाबाई आपल्या मुलांसह मोहिमेस निघाली. उमाबाईच्या हाताखालीं मराठे आपल्यावर चालून येत आहेत असें कळतांच बाबीनें उमाबाईच्या नांवें एक पत्र लिहून कळविलें कीं, 'तूं रंडकी बायको आहेस, तुझीं मुलें लहान आहेत. त्यापेक्षां तूं फौज घेऊन माघारीं जा.' हा कुत्सित निरोप ऐकून उमाबाईस क्रोध आला. तिनें सर्व सरदारांस एकत्र जमविलें व समोर बांगड्या व कुंकू ठेवून ती म्हणाली, "मी बायको माणूस असतां पठाणांनीं दुर्भाषणाचीं पत्रें लिहिलीं आहेत; त्यापेक्षां मी अहमदाबादेच्या राजवाड्यांत जाऊन अन्न घेईन, मध्यें घेणार नाहीं. तुम्हांस तुमच्या अब्रूची शरम वाटल्यास आमचे समागमें यावें. मरणास भिऊं नये, मरणास भीत असल्यास बांगड्या हातांत घालून कुंकू लावून आपल्या कुटुंबांत जावें." हें वीरश्रीचें भाषण ऐकून सर्व सरदारांस आवेश चढला व मुजरे करून ते बोलले, 'आम्हीं आपलें निमक खाल्लें आहे त्यापेक्षां मरून जाऊं. पण माघारे फिरणार नाहीं. मौज आपण पहावी." मग मरूं किंवा मारूं या आवेशानें मराठी सैन्य अहमदाबादेवर चाल करून जाऊं लागलें. उमाबाई हत्तीवर स्वार झाली होती, व तिनें हातांत पिस्तुल, पेषकबज व तलवार घेतली होती. तिच्या दोहों बाजूंस दोघां मुलांचे हत्ती चालले होते. दहा हजार स्वारांनिशीं बाबी मोकाबल्यास आला. मग मराठे व मोंगल यांची मोठ्या निकराची लढाई झाली. निरुपाय होऊन बाबी अहमदाबाद शहरांत जाऊन दरवाजे लावून बसला. त्या वेळीं मराठ्यांस मोठा आवेश चढला होता. त्यांनीं समरांगणावरचीं प्रेतें उचलून तटाबाहेर दरवाजाजवळ त्यांचा ढीग केला, व वर चढून किल्ल्याच्या दरवाजाला आग लावून दिली. मग मराठे आंत उतरले. तेव्हां मुसलमानांची अतिशय तारांबळ उडाली. बाबीस तर पळतां भुई थोडी झाली. मराठ्यांचीं निशाणें किल्ल्यावर फडकूं लागलीं! याप्रमाणें ठाणें सर झाल्यावर उमाबाईनें अन्नग्रहण केलें; मग शहराचा बंदोबस्त करून उमाबाई आपल्या मुलांसह साताऱ्यास गेली. तिचा पराक्रम पाहून शाहूस अत्यंत आनंद झाला, व त्यानें सोन्याचे तोडे उमाबाईस बक्षीस दिले; व हत्ती, घोडे, वस्त्रें, भूषणें देऊन तळेगांवास पावसाळ्याची छावणी करण्यासाठा

निरोप दिला.

८ ढमढेरे घराण्यांतील स्वार्थत्यागी स्त्री.

राघोबादादांची राक्षसभुवनचे ठिकाणीं लढाईस पुण्याहून स्वारी निघाली, तेव्हां ढमढेरे यांचे बाईस भेटण्याकरितां गेले. तेथें तिनें आग्रह केला कीं, माझा मुलगा पंधरा सोळा वर्षांचा आहे. तो स्वारीबरोबर घ्यावा. तेव्हां दादासाहेबांनीं सांगितलें कीं, "तुमचे घरांत मर्द माणूस कोणी राहिला नाहीं. एकटा मुलगा आहे. त्यास बरोबर नेण्याचें कारण नाहीं." तेव्हां बाई म्हणाली कीं, सरकारबरोबर आमचा कोणी नाहीं असें दिसेल तें ठीक नाहीं. याकरितां मुलगा घ्यावा. त्या आग्रहावरून दादासाहेबांनीं मुलगा बरोबर घेतला. पुढें पैठण उतरून पलीकडे राक्षसभुवनावर निजामअलीच्या फौजेची गांठ पडून लढाई झाली. त्यांत हा मुलगा पुढेंच होता. त्याला जखम लागून तो श्रीमंतांचे देखत ठार झाला. पुढें श्रीमंत लढाई संपल्यावर पुण्यास परत आले. तेव्हां बाईच्या समाधानाकरितां गेले आणि बाईस म्हणाले, 'तुमचा एकच मुलगा ठार झाला. आतां याचा मी उतराई कसा होईन तें दिसत नाहीं. याकरितां मी तुमचा मुलगा आहें. जर मला दत्तक घ्याल तर फार चांगलें.' तेव्हां बाईनें सांगितलें कीं, 'झाली ती गोष्ट झाली, सरकारकृपेनें दत्तक घेऊन दौलत चालेल, सरकारांनीं फिकीर करूं नये.'

९. आज कीर्ति मिळवा ! अपेश घेऊं नका.

लढाईचे वेळीं मुख्य सरदार यांस बोलावून पूर्व दिवशीं सभा करीत, त्यांमध्यें ताटांत विडे भरून ठेवीत आणि ते उचलावयास सांगत. ते जो उचलील तो मागें हटावयाचा नाहीं. दुसरे दिवशीं सर्व जमले, म्हणजे बापू गोखले वगैरे मुख्य सरदार शेल्याचा पदर पसरून त्यांचे पुढें फिरत आणि प्रार्थना करीत कीं, " माझी सरदारी खरी, पण राखणें तुम्हांकडे आहे. मी शेरभर पिठाचा मालक, सर्व भूषण तुमचें आहे. याकरितां आपले वडील कसे करीत आले, त्याचें स्मरण करून आज कीर्ति मिळवा. अपेश घेऊं नका. आमची शोभा तुमच्या हातीं आहे. मरण

आलें तर स्वर्गवास होईल. यश मिळालें तर कीर्ति होईल. सर्व दौलत तुमची आहे. असें समजून आमचे पदरीं असल्याचें भूषण करावें हें आमचें मागणें सर्वांस आहे." असें सांगून हल्ला चढवीत व जय मेळाला म्हणजे बक्षिसें वांटीत.

---

१०. साडेतीन राव.

भवानराव प्रतिनिधि यांनीं सांगितलें कीं, या पृथ्वींत साडेतीन राव कोणते ? एक मुरारराव घोरपडे, एक भवानराव प्रतिनिधि, एक गोपाळराव पटवर्धन, व अर्धा श्रीमंत माधवरावसाहेब, असें प्रतिनिधि बोलले.

कोणे एके दिवशीं प्रतिनिधि पुण्यांत आपले वाड्यांत बसले होते, तों गोपाळ नाईक तांबवेकर हे सावकार पालखींत बसून जात होते. समागमें कांहीं स्वार, पायदळ, इटेकरी व पट्टेकरी असे जात होते, ते यांचे माडीखालून गेले. तों यांनीं शोधास पाठविलें कीं स्वारी कोणाची ? त्यांचे माणसांनीं सांगितलें कीं, स्वारी गोपाळराव यांची. पंत यांनीं शोधास पाठविलें कीं, गोपाळराव पटवर्धन कीं काय ? त्यांचे माणसांनीं सांगितलें कीं, तांबवेकर; पटवर्धन नव्हेत. असें समजतांच पंतांनीं आज्ञा केली, 'काय पहातां ? धरून ठोका. हा राव कोठून जहाला ?' अशी आज्ञा होतांच पंतांकडील शेंपन्नास मनुष्य जाऊन तांबवेकर यांची पालखी मोडून त्यांसही मारिलें. इटे व पट्टे हिरावून घेतले. नंतर श्रीमंतांकडे तांबवेकर जाऊन मजकूर सांगितला. श्रीमंत बोलले कीं, तुम्ही आपणास राव कां म्हणत होता ?

कर्नाटकांत निजगल म्हणून एक ठाणें आहे. तेथें श्रीमंतांचे मोर्चे *बसले. एके दिवशीं लढाई होत असतां श्रीमंत मोर्च्यांत बुद्धिबळें खेळत बसले होते. मुरारराव घोरपडे यांचे बंधु दौलतराव आणि आपण असे उभयतां खेळत असतां अकस्मात् गोळी येऊन श्रीमंत नारायणराव-साहेब यांस निसरती लागली. लागतांच श्रीमंत नारायणराव पालखींत बसून गोटास गेले. ज्या जाग्यावर गोळ्या येऊन पडत त्या जाग्यावर श्रीमंत बुद्धिबळें खेळत बसले, व श्रीमंत नारायणरावसाहेबांस गोळी

* हैदरअलीवर तिसरी स्वारी, पृष्ठ ४०५, कलम ५ पहा.

लागली; तेव्हां सर्वांस काळजी पडली. परंतु श्रीमंतांस तेथून उठाण्याची कोणाची शक्ति नाहीं. तेव्हां सर्व सरदारांनीं जाऊन मुरारराव सांगितलें :—"राव, श्रीमंत बुद्धिबळें खेळत बसले, तेथें गोळ्या येऊन पडतात. श्रीमंत नारायणरावसाहेबांस गोळी लागली, आमची श्रीमंतांस 'उठा' म्हणण्याची ताकद नाहीं!" तेव्हां मुरारराव तसे श्रीमंतांपुढें आले, आणि बोलले.' उठ, नांहींतर आतां *तोडतो!' असे म्हणतांच श्रीमंतांनीं वरतें पाहिलें, तों राव म्हणाले कीं ' तूं मरणार कीं काय ? त्या पोरास गोळी लागली, दैववशात् वांचला म्हणून वांचला. आणि तुला गोळी लागल्यावर पुढें काय करावयाचें ?' असें म्हणून आपले भावास रागें भरलें. तों श्रीमंत बोलले 'हें ठाणें येत नाहीं त्यास काय करावें ?' मुरारराव म्हणालेः 'माझा तमाशा पहा.' असें म्हणून पायउतारा होऊन नीट चालून गेले तों हल्लाच केला. मुरारराव खासा जातीनिशीं निशाण घेऊन चढले. वर निशाण चढवून खालीं पाहतात तों शिडीच्या खालच्या पायरीजवळ श्रीमंत उभे ! तें पाहून मुरारराव यांनीं तोंडांत बोट घालून आश्चर्य केलें कीं, यांचेपुढें शिपाईगिरी मिरविण्याची आमची हद्द जाहली!

श्रीमंत माधवराव श्रीरंगपट्टणचे स्वारीस निघाले ते धारवाडांत आले. धारवाडास मोर्चे १ बसविले. तों हैदरखान फौजेसुद्धां धारवाडच्या कुमकेस निघाला. ही बातमी श्रीमंतांची आली. तेव्हां गोविंद शिवराम खाजगीवाले यांसी बोलले कीं, 'हैदरखान पट्टणाहून निघाला. त्याचे तोंडावर कोणी पाठवावा लागेल. आम्हांस तर मोर्चे बसले, त्यापेक्षां येथून जावयाचें नाहीं. त्यास कोण पाठवावा ?' गोविंदराव बोलले कीं, हैदरखानाचे तोंडावर गोपाळराव पटवर्धन यांस पाठवावें. त्यांजवांचून त्याचे तोंडावर जाण्यास कोणी योग्य नाहींत.' असें म्हणतांच श्रीमंत 'उत्तम' म्हणाले. नंतर श्रीमंतांनीं दहा हजार फौज व दहा हजार गारदी याप्रमाणें फौज देऊन रवाना केलें. तो धारवाडाहून दोन मुक्काम गेले. हैदरखानास बातमी समजली कीं, गोपाळराव आले. असें समजतांच कूच करून माघारें पट्टणास गेला.

---

* ठार मारतो. १ सन १७६४ च्या सप्टेंबरांत.

११. नाना फडणिसाची स्वामिभक्ति.

साल्बाईच्या तहाची वाटाघाट चालू असतां नाना फडणिसानें शिंद्याच्या दरबारचा वकील नारोपंत यास पुढील पत्र लिहिलें. स उपरि. मौजे वेळास हा गांव आमचा वतनी आहे. तो इंग्रजांकोंकणांत बाणकोटाखालीं आहे. तो सोडून घ्यावा असें मनांत परंतु साष्टी सरकारची सुटली नसतां आपला गांव सोडून घ्यावा हें नाहीं. तुह्मांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. रवाना छ. १३ रमन हे विनंति."

---

१२. नागपूरकर भोंसले व सखारामबापू.

बापू प्रतिबंधांत असतांही, गरजु लोक त्या वेळच्या प्रघाताप्रमाणें नायुक्तींनीं त्यांच्या अकलेचा फायदा घेत असत. एक वेळ नागपूरकर सले आणि श्रीमंत यांचेमध्यें कांहीं तेढ उत्पन्न होऊन, श्रीमंतांनीं भोंसास पुण्यास बोलाविलें. भोंसले यांस प्रसंग कठिण दिसला. म्हणून नीं पुण्यांतील आपल्या वकिलामार्फत बापूंची सल्ला मागितली. बापू तबंधांत असल्यामुळें त्यांच्याशीं बोलण्यास वकिलास मार्ग नव्हता. ापि त्या वेळच्या राजकीय वकिलांच्या चातुर्याप्रमाणें तो वकील बापूंचे ीस गेला. बापू बुद्धिबळें खेळत होते. तेथें जाऊन मुकाट्यानें उभा हेला. बापूंनीं त्याचा हेतु जाणून बुद्धिबळाच्या डावांत असें म्हटलें , 'राजा एक घर मागें घ्यावा आणि प्यादी एक घर पुढें द्यावी.' ऐकतांच वकिलाचें काम होऊन तो निघून गेला. आणि त्यानें आपल्या न्यास कळविलें कीं, 'आपण स्वतः न येतां, फौज पुढें पाठवावी, णजे पेशव्यास दहशत बसून कार्यभाग होईल.' भोंसल्यांनीं तसें करितांच त्यांजवरील प्रसंग टळला, हें सांगणें नकोच.

---

१३. हरिपंत फडक्यांची निष्ठा.

हरिपंत फडके पूर्वी सावकार वानवळे यांचे घरीं नोकर होते. एके दिवशीं वानवळ्यांकडे श्रीमंतांस मेजवानी झाली. त्या वेळीं रीती-

प्रमाणें जेवणाच्या वेळीं समया मांडिल्या होत्या. त्या समयांपैकीं ए किंचित् उंच होती. श्रीमंतांचें लक्ष त्या समईकडे गेलें. तें लाक्षणि ओळखून हरिपंतांनीं ती समई थोडीशी खळग्यांत सारून बाकी समयांबरोबर केली. हरिपंताचें हें चातुर्य श्रीमंतांचे लक्षांत येऊन, त्यांनी पानसुपारीच्या वेळीं वानवळ्यांस विचारिलें कीं, समई सारली तो कोण ? वानवळ्यांनीं तो आपल्या येथील नोकर असल्याचें सांगितलें. तेव्हां श्रीमंतांनीं तात्यांस मागून घेऊन आपल्या संग्रहीं ठेविलें. पुढें हरि तात्यांच्या पराक्रमाची प्रसिद्धि होऊन हिंदुस्थानभर जरीपटक्याचा घो वाजत राहिला तथापि हरिपंतांनीं आपला पूर्वीचा क्रम सोडला नव्हता ! त्यां यजमान वानवळे गत झाल्यानंतर त्यांचे श्राद्धाचे दिवशीं हरिपंत त्यां येथें जेवावयास जावयाचेच ! 'बोलावणें घेण्याचा आमचा मान नाहीं आम्ही वेळेवर येत जाऊं,' असें त्यांनीं वानवळे यांस सांगून ठेविलें होतें. वान वळे यांचे घरीं असतां जी धावळी व भांडें ते वापरीत, ती धावळी आणि भांडें वानवळ्यांच्या घरीं ज्या फडताळांत ठेवीत असत, त्यांतच ठेवू फडताळास हरिपंतांनीं आपलें कुलूप ठेविलें होतें. यजमानांच्या श्राद्धा गेले म्हणजे पूर्वीची ती धावळी नेसून आणि तें भांडें घेऊन जेवण क वयाचें असा त्यांचा क्रम होता.

---

१४ विठ्ठर सुंदर.

'सखा, देवा, विठ्ठला,' हे पेशवाईतील प्रसिद्ध *साडे शहाण्यांपैकीं तीन. त्यांपैकीं विठ्ठल सुंदर हे होत. हे माध्यंदिन ब्राह्मण. अल्पवयांतही यांच्या अंगीं राजकारणाचें पाणी खेळत होतें. जात अंगस्वभाव म्हणतात त्याप्रमाणें हे अगदीं लहानपणीं राजकार पडण्याची खटपट करीत. श्रीमंत नानासाहेब व श्रीमंत भाऊसाहेब

* पेशवाईत साडेतीन शहाणे म्हणत. ते पुढीलप्रमाणें:—१ सख राम बापू बोकील, पुण्याचे दिवाण; देवाजीपंत चोरघोडे, नागपूरक भोंसल्यांचे दिवाण; १ विठ्ठल सुंदर परशरामी संगमनेरकर, हैद्राबाद च्या निजामाचे दिवाण; ॥· नानाफडणीस भानू; एकूण ३॥.

बंधुद्वयाचें एकमेकांवरील प्रेम विलक्षण असल्याचें इतिहासप्रसिद्ध आहेच; तेव्हां श्रीमंत भाऊसाहेबांचे कच्छपीं लागून त्यांच्या द्वारें पेशवाईत आपला शिरकाव करून घ्यावा आणि राजकारणांत पडून दौलत व कीर्ति संपादावी हेतूनें विठ्ठल सुंदर भाऊसाहेबांचेपाशीं आर्जवानें रहात. एके दिवशीं दोन प्रहरीं उभयतां बंधु निजले असतां, हे भाऊसाहेबांचे पाय चेपीत जवळच होते. ह्यांच्या अंगची तरतरी पाहून भाऊसाहेबांस मोठें कौतुक वाटलें; आणि त्यांनीं श्रीमंतांपाशीं गोष्ट काढली कीं, 'हा मुलगा नांवारूपास चढविण्याजोगा आहे.' तेव्हां श्रीमंत म्हणाले, "छे, त्यांत काय आहे? 'माध्यंदिना बुद्धिहिना' त्याच्यानें काय व्हावयाचें आहे?" हें ऐकतांच त्या पाणीदार मुलास फार वाईट वाटलें आणि ह्या गोष्टीबद्दल पेशव्यांस प्रायश्चित्त देईन तरच मी 'विठ्ठल' असें म्हणून पेशव्यांचा त्याग करून तो दुसरा मार्ग सुधारण्याच्या मागें लागला.

इतक्यांत त्यास असें कळलें कीं, औरंगाबादेस निजामअली यास त्याचे भावानें अटकेंत ठेविलें आहे. तेव्हां निजामअली याजपाशीं संधान बांधून त्यास राज्यावर बसविलें असतां आपणास सहजच मोठें पद प्राप्त होईल, आणि पेशव्यांचा समाचार घेण्यास सांपडेल, असें मनांत आणून स्वारी त्या उद्योगाला लागली. दैवाची अनुकूलता असली म्हणजे साधनें आपोआप पुढें येतात म्हणतात तें अक्षरशः खरें आहे. इकडे एक मुसलमानांचा काफिला औरंगाबादेस जाण्यास निघाल्याचें मशारनिल्हे यांस कळलें. दुसऱ्याचें मन कसें वेधावें ही हातोटी मशारनिल्हे राजश्रीस फार चांगली साधली होती. तेव्हां त्यांनीं त्या काफिल्याच्या मुख्याधिकाऱ्याजवळ जाऊन 'मला आपल्याबरोबर औरंगाबादेस न्यावें' अशी विनंति केली. त्यानें मान्य केली आणि त्याचें बरोबर स्वारी जाऊन पोहोंचली; तेथें गेल्यावर तेथील ठळक ठळक बडी मंडळी पाहून त्यांचे घरीं जाण्याचा नित्यक्रम ठेविला; आणि ज्यास जसें आवडेल तसें वर्तन करून त्या सर्व मंडळीवर आपली छाप बसविली. मुख्य हेतु निजामाकडे जाण्याचा होता. परंतु किल्ल्यावर सात पहारे होते. तितके ओलांडून वर जाणें अशक्य होतें खरें; परंतु त्यांच्या मोहिनीपुढें कोणाचाहि टिकाव लाग-

ण्याजोगा नव्हता. हिंदु असो, मुसलमान असो, कोणीहि असो; त्यास आपल्या रसवंतीनें आपलेंसें करण्यास त्यांस कांहींच उशीर लागत नसे. त्यांनीं त्या पहाऱ्यावरील शिपायांकडे जाणें येणें सुरू करून त्यांस आपलेंसें करून घेतलें, आणि ' मला किल्ला पाहावयाचा आहे, वर जाण्यास परवानगी द्या ' असें म्हटलें. ' यःकश्चित् ब्राह्मणाचें पोर तें काय ! आणि तें वर गेल्यानें आपणांस उपद्रव तो काय होणार ?' असें मनांत आणून त्यांनीं यास वर जाण्याची परवानगी दिली.

एक दोन वेळां वर गेल्यावर एके दिवशीं सकाळीं निजामसाहेबांची स्वारी ऊन्ह खात एकटीच बसली असतां सुंदर यांनीं त्यांस कुरनिसा केला आणि विनंति केली कीं, ' कांहीं करावयाचें आहे किंवा असें ऊन्ह खात बसावयाचें आहे ? ' निजामअलीही कांहीं सामान्य मनुष्य नव्हता. त्यानें उत्तर केलें कीं, 'पुष्कळ करावयाचें आहे. पण अडकून पडल्यावर काय करावें ? साधन मिळेल तर करावयास तयार आहें ! सांथीदार तर कोणी पाहिजे ?' तेव्हां सुंदर यांनीं उत्तर केलें कीं, 'तुम्हांस मी सांथीदार आहें. तुम्हीं मला जन्मपर्यंत अंतर देऊं नये व मी तुम्हांस अंतर देणार नाहीं याबद्दल उभयतांनींही शपथा आणा करून त्याप्रमाणें वर्तावें.'असें म्हणून बरोबर तुळशी व सबजा नेला होता.तो उभयतांनीं एकमेकाच्या हातांत देऊन आणभाक केली आणि सुंदर आपल्या उद्योगास लागले. लवकरच त्यांनीं निजामाच्या जनानखान्यांतील जवाहिराच्या जोरावर एक हजार अरबी फौज नोकरीस ठेवून औरंगाबादचा किल्ला ताब्यांत घेतला व आसपासच्या मुलुखावर वर्चस्व स्थापिलें; नंतर कांहीं दिवसांनीं निजामाच्या भावास बोलावून त्याचा खून करविला व निजामास गादीवर बसविले व आपण त्याचा दिवाण झाले. याप्रमाणें बस बसल्यावर राजश्री पेशव्यांस प्रायश्चित्त देणाच्या उद्योगास लागले. पुढें निजामअलींनीं पेशव्यांवर एकामागून एक अशा तीन स्वाऱ्या केल्या, दर खेपेस विठ्ठल सुंदर यांनीं ' माध्यंदिना बुद्धिहीना ' असें म्हणून पेशव्यांस नमस्कार ठोकावा !! असो. विठ्ठल सुंदर पुढें राक्षसभुवनच्या लढाईत पडला. तें कांहींही असलें तरी विठ्ठल सुंदर व निजामअली यांचा जो संबंध जडला तो अद्याप कायम आहे.

———

१५ गोविंदराव कृष्ण काळे.

अखेर बाजीच्या अखेरीच्या वेळीं इंग्रजांकडून बाळाजीपंत नातू निर्वाणीचा खलिता (Ultimatum) घेऊन आले कीं, आमची सहा आण्यांची बाकी राहिली आहे ती चुकती करून द्या. नाहींपेक्षां पुण्यावर स्वारी होईल. सगळे उपयोगीं लोक काढून टाकून बदमाष, आचारी, पाणके भोंवतालीं गोळा करून वेडेचाळे केल्याचें प्रायश्चित्त घेण्याची वेळ आली !! या निर्वाणीच्या प्रसंगीं आपणास कोण उपयोगी पडेल असा विचार करितां, भोंवतालच्या मंडळींत मसलतीयोग्य असा एकही मनुष्य दिसेना !!! अर्थात्, पूर्वीच्या लोकांपैकीं कोणी आहे किंवा नाहीं याचा शोध करणें भाग पडलें. ह्यांपैकीं फक्त गोविंदराव काळे हे एकटेच उरले आहेत असें दिसून आलें. तेव्हां रावबाजींनीं त्यांस बोलावून आणून सांगितलें कीं, 'इंग्रज असें म्हणतो; प्रसंग तर मोठा कठिण आहे, यांतून सुटका कशी करावी ?' एवढा आकाश कोसळल्यासारखा प्रसंग आला तरी गोविंदरावांच्या तो खिजगणतींत नव्हता ! ते म्हणाले, "अः त्यांत काय आहे ? त्यास एवढें मात्र देणें द्यावें कीं, माझ्या मसलतीबाहेर वागूं नये; म्हणजे मी सर्व बंदोबस्त करितों." बाजीरावांनीं तें कबूल केलें व रसिडेंटाकडे लिहून कळविलें कीं, तुमचे खलित्याचा जाबसाल करण्यास गोविंदराव काळे यांस नेमिलें आहे. तें वाचल्याबरोबर रेसिडेंट म्हणालाः—'आतां सर्व फसलें ! आतां कांहीं लागीं लागावयाचें नाहीं.' गोविंदराव यांनीं लागलीच रेसिडेंटास भेटीस बोलाविलें. पुढें रेसिडेंट आल्यावर गोविंदराव व रेसिडेंट यांचें खालीलप्रमाणें भाषण झालें:—

गोविंदरावः—कुंपणीसरकारचें म्हणणें तरी काय आहे ?

रेसिडेंटः—वसईच्या तहाप्रमाणें सहा आण्यांची बाकी थकली आहे ती चुकती व्हावी.

गो०:—सहा आणे कशाबद्दल द्यावयाचे ?

रे०:—शत्रूंपासून रक्षण करणेबद्दल.

गो०:—शत्रु तरी कोण ? कोणापासून रक्षण केलें ?

रे०:—होळकरांपासून रक्षण केलें.

गो०:—होळकर आमचा शत्रु, म्हणजे काय ? तो तर आमचा सरदार, त्याचेपासून रक्षण तें काय करावयाचें ?

रे०:—तें कांहीं असो? तुमच्या यजमानांनीं ठराव केला कीं नाहीं?

गो०:—हो खरेंच ! तो आम्हांस शिरसावंद्य आहे. परंतु निजामाकडे खंडणी फार दिवसांची थकली आहे. कुंपणीसरकारचा ठराव परशत्रूपासून रक्षण करण्याचा आहे, तरी निजामाकडील आमची बाकी वसूल करून तिजमधून आपले पैसे घेऊन बाकीचे आम्हांस द्यावे.

रे०:—(मनांतल्या मनांत) ओ हो ! आता कसें करावें ? या ब्राह्मणानें तर मोठ्या पेंचांत घातलें ! निजाम म्हणजे कांहीं लहान प्रकरण नव्हे. त्यांत कंपनीसरकारचा दोस्त. त्याच्याशीं बिघडतां येत नाहीं. शिवाय तो गोविंदराव ह्यांचे मुठींत बागणार. तेव्हां स्वारीचा बेत पेशवे आणि निजाम एक करून आपलें कांडात काढावें असा आहे ! कसें आपल्यास कुंठित केलें !

इतकें चाललें आहे तोंच पेशवाईचा नाश करण्याकरितां अवतार घेतलेल्या बाजीरावांनीं बापू गोखले यांची मसलत ऐकून बेटावर स्वारी केली ! तोफांचा गडगडाट सुरू होऊन तो रेसिडेंट व गोविंदराव ह्यांचे कानीं पडला.

रे०:—(तोफांचा गडगडाट ऐकून) क्यों गोविंदराव, लढाई सुरू हुवा.

गो०:—सलाम साहेब. आतां आपण आपल्या जागीं जाऊं. नशीब त्या यजमानाचें ! पेशवाईचीं बारा वर्षें भरलीं इतकेंच खरें.

असें म्हणून उभयतां निघून गेले. एका बैठकींत रंगास आणलेली गोष्ट बिघडली व पेशवाई ठार बुडाली.

---

१६. वतनवृत्तीचा अभिमान.

पुरंदऱ्यांकडे कोडींत गांवचे ज्योतिष आहे. पाटलाचे येथें उपाध्यांनीं जाऊन ब्राह्मणभोजन असेल तेव्हां स्वयंपाक करून ब्राह्मणांस वाढावें, असा पूर्वापार संप्रदाय चालत आला आहे. एके वेळीं तेथील पाटलाचे घरीं कांहीं ब्राह्मणभोजन होतें, म्हणून त्यानें ग्रामजोशास (पुरं-

दऱ्यांस) बोलावूं पाठविलें. त्या वेळीं पुरंदऱ्यांकडे गजान्त लक्ष्मी आली होती. सबब त्यांनीं आपल्या गुमास्त्यास पाटलाकडे रवाना केलें. परंतु तो पाटीलही अभिमानी होता. त्यानें त्या गुमास्त्याच्या तोंडांत मारून त्यास म्हटलें, 'तूं रे कोण येणार ? तूं का आमचा उपाध्या ? त्या पुरंदऱ्याचें ढुंगण जड झालें वाटतें ? त्यानें स्वत: आलें पाहिजे व त्याचे बायकोनें येऊन स्वयंपाक केला पाहिजे. असें त्याच्यानें होत नसेल तर वृत्ति सोडून दे म्हणावें !' असें होऊन गुमास्ता परत आला. तेव्हां श्रीमंत पुरंदरे म्हणाले, 'गोष्ट खरी आहे. आपणच चुकलों. हत्ती व पालख्या ह्या दोन दिवसांच्या आहेत, वृत्ति मात्र निरंतरची आहे, तेव्हां आपणांस जाणें भाग.' लागलीच त्यांनीं बाईसाहेबांस सांगितलें, 'चला आतां यजमानाचें गृहकृत्य केलें पाहिजे.' असें म्हणून उभयतांनीं पाणी आणण्यासुद्धां सर्व व्यवस्था करून ब्राह्मणभोजन पार पाडलें. यजमानांनीं पत्रावळी उचलल्या हें पाहिलें तेव्हां पाटीलबोवा शांत झाले आणि उपाध्यांस म्हणाले, " अरे तुझे हात धुवावयाचे आहेत ना ? ही जमीन तुला हात धुण्याकरितां इनाम दिली आहे. ही घे सनद; आणि दाक्षिणेकरितां हें आठ खंडी गव्हाचें पेंव घे." ती हात धुण्याची जमीन अद्याप पुरंदऱ्यांकडे असून त्याच नांवानें प्रसिद्ध आहे. त्या वेळचे लोक ह्याप्रमाणें आपल्या हक्कास जपत व जपल्याचें सार्थकही करून घेत.

परिशिष्ट २.
कठिण शब्दांचा कोश.

अंदू--साखळदंड.

अमीन--परगण्याचा मुख्य अधिकारी.

अवई—भुमका, अफवा.

अस्मान—आकाश.

आणभाक—शपथ.

इटा—हें एक भाल्याच्या जातीचें पायदळाचें हत्यार आहे. याचा मारा बारा हातपर्यंत चालतो. 'एक इटेकरी व दहा पट्टेकरी बरोबर' अशी म्हण आहे.

इतबार—विश्वास.

इरें—जोर.

ऐवज—द्रव्य.

कबिले--बायकामुलें.

कमकसर—जवळजवळ, सुमारें.

कमची—हातांत धरावयाची छडी.

कमाविसदार--मामलेदार, ग्रामसंघकरग्राही.

कर्णधार—नावाडी.

कही—धान्य जमा करण्याकरितां दाणावैरण वगैरे मिळवून आणणारी लष्करी तुकडी.

कस्त—श्रम.

कानुनगो—एखाद्या परगण्यांतील चालीरीति व वसूलबाबी यांचा माहितगार आणि सरकारी दप्तराचा संभाळ करणारा अधिकारी.

कांडात काढणें—शिक्षा करणें.

कारखाने—हे अठरा होते. १ तोफखाना. २ पीलखाना. (हत्ती) ३ उष्टरखाना (उंट) ४ शिलेखाना (चिलखतें, ढाल, तरवारी इत्यादि युद्धोपयोगी सामान ठेविण्याचें स्थान). ५ फरासखाना. ६ कोठी. ७ लक्कडखाना. ८ इमारत. ९ बागा. १० कुरणें. ११ वहीतकोठी. (१) १२ रथखाना. १३ पुणें पेटा. १४ थट्टी. १५ पोतें व जामदारखाना. १६ जिन्नसखाना, व वैद्यशाळा. १७ पुस्तकशाळा. १८ खासगी.

किन्नरखंड—हें हिमालयाच्या पलीकडे आहे अशी समजूत आहे.

कासीद—जासूद.

किलावा—हत्तीच्या गळ्यांत सुताच्या दोरीचें पेंडें महाताचे पाय अडकविण्यास घालतात तें.

कुमक—मदत.

कुलमुखत्यार—मुख्य अधिकारी.

कौल घेणें—स्वाधीन होणें.

कौल, कौलनामा—अभयपत्र.

खलबत—पुष्कळ माणसें एका ठिकाणीं जमून करितात तो विचार.
खवासखाना—हत्तीचे अंबारीतिल पाठीमागची जागा. ही जागा मोठी मानाची असे.
खळी—शत्रु.
खामखा—निश्चयानें.
खिजमतगार—सेवक, हुजऱ्या.
खैरात करणें—बक्षीस देणें.
गंडांतर—जिवावरचें संकट.
गनीम—शत्रु, मुसलमानांनीं मराठ्यांस दिलेलें नांव.
गरनाळ—रुंद तोंडाची तोफ.
गोट—तळ.
ग्रंथ—धर्मशास्त्रावरील ग्रंथ.
घांसदाणा—चौथाई व सरदेशमुखी यांखेरीज कांहीं मराठे सरदारांनीं आपल्याच अधिकारानें वसूल केलेला कर.
चिन्तनिका—मनन, अभ्यास.
चिरिमिरि—लहानसें बक्षीस.
चौकडा—कानांत घालावयाचा मोत्यांचा दागिना. प्रत्येक कानांत दोन दोन मोतीं अशीं चार.
जरब—वचक.
जंगम—लिंगायत.
जमेदारी—अंमलदाराचें पद.
जिरेटोप—लोखंडी टोप.
जीद—विरोध.
झिझिया—मुसलमानी राज्यांत मुसलमानेतर लोकांवर बसविलेली डोईपट्टी.
ठाणें अमीन—ठाण्याचे अंमलदार.
ठाणगे—ठाण्याचा वसूल करणारा
डेरा—तंबू. [कामगार.
तबीब—शस्त्रवैद्य.
तलब—पगाराची बाकी.
तलावा—शोध.
तमा—पर्वा.
दरखदार—हिशेब तपासणारे अधिकारी.
दस्त—कबुलीचा कागद, हस्तगत.
दळ—सैन्य.
दिलेरी रुस्तुमी—पराक्रम. दिलेर व रुस्तुम हीं दोन महायोद्धयांचीं नांवें आहेत.
धमधमे—मातीचे मोठमोठाले धक्के अथवा बुरुज.
धुमामा—दंगा.
नक्षा—मान, ताठा. [कामगार.
नाइकवाडी—वसुलीकडचा हलका
नाडगौडा—मुख्य पाटील.गांवच्या उत्पन्नांपैकीं ३॥ टक्क्यांचा मालक. गौडा=पाटील.
नामाकूल—निंद्य.
नायबी—मुखत्यारी.
निमक—मीठ.
निरवणूक करणें—बजावून सांगणें.

निर्वेध—सुरक्षित.
नौबत—नगारा.
पंचहजारी—पांच हजार स्वारांची.
पटबंधन-(करून)-पदरांची गांठ [बांधून.
पथक—सैन्याची तुकडी.
पद—किताब.
पाळेगार—कर्नाटकांत पाळेगार लोकांचें प्राबल्य विशेष असे. हे पाळेगार म्हणजे प्राचीन काळच्या हिंदुराजांनीं महालोंमहालीं कामावर नेमिलेले अधिकारी होत. तीं राज्यें नष्ट झालीं तेव्हां हे अधिकारी आपणास पाळेगार म्हणजे संस्थानिक म्हणवूं लागले.
पेषकबज—कट्यार.
पोत—मशालीप्रमाणें जाळून उजेड पाडण्याकरितां तेलांत बुडवून गुंडाळलेलीं फडकीं.
पोस्त—सणांतील देणगी.
फत्तेमारी—मेचवा.
फंदफितुरी—बंडाळी.
फरजंद—मुलगा.
फर्मान—सनद.
फावलेमानी—सवड सांपडतांच.
फिसाद—दंगाधोपा.
बक्षीगिरी—सेनापतीची जागा.
बरकंदाज—बंदुकवाला.
बहुचकपणा—वाचाळपणा.
बाजी—अब्रू.
बिचवा—एक प्रकारचें हत्यार.
बिनी—अघाडी.
बेचिराख—दीपहीन, उजाड.
बेदिल—नाखूष, बेफाम.
भुमका—अफवा.
मनसब—स्वार बाळगण्याचा हक्क व त्याकरितां उत्पन्नाची नेमणूक.
मनसबा—इच्छा, योजना.
मसनद—गादी.
माची—डोंगराचा पायथा व माथा यांच्या दरम्यानची सपाटी.
मिनतवारीनें—नम्रपणानें.
मिसल—सैन्याचा तळ पडला असतां अमुक सरदारानें अमुक ठिकाणीं उतरावें अशी पद्धति लावून दिलेली असते तिला मिसल असें म्हणतात.
मुजरा—सलाम. [दिवाण.
मुतालिक—मोठ्या अधिकाऱ्याचा
मुलाहिजा—भीड.
मुलूखगिरी—प्रदेश जिंकणें.
मेखसूं—तंबूच्या मेखा ठोकण्याची मोगरी.
मोकाबला—युद्ध, समोरासमोर येणें.
मोकासा—स्वराज्यांतील एकंदर उत्पन्नांतून शेंकडा ६६ टक्के उत्पन्नाचा मुलूख जहागीरदारांस इनाम करून दिलेला असे. त्यास मोकासा म्हणत. मोकासा करून

देणें म्हणजे गांवच्या उत्पन्नाचा तो भाग इनाम करून देणें.

मोर्चा—तोफा ठेवण्यासाठीं तयार केलेली बैठक. प्रथम उंच उंच फळ्या उभ्या करितात, त्यांच्यामागें वाळूचीं पोतीं ठेवितात; व त्यावर तोफा लाविताते. फळ्यांच्या योगानें व अशा तजविजीनें शत्रूपासून तोफांचें संरक्षण होतें.

यख्त्यारी—अधिकारी.

यादी—आठवण.

येलगार—हल्ला.

रसद—अन्नसामुग्री.

रसीद—वसूल.

राऊत—स्वार.

रुबरू—समक्ष.

रेवण—तटाचें बंदुकीच्या गोळ्यांपासून संरक्षण व्हावें म्हणून तटाजवळ उतरता रचलेला मातीचा [ढीग.

लघु—हलकट, क्षुद्र.

वकील-ई-मुताालिक—बादशहाचा खास प्रतिनिधि.

वचक—धाक.

विल्हेस लावणें—निकाल करणें.

विवंचना—चिंता.

व्यूह—कारस्थान, मसलत.

व्रतबंध—मुंज.

शर्त—अट.

शहराची नाकेबंदी करणें—शहराच्या सर्व नाक्यांवर सक्त पहारा ठेवणें.

शहान्शहा—शहांचा शहा, मुख्य बादशहा.

शिबंदी—किल्ल्याच्या रक्षणास ठेविलेलें सैन्य.

शिरपेंच—पागोट्यावर बांधावयाचा दागिना. हा मुंडावळीप्रमाणें पागोट्यावर बांधावयाचा. मुंडावळीस लोंबणारे पदर असतात तसे यास नसतात.

सदरेस—सभेत.

सफेजंगी—पराक्रम.

सरखेल—आंग्र्यांना मिळालेला किताब. मूळचा अर्थ स्वारीच्या तुकडीचे अधिकारी, असा आहे.

सरंजाम—सामुग्री, लवाजमा, जहागीर.

सरदेशपांडेगिरी—चौथाई व सरदेशमुखी यांजसारखा एक हक्क होता. परंतु त्यांत वसुलावर शेंकडा पांच टक्के घ्यावयाचे असें होतें.

सरनोबत—सेनापति.

सलूख—तह.

साहेबनौबत—यजमानापुढें वाजवावयाची नौबत.

सिताब—लवकर.

हक्क—कर. उदाहरणार्थ चौथाईचा हक्क वसूल करणें.

हंगामा––लढाई.
हलकारा—जासूद.
हवालदिल––चिन्ताक्रान्त, घाबरा.
हालाझोला––संकट, त्रास.
हुजरात—खास पेशव्यांची फौज; सरदारांची नव्हे.
हुल्लड—हल्ला.
हजीर मजलस—मुख्य सभा.
हैराणगत—वाईट स्थिति.
होड—पैज.

परिशिष्ट. ३

(शकावली.)

[**विशेष सूचना**:—१ महत्त्वाच्या मित्या जाड खिळ्यांनीं छापिल्या आहेत; त्या पाठ ठेविल्यास चांगल्या. २ कांहीं ठिकाणीं वृत्तांचे वार आद्याक्षरांनीं दर्शविले आहेत; उदाहरणार्थ–श.=शनिवार; बु.=बुधवार.]

शक	सन	वृत्त.
१४५५	१५३३	बाबाजी भोंसले याचा जन्म.
१४७२	१५५०	मालोजी भोंसल्याचा जन्म.
१४९९	१५७७	लखुजी जाधवरावापाशीं मालोजीस शिलेदारी.
१५१६	१५९४	शहाजीचा जन्म.
१५१८	१५९६	जिजाबाईचा जन्म.
१५२०	१५९९	रंगपंचमीचा रंग.
१५२५ माघ शु.१५	६।१।१६०४	मालोजीस श्रीदेवीचा दृष्टांत.
१५२६	१६०४	शहाजी–जिजाई लग्न.
१५३० चैत्र शु. ९	१६०८	रामदासस्वामीचा जन्म.
१५४८ वैशाख व॥१०	१०।५।१६२६	मलिकंबरचा मृत्यु.
१५४९ वैशाख शु.२।७।४	१६२७	श. शिवाजीचा जन्म.
१५५१ फाल्गुन व॥३	**१९।२।१६३०**	**शु. शिवाजीचा जन्म**

(जेधे शकावलीवरून.)

शक	सन	वृत्त
१५६८	१६४६	तोरणा काबीज.
१५६९ आश्विन व.१३	१५।२।१६४७	दादाजी कोंडदेवाचा मृत्यु.
१५७० श्रावण व॥१	२५।७।१६४८	शहाजीस विजापूरकरांनीं पकडलें.
१५७१ वैशाख शु.९	११।४।१६४९	बु. शिवाजीस समर्थानुग्रह.
१५७१ ज्येष्ठ शु.१५	१६।५।१६४९	शहाजीची सुटका.
१५७१ फाल्गुन व॥२	९।३।१६५०	श. तुकारामाचा मृत्यु.
१५७७ पौष व॥१४	१५।१।१६५६	जावली घेतली.
१५७९ ज्येष्ठ शु.१२	१४।५।१६५७	संभाजीचा जन्म.
१५८१ मार्गशीर्ष शु.७	१०।११।१६५९	अफजलखानाचा वध.
१५८३ चैत्र शु.९	२९।३।१६६१	राजारामाचा जन्म.
१५८२ आषाढ व॥ १	१३।७।१६६०	विशाळगडच्या खिंडींत लढाई.
१५८४ भाद्रपद शु॥१२	१६।८।१६६२	मोरो त्रिंबक पिंगळ्यास पेशवाई.
१५८५ चैत्र शु. ८	५।४।१६६३	शाएस्तेखानावर छापा.
१५८५ पौष व॥४	६।१।१६६४	सुरतेवर पहिला छापा.
१५८५ माघ शुद्ध ६ श.	२३।१।१६६४	शहाजीचा मृत्यु.
१५८७ वैशाख व ज्येष्ठ	एप्रिल व मे १६६५	पुरंदरचा वेढा.
१५८७ आषाढ शु.१०	११।६।१६६५	जयसिंगाशीं तह.
१५८८ वैशाख व॥ ४	१२।५।१६६६	शिवाजीची आग्ऱ्यास औरंगजेबाशीं भेट.
१५८८ श्रा. व. १२	**१९।८।१६६६**	**शिवाजीची आग्ऱ्यांतून सुटका.**
१५९१ माघ व. ९	**४।२।१६७० गड आला पण सिंह गेला.**	
१५९२ कार्तिक शु.१	३।१०।१६७०	सुरतेवर दुसरा हल्ला.
१५९३ माघ	फेब्रुवारी १६७२	सालेरचें युद्ध.
१५९५ माघ व॥ १४	२५।२।१६७३	जेसरीची लढाई.
१५९६ ज्येष्ठ शु॥१३	**६।६।१६७४**	**श. शिवाजीस राज्याभिषेक.**
१५९६ ज्येष्ठ व॥ ९	१८।६।१६७४	जिजाबाईचा मृत्यु.
१५९८ फाल्गुन	फेब्रुवारी २।१६७७	कुतुबशहाशीं शिवाजीची भेट.

शक	सन	वृत्त
१६०२ चैत्र शु॥ १५	**३।४।१६८० श.**	**शिवाजीचा मृत्यु.**
१६०२ वैशाख शु॥३	२१।४।१६८०	राजारामाचें मंचकारोहण.
१६०२ माघ शु॥७	१६।२।१६८२	संभाजीचें राज्यारोहण.
१६०३ माघ व॥९ र.	२२।१।१६८२	रामदास समाधिस्थ झाले.
१६०४ वैशाख व॥७ गु.	१८।५।१६८२	शाहूचा जन्म.
१६०५–१६२८	**१६८३–१७०७**	**औरंगजेबाची दक्षिणची स्वारी.**
१६०५ वैशाख व॥४ बु.	२।५।१६८३	रघुनाथ नारायण हणमंते याचा मृत्यु.
१६०८ आश्विन शु.७सो.	१३।९।१६८६	अदिलशाही बुडाली.
१६०९ भाद्रपद शु. १२	८।९।१६८७	कुतुबशाही बुडाली.
१६१० माघ व॥ ७	१।२।१६८९	संभाजीस संगमेश्वरीं पकडलें.
१६१० फाल्गुन व॥३०	**११।३।१६८९**	**संभाजीस जिवें मारिलें.**
१६११ चैत्र शु॥ १५ ते मार्गशीर्ष शु॥२	२६।३।१६८९ ते ३।११।१६८९	रायगडचा वेढा.
१६१२ भाद्रपद शु॥४ ते १६१९ माघ	२७।७।१६९० ते ।१।१६९८	जिंजीचा वेढा.
१६२१ फाल्गुन व॥९	३।३।१७००	राजारामाचा मृत्यु.
१६२८ माघ व॥३० गु.	२०।२।१७०७	औरंगजेबाचा मृत्यु.
१६३३ भाद्रपद व॥३	२०।८।१७११	बाळाजी सेनाकर्ते झाला.
१६३५ मार्गशीर्ष शु॥१०	**१६।११।१७१३**	**बाळाजीस पेशवेपदप्राप्ति.**
१६४० फाल्गुन व॥९	३।३।१७१९	सहा सुभ्यांच्या चौथाईची सनद.
१६४१ चैत्र शु.५	१४।३।१७१९	सहा सुभ्यांच्या सरदेशमुखीची सनद.
१६४२ चैत्र शु.५	२।४।१७२०	बाळाजी विश्वनाथाचा मृत्यु.
१६४२ चैत्र व॥८	१७।४।१७२०	बाजीरावास पेशवाई.
१६४३ मार्गशीर्ष व॥१४	७।१२।१७२१	गु.बाळाजी बाजीरावाचा जन्म.
१६४६ आश्विन व॥१०	३०।८।१७२४	साखरखेडे येथील लढाई.
१६४९ फाल्गुन शु॥१२	२१।२।१७२८	पालखेडची लढाई.
१६५० फाल्गुन व॥९	१२।३।१७२९	जैतपुरची लढाई.

शक	सन	वृत्त.
१६५२ श्रावण शु, १	५।७।१७६०	सदाशिवरावभाऊचा जन्म.
१६५२ फाल्गुन शु।२	२७।२।१७३१	शाहू व संभाजी यांची जखिण-वाडीस भेट.
१६५३ चैत्र शु।६	१।४।१७३१	डभईची लढाई.
१६५० पौष शु।५ ते पौष व।१३	१५।१२।१७३७ ते ७।१।१७२८	भोपाळचा वेढा.
१६५६ भाद्रपद शु. १	१८।८।१७३४	राघोबाचा जन्म.
१६६० माघ शु।१७ ते १६६१ वैशाख शु।८	७।१।१७३९ ते ४।५।१७३९	वसईचा वेढा.
१६६१ फाल्गुन शु।११	२७।२।१७४०	मुंगीपैठणचा तह.
१६६२ वैशाख शु।१३	२२।४।१७४०	बाजीरावाचा मृत्यु.
१६६२ आषाढ शु।१२	२५।६।१७४०	बाळाजी बाजीरावास पेशवाई.
१६६२ पौष शु।१०	१७।१२।१७४०	चिमाजीआप्पाचा मृत्यु.
१६६५ आषाढ व।९	४।७।१७४३	माळव्याची सनद.
१६६६ माघ व।११	१६।२।१७४५	थोरल्या माधवरावाचा जन्म.
१६६७ श्रावण शु।२	१९।७।१७४५	राणोजी शिंद्याचा मृत्यु.
१६६७ श्रावण शु।९	२६।७।१७४५	ब्रह्मेंद्रस्वामी समाधिस्थ झाला.
१६७० ज्येष्ठ शु।५	११।५।१७४८	निजामुल्मुल्काचा मृत्यु.
१६७१ मार्गशीर्ष व।३	१५।१२।१७४९	शाहूचा मृत्यु.
१६७२ मार्गशीर्ष शु।६	२४।११।१७५०	ताराबाईने रामराजास कैदेंत टाकिलें.
१६७२ फाल्गुन व।१४	१५।३।१७५१	गेंड्याच्या माळावरील लढाई.
१६७३ चैत्र शु।५	२०।३।१७५१	फर्रुकाबादची लढाई.
१६७३ मार्गशीर्ष शु।१५	२१।११।१७५१	कुरुडी नदीवर ग्रहणसमयीं लढाई.
१६७४ वैशाख शु।४	७।४।१७५२	रामदासपंत भालकीस ठार झाला.
१६७५ चैत्र	।४।१७५३	राघोबानें अहमदाबाद सर केली.
१६७६ फाल्गुन शु।३	४।२।१७५५	रघूजी भोंसल्याचा मृत्यु.

शक	सन	वृत्त
१६७० ज्येष्ठ शु.॥ ५	११।५।१७४८	निजामुल्मुल्काचा मृत्यु.
१६७१ मार्गशीर्ष व॥३	**१५।१२। १७४९**	**शाहूचा मृत्यु.**
१६७५ ते १६७६	१७५४	कुंभेरीचा वेढा.
१६७७ ज्येष्ठ व॥ ७	३०।६।१७५५	जयाजी शिंद्याचा खून.
१६८१ कार्तिक व॥ ५	९।११।१७५९	नगरचा किल्ला मराठ्यांस मिळाला.
१६८१ मार्गशीर्ष शु॥९	२८।११।१७५९	दुसऱ्या आलमगिराचा वध.
१६८१ पौष व॥ ८	१०।१।१७६०	दत्ताजी शिंद्याचा लढाईत मृत्यु.
१६८१ माघ व॥ २	३।२।१७६०	उदगीरची लढाई.
१६८२ पौष शु॥ ८ बु.	**१४।१।१७६१**	**पानिपतचें शेवटचें युद्ध.**
१६८३ ज्येष्ठ व॥ ६	२३।६।१७६१	मं. बाळाजी बाजीरावाचा मृत्यु.
१६८३ आषाढ व॥ ३	२०।७।१७६१	माधवरावास पेशवाई.
१६८३ कार्तिक शु॥१२	६।११।१७६१	ताराबाईचा मृत्यु.
१६८४ कार्तिक व॥ ६	७।११।१७६२	घोडनदीची लढाई.
१६८५ वैशाख व अधिक ज्येष्ठ	१७६३	मे. निजामानें पुणें प्रांत लुटला.
१६८६ शु॥१	१०।८।१७६३	राक्षसभुवनची लढाई.
१६८६ वैशाख शु॥ २	३।५।१७६४	रटेहळ्ळीची लढाई.
१६७६ भाद्रपद व॥ २ ते १७।९। कार्तिक शु॥ १२ ५ ११।	१७६४	धारवाडचा वेढा.
१६८६ मार्गशीर्ष॥ १०	१।१२।१७६४	अनवडीची लढाई.
१६८८ वैशाख शु॥ ११	२०।५।१७६६	मल्हारराव होळकराचा मृत्यु.
१६९० फाल्गुन व॥ २	२३।३।१७६९	कनकापूरचा तह.
१६९० ज्येष्ठ व॥१०	१०।६।१७६८	घोडपची लढाई.
१६९२ फाल्गुन व॥ ७	७।३।१७७१	मोतीतलावाची लढाई.
१६९३ मार्गशीर्ष व॥ ४	२५।१२।१७७१	शहाअलमास मराठ्यांनीं दिल्लीस नेऊन गादीवर बसविलें.
१६९४ वैशाख शु॥ १५	१७।५।१७७२	जानोजी भोंसल्याचा मृत्यु.
१६९४ कार्तिक व॥ ८	१८।११।१७७२	माधवरावाचा मृत्यु.
१६९५ भाद्रपद शु॥ १३	**३०।८।१७७३**	**नारायणरावाचा खून**

सन	शक	वृत्त.
१६९६	अधिक वैशाख शु॥ ७	१८।४।१७७४ सवाईमाधवरावाचा जन्म.
१६९६	फाल्गुन शु॥ ५	६।३।१७७५ सुरतचा तह.
१६९७	पौष व॥१०	१६।१।१७७५ साबाजी भोंसल्याचा खून.
१६९७	फाल्गुन शु॥११	२९।२।१७७६ पुरंदरचा तह.
१६९८	मार्गशीर्ष शु॥ ८	१८।१२।१७७६ तोतया भाऊसाहेबाचा वध.
१६९९	आषाढ शु, ७	१२।७।१७७७ गंगाबाईचा मृत्यु.
१७००	पौष व॥ ११	१३।१।१७७९ वडगांवचा तह.
१७०३	श्रावण शु॥ १३	२।८।१७८१ सखारामबापूचा रायगडीं मृत्यु.
१७०४	मार्गशीर्ष शु॥ ३	७।१२।१७८२ हैदरचा मृत्यु.
१७०४	**माघ व॥ ८**	**२१।२।१७८३ साल्बाईचा तह.**
१७०५	मार्गशीर्ष व॥ ३	११।१२।१७८३ राघोबाचा मृत्यु.
१७०९	अधिक श्रावण शु. १४	२८।७।१७८७ लालसोटची लढाई.
१७१०	श्रावण शु. २	३।८।१७८८ गोपिकाबाईचा मृत्यु (पंचवटींत),
२७११	कार्तिक शु॥३	२१।१०।१७८९ रामशास्त्री प्रभुणे याचा मृत्यु.
१७१२	अधिक आषाढ शु.७	१९।६।१७९० पाटणची लढाई.
१७१२ ते १७१३	भाद्रपद शु॥ ६ / चैत्र शु॥३	१४।९।१७९० धारवाडास परशुरामभाऊचा वेढा. ६।४।१७९१
१७१२	भाद्रपद शु.१२	१०।९।१७९० मेडत्याची लढाई.
१७१३	ज्येष्ठ शु॥ ५	१६।६।१७९१सदाशिवपेठचे हौदास पाणी सोडलें.
१७१३	भाद्रपद शु॥३ बु.	३१।८।१७९१ घाशीराम कोतवालास देहान्त-शिक्षा.
१७१४	ज्येष्ठ व॥ ७	११।६।१७९२ महादजी शिंदे पुण्यास आला.
१७१४	आषाढ शु॥ ३	२२।६।१७९२ 'वकील-इ-मुतालिक' पदवीचें अर्पण.
१७१४	आश्विन शु. ४	२०।९।१७९२ लाखेरीची लढाई.
१७१५	**माघ शु॥१३**	**१२।२।१७९४ महादजीचा मृत्यु.**
१७१६	ज्येष्ठ व॥७	१९।६।१७९४ हरिपंत फडक्याचा मृत्यु.

शक	सन	वृत्त
१७१६	फाल्गुन व॥ ६ ते ९	११ते१५।३।१७९५ खर्ड्याची लढाई.
१७१७	श्रावण व॥ १४	१३।८।१७९५ अहल्याबाईचा मृत्यु.
१७१७	**आश्विन शु॥१५**	**२७।१०।१७९५ सवाईमाधवरावाचा मृत्यु.**
१७१८	वैशाख व॥ ३	२४।५।१७९६ चिमाजी पेशवा झाला.
१७१८	मार्गशीर्ष शु॥ ५	४।१२।१७९६ दुसऱ्या बाजीरावास पेशवाई.
१७१९	भाद्रपद शु॥ ८	२९।८।१७९७ तुकोजी होळकराचा मृत्यु.
१७१९	पौष शु॥ १३	३१।११।१७९७ नाना फडणिसाचा तुरुंगवास.
१७२०	चैत्र शु॥ ९	२६।३।१७९८ घाटग्याकडून पुणेकरांचा छळ.
१७२१	चैत्र शु॥ ३०	४।५।१७९९ टिपूचा मृत्यु.
१७२१	भाद्रपद व॥ ४	मं. १७।९।१७९९ परशुरामभाऊचा मृत्यु.
१७२१	**फाल्गुन व॥ २**	**१३।३।१८०० नाना फडणिसाचा मृत्यु.**
१७२४	**पौष शु॥ ७**	**३१।१२।१८०२ वसईचा तह.**
१७२५	कार्तिक व॥ २	१।११।१८०३ लास्वारीची लढाई.
१७२५	आश्विन शु॥ ७	२३।८।१८०३ असईची (बोकरदनची)लढाई.
१७३७	आषाढ शु॥ ८	१४।८।१८१५ गंगाधरशास्त्र्याचा खून.
१७३९	कार्तिक शु॥९	१७।११।१८१७शनवारवाड्यावर इंग्रजांचें निशाण.
१७३९	मार्गशीर्ष व॥ ९	१।१।१८१८ कोरेगांवची लढाई. [पडला.
१७३९	माघ शु॥ १४	२८।२।१८१८ अष्टीची लढाई, बापू गोखले
१७४०	वैशाख व॥३०	३।६।१८१८ बाजीराव इंग्रजांचे स्वाधीन झाला.
१७७२	पौष शु॥१२	१४।१।१८५१ दुसऱ्या बाजीरावाचा ब्रह्मवर्तास मृत्यु.
१७८०	ज्येष्ठ शु॥ ७	१८।६।१८५८ झांशीच्या राणीचा मृत्यु.
१७८०	भाद्रपद व॥१४	६।१०।१८५८ दुसरा नानासाहेब नेपाळांत वारला.

(रा. गणेश सदाशिव खरे व **रा. बाळाजी** प्रभाकर मोडक यांच्या जंत्र्यांवरून या शकावलींतील मित्यांचे तर्जुमे केले.)

शुद्धिपत्र

पृष्ठ४ ओळ१८ अशी पाहिजेः–तेव्हां नगरच्या किल्लयापासून एक मैलावर 'दाह्यरा दर्गा या ठिकाणीं शहासरीफ पीर नांवाचें मोठें जागृत स्थान

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
६	१२	त्रास	यात्रेस
३२	१३	कोंडाणास	कोंडाण्यास
३४...गोष्टीचा मथळा		चंद्रराव	८. चंद्रराव
४४	११	सांवत	काय सांवत
४४	२६	चाल्ला	चाल्ला.
५१	२३	निर्भत्सनाच	निर्भर्त्सनाच
८४	१८	औरंजेबाच्या	औरंगजेबाच्या
८५	२६	चपापला. व	चपापला व
८७	२२	होतें,	होतें.
९२	२२	आहेत.	आहेत,
९८...गोष्टीचा मथळा		राज्याभिषेक	२०. राज्याभिषेक
१२१	२१	तेथ	तेथें
२३४	१७	११।३१	१।३
१४०	१५	हुकूमतपन्हा	हुकमतपन्हा
१४०	२६	मडळीस	मंडळीस
१५७	६	रामारामाचा	राजारामाचा
१६३	१५	औरंजेबास	औरंगजेबास
१६३	१८	(४।३।१७०१)	(इ. स. १७०१)
१६३	२०	पल्हाद निराजी	प्रल्हाद निराजी
१८१	२	अधिक	अधिक
१८६	२६	निजामुल्मुकाच्या	निजामुल्मुल्काच्या
१८७	२	निजामुल्मुकानें	निजामुल्मुल्कानें
१८७	८	उप्तन्न	उत्पन्न
१८८	१६	उप्तन्नाचे	उत्पन्नाचे
१८८	२३	पउयोगीं	उपयोगीं
१९०	१२	मुरादाबादेच्या	*मुरादाबादेच्या

१९०	२६	हल्लीं	*हल्लीं
१९२	४	सरदेशमुखी	सरदेशमुखी
१९७	७	छातात	छातींत
२११	७	ढोलका	धोलका
२१४	६	मल्हाराव	मल्हारराव
२१७	४	बादशहाचे	बादशाहाचे
२२०	२२	शागिर्द	शागीर्द
२२४	९	उभईची	डभईची
२६३ व २६७	मथळा	मावळ्याची	माळव्याचीं
२७८	१९	करण्थास	करण्यास
३३२	९	दील्लीप्रांतीं	दिल्लीप्रांतीं
३५५	१६	अब्र	अब्रू
३६७	मथळा	२६७	३६७
४०९	१८	शत्र	शत्रू
४१०	२६	चालल	चाललें
४१६	८	मल	मला
४१९	४	आचानक	अचानक
४४१	१२	सखारामबापू	सखारामबापू
४४६	गोष्टीचा मथळा	इंग्रजांचा पराभव	८९ इंग्रजांचा पराभव
४४८	९	१७७८)	१७७८).
४७१	४	इस्मालबेग	इस्माइलबेग
४७९	२२	इस्मइलबेग	इस्माइलबेग
४९८	२४	परशुराभाऊस	परशुरामभाऊस
५१०	१	तन	सन
५१२	६	वस्त्रें	वस्त्रें
५२२	१०	रास्यांचा	रास्त्यांच्या
५२२	२०	तेल्हां	तेव्हां
५२३	३	याप्रमाण	याप्रमाणें
४८३	१८	महंमदबेग	इस्माइलबेग
४९७	६	मेदानांत	मैदानांत

सूचि.

(आंकडे पृष्ठांक होत. लढाया व तह यांचीं ठिकाणें, किंवा ज्या पक्षांमध्यें तह झाले त्यांचीं नांवें लढाया व तह या सदरांत दिलीं आहेत.)

अ

अंजनवेल ७८
अजमखान १०
अजमीर ३१०, ४६३
अजी २६६
अजीम १२८, १६०-१६१, १६९
अजीमतारा १६१
अटक ३३४
अँडरसन ४५६
अण्णाजी दत्तो ४०, ६०, ९५, १०२, १०६, ११९, १२०
अदिनाबेग ३३४, ४६३, ४६४
अदोनी ३२८, ४०६, ४४४
अनवडी ३७८, ३८०
अनुपशहर ३४७
अंताजी त्रिमळ १८१
अंताजी माणकेश्वर ३१४, ३३४, ३४६, ३५७
अंताजी रघुनाथ २४४
अन्तर्वेद २९६, ३११, ३४३, ३५२
अन्वरुद्दीन २६१, २८५, ३०१
अप्टन ४४१
अफजलखान ३३, ३७-४२
अफ्रासियाबखान ४६८-४६९
अबदुल करीम(बहलोलखान) ९५, ११४
अबदुल फत्तेखान ५२
अबदुल रहमान २३३-२३४
अबदुल राहिमखान ३३३
अबदुल्ला सय्यद १८६, १९०
अँबरक्रांबी ४९१--४९२
अभयसिंग २२७, ३१०
अभयसिंग (जोधपूरकर दुसरा) ४७३, ४८३
अमीनखान १९९
अमृतराव ३९५, ४४८
अमृतराव कदम बांडे १७०
अमृतराव निंबाळकर १८८
अंबाजी इंगळे ४७१, ४७३, ४८४
अंबाजीपंत पुरंदरे १७५, १७९, १८२
अंबिकाबाई १५८
अंबेड ३३८, ४२९
अयोध्या ३४२

अकोट २६१, ३०१, ४३०
अरबली २५०
अरळें २९३
अलवार ४७५
अलाहाबाद २१७, २३६, २५२, ३४७, ३८४--३८५
अलिगड ४५१, ४७५–४७६, ४७८, ५१८
अलिवर्दीखान २६४–२६५, २७६
अली अदिलशहा ३८, ४८, ९४
अलीगोहर (शहाआलम) ३५०
अलीबहादर ४७७, ४८०–४८१
अलीमर्दानखान १४८
अल्लाउद्दीन खिलजी २
अवचितगड २३४
अशरी २४७
अशीरगड १९८, ३३८, ३९३, ४३५, ४४५, ५१८
अष्टप्रधानपद्धति १०३, १०५, चा अंमल झाला नाहीं. १८५
असदअल्लीखान ५०४
अहमदशहा २६८, २९६, ३०७
अहमदाबाद २०८, ३०६, ४३७, ४५२, ५३२
अहमदशहा अबदाली ३०१, ३०७, ३३१, ३४३, ३४४, ३४७, ३५१–३५२
अहमदनगर [नगर] ८, १६७, १९९, ३०३, ३३७, ५१३, ५१८, ५३७
अहमदखान बंगष २९७, २९९, ३४९, ४१२
अहल्याबाई होळकरीण ३०८, ३८६–३८८
अज्ञानदास शाहीर ४३

आ

आग्रा ५९, ६२, २३७, ३३१, ३४८, ४११, ४६५, ४७५, ४७६, वेढा ४७८, ५१८
आटोळे १४४, १५६
आतईखान ३५५
आनंदराव गोपाळ ३९८
आनंदराव धुळप ३२०, ४५७, ५२९
आनंदराव पवार २०७, २२५, २६३
आनंदवल्ली ३८८, ३९४, ४३४, ५०८
आनंदराव रास्ते ३२६, ३६५, ४२९
आनंदीबाई ४२२, ४३७, ४५७, ४२३ 'ध' चा 'मा' ४२१-४२६, बालपेशव्यास दगा करण्याचा प्रयत्न ४५७, मृत्यु ५०८
आप्पाजी जाधवराव ३५०
आप्पा बळवंत ४०६, ४०८, ५१०

आप्पाजी राम ४०६, ४२०, ४३०
आबाजी सोनदेव २८
आबा पुरंदरे ३६५, ३७२
आंबेघाट ४८६
आरमार–कारवारांत गेलें ५२९, ५३०
आलमअली १९९
आलमगीर (औरंगजेब पहा.)
आलमगीर (दुसरा) ३०९, ३३०, ३४४
आवजी कवडे २२६, २५२
आवजी हरी चित्रे २७
आसदखान १४५, १४९
आळेगांव ३६६

इ

इकलासखान ९२
इगर्टन ४४८
इंग्रज ३२०–२१, धान्याचा पुरवठा ४४९
इंग्रज मुंबईचे-घाबरतात ३९७, साष्टी घेतात ४३९, राघोबाशीं तह ४३९, पुण्यावर स्वारी ४८८–४५१, संताप ४५७
इच्छारामपंत ढेरे ४२४
इटावा ३४३, ३४७
इतिकदखान (झुल्फिकारखान पहा)
इंदापूर २०१
इंदूर २०७, जाळलें ५१५
इंद्राजी कदम २३८
इंद्रायणी ११
इब्राहिमखान ३३७, ३४७, ३५७, ३५९, ५२८
इसलामगड २४३
इस्माइलखान १४९
इस्माइलबेग ४७१, ४७४, ४७८, ४८०, ४८३

उ

उजनी ६४, २०७, २१२, ३८७, ४३७, लुटली ४९८, व ५१५
उडगणी ४९०
उत्तर सरकार ३२८
उदयभानु ८७, ८९
उदगीर ३३७, ३४६
उदाजी चव्हाण १७९, २२१-२२२
उदाजी पवार १८७, २०७, २१२, २२५–२२६
उंदेरी ८१, ३२०
उंदेरी घाट ३७०
उदेपूर ४८४
उमरखेड ४००
उमरठे ८६
उमरावगीर गोसावी ३४३
उमाबाई दाभाडे १९८, २२७, २९७
उरण ३६, ४५०
उरळी ३६४

ए

एदलाबाद २६२
एलफिन्स्टन ५१८, ५२४
एलिचपूर २५७, ४२०-४२१
एसाजी काळे १०७

ऐ;

ऐवजखान २०२,२०३

ओ.

ओर्च्छे २६४
ओरिसा २६५, २७७, २७८

औ.

औंढा ९१,९२,११६
औंध १८३
औरंगजेब १२, ९३, ११७, शिवाजीस पत्र ४४, दक्षिणचा सुभेदार४८, जातो ४८, उत्तरेस शिवाजीची भेट६०-६२,संशयी स्वभाव ६५, मुलगा अकबर बंड करतो १२७, दाक्षिणेवरील स्वारीचा थाट १२७, विजापूर-गोंवळकोंड्याचीं राज्यें बुडवितो १३१, संभाजीचा वध १३४, मराठ्यांसंबंधी उद्गार१४६,जिंजी घेण्याची खटपट१४७-५३,किल्ले घेण्याची मसलत १६०, वाकिनखेड्यास जातो १६६, मृत्यु १६७
औरंगाबाद ५३, २४२, २५५, ३२८, ३६४, ३६५, ३६९, ३७३, ४२९, वेढा ३७३

क

कचेश्वरबाबा अंतीतकर २९०
कटक२५२, २५८, ५१८
कटवा २६५,२७६
कडप्याचा नबाब ३२३, ३२५
कंठाजी कदम बांडे २०५, २०९, २२५
कण्हेरखेड२०५
कनकापूर४००
कनकगिरी३३, ४०६
कनियामबाडी ४९१
कनोज१, २९९
कपिलासंगम४३०
कब्जी(कलुशा पहा.)
कमर्दीखान२३८
कमरुद्दीनखान २३७
करमाळें३७०
कराकुडा ३८५
कर्नाटक१०९,११०,३५२,३५७,
कर्नूळचा नवाब ३२३,३२५
कऱ्हाड२२३
कलमडें२५६
कलिंजर४६०
कलुशा१३२, १३३
कल्याण २७,२८, ७६, १२४, १२९
कल्याण(मोंगलाईंतील) २
कल्याणदुर्ग ४३२

कावेजंग ३३७
कंदाहार३३३
कात्रजचा घाट५३
कादरगंज२९८
कान्होजी आंगरे१४०,१५६,१७९ १८३,१८४,२३०,२३२ शीं समेट १८४,५२९
कान्होजी नाईक जेधे ३२
कान्होजी भोंसले१९२,१९९, २९७
कामबक्ष१३०,१४७,१४९, १६९
कायगांव टोकें ३८३
कायमखान बंगष२१९,१९६, २९७
कारवार९८,४९०
कार्ले४४९
कालिकोट२२४
कालीनदी२९७
काल्पी२२०,४४७
काशी ३१२, ३२३, ३३६
काशीपंत ६४
काशीपंत रानडे ४९०
कासीमखान (मायणा) ११०, १४०, १५१
कासेगांव ४३३
कॉर्नवॉलिस ४८५, ४९१, ४९३
किटिंग ४४०
कित्तूर (प्रांत) ४६३
किरीटी रामराजा ४८५
कीर्तिवर्मा २
कुकडी नदी ३०३
कुंजपुरा ३४३,३४४,३४९,३५१
कुडा ३८५
कुतुबुद्दीन ४८७
कुंदगोळ ४९३
कुमाऊन ३१०
कुंभेरीचा वेढा ३०८,३०९
कुरुडगांव ३९४
कुलबुर्गा ३९५
कुलाबा ८२,१५६,२३५
कुशबंदी २३८
कृष्ण जोशी संगमेश्वरकर ३५२
कृष्णराव खटावकर १७९, १८३, १८३, २२२
कृष्णराव बल्लाळ काळे३३८,४२८, ४३१
कृष्णा ११०,२७४,३९२,४३०, ४६१,४६३,४८७
कृष्णा-वेण्या संगम २८७
कृष्णाजी कंक १२५
कृष्णाजी परशुराम १८०
कृष्णाजीपंत ६४
कृष्णाजी भास्कर ३८
केदारजी शिंदे ३९३
केसरी ४१०
केळबें २४६
कोईमतूर ३७५, ४८७
कोटपुतळी २३९,३४४

कोटा ५२०,चा राजा२४३
कोंडाणे १६,२७,५०,८५
कोन्हेर त्रिंबक एकबोटे ३०४
कोन्हेर राम कोल्हटकर २५८
कोपरगांव ४४२,५२१
कोपळ१११,२२४, ४६३
कोरेगांव ३०४
कोल ४७१
कोल्हापूर १३३,४४५
कोल्हार १०९,३२२,४०३
कोळी यांचा दंगा ४४३
क्यामॅक (कर्नल) ४५५
क्लाइव्ह ३१८

ख.

खटाव १८३
खंडूजी इंगळे ४६६
खंडेराव हरी भालेराव ऊर्फ खंडेरावआप्पा ४६६,४७४,४७८
खंडूजी चौगुला २०४
खंडेराव दरेकर ४२०
खंडेराव दाभाडे १३६, १४०, १४५,१५७,१९०,१९१,२०८, २०९ सेनापति १८७, १९०
खंडेराव होळकर ३०८
खंडूजी खोपडे ४२
खंडोजी फर्जंद १२३
खंडोजी माणकर२४६,२४७,३१८
खंडो बल्लाळ चिटणीस १२१, १२५, १३५, १४०, १४१, १५३, १५६, १७२, १७३, १८०, स्वामिभक्ति १२५
खंड्या कुत्रा २८३, २८४
खबायत ४४०
खरकसिंग ४२४
खरगोण २५५
खवासखान ९६
खवासपूर १६२
खानखानान ३०८
खानजमान १२
खानडौरान २३७, २३८, २४२, २५२
खानजहान बहादूर ९४, १३०
खानजहान लोदी ९
खानवटे २८५
खांदेरी ८१, २३५
खेचीवाडा ३४७
खेम सांवत १७९

ग

गंगा ३४२, ३४३, ४१३
गंगाजी नाईक २४४
गंगाधरराव नेवाळकर २६४
गंगाधर यशवंत चंद्रचूड ३८७, ३८८, ३९०,३९६,४२८
गंगाधरराव रास्ते ४३२
गंगाधरशास्त्री ५२४
गंगापूर ४१९, ४५९
गंगाबाई ४३१ ,४३३,४३४
गंगावती (नदी) ७९

गंगा विष्णु ४१६
गंगू ३
गजेंद्रगड ३८, ४६३
गढें २६३
गणपतराव मेहेंदळे ४९०
गणपतराव पानशे ५१६
गणेशपंत वेहेरे ४६२, ४६३
गणोजी शिर्के १५३
गमाजी यमाजी ३६८, ३७०, ३७१
गंभीर (नदी) ३४८
गया २३६
गलगलें १४६
गागाभट्ट १००
गाजीउद्दीन २४०, ३०२, ३०५
गाजीउद्दीन (दुसरा) ३०७, ३३०, ३३२, ३४४
गाजुद्दीननगर ३५५
गॉडर्ड ४५२, ४५३, ४५५
गारपीर ३३७, ४९३
गिरिजाबाई ९
गिरजोजी यादव १८१
गिरिधर २१२, २१३, २२८
गिरिसोप ४९०
गुत्ती ३३, ३२३
गुरमकोंडा ४०५, ४०९
गुलबाई २७
गुहागर ५२१
गोकर्ण ५४, ७९, ११८
गोदावरी ३०६, ३२८, ३७२
गोविंदराव बाजी ४९५
गोपाळराव गोविंद पटवर्धन ३२४, ३२६, ३३८, ३६४, ३६७, ३७१, ३७८, ३९३, ३९५, ३९९, ४०२, ४०३, मृत्यु ४०६
गोपिकाबाई ३६४, ३६५, सवाई-माधवरावास उपदेश ४१५
गोवळकोट २३३, २३५
गोवळकोंडें ११४, १२६, १३१
गोविंदपंत बुंदेले (खेर) २२०, २२१, ३४१, ३४३, ३४७, ३५२, ३५४ मृत्यु ३५५
गोविंद शिवराम खाजगीवाले ३२०, ३८८, ३९३
गोविंदभट ४९५
गोविंदराव काळे ४८६, चें नानास पत्र ४९५, ४९७, ५०२
गोविंदराव गायकवाड ३९४, ३९६
गोविंदराव चिटणीस २९०, २९२
गोविंदसुत परमानंद १४
गोविंद हरी २३८, ३६७, ४०६
गोवें १२५
गोहद ३८६
गोहदकर ४६६
गौतमाबाई ३४४, ३४५
ग्वाल्हेर ३४७, ३८६, इंग्रजांनीं घेतली ४५३, वेढा ४६६

घ.

घटप्रभा ३७७
घाशीराम ५०७
घुसृणेश्वर ६
घोडखिंड ४५,३४५
घोडनदी ३०४,३६५
घोसाळें २३४

च.

चंडीघाट ४१३
चंदन १७२,२९५
चंदावर ४९०
चंदासाहेब २५९,२८५,३०१
चंद्रराव मोरे ३४,३५,३६
चंद्रसेन जाधव १७५,१७७-१७९ १८६, १९०, १९९, २०२-२०३,चंबळ ऊर्फ चमेली २३७, २५३,३०७, ४७६, ५१९
चरई २३६
चाकण७,१६,९२,१६९,वेढा ४९
चांदवड ५४२
चांदा १९२,३९८
चांभारगोंदें ३१४
चापाजी टिळेकर ४२५
चावडस (आनंदवल्ली पहा)
चिक् कृष्णराज ३४०,३७५
चिक् बाळापूर ४०३
चिकोडी ४४५
चिंचवड ५४२
चित्रदुर्ग ३७६-३७७,४०२,४४४
चिंतो विठ्ठल रायरीकर ३६७,३८२, ३९४,४२२,४२८
चिपळूण १७४,२३२
चिमणाजी दामोदर मोघे १७०, १७६, २२६
चिमणाजी नारायण सचिव २८८
चिमणाजी बापूजी देशपांडे ५१
चिमाजीआप्पा १८२, १९६, २४३,दयाबहादुराशीं युद्ध २१३, २१४, गुजराथवर स्वारी २११, २१३, चरईची लढाई २३५, निजामुल्मुल्कास भोपाळांत ताण २४२, वसईची मोहीम २४४–२५१, मनाचा थोरपणा २४८, नासिरजंगावर स्वारी २५५, मृत्यु २६२
चिमाजीआप्पा (राघोबाचा मुलगा ४५७,५०९,५१२
चेनगिरी ४९०
चेनापट्टण ३२६
चोळी महेश्वर ४५१
चौल १५६

छ.

छत्तिसगड २८०
छत्रसाल २१८,२२०

ज.

जखिणवाडी २२३
जगजीवनराव प्रतिनिधि २८५,२९५
जगत्राज २२०,२३७

जगत्राज अमरचंद २६६
जगतसिंग २७०
जगदेवराव ९
जगपाळराव निंबाळकर ६
जंजिरा ५९, ७६, १२३-१२४, २३४,३२०
जनकोजी शिंदे ३१२-३१३,३२९, ३३४,३३६,३४४,३५१, ३५४,३५७-३५९
जनार्दन २५७
जनार्दनपंत हणमंते १०२,१११, ११९,१३५,१५६
जनार्दन बल्लाळ भानू १९३
जंबूसर ४५०
जयपूर २९८
जयराम पिंड्ये ३३,३४
जयसिंग ५४,५७,५९,६५,१२६
जयाजी शिंदे २७,जहागिरीवर नेमणूक२७०,२९१,रामचंद्रबाबाशीं भांडण २९८-२९९, वाजिरास मदत २९८, पेशव्यांची शाबासकी ३००-३०१, कुंभेरीचा वेढा ३०१, मेडत्याची लढाई ३११,नागोरचा वेढा ३११,खून ३१३,दिव्य उपदेश ३१३
जलालाबाद ३४२
जवानबख्त ३५०, ४११, ४६८
जसवंतसिंग ६०, ६५, ९२
जहानखान ३३३
जाडरहेबळी ४८७
जानकीबाई ९५, १९८
जानराव (जानोजी) निंबाळकर किंवा रावरंभा २८३, ३२७
जानोजी भोंसले२७७,२७९,२८०, ३८३, ३८४, ३९४ , वर दुसरी स्वारी ३९६-४०१
जानोजी विश्वनाथ १७४
जाफरखान ३
जाबितजंग धौशा ४४४
जामगांव ४९४
जालना ११४,१५७,२०२
जावली (प्रांत) ३५-३६
जिऊबादादा बक्षी ५०३-५०४
जिऊ महाला ४१
जिजाबाई १०,१३-१५,४०,६४, ८५,९०,रंग ५, लग्न ७, मृत्यु ११३,
जिंजी २९, १०८, १४०, १४६, १८५, ३२२
जिवाई २०४
जिवाजी दाभाडे २२६
जिवाजी पवार २३८
जिवाजी विनायक ८२
जुन्नर १०, ४८, ३७०
जेऊर १७९
जेजुरी ४७,२८४,२९५
जैतपूर २१९
जैन-उल-अबदीन४६९

जोधपूर २२८,३१०
जोरखोरें २९४

झ.

झबेताखान ४१३
झांशी ४५१
झीलचा तलाव २३८
झुल्फिकारखान (इतिकदखान) १३८–१३९,१४२,१४७, १४९, १५८, १६३, १६७
झुल्फिकारबेग १९०

ट.

टिपूसुलतान ४०८, मराठ्यांशीं लढाई ४६१–४६४, वर स्वारी ४८५–४९३
टेंभुर्णी ५२२
टोकें ३६३

ठ.

ठाणें २४५, ५२४

ड.

डभई ४५२
डलहौसी ५२७
डहाणू २४७
डाकोर २२८
डीबॉईन ४६६, ४७४, ४८२, ४८३,५२८
डुप्ले ३०१–३०२,३२७

ढ.

ढोलका २११

त,

तंजावर १०५, १४७, १५०, कर ४०८
तरिकिरे ४०३
तळें २७,२३४
तळेगांव (ढमढेरे) ३०४
तळेगांव (दाभाडे) २२७,४४९
तह:– अलाहाबाद ३८५; इंग्रज व मराठे ५२४,५४२; इंग्रज व पेशवे ३१९; इंग्रज व होळकर ५२०; औरंगाबाद ३७३; कनकापूर ४००; कान्होजी आंगरे व शाहू १८४; कोल्हापूरकर व पेशवे ४४५; जाखिणवाडी २२३-२२४; टिपू व दोस्त ४९३; टिपू व मराठे ४६४; दराईसराई २४३; देवगांव ५१८; नवदरें २३५; निजाम, इंग्रज व मराठे ४८५; निजाम व मराठे ३०४, ५०५; निजाम व राघोबा ३८५; पुरंदर ५९,४४२; बाजीराव व निजाम २०३; बाजीराव व सरबुलंदखान २११; भालकी ३०६; महादजी व कर्नल मूर ४५६; माळव्याची सनद २६६–२६७; मुंगी पैठण २५५; मुंगी शेवगांव २०३; रघूजी व अलिवर्दीखान २७८; वडगांव ४५०; वसई ५१६–५१७; वारणा २२४;

विजापूरकर व मोंगल १२; शिवाजी व मुअज्जम ६६; शिवाजी व विजापूरकर ४७; साठच्याळिशीचा ३६८; सातारा १९१–१९२; साल्बाई ४५६; सुरजमल जाट व शिंदेहोळकर ३०९; सुरजी अंजनगांव ५१८; सुरत ४४०; हैदर व मराठे ३८१, ३९२, ४०९.

तहवारजंग ४६३
तळोदें २०४
ताई तेलीण ५२२
ताऊस सरोवर ३१३
तांडा (घाट) २१४
ताथवडा ९५
तानाजी २०, २५, ८६–९०, तोरणा घेण्यास मदत २५, मृत्यु ९०
तापी ९, ३०६
ताराबाई १५८, मराठ्यांचा पुढाकार १६३–१६४, शाहूशीं भांडण १७०–१७२, पन्हाळ्यावर कैद १८१, साताऱ्यास वस्ती २२३, शाहूस दत्तकाची सूचना २८५, बाळाजीशीं भांडण २९२–२९४, रामदासपंताशीं कारस्थान २९५
तासगांव ४८६
तिकोना २७
तुकाबाई मोहिते १४
तुकोजी आंगरे १८३
तुकोजी पवार २३८
तुकोजी होळकर ३८८, ३९५, ४१०, ४४७, ४५४–४५५, ४६३, ४७७, ५१३
तुंग २७
तुंगभद्रा १०७, २२४, २७३, ३२२, ३२४, ३७६–३७७, ४०२-४०३, ४४४, ४६३, ४८९
तुलसीदास शाहीर ९१
तुळजापूर ३८, ३७०
तुळाजी आंगरे २३२, ३१५–३१८, ३२१, ५२९
तुळापूर ११, १३३, ४१६
तुळ्या पवार ४२३, ४२५
तेजराम ३०८
तैमूरशहा ३३२, ३३३
तोतया भाऊसाहेब ४४३-४४४
तोरणा २५, ६४, ८०, ८४
त्रिचनापल्ली १५०, २५९–२६०
त्रिंबक १०, १२, १९१, ३०४, ४१५
त्रिंबकजी डेंगळा ५२३–५२४
त्रिंबक बापूजी ३४१, ३४४
त्रिंबकराव दाभाडे २२४–२२६
त्रिंबकरावमामा पेठे ३६४–३६०, ४०५–४०९, ४२५, ४३३
त्रिमलवादी १०८

त्र्यंबक सदाशिव पुरंदरे (नाना पुरंदरे पहा).

थ

थालनेर ३०७, ५४२
थेऊर ४१५, ४१८
थोरात १४४

द.

दंडा ७५
दत्ताजी त्रिंबक ६०
दत्ताजीपंत १०२
दत्ताजी शिंदे ३०४,३११,३१३, ३२९,३३४-३३६,३४१-३४५
दन्तिदुर्ग २
दमाजी गायकवाड २०९;(दुसरा) २२६, २२८, २६३, २९३, ३०७,३९४, मृत्यु ३९६
दमाजी थोरात १७९,१८२,१८९
दयाबहादूर २१३-२१४,२२८
दर्याखान रोहिला ९
दर्याबाई ४२०
दलपतराय १४७
दाऊदखान १६७, १८६, १९०
दादाजी कृष्ण लोहोकरे ३२
दादाजी कोंडदेव-पुण्याचा बंदोबस्त १५–१६, शिवाजीस शिक्षण १६,स्वराज्यांत सामील२२-२४, मृत्यु २६
दादाजी नरस प्रभु २२, २५
दादाजी रघुनाथ देशपांडे १२३
दादोपंत वाघ २९५
दाभोळ १५४
दामलुई बोतेलो २४५
दारणा सांगवी ३९४
दारव्हें २८०
दाराजहां ४८७
दिदीगल ३७४
दिनकरपंत ३१८
दिपाबाई ११०
दिलावरअलीखान १९८
दिल्ली १२७, २३६, राज्यक्रांति ३३१, २३९,३४९, ३६०–३६२,३९२, ४१२,४७९, ५१८, ५४२
दिलीरखान ५४, ५६ ६५, ९२, ११६, ११४, पुरंदरचा वेढा ५४
दीग ४७५
दुंदेखान २९६, २९७
देवगड (दौलताबाद) २, २५७
देवगांव ५१८
देवनहळ्ळी ३७४
देवराव लपाटे २९२
दोडवाड ४८७
दोस्तअली २५९
दौलतखान ८१
दौलतराव शिंदे-लग्न ४९४, वस्त्रप्राप्ति ५०१, घाटग्याच्या मुलीशीं लग्न ५१३, नानास कैद ५१३,

होळकराशीं लढतां ५१५, इंग्रजांशीं लढाई ५१७
दौलताबाद ६, २०, १९२, ३२८, ३२९, ३३८

ध

धनाजी जाधव ९७, १११, १३५, १३७, १४३–१४५, १४८–१५२, १७१–१७२, १७५, बाईच्या फौजदारावर हल्ला १४४ सेनापति १५६, औरंगजेबाशीं तहाची वाटाघाट १६६, मृत्यु १७३
धवलपूर २६२
धारूर ३३७
धामोरा २१८
धार २१२, २३६, ४३७
धारवाड ३७७, ३७९, वेढा ३७९, वेढा ४८७–४८९, प्रांत मराठ्यांस मिळाला ४४४
धारेश्वर ४९०
धावडशी २३१
धोडप ३३९, ३९५
धोंडसें १२०
धोंडोपंत गोखले ४८७
धोंडोपंत पुरंदरे २३६–२३८

न

नगर (अहमदनगर) ३३७, ४२३
नजफखान ४६५
नजीबखान ३३०–३३२, ३३४, ३४१–३४५, ३४७–३५१, ३५७–३५८, ३६१, मृत्यु ४११
नजीबगड ४१३
नंदराज ३२४, ३४०, ३४१, ३७४, ३७६
नंदलाल मंडलोई २१२, २१५
नंदुरबार १७०
नरगुंद (प्रांत) ४६४
नरगुंदकर भावे ४६१–४६२
नरसिंग खंडेराव विंचूरकर ५१६
नरसिंगराव देवाजी ४९०
नरसिंगराव धायगुडे ३६५, ३९८
नरसीबाबा २३
नरहरपंत रिसबूड ३९८
नरेंद्र ४८८
नर्मदा १४८, ११८, १७०, २४३, ४१०, ४३५
नवदरें २३५, २४५
नवलराय २९७
नवलसिंग ४१०–४११
नवलूर ४८८
नागपूर १, ३९५, ३९८
नागरगांव (तुळापूर) ११
नागोठणें ५४२
नागोर-चा वेढा ३११–३१२
नादिरशहा २५३
नाना पुरंदरे २८९, २९३, ३४६, ३५०
नाना पुरंदरे (दुसरा) ५१६

नाना फडणीस (बाळाजी जनार्दन भानू) ३६०, ३८८, ४०१, ४२७, ची फळी ४३१, बारभाईच्या पक्षाचें पुढारीपण ४३१, राज्यांतील दंग्यांचा मोड ४४३-४४५, मोरोबाच्या कारस्थानाचा मोड ४४७-४४८, इंग्रजांविरुद्ध जंगी मसलत ४५३, चाल पेशव्याचें संगोपन ४५८-४५९, टिपूवर स्वारी ४६१-४६४, स महादजी मदत मागतो ४७६-४७७, स गोविंदरावाचें पत्र ४९४-४९७, शीं महादजीची स्पर्धा ४९९, दोघांची एकी ५०१, यशवैभव ५०७, खड्र्याची लढाई ५०२-५०६, सवाई माधवरावाचा निषेध ५०९, बाजीरावास पेशवा करण्यासाठीं कारस्थानें ५१३, कैद ५१३, बाजीरावानें फसाविलें ५१३, मृत्यु व गुणवर्णन ५१४-५१५

नांदेड ३३८

नारायणराव ३६३, ४१७, जखम ४०५, पेशवेपदप्राप्ति ४१९, हैदरवर स्वारीचा बेत ४२१, खून ४२२-४२५

नारो आप्पाजी तुळशीबागवाले ३७१, ३८८, ४२०, ४२८, ४३२

नारो शंकर राजेबहादर २६४, ३०७, ३५१-३५२, ३६५, ३६७ ३७१, ३८६

नारो शंकर सचिव १८२

नालछा घाट २१४

नाशिक ३८१, ५४२

नासीरजंग १४३, २५३, २८२, २८५, ३०२

नाहावागड ११६

निजगल ४०५

निजामअली ३२८-३२९, ३३७, ३६३-३६४, ३६८, ३७३, ४२९, ४६१, ४६३-४६४, ५०२, ५०६

निजामुल्मुल्क (ऊर्फ चिंकिलीजखान) १८६, दक्षिणेंत स्वतंत्र होतो १९८, वजिरी १९९, पुनः दक्षिणेंत २००, बाजीरावाशीं स्पर्धा २०१-२०३, बाजीरावाची भेट २०७-२०८, दाभाड्यास फूस २२४-२२५, भोपाळांत कोंडला २४०-२४३, मृत्यु २८४

निरा १८८

निराजी रावजी ६०-६३

निर्मळ ४००

निवृत्तिसंगम १०७, ४३०

निळकंठशहा २७८

निळो बल्लाळ १२१

निळो मोरेश्वर १४२
निळो सोनदेव ६०
नेताजी पालकर ४०,५०, ६७
नेमाजी शिंदे १५७

प,

पंचगव्हाण ३९८
पंजाब २९९
पट्टा ९१-९२,११५ (विश्रामगड)
पठाण-पारिपत्य ४१२-४१३
पडदूर ३४६
पंढरपूर ३८,४६३,५२४
पद्मादुर्ग ७८
पनवेल ४४९,४५४-४५५
पंताजी गोपिनाथ ३९,४३
पन्ना २२०
पन्हाळा ४३, ९५, १२०, १४४, वेढा ४४,१७३,२०३
परभू-क्षत्रियत्व ४२१
परमानंद (गोविंदसुत) १४
परशुरामक्षेत्र १७४,२३१
परशुराम त्रिंबक १४३—१४४, १५६, १६०, १६३, १६७, १७२,१८०,१८७
परशुराम रामचंद्र पटवर्धन ४०४, ४४४, ४४५, ४४७, ४५४, ४८६, ४९३, टिपूवर स्वारी ४६२,धारवाडचा वेढा ४८७-४८९,खर्ड्याच्या लढाईत जखमी ५०४, चिमाजीआप्पास पेशवा करतो ५१२, कैद ५१३
परशुराम श्रीनिवास प्रतिनिधि ५१३
परसोजी भोंसले १४५,१५७,१७० १८७
परळी ९५, १६२
परिंडा ११,३३७,५०३
पर्वती—बाळाजी बाजीरावाचा मृत्यु ३६०,सवाई माधवरावाची मुंज ४५८
पवार १४४
पाटणा २६९
पांडवगड १७९
पांडिचरी ३०१,३२७, ३३७
पांडुरंग मुरार ५४२
पाथ्री ४००
पानगल ४९१
पानगांव २८५
पानिपत ३५२-३६२
पार ४०
पारद १७१
पाराशर दादाजी ३५५
पार्वतीबाई ४२५, ४३२
पावनगड (पन्हाळ्याजवळचा)१६७
पावनगड (गुजराथ) ५१८
पालखेड २०२
पिराजी राऊत १७७-१७८
पिऱ्या नाईक १६६-१६७
पिलाजी गायकवाड २०९, २११, २२७

पिलाजी जाधवराव २१४,२१८, २४१, २६२
पुणें (शहर) ३६३,३६४,३९९, शाएस्तेखानावर छापा ५०,५३, राजधानी २९० निजामानें जाळलें ३७०-३७१, पळ ३९९ जकात ५३२, बंदोबस्त ५३६, टांकसाळ ५४२, उद्योगधंदे ४५०,५३६, ५४६
पुरंदर ५४, १७८, १८६,१८९, ३६७,४२३,५३७, वेढा ५४-५६
पुरुषोत्तम दाजी पटवर्धन ४३६
पुलकेशी १, २
पूर्णा ९
पूर्णा नदी २६२
पेटलाद २११
पेडगांव ९४,३३६, ४३२
पेड्रो डीमेलो २४६
पेशजी २३
पैठण १,४२९,५४६
पैनगंगा ३०६
पोर्तुगीज १२५, २४६–२४८
पोलादजंग ६१,६३
प्रतापगड-तटबंदी ३६, अफजलखानाचा वध ३७–४२
प्रतापराव गुजर ६६-६७,८४,९६, ९७
प्रतापसिंह ५२७
प्रतापसिंह(जयपूरकर) ४७३,४८१
प्रयाग ३३६
प्रयागजी प्रभु १६०-१६१
प्रल्हाद निराजी १३५,१४०,१४२, १५५, १६३, प्रतिनिधि होतो १४२

फ

फत्तरगड ४१३
फत्तेखान ८, ९, १०
फत्तेखान (सिद्धी सरदार) ८०
फत्तेजंग ५३०
फत्तेसिंग गायकवाड ४३२, ४५२
फत्तेसिंग भोंसले १७१, १८७, २३३–२३४, २४२, २५४, ५४५
फत्तेसिंग माने ५१६
फरुकाबाद २९७, ४१२
फर्रुखसेयर १८६, १९०
फाजलखान ४४–४५
फार्मर ४५१
फिरंगोजी नरसाळा २७, ४९-५०
फुलंबरी ३३८
फैजाबाद ३८४
फैजुल्लाखान ३४९
फोंडे ७९, १२५
फ्रेडरिक (कर्नल)४८९
फ्रेचर ३८५

ब

बकाजी नाईक २३२-२३३

बंकापूर २७७, ३७८
बंगलूर १३, १०९, १४०, ३२२, ३२६, ३७५, ४०४, ४९१-४९२
बंगाल २६९, ३३१
बजाबा पुरंदरे ४२८
बडव्याचा घाट ४३४
बडी साहेबा ३८
बडोदें ४३७
बद्रिजमालखान ४८७
बनारस ३८४
बरद्वान २५६
बऱ्हाणपूर ८, १२८, १९०, १९९, ३०५, ३२८, ३३८, ३४६, ४३३, ५१८, ५४६
बलवंतसिंग ४६६
बसालतजंग ३८२, ४०६
बहलोलखान (अबदुल करीम) ९५
बहादुरगड ९४
बहादूरभेंडा २७४, हरिपंत धेतो ४६३
बहार २६९
बहिरो अनंत ३२३
बहिरजी नाईक ५४
बहिरोपंत पिंगळे १८२
बळवंतराव गणपत मेहेंदळे ३२५, ३४६, ३५१, मृत्यु ३५५
बळवंतराव नागनाथ ५०९
बागपत ३५२
बागलकोट ५४३
बाजी कदम १८६
बाजी घोरपडे ३०
बाजी पासलकर २०, २५, ४४
बाजी प्रभु देशपांडे ३७, ४५-४६
बाजी भिवराव रेटरेकर २४७
बाजीराव, चें लहानपण १२६, वीरश्रीचें भाषण १२७-१२८, निजामास मदत २००, निजामाचा पराभव २०३, छत्रसालास साहाय्य २१७-२२०, दाभाड्याशीं युद्ध २२५-२२७, सिद्दीवरील मोहीम २३०-२३३, दिल्लीवर स्वारी २३६-२३८, कर्ज २३९-२४०, भोपाळचा वेढा २४०-२४३, नादिरशहाविरुद्ध तयारी २५३, नासिरजंगास नरम आणिलें २५५, मृत्यु २५५
बाजीराव (दुसरा) ५०८-५०९, सवाईमाधवरावाशीं पत्रव्यवहार ५०९, पेशवाई ५१३, नानास कैद करवितो ५१३, वसईचा तह ५१६, पारतंत्र्य ५२५, शिक्षण ५४०
बाजीराव बर्वे ४२८, ५३८
बाजी शामराज ३४-३५
बाणकोट २३४, ३१२
बाणावर ४०५

बादामी १, वेढा ४६३, प्रांत ४६४
बापू (सखारामबापू पहा)
बापू करांडा ३९८, ४००
बापू (नरहर गणेश) गोखले ५२२, ५२५
बापूजी गोविंद गोखले ४५८
बाबाजी बापूजी देशपांडे ५१, ५२
बाबा फडके ५०४, ५१२
बाबूजी नाईक २५९-२६०, २६३, २७३, २९५, ३६४, ३७०
बाबूराव फडणीस ३६४-३६६
बाबूराव साळोंखे ४९०
बायजाबाई शिंदे ५१३
बारभाई ४३१
बारामती ४१, २९५
बारामहाल ४०८
बालासोर २६६, ५१८
बाळकृष्ण मुजुमदार २०
बाळाजी आवजी चिटणीस २७, २८, ४०, १००, १०७, १२०
बाळाजीपंत १०२
बाळाजीपंत सप्रे ३९८
बाळाजी बाजीराव २५५, पेशवाई २५७, २६१, माळव्याची सनद २६८, रघूजीशीं ऐक्य २६९, शिंदेहोळकरांस पत्र २७२, निजामाविरुद्ध कारस्थान ३०२-३०६, शिंद्यास उपदेश ३१२, श्रीरंगपट्टणची स्वारी २२३-२२६, निष्ठेची परीक्षा २८१-२८३, साताऱ्यास गमन २८५, शाहूची यादी २८६, सातारकडे कूच २९४, शिंदेहोळकरांस शाबासकी ३००, निजामशीं तंटा ३२७-३३०, हिंदुपदपातशाहीची कल्पना ३३६, दत्ताजीस टोमणा ३४२, भाऊची हिंदुस्थानवर रवानगी ३४६, भाऊ कोंडला गेल्याची बातमी ३५५, पानिपतचें वर्तमान कळलें ३६०, मृत्यु ३६१, पत्र ५४४
बाळाजी बापूजी ५४२
बाळाजी महादेव भानू १७४, १९२-१९३
बाळाजी विश्वनाथ, उदय १७४-१७६, चंद्रसेनाशीं तंटा १७७-१७९, सेनाकर्ते १८०, थोरातानें कैदेंत टाकलें १८२, पेशवाई १८४, थोरातांचें पारिपत्य १८७-१८९, स्वराज्याची सनद आणतो १९३, वसूल-व्यवस्था १९४-१९५, मृत्यु १९५
बाळापूर ३२२, ४०२
बाळोजी इंगळे ४७४
बाळोबाताल्या ५११, ५१३
बायफील्ड ३१९
बिजनार ४१३
बिजेसिंग ३१०-३१४

बिठूर ३४८
बिंबाजी भोंसले २७९
बिरवाडी १२२, २३४
बीड ९, १४३
बुंदीचा राजा ३१४
बुर्शिअर ३१७
बुऱ्हाणउद्दीन ४६३
बुसी ३०२, ३०६, ३२७-३३०, ३३७
बिदनूर ३२३,३७६,३८०,४९०, प्रांत ३२३,४०७
बेदर ३,१४३,३६४,३७१,४००, ४३०
बेदरबक्त १६०,१६३,४७९
बेलवाडी १०९
बेलापूर २४५
बेलूर ४०८
बेळगांव ३७७
बेंगरुळ (बंगलूर पहा)
बोरघाट ४४३,४४९,४५४
ब्रह्मपुरी १४५,१६०
ब्रह्मावर्त ५२५
ब्रह्मेंद्रस्वामी १७४, २३१, २३९, २४९
ब्राऊन (कर्नल) ४५४-४५५

भ.

भडोच ७५, ९२, ९६, ४५४, ४५६, ५९८,५९९
भंडारा ३८३, ३९८
भरतपूर ३७५, ३८३ ४९०,५२०
भवनाशी ४००
भवानराव प्रतिनिधि (श्रीनिवास गंगाधर) ३६७, ३७९, ३९९, ४२२, ४२८
भवानी २७
भागीरथी ५६६
भालकी ३०५
भास्कर राम कोल्हटकर२५८, २६५-२६७, २७५-२७७
भास्करराव ३६७
भिवंडी ५०, ५३२
भिवराव पानसे ४४३, ४४९
भीमगड ९०
भीमा ११,४७,१७०,३६६,४६१
भूषणकवि ७४
भेलसें १७०
भैरव (घाट) २१४
भोजराज २०४
भोर १४३

म.

मॅके ४५४
मॅकफर्सन ४७२
मक्का ५४
मंगळवेढें ५३८
मच्छलीपट्टण ३२८
मंडणगड २३४
मंडळ २६३

मतोड ४०३
मथुरा ६३, २३७, ३३१, ३४९, ४७०, ५२०
मदागिरी ४०२, ४०९
मदारी हत्ती २८४
मद्रासचे इंग्रज ३२५
मनोळी ४४५
मरे ५१९
मलप्रभा ३७७
मालिकंबर ८, ५३१
मालिक काफूर ३
माल्लिकार्जुन १०७
मल्हार कृष्ण २६३
मल्हार भिकाजी रास्ते ५४३
मल्हारराव पानसे ४०६
मल्हारराव होळकर, उदय २०४-२०८, निष्ठा २०७, दिल्लीची स्वारी २३७-३८, वसईचा वेढा २४६-४७, बाजिरास मदत २९८-९९, कुंभेरीचा वेढा ३०८ शिंद्यास दुष्ट उपदेश ३३५, स्त्रीचा उपदेश ३४५, पानिपत ३५७-३६१, मृत्यु ६८६.
मशरिउल्मुल्क ४९४, ५०२-५०५
मसाऊदखान ११४, ११६
मस्कत २७
महंमद अकबर १२०, १२७
महंमद आदिलशदा २९, ३८, ४८
महंमदअली ४०८
मुहंमद इसफ ४२४
महंमदखान बंगष २१७-२२०
महंमदबेग हमदानी ४६९, ४७३-४७४
महमदशहा १९३, १९८, २१०, २१७, २५२, २६८
महाड ३७, २२७, ५१६
महादजी नाईक पानसबळ १३५, १४०, १४२
महादजीपंत गुरुजी ३८८
महादजी शिंदे ३०४, ३६०, ३६२, ३८६, ५२८, पानिपतपळ ३६०, माधवरावाची जरब ४१०, बंगालच्या चौथाईची मागणी ४७२, दिल्लीकडे उत्कर्ष ४८२-४८३, ४३५-४३६, ४४९, ४५५-४५६, कवायती फौज तयार करतो ४६६, नानास पत्र ४७६-४७७, मर्दुमकी ३७३-४८४, सवाईमाधवरावाशीं भट ४९५, पुण्यास ढवळाढवळ ४९९, नानाशीं ऐक्य व मृत्यु ५०१
महादजीपंत पुरंदरे २६०, २९१-२९२, ३०४, ३२३
महाबतखान ९२, ९४
महिदपूर ५२५
महिपतराव चिटणीस ३४६
महिपतराव परभू ३९८
मही-नदी २१०, ४३७

महेश्वर ५४२
माण नदी १६२
मांडव घाट २१४
मांडवगड २११
मांडू २३६
मादण्णापंत १०६, ११४
माधवराव ३६२, पेशवाई ३६३, राघोबाशीं भांडण व समेट ३६५-३६६, राक्षसभुवनची लढाई ३७२-३७३, हैदरवर स्वारी ३७७-३७८, राघोबाचा वांटणीविद्दल आग्रह ३८२-३८३, भोंसल्यावर पहिली स्वारी ३८३, राज्यकारभार ३८८-३९२, राघोबास कैद ३९६, भोंसल्यावर दुसरी स्वारी ३९६-४००, हैदरवर तिसरी स्वारी ४०२-४०९, नऊकलमी याद ४१७, मृत्यु ४१८, गुणवर्णन ४१८-४१९
माधवराव कृष्ण पानसे ४८६
माधवराव जाधवराव ३८८
माधवासिंग २७०-२७१, २७३
मानाजी आंगरे २३२, २३५, २४५, २५५, ३१५, ३२०
मानाजी धायगुडे ३४६, ३४८
मानाजी पायगुडे २३८
मानाजी शिंदे (फाकडे) ३९३
मॉन्सन ५१९
मायकोंडा ४९०
मायनाईक भंडारी ७८
मालकम ५१८, ५२५
मालखेड २
मालवण १७३
मालीराव होळकर ३८७
मॅलेट ४७२
मालोजी ४--७
मालोजी पवार २२६
माहीम २४६
माहुली (किल्ला) १२, ५२५, ५४२
माहुली (संगम) २८७, ४२६
माहूर २०२, ३९९
माळवा प्रांत २०८-२१५ ची सनद २६८
मिडोज ४८६
मिदनापूर २६६
मिरकासीम ३८४
मिरज १२८, ३६४-३६५, ३७१, ४०६
मिरत ४८०
मिश्रीकोट ४८७
मीरजुमला ३३
मीरमोंगल ३६४
मीरशहाबुद्दीन (गाजीउद्दीन दुसरा पहा)
मीरफैजुल्ला ३७७-३७८
मीरहबीब २६५, २७८-२७९
मीरहसनखान कोका २३८

मुअजम ६५, ८४, ९२, ११४, १२८, १६९
मुकर्रबखान १३३
मुकुंदराव श्रीपत ३४०
मुंगी २८५
मुंगी पैठण २५५
मुजफरखान २३८, ३२३
मुजफरजंग २८५, ३०२
मुजफरखान गारदी ३२३
मुधोजी भोंसले २७९-२८०, ३८६, ४२० लांच घेतो ४३७, ४५३, ४५४
मुधोळ ३०
मुबारिक ३
मुबारिझखान २००
मुंबई ८१, २४४
मुलगुंद १०९
मुरबादचा डोंगर २६
मुरादखान ३६५
मुरादाबाद १९०
मुरार जगदेव ११, १७, ३१
मुरार बाजी ५४–५६
मुरारराव घोरपडे २५४, २६१, ३२५, ३७७, ३८०
मुर्शीदकुलीखान २६५
मुर्शीदाबाद २६६
मुलतान २९९, प्रांत ३३१-३३२
मुल्ला अहमद २८
मुल्हेर ३३८
मुसलमान अमीरांचें बंड ४७५
मुस्तफाखान २९, २७६-२७७
मूर्तजा निजामशहा ९-१०
मूर (कर्नल) ४५५
मेडतें ३११
मेलकोटें ४०७
मोकुबसिंग १९१
मोरो त्रिमळ पिंगळे ४०, ५०, ६०, ९१-९३, १०२, १०६, ११९, प्रतापगड बांधतो ३६
मोरोपंत तांबे २०४
मोरोबा फडणीस ३८८, ४१५, ४२७, ४३२, ४४७-४४८
मोरो विठ्ठल रायरीकर ३९५
मोस्टीन ४३९
मोहनसिंग १७०
ह्मसवड १५५
ह्मैसूर १०९, ३२६, ३४०, ३७४

य

यमाजी शिवदेव २६९, २८६, २८९,
यमुना १२९, २३७, ३४४, ३४८, ३५१-३५२, ३६२,
यशवंतगड ३२१
यशवंतराव खासनीस २९२
यशवंतराव दाभाडे २२७, २८९, २९४
यशवंतराव पवार २३८, २६३, ३५७
यशवंतराव होळकर ५१५, ५१९-

५२०
यशवंती ८८
यशोदाबाई ५११
याकूतखान २३१, २३३
यादगारखान २३६
यादगीर ४६१
येसाजी आंगरे २३२
येसाजी कंक २०,२५,६७,१२५
येसूबाई १२१,१३९,१९३,उत्कृष्ट सल्ला १३५-१३६

र

रघुनाथ नारायण हणमंते १०५-१०६, १०८, ११०, १२२
रघुनाथ पंडित ५७,१०२
रघुनाथ बल्लाळ कोरडे २०, ६१
रघुनाथराव कुरुंदवाडकर ४८९
रघुनाथ हरि २६४,२७४
रघूजी आंगरे ३२०,४२४, ४४४
रघूजी गायकवाड २०६
रघूजी भोंसले, उदय २५७-२६०, अलाहाबादेवर स्वारी २५२, कर्नाटकावर स्वारी२५४-२५५, बाळाजिसि विरोध २५९-२६०, बहारवर स्वारी२६५,बाळाजीशीं ऐक्य २६९, हट्ट २५२, मृत्यु २७५
रघूजी भोंसले (धाकटा) ४२८, ४३७, ५१६
रघोजी करांडे ३७१
रजपुतांच बंड ४७३-४७५
रटेहल्ली ३७८
रणछोड ४१६
रणदुल्लाखान १२
रणमस्तखान १२४, १३७
रत्नागिरी ७८,३१८,४४३, ५३०
रमाबाई ४१८
रहिमतपूर ४०६
रंगो नारायण १०७
राक्षसभुवन ३७२
राघोगड ४७२
राघो बल्लाळ अत्रे ३५, ४४,७७
राघोबा २५७,३३१–३३३,उत्तर हिंदुस्थानाकडील भरारी ३०६-३१०, निजामाशीं तह ३६४, पुतण्याशीं भांडण ३६५-३६६, निजामाशीं लढाई ३६८-३७३, कर्नाटकाकडे गमन ३८१,वांटणीचा आग्रह ३८२–३८३, उत्तरेस स्वारी ३८३-३८८, अहल्याबाईशीं भांडण ३८८, कैद ३९६, सुटण्याचा प्रयत्न ४०१, सुटका ४१५, पुन्हां कैद ४१९,सुटकेचा कट ४२२,पुतण्याचा खून ४२३-४२६,पेशवेपदप्राप्ति४२८,निजामावर स्वारी ४२९, हैदरवर स्वारी ४३०, बारभाईशीं विरोध ४३२-४४१, सुरतेचा तह ४३९,मृत्यु ४४७

राघो मित्रा ६०
रांगणा १४०, १७३
राजगड २६,१४४,१६३
राजपुताना २९९
राजपुरी ७५
राजमाची २७,१८३,२३५,४४३, ५३७
राजसबाई १५८,१८१,२२३
राजापूर २७
राजाराम २४, १४३, जन्म २३, लग्न ९८, राज्यप्राप्ति ११९, संभाजी राज्यावर१२०, जिंजीस गमन १४०-१४१, जिंजींतून सुटका १५४, खानदेशांत मोहीम १५७, मृत्यु १५८
राणेखानभाई ४७४
राणेगंज २७०
राणोजी भोंसले १९२, ४७८
राणोजी शिंदे, उदय २०५-२०८, बाजीरावावर निष्ठा२०७, दिल्लीवर स्वारी २३८-२३९, भोपाळचा वेढा २४१, डहाणू घेतो २४७, मृत्यु २७०
राणोजी शिर्के १५३
राधाबाई माने १५५
रामघाट ४११
रामचंद्र गणेश ३७०, ३९५, ३९९, ४००, ४१०, ४१३, ४४५, ४५३
रामचंद्र नाईक ४४३
रामचंद्र निळकंठ ८४, १३५, १४०-१४४, अमात्य १०२, १५८, महाराष्ट्रांतील कारभारावर नेमणूक १४०, अमात्यपद जातें १०६, पुनः अमात्यपद-प्राप्ति १५६, ताराबाईशीं भांडण १६३
रामचंद्र मल्हार शेणवी २९०
रामचंद्र रघुनाथ कावळे २४४
रामचंद्र हरि (बावा फडके पहा)
रामचंद्र हरि पटवर्धन २४६
रामजी पाटील जाधव ४६६
रामटेक ३९८
रामदास १२१-१२२, ३३५, ५४७
रामदासपंत २९५, ३०३, ३०५
रामदुर्ग ४३०
रामदेवराव (यादव) २, ३
रामराजा १८१, २८५-२९०, ५२६
रामराव चिटणीस ३८८
रामशास्त्री प्रभुणे ३९१-३९२, ४२६
रामसिंग ३१०, ३१२
रामसेज (किल्ला) १२८
रामाजी अनंत दाभोळकर २९१
रामाजी महादेव चिवलकर ३१६, ३२१, ४१७
रामाजी महादेव भानू १७४, १९३
रायगड (रायरी) ३७, २३४, शिवराज्याभिषेक ९८-१०३,

शिवाजीचा मृत्यु ११७, वेढा १३८, तेथून राजधानी बदलली १५६, टांकसाळ ५४२
रायचूर ३०२
रायदुर्ग ३७६
रायबा ८६
रायाजी कोळी ८७
रायाजी पाटील ४७८
रावरंभा निंबाळकर १८६, १८९, १९९, २०१, २८३
रिव्हेंज ४५७
रुकनुद्दवला ३८३, ३९८, ४२०, ४३३
रुस्तुमअली २१०
रुस्तुमजमान ४३
रूपेश्वरबाबा ४१६
रेवदंडा १२४, २५५, ५४२
रेवाडी २३९
रेसीन २३८
रोझें १६८
रोहिडखोरें २२
रोहिडा २३, ३७, १६७
रोहिलखंड २९९, ३५२, ४१२

ल.

लक्ष्मण कोन्हेर ३९०
लक्ष्मणराव काशी ४२२
लक्ष्मीबाई झांशीकर २६४
लक्ष्मेश्वर ४९३
लखनौ ३०८
लखबादादा ऊर्फ लक्ष्मण अनंत लाड ४७८-४८४
लखुजी जाधवराव ४-९
लढाया—अनवडी ४०४; अरिकेरा ४९१; अष्टी ५२५; अहमदनगर १९१; आग्रा ४७९; आडगांव ५१८; आरास २१०; आळेगांव ३६६; इंदूर ५१५; उदगीर ३३६-३३८; उंबराणी ९६; उरळी ३६४; औंध १८३; कावेरीपाक १४८; कासेगांव ४३३; कालीनदी २९७; कुकडी नदी ३०३-३०४; कोरेगांव ५२५; खडकी ५२५; खर्डे ५०२-५०६; खांडवा १९९; खेड १७१; घोडनदी ३०४, व ३६५; चकसान ४७८; चरई २३५; जालना ११५; जावळी ३६; जेऊर १७९; जेसरी ९७; जैतपूर २१९; डभई २२६; तळेगाव ४५०; तांदुळवाडी २९५; तारापूर २४७; तिरल २१४; दमलचेरी २५९; दरईसरई २४३; दिल्ली २३८; दुआब (कृष्णा व तुंगभद्रा) १११; दुधारी १५१; देवगड ४५३; धोडप ३९५; नापार ४४०; पाटण ४८३; पानिपत ३५६-३६१ पालखेड

२०३–२०३; पुणें ५१६; पुरंदर ५५; प्रतापगड ४१-४२; फरुकाबाद २९८-२९९; फोंडा १२५, बक्सार ३८४, बदाऊंचा घाट ३४४; बदाऊन २९७; बऱ्हाणपूर १९०; बाळापूर १९९; बोकरदन ५१८; भातवडी ८; भोपाळ २४०-२४२; मतोड ४०३; महिदपूर ५२५ महीनदी ४३८; मेडतें ३११-४८३; मेलकोटें ४०७; मोतीतलाव ४०८; रटेहळ्ळी ३७९; राक्षसभुवन ३६८-३७३; लाखेरी ४५८; लालसोट ४७४; लास्वारी ५१८; वसई २४४; २५०; विशाळगडची खिंड ४५-४६; शिंदखेड ३३०; साखरखेडें २००; सारंगपूर २१३; सालेर ९२-९३; सिंहगड ८८-१०१
लाडोजी देशमुख ४७०, ४७४–४७५
लाहार ४५३
लाहोर ३३१-३३३ (प्रांत.)
लिटल (क्याप्टन) ३४३, ३८६, ४८८, ४९३
लिंब २९३
लिस्बन २४६
लेक ५१९-५२०
लेस्ली ४४७
लोदीखान १६९
लोहगड २६, १८३, ३७०, ५३७

व

वडगांव ३६५, ४५०
वडगांव (वारणाकांठचें) १७३
वनवासवाडी २८४
वंदन १७२, २९५, ३१९
वर्धा (नदी) ३९८, ५१८
वऱ्हाड २८९, ३७०
वलीशहा २७८
वसई ३९७, ४३९, वेढा २४४–२५१, इंग्रज घेतात ४५३, तह ५१६–५१७
वसंतगड १६०, १६७, ५२२
वाई ५४३
वांकसई १९४
वाकिनखेडें १६६
वॉट्सन ३१८
वाडीकर सावंत ४४
वांदिवाश १४९, ३३०
वानवडी ५०१
वामनराव पटवर्धन ४०६
वारणा ४७, १८८, २२२
वॉरन हेस्टिंग्ज ४४१, ४६७
वावडी ५३०
वाशीम (घाट) ३९८
वासुदेव जोशी २७४
वासोटा ५२२
वाळवें १२९

विजयदुर्ग ७८, ३१५, ३१७, ४९०, ५२९
विजापूर ११४–११७, ३३८, शिवाजीचा प्रसंग १७–१८
विठोजी चव्हाण १३७
विठोजी भोंसले २८५
विठोबा बुळे २३७
विठोजी सातघर ५३७
विठ्ठल विश्राम ४२८
विठ्ठल शिवदेव विंचूरकर (दाणी) २१८, ३०७, ३३२, ३४६, ३५७, ३५८, ३६०, ३६७, ३७२, ३८६, ५४४
विठ्ठल सुंदर ३६५–३६८, ३७२–३७३
विंचूर ३३२, ३९४
विशाळगड ४५–४६, १४३
विश्वासराव ३२९, ३३६, ३४६, ३५६–३५९
विसाजी कृष्ण विनीवाले ३३७, ३६२, ३९६, ४१०, ४१३
विसाजीपंत ६४
विसाजी केशव लेले ३९०, ३९७, ४३४
वेंगुर्ले १२९
वेठ ३९०
वेण्या नदी २८२
वेलवेडखोरें २२
वेलोर १०८, १५२, ३२२
वेल्स्ली ५१८
वेरूळ ४३५
वेसावें २४५, २४७
व्यंकटराव काशी ४२२
व्यंकोजी १०५–११२
व्यासराव १७८
व्हास्को डीगामा २४४

श.

शंकरदेव यादव ३
शंकराजी केशव २४५
शनिवारवाडा २१८
शफी मिर्झा ४६८-४६९
शंभुसिंग जाधवराव २४२
शहा अहमदखान ५१६
शहाआलम (दुसरा) ३६२, ३८४, ४१२, ४६९, ४७९. ४८०
शहाजहान ८, ४८
शहाजहानपूर २४३
शहाजी, जन्म४, रंग५, विवाह ७, निजामशाही वांचविण्याचा प्रयत्न ११, शिवाजीसह विजापुरास गमन १७, बंदिवास ३०-३२, स्वतंत्र राज्याची कल्पना ३२-३३, मृत्यु ४७
शहाजी (धाकटा) ५२७
शहाजी (व्यंकोजीचा मुलगा) १५०
शहानवाजखान ३२७–३२९
शहाबुद्दीन १२९

शहानिजामुद्दीन ४७४-४७८
शहावलीखान ३५७-३५८
शहासरीफ (पीर) ४
शाएस्तेखान ४९, ५३, १२६
शामराज निळकंठ रांझेकर ७७
शाहू १३८–मोंगलांच्या सैन्यांतून सुटका १७०, ताराबाईशीं भांडण १७०-१७३, ची पडती बाजू १७४, थोरातापासून बाळाजीची सुटका करतो १८२, कोल्हापूरकर संभाजीशीं समेट २२२-२२४, बाळाजी बाजीरावास पेशवाई देतो २६०, पेशव्यांच्या निष्ठेची परीक्षा २८१-२८३ उदासीनपणा २८३-२८४, मृत्यु २८६–२८७
शाहू (दुसरा) ४५८, ५२७
शिकंदर आदिलशहा ९४
शिकंदर जहा ४९०
शिकंदरा ३४८
शिखर महादेव ६
शिखर शिंगणापूर ४७
शिंगवें ३०४
शिंदखेड १९, ३३०, ४३६
शिरहट्टी ३७९, ४६४
शिरें ३२२, ३३४, ३९२, ४०२
शिवगंगा २६९
शिवनेरी ७, ९, १२, १३, ९५, १२१, ३९५
शिवमोधें ४७
शिवरामभट साठे २७९
शिवसिंग २३८
शिवाजी (ताराबाईचा मुलगा) १५८, १६३, १८१
शिवाजी (शाहू) १३६-१३९
शिवाजी–जन्म १३, धर्मरक्षणाचा निश्चय १९, मावळ्यांस मिळवून घेतो २०–२१, मुद्रा २२, दादाजी नरस प्रभूस पत्र २३-२४, स्वराज्यस्थापना २५-२८, उज्ज्वल नीतिमत्ता २८, शहाजीस सोडविलें ३१-३२, जावली घेतली ३६, अफजलखानाचें शासन ४१, पन्हाळ्यांतून निसटला ४४, मोंगलांशीं लढाई व तह ४९-५९, जयसिंगाची भेट ५८, आग्र्यास गमन ६०-६४, राज्यव्यवस्था ६५-७६, जिजाबाईशीं सोंगट्यांचा खेळ ८५, राज्याभिषेक ९८-१०३, व्यंकोजीस अर्धा वांटा मागतो १०८, व्यंकोजीस पत्र ११२-११३, विजापूरचें रक्षण ११४-११६, मृत्यु व गुणवर्णन ११७-११८
शिवाजी विठ्ठल विंचूरकर ४७४
शुक्रताल ३४२, ४१३
शेखजी २३४
शेखमिरा १७२

शेरखान लोदी १०८
शेलारमामा ८७
शेषाप्पा नाईक ६
शोकदजंग ३३८
श्यामराव (वकील) २१०
श्रीगोंदें ६
श्रीनिवास केदार २५१
श्रीनिवास गंगाधर (भवानराव पहा)
श्रीनिवासराव १०, १३
श्रीपतराव प्रतिनिधि १८३, १९७, २२३, २२८, २३२
श्रीपतराव सुभेदार ३०७
श्रीशैल १०७
श्रीरंगपट्टण ३२३, ३८१, ४०१, चा वेढा ३२४, ४०८, ४९१-४९२
श्रीवर्धन १७४, ४१७
श्वेतकमलें ४८२

स.

सईबाई २४, ३१
सकवारबाई २८३ २८४, २८६-२८७
सकुराबाद ३४८
संकाजी नारायण १४३-१४४, १५६, १६३, १६७, १७५
संकाजी मल्हार १५६, १९१, १९९
संकाजीपंत २९४
सखाराम (सर्जेराव) घाटगे ५१३, ५१५-५१६
सखारामबापू २७४, ३०७, ३६४, ३६९, ३९३, ४१५, ४२७, राघोबाचा कारभारी ३६७, नारायणरावावर रुसवा ४१९, नारायणरावास कैद करण्याचा घाट ४२२, बारभाई ४३१-४३२, मोरोबाचे कटांत सामील ४४७-४४८
सखाराम हरि गुप्ते ४०७, ४२२, ५३८
सँग्स्टर ४६६
सगुणाबाई २८३-२८४
संगमनेर ११५
संगमेश्वर १३३
सटवाजी जाधव २३८
सतलज नदी ३३१, ३४१
सदाशिव माणकेश्वर ५२२
सदाशिव रामचंद्र शेणवी ४२२, ४२८
सदाशिवरावभाऊ २७४, बहादुर-भेंड्याची स्वारी २७४, सांगोल्याची स्वारी २८८-२९१, सावनूरची स्वारी ३२४, उदगीरची लढाई ३३६-३३८, सोनपत-पानपत ३४६-३६०, प्रतवंदी ५३१
संताजी घोरपडे १३५, १३७, १४०-१४२, १४३-१४५, १४८-१५२, जेसरीच्या लढा-

ईत मर्दुमकी ९७, जालना येथील लढाई ११५, वाई व मिरज येथील फौजदारांवर हल्ले १४४, अलीमर्दानचा पराभव १४८, दुधारीतील कोंडी १५२, धनाजीशीं बिघाड व मृत्यु १५५
संताजी भोंसले १०८, १९२–१९३,
संताजी वाघ ३४७
संतीबिदनूर ४९०
सफदरअली २५९
सफदरजंग २४३, २६७, २९६-२९९, ३०८
समदखान ३३२, ३३३, ३५१
समशेरबहादर २५७, ३४६, ३५७ ३६०
संभाजी (शिवाजीचा मुलगा) १०, २४, ३३, ४०, १८४, जन्म २४, दिल्लीस ६०–६३, मोंगलांस मिळतो ११६, राज्य-प्राप्ति १२०, कर्त्या पुरुषांचे वध १२०, सिद्दी व पोर्तुगीजांशीं लढाई १२३-१२६, कलुशाचा पगडा १३२-१३३, वध १३४
संभाजी आंगरे २३४, २३५, २४५, २५५, ३१५
संभाजी (कावजी) ३५, ४१
संभाजी (कोल्हापूरकर) १५८, १८१, २०१–२०३, २२२-२२४, २२८
संभाजी मोहिते ३७
सयाजी गुजर २४१
सय्यदबंधु १८६–१९०
सरफजी ४
सरंजामपद्धति-ची सुरुवात १८७-१८८
सरबुलदखान २०९-२११, २२७
सरहिंद ३३१-३३३
सलाबतजंग ३०२, ३२४, ३२७-३२९, ३३७, ३६३
सवाईजयसिंग १९३, २१२—२१५, २२८, २३६, २६२
सवाईमाधवराव–जन्म ४३३, शिक्षण ४५३, गोपिकाबाईचा उपदेश ४५९–४६०, लग्न ४५८, 'वकील इ मुतालक'चें अर्पण ४९७, मृत्यु ५११
सहारणपूर ४७९
सागर २२१, ४१०
सांगोलें २८९–२९०, ४२३
सातारा १७२, २८५, २८७, २९३, राजधानी १५६, मोंगलांचा वेढा १६०, शाहूचा मृत्यु २८७, राज्य खालसा ५२७
सादतखान २३७–२३८, २५२
सादुल्लाखान ३४९
साबाजी भोंसले २७९–२८०,

४२०, ४२९, ४३२-४३३, ४३७
साबाजी शिंदे ३४१, ३४४
सारंगपूरचा घाट ३५१
सारिकाशतक ४५८
सालेर ९१–९४, १२८, ३३८
साल्पेघाट ३९३
सांवतवाडी २९०
सांवत गोवळकर २७
सावनूर २३१, ३२३, ३२७, ३७९, ४०३, चा नबाब ३७७
सावित्रीबाई देसाईण १०९
साष्टी ४२२, ४३९, ४५०
सासवड १८९
साळशी २२४
सिद्दी अजीज ४५
सिद्दी अंबर २३४
सिद्दी कासीम ८०
सिद्दी खैरियत ८०
सिद्दी जोहार ४४
सिद्दी याकूब २३४–२३५
सिद्दी संबूल २३४
सिद्दी सात २३१–२३५
सिंघण यादव २
सिधोजी गुजर ७८, १४०, १५६
सिधोजी निंबाळकर ११५
सिंदगांव ४५
सिंधुदुर्ग ७८, ३२१
सिंहगड (कोंडाणें) ८५, ९०, १५८, १६७, २८८, ३६७, ३७१, ५१६, ५३७
सिरवळ २३
सिरोंज २२५, २४१, ३६०, ४५५
सिवा जंगम २३
सिहोर ३४७
सुजाउद्दवला ३१२, ३४१, ३४७, ३८४, ४१४, ४६५
सुजायतखान २०९
सुजालपूर २७०
सुर्वे ७, ३७, ६६
सुभानसिंग ५८–५९
सुमेरसिंग ४२४
सुरजमल २९८, ३०८–३०९, ३५१, पळांतील लोकांस मदत ३६०
सुरत ५४, ९१, ९८, चा तह ४४०
सुवर्णदुर्ग १५६, ७८, ३१७
सुवर्णरेखा नदी २९७
सूर्यराव काकडे ९३
सूर्याजी पिसाळ १३८–१३९
सूर्याजी मालुसरे ८७–८८, ९१, सैन्यास उत्तेजन ९०–९१
सूर्यराव मोरे ३६
सेखोजी आंगरे २३२, २३४
सेंट ल्युबिन ४४६
सैद बंडू ४०–४१
सोनोपंत २०

सोंधे ३२३, ३७७
सोयराबाई २४, १०१, १२०,
सोलापूर किल्ला ३१९, ३७०
स्पेन्सर ३१९
स्टुअर्ट ४४९

ह.

हणमंतराव ३६
हंसाजी मोहिते (हंबीरराव) ९७-९८,१०२,१११,१२०,१२८
हफीज रहमतखान २९६, ३४९, ३८४, ४१२
हमीदखान २०९
हरपाळ २
हरपनहळ्ळी ३७६, ३८१, ४०२
हरजीराजे महाडीक १२२
हरिपंत फडके ३८८,४१७, ४२३, ४२८, ४३२-३३,४३५-३८, ४४८,४५४-५५, ४६३-६४, ४९०, ४९३, मृत्यु ५०२
हरि बाबाजी ४५१
हरि महादेव भानू १७४
हर्ष १
हरिहर ४०३
हांडिया २५५,चा घाट ४३४
हार्ट्ली २८५
हिम्मतखान १५२
हिम्मतबहादर गोसावी४६९,४८१
हिरदेसा २२०
हिरोजी फर्जंद ६०, ६३, ११९
हिवरे ४३
हुगळी २६६
हुबळी ९५, ४८७
हुपेगिरी ४९०
हुसेनअली १९०–१९२, १९९
हुसेन निजामशहा १०
हुसेन (सय्यद बंधूंपैकीं) १८६
हुसेनखान मायणा ११०–१११
हुशंगाबाद ४५२
हेमाद्री २
हेस्टिंग्ज (वॉरन हेस्टिंग्ज पहा)
हैबतराव निंबाळकर १४५, १५७, १७९, १८६
हैबतराव फाळके ४७३
हैदर ३२६, ३४०, ३८१, ३७४-४४४, पुंडावा ३७४-३७६, वर पहिली स्वारी३७७,३८१-दुसरी स्वारी ३९२, तिसरी ४०१-४०९, ची मद्रासवर स्वारी ४५४, मृत्यु ४५६
हैद्राबाद ८६,२०१,२८५, ३०२, ३०४, ३२३, ३२७, ३७०
होदिगिरे ४७
होनाजी अनंत (सेनाकर्ते) १८०
होनावर ४९०
होस्कोटे १२९, ३२२
होळ २०४
होळीहुन्नूर ३०४, ३२३.

हिंदुस्थानचा नकाशा.
इंग्रजी मैल.
१०० २०० ३०० ४००
अफगाणिस्थान
काबूल
पेशावर
अटक
कंदाहार
लाहोर
मुलतान
सरहिंद
कराची
हैदराबाद
हिमालय पर्वत
नेपाळ
अयोध्या
राजपुताना
मराठी साम्राज्य
पानिपत
दिल्ली
अलीगड
मथुरा
आग्रा
रामपूर
बदाऊन
शाहाजहानपूर
फरुकाबाद
लखनौ
कनौज
जोधपूर
नागोर
रेवाड
जयपूर
अजमीर
उदयपूर
बुंदी
नरवर
ग्वालहेर
झांशी
कालपी
सागर
सिरोंज
रैसीन
भोपाळ
सिहोर
उज्जनी
इंदूर
धार
नर्मदा नदी
गढे
मंडळ
देवगड
नागपूर
अमदाबाद
बडोदें
सुरत
खानदेश
दौलताबाद
औरंगाबाद
अहमदनगर
कल्याण
मुंबई
पुणें
सातारा
कोल्हापूर
गोवें
सावनूर
होनावर
बिदनूर
निजाम
हैदराबाद
कृष्णा नदी
कर्नूल
कडप्पा
म्हैसूर
बंगलूर
श्रीरंगपट्टण
मद्रास
पांडिचेरी
कालिकत
कावेरी नदी
तंजावर
कर्नाटक
बंगाल
बहार
पाटणा
काशी
प्रयाग
मुर्शिदाबाद
हुगळी
कलकत्ता
ओरिसा
कटक
जगन्नाथपुरी
उत्तर सरकार प्रांत
बंगालचा उपसागर
अरबी समुद्र
सिलोन
कोलंबो
७० ७५ ८० ८५ ९०
५ १० १५ २० २५ ३० ३५

महाराष्ट्राचा नकाशा.
शहाजीची जहागीर.
शिवाजीचें राज्य (स्वराज्य)
महाराष्ट्र.
इंग्रजी मैल.
सातपुडा पर्वत
नर्मदा नदी
तापी नदी
गोदावरी नदी
कृष्णा नदी
भीमा नदी
तुंगभद्रा नदी
उत्तर पेन्नार न.
दक्षिण पेन्नार न.
अरबी समुद्र
बंगालचा उपसागर
सिलोन
सुरत
नाशिक
कल्याण
मुंबई
पुणें
सातारा
कोल्हापूर
रत्नागिरी
सिंधुदुर्ग
वेंगुर्ले
कारवार
बेळगांव
औरंगाबाद
दौलताबाद
अहमदनगर
जालना
सोलापूर
विजापूर
कलबुर्गी
हैदराबाद
रायचूर
बेल्लारी
कडप्पा
मद्रास
वेलोर
अर्काट
जिंजी
पांडीचेरी
बंगलोर
कोलार
होसकोट
श्रीरंगपट्टण
म्हैसूर
चित्रदुर्ग
मंगळूर
कोईमतूर
त्रिचनापल्ली
तंजावर
दिंडीगल
मदुरा
नागपूर
भंडारा
चांदा
माणिकगड
बऱ्हाणपूर
देवगड
गाविलगड